श्रीमंत नामदार जगन्नाथ शंकरशेट उर्फ नाना शंकरशेट



यांचे
चरित्र

लेखक—विनायकराव माधवराव पितळे.

S. P. AGASKAR

श्रीमंत नामदार जगन्नाथ शंकरशेट
ऊर्फ नानाशंकरशेट
ह्यांचें चरित्र.

श्रीमंत नामदार जगन्नाथ शंकरशेट ऊर्फ नानाशंकरशेट

ह्यांचें चरित्र.

सत्कर्मयोगें वय घालवावें
सर्वांमुखीं मंगल बोलवावें.

रामदास.

हा ग्रंथ

विनायकराव माधवराव पितळे,
संपादक—माजी दैवज्ञमित्र

ह्यांनीं
अनेक ग्रंथांच्या, कागदपत्रांच्या आणि अवांतर
माहितीच्या आधारें लिहिला.

तो " मुंबईवैभव " प्रेसमध्यें छापला.

मुंबई.

सन १९१६.

किंमत २ रुपये.

मुद्रक-रा. **चिंतामण सखाराम देवळे**, मुंबईवैभव प्रेस, सर्व्हंट्स् ऑफ् इंडिया सोसायटीज् होम, सँढर्स्ट रोड, गिरगांव-मुंबई.

प्रकाशक,
विनायकराव माधवराव पितळे, चिराबझारनजिक
घर नंबर १३७-कॅव्हेल-मुंबई.



श्रीमंत महाराजाधिराज राजराजेश्वर सवाई तुकोजीराव
महाराज होळकर, इंदूर.

समर्पण.

सकलगुणैश्वर्यसंपन्न इंदुराधिपति
श्रीमंत महाराजाधिराज राजराजेश्वर
सवाई श्री तुकोजीराव महाराज होळकर
यांचे चरणसेवेशीं,

महाराजांची विद्याभिवृद्धीविषयींची लालसा, प्रजावात्सल्य व

मुख्यत्वेंकरून महाराष्ट्रभाषेच्या उन्नत्यर्थ साह्य

करण्याचें प्रशंसनीय औदार्य इत्याद्यनेक

अनुपमेय गुणगणांवर भृंगवत्

लोलुप होऊन

हें एका थोर, सन्मान्य आणि अनुकरणीय पुरुषश्रेष्ठाचें

अल्प चरित्र अत्यंत कृतज्ञता बुद्धीनें आणि

परमादरानें ग्रंथकर्त्यानें

अर्पण केलें असे.

The Bombay Art Printing Works, Fort.

प्रस्तावना.

पवित्र होईन चरित्र उच्चारें ॥
सत्याच्या आधारें गोजिरीया ॥

तुकाराम.

वाणी आणि मन हीं पवित्र होण्याकरितां पुराण पुरुषांचीं चरित्रें लिहिणें हें ज्यांच्या वांट्यास येतें, ते चरित्रकार आपणास भाग्यवान् समजतात. ह्यांत एकाप्रकारचा आत्मोद्धार आहे, कारण परममंगल विभूतींच्या समागमांत मुमुक्षूंस जसा अप्रतिम लाभ धडून त्यांचें समाधान होतें, त्यांचप्रमाणें सर्वमान्य व वैभवशाली महाभागाचें चरित्र लिहिण्यांत चरित्रकारास अशा प्रकारच्या नरवराच्या स्मृतिसमागमाचा अलभ्य लाभ अनपेक्षित घडतो.

हा आमचा प्रयत्न तशाच प्रकारचा कांहींसा आहे. कारण कै० **श्रीमंत ना० जगन्नाथ शंकरशेट** ऊर्फ **नानाशंकरशेट** ह्यांचें चरित्र लिहिण्याचा जो कांहीं आमच्या हातून थोडाबहुत प्रयत्न झालेला आहे, तो त्यांचें यश व कीर्ति वाढविण्याकरितां नव्हे. कारण, यांची कीर्ति तर विशाळ आहेच, ती आमच्या प्रयत्नानें कांहीं अधिक वाढावयाची नाहीं. परंतु अशा पुण्यपुरुषाचें चरित्र लिहिल्यानें आमचें मन व वाणी हीं मात्र पवित्र होतील. कारण साधुवर्य **तुकाराम महाराज** या परमंहसानें वर म्हटल्याप्रमाणें **पवित्र होईन चरित्र उच्चारें ॥ सत्याच्या आधारें गोजिरीया ॥** अशी आमची स्थिति झाली आहे.

नानांचा सन १८६५ त काळ झाल्याला आज ५१ वर्षें झालीं. एवढ्या अवधींत **नानां**सारख्या अलौकिक व वंदनपात्र पुरुषाचें एखादें चरित्र यापूर्वीं कधींच प्रसिद्ध व्हावयास पाहिजे होतें. परंतु तसा योग दुर्दैवानें आजपर्यंत आला नव्हता, ही मोठ्या खेदाची गोष्ट होय ! कारण **नानां**च्या निधनानंतर पुढें कांहींकाळपर्यंत त्यांच्या अवघ्या जीवनक्रमाविषयीं घडलेल्या अनेक संस्मरणीय व उपयुक्त गोष्टी लोकांच्या स्मृतींतून गेल्या नव्हत्या व नजरेपुढें असलेल्या अगदीं ताज्या गोष्टी **नानां**चा जीवनवृत्तांत लिहिण्यास त्या वेळीं अत्यंत उपयोगी पडल्या असत्या. म्हणून अशाप्रकारचा प्रयत्न त्यावेळीं अवश्य व्हावयास पाहिजे होता. अशा गोष्टींचें पूर्णपणें ज्ञान असलेलीं जुनीं माणसें आज फारशीं हयात नाहींत, ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय ! ! आणि ह्या दृष्टीनें आपली मोठी हानी झालेली आहे ! ! आणखी दुसरें असें कीं, प्रस्तुतच्या चरित्रप्रकाशनास आज जो एवढा कालावधि लागला, याचें कारण पूर्वींच्या काळीं हल्लींप्रमाणें ग्रंथकर्तृत्वाविषयीं व प्रकाशनाविषयीं आपल्या लोकांची फारशी प्रवृत्ति नव्हती. आणखी त्यांतल्यात्यांत चरित्रविषयक किंवा ऐतिहासिक ग्रंथ निर्माण करणें फारच विरळा ! किंबहुना नाहीं म्हणणें धाडसाचें होणार नाहीं ! ! त्या वेळीं कै० **सदाशिव काशीनाथ छत्रे**, कै० **बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर**, कै० **हरि केशवजी**, कै० **गोविंद नारायण माडगांवकर** अशासारखीं अगदीं शेलकीं माणसें ‘ ग्रंथकार’ या नात्यानें मधून मधून झळकत होतीं. त्यांच्या हातून अनेक उपयुक्त विषयांवर ग्रंथ निर्माण झाले, पण ते फारच थोडे.

तथापि अगदीं अलीकडे ह्मणजे सुमारे १५–२० वर्षांच्या पूर्वीं **नानां**सारख्या नामांकित नरवराचें चरित्र लिहिण्याचा प्रयत्न आजपर्यंत एक नव्हे, दोन नव्हत, तर जवळ जवळ सहा सात विद्वानांनीं केला होता. तथापि तो त्यांपैकीं एकाच्याही हातून सिद्धीस गेला नाहीं, ही मोठ्या खेदाची गोष्ट होय. प्रथम कै० **नामदार जव्हेरीलाल उमियाशंकर याजनिक** यांनीं **नानां**चें चरित्र इंग्रजींत प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न केला; पण तो निष्फळ झाला. पुढें प्रसिद्ध **कौमुदीमहोत्साहकार**

गुरुवर्य कैलासवासी **रामचंद्र भिकाजी गुंजीकर** यांनीं **नानांचे** चरित्रलेखनाविषयीं बरीच खटपट केली. परंतु दुर्दैवानें ती सिद्धीस गेली नाहीं. या विद्वद्वर्यांच्या हातून जर **नानांचें** चरित्र लिहिलें गेलें असतें तर तें खास अप्रतिम वठलें असतें, यांत तिलप्राय शंका नाहीं. त्यानंतर गुरुवर्य कै० **नारायण आपाजी दीक्षित** यांनीं कांहींसा प्रयत्न करून **नानांच्या** चरित्रासंबंधानें थोडेंबहुत लिहिलें होतें, असें आह्मांस चांगल्या आधारावरून कळतें. परंतु त्याचें काय झालें तें परमेश्वर जाणे. पुढें गुरुवर्य रा. रा. **भास्कर बल्लाळ निमकर, नानाच्या** शाळेंतील फर्स्ट ॲसिस्टन्ट यांनींही **नानांचें** चरित्र लिहिण्याचा उपक्रम केला होता, परंतु तें काम अपुरेंच राहिलें. या सर्वांचें कारण वरील विद्वान् लोकांची अपात्रता नव्हे, तर **नानांच्या** अवघ्या चरित्रक्रमाविषयीं विश्वसनीय माहितीचा अभाव व अनुपलब्धता. ह्मणून त्यांस वरील सारखा पवित्र प्रयत्न निरुपायानें सोडून देणें भाग पडलें. आणखीही एकादोघांनीं **नानांचें** चरित्र लिहिण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांचीही तीच अवस्था झाली. एतावता सर्वांचेही प्रयत्न निर्फळ झाले, ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय ! !

वर लिहिलेल्या विद्वान् गृहस्थांखेरीज दापोली मुकामीं रहात असलेले कै. **सखाराम बापूजी दांडेकर** वकील ह्यांनीं **नानांच्या** चरित्रांतील गोष्टींचें चांगलें टिप्पण करून संग्रहीं ठेविलें होतें, असें आह्मास चांगल्या आधारावरून कळतें. कै. **दांडेकर** हे **नानांचे** उत्तरकालिन होते व त्यांनीं **नानांची** अमदानी प्रत्यक्ष पाहिलेली होती. आणि त्यांचा व **नानांचा** कारणपरत्वें पत्रव्यवहारही होत असे. कै. **दांडेकर** वकील यांनीं **नानांचें** चरित्र लिहिण्याकरितां एकंदर माहितीचीं टिप्पणें तयार केलीं होतीं. पुढें कालांतरानें वृद्धापकाल व संततीवियोग यांनीं त्यांचे मस्तकास भ्रम होऊन त्यांतच त्यांचा अंत झाला. त्यामुळें चरित्र लिहिण्याचें काम तसेंच राहून गेलें. तथापि त्यांनीं लिहून ठेविलेलीं **नानांच्या** चरित्रांतील उपयुक्त टिप्पणें जर आह्मांस लाभलीं असतीं, तर आह्मी

लिहिलेल्या ह्या चरित्रावर कांहीं अधिक प्रकाश निःसंशय पडला असता. पण तसा योग तूर्त नाहीं, ह्याबद्दल आह्मास फार वाईट वाटतें.

आमचेही मनांत **नानांचें** एखादें चरित्र लिहावें, असे फार दिवसांपासून होतें व त्याप्रमाणें आह्मी लिहिण्याचा उपक्रम केलाही. परंतु चरित्रविषयासारखा सार्वजनिक व विश्वसनीय इतिहास लिहून 'ग्रंथकार' या नात्यानें विद्वान् बहुजनसमाजापुढें येण्याची, स्वतःची यत्किंचितही पात्रता नसतां आमच्या सारख्या अनधिकारी माणसानें भलत्याच गोष्टीची हांव धरून जनांत आपलें हांसें करून घेण्यासारखें होय. आणखी हें आकाशांतील चंद्रम्याला हात घालण्याचा वेडगळ प्रयत्न करण्यासारखेंच आहे. या भीतीस्तव आणखी विशेषेंकरून उपरीनिर्दिष्ट चार पांच विद्वान् व योग्य पुरुषांनीं चरित्र लिहिण्याचे प्रयत्न केले असतां ते निष्फळ झाले, ही दहशत अंतःकरणांत उद्भवल्यामुळेंच आणि चरित्रलेखनास ज्या गोष्टींची अत्यावश्यकता होती त्या महत्वाच्या गोष्टी त्यावेळीं आह्मास फारशा उपलब्ध झाल्या नव्हत्या ह्मणून अवश्य तेवढ्या साधनसामुग्रीच्या अभावीं आम्हासही हा प्रयत्न कांहींकाळपर्यंत सोडून देणें भाग पडलें. तथापि आपला स्वीकृत प्रयत्न सोडून देऊन अंगीं पात्रता येईपर्यंत वाट पहात बसणें बरें नाहीं. कारण कविचूडामणि **मोरोपंत** यांनीं ह्मटलें आहे कीं, **कां न सदन बांधावें कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस,** ह्मणून आह्मी पुन्हां प्रयत्नास लागलों.

आतां खुद्द आमच्या ग्रंथलेखनाच्या सामुग्रीसिद्धीविषयीं दोन शब्द लिहिणें इष्ट होय. आम्ही हा ग्रंथ लिहिण्यास सुरवात करण्यापूर्वी **नानांच्या** चरित्रासंबंधानें माहिती गोळा करण्याच्या प्रयत्नास लागलों. ती माहिती आम्हास कशी उपलब्ध झाली, त्याबद्दल दोन शब्द लिहूं. हल्लीं **नानाशंकरशेटच्या** गादीवर विद्यमान असलेले त्यांचे नातू **श्रीमंत रावजी विनायकराव जगन्नाथ शंकरशेट, जे. पी., ऑनररी मॅजिस्ट्रेट** यांचे पूर्वाश्रमीचे तीर्थरूप रा. रा. **बाळकृष्ण गणोबाशेट मुर्कुटे** हे **नानांचे** अगदीं नजिकचे आप्तविषयक असून खुद्द

नानांजवळ ते स्वतः खासगी काम पहात असत. त्यांच्याकडून आम्हांस **नानां**च्या पूर्वजांपासून तों त्यांच्या अमदानीपर्यंतचा पुष्कळ विश्वसनीय असा खासगी इतिहास मिळाला. सदरहू इतिहास उपरीनिर्दिष्ट रा. **बाळकृष्ण गणोबाशेट** यांनीं आपले तीर्थरूप रा. **गणोबाहरीशेट मुर्कुटे** यांचे तोंडून ऐकिला होता, तो त्यांनीं लिहून ठेविला होता. विद्यावृद्धीविषयक आणि राजकीय ह्या विषयांची माहिती आह्मास कै. रा. रा, **बाळकृष्ण निळाजी पितळे**–पुढें डॉ. **पितळे,–एल्‌. एल्‌. डी.**–यांनीं सन १८६७ साली **दैवज्ञज्ञातीय क्यालेंडर** या नांवांचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे, त्यावरून मिळाली. सदरहू पुस्तकांत **नानां**च्या राजकीय व सामाजिक बाबतींसंबंधानें बराच उल्लेख केलेला आहे, त्याचा आह्मांस फार उपयोग झाला, हें आम्ही प्रांजलपणें या ठिकाणीं कबूल करतों. म्हणून आम्ही **डॉ. पितळे** यांचे फार ऋणी आहोंत. सदरहू पुस्तकाच्या अभावीं आह्मास **नानां**च्या विद्यावृद्धीविषयक, राजकीय, सामाजिक वगैरे बाबतींविषयीं माहिती लिहिणें शक्यच नव्हतें.

नानांच्या सार्वजनिक, परोपकारपरायणतेच्या वगैरे गोष्टी कै. **गोविंद नारायण माडगांवकर** यांनीं सन १८६३ सालीं प्रसिद्ध केलेल्या **मुंबईचें वर्णन** नामक पुस्तकावरून घेतलेल्या आहेत. सदरहू पुस्तकाचा आम्हांस फार उपयोग झाला, ह्मणून आम्ही वरील ग्रंथकर्त्यांचे फार आभारी आहोंत. बाकी अवांतर माहिती आम्हास इतर साधनांनीं उपलब्ध झाली.

अठराव्या भागांत **आख्यायिका** या सदरांत **नानां**च्या शहाणपणाच्या, धूर्ततेच्या, दूरदृष्टीच्या, प्रसंगावधानाच्या आणि त्याचप्रमाणें एकोणिसाव्या भागांत **नानाविषयीं ध्यानांत ठेवण्यासारख्या कांहीं विशेष गोष्टी** या सदरांत आलेल्या अनेक गोष्टी त्यावेळच्या कांहीं वृद्ध गृहस्थांच्या तोंडून ऐकिलेल्या गोष्टी होत. त्यांमुळें वाचकांचें बरेंच मनरंजन होऊन त्यांस बोधप्राप्ति होईल, अशी आह्मांस उमेद आहे.

वरील दोन पुस्तकांखेरीज ह्या ग्रंथास ज्या अनेक ग्रंथांचें साह्य घेतलें, त्यांचीं नांवें पुढें दिलेल्या यादींत नमूद केलेलींच आहेत. ह्मणून त्या त्या ग्रंथकाराचे आह्मी व्यक्तिशः फार आभारी आहोंत.

आमचा ग्रंथ बहुतेक लिहून पुरा झाल्यावर त्याची हस्तलिखित प्रत, ज्या मान्यवर पुरुषानें आपल्या दीर्घ आयुष्याचा बहुतेक काळ उपयुक्त ग्रंथसृष्टि निर्माण करण्यांत वेंचला, ते प्रसिद्ध विद्वद्वर्य कै. **रावसाहेब विनायक कोंडदेव ओक** यांस दाखविली व त्यांनीं आपला अमोल्य वेळ खर्च करून वाचून पाहिली, ती त्यांस फार आवडली आणि त्यांनीं आम्हांस ग्रंथप्रसिद्धीविषयीं मोठें उत्तेजन दिलें. आणखी त्यांतल्या त्यांत त्यांनीं कांहीं उपयुक्त सूचनाही केल्या. त्यांचा आह्मांस फार उपयोग झाला. **रावसाहेब ओक** यांनीं आमच्या विनंतीवरून ह्या चरित्रास प्रस्तावना लिहिण्याचें संतोषानें कबूल केलें होतें. परंतु आमच्या दुर्दैवानें ते ग्रंथप्रकाशनापूर्वींच कैलासवासी झाले, त्याला इलाज नाहीं.

पुढें हें चरित्र संपूर्ण लिहून झाल्यावर तें छापण्यापूर्वीं कोणा तरी योग्य पुरुषाच्या नजरेखालून एकदां घालावें ह्मणून जे वयोवृद्ध असूनही अद्यापपर्यंत विद्याव्यासंगांत सदा निमग्न असतात, आणखी विद्यानंदाचा महासुखानुभव घेतात, आणखी विद्याव्यसनाविषयीं ज्यांची अद्यापपर्यंत अतृप्तताच आहे, ते प्रसिद्ध विद्वन्मुकुटमाणि **लेफ्टनन्ट कर्नल् कान्होबा रणछोडदास कीर्तीकर, आय. एम. एस्.** यांस दाखविलें. तें त्यांनींही मोठ्या आवडीनें वाचून पसंत केलें आणि आह्मांस तें छापून प्रसिद्ध करण्याविषयीं बरेंच प्रोत्साहन दिलें; याबद्दल **डॉ. साहेबांचे** आह्मी अत्यंत आभारी आहोंत.

आतां खुद्द ग्रंथप्रकाशनाच्या कामीं ज्यांनीं ज्यांनीं ह्मणून आह्मांस पूर्ण सहाय्य केलें, त्यांचे त्यांचे व्यक्तिशः आभार मानणें इष्ट होय.

प्रथम आमचे स्नेहांकित कै. **नानाभाई आनंदराव पेणकर** यांनीं आम्हांस चरित्रलेखनाच्या बाबतींत मनापासून बरीच मदत केली, ह्याबद्दल आह्मी त्यांचे फार आभारी आहोंत. **नानांच्या** चारित्रप्रसिद्धिवि-

षयीं त्यांनीं बरीच हौस बाळगिली होती, परंतु खुद्द ग्रंथप्रकाशन पाहण्यास ते राहिले नाहींत, याबद्दल आह्मास परमावधीचें वाईट वाटतें.

प्रस्तुत ग्रंथास बाह्यशृंगारानें जर कांहीं मनोरमता आली असेल, तर तिचें श्रेय आमचे परममित्र रा. रा. **दत्ताराम काशीनाथ मालनकर**, सुप्रसिद्ध **नवयुग** या मासिक पुस्तकाचे कर्ते व **बॉंबे आर्ट प्रिंटिंग वर्क्स**चे मालक त्याचप्रमाणें प्रसिद्ध चित्रकलापटु रा. रा. **शांताराम पुरुषोत्तम आगासकर** आणि रा. रा. **शांताराम केशव सुरावकर** आणखी अभिनव फोटोग्राफर रा. रा. **मोरेश्वर नारायण कीर्तीकर** यांजकडे आहे., आणखी वरील गृहस्थांनीं आम्हांस वेळेवर मदत केली म्हणून आम्ही त्यांचे फार आभारी आहोंत.

आणखी एका गोष्टीचा या ठिकाणीं उलगडा करणें जरूर आहे. ती ही कीं, आह्मी प्रथम सन १९१४ त **नानां**चें चरित्र छापण्याची सुरवात केली आणखी त्याप्रमाणें आह्मीं लोकांस जाहीरही केलें. कांहीं वर्गणीदारांनीं अगाऊ वर्गणी रु. १॥ भरली. कांहींकांनीं रु. १ भरून पुस्तकें तयार झाल्यावर आठ आण्याची व्ही. पी. करण्यास सांगितलें. याप्रमाणें कोणी सबंध, कोणी अंशतः अशी वर्गणी भरली. पुढें आमचें पुस्तक छापत असतांना आमच्यावर दुर्दैवानें अनिर्वाच्य प्रसंग येऊन आजारीपणामुळें आमची अत्यावस्था झाली आणि पुस्तक छपाईचें काम निरुपायानें बंद ठेवावें लागलें. कल्पनेबाहेर पुस्तक प्रसिद्धीस कालावधि लागल्यामुळें ज्यानीं आगाऊ वर्गणी भरली होती, त्यांची पत्रांवर पत्रें येऊं लागलीं. त्यांनीं आमच्यावर अनेक आक्षेप काढले व बोलूं नये किंवा लिहूं नये तें तें त्यांनीं केलें. वर्गणीदार तरी काय करतील ! दोन वर्षांइतका दीर्घकाळ मध्यें लोटला, तेव्हां त्यांचा धीरभंग होईल, ही गोष्ट अगदी स्वाभाविकच होय ! ह्मणून वर्गणीदारांवर याबद्दल आम्ही रुसवा न करतां उलट त्यांनीं इतकावेळपर्यंत धीर धरला, ह्याबद्दल त्यांचे आह्मी फार आभार मानतों.

पण इतक्यानेंच आमच्या प्रस्तावनेची परिसमाप्ति होत नाहीं. कारण मुख्य गोष्ट तर अद्याप सागणें राहिलेलीच आहे. ती या ठिकाणीं न सांगितली तर आमच्याकडे अनुदारपणाचा व कृतघ्नतेचा दोष येईल. ती गोष्ट ही कीं, आमचें पुस्तक छापण्याचें काम दोन वर्षांपूर्वी जेव्हां बंद पडलें, तेव्हां अगदीं आतांपर्यंत तें पुन्हां छापून प्रसिद्ध करण्याबद्दलची आमची आशा बहुतेक नाहींशी झाली होती. पण या ठिकाणीं नमूद करण्यास आह्मास अत्यंत संतोष वाटतो कीं, आमचे मित्रवर्य **प्रोफेसर विनायकराव नानाभाई हाटे, बी. एस्. सी.** आणि मित्रवर्य रा. रा. **सदाशिव नानाभाई हाटे, एल्. सी. ई., बी. एस्. सी.** या विद्वान् बंधुद्वयानें पुढाकार घेऊन रा. रा. **द्वारकानाथ त्रिंबक वइउडे**, रा. रा. **नारायण सदाशिव देवरुखकर बी. ए; एल्. लल्. बी**, रा. रा. **मोठाभाई गणपतराव शेटे**, रा. रा. **शांताराम गणपतराव शेटे** आणि रा. रा. **वामनराव गणपतराव शेटे** ह्या मित्रमंडळीच्या साह्यानें हें महा खटपटीचें व श्रमाचें काम मोठ्या उत्साहानें व हौसेनें तडीस नेलें, ह्याबद्दल तर ते सर्वजण आमच्या वाचकांच्या प्रशंसेस पात्र आहेतच, पण खुद्द आमच्यावर त्यांचे किती उपकार झाले आहेत, हे इकडे शब्दांनीं व्यक्त करण्यास आह्मी केवळ असमर्थ आहोंत. कारण मृत्युपंथास लागलेल्या शुष्कलतेस त्यांनीं अमृतघनाचें सिंचन करून तिला सजीव केली आहे, हें म्हणणें अप्रासंगिक होणार नाहीं, असें आह्मांस वाटतें.

परिशिष्ट ५ मध्यें दिलेला **नानाशंकरशेट**वर पोवाडा हा आम्हास आमचे सन्माननीय मित्र रा. रा **गजानन भाऊ वैद्य** यांजकडून जसा मिळाला तसाच आम्ही छापला आहे. हा संपूर्ण नाहीं, याबद्दल फार दुःख वाटतें. कारण तो फारच गोड आहे. हा पोवाडा सबंध मिळविण्यास आम्हीं आमची पराकाष्ठा केली. **नानां**च्या पूर्वजांचें मूळ गांव मुरबाड या ठिकाणीं आणि त्याचप्रमाणें भिवंडी, शहापूर, कल्याण, वसई या ठिकाणीं स्वतः जाऊन फार बारकाईनें शोध केला, पण अद्यापपावेतों त्याचा तपास लागला नाहीं. हा पोवाडा **दैवज्ञ समाचारांत १८८०** च्या व १८८१ च्या कांहीं अंकांत प्रसिद्ध झाला आहे. **दैवज्ञ समाचाराचे**

माजी संपादक व मालक रा. रा. **गंगाधर आनंदराव मिरकर** यांजकडे चवकशी केली असतां त्यांच्याकडे **दैवज्ञसमाचाराची** जुनी फाईल संग्रहाला नाहीं, असें कळलें म्हणून परिशिष्टांत दिलेल्या तुटक पोवाड्यावरच तूर्त काम भागवावें लागतें. हा पोवाडा सबंध जर कोणाच्या संग्रहास असल्यास त्यांनीं आमचेकडे पाठविण्याची अवश्य कृपा करावी.

परिशिष्ट ६ मध्यें दिलेला पोवाडा सुमारें ऐशीं वर्षांपूर्वीं भिवंडींत हिंदु-मुसलमानांत झालेल्या मारामारीवर आहे. **नानाशंकरशेट**वरील रचलेल्या पोवाड्यासंबंधानें शोध करीत असतां हा पोवाडा आम्हांस वसई मुक्कामीं रहात असलेले रा. रा. **दिनानाथ रघुनाथ हाटे** यांजकडून आमचे मित्र रा. रा. **हरि गोविंद वाघ** यांचे मार्फत सबंध मिळाला, ह्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहोंत.

आह्मांस अगदीं आजपर्यंत नानांविषयीं ज्या ज्या गोष्टी समजल्या, त्या त्या गोष्टींचा आह्मी ह्या ग्रंथांत यथास्थळीं समावेश केलेलाच आहे. या खेरीज नानांविषयीं कोणास कांहीं अधिक माहिती असल्यास ती त्यांनीं आह्मांस कृपा करून कळवावी. ह्मणजे ह्या ग्रंथाची पुनरावृत्ति काढण्याचा जर सुयोग आला, तर त्या आह्मीं त्यांत आनंदानें अवश्य ग्रथित करूं. कारण आह्मी काय किंवा कोणी काय, अधिक परिश्रम किंवा अधिक शोध केला तर **नानां**बद्दल आणखीही कांहीं अधिक माहिती उपलब्ध होण्याचा पुष्कळ संभव आहे.

सरते शेवटीं प्रापंचिक संकटपरंपरेंत निमग्न असल्यामुळें चित्तस्वास्थ्य नसतां हा ग्रंथ लिहिला गेल्यामुळें स्वाभाविक त्यांत अक्षम्य प्रमाद राहून गेले असतील. तथापि आमचे क्षमाशील वाचक तिकडे दुर्लक्ष करतील, अशी आम्हांस पूर्ण आशा आहे.

आह्मी दोन वर्षांपूर्वीं जाहिरातींत प्रसिद्ध केल्याप्रमाणें आगाऊ वर्गणीदारांचीं नांवें ग्रंथाच्या शेवटीं नमूद करण्याचें अभिवचन दिलें होतें. पण लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं, चालू ग्रंथाचा विस्तार आमच्या अदमासाबाहेर वाढल्यामुळें आह्मांस निरुपायानें तसें करतां आलें नाहीं. शिवाय चालू महायुद्धामुळें सर्व जिनसांची किंमत आटोक्याबाहेर वाढल्यामुळें आह्मांस नांवें प्रसिद्ध करण्याची अगदीं सवड करतां आली

नाहीं. ह्मणून आमचे वर्गणीदार आमच्यावर रोष करणार नाहींत, अशी आह्मांस बळकट आशा आहे. तथापि नांवें प्रसिद्ध करून ग्रंथाची जागा निरर्थक अडविण्यापेक्षां त्याचें उटें, आह्मी इतर महत्वाच्या गोष्टी ग्रंथांत सामील करून ग्रंथास अधिक उपयुक्तता आणून भरून काढलें आहे.

ह्या ग्रंथांत **नानांचा** पालवावरील वाडा, **नानांच्या** वाड्याचा दिवाणखाना, देवघर, जिना, भवानीशंकरचा बंगला, भवानीशंकरचें देऊळ, आपला स्वत:चा, ज्येष्ठ चिरंजीव रा० रा० **मधुसूदनराव**, लहान मुलांचा ग्रूप वगैरे चित्रें श्रीमंत रा. रा. **रावजी विनायकराव ज०शं०** यांनीं स्वखर्चानें छापविलीं. त्यामुळें ग्रंथास विशेष शोभा आली आहे, हें सांगणें नलगे !

आमचा ग्रंथ सबंध छापून निघाल्यावर आमच्या कांहीं हितचिंतकांच्या इच्छेनुरूप **कै० श्री० जगन्नाथ शंकरशेट** यांचे चिरंचीव **श्रीमंत विनायकराव** ऊर्फ **बाबासाहेब** आणि नातू **भवानीशंकर** ऊर्फ **बाळासाहेब** यांचे चेहरे आणि त्याचप्रमाणें इंदुराधिपति **श्रीमंत सवाई तुकोजीराव होळकर** यांचा चेहरा वगैरे चित्रें मागाहून घातलीं असल्यामुळें तीं चित्रानुक्रमणिकेंत नमूद करतां आलीं नाहींत, ही निरुपायाची गोष्ट होय !

मुंबईवैभव प्रेसचे व्यवस्थापक व त्यांचे हाताखालची मंडळी या सर्वांनीं आह्मांस छपाईचे कामांत चांगली मदत केली आणि छपाईसंबंधानें पुस्तकास सुबकता आणण्याचा शक्य तितका प्रयत्न केला, याबद्दल आह्मी त्या सर्वांचे फार आभारी आहोंत.

सरतेशेवटीं ह्या ग्रंथासंबंधानें जिवापाड परिश्रम करून हरप्रयत्नांनीं तो वाचकांपुढें सादर केलेलाच आहे. तथापि हल्लींच्या चालू असलेल्या महायुद्धामुळें सर्व जिनसांची किंमत आटोक्याबाहेर वाढली. तथापि अशा महत्संकटकाळींही ग्रंथाची किंमत न वाढवितां तो कसाबसा पुरा करून आज वाचकांच्या हातांत पडत आहे.

मुंबई,
ता० १५ सप्टेंबर १९१६

विनायकराव माधवराव पितळे,
ग्रंथकार.

अनुक्रमणिका.

परिशिष्टें:—

चित्रांची अनुक्रमणिका.

ह्या चरित्रास ज्या ज्या ग्रंथांचा आधार घेतलेला आहे त्यांचीं नांवें.

1. Daiwadnya Dnyatiya Calendar and Directory by B. N. Patale Esqre.
2. Speeches and addresses of Sir Bartle Frere, G. C. S. I; K. C. B., D. C. L. by B. N. Pitale Esqre.

३. मुंबईचें वर्णन–गोविंद नारायण माडगांवकरकृत.

४. हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास–ब्रिटिश रियासत– श्री. गोविंद सखाराम सरदेसाईकृत.

५. साष्टीची बखर–निसबत काव्येतिहास–संग्रह.

६. श्रीमंत बाजिराव बल्लाळ पेशवे यांचें चरित्र, ना. वि बापटकृत.

७. रावबहादुर नाना मोरोजी यांचें चारित्र, श्री. भिडेकृत.

८. रावबहादुर हरिश्चंद्र कृष्ण जोशी यांचें चरित्र, वि. कों. ओककृत.

९. आंग्रे घराण्याचा इतिहास–आवृत्ति २ री.

१०. मुंबईनो बहार–गुजराथी.

11. Rise and growth of Bombay Municipal Govrnment by Hon'ble Mr. D. E. Wacha.
12. Jalbhoy's Portrait Gallery of Western India.
13. Financial Chapter on the history of the Bombay city by Hon'ble Mr. D. E. Wacha
14. Bombay–Retrospect–by S.M. Edwards Esqre.I.C.S.
15. Culture–By B. B, Nagarkar Esqre.

आणखी पत्रें, यादी व अवांतर माहिती.

- नारायणशेट.
  - माणिकशेट.
    - बाबुलशेट.
      - १ शंकरशेट
        - पहिल्या कुटुंबापासून
          - १ कृष्णाजी
          - २ रामचंद्र
        - दुसरें कुटुंब भवानीबाई यांजपासून.
          - १ भिंवराबाई उर्फ आकाबाई.
            - माधवराव भाऊ दत्तक.
          - २ **जगन्नाथ** ऊर्फ **नाना**
            - विनायकराव × लक्ष्मीबाई
              - भवानीशंकर
              - रावजी ऊर्फ रावसाहेब--दत्तक.
                - १ मधुसूदन.
                - २ विनायकराव.
                - ३ भालचंद्र.
                - ४ प्रभाकर.
                - ५ वसंतराव.
          - ३ परशुराम
          - ४ माधवराव.
      - २ गणबाशेट
        - रामचंद्र–दत्तक.
          - जनार्दन.
            - पुरुषोत्तम.
              - मोठाभाई.

१. शंकरशेट यांनीं आपला दुसरा मुलगा रामचंद्र यांस आपले कनिष्ठ बंधु गणबाशेट यांचे मांडीवर दत्तक दिला.

२. शंकरशेटचा पहिला मुलगा कृष्णाजी हा दुसरा मुलगा रामचंद्र आपल्या भावाच्या मांडीवर दत्तक दिल्यानंतर थोडे दिवसांनीं अल्पवयांतच वारला.

३. हा अल्पवयींच पुष्करणींत बुडून मरण पावला.

४. नानांचा नातू भवानशिंकर हा अल्पवयीं वारल्यामुळें नानांचे गादीस औरस संतती राहिली नाहीं ह्मणून लक्ष्मीबाईनें रावजी ऊर्फ रावसाहेब यांस दत्तक घेतलें. हेच हल्लीं नानाशंकरशेटच्या गादीवर विराजमान आहेत.

श्रीमंत नामदार जगन्नाथ शंकरशेट ऊर्फ नाना शंकरशेट यांचें चरित्र.

भाग पहिला.

विषयाचें अभिनंदन.

अहह ! महतां निःसीमानश्चारित्रविभूतयः ।

भर्तृहरि.

Lives of great men all remind us,
We can make our lives sublime.

Longfellow.

श्रीमद्भगवद्गीतेंत ह्मटलें आहे कीं,

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥

अशा आपल्या आचरणानें लोकांस अनुकरण करण्यास लावणाऱ्या मानवरत्नांनीं ही वसुंधरा शोभायमान झाली आहे. ह्या सर्व रत्नांत आपल्या कर्तबगारीनें ह्मणजे सत्यनिष्ठा, सत्वशीलता, अढळ निश्चय, दीर्घोद्योग, सार्वजनिक हितबुद्धि, कर्तव्यदक्षता, स्वदेशभक्ति इत्यादि अलौकिक आणि असा-

मान्य गुण ज्यांनीं आपल्या चरित्रक्रमांत प्रगट करून स्वतःचें नांव अजरामर करून ठेवलेले महाभाग, हींच नररत्नें अत्यंत श्रेष्ठ होत. कविचूडामणि **मोरोपंतां**नीं असें ह्मटलें आहे कीं,

> **सत्पुरुषकथा अद्भुत,**
> **रसदा ह्मणतों इलाच सुरभी मी ॥**

सत्पुरुषांची अद्भुत कथा रसवंती असून ही केवळ कामधेनूच आहे ! ग्रीस देशामध्यें **प्लुटार्क** नांवाचा एक नामांकित इतिहासकार होऊन गेला. त्याचा अत्यंत प्रसिद्ध व सर्व जगाच्या प्रीतीस पात्र झालेला ' **थोर लोकांचीं चरित्रें** ' या नांवाचा एक प्रख्यात ग्रंथ आहे. ह्या ग्रंथांत त्यानें ग्रीस आणि इताली देशांत ज्या मोठमोठ्या विभूति होऊन गेल्या, त्यांचा वृत्तांत दिला आहे. त्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत त्यानें असें ह्मटलें आहे कीं, 'मला या लोकांच्या उज्ज्वल चरित्रांचें मनन केल्यापासून जो लाभ झाला, तो सांगतां पुरवणार नाहीं. जेव्हां जेव्हां कांहीं अनुचित कृत्यांकडे माझ्या मनाची प्रवृत्ति होई, किंवा सदाचरणाविषयीं उत्साह कमी झालासा वाटे, तेव्हां तेव्हां मी त्यांचीं चरित्रें वाचीं; तेणेंकरून मला पुनः हुशारी वाटे. ' या उताऱ्यावरून थोर पुरुषांचीं चरित्रें परिसासारखीं असतात, यांत शंका नाहीं. ह्या परिसाचा लाभ होण्यास जगतास भूषणभूत जीं रत्नें देशांत निपजलीं, त्यांचीं चरित्रें प्रसिद्ध झालीं पाहिजेत.

आह्मांस **श्रीमंत नामदार जगन्नाथ शंकरशेट** यांचें चरित्र लिहिण्याची स्फूर्ति कशी व केव्हां झाली, याबद्दलचा थोडासा चमत्कारिक पूर्वेतिहास येथें दिल्यास अप्रासंगिक होणार नाहीं, असें आह्मांस वाटतें.

आह्मी आमच्या बाळपणांत दररोज रात्रौ भोजनोत्तर शिळो-

ल्याच्या वेळीं आमच्या कै. परमपूज्य तीर्थरूपांच्या तोंडून रामायणांतल्या व भारतांतल्या रसभरित व गोड कथा आणि त्याचप्रमाणें इतर सत्पुरुषांच्या आणि त्यांतल्या त्यांत **नाना शंकरशेट** यांच्या अद्भुत गोष्टी ऐकाव्या. त्या वेळीं आमचें मन कोंवळें व निर्विकार असल्यामुळें त्या गोष्टी आमच्या अंतःकरणावर बिंबून गेल्या. त्या गोष्टी वारंवार ऐकण्याची आह्मांस केवळ एक प्रकारची चटकच लागून गेली होती. त्या वेळीं **नाना** कैलासवासी होऊन कांहीं फार दिवस झाले नव्हते, तेव्हा त्यांच्याविषयीं घडलेल्या गोष्टी जुन्या झाल्या नव्हत्या. आमचे कै० तीर्थरूप त्या आह्मांस कौतुकपूर्ण वाणीनें सांगत, त्या ऐकून आह्मांस पराकाष्ठेचा आनंद होत असे व आमच्या मनावर एक प्रकारचा चांगला परिणाम होई. कां होणार नाहीं ! कारण एका संस्कृत कवीनें ह्मटलें आहे कीं,

अकर्णमकरोच्छेषं विधिर्ब्रह्माण्डभंगधीः ॥
श्रुत्वारामकथांरम्यां शिरः कस्य न कम्पते ॥ १ ॥

याचा भावार्थ असा आहे कीं, अखिल ब्रह्मांड गोलाचा—पृथ्वीचा—नाश होईल, या भीतीनें ब्रह्मदेवानें शेषाला कर्णहीन—बहिरा—केलें; कारण रसाळ अशी रामकथा ऐकल्यानें कोणाची मान आनंदानें डुलणार नाहीं ? ह्मणजे भगवान् रामचंद्रजीची सुरस कथा ऐकून कोणासही आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं ! तेव्हां शेषानें पृथ्वी आपल्या मस्तकावर धारण केलेली आहे, व त्यानें जर सुरम्य अशी रामाची कथा ऐकली, तर तो आनंदातिशयानें आपली मान डोलवील, व एकदां का त्यानें मान डोलविली, तर ब्रह्मांडगोल खालीं पडून त्याचा नाश होईल; यावरून सुरस कथाश्रवणाचा अद्भुत परिणाम कोणाच्याही लक्षांत येईल. तेव्हां आमच्यासारख्या कोंवळ्या मनाच्या माणसावर त्या वेळीं कै० तीर्थरूपांच्या तोंडून

ऐकलेल्या **नाना शंकरशेट** यांच्या रसभरित कथापरिश्रवणामुळें सुपरिणाम होऊन कां बरें आमचें मन तल्लीन होणार नाहीं ? अर्थात् झालेंच पाहिजे ! आणखी हा त्यांच्या चरित्रलेखनाचा केलेला अल्पसा प्रयत्न त्याच्या परिणामाचीं फळें होत.

थोर पुरुषांचीं चरित्रें वाचणें, हा एक अप्रातिम लाभ होय. अशा माणसांचा चरित्रक्रम कसा होता, त्यांनीं जनहितार्थ काय काय प्रयत्न केले, सांसर्गिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक व लोकोपयोगी बाबतींत त्यांचा एकंदर वर्तनक्रम कसा होता, त्यांनीं मनुष्यमात्रावर किती अगणित उपकार करून आपली कीर्ति अजरामर करून ठेवून आपल्या पाठीमागें लोकांस आपले पोवाडे गावयास लाविलें, इत्याद्यनेक अश्रुतपूर्व गोष्टी वाचून खरोखर मन प्रसन्न होतें, व आपल्या ज्ञानांत पुष्कळ अंशांनीं भर पडते, हा कांहीं थोडा लाभ नाहीं. अशा निरनिराळ्या थोर पुरुषांच्या चरित्रवाचनापासून या संसाररूप महानाटकांत आजपर्यंत कोणकोणतीं पात्रें आपापली भूमिका आटपून निष्क्रमण करतीं झालीं, हें चित्तावर चांगलें ठसून, चांगला मार्ग कोणता आणि वाईट मार्ग कोणता, हें आपणांस सहज निवडतां येतें. खरें सुख, खरें समाधान, खरी प्रतिष्ठा कशांत आहे, हेंही मनुष्यास कळूं लागतें. सहस्रावधि मनुष्यांचा अनुभव थोडक्यांत त्यास आपलासा करतो; त्याच्या योगानें त्याची दृष्टि फांकते. आणि वाचक जर दृढनिश्चयाचा असेल, तर लौकरच तो कोणाचा तरी कित्ता उचलून दर्यावर्दी लोक ध्रुवाच्या ताऱ्यावरून जसें नौकेचें नियमन करतात, त्याप्रमाणें तो त्या निवडलेल्या पुरुषाच्या चरित्रावर सारखी नजर ठेवून तदनुरूप आपलें आयुष्यक्रमण करतो.

अमुक एक गोष्ट वाईट आहे ह्मणून ती करूं नका व अमुक चांगली आहे, ह्मणून तिचें आचरण करा, असें सांगितलें, ह्मणजे मनावर त्याचा व्हावा तसा परिणाम क्वचित् प्रसंगीं होत नाहीं. परंतु तेंच दृष्टान्तानें सांगितलें असतां तत्काळ पटतें. सत्य भाषण, दीन बंधूंची कळकळ, मातृभूमीवरील निस्सीम प्रेम, सुसंगति, सदाचरण इत्यादि गुण हितप्रद आहेत, असें नुसतें सांगून भागत नाहीं. तेंच अमुक अमुक सत्पुरुष झाले, त्यांनीं अमुक अमुक कृत्यें केलीं, अमुक तऱ्हेनें आचरण ठेविलें व त्यामुळें अमुक तऱ्हेचे सुपरिणाम होऊन त्यांची कीर्ति अजरामर झाली, हें वरचेवर सांगितलें, ह्मणजे तें मनावर लवकर ठसतें व पुष्कळ अंशीं परिणामही होतो.

थोर पुरुषांनीं केलेली कामगिरी नेहमीं नजरेसमोर राहिली, तर त्याचा चांगला ठसा मनांत प्रतिबिंबित होईलच होईल. एके ठिकाणीं ह्मटलें आहे—

महा पुरुषांचे इतिहास। ऐकतां वाचतां होय संतोष॥
श्रवणमननें निदिध्यास। संस्कृतीचा जडे कीं॥

मनुष्यप्राणी हा अनुकरणीय आहे. पूर्वीं जे कोणी होऊन गेले, त्यांचा कित्ता गिरविणें, हें आमच्या जणूं हाडींमासीं खिळलें आहे. परंतु आमचें चुकतें तें येथेंच कीं, उत्तम प्रकारचा आदर्श पुढें निवडून घेतां येत नाहीं. शिवाय कोणत्याही तऱ्हेचे परिश्रम न करतां नुसतें शब्दजाल पसरून लोकमान्यतेची बळकट हांव अंतःकरणांत वास करीत असते. पदराला खार लागण्याची वेळ आली, कीं, त्यांचा पाय मागें ! स्वमुखांतून काढलेल्या तत्त्वानुसार आचरण करण्याचा प्रसंग आला, कीं, पोकळ सबबी पुढें आल्याच ! असले प्रसंग आमच्या पुढील पिढीस येऊं नयेत,

ह्मणून आतांपासूनच आपण सावधगिरी बाळगिली पाहिजे. 'शब्द,' आणि 'वचन' ह्यांचें महत्त्व किती आहे, हें त्यांच्या मनांत बिंबविलें पाहिजे; व अशा बाण्याचीं जीं माणसें होऊन गेलीं, त्यांचीं चरित्रें त्यांना ऐकविलीं पाहिजेत. तुकोबारायांनीं ह्मटलेंच आहे कीं,

बोले तैसा चाले । त्याचीं वंदावीं पाउलें ॥

पूर्वीं जे पुरुष होऊन गेले, ते आमच्यासारखेच होते. त्यांच्यांत व आमच्यांत कांहीं फरक नव्हता. आणि फरक असेल तो थोडाफार बुद्धीच्या प्रमाणांत असेल. असें जरी असलें, तरी पूर्वीं जीं विख्यात नररत्नें होऊन गेलीं, त्यांच्यासारखें आह्मांला कां होतां येऊं नये ? त्याला उत्तर हेंच कीं, तसें होण्याचा आमचा निर्धार नाहीं व खरी कळकळ नाहीं. निश्चय असला, ह्मणजे सर्व कांहीं होतें. त्याचप्रमाणें हातून कांहीं तरी कर्तबगारी घडण्यास मानसिक धैर्य चांगलें असलें पाहिजे. सतत उद्योग केला व दगदग सोसली, तरच साधुवर्य कबीरांनीं ह्मटल्याप्रमाणें '**पशूकी होत पन्हया, नरका कछु नही होय ॥ नर करनी करे, तो नरका नारायन होय.**' मात्र तसा प्रयत्न, दृढनिश्चय व अचल धैर्य यांची अवश्यकता आहे. हे गुण अंगीं येण्यास प्रस्तुत चरित्रनायकासारख्या अनेक थोर पुरुषांच्या आख्यायिका हृत्पटलावर कोरून ठेविल्या पाहिजेत.

जे थोर पुरुष पूर्वीं होऊन गेले, त्यांना परिस्थिति अनुकूल असेल, ह्मणून त्यांचें इतकें तेज पडलें असेंही कोणी ह्मणेल, परंतु खरी वस्तुस्थिति तशी नाहीं. आमच्या भरतखंडावर जे हिरे चमकत होते, ते प्रतिकूल स्थितींतच ! आणि तीच प्रतिकूल स्थिति त्यांच्या अजरामर कीर्तीला कारण झाली. शिवाय हा सिद्धांतच आहे कीं,

क्रियासिद्धिः सत्वे भवति महतां नोपकरणे ॥

सुभाषित.

कार्यसिद्धि घडवून आणण्यास थोर पुरुष अनुकूल स्थितीची वाट पहात नाहींत. प्रतिकूल स्थितींतही आपल्या प्रभावाच्या जोरावर मार्ग काढून कार्यसिद्धि करतात. आणि हेंच तत्व प्रस्तुत चरित्राच्या वाचनानें वाचकांच्या सहज लक्षांत येईल.

कालिदास, भवभूति, दंडी, बाण, ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, तुकाराम, वामन, मोरोपंत, रंगनाथ, श्रीधर, महीपति इत्यादि अखिल भरतखंडास केवळ ललामभूत असणारें कविमंडळ, श्रीशिवाजी महाराज, थोरले बाजीराव, पीटर धी ग्रेट, नेपोलियन बोनापार्ट, सर ऐझॅक न्यूटन, जॉर्ज वॉशिंग्टन, साक्रेटीस, ग्लॅड्स्टन, मोहनलाल, ईश्वरचंद्र विद्यासागर, डॉ० राजेंद्रलाल मित्र, सर सालरजंग, सर टी. माधवराव, दादाभाई नौरोजी, न्या० रानडे, न्या० तेलंग इत्यादि विभूतींचा जीवनवृत्तांत वाचल्यानें आपलें मन किती प्रसन्न होतें, आणखी धार्मिक, राजकीय, सामाजिक, नैतिक, वाङ्मयात्मक, विद्याप्रचुर इत्यादि नानाविध गोष्टींच्या परिज्ञानानें मन किती प्रगल्भ होतें, हें कोणास नव्यानें सांगितलें पाहिजे, असें नाहीं. त्याचा आस्वाद ज्यांस माहित आहे, त्यांसच त्याची कल्पना होणार आहे. इतरांस त्याचें वर्म कळणार नाहीं. कारण बाळंतिणीस होणाऱ्या प्रसववेदना बाळंतिणीसच माहीत ! त्या जशा सुइणीस कळत नाहींत, तद्वतच चरित्रवाचनाच्या माधुर्याचा रसास्वाद अनभ्यस्तांस कळणें कठीण !

तात्पर्य, **श्रीमंत जगन्नाथ शंकरशेट** ह्यांचा जीवनवृत्तांत तशाच प्रकारच्या अनेक दृष्टींनीं बोधपर व मननीय झाला आहे. याचें कारण असें आहे कीं, त्यांच्या सार्वजनिक आयुष्यक्रमाचा जेव्हां प्रथम अरुणोदय झाला, त्या काळच्या परिस्थितीचें ऐतिहासिक दृष्ट्या सूक्ष्म रीतीनें निरीक्षण केलें पाहिजे. ह्मणजे अनायासें आपणांस वरील

गोष्टींचें कोडें आपोआप उलगडेल. तें असें कीं, सन १८१८ त **ब्रह्मबादशाहीची–पेशवाईची**–इतिश्री होऊन दयाळु **इंग्रजसरकारचें** राज्य या इलाख्यांत प्रस्थापित झालें, त्या काळापूर्वी अवघी प्रजा पूर्वीच्या राज्यव्यवस्थेस मनस्वी त्रासली असून, तिच्यांत कांहीं त्राण उरलें नव्हतें, हें सर्वांस मागील इतिहासावरून महशूर आहेच. त्या वेळच्या प्रजेस राज्यकारणीं अनिवार संकटें भोगावीं लागलीं. मालमत्ता व जीवित यांची देखील शाश्वती नव्हती. येणें-प्रमाणें संत्रस्त झालेली प्रजा अनेकविध संकटपरंपरेंत निमग्न होती. इतक्यांत त्यांच्या पूर्व संचिताच्या ठेव्याप्रमाणें त्यांस चांगले दिवस पाहण्याचा सुयोग येऊन **इंग्रज** बहाद्दरांचे राज्याची सुरवात झाली. मग सारा नव्यानें डाव सुरू झाला. **इंग्रजांच्या** राज्यकारभाराचा इकडे ' ओ ना मा,' घातला गेला, त्यामुळें आमच्या लोकांची नवलो पालटली. अर्थात् इकडे अनेक नवीन व लोकहितसंबंधीं गोष्टी हळुहळू प्रचारांत येऊं लागल्या. त्यामुळें पूर्वींच्या कारकीर्दी-पेक्षां नवीन कारकीर्द प्रजेस अधिक सुखावह वाटूं लागली. आणखी येथपासूनच आमच्या चरित्रनायकाचा यशोरवि उदयाचलावर येऊं लागला. ह्याचें प्रत्यक्ष प्रमाण हाटलें ह्मणजे ' हर म्याजिस्टीज बेंच ऑफ् जस्टिसीज्' या संस्थेचे अध्यक्ष **ए. आर. स्कोबल एस्कायर** यांनीं एका प्रसंगीं केलेल्या भाषणांत असें स्पष्ट ह्मटलें कीं, ".........for I might say without exaggeration that the life of Mr. Jagannath Sankersett was a history of native advancement in Bombay."

"नामदार जगन्नाथ शंकरशेट यांच्या आयुष्यक्रमाचा प्रारंभ ह्मणजे मुंबई शहरांतल्या एतद्देशियांच्या प्रगमनकालाची केवळ इतिहास होय, असें ह्मणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं, असें मला वाटतें "

याप्रमाणें अशा अगदीं नवीन सुरू झालेल्या कारकीर्दीच्या ऐन आणीबाणीच्या चमत्कारिक परिस्थितींत **नानांनीं** जनतेच्या सुखवृद्ध्यर्थ अविश्रांत परिश्रम करून तिच्याकडून धन्य म्हणवून घेतलें, इतकेंच केवळ नव्हे, तर सरकाराला कोणत्याही बाबतींत न दुखवितां मोठ्या चातुर्यानें व दूरदृष्टीनें सरकाराचें मन राखलें आणि म्हणून रयत व सरकार या उभयतांस राजी ठेवून त्यांजकडून धन्यवाद घेतले, तेव्हां त्यांचें चरित्र अनुकरणीय, अवलोकनीय व बोधप्रद कां होणार नाहीं ! तेव्हां ह्या विषयाची थोरवी कोठवर वर्णन करावी!

> **नरपतिहितकर्ता द्वेष्यतां याति लोके**
> **जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन ॥**
> **इति महति विरोधे विद्यमाने समाने**
> **नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ॥**

' राजाचें हित साधावें तर लोक द्वेष करतात, लोकांचें हित करावें तर राजास राग येतो. अशी दोहोंकडूनही मोठी पंचाईत असते. अशा प्रसंगीं, राजा आणि प्रजा या दोहोंचेंही मन सुप्रसन्न राखणारा चतुर पुरुष फार विरळा ! ' अशी खरी वस्तुस्थिति असल्यामुळें ज्या विभूतीनें राजाचें आणि प्रजेचें हित साधलें, त्या थोर पुरुषाचें वर्णन करण्यास सामान्य पुरुष असमर्थ होय. ती वर्णन करण्यास बहुश्रुत व सरस्वतीमंदिरांतला एखादा भाग्यवान् पुरुष हवा किंवा ईश्वरीप्रसादांतला एखादा ज्ञानसंपन्न कवि !

भाग दुसरा.

पूर्वपीठिका आणि कुलवृत्तांत.

तानितानि कमलानि तज्जलं ।
तानि षट्पदकुलानि ते खगाः ।
सर्वमेकसमये तु विच्युतं ।
पंच शेषमचिरादभूत्सरः ॥

सुभाषित.

मंगलकारक कार्यें करून आपलें नांव अमर करून ठेवलेलीं मांणसें कोणत्याही राष्ट्रांत झालीं, तरी ' शैले शैले न माणिक्यं ' ह्या न्यायानें अगदीं थोडीं निपजतात. त्यांचीं चरित्रें अत्यंत वर्णनीय आणि इतरांस कित्ता घेण्यासारखीं असतात. अशा अवर्णनीय चरित्राच्या ज्या थोड्या बहुत विभूति ह्या **भरतखंडांत** होऊन गेल्या, त्यांत प्रस्तुतचे चरित्रनायक **श्रीमंत नामदार जगन्नाथ शंकरशेट** ऊर्फ **नाना शंकरशेट** ह्यांची गणना आहे.

ह्या वैभवशाली पुरुषश्रेष्ठाचे पूर्वज, **ठाणें** जिल्ह्यांत **कल्याण-भिंवडी**च्या आसपास **शहापुराजवळ** कसबें **मुरबाड** नांवाचा तालुक्याचा एक लहानसा गांव आहे, तेथील मूळचे रहाणारे संभावित व्यापारी होते. हे जातीचे दैवज्ञब्राह्मण असून ह्यांचें उपनांव **मुर्कुटे**. ह्यांच्या मूळपुरुषांपैकीं

नारायणशेट हे एक व्यापारानिमित्त काठेवाडांत **पोरबंदर** मुक्कामीं जाऊन राहिले होते. तेथें ते मोत्यांचा व्यापार करीत असत. व्यापारांत त्यांनीं बरीच संपत्ति मिळवून ते धनसंपन्न झाले होते. **नारायणशेट** यांचा **पोरबंदरीं** व्यापार सुरू होता, तरी त्यांच्या घराण्याची स्थायिक वस्ती **मुरबाडास** होती. कारण त्यांचे चिरंजीव **माणिकशेट** यांस **मुरबाड**ची पोतदारीची* असामी असून सरकारांतून त्यांचा चांगला मान मरातब असे. शिवाय गांवांतल्या गांवांत त्यांचा व्याजबट्टा वगैरे देवघेवीचा धंदा असून **सुरत**, **वसई** वगैरे प्रांतांतून खडीसाखर, मिरीं, चहा, काफी वगैरे जिनसांचाही त्यांचा व्यापार होता.

तो काळ खरोखरीच मोठा धामधुमीचा होता. वित्त, मालमत्ता, किंबहुना जीविताचीही फारशी शाश्वती नव्हती. कारण त्यावेळीं अवघा साष्टी प्रांत **फिरंगी** लोकांच्या ताब्यांत होता, आणि ते

---

* पोतदारीची सनद येणेंप्रमाणें—' मौजवार व मोकादम ता. मुरबाडचे

सरकारी शिक्का.

हद्देदार इसल माबद० कानो जिवाजी अधिकारी, केशव भाऊ अधिकारी, संभाजी देशमुख, जिवाजी व लखोजी अधिकारी, नाभाजी येसू चौधरी कुळकर्णी कौलक (येथील अक्षरें उडालीं आहेत.) पत पाटील ठुमरे, वतन पाटील वगैरे कसबा कृष्णाजी भिऊ पाटील मानिवली. पत पाटील बिरवाडी दत्त पाटील नसे, व गण पाटील बोंबे सन हजार सतराशें चौदा कारणें उद्धव शेटी वल्लद माणिकशेट अधिकारी कसबें मुरबाड यांसी लेखून दिल्हे ऐसीजे, ता. मजकूरची भरपायीची मिळकत तुज दिली असे. तालुका मजकुरीं जे रुपये टक्की पैका जमा होईल त्याची भरपायी करीत जाणें आणि दर गांवास शिवाय हक्कबाबी येणेंप्रमाणें, भातें सालीना घेत जाणें. असलेले गांव, भात कुंडव[1] दोन खुद्द गांव भात दीड कुडव, येणेंप्रमाणें घेऊन भरपायी करीत जाणें. '

ही सनद कसबें मुजबाड मुक्कामचे रा. रा. पुरुषोत्तम बाळकृष्ण मुर्कुटे—पोतदार—यांच्याजवळ असलेल्या अस्सल सनदेवरून नक्कल करून घेतली आहे.

---

१ कुडव ह्मणजे आधोली आठ ह्मणजे पायली पांच.

लोक सत्ताधारी असल्यामुळें ' करतील ती पूर्वदिशा व बांधतील तें धोरण ' अशीं स्थिति होती. **फिरंगी** किंवा **पोर्तुगीज** लोकांनीं स्वधर्मवृद्धीच्या उद्देशानें ह्मणा अगर धर्मवेडानें ह्मणा, **हिंदु** लोकांचा जो अतोनात छळ केला, त्याची पूर्व पीठिका इकडे दिल्यास अप्रासंगिक होणार नाहीं, असें आह्मांस वाटतें. कारण त्यामुळें आपल्या लोकांची त्यावेळीं एकंदर परिस्थिति कशी होती, आणि लोकांस किती अनिवार दुःखें भोगावीं लागून त्यांचे कसकसे हाल झाले, त्याबद्दलची अंशतः तरी कल्पना हल्लींच्या पिढीस व्हावी, ह्मणून आह्मीं खालील वृत्तांत संक्षिप्त रूपानें वाचकांस सादर करतों. तो असा—

चौदाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास **युरोपांत** एक वेळ धर्मवेडानें लोकछळाची जी भयंकर लाट उसळली होती, आणि त्यामुळें तिकडच्या लोकांवर पर्यायानें जी संकटपरंपरा ओढविली होती, त्या संबंधाची हकीकत वाचतांना अंगावर शहारे येतात. सन १४९४ त **पांचवा निकोलेस** नांवाचा पोप यानें असा हुकूम फर्माविला कीं, वाटेल त्या विधर्मी लोकांस जिंकून ख्रिस्ती धर्मांत आणावें. मग काय ?—' पडल्या फळाची आज्ञा ! ' या न्यायानें पोपाच्या अनुयायांनीं धर्मच्छलाचें कंकण हातीं बांधून विधर्मी लोकांचे फार हाल केले. ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणें हें पोपचें मुख्य ध्येय असल्यामुळें लोकांस ज्या भयंकर यमयातना भोगाव्या लागल्या, त्याचे वर्णन करूं गेल्यास अंतःकरणाला फार द्रव येतो.

स्पेन आणि **पोर्तुगाल** देशांत भयंकर धर्मच्छल चालू होता. विधर्मी लोकांचीं मतें आपल्या धर्माविषयीं काय आहेत, याचा तपास करून त्यांस शासन करण्याकरितां एक पृथक मंडळी नेमलेली

होती. हीच शासनमंडळीची संस्था **पोर्तुगीज** लोकांनीं कालांतरानें हिंदुस्थानांतील आपल्या राज्यांत सुरू केली. ह्या मंडळाची शासन करण्याची पद्धत अत्यंत अमानुष होती. पुढें त्या लोकांनीं **मुंबई, वसई** वगैरे ठिकाणें काबीज केलीं, तेव्हां इकडील पुष्कळ लोकांस त्यांनीं बाटवून ख्रिस्ती केलें. विशेषतः ब्राह्मण परभू वगैरे वरच्या जातींच्या लोकांवर त्यांनीं कहर केला.

मुंबईबेट पोर्तुगीजांच्या ताब्यांत आलें, तेव्हां **फ्रान्सिस्कन** मिशनऱ्यांनीं येथें असलेल्या सर्व योगी व बैरागी लोकांस बाटवून ख्रिस्ती केलें; तसेंच **मुंबई**नजीक **कान्हेरी** आणि **मंडपेश्वर** येथें जी **बौद्ध** लोकांचीं लेणीं होतीं, त्यांतही ख्रिस्ती प्रार्थना सुरूं केल्या. हें काम करणारा **ऍंटोनियो पोर्टो** नांवाचा मुख्य पाद्री होता. एका **वसई** प्रांतांत दोन वर्षांच्या अवधींत त्यानें हजारों लोक बाटविले. ह्या **पोर्टो**ची आठवण अद्यापि लोकांस चांगली होते.

मुंबईंत **फ्रान्सिस्कन** पाद्र्यांचें नेहमीं वर्चस्व होतें. **मुंबई**पासून **वसई**पावेतों ह्या मंडळींनीं अनेक ख्रिस्ती मंदिरें बांधलेलीं होतीं. **चौल, साष्टी, ठाणें** येथेंही **पोर्तुगीज** पाद्र्यांनीं आपल्या संस्था स्थापिल्या. मंदिरें बांधणें, त्यांस उत्पन्न करून देणें व त्या उत्पन्नांतून मंदिरांचा व बाटलेल्या लोकांचा खर्च चालविणें, अशी त्यांनीं योजना केली होती. देशांत दुष्काळ पडला असतां ह्या पाद्र्यांचा बाटविण्याचा धंदा फार जारीनें चालू असे. अशा दुष्काळप्रसंगीं ते गरीब मुलें विकत घेत असत. ही विक्रीची किंमत वयावर असे. वर्षाच्या आंतलें मूल **पोर्तुगाल** मधील एका कोंकराच्या किंमतीस ते विकत घेत. ह्या कामासाठीं गांवोगांवीं हिंडणारे पाद्री असत. ह्याप्रमाणें फक्त एका **ठाणें** शहरांत तीन वर्षांच्या अवधींत सुमारें सहा हजार मुलें विकत घेतल्याचा दाखला मिळतो.

जगाच्या व्यवहारक्रमाप्रमाणें उन्नति व पाठीमागून अवनति किंवा उदय आणि ऱ्हास अशी परंपरा लागलेली असते. ह्या अन्वयें **पोर्तुगीज** लोकांच्या राज्यसत्तेचा कळस सन १६०० त झाला. मग पुढें त्यांच्या सत्तेस उतरती कळा लागली. या वेळेच्या सुमारास युरोपांतून इतर राष्ट्रांनीं व्यापार करण्याच्या उद्देशानें इकडे येऊन आपला अमल बसविला. त्यामुळें **फिरंगी** लोकांचें वर्चस्व दिवसोंदिवस कमी कमी होत गेलें.

फिरंगी लोकांनीं पश्चिम किनाऱ्यावरील अगदीं प्रमुख अशीं बंदरें आडविलीं होतीं. त्यामुळें त्यांस एतद्देशियांस बाटविण्याचें महत्कृत्य करण्यास बरेंच फावलें होतें. सन १७३७ च्या सुमारास **फिरंगी** लोकांनीं अवघ्या ' साष्टी प्रांतांतील व आगरांतील मराठे लोक आहेत ते एकदां धरून बाटवावे, ' असा संकल्प केला. त्यावरून त्या मुलखांत सर्वत्रांस मोठी दहशत पडली. त्यावेळीं महाराष्ट्रांत **मराठे** लोकांची सत्ता प्रचलित असून थोरले **बाजीरावसाहेब** हे त्याकाळीं कर्ते होते. त्यांच्या कानावर ही बातमी जातांच **फिरंगी** लोकाच्या तावडींतून आपल्या लोकांची मुक्तता करावी, हा हेतु मनांत धरून त्यांनीं आपला मोर्चा तिकडे वळविला. **विसाजीपंत लेले** या नांवाचा एक कारकून त्यांच्या पदरीं होता. त्यानें ६ एप्रिल १६३७ या दिवशीं **वसई** नजीकचा **घोडबंदर** किल्ला रात्रीच्या प्रहरीं छापा घालून घेतला. मग पुढें उत्तरहिंदुस्थानांत कांहीं राज्यकारण उपस्थित झालें ह्मणून **बाजीराव पेशव्यांनीं** आपला धाकटा भाऊ, प्रसिद्ध वीरपुरुष **चिमणाजी आपा** ह्यांजवर **फिरंगी** लोकांचें पारिपत्य करण्याचें सोंपवून आपला मोर्चा हिंदुस्थानाकडे वळविला.

पुढें **चिमणाजी आपानें फिरंगी** लोकांची खोड मोडण्याचें

मनावर घेऊन वसई प्रांताकडे आपली दृष्टि वळविली. ह्याबद्दलचा मनोवेधक वृत्तांत थोडक्यांत पुढें दिला आहे.

उत्तर कोंकणांत **वसईच्या** किल्ल्यासारखा मातब्बर व अभेद्य किल्ला **फिरंगी** लोकांच्या ताब्यांत असल्यामुळें आसपासच्या प्रांतांत त्यांचा पूर्ण अम्मल होता. त्यामुळें ते लोक फार शेफारले होते. सन १७३६ ते १७३८ ह्या दरम्यांत **चिमणाजी आपांनीं** फिरंगी लोकांवर दोन वेळां स्वाऱ्या करून त्यांची कणीक बरीच मऊ केली व त्यांजपासून बराच मुलूख काबीज करून ते **पुण्यास** परतले. तों मागें **फिरंग्यांनीं** पुनः तो सारा मुलूख परत घेतला. नंतर **चिमणाजी आपांनीं** तिसऱ्या खेपेस युद्धकलाकुशल व पेशव्याच्या अवघ्या राजवटींत केवळ प्रतिभीष्माचार्य असे जे **थोरले मल्हारराव होळकर** व जवळ जवळ त्यांच्याच योग्यतेचे असलेले **विठ्ठल शिवदेव, राणोजी शिंदे, शंकराजी नारायण, मानाजी आंग्रे, पिलाजीराव जाधव** वगैरे रणवीर इतिहासप्रसिद्ध पुरुषांस बरोबर घेऊन **वसईच्या** किल्ल्यावर मोर्चे बांधले, आणि तीन महिनेपर्यंत अगदीं निकराची लढाई चालू ठेऊन किल्ला पाडाव करण्याचे भगीरथ प्रयत्न केले. तथापि तो हस्तगत होईना! एवढा तो बळकट व केवळ अजिंक्य होता. उभयपक्षाकडील बहुत माणसें फार खराबीस आलीं. व नुकसानही कांहीं कमी झालें नाहीं!!

या पुढील वृत्तांत फार मनोवेधक असल्यामुळें तो सारांशरूपानें देऊन हें लांबलेलें ' फिरंगी प्रकरण ' आटोपून आपण मूळ विषयाकडे वळूं.

वसईचा किल्ला हा बंदरकिनारीचा किल्ला असल्यामुळें जेव्हां खुष्कीच्या मार्गानें सतत तीन महिने प्रयत्न करूनही तो हस्तगत

होईना, तेव्हां **चिमणाजी आपानें** आरमार जमवून समुद्रांतून लढाईचा उद्योग केला. ' त्यावेळीं मनुष्य फार कामास आलें. नऊ लाख बांगडी फुटली. ' **चिमणाजी आपा** यांचा किल्ला घेण्याचा निश्चय तर मोठा ! तेव्हां आपले सर्व सरदार जमा करून त्यांना **आपासाहेब** बोलले कीं, ' किल्ला हस्तगत होत नाहीं, याजकरितां मजला तोफेच्या तोंडी बांधून माझें डोकें तरी किल्ल्यांत पाडावें, नाहीं तर किल्ला घ्यावा. ' तेव्हां सर्व सरदारांनीं **आपासाहेबांस** सांगितलें कीं, ' जो आपला निश्चय झाला तो आमचा आहे. परंतु कांहीं तरी किल्ल्यांतील भेद समजल्याशिवाय किल्ला हस्तगत होणें कठीण. यासाठीं याचा विचार करून कांहींतरी मसलत काढली पाहिजे. मग दुसरा विचार किल्ला घेण्याचें ठरवूं. आधीं किल्ल्यांतील भेद आणावा. '

तेव्हां सर्वांनीं विचार करून **खंडोजी माणकर** यांस गुराखी करून त्यांनीं किल्ल्यांत जाऊन गुरें राखावयाची चाकरी पत्करली. रोज किल्ल्यांत जाऊन लोकांचीं गुरें चारावयास न्यावीं आणि फिरून किल्ल्यांत पावती करावीं, असा क्रम **माणकर** यांनीं चालविला. दुसरे **अंजुरकर पांचकळशी** सुतार सरदार होते. त्यानीं सुतारकाम करावयास किल्ल्यांत जाण्याचें पत्करून रोज किल्ल्यांत जावें आणि लोकाच्या घरीं सुतार काम करावें. तिसरे **दुल्लबाजी मोरे** सरदार होते, त्यांनीं कासारपणा पत्करून रोज किल्यांतील लोकांचे बायकांस किल्ल्यांत जाऊन बांगड्या भरून बाहेर येत जावें !

याप्रमाणें तिघांनीं किल्ल्याचा भेद आणल्यावर आपले लष्करांतून सुरुंग खणून किल्ल्याचे बुरुजाखालीं सुरुंग नेऊन त्यांत दारूचे बुधले भरून बत्ती दिली. तेव्हां तो बुरूज उडाला परंतु तो पुनः जागचे जागीं जाऊन बसला. नंतर दुसरा सुरुंग पाडावयाचें काम

चालविलें. त्या समयीं किल्ल्यांतील **फिरंगी** सरदाराची बायको जहाजांत बसून गोव्यास जाण्याच्या उद्देशानें बाहेर निघाली होती, तें पाहून (पेशवे) सरकारचीं जहाजें धांवून त्यांनीं **फिरंग्याचें** जहाज धरिलें; आणि त्या बायकोस श्रीमंतांकडे धरून आणिली. ती बहुत देखणी आणि रूपवान् होती, ह्मणून श्रीमंतांस दाखविली. तिला पाहून ते आपले लोकांस बोलले कीं, " हिला कशाला धरून आणिली ? " असें बोलून तिला साडी–चोळी नेसवून सोडून दिली. तेव्हां ती माघारी जाऊन आपले नवऱ्यास तिनें सर्व वर्तमान सांगितलें आणि ती म्हणाली कीं, "तुह्मी पेशव्याशीं कशासाठीं भांडतां ? तो पुण्यवान् आहे. मी तेथें गेलें असतां, त्यानें मला वांकडया दृष्टीनें पाहिलें देखील नाहीं, तेव्हां त्याशीं लढून यश येईल असें दिसत नाहीं, व तुह्मास दुसरीकडून कुमकही येत नाहीं." असें ह्मणून तिनें पतीला उपदेश केला. परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं.

पुढें **मराठ्यांनीं** एकदम पांच सुरूंग पाडले. त्यांपैकीं, दोन चांगले उडाले. त्यामुळें किल्ल्याच्या तटास मोठीलीं खिंडारें पडलीं. तेव्हां एकदम हल्ला करून **मराठे** आंत जाऊं लागले. शत्रूंनीं त्याच ठिकाणीं आगीची अतिशय गर्दी केली. वरून राळेचीं भांडीं, माशाचें कढत तेल वगैरे टाकिलें, परंतु **मराठ्यांनीं** किंचितही न डगमगतां 'मेला तो गेला' असा निश्चय करून जेथपर्यंत ते लढत गेले होते, तेथून मागें सरकले नाहींत. इतक्यांत दुर्दैवानें त्यांचाच तिसरा सुरूंग अकस्मात उडाला, त्यामुळें त्यांचें फार लोक दुखावले. तथापि एक सुरूंग अद्यापि तसाच उडावयाचा राहिला होता. तो खुद्द **मल्हारराव होळकर** यांनीं आपल्या देखरेखीखालीं इतक्या शिताफीनें उडविला कीं, त्या सरसा अर्धा अधिक बुरूज धाडकन् कोसळून

पडला ! तेव्हां सर्व **मराठे** सैन्य आवेशानें पाण्याच्या लोटाप्रमाणें एकदम ' हरहर महादेव ' असा सिंहनाद करून हल्ला करीत आंत शिरलें. नंतर तीन चार तास एक सारखी मातब्बर लढाई होऊन अखेरीस **फिरंगी** लोक अगदीं जेरीस येऊन त्यांना किल्ला सोडून देणें भाग पडलें.

याप्रमाणें **वसई**चा बलाढ्य किल्ला **चिमणाजी आपां**नीं सर करून त्याच्या आसपासचा बराच मुलुख काबीज केला. त्यांनीं **फिरंगी** लोकांस तेथून काढून लाविलें व **मराठ्यां**ची पूर्ण सत्ता तेथें प्रस्थापित केली; आणि त्यामुळें **फिरंग्यां**च्या भयंकर जाचापासून आमच्या लोकांस अखेरीस मुक्त केलें. असो.

त्यावेळीं **साष्टी** जिल्ह्यांत **फिरंगी** लोक करते होते, असें मागें सांगितलेंच आहे. त्या प्रांतांत त्यांचा करडा अम्मल असे. **बाबुलशेट** यांस व्यापारानिमित्त वरचेवर **वसई** प्रांतांत जावें यावें लागे, तेव्हां त्यांस **फिरंगी** लोकांकडून मनस्वी त्रास होई. कारण ते लोक **हिंदूं**चा अतोनात छळ करीत असत. कधीं कधीं त्यांच्या छळाचें पर्यवसान इतकें भयंकर होई कीं, कित्येक पांढरपेशे, भंडारी, कोळी, कुणबी यांस स्वधर्म सोडावा लागे. त्या दुष्टांनीं रात्रीं चोरून छपून येऊन **हिंदू** लोकांच्या विहिरींत पावाचा तुकडा किंवा मांसखंड टाकावें आणि सकाळीं त्या विहिरीवर येऊन लोकांनीं त्या पाण्याचा वापर केला ह्मणजे त्या अधमांनीं ' हीः हीः हीः ' करून दांत काढावे आणि ह्मणावें कीं, ' धगरीचा बाटला ! ' अगर पहांटेस विहिरीवर येऊन त्या पवित्र जलांत थुंकावें आणि **हिंदू** लोकांनीं तें पाणीं स्वयंपाकांत वगैरे वापरलें ह्मणजे मग त्यांस ते आपल्या पराक्रमाची परिस्फुटता करीत.

त्या कालीं हल्लींप्रमाणें आपल्या लोकांच्या मनावर आर्येतर लोकांच्या सहवासाचा कांहींच परिणाम झालेला नव्हता. कारण त्यावेळीं दयाळु **इंग्रजां**चा आपल्या देशांत नुकताच कोठें प्रवेश झाला होता. शिवाय आतांप्रमाणें आपल्या लोकांचीं मनें त्यावेळीं इतकीं सुसंस्कृत झालेलीं नव्हतीं; त्यामुळें धर्मभोळेपणानें त्यांच्या मनावर विशेष परिणाम व्हावा यात नवल नाहीं! बिचाऱ्या **हिंदू**लोकांनीं वर लिहिलेल्या **फिरंग्यां**च्या अधम कृतीला बळी पडून निराशेनें धर्म त्याग करावा, शेंडी कातरून जानवीं तोडावीं आणि किरस्तांव व्हावे. अशा रीतीनें त्यावेळीं बाटलेल्या दुर्दैवी कुटुंबाचें वंशज **वसई** प्रांतात अद्यापि पुष्कळ आहेत.


याप्रमाणें त्यावेळीं **फिरंगी** लोकांनीं आपल्या अधिकाराच्या जोरावर आमच्या लोकांच्या धर्मभोळेपणाची संधि साधून **हिंदूंचीं** बरींच कुटुंबें बाटविलीं, त्यामुळें तेथील **हिंदू** रहिवासी ह्या त्यांच्या धर्मच्छलाला अगदीं त्रस्त होऊन गेले. हा **फिरंगी** लोकांचा धर्मछल तेथील व्यापारी वर्गाला देखील कमी अधिक प्रमाणानें नडूं लागला, त्यामुळें—

> **जनामध्यें दुर्जन प्रगट। तरी मग अखंड खटपट।**
> **या कारणें ते वाट। बूझवून टाकावी ॥ १ ॥**
>
> **रामदास.**

या उक्तीला अनुसरून **बाबुलशेट** आपल्या कुटुंबासह **मुरबाड**ची वस्ती हालविण्याच्या विचार करूं लागले. दिवसें दिवस **फिरंग्यां**चा त्रास वाढूं लागला. अशा वेळीं **मुरबाडास** स्थायिक केलेली वस्ती एकदम उठविणें म्हणजे मोठ्या विचाराचा प्रश्न होता. कारण त्या वेळच्या परिस्थितींत आपणास ज्या ठिकाणीं **फिरंग्यां**चा त्रास होणार नाहीं, आणि

व्यापाराचाही चांगला जम बसवितां येईल, असें एखादें सुरक्षित व निर्भय स्थान कसें मिळेल ही एक त्याना मोठी काळजी होती. परंतु लवकरच **घोडबंदर** हें स्थान त्यांच्या आढळण्यांत आलें. ह्या ठिकाणीं आपण येऊन राहिल्यास आपल्या व्यापाराला तेजी येईल, असें **बाबुलशेट** यांस वाटूं लागलें. कारण त्या वेळीं **घोडबंदर** हें व्यापाराच्या रहदारीचें नाकें होतें. इतकेंच नव्हे तर, ज्याप्रमाणें ह्या इलाख्यांत रेल्वे होण्यापूर्वीं **पनवेल** आणि **खोपोली** हे घाटावर जाण्याचे पायमार्ग होते, त्याप्रमाणें जल प्रवाश्यांचीं जहाजें आणि व्यापाऱ्यांच्या मालाचे मचवे **वसई**च्या खाडींतून **भिवंडी—वसई** वगैरे बंदरांस लागण्याचें, मोठ्या सोईचें व भरभराटीचें तें केवळ मुक्तद्वार होतें.

ह्या खाडीचें मुख **वसई** बंदराच्या दक्षिणेस समुद्रास मिळालेलें असून तिचा ओघ सुरवातीपासून **घोडबंदरा**पर्यंत साधारण पूर्वेच्या बाजूस सरळच चाललेला आहे. खाडीच्या ह्याच भागावर सांप्रत **वसई**चा प्रचंड पूल आहे. पुढें तो ओघ अर्ध चंद्राकृति वळसा घेऊन उत्तरेच्या बाजूला वळला आहे. आणि ह्या अर्धचंद्राकार वळशाच्या दक्षिणबाजूला मध्यावर **घोडबंदर** वसलें आहे. हें स्थान अवलोकनांत येतांच आपल्या व्यापाराला हें स्थान फारच सोईस्कर आहे, असें वाटून **बाबुलशेट** यांनीं त्या खाडीला लागून समुद्रकिनाऱ्यावर जागा खरेदी केली; आणि तेथें आपल्या कुटुंबांतील माणसाच्या सोई-सारखें एक टुमदार घर बांधलें, ह्या ठिकाणीं सुखवस्तु येऊन राहिल्या-वर शेटजींनीं आपल्या व्यापाराला सुरवात केली; आणि थोड्याच काळांत त्यांच्या व्यापाराचा तेथें जम जमला. **घोडबंदर** हें घाऊक व्यापाराला अत्यंत सोईस्कर बंदर असल्यामुळें त्यांच्या व्यापाराचें क्षेत्र वाढलें. आणि लवकरच त्यांच्या व्यापाराला तेजी आली.



घोडबंदरची खाडी आणि उजवे हातास खाडीचे वळणावर असलेलें

हळुहळू त्यांचा व्यापार वाढून त्यांत त्यांना जास्त किफायत होऊं लागली, तशी साहजिकच व्यापारवृद्धीविषयीं त्यांची इच्छा प्रबळ होऊं लागली.

बाबुलशेटजींच्या मनांत अशी इच्छा उत्पन्न झाली, यांत नवल वाटण्याचें कारण नाहीं. कारण सांप्रत आपण ज्या इतिहासप्रसिद्ध नरपुंगवांच्या, त्यांनीं केलेल्या लोकोत्तर गोष्टी वाचतों, त्या त्यांच्या हातून होण्यापूर्वीं त्यांच्या मनांत जी भावना उत्पन्न झाली, ती महत्वाकांक्षाच होय ! ही महत्वाकांक्षा एक ईश्वरी देणगी आहे. ही मनुष्याच्या ठायीं कमी अधिक प्रमाणानें असते. शिकंदर बादशहा, जुलिअस सीझर, नेपोलियन बोनापार्ट, श्रीशिवछत्रपति, थोरले बाजीराव वगैरे जे महाप्रतापी नरशार्दूल ह्या भूतलावर वेळोवेळीं अवतीर्ण झाले, त्यांनीं आपल्या दारुण महत्वाकांक्षेच्या आधीन होऊन हजारों नाहीं—लाखों माणसांच्या प्राणाहुति घेतल्या, अनेक देश पादाक्रान्त केले, तरी देखील जास्त देश आणि संपत्ति मिळविण्याची त्यांची हांव कमी झाली नाहीं. हा कशाचा प्रभाव ? फक्त महत्वाकांक्षेचा. एकूण महत्वाकांक्षा ही कोणासच सुटली नाहीं. मग त्याला **बाबुलशेट** तरी अपवाद कसे होतील ? **घोडबंदरास** आल्यावर अनुकूल परिस्थिति येतांच आपला व्यापार वाढवून आपणास जास्त द्रव्य प्राप्ति करून घ्यावी असें **बाबुलशेट** यांस वाटावें, हें अगदीं साहजिकच आहे. त्यांच्या मनांत महत्वाकांक्षेचा प्रादुर्भाव झाल्यापासून व्यापारवृद्धीविषयीं त्यांची इच्छा दिवसेंदिवस प्रबळ होऊं लागली. पुढें पुढें ह्या एका विचाराशिवाय दुसरा कोठलाही विचार त्यांचे मनांत येईना.

भाग तिसरा.

महंताचा आशीर्वाद.

परोपकाराय सतां विभूतयः ।

* * * *

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ॥

तुकाराम.

तत्वज्ञानी ह्मणतात कीं, दातृत्वाची थोरवी फार मोठी आहे. शंभर मनुष्यांत एखादा मनुष्य शूर असतो; हजारांमध्यें एखादा विद्वान् असतो, दहा हजारांत एखादा वक्ता असतो, पण इतक्यां मध्येंही दाता एक तरी निपजेल किंवा नाहीं ह्याची वानवाच! दाता होण्याला मुख्य दोन गोष्टींची अनुकूलता लागते. एक द्रव्यसंग्रह; आणि दुसरें, परोपकारी मन. हीं दोन्हीं जेथें एकत्र होतात, तोच मानव महंताच्या आशीर्वादास पात्र होतो.

बाबुलशेटजींच्या ठायीं ह्या दोन्हीं गोष्टी वास करित होत्या. ते श्रीमंत होते आणि त्यांच्या मनांत परोपकार बुद्धि चांगली जागृत होती. द्रव्यद्वारा सहाय्य करून ते इतरांच्या उपयोगी पडतच असत. परंतु ' हा गरीब ' आणि ' तो श्रीमंत ' असा प्रपंच मनांत न बाळगतां, किंवा आपल्या श्रीमंतीच्या तोऱ्यांत न राहतां, प्रसंगीं ते अंगमेहनतीनें सुद्धां इतरांना मदत करण्यास तत्पर असत. ह्या भागांत उल्लेख केलेला प्रसंग त्यापैकींच एक आहे.

एके दिवशीं **बाबुलशेट** आपल्या घराच्या पडवींत एकटेच सचिंत विचार करीत बसले होते. त्याच्या मनांत व्यापाराच्या भावी आशेचे विचार चालले होते. त्यांचें घर समुद्रकाठीं असल्यामुळें खाडींतून जाणारीं येणारीं जहाजें तेथून स्पष्ट दिसत असत. ते रोहिणी नक्षत्राचे सरते दिवस होते. वाराही मंद वहात होता. अशा प्रशांत वेळीं **बाबुलशेट**जींचें मन सृष्टिसौंदर्यापेक्षां भावी आशेकडे लागलें होतें. परंतु ह्या नैसर्गिक सृष्टिसौंदर्याकडे शेटजींचें मन लागत नाहीं ह्मणून कीं काय, ईश्वरानें त्यांस आपल्या चरणीं लीन करण्याकरितां एका क्षणांत सर्व परिस्थिति एकदम बदलून टाकिली. त्यावेळीं खाडींतून एकच जहाज जात होतें.

हां हां ह्मणतां सोसाट्याचा वारा सुटला, आणि अघटित घटनापटु देवानें अतर्क्य लीलेचा चमत्कार सुरू केला. क्षणार्धांत खाडीच्या पाण्याचा जोर वाढला आणि समुद्र खवळल्यासारखा दिसूं लागला. सर्व दिशा उदास भासूं लागल्या. एकाएकीं हें वादळ झालेलें पाहून **बाबुलशेट** आपल्या मनोराज्यांतून जागे झाले, तों त्यांची दृष्टि खाडींतील भर तुफानांत सांपडलेल्या त्या जहाजाकडे गेली. वाऱ्याच्या प्रचंड माऱ्यामुळें जहाजाच्या शिडाच्या चिंधड्या उडून तें वातावरणांत इतस्ततः फडकूं लागलें; आणि जहाज प्रत्येक क्षणाला त्या खवळलेल्या विशाल समुद्राच्या उदरांत गडप होतें कीं काय, असें भासूं लागलें. अशा निर्वाणीच्या समयीं जहाजांतील उतारूंची काय स्थिति झाली असेल, याची कल्पना वाचकांनींच करावी! आत्मसंरक्षणाकरितां दयाळु जगन्नियंत्याची दीन मुद्रेनें करुणा भाकीत नावाड्यांची एकसारखी धडपड चालूं होती. ही त्यांची आणीबाणीची आणि संकटप्रद स्थिति पाहून **बाबुलशेट**च्या

अंतःकरणास दयेचा पाझर फुटला. त्यांनीं तात्काळ आपल्या माणसांना आपला घरचा मचवा खाडींत लोटण्यास सांगितलें. मग तिकडे कसचा उशीर ! ताबडतोब नोकरांनीं एक मचवा त्या भर तुफानांत घातला. कांहीं वेळपर्यंत मचव्यांतील नावाडी आणि खवळलेला समुद्र या उभयतांत जणूं मोठी स्पर्धाच लागून राहिली होती. एकीकडून वाऱ्याच्या प्रचंड वेगामुळें व दुसरीकडून समुद्राच्या भयंकर लाटांमुळें तो मचवा पुढें मागें सारखे हेलकावे खात होता. त्या प्रसंगीं जणूं पंचमहाभूतें कोपलीं होतीं, असें भासूं लागलें. अखेरीस महत्प्रयासानें त्यांनीं एकदाचे तें जहाज गांठलें. तिकडे लाटेच्या प्रत्येक भयंकर उसळीबरोबर आपलें जहाज तळाशीं जाऊन जलसमाधि मिळेल या विवंचनेंत निमग्न असणाऱ्या, हवालदील झालेल्या उतारूंस, आपला प्राण वांचविण्याकरितां आलेल्या लोकांस पाहून काय बरें वाटलें असेल ? आपला करुणारव ऐकून अनाथनाथ करुणासागरानें आपल्या हांकेस ओ दिली, असें त्यांना वाटलें. मचवा जवळ जाईपर्यंत त्या जहाजांत प्रत्येक लाटे बरोबर पाणी शिरत होतें. पाण्याच्या भारामुळें आणि लाटांच्या उसळीमुळें क्षणांत तें जहाज 'समुद्रास्तृप्यंतु' होईल अशी प्रतिक्षणीं भीति वाटत होती. परंतु मचव्यांतील नावाड्यांच्या चलाखीमुळें आणि प्रसंगावधानामुळें त्या जहाजावर तसा प्रसंग ओढवला नाहीं. त्यांनीं मोठ्या प्रयासानें त्या जहाजावरील प्रत्येक उतारूस सुरक्षितरीतीनें आपल्या मचव्यांत घेतलें.

जहाजावरील त्या संकटमुक्त झालेल्या उतारूंत एक वृद्ध महंत होता. त्याच्या अंगावरील भगवीं वस्त्रें आणि मस्तकावरील शुभ्र व भव्य जटाजूट पाण्यानें भिजून चिंब झाला होता. सर्व उतारूंना सुरक्षितपणें किनाऱ्यावर आणल्यानंतर त्या महंताकडे **बाबुलशेटचें**

चालविलें. त्या समयीं किल्ल्यांतील **फिरंगी** सरदाराची बायको जहाजांत बसून गोव्यास जाण्याच्या उद्देशानें बाहेर निघाली होती, तें पाहून (पेशवे) सरकारचीं जहाजें धांवून त्यांनीं **फिरंग्याचें** जहाज धरिलें; आणि त्या बायकोस श्रीमंतांकडे धरून आणिली. ती बहुत देखणी आणि रूपवान् होती, ह्मणून श्रीमंतांस दाखविली. तिला पाहून ते आपले लोकांस बोलले कीं, "हिला कशाला धरून आणिली ?" असें बोलून तिला साडी—चोळी नेसवून सोडून दिली. तेव्हां ती माघारी जाऊन आपले नवऱ्यास तिनें सर्व वर्तमान सांगितलें आणि ती म्हणाली कीं, "तुह्मी पेशव्याशीं कशासाठीं भांडतां ? तो पुण्यवान् आहे. मी तेथें गेलें असतां, त्यानें मला वांकड्या दृष्टीनें पाहिलें देखील नाहीं, तेव्हां त्याशीं लढून यश येईल असें दिसत नाहीं, व तुह्मास दुसरीकडून कुमकही येत नाहीं." असें ह्मणून तिनें पतीला उपदेश केला. परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं.

पुढें **मराठ्यांनीं** एकदम पांच सुरूंग पाडले. त्यांपैकीं, दोन चांगले उडाले. त्यामुळें किल्ल्याच्या तटास मोठीलीं खिंडारें पडलीं. तेव्हां एकदम हल्ला करून **मराठे** आंत जाऊं लागले. शत्रूंनीं त्याच ठिकाणीं आगीची अतिशय गर्दी केली. वरून राळेची भांडीं, माशाचें कढत तेल वगैरे टाकिलें, परंतु **मराठ्यांनीं** किंचितही न डगमगतां 'मेला तो गेला' असा निश्चय करून जेथपर्यंत ते लढत गेले होते, तेथून मागें सरकले नाहींत. इतक्यांत दुर्दैवानें त्यांचाच तिसरा सुरूंग अकस्मात उडाला, त्यामुळें त्यांचें फार लोक दुखावले. तथापि एक सुरूंग अद्यापि तसाच उडावयाचा राहिला होता. तो खुद्द **मल्हारराव होळकर** यांनीं आपल्या देखरेखीखालीं इतक्या शिताफीनें उडविला कीं, त्या सरसा अर्धा अधिक बुरूज धाडकन् कोसळून

पडला ! तेव्हां सर्व **मराठे** सैन्य आवेशानें पाण्याच्या लोटाप्रमाणें एकदम ' हरहर महादेव ' असा सिंहनाद करून हल्ला करीत आंत शिरलें. नंतर तीन चार तास एक सारखी मातब्बर लढाई होऊन अखेरीस **फिरंगी** लोक अगदीं जेरीस येऊन त्यांना किल्ला सोडून देणें भाग पडलें.

याप्रमाणें **वसई**चा बलाढ्य किल्ला **चिमणाजी आपां**नीं सर करून त्याच्या आसपासचा बराच मुलुख काबीज केला. त्यांनीं **फिरंगी** लोकांस तेथून काढून लाविलें व **मराठ्यां**ची पूर्ण सत्ता तेथें प्रस्थापित केली; आणि त्यामुळें **फिरंग्यां**च्या भयंकर जाचापासून आमच्या लोकांस अखेरीस मुक्त केलें. असो.

त्यावेळीं **साष्टी** जिल्ह्यांत **फिरंगी** लोक करते होते, असें मागें सांगितलेंच आहे. त्या प्रांतांत त्यांचा करडा अम्मल असे. **बाबुलशेट** यांस व्यापारानिमित्त वरचेवर **वसई** प्रांतांत जावें यावें लागे, तेव्हां त्यांस **फिरंगी** लोकांकडून मनस्वी त्रास होई. कारण ते लोक **हिंदू**चा अतोनात छल करीत असत. कधीं कधीं त्यांच्या छलाचें पर्यवसान इतकें भयंकर होई कीं, कित्येक पांढरपेशे, भंडारी, कोळी, कुणबी यांस स्वधर्म सोडावा लागे. त्या दुष्टांनीं रात्रीं चोरून छपून येऊन **हिंदू** लोकांच्या विहिरींत पावाचा तुकडा किंवा मांसखंड टाकावें आणि सकाळीं त्या विहिरीवर येऊन लोकांनीं त्या पाण्याचा वापर केला ह्मणजे त्या अधमांनीं ' हीः हीः हीः ' करून दांत काढावे आणि ह्मणावें कीं, ' धगरीचा बाटला ! ' अगर पहांटेस विहिरीवर येऊन त्या पवित्र जलांत थुंकावें आणि **हिंदू** लोकांनीं तें पाणी स्वयंपाकांत वगैरे वापरलें ह्मणजे मग त्यांस ते आपल्या पराक्रमाची परिस्फुटता करीत.

त्या कालीं हल्लींप्रमाणें आपल्या लोकांच्या मनावर आर्येतर लोकांच्या सहवासाचा कांहींच परिणाम झालेला नव्हता. कारण त्यावेळीं दयाळु **इंग्रजां**चा आपल्या देशांत नुकताच कोठें प्रवेश झाला होता. शिवाय आतांप्रमाणें आपल्या लोकांचीं मनें त्यावेळीं इतकीं सुसंस्कृत झालेलीं नव्हतीं; त्यामुळें धर्मभोळेपणानें त्यांच्या मनावर विशेष परिणाम व्हावा यात नवल नाहीं! बिचाऱ्या हिंदूलोकांनीं वर लिहिलेल्या **फिरंग्यां**च्या अधम कृतीला बळी पडून निराशेनें धर्म त्याग करावा, शेंडी कातरून जानवीं तोडावीं आणि किरस्तांव व्हावे. अशा रीतीनें त्यावेळीं बाटलेल्या दुर्दैवी कुटुंबाचें वंशज **वसई** प्रांतात अद्यापि पुष्कळ आहेत.

याप्रमाणें त्यावेळीं **फिरंगी** लोकांनीं आपल्या अधिकाराच्या जोरावर आमच्या लोकांच्या धर्मभोळेपणाची संधि साधून हिंदूचीं बरींच कुटुंबें बाटविलीं, त्यामुळें तेथील **हिंदू** रहिवासी ह्या त्यांच्या धर्मच्छलाला अगदीं त्रस्त होऊन गेले. हा **फिरंगी** लोकांचा धर्मछल तेथील व्यापारी वर्गाला देखील कमी अधिक प्रमाणानें नडूं लागला, त्यामुळें—


जनामध्यें दुर्जन प्रगट । तरी मग अखंड खटपट ।
या कारणें ते वाट । बूझवून टाकावी ॥ १ ॥

रामदास.

या उक्तीला अनुसरून **बाबुलशेट** आपल्या कुटुंबासह **मुरबाड**ची वस्ती हालविण्याच्या विचार करूं लागले. दिवसें दिवस **फिरंग्यां**चा त्रास वाढूं लागला. अशा वेळीं **मुरबाडास** स्थायिक केलेली वस्ती एकदम उठविणें म्हणजे मोठ्या विचाराचा प्रश्न होता. कारण त्या वेळच्या परिस्थितींत आपणास ज्या ठिकाणीं **फिरंग्यां**चा त्रास होणार नाहीं, आणि

व्यापाराचाही चांगला जम बसवितां येईल, असें एखादें सुरक्षित व निर्भय स्थान कसें मिळेल ही एक त्याना मोठी काळजी होती. परंतु लवकरच **घोडबंदर** हें स्थान त्यांच्या आढळण्यांत आलें. ह्या ठिकाणीं आपण येऊन राहिल्यास आपल्या व्यापाराला तेजी येईल, असें **बाबुलशेट** यांस वाटूं लागलें. कारण त्या वेळीं **घोडबंदर** हें व्यापाराच्या रहदारीचें नाकें होतें. इतकेंच नव्हे तर, ज्याप्रमाणें ह्या इलाख्यांत रेल्वे होण्यापूर्वीं **पनवेल** आणि **खोपोली** हे घाटावर जाण्याचे पायमार्ग होते, त्याप्रमाणें जल प्रवाश्यांचीं जहाजें आणि व्यापाऱ्यांच्या मालाचे मचवे **वसई**च्या खाडींतून **भिवंडी—वसई** वगैरे बंदरांस लागण्याचें, मोठ्या सोईचें व भरभराटीचें तें केवळ मुक्तद्वार होतें.

ह्या खाडीचें मुख **वसई** बंदराच्या दक्षिणेस समुद्रास मिळालेलें असून तिचा ओघ सुरवातीपासून **घोडबंदरा**पर्यंत साधारण पूर्वेच्या बाजूस सरळच चाललेला आहे. खाडीच्या ह्याच भागावर सांप्रत **वसई**चा प्रचंड पूल आहे. पुढें तो ओघ अर्ध चंद्राकृति वळसा घेऊन उत्तरेच्या बाजूला वळला आहे. आणि ह्या अर्धचंद्राकार वळशाच्या दक्षिणबाजूला मध्यावर **घोडबंदर** वसलें आहे. हें स्थान अवलोकनांत येतांच आपल्या व्यापाराला हें स्थान फारच सोईस्कर आहे, असें वाटून **बाबुलशेट** यांनीं त्या खाडीला लागून समुद्रकिनाऱ्यावर जागा खरेदी केली; आणि तेथें आपल्या कुटुंबांतील माणसाच्या सोई-सारखें एक टुमदार घर बांधलें. ह्या ठिकाणीं सुखवस्तु येऊन राहिल्या-वर शेटजींनीं आपल्या व्यापाराला सुरवात केली; आणि थोड्याच काळांत त्यांच्या व्यापाराचा तेथें जम जमला. **घोडबंदर** हें घाऊक व्यापाराला अत्यंत सोईस्कर बंदर असल्यामुळें त्यांच्या व्यापाराचें क्षेत्र वाढलें. आणि लवकरच त्यांच्या व्यापाराला तेजी आली.



घोडबंदरची खाडी आणि उजवे हातास खाडीचे वळणावर असलेलें

हळुहळू त्यांचा व्यापार वाढून त्यांत त्यांना जास्त किफायत होऊं लागली, तशी साहजिकच व्यापारवृद्धीविषयीं त्यांची इच्छा प्रबळ होऊं लागली.

बाबुलशेटजींच्या मनांत अशी इच्छा उत्पन्न झाली, यांत नवल वाटण्याचें कारण नाहीं. कारण सांप्रत आपण ज्या इतिहासप्रसिद्ध नरपुंगवांच्या, त्यांनीं केलेल्या लोकोत्तर गोष्टी वाचतों, त्या त्यांच्या हातून होण्यापूर्वीं त्यांच्या मनांत जी भावना उत्पन्न झाली, ती महत्वाकांक्षाच होय ! ही महत्वाकांक्षा एक ईश्वरी देणगी आहे. ही मनुष्याच्या ठायीं कमी अधिक प्रमाणानें असते. शिकंदर बादशहा, जुलिअस सीझर, नेपोलियन बोनापार्ट, श्रीशिवछत्रपति, थोरले बाजीराव वगैरे जे महाप्रतापी नरशार्दूल ह्या भूतलावर वेळोवेळीं अवतीर्ण झाले, त्यांनीं आपल्या दारुण महत्वाकांक्षेच्या आधीन होऊन हजारों नाहीं—लाखों माणसांच्या प्राणाहुति घेतल्या, अनेक देश पादाक्रान्त केले, तरी देखील जास्त देश आणि संपत्ति मिळविण्याची त्यांची हांव कमी झाली नाहीं. हा कशाचा प्रभाव ? फक्त महत्वाकांक्षेचा. एकूण महत्वाकांक्षा ही कोणासच सुटली नाहीं. मग त्याला **बाबुलशेट** तरी अपवाद कसे होतील ? **घोडबंदरास** आल्यावर अनुकूल परिस्थिति येतांच आपला व्यापार वाढवून आपणास जास्त द्रव्य प्राप्ति करून घ्यावी असें **बाबुलशेट** यांस वाटावें, हें अगदीं साहजिकच आहे. त्यांच्या मनांत महत्वाकांक्षेचा प्रादुर्भाव झाल्यापासून व्यापारवृद्धीविषयीं त्यांची इच्छा दिवसेंदिवस प्रबळ होऊं लागली. पुढें पुढें ह्या एका विचाराशिवाय दुसरा कोठलाही विचार त्यांचे मनांत येईना.

भाग तिसरा.

महंताचा आशीर्वाद.

परोपकाराय सतां विभूतयः ।

*   *   *   *

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ॥

तुकाराम.

तत्वज्ञानी ह्मणतात कीं, दातृत्वाची थोरवी फार मोठी आहे. शंभर मनुष्यांत एखादा मनुष्य शूर असतो; हजारांमध्यें एखादा विद्वान् असतो, दहा हजारांत एखादा वक्ता असतो, पण इतक्यां मध्येंही दाता एक तरी निपजेल किंवा नाहीं ह्याची वानवाच! दाता होण्याला मुख्य दोन गोष्टींची अनुकूलता लागते. एक द्रव्यसंग्रह; आणि दुसरें, परोपकारी मन. हीं दोन्हीं जेथें एकत्र होतात, तोच मानव महंताच्या आशीर्वादास पात्र होतो.

बाबुलशेटजींच्या ठायीं ह्या दोन्हीं गोष्टी वास करित होत्या. ते श्रीमंत होते आणि त्यांच्या मनांत परोपकार बुद्धि चांगली जागृत होती. द्रव्यद्वारा सहाय्य करून ते इतरांच्या उपयोगी पडतच असत. परंतु ‘ हा गरीब ’ आणि ‘ तो श्रीमंत ’ असा प्रपंच मनांत न बाळगतां, किंवा आपल्या श्रीमंतीच्या तोऱ्यांत न राहतां, प्रसंगीं ते अंगमेहनतीनें सुद्धां इतरांना मदत करण्यास तत्पर असत. ह्या भागांत उल्लेख केलेला प्रसंग त्यापैकींच एक आहे.

एके दिवशीं **बाबुलशेट** आपल्या घराच्या पडवींत एकटेच सचिंत विचार करीत बसले होते. त्याच्या मनांत व्यापाराच्या भावी आशेचे विचार चालले होते. त्यांचें घर समुद्रकाठीं असल्यामुळें खाडींतून जाणारीं येणारीं जहाजें तेथून स्पष्ट दिसत असत. ते रोहिणी नक्षत्राचे सरते दिवस होते. वाराही मंद वहात होता. अशा प्रशांत वेळीं **बाबुलशेट**जींचें मन सृष्टिसौंदर्यापेक्षां भावी आशेकडे लागलें होतें. परंतु ह्या नैसर्गिक सृष्टिसौंदर्याकडे शेटजींचें मन लागत नाहीं ह्मणून कीं काय, ईश्वरानें त्यांस आपल्या चरणीं लीन करण्याकरितां एका क्षणांत सर्व परिस्थिति एकदम बदलून टाकिली. त्यावेळीं खाडींतून एकच जहाज जात होतें.

हां हां ह्मणतां सोसाट्याचा वारा सुटला, आणि अघटित घटना-पटु देवानें अतर्क्य लीलेचा चमत्कार सुरू केला. क्षणार्धांत खाडी-च्या पाण्याचा जोर वाढला आणि समुद्र खवळल्यासारखा दिसूं लागला. सर्व दिशा उदास भासूं लागल्या. एकाएकीं हें वादळ झालेलें पाहून **बाबुलशेट** आपल्या मनोराज्यांतून जागे झाले, तों त्यांची दृष्टि खाडींतील भर तुफानांत सांपडलेल्या त्या जहाजा-कडे गेली. वाऱ्याच्या प्रचंड माऱ्यामुळें जहाजाच्या शिडाच्या चिंधड्या उडून तें वातावरणांत इतस्ततः फडकूं लागलें; आणि जहाज प्रत्येक क्षणाला त्या खळलेल्या विशाल समुद्राच्या उदरांत गडप होतें कीं काय, असें भासूं लागलें. अशा निर्वाणीच्या समयीं जहाजांतील उतारूंची काय स्थिति झाली असेल, याची कल्पना वाचकांनींच करावी ! आत्मसंरक्षणाकरितां दयाळु जगन्नियंत्याची दीन मुद्रेनें करुणा भाकीत नावाड्यांची एकसारखी धडपड चालूं होती. ही त्यांची आणीबाणीची आणि संकटप्रद स्थिति पाहून **बाबुलशेट**च्या

अंतःकरणास दयेचा पाझर फुटला. त्यांनीं तात्काळ आपल्या माण-सांना आपला घरचा मचवा खाडींत लोटण्यास सांगितलें. मग तिकडे कसचा उशीर ! ताबडतोब नोकरांनीं एक मचवा त्या भर तुफा-नांत घातला. कांहीं वेळपर्यंत मचव्यांतील नावाडी आणि खवळलेला समुद्र या उभयतांत जणूं मोठी स्पर्धाच लागून राहिली होती. एकीकडून वाऱ्याच्या प्रचंड वेगामुळें व दुसरीकडून समु-द्राच्या भयंकर लाटांमुळें तो मचवा पुढें मागें सारखे हेलकावे खात होता. त्या प्रसंगीं जणूं पंचमहाभूतें कोपलीं होतीं, असें भासूं लागलें. अखेरीस महत्प्रयासानें त्यांनीं एकदाचे तें जहाज गांठलें. तिकडे लाटेच्या प्रत्येक भयंकर उसळीबरोबर आपलें जहाज तळाशीं जाऊन जलसमाधि मिळेल या विवंचनेंत निमग्न असणाऱ्या, हवाल-दील झालेल्या उतारूंस, आपला प्राण वांचविण्याकरितां आलेल्या लोकांस पाहून काय बरें वाटलें असेल ? आपला करुणारव ऐकून अनाथनाथ करुणासागरानें आपल्या हांकेस ओ दिली, असें त्यांना वाटलें. मचवा जवळ जाईपर्यंत त्या जहाजांत प्रत्येक लाटे बरो-बर पाणी शिरत होतें. पाण्याच्या भारामुळें आणि लाटांच्या उसळी-मुळें क्षणांत तें जहाज 'समुद्रास्तृप्यंतु' होईल अशी प्रतिक्षणीं भीति वाटत होती. परंतु मचव्यांतील नावाड्यांच्या चलाखीमुळें आणि प्रसंगावधानामुळें त्या जहाजावर तसा प्रसंग ओढवला नाहीं. त्यांनीं मोठ्या प्रयासानें त्या जहाजावरील प्रत्येक उतारूस सुरक्षितरीतीनें आपल्या मचव्यांत घेतलें.

जहाजावरील त्या संकटमुक्त झालेल्या उतारूंत एक वृद्ध महंत होता. त्याच्या अंगावरील भगवीं वस्त्रें आणि मस्तकावरील शुभ्र व भव्य जटाजूट पाण्यानें भिजून चिंब झाला होता. सर्व उतारूंना सुरक्षितपणें किनाऱ्यावर आणल्यानंतर त्या महंताकडे **बाबुलशेटचें**

लक्ष गेलें. **बाबुलशेट** स्वभावतः धर्मनिष्ठ असल्यामुळें त्या महंताची गंभीर आणि तेजस्वी मुखचर्या पाहून, अशा सत्पुरुषाची आपल्या हातून थोडी बहुत सेवा घडली म्हणून त्यांनीं स्वतःला धन्य मानून घेतलें. आणि

श्रीसंताचिया माथा चरणावरी । साष्टांग हें करी दंडवत ।

ह्या भावनेनें त्यांनीं तात्काळ त्या महंतापुढें साष्टांग दंडवत घातला.

साधुश्रेष्ठ **तुकाराम** महाराजांनीं म्हटल्याप्रमाणें—

लांब लांब जटा काय वाढवूनि । पावडें घेऊनी क्रोधें चाले ॥ १ ॥
खायाचा वोळसा शिव्या दे जनाला । ऐशा तापशाला बोध कैंचा॥२

किंवा

ऐसे संत जाले कळीं । तोंडीं तमाखूची नळी ॥ १ ॥
स्नानसंध्या बुडविली । पुढें भांग वोढविली ॥ २ ॥
भांगभुर्का हें साधन । पची पडे मद्यपान ॥ ३ ॥

अशा कोटींतल्या साधूपणाचा अंगीं मुलामा चढवून आणि दांभिकपणाचीं त्यावर प्रावरणें परिधान करून बनलेले साधु आजकाल आपणांस पुष्कळ पहावयास सांपडतात. सांप्रत शहराच्या वस्तीला मुद्रा टिळे लावून शेंकडों दांभिक साधु धनिकांच्या द्वारीं हरहमेष हांजी हांजी करतांना दृष्टीस पडतात. आणि धनिक लोकही अशा दांभिकांचें देव्हारे माजवितांना आपण पहातों, ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय ! ! परंतु आह्मी वर वर्णन केलेले महंत अशा प्रकारचे नव्हते. कारण स्वयंसिद्ध तेज प्रकाशित झाल्याशिवाय कधींही रहावयाचें नाहीं. खऱ्या तेजःपुंज माणसाची ओळख तेव्हांच पटते. तेव्हां अशा ह्या महंताच्या ठायीं **बाबुलशेट** मिलिंदायमान झाले, यांत आश्चर्य तें कोणतें !

महंताचा चरणस्पर्श केल्यावर कांहीं काळपर्यंत **बाबुलशेट** त्या

साधुपुरुषाच्या गंभीर चर्येकडे पहात राहिले. तेव्हां त्या चर्येवर अनेक गुण एकवटलेले त्यांना जणूं काय स्पष्ट दिसूं लागले. अशा सत्पुरुषाचा आपणास नेहमीं सान्निध्य लाभ व्हावा, अशा इच्छेनें **बाबुलशेटनीं** त्या महंतास आपल्या घरीं नेण्याचा विचार केला. परंतु साधुवृत्तीनें भोळ्या भाविक लोकांस लुबाडून आपली उपजीविका चालविणारा तो दांभिक नसल्यामुळें प्रथम बराच वेळ **बाबुलशेटजींची** इच्छा फलद्रूप होईल असा रंग दिसेना. शेवटीं **शेटजींचा** अत्यंत आदरपूर्वक आग्रह पाहून त्या महंतास नाहीं ह्मणतां येईना. तेव्हां नाइलाजास्तव त्या महंतानें आपली संमति दिली. त्यावेळीं **बाबुलशेटजीस** अत्यंत आनंद झाला. त्यांनीं मोठ्या सन्मानानें त्यांस आपल्या घरीं आणलें. नंतर त्यांस स्नान घालून सुग्रास अन्नाचें भोजन घातलें. त्या वेळीं साहजिकच प्रवासजन्य श्रमामुळें महंतास फार ग्लानी आली होती. ही गोष्ट **बाबुलशेटच्या** लक्षांत येतांच त्यांस जरा वामकुक्षी करण्यास त्यांनीं विनंति केली. त्याप्रमाणें महंत थोडे आडवे झाल्यावर श्रम परिहारार्थ **शेटजींनीं** स्वतः त्यांचीं पादचूरणसेवा केली. इतक्या थोड्या अवधींत **बाबुलशेटच्या** मनावर वैराग्यपर विचारांचा अंमल बसूं लागला. ते त्या साधुचरणीं अगदीं लीन झाले.

कांहीं वेळ निद्रासुखाचा अनुभव घेतल्यावर महंत उठले. आतां त्यांची मुद्रा अत्यंत गंभीर आणि प्रफुल्लित दिसत होती. **बाबुलशेटनीं** थोडावेळ जी त्यांची अगदीं अंतःकरणपूर्वक सेवा केली, त्यामुळें ते फार संतोषित झालेले दिसले. नंतर कांहीं काळानें आपली चिलीम भरून यथेच्छ धूम्रपान केल्यावर महंतांनीं आपली जाण्याची इच्छा प्रदर्शित केली. प्रथम कांहींवेळ त्यास राहण्याचा **शेटनीं** बराच आग्रह केला, परंतु तो फलद्रूप झाला नाहीं, तेव्हां 'मज गरीबाच्या घरीं येऊन आपण पायधूळ झाडली व तें पवित्र केलेंत, हा माझ्यावर

मोठा अनुग्रह झाला, ' असें ह्मणून त्यांनीं महंतास जाण्याचा रुकार दिला. प्रयाण समयीं प्रसन्न चित्तानें महंतानीं आपले दोन्हीं हात वर करून, ' जा बेटा, तुझ्या सर्व इच्छा पूर्ण होऊन तुझ्या वंशांत एक कुळदीपक पुरुष निर्माण होईल, ' असा आशीर्वाद देऊन **बाबुलशेट**च्या माथ्यावर आपला वरदहस्त ठेविला. तेव्हां त्यांनीं मोठ्या नम्रतापूर्वक तो आशीर्वाद ग्रहण केला व आपण आज खरोखरींच कृतकृत्य झालों, असें त्यांस वाटलें. असो.

सुखोत्पत्तींची सर्व साधनें परमेश्वरानें मनुष्याच्या स्वाधीन ठेविलीं आहेत. जें घडून येतें तें यथार्थ येतें, कारण जें जें परमेश्वर घडवितो, तें तें शहाणपणानेंच घडवितो. तुला जसें वाटतें तसें घडावें, अशी इच्छा करूं नको. जशा गोष्टी घडतात, तशाच घडणें हितकर आहे असें ज्ञान, ह्मणजे तुझा काळ समाधानांत जाईल.

मार्कस आरिलिअस.

हें वरील मत सत्य आहे. सुख आणि दुःख हें मनाच्या भावनेवरच सर्वस्वी अवलंबून आहे. व्यापाराच्या भावी आशेंत सदोदित विचार करीत असलेले **बाबुलशेट** यांच्या सचिंत मनाचा ओघ वरील महंताच्या आशीर्वादानें एकदम पालटला. आपण व्यापाराविषयीं योजलेले विचार आतां सिद्धीस जातील असें त्यांना वाटूं लागले. सकाळीं आपलें मन व्यापारविषयक गोष्टीमुळें चिंताक्रांत होतें, तेंच आतां चिंतारहित कशानें झालें, याचाच ते विचार करूं लागले, तेव्हां त्यांना अत्यंत आश्चर्य वाटलें. त्यांच्या मनांत असें स्थित्यंतर घडून येण्याचें काय कारण असेल, याचा जर आपण विचार केला, तर आपणांस असें दिसून येईल कीं, त्यांस वादळामुळें घडीभर झालेली सत्संगतिचाच हा सर्व परिणाम होय.

भाग चौथा.

घराण्याचा अभ्युदय.

उद्योगादनिवृत्तस्य ससहायस्य धीमतः ।
छायेनुवागता तस्य नित्यं श्रीः सहचारिणी ॥

सुभाषित.

नानाविध वस्तूंकडे सूक्ष्मावलोकन केलें असतां विचारी माणसाला त्यांत तीन अवस्था दृष्टीस पडतील. ज्याप्रमाणें रवीला उदय, मध्य आणि अस्त ह्या तीन अवस्था आहेत, त्याचप्रमाणें प्रत्येक राष्ट्राला, प्रत्येक समाजाला आणि प्रत्येक कुटुंबाला आरंभ, उन्नति आणि ऱ्हास हीं आहेतच. ज्याप्रमाणें दारुण अंधकाराचा नाश करून सहस्त्ररश्मि उदय पावतो, त्याचप्रमाणें राष्ट्र, समाज किंवा कुटुंब हीं देखील उत्क्रांति तत्वाप्रमाणें अनुकूल परिस्थिति प्राप्त होतांच उदय पावूं लागतात. रवीचा उदय, मध्य आणि अस्त ह्या अवस्था नैसर्गिक आहेत. परंतु राष्ट्र, समाज आणि कुटुंब यांचा उदय, त्या त्या राष्ट्रांतील, समाजांतील किंवा कुटुंबांतील माणसाच्या कर्तबगारीवर अवलंबून असतो.

आमच्या चरित्रनायकाच्या घराण्याचा अभ्युदय त्यांचे आजोबा **बाबुलशेट** यांच्या उत्तर वयापासून होण्यास सुरवात झाली. महंतानें त्यांच्यावर आशीर्वादाचा अनुग्रह केल्यापासून त्यांच्या मनाला

एकप्रकारची शांति मिळून त्यांना नवा उत्साह उत्पन्न झाला. हा वेळपर्यंत त्यांचे चिरंजीव **शंकरशेट** आपला गांवांतल्या गांवांत चाललेला व्यापार मोठ्या दक्षतेनें करीत होते. परंतु तेवढ्यानें त्यांचें समाधान होईना. आपलें व्यापाराचें क्षेत्र मोठें असावें, असें वाटून त्यांनीं एकदां आपल्या वडिलांजवळ गोष्ट काढिली. त्यावेळीं **बाबुलशेट**जीस फार समाधान झालें. आपली जी इच्छा आहे तीच आपल्या होतकरू चिरंजिवाची आहे, असें पाहून **बाबुलशेट**च्या महत्वाकांक्षेला जास्त उत्तेजन मिळालें. शेवटीं **मुंबईस** जाऊन व्यापार करावा असा त्यांनीं निश्चय केला. ती वेळ **इंग्रज** राज्याची अवली होती. सर्व **हिंदुस्थानांत मराठे, निजाम, इंग्लिश** आणि **फ्रेंच** यांची एकच धुमश्चक्री सुरू होती. **मराठ्यांशीं** नुकताच तह होऊन **इंग्रजांस मुंबई** जवळचीं **साष्टी, वसई** वगैरे ठाणीं व **भडोच, सुरत** वगैरे परगणे मिळाले होते. **मुंबई** ह्मणजे म्लेच्छांचा गांव, असा त्यावेळीं लोकांचा समज झाला होता. परंतु हळहळू हा खोटा समज पालटत जाऊन **इंग्रजी** अम्मल चांगला व न्यायाचा, अशी लोकांची खात्री होऊं लागली आणि त्यांच्याविषयीं लोकांच्या मनांत आदर उत्पन्न होऊं लागला. शिवाय इतर लोक **मुंबईत** जाऊन व्यापार धंदा, नोकरी चाकरी करूं लागलेले पाहून, आपणही **मुंबईत** जावें, असा विचार करून **बाबुलशेट** हे अठराव्या शतकाच्या मध्याला प्रथम **मुंबईत** आले व पुढें ते हरहमेष **मुंबईत** जाऊन येऊन असत. नंतर कांहीं काळानें त्यांनीं इकडे पैशाची देवघेव करण्याकरितां एक पेढी स्थापन केली व सराफीचा धंदा सुरू केला. पुढें **शंकरशेट** यांस समजूं लागतांच ते देखील आपल्या वडिलांबरोबर **मुंबईत** जाऊं येऊं लागले.

'**प्रासादचिन्हानि पुरः फलानि**' ही **कालिदास** कवीची उक्ति **शंकरशेट** यास पूर्णपणें लागूं पडते. कारण प्रौढवयांत

व्यापाराविषयीं जें साहस दिसून यावयाचें ते लहनपणापासूनच त्यांच्या अंगीं चांगल्या प्रकारें बाणलेलें दिसून येऊं लागलें. **शंकरशेट** हे जात्याच चलाख, विचारी आणि धाडशी होते. जेव्हां जेव्हां ते वडिलांबरोबर **मुंबईत** येत, त्या त्या वेळीं **मुंबईतील** व्यापाराची ती भरभराट पाहून आपला भाग्योदय येथें खास होईल, हा विचार प्रत्येक वेळीं त्यांच्या मनांत प्रामुख्यानें घोळत असे. त्याच प्रमाणें त्यावेळीं गोदींतील व्यापाराची ती विलक्षण घडामोड पाहून गांवांतल्या गांवांत व्यापार किंवा देवघेव करण्यापेक्षां इतर देशांशीं व्यापार करून त्यांबरोबर दळणवळण ठेवणें अधिक श्रेयस्कर होईल असें त्यांस वाटूं लागे. प्रत्येक खेपेस ते **मुंबईतील** व्यापार विषयक माहिती मिळविण्याविषयीं फारच चौकस असत. पुढें त्यांचा बहुतेक काळ **मुंबईतील** पेढीवर जावूं लागला. कारण त्यावेळीं **बाबुलशेट** यांचा बहुतेक वृद्धापकालच झाला होता. तरी मधून मधून ते **शंकरशेट**बरोबर **मुंबईत** येतच असत. **मुंबईत** व्यापार सुरू केल्यापासून त्यांत त्यांना बरीच किफायत होऊं लागली. लवकरच **शंकरशेट**चे व्यापारांत चांगलें धोरण बसून त्यांचा व्यापार बराच वाढला. परंतु त्यांत त्यांचें समाधान होईना. दूर देशांशीं दळणवळण ठेवल्याशिवाय आणि परदेशाचा माल ने आण केल्याशिवाय आपल्या व्यापाराची प्रगति होणार नाहीं, असें वाटून रात्रंदिवस ह्या गोष्टीचा ते विचार करूं लागले.

शंकरशेटची महत्वाकांक्षा फार जबर होती. आपल्या व्यापाराच्या वृद्धीकरितां आपणांस काय काय केलें पाहिजे, आपणांस कोणत्या गोष्टीं अवगत झाल्या पाहिजेत, याचा त्यांनीं फारच खोल विचार केला होता. जगांतील भिन्न भिन्न राष्ट्रांबरोबर आपला

व्यवहार ठेवण्यास प्रथम आपणांस त्या त्या देशाच्या भाषेचें ज्ञान असणें अवश्य आहे, असें वाटून प्रथम त्यांनीं इंग्रजी भाषेचें ज्ञान संपादन करण्याचा उपक्रम केला. नंतर ते पुढल्या तयारीला लागले. इंग्रजी भाषेचें थोडेंबहुत ज्ञान संपादन केल्यावर आपला इष्ट हेतु साध्य होण्यासाठीं परदेशाशीं व्यापार करण्याच्या रीतीभाती अवगत करून घेण्याच्या उद्देशानें त्यांनीं प्रथम कांहीं दिवस गोदींत एका इंग्रजी व्यापाऱ्याच्या ऑफिसांत नोकरी धरली. वास्तविक त्यावेळीं त्यांची घरची पेढी होती. आणि त्यांत त्यांना किफायतही उत्तम होत असे. त्यामुळें चिरंजीवानें नोकरी धरलेली ऐकून **बाबुलशेट**जीनीं त्यांस दूषण दिलें. परंतु **शंकरशेट**चा अंतिम हेतु त्यांच्या प्रथम लक्षांत आला नाहीं. आपल्या वडिलांप्रमाणें **शंकरशेट**ही स्वतंत्र वृत्तीचे होते, ह्मणून थोड्या काळांत परराष्ट्राशीं व्यापार करण्याची चांगली माहिती होतांच त्यांनीं नोकरीची शृंखळा तोडून टाकिली, आणि स्वतःच्या हिमतीवर आपला व्यापार मोठ्या प्रमाणावर चालविला. त्याच संधीला त्यांची आणि एका श्रीमंत बंगलीबाबूची गांठ पडली. हा बंगाली व्यापारी फार सधन असून त्यवेळीं त्याची भराभराट होती. त्याच्या सहाय्यानें **शंकरशेट**जीनीं आपला व्यापार बराच वाढविला. ह्या व्यापारांत त्यांना विपूल पैसा मेळूं लागून व्यापाऱ्यांत त्यांचें वजनही बरेंच वाढलें. ह्या सर्व गोष्टींचा विचार केल्यास आपणास असें दिसून येईल कीं, कोणतीहि गोष्ट जरी घेतली तरी त्यांत खरें धैर्य, मनाची अस्खलित दृढता व शांत प्रकृति यांच्या सहाय्यानें उद्योग केल्यास त्यांत यश येतें

जो जो जेथें उगवला । तो तें व्यवसायीं उमगला ।
तयास लोक ह्मणती भला । कार्यकर्ता ॥

रामदास.

शंकरशेट हे खरेखुरे व्यापारी होते. त्यांस आपल्या कार्यक्षेत्रांतील प्रत्येक कोनकोपरा उत्तमप्रकारें अवगत होऊन त्यांनीं **दासबोधां**त ह्मटल्याप्रमाणें **रामदास** स्वामींच्या वरील उक्तीची खरी साक्ष पटविली, यांत शंका नाहीं.

आपल्या चिरंजिवाचा दिवसेंदिवस होत असलेला उत्कर्ष पाहून **बाबुलशेट**जींस अत्यंत समाधान वाटे. अलीकडे वार्द्धक्यामुळें त्यांची स्थिति बरीच कष्टमय झाली होती. हळु हळू त्यांची शक्ति क्षीण होत चालली. **शंकरशेट** यांचें व्यापाराकडे जितकें लक्ष होतें तितकें लक्ष, किंबहुना त्यांचें जास्त लक्ष आपल्या पित्याच्या शुश्रूषेकडे होतें. वरचीं त्याप्रमाणें व्यापाराचीं सर्व सूत्रें जरी आतां त्यांच्या हातीं आली होतीं, तरी देखील कोणतीही गोष्ट करण्यापूर्वीं ते आपल्या पित्याची आज्ञा घेत असत. त्यामुळें त्यांस अत्यंत समाधान होई. पुढें लवकरच **बाबुलशेट**जींनीं सृष्टिकमानुसार इहलोकींचा पसारा आसून स्वर्गवास केला.

त्यावेळीं **शंकरशेट** यांचा व्यापार इतका वाढला होता कीं, **मुंबईं**तील सधन व्यापाऱ्यांत त्यांची गणना होऊन '**शेट**' या नात्यानें त्यांना चारचौघांत मान मिळूं लागला. नंतर त्यांनीं मार्केटाजवळ बरीच जागा खरेदी करून, तेथें एक घर बांधलें. पूर्वीं ही मार्केटची जागा एका वाणी सावकाराची होती असें सांगतात. ह्या परोपकारी गृहस्थानें ती जागा, ज्याप्रमाणें अन्नछत्र व धर्मपोई घालण्यांत किंवा विहिरी अथवा तलाव बांधण्यांत पुण्य आहे, तसेंच धर्मार्थ बाजार बांधण्यांतही पुण्य आहे, असें मानून, बाजार बांधण्यासाठीं धर्मार्थ दिली होती. पुढें कांहीं वर्षांनीं **मुंबईचे** गव्हर्नर **डंकन**साहेब यांच्या कारकीर्दींत सन १८०९ त सरकारानें ह्या जागेंत एक

सोईवार इमला बांधून तेथें बाजार भरण्याची लोकांस परवानगी दिली. ह्या ठिकाणीं फक्त फळफळावळ व भाजीपाला विकण्याची परवानगी असे. पुढें सन १८३८ त सरकारानें त्या इमल्याचा जीर्णोद्धार केला. आणि शहराच्या वाढत्या वस्तीकडे नजर देऊन तेथें मोठ्या प्रमाणावर बाजार बांधला. पूर्वीं ह्या ठिकाणीं बसून भाजीपाला विकण्याबद्दल सरकारास कांहीं भाडें द्यावें लागत नसे.

ह्या मार्केटजवळ घर बांधल्यावर **शंकरशेट मुंबईंत** रहावयास आले. ह्याच संधीला नमूद करण्यासारखी एक विशेष गोष्ट घडली. कारण ही वेळ **मुंबईंत** मोठ्या धामधुमीची होती. त्या वेळीं **मुंबईंत** लष्कर पाठविण्याची **इंग्रज** सरकाराची धामधूम चालली होती. ही धामधूम चालण्याचें कारण **फ्रेंच** लोकांचें आणि **इंग्रजां**चें वैमनस्य-पडल्यामुळें **फ्रेंच**लोक हे **मुंबई** बेटावर केव्हां हल्ला करतील आणि **मुंबई** बेट केव्हां घेतील याची **इंग्रजां**स भीति होती; शिवाय दुसरें एक भीतीचें कारण असें होतें कीं, **हैदरअल्ली** व हिंदुस्थानांतील दुसरे राजेरजवाडयांतील राजकीय वातावरण बरेंच क्षुब्ध झालेलें होतें. त्यामुळें सर्वांचें लक्ष तिकडे वेधलें होतें. पुढें ही सर्व हकीकत जेव्हां **विलायतेंत 'कोर्ट ऑफ डायरेक्टर्स'** यांस कळली, तेव्हां त्यांनीं **डंकन**साहेबांस—त्यावेळचे गव्हर्नर—यांस लष्करी तयारी करण्यास लिहून पाठविलें. त्याप्रमाणें सन १७९८ च्या आक्टोबर महि-न्यांत **डंकन**साहेबांनीं कोटांतील थिएटरांत सभा भरवून मोठ-मोठ्या सावकारांचा आणि नागरिकांचा सल्ला घेतला. त्यावेळीं शत्रूचें निवारण करण्यासाठीं **इंग्रज**सरकारास द्रव्याची जरूरी होती. तेव्हां **शंकरशेट** यांनीं इतर नागरिकांबरोबर सरकारास बऱ्याच रकमेची मदत केली. पुढें कालांतरानें **टिपूसुलताना**चा

पराभव करून **म्हैसूर** प्रांत इंग्रजसरकारास मिळाला. त्यांत त्यांना अगणित संपत्ति मिळाली. ह्याच संधीला **शंकरशेट** यांस देखील स्वतःच्या व्यापारांत कल्पनेच्या बाहेर नफा झाला. त्यावेळीं त्यांच्या तिजोरींत सोळा लक्ष रुपये रोख आणि एक लक्षांचें जवाहीर होतें. अशा रीतीनें अगदीं अल्पकाळांत ते अत्यंत श्रीमान् व्यापारी झाले. इतकेंच नव्हे, तर **मुंबईतील** व्यापाऱ्यांत त्यांचा मान मरातब व दर्जा फार वाढला. आणि सर्व व्यापार पेठेंत ते एक मोठे सावकार ह्मणून देशी आणि परदेशी व्यापाऱ्यांत त्यांची मोठी चहा होऊं लागली.

अलीकडे व्यापार वृद्धीविषयीं **शंकरशेट** यांची महत्वाकांक्षा किंचित् खालावत चालली, याचें कारण संततीचा अभाव हें होय.

---

१ हें **म्हैसूरचें** शेवटचें युद्ध. त्यावेळीं हिंदुस्थानांत जिकडे तिकडे युद्धाची सारखी धामधूम चालली होती. **टिपूसुलतानानें** सर्वत्र मोठा बंडावा मांडला होता. एक नवीन धर्म स्थापून आपण पैगंबर व्हावें, इतकी त्याची महत्वाकांक्षा अनावर झाली होती. त्याचें पारिपत्य करण्याकरितां **इंग्रजांनीं** तयारी चालविली. प्रथमतः जनरल **स्टुअर्ट** ह्या सेनानायकाच्या हाताखालीं **मुंबईची** मोठी फौज देऊन त्याला पुढें केलें. परंतु **टिपूनें** त्यांचा तेव्हांच पराजय केला. तेव्हां **निजाम, मराठे** आणि **इंग्रज** एकत्र होऊन **मलवेल्ली** येथें इ. स. १७९९ त खडाजंगी लढाई होऊन त्यांत **टिपूचा** पराजय झाला. ह्या लढाईंत **टिपू** शेवटपर्यंत फारच शौर्यानें लढला. दारुण युद्धप्रसंग असा फक्त एक तासच झाला. त्यापैकीं अवघीं सात मिनिटें अत्यंत भयंकर खडाजंगी उडून **इंग्रजांचा** जय झाला. ह्या लढाईंत शौर्यानें लढत असतां अत्यंत जखमी होऊन तो निधड्या छातीचा ' **म्हैसूरचा वाघ** ' किल्ल्यास पाडलेल्या खिंडारांत मरून पडला. (इ. स. १७९९ मे ३.) त्याच्या मरणानंतर **म्हैसुरचें** सर्व राज्य **इंग्रजांच्या** हातीं आलें, हें इतिहास प्रसिद्ध आहे.

त्यांस दोन पुत्र होऊन त्यांची पत्नी परलोकवासी झाली होती. त्या दोन पुत्रांपैकीं वडील चिरंजीव **कृष्णाजी** यांस दोन मुली होऊन तेही अल्पवयांत निवर्तले. आणि कनिष्ठ चिरंजीव **रामचंद्र** यांस त्यांनीं आपले कनिष्ठ बंधु **गणबाशेट** यांचे मांडीवर दत्तक दिलें. त्यामुळें **शंकरशेट**जीस औरस संतती मुळींच राहिली नाहीं. म्हणून त्यांनीं द्वितीयसंबंध केला. ह्या पत्नीचें नांव **भवानीबाई** ऊर्फ **ताईबाई** असें होतें. **भवानीबाईस** प्रथम एक कन्या झाली. तिचें नांव **भिवराबाई** ऊर्फ **आकाबाई** असें होतें. त्यानंतर अपत्यमुख पाहण्याचा योग फार दिवसांत त्यांना आला नाहीं. त्यामुळें संततीच्या अभावीं त्यांच्या मनाची उद्विग्नता दिवसेंदिवस वाढूं लागली.

श्रीसमर्थ **रामदास स्वामींनीं** म्हटलें आहे कीं '**जगीं सर्व सूखी असा कोण आहे ?**' तें:अगदीं यथार्थ आहे. आपण सूक्ष्म-दृष्टीनें खरें सुख पाहूं गेलों असतां, तें आपल्या चर्मचक्षूंना ह्या अखिल ब्रह्मांडांत राई एवढें दिसेल किंवा नाहीं, याची वानवाच ! साधुश्रेष्ठ **तुकाराम** महाराजांनीं '**सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वताएवढें ॥**' असें म्हटलें आहे. परंतु ह्या जवाएवढ्या सुखाची पर्वताएवढ्या दुःखापुढें काय मातब्बरी आहे !! त्या सुखाला सुख तरी म्हणतां येईल काय ?—नाहीं. ह्या पारमार्थिक सुखाच्या विचाराहून मायापाशांत बद्ध झालेल्या संसारी लोकांची सुखाची कल्पना बरीच भिन्न आहे. सदृढ शरीरसंपदा, संतती आणि विपुल संपत्ति असली म्हणजे आह्मीं त्याला सुखी म्हणतों.

ऐश्वर्य, चार चौघांत, त्याचप्रमाणें सरकार दरबारांत, मोठा मानमरातब आणि कीर्ति इत्यादि बाह्य दृष्टीनें पाहतां **शंकरशेट** सुखी

१ ह्या बाईचे मांडीवर रा. **माधवराव भाऊ** यांस दत्तक दिलें होतें.

होते; परंतु औरस संततीच्या अभावीं त्यांना होत असलेल्या अंतस्थ दुःखापुढें तें सुख खरोखरीच राईएवढें होतें. अलीकडे त्यांची चित्तवृत्ति फार उदास असे. त्यांना पहिली संतति कन्या झाल्यानंतर बरींच वर्षें लोटलीं, तशी त्यांची निराशा होऊं लागली. आपल्या पश्चात् एवढ्या मोठ्या संपत्तीचा उपभोग घेण्यास आपणास औरस संतती नाहीं आणि '**अपुत्रस्य गृहं शून्यम्**' हा आपणास ह्या संसारांत येऊन मोठा डाग लागणार हें निराळेंच, हे विचार त्यांच्या मनांत आले कीं, त्यांचें हृदय दुःखानें विदारण होत असे; आणि **निरंजनमाधव** कवीनें ह्मटल्याप्रमाणें—

नसेचि सुत त्याजला ह्मणुनि फार चिंतावला।
सुखासि बहु वीटला, अफळ जन्मसा वाटला॥

अशी त्यांच्या मनाची स्थिति झाली होती. स्वभावतः ते दयाळु अंतःकरणाचे व धार्मिक असल्यामुळें पुत्रप्राप्तीकरितां जे जे व्रत-नियम त्यांना सुचले व सुचविले, ते ते सर्व त्यांनीं पूर्ण निष्ठेनें पाळले. त्यामुळें त्यांचा रोजचा दानधर्म वाढून अतित अभ्यागतांचा त्यांच्याकडे सारखा रव लागला होता. त्याचप्रमाणें **भवानीबाईचाही** नेमधर्म, व्रत किंवा उपवास यांवाचून एकही दिवस सुनका जात नसे. पुत्रप्राप्तीकरितां त्या साध्वीनें आपल्या सुंदर तनुचीं शुष्ककाष्ठें करून घेतलीं, परंतु ईश्वराच्या कसोटीचे अद्यापि कांहीं दिवस बाकी राहिले होते.

पुढें पुढें **शंकरशेट** यांच्या मनाचा उद्वेग इतका वाढला कीं, त्यांचें व्यापारधंद्यावरूनही मन उडत चाललें. नेहमीं त्यांचें मन अस्वस्थ आणि चिंतायुक्त असे. होतां होतां त्यांच्या वयाची पन्नाशी उलटून त्यांच्या उत्तर वयास आरंभ झाला. तेव्हां त्यांनीं आपल्या

वाढत्या व्यापारास हळुहळू आळा घालण्यास सुरवात केली. परंतु त्यांनीं किंवा त्यांच्या प्रियकर पत्नीनें व्रतधर्माला मात्र आळा घातला नाहीं. आपले व्रत–नियम आणि दानधर्म आपणास उपयोगी पडतील, अशी **शंकरशेट** यांची खात्री होती. कोठलीही गोष्ट करण्याकरितां हातीं घेण्यापूर्वीं तिचा साधक बाधक आणि नफ्या तोट्याविषयीं योग्य विचार करूनच ती गोष्ट ते करीत असत. आणि पूर्ण विचारांतीं हातीं घेतलेली गोष्ट फलसिद्धि होईपर्यंत सोडावयाची नाहीं, असा त्यांचा बाणा होता. त्यांच्या एकंदर आयुष्यक्रमांतील गोष्टींचें नीट निरीक्षण केल्यास पुढें लिहिलेलें तत्त्व त्यांच्या मनावर उत्तम रीतीनें बिंबलें होतें, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

उद्योगास तूं स्वाधीन ठेव; त्याचें वर्चस्व तुजवर होऊं देऊं नकोस. आळसी मनुष्यास सर्व गोष्टी दुःसाध्य दिसतात; उद्यमी मनुष्यास सर्व सुखकर असतात; आळस, हत्याराचे जंगाप्रमाणें आहे. जंगानें हत्यार जितकें नाश पावतें, तितकें तें वापरण्यानें बिघडत नाहीं. नेहमीचे उद्योगांतली किल्ली चकचकीत असते. शहाणपणानें व सतत परिश्रमानें मूषकानें चावून दोरखंडाचे दोन तुकडे केले.

फ्रांकलीन.

आपल्या दीर्घोद्योगानेंच **शंकरशेट** यांनीं विपूल संपत्ति मिळविली. मानमान्यता आणि श्रीमंती यांत त्या वेळच्या प्रमुख आणि धनिक शेटसावकारांत त्यांचें नांव झळकूं लागलें, याचें कारण हेंच कीं, त्यांनीं आपल्या दीर्घोद्योगानें मिळविलेला लौकिक !

———

भाग पांचवा.

भुजंगहनन व स्वप्नप्रतीति.

प्रसाद चिन्हानि पुरः फलानि ।

रघुवंश.

महत् पुण्यसंचयानें आमच्या आर्यावर्तांत अति प्राचीन काळीं व ह्या महाराष्ट्रांत गेल्या दोन तीनशें वर्षांत असे कांहीं श्रीलक्ष्मीचे व श्रीसरस्वतीचे लाल होऊन गेले आहेत कीं, ज्याचा प्रकाश, ज्यांच्या नांवाची गर्जना व ज्यांच्या कर्तबगारीचा प्रभाव यावच्चंद्रदिवाकरौ अक्षय राहील. अशा महापुरुषांच्या नांवांत अशी कांहीं जादू भरली आहे कीं, त्यांच्या नांवाचा उच्चार प्रत्यहीं प्रातःकाळीं केला तर आपला सर्व दिवस पुण्यकर्मांत खर्च व्हावयाचाच ! आमचें सुदैव मोठें, आमचें सौभाग्य खंबीर ह्मणून अशा सत्पुरुषांचे अवतार आमच्या महाराष्ट्रभूमींमध्यें होऊन ठिकठिकाणीं पुण्यक्षेत्रें उत्पन्न झालीं आहेत. आणि खरोखरीच आह्मी धन्य आहोंत, कारण आमचे ते पूर्वज ह्मणून मोठ्या उत्साहकारी अभिमानानें आह्मांस अशा सत्पुरुषांची कीर्ति गातां येते. प्रस्तुत आम्ही ज्या महाभागाची कीर्ति गात आहोंत, त्याच्या जन्मापूर्वीं एक अश्रुतपूर्व चमत्कार घडून आला, ती मनोवेधक हकीकत पुढें दिली आहे.

एके दिवशीं **भवानीबाई** अस्पर्श असल्यामुळें मागील द्वारीं तुळशी-वृंदावनाच्या बाजूला घरांतील इतर बायकांबरोबर इकडल्या तिकडल्या गोष्टी करीत बसल्या होत्या. परसांत चाकरमाणसें आपापलीं नित्यनैमित्तिक कामें करण्यांत गढून गेलीं होतीं. एका बाजूला सुतार कांहीं काम करीत होते. आणि त्यांच्या बाजूला इमारतीला लागणाऱ्या लाकडांचा मोठा ढीग रचून ठेविला होता. त्या लाकडांच्या राशींतून एकाएकीं एक मोठा, लांब आणि अंगावर लव असलेला असा भुजंग निघाला. प्रथम तो कोणाच्या दृष्टीस पडला नाहीं. तो हळूहळू तुळशीवृंदावनाकडे चालला होता. इतक्यांत **भवानीबाईंची** दृष्टि त्याच्याकडे गेली. त्याबरोबर त्यांनीं भयाभीत होऊन एक किंकाळी फोडली. ती किंकाळी ऐकतांच सर्वांचें लक्ष त्या भुजंगाकडे गेलें. तेव्हां **भवानीबाईजवळ** बसलेल्या बायका पटापट उठून घरांत पळत गेल्या. इकडे ही गडबड उडालेली पाहून नोकर चाकर लोक हातांत काठ्या घेऊन धांवत आले. आणि जो तो त्या भुजंगाला मारण्यास प्रवृत्त झाला. तें पाहून **भवानीबाईंस** स्त्रीस्वभावानुसार वाईट वाटून त्या म्हणाल्या, ' नकोरे नका त्याला मारूं ! जाऊं द्या त्याला. तो कोणी ह्या वाडीचा धनी असेल किंवा तो पूर्वजन्मींचा आपला भोगी आलेला असेल.' परंतु छे ! नोकर लोकांनीं अखेरीस त्या प्राण्यावर घाव घातलाच ! तेव्हां 'मला मारूं नका' अशा अर्थसूचक खुणेनें त्या भुजंगानें दोन तीन वेळां आपली फडा हालविली. त्यावेळीं **शंकरशेट** माडीवर बसले होते. त्यांना हा गलबला ऐकूं जातांच ते खालीं परसांत आले. तेव्हां नोकरांनीं आपण केलेली बहादुरी दाखविण्याकरितां तो मारलेला भुजंग त्यांच्यापुढें केला. तो पाहून **शंकरशेटजींस** अत्यंत वाईट वाटलें. त्यांनीं आपल्या नोकरांस त्याबद्दल फार दूषण दिलें.

नोकरांच्या अविचारामुळें त्यांच्याकडून घडलेल्या ह्या कृत्याबद्दल **शंकरशेटजींस** फार चटपट लागली. ती इतकी कीं, न जाणतां आपल्या हातून एक अप्रत्यक्ष हत्या घडली, असें त्यांस वाटूं लागलें. त्यांनीं तात्काळ पुरोहितास बोलावून ज्या ठिकाणीं तो भुजंग मारला होता, त्या जागेवर चंदनाची चिता रचविली. नंतर त्या मृतभुजंगाच्या तोंडांत एक सुवर्णाचें नाणें घालून त्यास एका रेशमी वस्त्रांत गुंडाळलें, आणि त्या चंदनाच्या चितेवर त्याचें यथाविधि दहन केलें. नंतर त्यांनीं आपल्या पत्नीसह त्या मृतभुजंगाचें तीन दिवसपर्यंत अशौच धरिलें. असें ह्मणतात कीं, तिसऱ्या दिवशीं मध्यरात्र उलटून गेल्यावर **शंकरशेट** सुषुप्तावस्थेंत असतां त्यांस एक चमत्कारिक स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत तो मृत भुजंग दिव्यरूपानें येऊन ह्मणाला, ' मला मारल्याबद्दल तुम्हाकडे कांहींएक दोष नाहीं. उलट ह्या योनींतून माझी मुक्तता केल्याबद्दल आणि माझें यथाविधि दहन करून माझें सुतक पाळल्याबद्दल मी प्रसन्न झालों. मी तुमच्या पोटीं येऊन तुमची पुत्रप्राप्तीची इच्छा सफल करीन ' असें ह्मणून तो अंतर्धान पावला.

खरोखर हा एक दैविक चमत्कार घडला. ईश्वरीलीला किती अतर्क्य आहे, कारण ह्मटलेंच आहे—

' चिकिर्षते कर्मणि चक्रपाणेर्नापेक्ष्यते तत्र सहायसंपत् '

देवाच्या मनांत एखादी गोष्ट करावयाची आली ह्मणजे तेथें कशाची अवधि ! हें विलक्षण भावी गोष्टीचें सूचक स्वप्न पाहून **शंकरशेट** गडबडून जागे झाले. आणि क्षणभर आपल्या शय्येवर विचार करीत राहिले. हळुहळू त्यांना पूर्वींच्या गोष्टीची स्मृति झाली. **घोडबंदर** मुक्कामीं असतांना महंतानें आपल्या पूज्य वडिलांस दिलेल्या

आशीर्वादाची त्यांना आठवण झाली. तत्काळ त्यांनीं आपल्या प्रिय पत्नीस उठवून नुकताच पाहिलेला स्वप्नांतील अद्भुत परंतु पुत्रप्राप्तीचा आशाजनक वृत्तांत निवेदन केला. ती दैविक चमत्काराची शुभसूचक हकीकत ऐकून **भवानीबाईस** मोठी धन्यता वाटली आणि त्यांच्या आशातंतूस अंकूर फुटूं लागले.

ही वरील वृत्तांताची अद्भुत हकीकत आमच्या आधुनिक मंडळीस कितपत रुचेल, याची मोठी शंका आहे. तथापि तिच्या सत्यासत्यतेविषयीं विचार करणें आह्मी आमच्या प्रिय वाचकावर सोंपवितों. परंतु इतकी गोष्ट खरी कीं, **भवानीबाईच्या** उदरांत पहिल्या कन्येच्या पाठीमागून बारा वर्षें राहिलेला सल वरील दृष्टान्त झाल्या दिवसापासून उत्तरोत्तर वाढूं लागला. आणि गर्भधारणेचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. त्यावेळीं **शंकरशेट** यांस झालेल्या आनंदाचें वर्णन कोण करील ! आपणावर ईश्वराची खैर झाली, अशी त्यांची पूर्ण खात्री झाली. आतां मात्र त्यांच्या दानधर्माची मर्यादा फार वाढली. इतकेंच नव्हे तर दृष्टांताच्या रात्रीं **भवानीबाईनीं** त्या आनंदाच्या भरांत **त्र्यंबकेश्वराला** केलेला नवस, **नाशिक त्र्यंबकेश्वरीं**[1] जाऊन फेडण्याचा त्यांनीं संकल्प केला.

---

१ **त्र्यंबकेश्वर** हें देवस्थान नाशिकापासून १८ मैलांवर आहे. तेथें गोदावरीचा उगम असल्यामुळें भाविक हिंदुजनांस हें अत्यंत पवित्र स्थान आहे. कारण **त्र्यंबकेश्वर कुशावर्ता**विषयीं लोकांचा—

कुशेनावर्तिता गंगा गौतमेन महात्मना ।
कुशावर्तमितिख्यातं त्रिषु लोकेषु दुर्लभम् ।

असा समज असल्यामुळें ह्या कुंडांत स्नान करणें अत्यंत पुण्यकारक होय, असें मानितात. **कुशावर्ता**चें बांधकाम फार सुरेख असून हें तीर्थ शके १६७२ त बांधण्यास आरंभ होऊन त्याची पूर्णता शके १६९० मध्यें झाली. **गौतमऋषीनें**

त्यावेळीं तीर्थयात्रा करणें ह्मणजे फारच दुर्घट आणि द्रव्याचें काम होतें. हल्लींच्या पिढीला तीर्थयात्रेचें कांहींच महत्त्व वाटत नाहीं. कारण हल्लीं सव्वा रुपया रेल्वे—गाडीभाडें खर्च केलें असतां बिनधास्त रात्रीं गाडींत बसून दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपणास परम पवित्र गोदावरीच्या स्नानाला **नाशिकास** जातां येतें, परंतु त्यावेळची स्थिति अगदींच निराळी होती. एखादा साधु, बैरागी किंवा एखादा श्रीमंत मनुष्य यांसच तीर्थयात्रा घडत असे. कारण त्यावेळीं कोणतीही तीर्थयात्रा करणें ह्मणजे दुःखाचें, हालाचें आणि फार पैशाचें काम असून सर्व प्रवास बैलगाडीनें करावा लागत असे. एखाद्या मध्यम स्थितींतील मनुष्यास त्यावेळीं तीर्थयात्रेच्या गोष्टी केवळ स्वप्नवत् होत्या. **शंकरशेट** ह्या तीर्थयात्रेला निघाले तेव्हां त्यांनीं आपला सर्व आश्रितवर्ग बरोबर घेतला होता. शिवाय ह्या तीर्थयात्रेनिमित्त त्यांनीं हजारों रुपये दानधर्मांत खर्च केले. यावरून वाचक हो ! **शंकरशेट** यांची व्यापारमिळकत किती होती, याचा तुह्मींच विचार करा !

गंगा विवक्षित जागेंत रहावी ह्मणून कुशानें—दर्भानें एक रेषेची मर्यादा आंखली ह्मणून त्या स्थलास '**कुशावर्त**' असें नांव पडलें. कुशावर्तापेक्षां **त्र्यंबकेश्वर**चें देवालय अत्यंत प्रेक्षणीय आहे. हें देवालय श्रीमंत **नानासाहेब पेशवे** यांनीं बांधण्यास सुरवात केली, त्याची पूर्णता **सवाई माधवराव पेशवे** यांच्या कारकीर्दींत झाली. आणि सर्व खर्च सुमारें दहा लक्ष रुपये झाला, असा अजमास आहे. देवाचे दागिने आणि लवाजमा अत्यंत मौल्यवान् असून त्यांत रत्नजडित मुकुट फारच प्रेक्षणीय आहे. पूर्वीं हा मुकुट **म्हैसूर**च्या राजाजवळ होता. तो पुढें मोंगलांच्या हातीं गेला. नंतर श्रीमंत पेशव्यांनीं तो दिल्लीहून आणून देवास समर्पण केला, असें म्हणतात. हल्लीं ह्या देवस्थानास इंग्रजसरकारानें दरमहा ९५६ रुपयांची नेमणूक चालू ठेविली आहे.

भाग सहावा.

जन्म आणि बाळपण.

परिवर्तिनि संसारे मृतः को वा न जायते ।
स जातो येन जातेन याति वंशस्समुन्नतिम् ॥

भर्तृहरि.

पुत्र व्हावा ऐसा गुंडा । ज्याचा तिहीं लोकीं झेंडा ॥

तुकाराम.

दासबोधांत—

जन्म दुःखाचा अंकुर । जन्म शोकाचा सागर ।
जन्म भयाचा डोंगर । चळेना ऐसा ॥ १ ॥

असें जन्मदुःखाचें निरूपण केलें आहे. परंतु समर्थांनीं वर्णन केलेली जन्मदुःखाची हृदयविदारक कल्पना पुत्रजन्माच्या आनंदांत एकातरी मातापितरांस होत असेल काय ?—नाहीं. कारण पुत्रप्राप्तीचा आनंद, हा सर्व आनंदाचें अत्युच्च शिखर व सौख्याचें माहेरघर होय. ह्या सुखाची किंमत गृहस्थाश्रमीच योग्य प्रकारें जाणतात. असो.

दीन चातकांची तृषार्तता अवलोकन करून ज्याप्रमाणें मेघराजाच्या ठिकाणीं आपोआपच जलवृष्टि करण्याची बुद्धि उत्पन्न होते, त्याचप्रमाणें सतत बारा वर्षें पुत्रप्राप्तीचा निदिध्यास लागलेले

शंकरशेट आणि त्यांची प्रिय पत्नी यांची दीर्घकाळाची इच्छा फलद्रूप होण्याची सुवेळ नजीक येऊन ठेपली.

दिवसेंदिवस **भवानीबाईच्या** उदरांतील गर्भ वाढूं लागला, हें मागील भागांत सांगितलेंच आहे. तेव्हांपासून तीं उभयतां पति-पत्नी अधिक नेमधर्म पाळूं लागलीं; आणि त्यांचा दानधर्मही विशेष वाढला. सातवे मासीं घरांतील वृद्ध स्त्रियांनीं **भवानीबाईस** होणाऱ्या डोहळ्यावरून ' पुत्राचा योग आहे, ' असें ध्वनित केलें. तेव्हां तर **शंकरशेटजींच्या** आनंदाला पारावार नाहींसा झाला. **शंकरशेट** यांस दृष्टान्त झाल्या दिवसापासून **भवानीबाईस** नऊ महिने नऊ दिवस पूर्ण होऊन प्रसूतीचा वेळ नजीक येऊन ठेपला, त्यावेळीं **शंकरशेट** माडीवर बसले होते. त्यांच्या मनांत निरनिराळ्या विचारांचें काहूर माजलें होतें. जसजशी रात्र होऊं लागली, तसतशी त्यांची उत्कंठाही वाढूं लागली. ती महाशिवरात्रीची उत्तर रात्र होती. शेवटीं बारावर दोन वाजतां ह्मणजे गुरुवार ता. १० माहे फेब्रुआरी सन १८०३ या रोजीं **भवानीबाई** सुखरूप पुत्ररत्न प्रसवल्या. हेच आमचे प्रस्तुतचे चरित्रनायक होत.

पुत्रप्राप्तीचें आनंदकारक वर्तमान **शंकरशेट** यांस कळतांच आज आपण सौख्यसागरांत पोहत आहोंत असें त्याना वाटलें, आणि तें स्वाभाविकच होतें. ज्या सेवकानें पुत्र झाल्याची बातमी **शंकरशेट** यांस ते माडीवर असतांना प्रथम कळविली, त्यास शेटजींनीं एक मोहर बहाल करून संतोषित केलें. आतां आपण सौख्याच्या अत्युच्च शिखरावर आहोंत, असें त्यांना क्षणोक्षणीं वाटत होतें.


१ ह्या थोर पुरुषाच्या जन्मकाळाविषयीं तत्कालिन वृत्तपत्रांत चुकीची वेळा नमूद केली आहे. एका प्रसिद्ध वृत्तपत्रांत नानांचा जन्मसन १८०० दिला

कारण बरोबरच आहे. अनेक नवससायास करून पुत्रप्राप्तीची बहुतेक निराशा झाल्यावर पुत्रमुख दृष्टीस पडणें हें महद्भाग्यच होय. **पंतांनीं** ह्मटल्याप्रमाणें—

दुग्धलता अमृतधनें फळती न फळेल काय शुष्कलता ?

ज्याच्या कृपेनें जळलेल्या वेलीस फुलें येणें ही साहजिक गोष्ट, त्याला वाळलेलें झाड फलपुष्पांनीं वांकवून टाकणें अशक्य आहे काय ?—आपली वंशवृद्धि झाली, ह्या आनंदांत त्यांनीं ईशचरणीं लीन होऊन जो दानधर्म केला व जो आनंदोत्सव केला तो खरोखरीच अपूर्व होता. त्यांनीं केलेला पुत्रजन्मोत्सव पाहून मुंबईतील मोठमोठे शेटसावकारही थक्क झाले. पुत्रप्राप्तीचा आनंद कसा असतो तो पित्यासच पुसावा, निपुत्रिकास त्याची कल्पना

आहे. व इतर पत्रांनींही त्याचाच अनुवाद केलेला आहे. करितां येथें त्यांच्या जन्मपत्रिकेवरून वेळ आणि कुंडली खालीं दिली आहेत.



शके १७२५ माघ वद्य १३ गुरुवार. सूर्योदयातगत् घ. १६ प. ४०.

देखील व्हावयाची नाहीं. ही पुत्रप्राप्ती होतांच एका संस्कृत कवीनें ह्मटल्याप्रमाणें—

सानंदं सदनं सुतास्तु सुधियः कांता मृदू भाषिणी ॥
इच्छापूर्णधनं स्वयोषिति रतिः स्वाज्ञापराः सेवकाः ॥
आतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मिष्टान्नपानं गृहे ॥
साधोःसंग मुपागतेच सततं धन्यो गृहस्थाश्रमः ॥

अशी **शंकरशेट** यांची गृहस्थिति सर्वतोपरी आनंददायक झाली. पुढें बारावे दिवशीं नामकरणविधि मोठ्या थाटाचा होऊन मुलाचें नांव '**जगन्नाथ**' असें मोठ्या आवडीनें ठेविलें. त्यावेळीं उपाध्यांनीं मुलाच्या कुंडलींतील ग्रह पाहून जें कांहीं मुलाच्या भावी आयुष्यक्रमाचें भविष्यकथन केलें, तें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ते ह्मणाले, ' मुलाचा लग्नाधिपति शुक्र दशमांत असून त्यावर गुरूची पूर्ण दृष्टि असल्याकारणानें मुलाची दहाव्या वर्षापासून मानप्रतिष्ठा वाढून राजदरबारीं त्यास मोठा सन्मान मिळेल. त्याचप्रमाणें उद्योगधंदा आणि व्यापार वृद्धी पावेल. शुक्राची दशा सुरू असतांना ह्या मुलाच्या वयाच्या ४१ वर्षांपासून तो ६२ वर्षांपर्यंत याचा अत्यंत उच्चकाल आहे. ह्या वर्षांच्या अवधींत हा मुलगा आपल्या कर्तबगारीनें अनेक सत्कृत्यें करील आणि आपली कीर्ति त्रिखंड गाजवील. तसेंच पंचमाधिपति आणि चतुर्थाधिपति रवि आणि बुध हे भाग्यांत असल्यामुळें हा मुलगा बुद्धिमान् आणि ऐश्वर्यवान् होईल.' इ० इ० हें मुलाचें अत्युत्तम ग्रहमान ऐकतांच **शंकरशेट**जींस किती हर्ष झाला असेल, याची वाचकांनींच कल्पना करावी. असो.

शंकरशेटजींस पहिल्या कुटुंबापासून दोन मुलगे होते, आणि हें नवें बालक, अर्थात् लहान असल्यामुळें ह्या बालकाचें '**नाना**' असें लाडिकपणानें नांव ठेवलें. आणि हेंच नांव आज त्रिभुवनांत गाजत आहे.

शुद्ध बीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥

ह्या तुकोबाच्या उक्तीची सत्यता नव्यानें सांगावयास नको ! **नानांच्या** नांवाप्रमाणें त्यांच्या वडिलांचे '**शंकरशेट**' हेंही नांव आज बहुश्रुत आहे. त्यांनीं आपल्या दीर्घोद्योगानें विपुल लक्ष्मी संपादन केली; आणि **नानांनीं** तिचा लोककल्याणाकरितां सत्कार्यीं व्यय केला. सर्वच लक्ष्मीपुत्रांकडून त्याचें कर्तव्य योग्य रीतीनें बजाविलें जातें, असें नाहीं. आपल्या घरांत असलेली एखादी विपुल वस्तु इतर जनांस देऊन तिचा सत्कारणीं व्यय करणारे आज काल थोडेच सांपडतील. लोककल्याणार्थ अगदीं तन्मय होऊन जाणाऱ्या सत्पुरुषांना कशाची उपमा साजेल ? **टेनिसेन** कवि ह्मणतो कीं, **पृथ्वीपतीच्या मस्तकावर चमकणाऱ्या रत्नजडित मुकुटापेक्षांही त्यांची योग्यता फार मोठी आहे.** मग अशाप्रकारचे सत्पुरुष जगास वंदनपात्र व्हावेत, यांत आश्चर्य तें कोणतें !

थोर कुलांत जन्म घेतल्यानें मोठेपणा येत नाहीं. पेशव्यांच्या कुळांत दोन **बाजीराव** झाले. दोघांच्याही कीर्ति दिगंत आहेत. एकानें कीर्ति मिळविली आणि दुसऱ्यानें घालविली. पहिला आपल्या अलौकिक कृत्यांनीं कुलदीपक झाला. आणि दुसरा कुलांगार निपजला; इतकाच फरक ! परंतु आमचे चरित्रनायक, **भर्तृहरीनें** नीतिशतकांत ह्मटल्याप्रमाणें—

परिवर्तिनि संसारे मृतः को वा न जायते ।
स जातो येन जातेन याति वंशस्समुन्नतिम् ।

स्वतःच्या गुणांनीं मोठेपणा पावून आपल्या कुलास भूषणीभूत झाले.

शंकरशेटजींस त्यांच्या उत्तरवयांत **नाना** झाले. प्रस्तुतकाळीं हा एक मोठा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. सांप्रत इतक्या

वयाविषयीं आपली काय कल्पना होते, तें येथें सविस्तर रीतीनें सांगण्याची जरूरी नाहीं. प्रस्तुतचें कालमान विचित्र झाल्यामुळें, परिस्थितींत पुष्कळ फरक पडला आहे. शंभर वर्षांमागें '**शतायुर्वै पुरुषः**' ह्या श्रुति वाक्यानुरूप लोकस्थिति होती. आणि आतां 'विशी ह्मणजे ऐनउमेदी–संसाराचा स्पर्शकाल, तिशी ह्मणजे मध्यकाल आणि चाळीशी–पन्नाशी ह्मणजे मोक्षकाळ,' असा चमत्कारिक प्रकार झाला आहे.

शंकरशेट यांनीं पुत्रप्राप्तीकरितां केलेले नवस यथासांग फेडण्यास एका वर्षाइतका कालावधि लागला. प्रत्येक आठ पंधरा दिवसांनीं ह्या नवसाप्रीत्यर्थ कांहींना कांहीं तरी समारंभ असे. एकूण **नानां**च्या जन्मवेळीं **शंकरशेट**च्या हातून लोकोत्तर दानधर्म झाला. त्या उभयतां मातापित्यांचें **नाना**वर विलक्षण प्रेम होतें, यांत कांहीं नवल नाहीं. **नाना** एका वर्षाचे झाले, तेव्हां बोलूं चालूं लागले. त्यांची लहानपणीं फार तामसवृत्ति असे. त्यांना साधारण समजूं लागतांच नोकरचाकरांनीं उचलून घेतलेलें त्यांस बिलकूल खपत नसे. परंतु त्यापूर्वींचा प्रकार अगदीं निराळा होता. **शंकरशेट**च्या पदरीं आश्रितवर्ग मोठा असल्यामुळें सबंध दिवसांत **नानां**ची पाठ भूमीला क्वचितच लागत असे. आपणास मुलाला घेण्यास मिळावें ह्मणून त्यांच्यांत चढाओढ लागून ज्याच्याजवळ **नाना** जात तो स्वतःला भाग्यवान् समजे. परंतु असे दिवस फार थोडे असत. कारण बहुतेक सर्व दिवसांत **भवानीबाई** आपल्या प्रिय बालकाला क्वचितच विसंबत असत. त्याचें गोड बोबडे बोल आणि त्याची बाललीला पाहून ती माउली स्वतःला धन्य मानीत असे. आणि तेंही बरोबर आहे. कविशिरोमणी **मोरोपंतांनीं** पुत्र-

वात्सल्याच्या स्फूर्तीनें छंदोरामायणांत गोड वर्णन केलें आहे. तें येणेंप्रमाणें--

पीतां स्तनातें क्षणमात्र राहणें ।
महादरें मातृमुखासि पाहणें ॥
वक्त्रांत तें दुग्ध तसेंचि वाहणें ।
तेणेंचि फुत्कार करूनि नाहणें ॥ १ ॥

मुखांतुनी दुग्ध गळे सुनिर्मळ ।
उरावरी ये अतिशुभ्र बोगळ ॥
मंदाकिनीचा गगनीं प्रवाह तो ।
चंद्रप्रभा पांडुर काय वाहतो ! ॥ २ ॥

बैसोनि हर्षें जननीचिया कडे ।
विलोकुनी तन्मुखनीरजाकडे ॥
स्मितामृतापूरित बोल बोबडे ।
बोले तदा ब्रह्मसुख स्वयें दडे ! ॥ ३ ॥

स्वनंदनातें प्रतिबिंब मंडलीं ।
धौतामला स्फाटिक मंदिरस्थलीं ॥
माता न जाणें बहुशोधितां भ्रमें ।
परंतु पावे सुख ती अशा श्रमें ॥ ४ ॥

बालकांच्या मधुर बोबड्या बोलांनीं आणि कृतींनीं मोठमोठ्या कवींना व तत्ववेत्त्यांनाहीं भुरळ पडली आहे, मग हें तर काय मातेचें प्रेमळ हृदय ! बालकाच्या बाललीलांनीं ज्याचें हृदय उदात्त व प्रसन्न होत नाहीं, असा प्राणी जगतीतलावर सांपडणें कठीण !

नाना आपल्या प्रियमातेच्या मांडीवर खेळत असतांना पाहून **शंकरशेट**जींस आनंदाचें भरतें येत असे. आपल्या बालकाची लीला कोणत्याही स्थितींतल्या मातापितरांस आल्हादकारक असते. सर्व दिवस काबाडकष्ट करणाऱ्या जनास बालकाची लीला सहज श्रम-

रहित करते, दारिद्र्यानें पिडलेल्या दीनांची अन्नाच्या अभावीं जठराग्नीची प्रदीप्तता बालकानें लीलेनें भरविलेल्या एका घासानें सहज शमन होते, अशी ही बाळलीला **शंकरशेट**सारख्या लक्ष्मीपुत्रास पुत्रवात्सल्यानें आनंदाचें भरतें आणील, यांत नवल तें कोणतें ! पुढें **नानां**च्या पाठीमागून दीडदोन वर्षांनीं **भवानीबाईस** दुसरा मुलगा झाला. त्याचें नांव **परशुराम** असें ठेविलें. व त्याच्याही मागून कांहीं काळानें तिसरा मुलगा जन्मास आला. त्याचें नांव **माधवराव** ठेविलें. परंतु ह्या बालकांपासून त्या मातापितरांस सुख झालें नाहीं, हें त्यांचें दुर्दैव !

भाग सातवा.

मातृवियोग.

न मातुः परदैवतम् ।

रम्य अशा ह्या जगतांत दुःखसंबंधरहित संपूर्ण सुखाच्या ऐश्वर्यानें मंडित असा कोण आहे ? असें जर आपण सूक्ष्मरीतीनें विचार करून पाहूं लागलों, तर तशा प्रकारचा प्राणी फार विरळा ! किंबहुना नाहींच ह्मटलें तरी चालेल, असें आपणांस दिसून येईल. कोणास पुत्र नाहीं, कोणाची बायको कुरूप, कोणाजवळ द्रव्य नाहीं, कोणाजवळ संतती आणि संपत्ती असून त्यास शारीरस्वास्थ नाहीं, अशा प्रकारें कोणत्याना कोणत्यातरी कारणामुळें दुःख हें आहेच ! एतावता, दुःखसंबंधरहित केवळ परमानंदाचा अनुभव कोणी घेत आहे, असें दिसत नाहीं. पण प्रत्येक प्राण्याची इच्छा तर तशी स्थिति आपणास असावी अशी आहे, व ती प्राप्त होण्याकरितां आपापल्या बुद्धीनें तो लौकिक उपायही करीत असतो. परंतु अशा लौकिक उपायानें दुःखनाश होत नाहीं किंवा परमानंदाचा लाभही होत नाहीं.

शंकरशेट यांची स्थिति अशाच प्रकारची होती. पुत्रप्राप्तीनंतर त्यांस सुखाचा किंचित्काल भास होतो न होतो तोंच त्यांच्यावर एक दारुण प्रसंग गुदरला. अलीकडे **भवानीबाईं**ची प्रकृति नेहमीं

नादुरुस्त असे. शेवटच्या प्रसूतीपासून त्यांस एक विकृति जडली होती. दिवसेंदिवस त्या निस्तेज आणि शक्तिहीन होऊं लागल्या. प्रथम **शंकरशेटजींस** आपल्या प्रिय भार्येविषयीं इतकी काळजी वाटली नाहीं; कारण सर्व साधारण नियमाप्रमाणें प्रसूतकालानंतर अशक्ततेमुळें स्त्रियांच्या नाजुक झालेल्या प्रकृतीवर स्वाभाविक तसा परिणाम होतोच. तशाचपैकीं हाही प्रकार असेल असें **शंकरशेटजींस** वाटलें. परंतु **भवानीबाईंच्या** प्रकृतीवर त्या अशक्ततेचा विलक्षण परिणाम होऊन त्यांस निराळी विकृती जडली. आणि त्याचा परिणाम त्यांचा आपल्या प्रियजनांशीं अखंड वियोग करण्यास कारणीभूत झाला. पुढें पुढें त्या अशक्ततेमुळें आपल्या शय्यागृहांतून बाहेर येईनातशा झाल्या. त्यांना आपल्या दुखण्याचा शेवट कळून चुकला. **शंकरशेटनीं** त्यांच्या आरोग्यार्थ आटोकाट परिश्रम केले. दूरदूरच्या ठिकाणांहून नामांकित वैद्य बोलाविले; परंतु दुर्दैवामुळें त्यांत यश आलें नाहीं. शेवटीं ' **अपि धन्वंतरिर्वैद्यः किं करोति गतायुषि,** ' किंवा कविशिरोमणि **मोरोपंतांनीं** म्हटल्याप्रमाणें—" **मरणाऱ्या रोग्याला काय करिल जाणता भला वैद्य ?** " या न्यायानें आयुर्मर्यादाच खुंटल्यावर प्रकृतीस आराम पडण्याकरितां केलेल्या अनेक उपायांचा कांहींएक उपयोग न होतां अखेरीस **मुक्तेश्वरानें** वर्णन केल्याप्रमाणें—

भार्या सकल श्रमातें हर्ती । भार्या सकल सुखातें कर्ती ।
भार्या पवित्रवंश धर्ती । यशकीर्ति स्त्रीसंगे ॥ १ ॥

अशी त्यांची सुशील भार्या इहलोकीचा पसारा सोडून व आपल्या तिघां अर्भकांना आपल्या पाठीमागें टाकून निघून गेली.

सृष्टीनियमाप्रमाणें सृष्टिक्रमाचें राहाटगाडगें ठरलेलें आहे. दिवस गेला कीं रात्र यावयाचीच, एक ऋतु संपला कीं दुसरा दत्त, त्यांप्र-

माणें प्रपंचांत सुखदुःखाचें रहाटगाडगें परमेश्वरानें माणसास लावून दिलें आहे. सृष्टिक्रमांतील दिवस आणि रात्र, ऋतुक्रम ही जशीं माणसास टाळतां येत नाहींत, त्याचप्रमाणें प्रपंचांतील सुख आणि दुःख त्याच्या स्वाधीन नाहींत. तीं जशी येतील तशीं त्याला भोगावीं लागतात. सुख मागून मिळण्यास मनुष्य जसा असमर्थ आहे, तसा दुःखही टाळण्यांत तो शक्तिमान् नाहीं. तीं क्रमानुसार यावयाचीं तेव्हां येतात आणि जावयाचीं तेव्हां जातात. त्यांत मनुष्याच्या स्वाधीनची गोष्ट **समर्थांनीं** सांगितली आहे.—' **ज्याज्या वेळीं जें जें होईल तें तें भोगावें ।** ' इतकीच आहे. आपल्या वाटयांस जें आलें आहे, तें मुकाटयानें भोगून त्यांतच सुखसमाधान मानावें. **शंकरशेट** हे फार विचारी पुरुष होते. त्यांनीं विवेकबलानें स्वतःचें बरेंच समाधान करून घेतलें, तरी देखील वृद्धपणीं आपल्या सहचारिणीचा विरहवियोग थोड्या-बहूत प्रमाणानें त्यांना जाणवलाच !

गिझो नांवाचा एक महापण्डित **फ्रान्स** देशांत होऊन गेला. त्यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं:—

मनुष्यानें कितीही उद्योग करून मोठालीं कामें करून जय मिळविला, तरी त्याला खऱ्या प्रेमाच्या सुखाची इच्छा झाल्यावांचून राहणार नाहीं. ही गोष्ट मला आज वार्धक्यांत वाटते असें नाहीं. तारुण्याच्या आरंभापासून असेंच वाटत आहे. कुटुंबप्रेम हेंच मोठालीं कृत्यें हातीं घेण्याचें कारण, आणि कुटुंबप्रेम नसेल तर मनुष्याची लोकांत मोठी प्रतिष्ठा झाली तरी त्याला खरें सुख होणार नाहीं.

गोष्ट खरी आहे ! संसारी मनुष्याला खऱ्या सुखाची कल्पना कुटुंबप्रेमापासून होत असते. **शंकरशेट** यांनीं आपल्या प्रिय पत्नीच्या

सहवासांत त्या कुटुंबप्रेमाचें सूख पूर्णपणें अनुभविलें होतें. मनुष्याला कोठलेंही कृत्य करावयाचें असल्यास त्याला एका प्रकारच्या उत्साहाची जरूरी असते. कुटुंबप्रेमापासून उत्पन्न होणारा उत्साह त्याच्या हातून वाटेल तें अवघड कार्य घडवून आणितो, इतकी त्याची विलक्षण शक्ति आहे. **शंकरशेटजींनीं** आपल्या व्यापाराचा एवढा मोठा पसारा वाढविला, त्याला कुटुंबप्रेमापासून होणारा उत्साहच कारण होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

पुढें **शंकरशेट** यांनीं आपल्या मृतपत्नीचे स्मरणार्थ मुंबईंत गवाली तलावाजवळ आपल्या वाड्यांत **भवानीशंकराचें** एक देवालय बांधिलें. हें एक मोठें सुंदर स्थळ असून त्याच्या बाजूला शेटजींनीं एक धर्मशाळा बांधली. ह्या धर्मशाळेंत अतिथि अभ्यागत आणि गरीबगुरिबांस वस्ती करण्याची मोकळीक आहे. ह्या देवालयांत रघुवीराप्रित्यर्थ दर मार्गशीर्षांत मोठा उत्सव होऊन चार दिवस यात्रा भरत असते. हें स्थान ग्रँटरोड स्टेशना जवळ असल्यामुळें दूरदूरच्या प्रवाशांची येथें उत्तम सोय होते. शिवाय ह्या धर्मशाळेला लागूनच पुढें **नानांनीं** एक धर्मार्थ दवाखाना ठेविला आहे. येथें हजारों गरीब रोग्यांना औषधें मिळतात. त्यामुळें लोक त्यांचे धन्यवाद गातात. यालाच ह्मणतात कीर्तिमहिमा !

भाग आठवा.

विद्यार्जन आणि पितृनिधन.

य: पठति, लिखति, पश्यति, परिपृच्छति, पण्डितानुपासयति ।
तस्य दिवाकरकिरणैर्नलिनीदलमिव विकास्यते बुद्धिः ॥ १ ॥

सुभाषित.

उत्तम गुणें शृंगारिला । तो बहुतांमध्यें शोभला ।
प्रगट प्रतापें उगवला । मार्तंड जैसा ॥ १ ॥

रामदास.

जगांत मनुष्यप्राणी जन्मास येतो, तेव्हा त्याचें मन धुतल्या तांदळासारखें निर्मळ व विकाररहित असतें. ज्ञान ग्रहण करण्याच्या शक्तींना तें संपन्न असतें खरें; परंतु जगाची आणि त्याची मुळींच ओळख नसते. जगांत तो अगदीं नवखा आणि परका असतो. प्रथम त्याला जें ज्ञान होतें तें शरीरव्यापाराला अत्यावश्यक लागणारें ज्ञान होय. आणि तें त्याला स्वाभाविकच प्राप्त होतें. पुढें मनुष्य जसजसा सृष्ट्यवलोकन करूं लागतो, तसतसा तो अधिकाधिक ज्ञान मिळवीत जातो. आणि त्याच्या योगानें हळुहळू त्याची ज्ञानज्योति वृद्धिंगत होऊं लागते. पुढें ह्या ज्ञानज्योतीचा प्रकाश मनावर घडणाऱ्या चांगल्या किंवा

वाईट संस्काराप्रमाणें पडतो. ह्मणून मुलांना लहानपणींच उत्तम गृहशिक्षा पाहिजे.

नाना लहानपणीं तामसवृत्तीचे होते, तरी प्रथमपासून त्यांच्या वडिलांनीं त्यांना गृहशिक्षा उत्तम लाविली होती. त्यामुळें **नानांची** ज्ञानार्जनतृष्णा दिवसेंदिवस अधिकाधिक बळावत चालली. मातृभाषेचा अभ्यास होतांच एका पण्डिताजवळून **नानांनीं** संस्कृत भाषेचें अध्ययन केलें. बाळपणांत त्यांना त्या भाषेची इतकी गोडी लागली कीं, तींत त्यांनीं चांगलें प्राविण्य मिळवून मोठमोठ्या विद्वानांबरोबर ते त्या भाषेंत नेहमीं वादविवाद करीत. त्याविषयीं **रेव्हरन्ड डॉ. विल्सन साहेब** ह्मणतात, ‘ To his vernacular languages, and especially the Marathi his mother-tongue, he gave much attention. Sanskrit, even, was not neglected by him, and his progress in it was such that he was accustomed intelligently to peruse some of the olden classics of this country. ’ त्यांच्या शिक्षणाविषयीं **शंकरशेटजींनीं** फारच काळजी घेतली होती. **नानांना** संस्कृतभाषेची आवड आणि तिचा त्यांच्या मनावर झालेला सुसंस्कार सांप्रत **मुंबई विश्वविद्यालयां**तील त्यांच्या नांवाच्या स्कॉलरशिपा—शिष्यवृत्त्या-साक्ष देत आहेत. **नाना** विद्यार्जनाकरितां इतके उत्सुक असत कीं, एखादी शंका आली असतां त्यावर वादविवाद करून गुरुमुखांतून ती शंका समजून घेतल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे.

प्रस्तूतचा शिक्षणक्रम आणि त्यावेळचा शिक्षणक्रम याविषयीं आपण विचार करूं लागल्यास त्यांत आपणास पुष्कळ अंतर दिसून येईल. हल्लींप्रमाणें क्रमिक पुस्तकें पूर्वीं नसल्यामुळें कोठलाही विषय शिकवितांना मुलांस एकंदर ज्ञान द्यावयाचें हें पूर्णपणें लक्षांत बाळगून

शिक्षकवर्ग चालत असे. त्यामुळें तो विषय शिष्यवर्गाच्या कोमल मनावर उत्कृष्टपणें बिंबत असे. आणि हल्लींप्रमाणें त्यांना क्रमिक पुस्तकांतील गोठलेल्या कज्जलांत कुचंबत न पडतां पवित्र व स्वच्छ अशा विषयजलांत प्रवेश करण्यास सांपडे. अशा रीतीनें गुरुमुखांतून प्रत्येक गोष्ट पूर्णपणें मनांत बिंबत गेल्यामुळें मुलांचें मन जास्त प्रफुल्लित होऊन विकास पावत असे. परंतु अलीकडील घोकंपट्टीच्या शिक्षणपद्धतीनें मुलांच्या तीव्रबुद्धीचा र्‍हास होतो, असें स्पष्ट म्हणावें लागतें. एकंदरीनें त्यावेळीं आतां प्रमाणें साच्यांतला अभ्यासक्रम नसून हल्लींप्रमाणें अभ्यासाची ठरीव कवाईतही नव्हती. विद्यार्थ्यांचीं मनें जेणेंकरून सुसंस्कृत होतील, व त्यांच्या बुद्धीचा विकास होऊन जेणेंकरून त्यांच्या अंगीं बहुश्रुतपणा येईल, अशा प्रकारचें खरें शिक्षण तें होतें.

नानांच्या शिक्षणाविषयीं **शंकरशेट** फार चौकस असत. त्यांनीं **नानां**वर असलेल्या आपल्या प्रेमाचा कधींही अतिरेक होऊं दिला नाहीं. मुलाचें मन सुशिक्षणाच्या संस्कारांनीं विकसित करणें, त्याला कर्तव्यतत्पर आणि सदाचारी करणें, हें आपलें कर्तव्य शेटजींनीं उत्तमप्रकारें बजाविलें, असेंच ह्मटलें पाहिजे. एके ठिकाणीं उद्योगपर्वांत—

द्यावें शीलचि, द्यावें केवल व्हाया न घात वसु तातें ।

असें **पंतां**नीं ह्मटलें आहे. आणि हेंच प्रत्येक पित्याचे कर्तव्य आहे. आपल्या मुलाला प्रत्येक बापानें ‘ शीलचि द्यावें ! ’ शील न देतां मुलाला विपुल संपत्ति दिली तर तो दुर्व्यसनांत तिचा व्यय करून स्वतःचा नाश करून घेईल. ह्मणून **पंतां**नीं स्पष्ट सांगितलें आहे कीं, प्रत्येक पित्यानें आपल्या पुत्राला संपत्तीपेक्षां अधिक मह-

त्याची जी वस्तु द्यावयाची ती 'शील' ही होय. ह्या मताच्या समर्थनार्थ एका हिंदी कवीनें ह्मटलें आहे—

जलकी शोभा कमल है। दलकी शोभा पील ॥
धनकी शोभा धरम है। कुलकी शोभा शील ॥

वर सांगितल्याप्रमाणें शेटजींनीं आपलें कर्तव्य योग्य प्रकारें बजावून **नानां**च्या शिक्षणाविषयीं जी काळजी घेतली, ती खरोखरीच फार प्रशंसनीय होती. नाहींतर अलीकडे पहावें तों मुलें शाळेंत जातात; आणि बाप फी भरतो, इतकेंच ! त्यांना जर त्यांच्या मुलाच्या अध्यायनाविषयीं विचारलें तर ती देखील माहिती नसते. अशी ही बापाची मुलाच्या शिक्षणाविषयीं आस्था, आणि त्यांतून हल्लींची घोकंपट्टीची शिक्षणपद्धति ! अशा स्थितींत आमचीं मुलें सुशिक्षित निपजलीं नाहींत, तर त्यांत आश्चर्य नाहीं.

नानांना विद्याभिरुचि उत्तम प्रकारची लागली होती. आणि त्यांच्या अंगीं '**वायां जावो नेदी क्षण, हेंचि सभाग्याचें लक्षण,**' हें साधुवचन पूर्णपणें बाणलें असल्यामुळें ते निमिषमात्रही आपला वेळ व्यर्थ दवडीत नसत. मराठीचा आणि संस्कृताचा अभ्यास पूर्ण होतांच त्यांनीं इंग्रजीभाषा शिकण्यास सुरवात केली. त्यावेळीं मुंबईंत **मिस्तर मेनवेरींग** आणि **डाक्टर मरफे** हे दोन प्रसिद्ध इंग्रजी शिक्षक होते. ते सकाळ संध्याकाळ **नानां**ना शिकविण्याकरितां येऊं लागले. थोड्याच दिवसांत आपल्या शिष्याची असाधारण धारणाशक्ति पाहून ते दोघे आंग्लपंडित प्रसन्न झाले. त्या पण्डितांची शिकविण्याची हातोटी चटकदार आणि ज्ञानविकासक असल्यामुळें नव्या स्फूर्तीनें **नानां**चें अध्यायन चाललें होतें. ह्या दोन पंडितांजवळ शिकत असतांना स्वतःच्या अनुभवावरून जनांमध्यें विद्याभिवृद्धि

करण्याचें बीं त्यांच्या ठायीं आपोआप रुजूं लागलें; त्यामुळें भावी कृतीचीं चिन्हें **नाना** शिष्यवृत्तींत असतांना **मेकालेनें लॉर्ड क्लाईव्ह**-च्या निबंधांत ह्मटल्याप्रमाणें—Some lineament of the character of the man were early discerned in the child. तीं चिन्हें त्यांच्या आचारविचारांत स्पष्ट दिसूं लागलीं. ते आपल्याबरोबर आपल्या दोघां धाकट्या बंधूंना अभ्यासाकरितां बसवीत; परंतु त्यांच्यासारखा उत्साह त्या दोघां बंधूंत दिसून आला नाहीं.


पुढें एके दिवशीं **शंकरशेटजी**वर एक अकल्पित प्रसंग ओढवला. त्यांचा धाकटा मुलगा **माधवराव** हा अतिशय स्वच्छंदी आणि हेकेखोर असल्यामुळें त्यानें स्वतःचा नाश करून घेतला. एके दिवशीं तो एकटाच वाड्यांतील पुष्करणी जवळ खेळत असतांना दुर्दैवानें एकाएकीं आंत पडला. त्यासमयीं जवळपास कोणींही नव्हतें, आणि बराच वेळ तें कोणाच्या लक्षांतही आलें नाहीं. पुढें मुलगा कोठें दिसेना ह्मणून सर्वत्र शोधाशोध सूरू झाली. सर्व घरांत एकच हाःहाःकार उडाला. जिकडे तिकडे नोकरचाकरांची धांवपळ सुरू झाली. अखेरीस शोधाअंती मुलाचें प्रेत पुष्करणींत सांपडलें. त्यावेळीं **शंकरशेट**च्या मनाची स्थिति फारच शोचनीय झाली. वृद्धापकाळीं त्यांना हा दुसरा धक्का बसला.

त्यावेळेपासून त्यांनीं आपलें मन संसारांतून काढल्यासारखें केलें होतें. हळुहळू संसारभार ते **नानां**च्या शिरावर टाकूं लागले. व तो वाहण्याची पात्रता **नानां**च्या अंगीं आलेली होती. कवि **मोरोपंत** ह्मणतात—

सुविद्य, धन मेळवी, वचन आयके आवरी ।
प्रपंच, भर घे शिरीं, करि कृपा पिता त्यावरी ॥

अशा प्रकारची योग्यता त्यांच्या अंगीं बाणली होती. आतां **शंकरशेट**जींच्या संसारसुखाच्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या होत्या. फक्त एकाच गोष्टीचा ते अलीकडे विचार करीत असत. आणि ती गोष्ट ह्मणजे सुनमुख पाहणें ही होय. अलीकडे त्यांनीं आपल्या सर्व आश्रित पुरोहितांच्या मागें एक महत्वाची कामगिरी लावून दिली होती. उत्तम कुलशीलाची सुस्वरूप अशी उपवर कन्या आढळल्यास त्यांनीं येऊन शेटजीस सांगावें. नंतर शेटजींनीं त्या मुलीविषयीं खासगी रीतीनें चौकशी करावी. अशा रीतीनें कांहीं मुलींचा शोध केल्यावर शेवटीं **नानां**च्या योग्यतेनुरूप एक मुलगी त्यांच्या पाहण्यांत आली. ह्या मुलीचें नांव **जमनाबाई** असें होतें. पुढें लवकरच सुमुहूर्तावर **शेटजीं**नीं आपल्या इतमामाला साजेल अशा थाटांत **नानां**चें लग्न केलें.

आतां सर्व गोष्टी **शेटजीं**च्या मनाप्रमाणें झाल्या. कारण **जमनाबाई** ही फारच समजुतदार, घोरणी आणि कार्यदक्ष होती. तिचा थोडे दिवस श्वशूरगृहीं वास होतांच, आपणांस काय काय गोष्टी केल्या पाहिजेत, याचें नीट घोरण बांधून तिनें अल्प वयांतच श्वशुर गृहाची गृहकृत्यविषयक सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतलीं आणि गृहलक्ष्मी ह्या नांवाचें सार्थक करून दाखविलें. अशा रीतीनें सूनबाईनें घरांतील सर्व जबाबदारी आपणाकडे ओढून घेतांच शेटजींच्या मनाला आराम वाटून ते परमार्थाकडे लागले. आणि तेही ठीकच आहे. '**आधीं प्रपंच करावा नेटका। मग घ्यावें परमार्थ विवेका।**' अव्याहत साठसत्तर वर्षें प्रपंचगाडा ओढल्यावर मन वैराग्यशील बनणें हें कांहीं अस्वाभाविक नाहीं. क्रमाक्रमानें त्यांनीं आपला व्यापाराचा पसाराही आटो-



शंकरशेट बाबुलशेट मुर्कुटे.



श्रीमंत जगन्नाथ शंकरशेट
यांचा तरुणपणचा चेहरा.

पान ६१

चित्रकारः-
रा. शां. के. सुरावकर.

बॉंबे आर्ट प्रिंटिंग वर्क्स

पता घेतला. आणि हळुहळू मोठमोठे सरकारी अंमलदार आणि नामांकित व्यापारीमंडळी यांच्याबरोबर **नानां**चा परिचय करवून व्यापारादि कृत्येंही त्यांच्या स्वाधीन केलीं.

अलीकडे **शंकरशेट** यांची प्रकृति वरचेवर नादुरुस्त होत असे. हें असें कां होतें याचें कारण त्यांच्या लक्षात येण्यास फारसा उशीर लागला नाहीं. आपला अंतकाळ जवळजवळ येत चालला हें ते समजून चुकले. दिवसेंदिवस त्यांची अशक्तता वाढून त्यांना दुसऱ्याच्या साहाय्याशिवाय आपल्या शय्येवरूनही उठतां येईनासें झालें. शेवटीं जेव्हां त्यांचा अंतसमय अगदीं नजीक येऊन ठेपला, तेव्हां त्यांनीं **नानांस** आपल्या बिछान्याजवळ बोलावून पितृवात्सल्यानें त्यांच्या पाठीवर हात फिरविला आणि त्यांस उपदेशपर दोन शब्द सांगितले. ते ह्मणाले, " पहा ! **नाना,** मी आतां थोडे दिवसांचा सोबती ! माझा आतां घडीचा भरंवसा नाहीं. मला केव्हां बोलाविणें येईल, याचा नेम नाहीं. माझी तयारीच आहे. परंतु माझें कर्तव्य ह्मणून मी तुला दोन शब्द सांगतों, तें नीट लक्षांत ठेव. तुला आतां कांहीं कमी नाहीं. संपत्ति विपुल आहे व तुला रीतीप्रमाणें विद्यादान दिलें आहे. त्याचप्रमाणें सांसर्गिक व व्यापारादि बाबतींत योग्य तें ज्ञान दिलें आहे. कांहीं कमी केलें नाहीं. ह्मणून माझ्या पश्चात् नीट शहाणपणानें वागून आपल्या घराण्याचें नांव राख आणि कोणत्याही तऱ्हेनें जगांत आपलें हांसें करून न घेतां लाल टिळयाचा काळा टिळा करूं नकोस.' अशा तऱ्हेचा मोठ्या प्रेमळ शब्दांनीं **नानांस** सदुपदेश केला. हा सदुपदेश प्रेमळ पित्याच्या मुखांतून निघणें योग्यच आहे. शेटजींनीं आपल्यामागें विपुल संपत्ति ठेविली होती, ही गोष्ट जरी खरी आहे, तरी त्यांनीं

नानांना जी विद्या शिकविली, तीच आमच्या मतें त्यांस सर्वांत मोठी अशी बिनमोल संपत्ति दिली असें आह्मीं समजतों. ह्या विद्यारूपी संपत्तीचें एका संस्कृत कवीनें खालीं दिल्याप्रमाणें वर्णन केलें आहे.

मातेव रक्षति, पितेव हिते नियुंक्ते,
कान्तेव चापि रमयत्यपनीय खेदम् ।
लक्ष्मीं तनोति, वितनोति च दिक्षु कीर्तिं,
किं किं न साधयति कल्पलतेव विद्या ?

'कल्पवल्लीप्रमाणें ही विद्या मनुष्यांस काय बरें देत नाहीं? सर्व कांहीं देते. आईप्रमाणें रक्षण करते, बापाप्रमाणें हित दाखविते, भार्येप्रमाणें खेद दूर करून मनास रंजविते, संपत्ति देते व दिगंतरी निर्मल कीर्ति पसरितें.' ह्या सुभाषितावरून विचार करतां आमच्या वरील मताचें समर्थन होऊन **शंकरशेट**जींनीं आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजाविलें असें सिद्ध होतें.

असो. **नानां**नीं व्यापारांत मन घालून फार दिवस झाले नाहींत तोंच त्यांच्या माथ्यावरील पितृछत्र जगाच्या रहाटीप्रमाणें निर्घृण काळानें आपल्या आरामस्थानीं सन १८२२ ह्या वर्षीं अक्षय्य नेऊन ठेविलें. त्यावेळीं **नानां**चें वय अवघें अठरा वर्षांचें होतें. वास्तविक पाहिलें असतां ती वेळ मोठ्या आणीबाणीची होती. जगाचा किंचितही अनुभव नसतांना संसाराची सर्व जबाबदारी, त्याचप्रमाणें अवाढव्य पसरलेल्या व्यापाराची जबाबदारी, इतक्या तरुणपणीं शिरावर पडली असतां बिलकुलही न डगमगतां **नानां**नीं अल्पकाळांतच आपली जबाबदारी पूर्णपणें ओळखिली, ही मोठी प्रशंसनीय गोष्ट आहे.

लहानपणासून **नानांना** गृहशिक्षा उत्तम मिळाली असल्यामुळें त्यांचें मन सुसंस्कृत झालें होतें, असें वर सांगितलेंच आहे. श्रीमंतांचीं मुलें आळशी आणि मूर्ख असतात, ह्या सर्वसाधारण नियमाला **नानांनीं** आपल्या आचरणांनीं खोटें ठरविलें. लक्षपूर्वक अभ्यासामुळें आणि वक्तशीरपणामुळें त्यांनीं आपल्या आंग्लगुरूंपासून कैकवेळां शाबासकी मिळविली- त्यांच्या सर्व वेळा अगदीं वेळापत्रकाप्रमाणें बांधलेल्या असत. अमुक वेळेला अमुक काम करावयाचें, असें एकदां ठरलें ह्मणजे त्यावेळेला तें काम व्हावयाचेंच! त्याचप्रमाणें त्यांचा निजण्याचा, उठण्याचा, अभ्यासाचा आणि व्यापारादि कृत्यांचा नियमितपणा इतका प्रशंसनीय होता कीं, तें पाहून इतर लोकांस मोठें आश्चर्य वाटे. ज्या ज्या थोर पुरुषांबरोबर **नानांचा** संबंध घडे, त्यांच्यापासून कांहींतरी शिकण्याचा ते नेहमी प्रयत्न करीत. आंग्लपंडितांच्या सहवासानें त्यांनीं इंग्लिश लोकांच्या चालीरीति उत्तमप्रकारें अवगत करून घेतल्या. अगदीं लहानपणापासून **नाना** धीट आणि चौकस होते. ह्या गुणांमुळें त्यांनीं आपल्या ज्ञानांत स्वतः बरीच भर घातली होती. लहानपणीं वडिलांच्याबरोबर एखाद्या युरोपिअन गृहस्थाच्या घरीं जाण्याचा प्रसंग आला ह्मणजे तेथें पाहिलेल्या सर्व गोष्टी **नाना** नीट लक्षांत ठेवीत आणि त्याचें मनन करीत. क्वचित् प्रसंगीं एखादी नवीन गोष्ट त्या युरोपिअन गृहस्थाच्या घरीं अवलोकनांत आली आणि त्या गोष्टीचा जर त्यांस चांगलासा बोध झाला नाहीं, तर ते धीटपणानें त्या गृहस्थाजवळ त्याची चौकशी करीत. आणि आपल्या शंकेचें निरसन करून घेत. अशा वेळीं त्या गृहस्थास **नानाचें** कौतुक वाटून तेही मोठ्या आनंदानें त्यांच्या शंकेचें समाधान करीत; इतकेंच नव्हे तर त्याबरोबर इतर बरीचशी माहिती सांगत असत. अशा रीतीनें **नाना** जें ज्ञान प्राप्त करून घेत होते, तें ज्ञान आपल्या सम-

वयस्क मित्रमंडळीसही प्राप्त व्हावें, अशी त्यांची फार इच्छा असे.

कांहीं लोक समजतात कीं, मन हें कोठीसारखें आहे. त्यांत ज्ञानाच्या मात्रा सांठवून ठेवाव्या. आणि ज्या वेळेस जी मात्रा लागेल ती काढून तिचा उपयोग करावा, ह्मणजे झालें. परंतु तें सगळें बरोबर नाहीं. ह्या संबंधानें हें लक्षांत ठेवावें कीं, मनुष्याच्या जीविताचा हेतु, मनुष्याची सुधारणा, मनुष्याची उन्नति हा होय. ह्मणून, ज्ञान संपादून त्याच्या योगानें आपल्यानें होईल तितकें माणसांचें चांगलें करावें—तें चांगलें करणें ह्मणजे ह्या जगांतील पाप आणि दुःख कमी करण्याचा प्रयत्न करणें होय.

ग्लाडस्टन.

वरील **ग्लाडस्टन**साहेबांच्या मताचा किंचित् सूक्ष्म विचार केला असतां ज्ञानाचा किती व्यापक अर्थ आहे, हें कोणाच्याही सहज लक्षांत येईल. आपणाप्रमाणें आपली मित्रमंडळी ज्ञानसंपन्न व्हावी अशी **नानां**ना इच्छा झाली, हीच गोष्ट ज्ञानसंपन्नतेनें **नानां**चें मन सुसंस्कृत झालें होतें याची साक्ष पटविण्यास पुरेशी आहे. असो.

पितृनिधनामुळें प्रपंच आणि व्यापारादि सर्व जबाबदारी अगदीं तरुणपणांतच **नानां**च्या शिरावर येऊन पडली. आणि ती जबाबदारी त्यांच्या वयाच्या मानानें पाहतां फारच मोठी होती. अशा प्रसंगीं **नानां**च्या मनाची फारच चमत्कारिक स्थिति झाली. एकाएकीं आपण उघडे पडलों ह्या विचारानें त्यांच्या मनाची तशी स्थिति होणें प्रथम स्वाभाविक आहे. कारण ह्मटलें आहे कीं,

'मन एव मनुष्याणां कारणं बन्ध मोक्षयोः'

मनाची सहजस्थिति फार चंचल व दांडगी आहे. त्याला बांधून ठेवणें हें वायुला बांधून ठेवण्यासारखें अत्यंत कठीण आहे. अशा ह्या

मनाला ताबा नसल्यामुळें स्वैरगतीनें वर्तन करण्यास सहज सुलभ होतें. परंतु **नानांनीं** पितृनिधनानंतर आपल्या मनाला अयोग्यरीतीनें बिलकूल भडकूं दिलें नाहीं. नाहींतर भर तारुण्यांत अलोट संपत्ति ताब्यांत येतांच द्रव्यमदानें बेहोष होऊन आपल्या पूर्वजांच्या कुलशीलाला कलंक लावणारे असे ' कुलघ्न ' पुत्र पाहूं गेल्यास पुष्कळ सांपडतील. **नानांची** स्थिति मात्र त्याच्या अगदीं उलट होती. त्यांचा वर्तनक्रम फार प्रशंसनीय होता. उत्तम गुरूंच्या सहवासानें आणि उत्तम गृहशिक्षेमुळें स्वतःचें शील खरोखर जोरदार, उमदें आणि सर्वांगसुंदर बनेल अशाच प्रकारच्या संवयी त्यांना बाळपणापासून स्वभावतः जडल्या होत्या. आपण मोठ्या व थोर कुळांतील असल्यामुळें आपल्या आचरणास किमपिही स्वैरवर्तन खपावयाचें नाहीं, हें ते पूर्णपणें जाणत होते. लहानपणापासून त्यांचे आचारविचार फार उदात्त असत, हें वर सांगितलेंच आहे. त्यांनीं आपल्या पूज्य पित्याच्या पश्चात् त्यांच्या मोठमोठ्या मित्रमंडळी-बरोबर पूर्ववत् दळणवळण ठेविलें होतें. त्यांत **शंकरशेटच्या** घराण्याचें आणि **सर जमशेटजी जिजीभाई बाटलीवाले** ब्यॅरोनेट या उभयतांचें फारच सख्य होतें. त्याचप्रमाणें **आलिबागचे आंग्रे** यांचे दिवाण **बाबाजी बिवलकर** यांच्या बरोबरही त्यांचा चांगला मित्रभाव होता. ह्या सर्व मंडळींचा **नाना**विषयीं, त्यांच्या सद्वर्तनानें लवकरच उच्च ग्रह झाला, ती हकीगत क्रमाक्रमानें पुढें येईल.

आपल्या शास्त्रानुसार पितृनिधनानंतर एक वर्षपर्यंत **नाना** व्रतस्थ राहून नेमधर्मानें वागले. त्या अवधींत त्यांनीं आपल्या पितृभक्तीला उचित आणि घराण्याच्या इभ्रतीस शोभेल असा दान-धर्म केला. श्रीशंकराची आराधना करणें हा आपला कुलसंप्रदाय

त्यांनीं अव्याहत चालविला. सकाळ संध्याकाळ ते स्वजातीनें शिवपूजा करीत असत. विद्वान् याचकांची त्यांच्या योग्यतेप्रमाणें ते योग्य संभावना करीत. या विषयीं विशेष हकीकत पुढील एका भागांत सविस्तर रीतीनें येणार आहे.

संसाराचीं आणि व्यापाराचीं सर्व सूत्रें हातीं येतांच आमच्या चरित्रनायकानें आपल्या मुत्सद्दी बाण्याप्रमाणें सर्व आश्रित मंडळीला त्याचप्रमाणें आपल्या घराण्यांचा अभिमान बाळगणाऱ्या आपल्या प्रिय पित्याच्या स्नेही मंडळीस थक्क करून सोडलें. त्या विषयीं दोन शब्द येथें लिहून हा भाग संपवूं.

आपली मालमत्ता किती व कोठें आहे, याविषयीं निश्चयात्मक माहिती वडिलांच्या नंतर **नानांस** बिलकूल नव्हती, त्यामुळें ते फार दिलगीर होते. एवढा मोठा पसारा सुयंत्रित चालविण्यास त्या माहितीची त्यांना अत्यावश्यकता होती. आणि ती सर्व माहिती पदरच्या लहान मोठ्या कारकूनांस होती. आपण मालक असून आपल्या मालमत्तेची माहिती आपणास आपल्या आश्रित वर्गास विचारावी लागणार यासारखें लघुत्व नाहीं, असें त्यांच्या अभिमानी मनाला वाटे. कारण आपल्या गृहस्थितीचें आपलें अज्ञान आपल्या आश्रित मंडळीस कळल्यास त्यांच्या ओंजळीनें आपणास पाणी प्यावें लागेल, व त्यांच्यावर आपला दाबही राहणार नाहीं. अशावेळीं **नानांनीं** जी युक्ति योजिली, ती फारच चातुर्याची होती, कीं, ज्यामुळें आश्रित वर्गावर पूर्णपणें दाब राहून ते कोणासही अप्रिय न बोलतां आपल्या अवाढव्य मालमत्तेची इत्थंभूत माहिती त्यांस सहज झाली आणि **समर्थ**वचनाप्रमाणें—

संकेतें लोक वेधावा । एके अनेक बोधावा ।
प्रपंचहि सांवरावा । यथानुशक्त्या ॥ १ ॥

त्यांनीं आपल्या प्रपंचाचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतलीं.

एके दिवशीं दोन प्रहरीं आपल्या घराण्याविषयीं सहानुभूति बाळगणाऱ्या वडिलांच्या वेळच्या दोन मित्रांस—**सर जमशेटजी जिजीभाई** आणि **बाबासाहेब बिवलकर** यांस **नानांनीं** आपल्या घरीं बोलाविलें. प्रथम **नानांनीं** आपला उद्देश त्यांना बिलकूल कळूं दिला नाहीं. ते आल्यानंतर कांहीं वेळ त्यांच्या बरोबर औपचारिक भाषण करून **नानांनीं** आपल्या मुख्य कारकुनास—मेथाजीस—सर्व दप्तर घेऊन वर बोलाविलें. यजमानानें दप्तर मागविलेलें पाहून सर्व कारकून मंडळींत एकच गडबड उडाली. एकाएकीं आपल्या नव्या व तरुण मालकानें **ब्यॅरोनेट** आणि **बाबासाहेब** यांच्या सारख्या मोठ्या मंडळीसमक्ष दप्तर मागविण्याचा काय हेतु असावा, हें माहित नसल्यामुळें त्यांना भीति व संकोच वाटणें साहजिक होतें. आपल्या श्रेष्ठ मंडळीबरोबर बोलत असतां हळुहळू मेथाजीच्या सर्व दप्तराची तपासणी करून आपल्या इस्टेटीपैकीं प्रत्येक ठिकाणचें नांव, तें कोठें आहे, त्याचें मासिक उत्पन्न किती आहे वगैरे सर्व गोष्टींचें टिपण करून घेऊन एकंदर वार्षिक उत्पन्नाचा सविस्तर तपशील **नानांनीं** लिहून घेतला. याप्रमाणें आपला आदा व खर्च समजून घेतल्यावर निरनिराळे कारकून काय काय कामें करितात, ती माहिती करून घेतली. इतकें झाल्यावर स्वतः सर्वांच्या कामाची मोजदाद करून तिजोरींतील शिल्लक आंकडा पाहिला. नंतर प्रतिदिवशीं जीं जीं कामें करावयाचीं त्याची व्यवस्था पूर्व दिवशीं मेथाजीनें आपल्या संमत्तीनें करावी, असें ठरविलें. हा सर्व विधि **नानांचीं** सदरहू मंडळी पहात होती. परंतु हा काय प्रकार आहे, हें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं. मेथाजी निघून गेल्यावर **बाबासाहेब**

बिवलकरांनीं नानांस विचारलें. तेव्हां **नानांनीं** सर्व गोष्टीचा उल्लेख करून सांगितलें कीं, 'आपणा समक्ष मेथाजीस बोलविण्याचें कारण आपण उभयतांस वडिलाच्या एकंदर व्यवहाराची माहिती असल्यामुळें आपणांसमक्ष विचारलें असतां त्या सर्व गोष्टींची खरी माहिती देणें मेथाजीस भाग पडून त्याच्यावर माझेंही वजन चांगलें राहिलें.' ही **नानांच्या** चातुर्याची गोष्ट ऐकून हा पुढें मोठा मुत्सद्दीबाण्याचा पुरुष होईल, अशी त्यांनीं मनांत गांठ घातली. त्याचप्रमाणें मेथाजी व इतर कारकून मंडळीस आपले छोटे यजमान इतक्या लवकर आपणांवर युक्त अंमल चालवितील, किंवा इतर लक्ष्मीपुत्राप्रमाणें ऐषआरामांत आपला कालक्षेप न करतां आपल्या कामाची दक्षता दाखवितील, असें बिलकूल वाटलें नव्हतें. परंतु साधुश्रेष्ठ **रामदासांनीं** ह्मटल्याप्रमाणें—

> **आपलें हित न करी लौकिकीं । तो जाणावा आत्मघातकी ।**
> **या मूर्खा एवढा पातकी । आणिक नाहीं ॥**

हें तत्व आपल्या तरुण यजमानाच्या मनांत पूर्णपणें बिंबलें आहे, हें त्या बिचाऱ्यांस काय माहित !

त्या दिवशीं घडलेल्या गोष्टी, हा आश्रित मंडळीचा चर्चेचा विषय बनला. नव्या तरुण यजमानाची कारकीर्द सुरू झाली असतां सर्वच मनु पालटतो आणि कांहीं काळपर्यंत आश्रित मंडळींची चंगळ उडते. अशा प्रसंगीं वाहत्या गंगेत हात न बुडवितां आपल्या तरुण मालकाचें हित पाहणारा आश्रितवर्ग फार विरळा ! होतां होईल तों अशा पालटलेल्या मनूंत तरुण मालकाच्या अज्ञानाचा फायदा घेऊन आश्रित मंडळी आपली तुंबडी भरून घेण्यास बहुतेक संधी साधत असते, असा सर्वसाधारण अनुभव आहे.

आणि कैकप्रसंगीं असाही उलट अनुभव येतो कीं, आपला स्वार्थ साधण्याकरितां आश्रितवर्ग आपल्या तरुण व अननुभवी यजमानास निरनिराळ्या व्यसनाची चटक लावितात. आणि एकदां का अलोट संपत्तीचा तरुण पालक व्यसनाधीन झाला ह्मणजे आश्रितवर्ग वाटेल तसा अत्याचार करून आपली तुंबडी भरतातच, आणि शेवटीं एकाकाळीं नांवारूपाला आलेल्या त्या थोर घराण्याचा नामशेष करण्यास कारण होतात.

शंकरशेट स्वर्गवासी झाल्यावर कांहीं काळपर्यंत सर्व व्यवहार कारकून आदिकरून आश्रित मंडळीच्या तंत्रानें चालला होता. आपले नवे यजमान अद्यापि लहान आहेत, तेव्हां हा प्रकार असाच कांहीं काळ चालेल, असें सर्वांस वाटत होतें. परंतु **नानांनीं** आपल्या हातांतील सर्व सत्ता काढून घेण्यास योजलेली युक्ति पाहून ती मंडळी विस्मयचकित झाली, यांत आश्चर्य तें कोणतें !

त्या दिवशीं सर्व आश्रित मंडळींनीं आपल्या तरुण यजमानाची भावी कारकीर्द कशा प्रकारची होईल याचा पुष्कळ खल केला. परंतु व्यर्थ ! आपल्या अवाढव्य कारभाराची सर्व गुरुकिल्ली हातीं येईपर्यंत **नानांनीं** आपलें धोरण असें ठेविलें होतें कीं, तें इतरांस कळणें दुर्बोध !



भाग नववा.

विद्याभिवृद्धीचे प्रयत्न.

अन्नं दानात्परं दानं विद्यादानमतः ततः परं ॥
अन्नेन क्षणिका तृप्तिर्यावजिवं चँ विद्यया ॥

सुभाषित.

नाहीं परोपकारापरि दुसरें थोर पुण्य हें वचन ॥
सत्य असें तरि विद्यादानाशीं तुल्य आणि पुण्य आणिक न ॥

थोरले चिपळुणकर.

" Mr. Mountstuart Elphinstone had the advantage of his (Hon. Jagannath Sankersett) advice in framing his Educational Scheme. "

Sir Bartle Frere.

गंगाजलाप्रमाणें मनुष्यमात्राचे आचार विचार निर्मल होण्यास त्यास विद्येसारखें दुसरें उत्कृष्ट साधन क्वचितच सांपडेल. त्या साधनाच्या योगानें तो प्राणी आपली पाहिजे तशी उन्नति करून घेईल. प्रसिद्ध साधुवर्य कबीर यांची एक ह्मण आहे कीं, ' **नर करनी करे तो नरका नारायण होय,** ' परंतु ह्या ह्मणीप्रमाणें मनुष्यमात्राच्या हातून करणी मात्र योग्य तऱ्हेनें झाली पाहिजे. आतां ती करणी सर्वोत्तम

रीतीनें पूर्ण दशेस येण्यास मुख्य साधन विद्या हेंच आहे. ह्या साधनाच्या योगानें ज्यांनीं आपला कालक्षेप योग्य रीतीनें घालवून आपली उर्जितावस्था करून घेतली, इतकेंच नव्हें तर, त्या साधनाचा ह्मणजे विद्येचा व्यासंग अखंड केला, तींच माणसें ह्या जगत्कोंडणावर हिऱ्याप्रमाणें चकाकत असतात. मग तीं कोणत्याही धर्माचीं अगर कोणत्याही देशांतील असोत, तीं सर्व ठिकाणीं वंदनपात्र, प्रशंसनीय आणि पूजार्ह होतात, यांत किमपीही शंका नाहीं. बालपणापासून सतत विद्याव्यासंगांत निमग्न राहून, ज्ञान संपन्न झाल्यावर त्या ज्ञानाचा सृष्टिजन्य वस्तूंशीं सहचर्यानें प्रत्यक्ष अनुभव घेऊन, त्याचा इतर जनांस लाभ करून देण्यांत आपल्या आयुष्याचा सद्व्यय करून ज्यांनीं कालक्षेप केला व अज्ञात गोष्टी ज्ञात करून जगाच्या निदर्शनास आणिल्या, अशा नररत्नांनीं या भूतलावर स्वैर विहार करून आपल्या सत्कीर्तिपरिमलानें हें दिग्मंडळ भरून टाकिलें, यांत आश्चर्य तें कोणतें ?

विद्यादानासारखें दूसरें पुण्य नाहीं, आणि ह्या पुण्याची आमच्या चरित्रनायकानें सार्थकता केली. लहानपणापासून **नानां**च्या अंतःकरणांत विद्येचें सर्वोत्कृष्ट बीज पेरलें गेल्यानें त्याचा सुसंस्कार त्यांच्या मनावर घडल्यामुळें आपल्या देशबांधवांची विद्येच्या अभावीं होत असलेली दैना त्यांना स्पष्ट दिसूं लागली. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं ह्या बाबतींत आपल्या देशाची किती किती निकृष्टावस्था होती, हें येथें नव्यानें सांगावयास पाहिजे, असें नाहीं. देशाची स्थिति सर्व बाजूंनीं अगदीं गुंतागुंतीची झाली होती. तींतून त्याची सुटका करण्यांस विद्येशिवाय दुसरें साधन नाहीं, अशी स्वानुभवावरून **नानां**ची खात्री झाली होती. त्यांच्या मनांत

हा अत्यंत पवित्र व महत्वाचा प्रश्न फार दिवस सारखा घोळत होता. शेवटीं त्यांच्या मनाप्रमाणें होण्याचीं चिन्हें दिसूं लागली. त्याचा इतिहास असा—

सन १८१८ **ब्रह्मबादशाहीचा**–**पेशवाईचा**–लोप झाला, त्यापूर्वी ह्मणजे **सवाई माधवरावांच्या** निधनानंतर पेशवाईच्या हक्कासाठीं आपांपसांत भांडणें उपस्थित होऊन राज्यांत जी कांहीं वेळ केवळ यादवी माजून राहिली, आणि ज्यामुळें राज्यकार्यधुरंधर प्रसिद्ध **नानाफडणवीस** यांस कैदेची संभावना झाली, व इतरही कांहीं मोठमोठ्या माणसांना ती भोंवली, त्या वेळेपासून साऱ्या महाराष्ट्रभर फार पुंडावा माजून राहिला होता. पुढें **रघुनाथराव** ऊर्फ **'राघोबा भरारी'** यांचे चिरंजीव **दुसरे बाजीराव साहेब** हे पेशवाईच्या पदावर आरूढ झाले. मग तर काय 'दुष्काळांत अधिकमास'! जिकडे तिकडे पुंडाईचेंच साम्राज्य होऊन गेलें! कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत राहिनासा झाला. **नानाफडणीसांचा** सद्दीचा जोर अस्तंगत पावल्यामुळें ते आधींच नामशेष होऊन गेले होते. याप्रमाणें मुलुखांत चोहोंकडे धुमाकूळ चालली होती. आणि ती पेशवाईची इतिश्री होईपर्यंत तशीच चालू राहिली होती. ह्याबद्दलचा सर्व इतिहास हृदयंगम असून वाचनीय आहे. तो इकडे देतां येणें शक्य नाहीं. तथापि वर ह्मटलेल्या कालावधींत देशस्थितीचें चित्र रेखाडण्याचा आमचा प्रयत्न आहे; तेणेंकरून आपल्या मुलुखाची त्यावेळची परिस्थिति कशी काय होती हें नीट समजेल.

दुसरे बाजीराव पेशवे यांच्या राजवटींत विद्यावृद्धीच्या बाबतींत लोकांस उत्तेजन मिळण्याऐवजीं राज्यांत अवघ्या दुर्गुणांचें

विशेष प्राबल्य मातलें. त्यामुळें कित्येक शास्त्री-पंडितांचीं पुरातन घराणीं उत्तेजन व राजाश्रय यांच्या अभावीं 'आहेत नाहींत,' अशीं होऊन गेलीं. कित्येकांचा तर समूळ लोप झाला. कारण राजाश्रयच नाहीं, तर देशांत विद्वान् तरी कसे निपजावे ! अगदींच अशक्य ! याप्रमाणें राष्ट्राचें या बाबतींत भयंकर नुकसान झालें. मशारनिल्हे **पेशवे** यांस इतर छंदांनीं पछाडलें, तेव्हां त्यांचें देशसुधारणेकडे किंवा विद्योत्तेजनाकडे लक्ष कसें लागावें ! अर्थात् नाहींच लागणार ! ! मग काय ' यथा राजा तथा प्रजा ' अशी स्थिति होऊन गेली. त्यामुळें आपल्या लोकांचें बरेंच नुकसान झालें. व त्याचा परिणाम त्यास पुष्कळ काळपर्यंत भोंवला. विद्येच्या अभावीं लोकांची बुद्धि प्रगल्भ होत नाहीं. उलट त्यांस अनेक दुर्गुण जडतात व त्यांची विचारशक्ति नष्ट होते, आणि सन्मार्गाचें अवलंबन करण्याकडे त्यांची प्रवृत्ति होत नाहीं. सद्गुणांपेक्षां दुर्गुणांचेंच प्राबल्य अधिक होतें, आणि त्याप्रमाणें झालेंही ! अशाप्रकारें राष्ट्राचें नुकसान होत गेलें.

पुढें **बाजीरावा**नें हलकट लोकांचे नादीं लागून राज्यकारणांत **इंग्रज** बहादरांशीं निरर्थक आणि मूर्खपणानें वैर संपादन करून स्वतःला अजिंक्य शत्रु निर्माण करून घेतला, आणि त्याचा परिणाम अखेरीस त्यास **पेशवाई**पदास मुकावें लागलें. एतावता सन १८१८ त **पेशवाई**चा पूर्ण लोप झाला.

पेशवाई बुडाल्यावर दयाळू **इंग्रज** बहादरांचें राज्य अबाधित सुरू होऊन जिकडे तिकडे स्थिरस्थावरता झाली. आणि **इंग्रजां**ची कारकीर्द लोकांस सुखावह वाटूं लागली. त्या वेळेस **मुंबई** इलाख्याचे लोकप्रिय गव्हर्नर प्रसिद्ध राज्यकारणपटु व हुशार मुत्सद्दी **ऑनरेबल**

माउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन यांची कारकीर्द होती. हा पुरुष मोठा धूर्त, दूरदृष्टि आणि मोठ्या मनाचा असून वेळ पाहून तदनुसार वर्तन करणारा होता. **पेशवाई** बुडाल्यानंतर जिकडे तिकडे हळुहळू स्वस्थता झाली, व **इंग्रज** सरकारास देशाच्या उन्नतीस हात लावण्यास फावलें; त्यांत रयतेच्या सुखवृद्ध्यर्थ ज्या अनेक गोष्टी **इंग्रज** सरकारानें केल्या त्यांतच मुख्यत्वेंकरून विद्यावृद्ध्यर्थ प्रयत्न केले.



माउंट स्टयुअर्ट एल्फिन्स्टन.

मुंबईइलाख्यांत मुंबई शहर हें सर्वतोपरी प्रमुख ठिकाण असल्यामुळें प्रथमतः याच ठिकाणीं विद्यादानाची मुहूर्तमेढ बसविली. तो वृत्तांत्त असा—

ऑ. माउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टनसाहेब सन १८१८ च्या धांमधुमींतून मोकळे झाल्यावर त्यांनीं आपलें लक्ष लोकसुधारणेकडे वळविलें. त्यावेळीं रयत ही लढाया, पुंडावे वगैरे वावटळींत सांपडल्यांमुळें अगदीं त्रस्त झाली होती. तीस आतां चांगले दिवस येण्याची चिन्हें दिसूं लागलीं. कारण **ना. एल्फिन्स्टन**साहेब यांनीं लोकसुधारणा कशी होईल आणि रयतेला सुख कोणत्या प्रकारें मिळेल याचा विचार चालविला. ह्या लोकप्रिय गव्हर्नराची सर्व कारकीर्द आपण लक्षपूर्वक अवलोकन केल्यास आपणास असेंच दिसून येईल

कीं, आपल्या कारकीर्दींत रयतेला सुख व्हावें आणि रयतेचें कल्याण व्हावें ह्मणून त्यांनीं अविश्रांत श्रम केले, आणि लोकसुधारणेचें मोठें कार्य केलें. परंतु ह्या कामांत त्यांना **नानाचें** पूर्ण सहाय्य होतें. रयतेस विद्यामृत पाजल्याशिवाय त्यांची सुधारणा होणें कठीण ! त्यांस बरेंवाईट कळूं लागणार नाहीं, ह्मणून प्रथम त्यांस विद्यादान द्यावें, या साठीं त्याकाळीं सर्व जनतेचे पुढारी असलेले आमचे लोकनायक **नाना** यास पहिल्यानें सरकारानें हाताशीं धरलें. ह्यांच्या पूर्वी **ऑ. एलिफन्स्टन** साहेबांनीं ह्याच बाबतींत **नानां**चा सल्ला विचारला होता कीं, "कोणत्या गोष्टी केल्यापासून रयतेस सुख होईल ?" असा **ऑ. एलिफन्स्टन** साहेबांनीं त्यांस सल्ला विचारला असतां **नानां**नीं जें मत दिलें तें खरोखरीच मननीय आहे. **नाना** हे पहिल्या पासूनच आपल्या लोकांचें सदैव कल्याण चिंतणारे असल्यामुळें त्यांनीं **ऑ. एलिफन्स्टन** साहेबांस असें स्पष्ट सांगितलें कीं, "रयतेस विद्यादान दिल्याशिवाय तिची ऐहिक व आत्मिक सुधारणा होणें नाहीं." तेव्हां **नानां**सच हाताशीं धरून सरकारानें विद्यादानाचें बीज सुमुहूर्तावर पेरिलें. सुमुहूर्तावर ह्मणण्याचें कारण हें कीं, ज्या वेळीं ही गोष्ट प्रचारांत आणली, तो सुयोग होता. एक तर विद्यादान देण्याचा सरकाराचा उच्चतम हेतु ! त्यांत **नाना** सारख्या योग्य पुरुषाची सल्ला व सहाय्य मिळालें, मग हा अमृतयोग कां होणार नाहीं !!

मुंबई हें इलाख्याचें प्रमुख शहर असल्यामुळें येथें प्रचारांत येणाऱ्या गोष्टींचें अनुकरण तात्काल ठिकठिकाणीं होईल, अशी **नानां**ची खात्री होती. ह्मणून विद्यादान करण्याचा **इंग्रज** सरकाराचा उद्देश दिसूं लागतांच **नानां**नीं त्यांस तन, मन आणि धनासह सहाय्य करण्याचा निश्चय केला. ह्याचें तात्पर्य काढावयाचें ह्मणजे,

त्याकाळीं पेरलेल्या विद्येच्या बीजाचा सांप्रत मोठा प्रचंड वृक्ष होऊन तो आज उत्कृष्ट व दळदार अशा फलभारानें अगदीं लवून गेलेला आहे, हें आपण प्रत्यक्ष पहातच आहोंत. ह्मणून तो वृक्ष वृद्धि पावून आज ह्या स्थितीस येण्यास पुष्कळ अंशांनीं **नानांचे** परिश्रम कारणीभूत झाले आहेत, हें आपण विसरतां कामा नये. विद्वन्मुमुकुटमणि **दादाभाई नौरोजी** ह्मणतात—We natives owe much debt to Mr. Jagannath Sankersett who was among the first, that first sowed the seeds of Education and watched and nursed it to its present healthy growth. 'आपण एतद्देशीय लोक **जगन्नाथ शंकरशेट** यांचे अत्यंत ऋणी आहोंत. कारण ज्ञानाचें बीं पेरणांत ते अग्रेसर होते, इतकेंच नव्हे तर सध्यां त्याची जी जोमाची वाढ झाली आहे त्याचें सर्व श्रेय त्यांनाच आहे.'

असो. आतां विद्यावृद्धीविषयक कोणकोणत्या गोष्टी हळुहळू प्रचारांत आल्या आणि त्या सर्वांशीं आमच्या चरित्रनायकाचा काय संबंध जुळतो त्याचा आपण क्रमाक्रमानें विचार करूं. प्रथम—

(१) बॉंबे नेटिव्ह स्कूल बुक अँड स्कूल सोसायटी.

'The Bombay Native School Book and School Society which sowed the first seeds of Education in this Town, was founded in 1822. In the foundation of this Society, Mr. Jagannth Sankarsett is one of the foremost.'

Dadabhoy Naoroji.

एतद्देशियांच्या कल्याणाकरितां त्यांस विद्यादान देण्याचें ठरल्यावर मे. **माउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन** साहेबांनीं मिशनऱ्यांच्या साह्यानें एतद्देशियांत विद्याप्रसार करण्याचा प्रयत्न सुरू केला. परंतु त्यापासून व्हावा तसा उपयोग होईना. एकतर आमच्या लोकांचें अज्ञान, शिकण्याविषयीं आवड कमी आणि त्यांतून मिशनरी लोक शिकविणार ! तेव्हां असा त्रिवेणीसंगम जुळल्यावर आपलीं मुलें मिशनऱ्यांच्या हातीं देण्यास कोणी कबूल झाला नाहीं; ह्मणून त्यांस दूषण देणें कधींही न्याय्य होणार नाहीं. अशी जरी खरी वस्तुस्थिति होती, तरी मिशनरी लोकांनीं आपला उपक्रम अव्याहत रीतीनें चालू ठेविला होता. एखाद्या कामाची चिकाटी आणि सतत परिश्रम हे वाखाणण्यासारखे गुण त्यांच्या अंगीं असल्यामुळें आमच्या तत्कालीन लोकांना विद्येची अभिरुचि लागावी ह्मणून त्यांनीं नानाप्रकारच्या गोष्टींचें लोकांना आमिष दाखविलें तथापि त्याचा फारच थोडा उपयोग झाला.

अशारीतीनें सरकारानें विद्यादानाचे शक्य ते प्रयत्न चालविले असतां आपल्या लोकांना त्याचा फायदा करून घेतां येईना, असें पाहून **नानां**नीं कांहीं प्रमुख मंडळीच्या सहाय्यानें एक शिक्षणसंस्था स्थापण्याचा विचार केला. आणि स्वतः बरीचशी रक्कम त्याप्रित्यर्थ बाजूला काढली. पुढें लवकरच सर्व गोष्टींचा जम बसल्यावर **नानां**नीं आणि इतर प्रमुख मंडळीनें मिळून सन १८२२ च्या आगष्ट महिन्याच्या २१ व्या तारखेस **बॉंबे नेटिव्ह स्कूल बुक अँड स्कूल सोसायटी** नामक संस्थेची स्थापना केली. एतद्देशीय लोकांमध्यें शिक्षणप्रसार करणारी हीच पहिली संस्था होय. त्यावेळीं **सदाशिव काशीनाथ छत्रे**[1] यांनीं **नानां**ना बरीच मदत केली.

ही सोसायटी स्थापन झाल्यावर प्रारंभीं लोकांस एतद्देशीय भाषांत शिक्षण देण्याचा क्रम सुरू केला. तेव्हां ज्या मराठी शाळा स्थापन झाल्या, त्यावर **सदाशिवपंत छत्रे** आणि **जगन्नाथ शास्त्री क्रमवंत** ह्या विद्वद्वयीस मुख्य तपासनीस नेमिलें. अशा रीतीनें उत्साही आणि परोपकारी मंडळीनें विद्यादानछत्र सुरू केलें. परंतु छात्रवर्गाचा व्हावा तसा जमाव होईना. कारण त्यावेळीं लोकांमध्यें बराच गैरसमज उत्पन्न झाला होता. कारण प्रथम मे. **माउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन** साहेबांनीं मिशनऱ्यांच्या सहाय्यानें विद्याप्रसाराचा उपक्रम

१ **सदाशिव काशीनाथ छत्रे** ह्या विद्वान् गृहस्थानें इंग्रजी भाषेंतून '**बाळमित्र**' '**इसापनीति**' वगैरे शालेपयोगी पुस्तकें तयार केलीं. खुद्द **जर्विस**साहेब यांनीं वरील विद्यालयाकरितां **गणित, भूगोल' भूमिति**–इत्यादि ग्रंथ प्रथम तयार केले. आणि **रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र** यांवर उत्तम विद्वानांकडून ग्रंथ तयार करवून घेतले. **हरि केशवजी** नांवाचे इंग्रजी ग्रंथांचें मराठी भाषांतर करणारे त्यावेळीं विद्वान् गृहस्थ होते. त्यांनीं देखील त्या वेळीं शालोपयोगी कांहीं ग्रंथ केले. ह्यांचें चरित्र हल्लीं नुकतेंच त्यांच्या चिरंजिवानें छापून प्रसिद्ध केलें आहे.

केला असल्यामुळें मिशनरी लोक विद्याप्रसाराच्या सबबीवर मुलांना फितवून बाटवितात असा लोकांचा गैरसमज झाला होता. त्यामुळें ही गोष्ट वरील सोसायटीच्या संस्थापकांस थोडीशी बाधक झाली. परंतु ह्या क्षुल्लक गोष्टीमुळें संस्थेच्या संस्थापक मंडळीनें आपली उमेद खचूं दिली नाहीं. त्या उत्साही मंडळीनें ह्या गोष्टीला एक तोड काढिली. **सदाशिवपंत छत्रे** यांनीं व इतर मंडळीनें आपले आप्त, इष्टमित्र यांस शिकण्याकरितां मुद्दाम **मुंबईत** आणलें. त्यांपैकीं कांहीं जणांची सोय **नानांनीं** आपल्या घरीं केली. अशा रीतीनें छात्रवृत्ति सांभाळून जे विद्यार्थी **नानांच्या** घरीं राहिले होते, त्यांत प्रसिद्ध **बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर**[१] हेही एक होते. ह्या विद्वान् पुरुषानें पुढें कसा लौकिक कमाविला, तो बहुश्रुत आहेच.

असो. पुढें कांहीं काळपर्यंत ही संस्था सुरळीतपणें चालली होती.

आज काल **मुंबई** शहरांत विद्येचा जो इतका प्रसार झालेला आढळतो, व ज्यामुळें आज भूषणभूत झालेले अनेक बुद्धिमान् पुरुष निर्माण झाले आहेत व पुढें होतील, त्या विद्येचें बीज वरील मंडळीनें पेरलें होतें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

---

१ शास्त्रीबुवांच्या स्मरणशक्तीबद्दल अशी एक आख्यायिका सांगतात कीं, एके दिवशीं ते एका मोठ्या रस्त्यावर उभे असतां, दोघां सोजिरांची मोठी मारामारी झाली. त्यावेळीं शास्त्रीबुवांस न्यायाधिशापुढें साक्षीदार ह्मणून उभे करण्यांत आलें. तेव्हां त्यांस इंग्रजीचा गंधही नसतां, हा त्याला कोणता शब्द बोलला आणि तो उलट काय बोलला, तीं सर्व वाक्यें त्यांनीं न्यायाधिशाला अगदीं बरोबर उच्चार करून दाखविलीं. त्यावरून तो खटला न्यायाधिशाच्या पूर्ण लक्षांत येऊन त्यांनीं खटल्याचा योग्य न्याय केला; आणि त्या चौदा वर्षांच्या मुलाच्या—शास्त्रीबुवांच्या—तीव्र बुद्धीचा विलक्षण चमत्कार वाटून त्यानें त्याच्या इंग्लिश शिक्षणाची सोय आपल्या खर्चानें केली.

बालबोध.

(२) बाँबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी.

तुह्मीं टोलेजंग वाडे उभारिले ह्मणजे देशाचें हित केलें, असें समजूं नका. तुमच्या हातून देशबांधवांचीं मनें उत्कर्ष पावलीं, तरच देशाची तुह्मीं मोठी सेवा केली.

इपिक्टिटस.

He (Mr. Jagannath Sankarsett) was one of the first members of the Committee of the Bombay Native Education Society, which was next called into being, and which, to the last, he continued the zealous and prudent councellor and supporter.

Rev: Dr. Wilson.

पुढें इ. स. १८२४ त **बाँबे नेटिव्ह स्कूल बुक अँड स्कूल सोसायटी** ही संस्था **बाँबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी** या नांवाखालीं मोडूं लागली. उत्तरोत्तर ह्या संस्थेची भरभराट होऊन जनतेला संस्थेचा फार फायदा होऊं लागला. आणि ह्या सर्व भरभराटीला संस्थापक मंडळीचा उत्साह कारण होय. आपल्या मंडळींत विद्येची आवड उत्पन्न व्हावी ह्मणून त्यांनीं दोन वर्षेंपर्यंत जो दीर्घोद्योग केला, तो खरोखरीच प्रशंसनीय होता. ह्या संस्थेंत **नाना** प्रमुख असल्यामुळें त्यांनीं संस्थेला स्थायिकत्व येण्यास बरेंच द्रव्यसहाय्य केलें. हळुहळू आमच्या बड्याबड्या धनिक लोकांचें लक्ष येथें वेधूं लागलें. पुढें सोसायटीच्या वार्षिकोत्सवाच्या दिवशीं,

सोसायटीच्या रिपोर्टावरून संस्थेनें जनहितार्थ अति उच्चतम अशी शिक्षणप्रसाराची केलेली कामगिरी पाहून प्रत्येकाच्या मनांत संस्थेविषयीं आस्था आणि प्रेम उत्पन्न झालें आणि त्यांनीं यथाशक्ति वर्गणी देऊन संस्थेला मदत केली.*

ह्या शाळेचा योग्य जम बसून संस्थेची भरभराट होऊं लागतांच मुंबईइलख्यांत शहरोंशहरीं आणि गांवोंगांवीं शाळा स्थापन होऊं लागल्या. इतक्या अवधींत विद्यावृद्ध्यर्थ शालागृहें बांधण्यास किंवा त्या संबंधीं हरएक बाबतींत **नानांनीं** द्रव्यद्वारां हजारों रुपयांची मदत केली.

सांप्रत देशहिताकरितां कोठल्याही बाबतींत वर्गणी गोळा करण्याचा प्रसंग आल्यास कित्येक लक्ष्मीपुत्रांचे वर्गणीचे मोठमोठे आंकडे दिसतात, त्या मानानें पहातां **नानांनीं** लोकहितार्थ केलेल्या पैशाचा व्यय थोडा दिसेल; परंतु वस्तुस्थिति तशी नव्हती. त्यावेळची एक रुपयाची वर्गणी सांप्रत शेंकडों रुपयांच्या वर्गणी बरोबर होती. त्यावेळीं कोठल्याही कार्याकरितां वर्गणी गोळा करण्याचा प्रसंग आला असतां **नानांनीं** अत्यंत संतोषानें, ते जेवढा आंकडा घालतील असा लोकांचा अंदाज असे, त्याहींपेक्षां प्रत्येकवेळीं मोठाले वर्गणीचे आंकडे घालावे. वर्गणी भरण्यांत त्यांना एक प्रकारचा आनंद होत असे. कारण सर्व एतद्देशीय लोकांमध्यें विद्येचा प्रसार व्हावा, ह्या एका गोष्टीकडे त्यांचें फार लक्ष असे.

---

* The occasion brought together a large collection of Natives, and thousands of rupees were subscribed towards the promotion of this purpose. The natives appeared warmly interested in behalf of this cause; and their donation were, to avail ourselves of the expression of a native friend. 'as large as their wishes'—*The Monthly Miscellany Western India*.

ह्या ठिकाणीं एक विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी घडली कीं, त्यावेळीं **विलायतेंत** नवीन गव्हर्नरजनरल नेमण्याविषयीं पुष्कळ वादविवाद आणि खटपटी झाल्या. शेवटीं ती जागा **लॉर्ड आक्लंद** यांस मिळाली. त्यांस **हिंदुस्थानांत** येण्यास बरेच दिवस लागले. तितक्या मुदतीमध्यें त्यावेळीं येथें असलेले गव्हर्नर जनरल (१८२७) **सर चार्लस मेतकाफ** यांनीं आपलें नांव मागें राहण्यासारख्या पुष्कळ गोष्टीं केल्या. त्यांतली एक मुख्य अशी कीं, त्यांनीं वर्तमानपत्रकर्त्यांवर जे कांहीं सक्तीचे नियम ठरलेले होते, ते सर्व काढून टाकिले. आणि त्यांस स्वेच्छेप्रमाणें खरें खरें आणि वाजवी असेल तें लिहिण्यास पूर्ण मोकळीक दिली. हें त्यांचें कृत्य **हिंदुस्थानांतील** आणि **विलायतेंतल्या** पुष्कळ **इंग्रज** लोकांस फार अप्रशस्त वाटलें, आणि त्यावरून त्यांनीं **सर चार्लस मेतकाफ** यांच्या नांवाचा फार गवगवा केला. परंतु त्यांस ते तिळभरही डगमगले नाहींत. तत्संबंधीं त्यांचे कित्येक लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांतल्या एकाचें तात्पर्य येणेंप्रमाणें—



सर चार्ल्स् मेटकाफ्.

" **हिंदुस्थानांतील** लोकांत ज्ञानाचा प्रसार झाला असतां तो आपल्या राज्यास बाधक होईल, असें जर माझ्या प्रतिपक्षाचें ह्मणणें असेल, तर त्याविषयीं मी मुळींच वाद करीत नाहीं; आणि त्यांस एवढेंच सांगतों कीं, ज्ञानप्रसाराचा पुढचा परिणाम कसाही साधक बाधक व्हावयाचा असो; त्याविषयीं कांहीं एक भय मनांत

न धरितां, ज्ञानप्राप्तीपासून जे लाभ होतात, ते **हिंदुस्थान**च्या लोकांस कळविणें, हें आपलें राज्यकर्त्यांचें मुख्य कर्तव्यकर्म आहे. **हिंदुस्थान**चा राज्याधिकार स्वहस्तीं ठेवण्यास, तेथील लोकांस अज्ञानांत राहूं देणें एवढेंच जर साधन आमचे हातीं आहे, तर आमचें राज्य हें ह्या देशावर एक मोठें विघ्न आलें आहे, असें ह्मटलें पाहिजे आणि हें अरिष्ट होईल तितकें लवकर नष्ट होवो, अशी इच्छा केली पाहिजे. परंतु मला तर असें वाटतें कीं, **हिंदुस्थानां**तील लोकांस अज्ञानी राहूं देणें, हें आमच्या नाशास कदाचित् कारण होईल. **हिंदुस्थानां**तील लोकांत ज्ञानवृद्धि झाली, तर ती आमच्याच राज्याच्या बळकटीस अधिक जोर आणील, असा माझा समज आहे. ह्मणजे तिच्या योगानें त्यांच्या मनांतल्या अज्ञानमूलक भावना नाहींतशा होतील; कडकपणा कमी होईल; आमच्या चांगल्या राज्यरीतीपासून त्यांस आणि त्यांच्या देशास उत्तम लाभ कोणते होतील, हें त्यांस समजेल; त्यांचीं मनें आह्मांकडे वळतील; आणि आह्मां राजकर्त्यांच्या आणि त्यांच्यामध्यें जें तिऱ्हाईतपण आहे, तें दिवसेंदिवस कमी कमी होत जाऊन शेवटीं अगदीं नाहींसें होईल, आणि त्या योगानें उभयपक्षास पुष्कळ लाभ होईल. **हिंदुस्थानां**तील आमच्या राज्याचा शेवट परमेश्वराच्या इच्छेनुरूप जो व्हावयाचा असेल तो होवो; परंतु जावत्कालपावेतों ह्या देशाचें स्वामित्व जगदीश्वरानें आमच्या हातीं दिलें आहे, तावत्कालपर्यंत, होईल तितकें करून, तेथील लोकांच्या कल्याणाकरितां झटणें, हें आमचें मुख्य कर्तव्यकर्म आहे."

हे वरील शब्द **सर चार्लस मेतकाफ** ह्यांच्या कीर्तीस अत्यंत भूषणप्रद आहेत, आणि आह्मां हिंदुस्थानांतील लोकांस अत्यंत आनंदप्रद आहेत, असें कोण म्हणणार नाहीं !!

---

(३) एल्फिन्स्टन फंड.

In the commemoration of Mr. Elphinstone, and in the dedication to the cause of Education, through public professorships of the large pecuniary testimonial which was forthcoming on that occasion, he (Mr. Jagannath Sankarsett) took a most active and advantageous part, and to the day of his death he remained one of the Trustees of the Elphinstone Fund.

Dr. Stovell.

माउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन साहेबांनीं आपल्या गव्हर्नरीच्या जागेचा राजीनामा दिला, त्यावेळीं त्यांचें कांहीं तरी स्मारक असावें ह्मणून **नाना** आदीकरून प्रमुख नागरिकांनीं आणि कांहीं सरकारी अमलदारांनीं ता. २२ आगष्ट १८२७ त **बाँबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी**मार्फत एक सभा भरविली. त्यांत शिक्षणविषयक गोष्टींचा बराच उहापोह होऊन, मुंबईत उच्चशिक्षणाची कांहींतरी सोय व्हावी आणि त्या प्रित्यर्थ एक फंड असावा, असें ठरलें. ह्या फंडाचें नांव **एल्फिन्स्टन फंड** असें ठेवण्यांत आलें. ह्या फंडाची वर्गणी ४, ४३, ९०१ रुपये जमून शिवाय सरकारानें सालीना वीस हजार रुपयांची ग्रांट—मदत—देऊं केली.

इंग्रजी भाषेचे शिक्षक (प्रोफेसर) तयार करावे, विद्यापीठ (कॉलेज) स्थापावें, त्यांत युरोपांतील कला व शास्त्र शिकविणारे प्रोफेसर असावे आणि विद्यार्थ्यांस शिष्यवृत्त्या देण्यांत याव्या इत्यादि कामांकडे ह्या फंडाचा विनियोग करण्याचें ठरलें. ह्या फंडाची सर्व व्यवस्था **एल्फिन्स्टनफंडट्रस्ट कमिटीच्या** स्वाधीन

करण्यांत आली. **नाना** ह्या फंडाचे ट्रस्टी होते. त्यांनीं आपल्या वजनावर आणि चातुर्यावर हा फंड बराच नांवालौकिकास आणला. कित्येक प्रसंगीं ह्या फंडांतून होत असलेला खर्च गैर आहे, असें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आल्यावरून व त्यामुळें एतद्देशीय विद्यार्थ्यांचें नुकसान होत आहे, असें पाहून त्यांनीं निर्भीडपणें ती गोष्ट फंडाच्या व्यवस्थापक मंडळीच्या नजरेस आणिली. आणि फंडांतून गैररीतीनें होणारा खर्च बंद केला. ह्या फंडाचे **नाना** शेवटपर्यंत ट्रस्टी होते.

---

(४) बोर्ड ऑफ एज्युकेशन.

When the Board of Education was formed he (Mr. Jagannath Sankarsett) was appointed one of its members and he remained in it while it continued, constantly taking a most active part in its business, and aiding it by his sound judgment and wise counsels.

Hon: *Mr. Justice Newton.*

एलिफन्स्टन फंडाच्या मार्फत उच्च शिक्षणाकरितां विद्यापीठाची—**एलिफन्स्टनकालेजा**[१]ची स्थापना होतांच सन १८३७ त **बॉबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी**चा त्या कॉलेजबरोबर मिलाफ करून **सोसायटी**चें नांव **एलिफन्स्टन इंस्टिट्यूट** असें बदलण्यांत आलें.

---

१ हें **कॉलेज** प्रथम कांहीं दिवस भायखळ्यावर होतें. नंतर बाबुला टँकवर नेण्यांत आलें. तेथून सन १८७१ च्या फेब्रुआरी महिन्याच्या

पुढें तीन वर्षांनीं **बोर्ड ऑफ एज्युकेशनची** स्थापना होऊन **नानां**-च्या परिश्रमानें स्थापन झालेल्या **सोसायटीला** उत्तम स्वरूप प्राप्त झालें. ह्या **बोर्डमध्यें** जे तीन नेटिव्ह सभासद नेमण्यांत येत असत, त्यांत **नाना** प्रमुख होते. ह्या सभासदांच्या नेमणूका प्रतिवार्षिक होत असत. त्यांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, त्या तीन सभासदांपैकीं दोघांत प्रतिवर्षीं फेरफार व्हावा. परंतु **नानांची**, सतत सोळावर्षेंपर्यंत, ह्मणजे त्या **बोर्डाच्या** अस्तित्वापर्यंत, पुनः पुनः नेमणूक होत गेली.

---

२० तारखेस राणीच्या बागेसमोर **कावसजी जहांगीर बिल्डिंगमध्यें** नेलें. ह्या इमारतीस एकंदर दोन लक्ष रुपये खर्च झाला. पुढें सरकारनें ही इमारत **टेक्निकल इन्स्टिटयूटचे** उपयोगाकरितां देऊन **सेक्रेटेरि-एटजवळ गव्हर्मेंट सेंट्रल प्रेसकरितां** जी इमारत बांधली होती, त्याठिकाणीं हें **कॉलेज** नेलें. आणि अद्यापि तें तेथेंच आहे.

२ ह्या **इन्स्टिटयूटकरितां** साडेपांच लक्ष रुपये खर्च करून कापाच्या मैदाना-समोर साडेचारशें फुट लांबाची एक भव्य इमारत बांधली. पुढें सन १८५६ पासून ह्या **इन्स्टिटयूटला 'एलिफन्स्टन हाय स्कूल'** असें नांव देण्यांत आलें.

(५) डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन

He (Mr. Jagannath Sankarsett) had really done more for education, social advancement, and civilisation of Native Society, than who spoke more loudly in favour of the cause of progress.

Hon. B. H. Ellis.

विद्याखात्याची सर्व व्यवस्था सरकारानें आपल्या हातांत घेतल्यावर त्याला व्यवस्थेशीर स्वरूप प्राप्त झालें. सोळा वर्षेंपर्यंत **बोर्ड ऑफ एजुकेशन**चीं सर्व सूत्रें **नाना** आदिकरून सरकारी आणि बिनसरकारी कार्यकारी मंडळीच्या हातीं होतीं. आणि तीं त्यांनीं अत्यंत उत्तम प्रकारें चालविलीं. पुढें इ. स. १८९६ त सरकारानें **डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन** ही स्वतंत्र संस्था स्थापून विद्याविषयक सर्व गोष्टींचे अधिकार ह्या संस्थेस देण्यात आले. ह्या संस्थेनें शाळाखात्याची पुष्कळ सुधारणा केली आणि जागजागीं शाळा स्थापन केल्या. एकंदरीनें ह्या सुमारास **मुंबईत** व इतर ठिकांणीं विद्यावृद्ध्यर्थ पुष्कळ प्रयत्न झाले. तरी देखील शाळा खात्याविषयीं कोठलीही गोष्ट करतांना सरकारानें **नानां**चा विचार घेतल्याशिवाय ती केली नाहीं. कारण **नानां**विषयीं सरकाराचा अत्यंत उच्च ग्रह होता; आणि **नानां**चें मत सरकाराच्या हिताचें आणि प्रजेच्या कल्याणाचें असें पोक्त असे. एखादी नवीन शाळा स्थापन करावयाची असल्यास अथवा एखाद्या शाळेविषयीं विचार करावयाचा अस-

ल्यास किंवा कोठल्याही सरकारी शाळेंत शिक्षकांची नेमणूक करावयाची असल्यास, **नानांची** सल्ला फारच दूरदर्शीपणाची आणि महत्वाची असते, अशी सरकाराची पूर्ण खात्री झाली होती. यावरून **नानांचें** लोकांतील वजन आणि विद्याभिवृद्धीविषयीं त्यांची आवड स्पष्ट दिसून येते. **नानांचें** लोकांमध्यें किती दांडगें वजन होतें व त्यांची लोकांवर कशी छाप होती, ह्या विषयीं एका ठिकाणीं बोलतांना रे. डॉ. **विल्सन** साहेबांनीं प्रेमानें असें उद्गार काढले कीं,




डॉ. उइल्सन्.

Mr Jagannath Sankarsett was really at the Head of the Indian Community. (properly so called.) That position, that worthy person occupied though he was then no Jagatsett of boundless wealth, no acute or learned Brahmin, no warrior-Khatria or Sirdar but a member of a division of the Hindu Community.

---

१ सतत तेरा वर्षें **मुंबई**शहराचे तिसरे प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेट असलेले कै. **रा. ब. नाना मोरोजी त्रिलोकेकर** हे पूर्वीं **एल्फिन्स्टन हायस्कुलांत** असिस्टंट मास्तर असतांना **नानां**च्या शिफारशीवरून **ठाण्या**च्या इंग्रजी शाळेवर त्यांस हेडमास्तर नेमलें. ह्या संबंधीं रा. **गणेश हरि भिडे**कृत **नाना मोरोजी** यांच्या चरित्रांत पुढील उल्लेख आढळतो —

' मुख्य गुरूच्या जागेचें एकदम आज्ञापत्र **नाना**स येण्यास धूर्त व



रा. ब. नाना मोरोजी

चतुरपुरुष **नानाशंकरशेट** हे विशेष कारणीभूत झाले. ह्या शेटजींची नजर फार खोल असे. यांची गुणग्राहकता अद्याप लोक वाखाणतात. यांच्या मनाला रत्नें निवडण्याची संवयच पडून गेली होती. आणि चमत्कार हा कीं, या प्रचंड बुद्धीच्या विशाल पुरुषाच्या मनांत यांतलें एकही रत्न दडून रहात नसे, मग आमचे **नाना**च कसे चुकून राहतील ! '

(६) स्टूडण्टस् लिटररी अँड साएंटिफिक सोसायटी.

When the Students Literary and Scientific Society was first started, Mr. Jagannath Sankarsett was one of the first who gave a helping hand

Bombay Daily Post.



प्रो॰ दादाभाई नौरोजी.

इंग्रजी शिक्षणाच्या प्रसाराबरोबर लोकांत सार्वजनिक हिताची आस्था उत्पन्न होऊन तें साधण्याकरितां **मुंबई** शहरांत ज्या निरनिराळ्या चळवळी सुरू झाल्या, त्या सर्वांत **स्टूडण्टस् लिटररी अँड साएंटिफिक सोसायटी** ह्या संस्थेची चळवळ पहिली होय. कांहीं सुशिक्षित, उत्साही व होतकरू तरुणांनीं वरील संस्था सन १८४९ त **मुंबई** शहरांत स्थापन केली. **प्रो. दादाभाई नौरोजी, नारायण दिनानाथजी, डॉ. भाऊ दाजी, विश्वनाथ नारायण मंडलिक, भगवानदास पुरुषोत्तमदास** आदिकरून मंडळी, ही संस्था स्थापन करण्यापूर्वीं आमच्या चरित्रनायकाकडे गेली आणि त्यांस आपला उद्देश कळविला. तेव्हां **नानां**ना त्या मंडळीचा उत्साह आणि सार्वजनिक कार्य करण्याविषयीं त्यांची खरी कळकळ पाहून फार


डॉ. भाऊ दाजी.

कौतुक वाटलें आणि त्यांनीं प्रसन्नचित्तानें ‘ आपण कार्याला आरंभ करा, माझें आपणास पूर्ण पाठबळ आहे,’ असें त्यांस प्रेमानें आश्वासन दिलें. वचनाप्रमाणें **नानांनीं** सोसायटीच्या उत्कर्षाकरितां शेवटपर्यंत तन, मन आणि धनानें संस्थेस सहाय्य केलें.

ह्या संस्थेला बऱ्याच विद्वान् लोकांचें सहाय्य होतें. ते पाळीपाळीनें इंग्रजी भाषेंत निबंध लिहून ह्या संस्थेच्या विद्यमानें भरणाऱ्या सभेंत वाचीत. कोणी उपयुक्त विषयावर व्याख्यानें देत. अशा रीतीनें प्रत्येक आठवड्यास अनेक विद्वान् मंडळीस एकत्र जमविण्यास ही संस्था कारण होऊं लागली. कांहीं काळानें ह्या संस्थेनें **ज्ञान प्रसारक** नांवाचें एक मासिक पुस्तक सुरू केलें. त्याचप्रमाणें वेळोवेळीं विद्याप्रसारक ज्या ज्या गोष्टी त्याकाळीं उपस्थित झाल्या, त्या सर्वांस ह्या संस्थेची पूर्ण मदत होती.



रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक.

पुढें १८४८ त ह्या संस्थेच्या आश्रयाखालीं एक मुलींची शाळा स्थापन झाली. तेव्हां ह्या संस्थेला लोकांनीं अगदीं सळो कीं पळो करून सोडलें. परंतु **नानांनीं** तीस योग्य मदत देऊन बिलकुल निरुत्साही होऊं दिलें नाहीं. कारण तो काळ मोठा चमत्कारिक होता. त्यावेळीं लोकमान्य नसलेलें स्त्रीशिक्षण प्रचारांत आणण्यास **श्रीमंत जगन्नाथ शंकरशेट, दादाभाई नौरोजी** आणि **नारायण दिनानाथजी** प्रभृति थोर गृहस्थांनीं अविश्रांत श्रम केले.

१ पुढें ह्या सोसायटीच्या शाळांपैकीं एका शाळेंत इंग्रजी भाषा शिकविण्यास सुरवात झाली. त्यावेळीं प. वा. **न्यायमूर्त्ति नामदार तेलंगा**सारख्या सद्गृहस्थांनीं आणि **डॉ. रमाबाई**सारख्या विदुषींनीं अनेक प्रकारें सहाय्य केलें. सांप्रत ह्या सोसायटीच्या तीन कन्याशाळा, पांच सहाशें मुलींना ‘ श्रीगणेशा ’ पासून मॅट्रिक्युलेशनपर्यंत विद्या शिकविण्याचें काम करीत असून, सोसायटीचें व शाळांचे चालकत्व व अध्यक्षत्व **नामदार न्यायमूर्ति सर चंदावरकरां**कडे व सेक्रेटरीचा अधिकार श्रीयुत **दाजी आबाजी खरे** व श्रीयुत **रामदत्त विठोबा देसाई** यांच्याकडे आहे.

(७) जगन्नाथ शंकरशेट मुलींची शाळा.

Without earnestness no man is ever great or does really great things. No soul moving picture was ever painted that had not in it depth of shadow.

Lyman Abott.

खरी कळकळ असल्याशिवाय व त्या गोष्टींत रंगल्याशिवाय कोणीही थोर पदवीला पोहोंचत नाहीं; किंवा कोणाच्या हातून मोठें कृत्य होत नाहीं. चित्रांत छायेचा उठाव असल्याशिवाय चित्र सजीव वाटणार नाहीं; ही गोष्ट अक्षरशः खरी आहे. कारण सांप्रत देशोन्नतीच्या लांब लांब गप्पा झोंकणाऱ्या, व समाजोन्नतीकरितां अमुक केलें पाहिजे, तमुक केलें पाहिजे, वगैरे केवळ वाचाळतेस भूषण आणणाऱ्या मंडळींचे थवेच्या थवे नेहमीं दृष्टीस पडतात. परंतु पदराला खार लागण्याचा प्रसंग आला कीं, प्रत्येक जण तेथून आपला पाय काढून घेण्यासाठीं कसा प्रयत्न करीत असतो, याचा जर बारकाईनें विचार केला तर आमच्या लोकांच्या कर्तबगारीची आणि सौजन्याची चांगलीच ओळख पटते. हा प्रकार आमच्या देशांतील लोकांस अगदीं लांछनास्पद आहे.

राष्ट्रहिताच्या नांवाखालीं सामाजिक, राजकीय औद्योगिक, धार्मिक वगैरे चळवळी जशा एका नांवाखालीं मोडत आहेत, तसे तिचे पुरस्कर्तेही एका शतकापूर्वीं एकच होते. त्यामुळें त्या काळीं उत्साह, उद्योग व कळकळ यांचा विभाग होऊन सर्वांचीच सारखी तारांबळ उडे व प्रतिकूल परिस्थितीमुळें चोहोंकडून त्यांच्यावर निराशेचा पगडा

बसे आणि या चळवळीच्या पुरस्कर्त्यांवर जनसमूहाचा प्रथम असलेला विश्वास व पूज्यभाव कमी होऊन त्यांची सहानुभूति देखील मंदावत जाई, या कारणानें पुढाऱ्यांचेही प्रयत्न शिथील होत असत, अशी वस्तुस्थिति असल्यामुळें लोकांचा अविश्वास, प्रयत्नांची निष्फळता व तीपासून उत्पन्न होणारी निराशा, यांपासून जर पुढाकार घेणाऱ्या माणसांस आपली सुटका करून घ्यावयाची असली, तर त्याला कोठला उपाय योजावा, हें आमच्या चरित्रनायकाला उत्तमप्रकारें माहीत होतें. आणि तो उपाय हा कीं,

आपणास जीं जीं कार्यें करावयाचीं आहेत, त्या सर्वांत एकदम हात घालण्यापेक्षां त्यांतील एक एक कार्य हातीं घेऊन त्यांतच आपलें बुद्धिसामर्थ्य व दीर्घोद्योग यांचा व्यय करावा, आणि असें केल्यानें इष्टकार्य तडीस नेण्यास हवे तितके प्रयत्न करावे लागले, तरी ते करण्यास उल्हास व हिंमत यांची वाण कधींही पडणार नाहीं.

ग्लाडस्टन.

ह्या उक्तीप्रमाणें आमच्या चरित्रनायकानें आपल्या देशबांधवांच्या शिक्षणाची नीट व्यवस्था लागलेली पाहून आपल्या देशभगिनी सुशिक्षित करण्याचा प्रश्न हातीं धरला. ह्या विषयीं मि. **स्कोबल**साहेब ह्मणतात, That the services thus rendered to the cause of Education among Native men, did not satisfy Mr. Jagannath Sankarsett. He thought it was not enough to bring males within its influence and he strove to have females brought under its influence—अशा रीतीनें स्त्रीशिक्षण लोकमान्यतेस आणण्याच्या प्रयत्नाला सुरवात करतांच कांहीं अप्रबुद्ध लोकांनीं त्या कार्यांत अतिशय अडथळे आणले. परंतु

वानोत निंदोत सुनीतिमंत ।
चलो असो वा कमला गृहांत ॥
हो मृत्यु आजीच घडो युगांतीं ।
सन्मार्ग टाकूनि भले न जाती ॥

वामन.

नाना आपल्या कर्तव्यापासून किंचितही पराङ्मुख झाले नाहींत. उलट ह्या लोकोत्तर पुरुषाच्या धैर्याची, सोशिकपणाची व लोकहिततत्परतेची तेजी वाढविण्यास ते अडथळे कारण झाले.

हिंदुस्थानांत प्राचीनकाळीं स्त्रियांची योग्यता केवढी होती, हें आपणांस प्रत्येक गृहसंस्कारांत स्त्रियांची जी आवश्यकता आहे, तिजवरून दिसून येतें. तसेंच प्राचीनकाळीं वेदविद्येंत सुद्धां निष्णात असलेल्या स्त्रियांचीं नांवें आपल्या ऐकिवांत आहेत; परंतु अनेक कारणांमुळें आपला स्त्रीसमाज शिक्षणविमुख बनला, व अजूनही ही स्थिति बऱ्याच अंशीं चालू आहे. या त्यांच्या अज्ञानामुळें सामाजिक सुधारणेला लहानसहान अडथळा येतो, असें नाहीं. आमचे किती तरी नांवाजलेले सुधारक अनेक प्रसंगीं स्वतःस अवश्य वाटणाऱ्या सुधारणा स्वतःसच अमलांत आणतां आल्या नाहींत, ह्मणजे स्त्रियांच्या अज्ञानाची सबब पुढें करितात, व बरेच अंशीं ती खरीही आहे. यासाठीं शिक्षणाचा प्रसार आणि विशेषतः स्त्रीशिक्षणाचा प्रसार करावा तितका थोडाच आहे.

पूर्वींपासून चालत आलेले आपणांतील कित्येक सामाजिक निर्बंध अद्यापि अबाधितपणें चालू असल्यामुळें आपल्या समाजाची नैतिकबाबतींत सुधारणा होण्यास स्त्रियांच्याही मनावर शिक्षणाचे संस्कार घडावे अशी **नानांची** इच्छा होती. परंतु हें मत त्यावेळीं पुष्कळांना ग्राह्य नव्हतें. सांप्रत देखील स्त्रीशिक्षणानें बायका बिघडतात

अशी ओरड ऐकूं येते आणि ही ओरड बऱ्याच अंशीं खरी असावी, असें आह्मास देखील वाटतें. परंतु सदर दोष शिक्षणाचा नसून शिक्षण देण्याच्या पद्धतीचा आहे, असें ह्मणावें लागतें. कारण हल्लीं स्त्रियांची धारणाशक्ति पूर्णावस्थेंत येण्यापूर्वीच त्यांस पाश्चिमात्य शिक्षण देण्यांत येतें. आणि यालाच **स्त्रीशिक्षण** ह्मणतात, अशी आमच्या लोकांची चुकीची समजूत होऊं पहात आहे. परंतु त्यामुळें आमच्या समाजाचा एक भयंकर तोटा होत आहे. असें पायाशुद्ध नसलेले शिक्षण त्यांस देण्यांत येत असल्यामुळें त्यांच्या नीतिमत्तेस धोका बसतो, असें सूक्ष्म विचारांतीं दिसून येईल. तर तसें न करतां पौर्वात्य पद्धतीनें ह्मणजे प्रथम मराठी नंतर संस्कृत शिकवून मग पुराणादि धार्मिक ग्रंथांची त्यांस माहिती करून दिल्यास त्यांचें ठायीं नैतिक बल वाढेल. मग त्यांस कितीही पाश्चिमात्य शिक्षण दिलें तरी त्या योगानें त्यांचे मनावर वाईट परिणाम व्हावयाचा नाहीं. असें केलें असतां कालांतरानें कां होईना, आपला सामाज नीतिमत्तेच्या उच्च पायरीवर जाऊन पोहोंचेल. नीतिमत्ता सुधारण्यास शिक्षणासारखें दुसरें साधनच नाहीं.

हल्लीं देखील स्त्रीशिक्षणाची उचल घेणारांस क्वचित् प्रसंगीं समाजाच्या प्रखर छलास बळी पडावें लागतें, मग एका शतकापूर्वीं मूळ आपल्या येथें स्त्रीशिक्षणाचा पाया घालणाऱ्या समाजसुधारकाला किती तरी लोकच्छल सोसावा लागला असेल, याची कल्पना देखील करवत नाहीं. परंतु **नाना** कर्तृत्वहीन, हतवीर्य आणि दुर्बल असे बोलके समाजसुधारक नव्हते. त्यांनीं **स्टूडण्टस् लिटररी अँड साएंटिफिक सोसायटी**ला प्रोत्साहन देऊन हाताशीं धरलें आणि आपल्या स्वतःच्या वाड्यांत १८४८ त मुलींची शाळा स्थापन केली. हीच हिंदु मुलींची पहिली शाळा होय.

ही शाळा स्थापन झाल्यावर सोसायटीच्या चालक मंडळीला जनतेचा ‘न भूतो न भविष्यति’ त्रास सोसावा लागला. ‘तुमच्या शाळेंत मुली शिकविण्याकरितां कशा येतात तें आह्मी पाहूं !’ अशी लोकांनीं दहशत घातली. परंतु **नानांनीं** त्याकडे बिलकुल लक्ष दिलें नाहीं. इतकेंच केवळ नव्हे, तर Charity bigins at home ह्या उक्त्यनुसार त्यांनीं स्वतःच्या मुलीं शाळेंत पाठवून लोकांना धडा घालून दिला. आणि न बोलतां कृतीनें लोकांस अनुकरण करावयास लाविलें. ह्या सर्व वरील मजकुरावरून येथें स्त्रीशिक्षणाचें बी पेरण्यांत **नाना** अग्रेसर होते हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. अद्यापि ही **नानांची मुलींची शाळा** चालू आहे. या शाळेंतून शेंकडों मुलीं शिकून तयार झाल्या आहेत व सांप्रत होत आहेत.

(८) धि जगन्नाथ शंकरशेट फर्स्ट ग्रेड अँग्लो व्हर्न्याक्युलर स्कूल.

We do not choose our own parts in life and have nothing to do with these parts. Our simple duty is confined to playing them well.

Epictetus.



‘ह्या जगरूपीं नाटकांत जी भूमिका आपणाकडे आली आहे, ती आपल्या संमतीनें आपणास अगोदर विचारून आलेली नाहीं; तेव्हां आपणास तिच्याबद्दल, ती अशीच कां यावी या बद्दल भांडण करून उपयोगी नाहीं. ती भूमिका कोणती का असेना,

तिच्याशीं आपला संबंध नाहीं. आमचें कर्तव्य इतकेंच कीं, आलेली भूमिका उत्तम प्रकारानें वठवून दाखवावी.' ह्या तत्त्वांत ह्मटल्याप्रमाणें **नानांनीं** आपणाकडे पर्यायानें आलेली भूमिका किती उत्तम प्रकारें बजाविली, हें पुढील गोष्टीवरून वाचकांच्या लक्षांत येईल.

सांप्रत ह्या **मुंबई**शहरांत ज्या प्रमाणें जिकडे तिकडे इंग्रजी शाळा दृष्टीस पडतात, त्याप्रमाणें पूर्वीं नव्हतें. त्यावेळीं इंग्रजी शिकण्याची वर लिहिलेली एकच शाळा कापाच्या मैदानाजवळ होती. तिला '**एलिफ-न्स्टन इन्स्टिटयूट**' असें ह्मणत. परंतु ती '**सोसायटी**' या नांवानें विशेष प्रसिद्ध होती. याचा उल्लेख मागें आलाच आहे. ती शाळा फार दूर होती, तरी नाइलाजास्तव इंग्रजी शिकण्याकरितां गिरगांवादि दूर ठिकाणच्या लोकांस आपलीं मुलें तेथें पाठवावीं लागत. ही आपल्या लोकांची गैरसोई पुष्कळ दिवसांपासून **नानां**च्या मनांत घोळत होती. शेवटीं ही अडचण दूर व्हावी ह्मणून **नानां**नीं शाळाखात्याच्या मुख्य अधिकाऱ्याशीं बोलणें लाविलें. त्या वेळीं गिरगावांत इंग्रजी शाळेची किती आवश्यकता आहे, हें शाळाखात्याचे अधिकाऱ्यांना दाखवून अशा प्रकारची शाळा स्थापन झाल्यास आपणही सरकारास मदत करण्यास तयार आहोंत, असें त्यांनीं कळविलें. **नानां**नीं त्या शाळेला दरमहा पाउणशें रुपये देणगी देण्याचें कबूल केलें. तेव्हां शाळा खात्यानें त्यांची विनंती मान्य करून अत्यादरानें त्यांच्या देणगीचा स्वीकार केला, आणि त्या शाळेला त्यांचेंच नांव देण्याचें योजिलें. ही गोष्ट **नानां**च्या ज्ञातिबांधवांस कळतांच त्यांना आनंद झाला. आणि त्या शाळेंत फक्त आपल्या ज्ञातीच्या मुलांची सोय व्हावी, असें, त्यांनीं **नानां**ना कळविलें.परंतु ही व्यक्तिवाचक सूचना **नाना**सारख्या सार्वजनिक हितार्थ झटणाऱ्या पुरुषास कशी मान्य व्हावी ? तेव्हां त्यांनीं

मंडळीची योग्य प्रकारें समजूत करून शिक्षणाच्या बाबतींत आपण असा प्रपंच ठेऊं नये, इत्यादि सामोपचाराच्या गोष्टी गोड शब्दांनीं सांगून ज्ञातिबांधवांना न दुखवितां त्यांचीं मनें वळविलीं. पुढें लोकरच ता. २९ एप्रिल १८९७ त '**धि जगन्नाथ शंकरशेट फर्स्ट ग्रेड अँग्लो व्हर्न्याक्युलर स्कूल**' ह्या शाळेची स्थापना झाली.

हा वेळपर्यंत इतर धनाढ्य लोकांनीं परोपकाराचीं पुष्कळ कृत्यें केलीं. परंतु वरील कृत्यामुळें **नानां**ची कीर्ति सर्वत्र पसरली. त्यांच्या ह्या व इतर सत्कृत्याबद्दल सर्वत्र त्यांचे स्तुतिपाठ ऐकूं येऊं लागले. ही शाळा स्थापन झाली, त्यावेळीं प्रख्यात व लोकप्रिय वकील आणि पुढें चतुर्थाश्रम स्वीकारून ब्रह्मीभूत झालेले **आनंदसरस्वती स्वामी महादेव चिमणाजी आपटे** हे हेडमास्तर होते, आणि मुलांची संख्या २०० शें होती. त्या वेळेच्या मानानें ही संख्या मोठी होती. ही शाळा अगदीं आतांपर्यंत '**नानाची शाळा**' या नांवानें प्रसिद्ध होती.

पुष्कळ लोक केवळ साधनें नसल्यामुळें त्यांचे स्वाभाविक गुण जरी तेजस्वी असले, तरी घरच्या विपन्नतेमुळें त्यांच्या आंगचे हे गुण असून नसल्या सारखेच होतात. हें **नाना** पूर्णपणें जाणत होते. अशा लोकांकरितां आपल्या तर्फे चाळीस विद्यार्थी आपल्या शाळेंत माफी ठेवावे, अशी तजवीज त्यांनीं शाळाखात्याच्या मुख्य अधिकाऱ्याशीं शाळा स्थापन होण्याच्या वेळीं केली होती. त्यांनीं आपल्या हयातींत हजारों गरीब विद्यार्थ्यांचा परामर्ष घेतला. गरजू विद्यार्थी त्यांच्या

---

१ यांच्या मागून रा. रा. **रावजीपंत कानिटकर**; रा. **नारो आप्पाजी गोडबोले**; रा. **नारो कृष्ण गोखले**, रा. **विनायक गोरे**; रा. **केशव विनायक धैर्यवान**; रा. **गोविंद केशव साबदे**; इत्यादि विद्वान् व हुशार मंडळी हेडमास्तराच्या जागेवर क्रमाक्रमानें येऊन गेली.

कडे जाऊन आपली गरज भागविल्याशिवाय कधीं विन्मुख आला आहे, असें झालेंच नाहीं ! आपल्या शाळेंत त्याच प्रमाणें अन्य शाळांतून जाणाऱ्या बहुतेक विद्यार्थ्यांस फी, पुस्तकें आणि पैशाची मदतही ते वारंवार करीत असत. ही गोष्ट शहरांत सर्वतोमुखीं होती. कोणाही मनुष्यास, एखादा गरीब विद्यार्थी, जो शाळेची फी देण्यास समर्थ नाहीं, अगर ज्याच्याजवळ पुस्तकें नाहींत, असा आढळला कीं, तें त्याला **नानाशंकरशेटजी**कडे जावयास सांगत. सुप्रसिद्ध व्याकरणकर्ते कै० **राव बहादूर दादोबा पांडुरंग 'एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशन'** मध्यें शिकत असतां त्यांच्यावर **नानां**ची वर दर्शविल्याप्रमाणें कृपादृष्टि होती, त्याबद्दल त्यांनीं अंतःकरणपूर्वक कृतज्ञता दर्शविली आहे.[१] ह्या गोष्टीवरून विचार करतां पुढे लोकादरास पात्र होणारे कर्ते पुरुष निर्माण होण्यास आमचे चरित्रनायक पुष्कळ अंशानीं कारण झाले, हें आमचें सुदैव !



रा. बा. दादोबा पांडुरंग.

१ कै. **रा. ब. दादोबा पांडुरंग** यांनीं **नानां**च्या मृत्यूविषयीं उल्लेख करतांना असें उद्गार काढले आहेत कीं, It is with the deepest regret that I have to record the death of this great man, (The Hon: Jagannath Sankarsett) which sad event took plaec on the 31st July 1865. The Public will no doubt do justice to him in commemoration of his very useful career, by the erection of a Statue which they voted for him some months ago in the Town Hall. But I cannot aovoid paying a humble tribute to his lamented memory by expressing my deep sense of gratefulness for his particular acts of kindness to me personally ever since I was a Student in the Elphinstone Institution.

भाग दहावा.

राजकीय आणि सार्वजनिक कामें.

सन्तः स्वयं परहितेषु कृताभियोगाः ।

भर्तृहरि.

काया बहुत कष्टवावी । उत्कट कीर्ति उरवावी ॥
चटक लावुनि सोडावी । कांहीं एक ॥

रामदास.

नानाविध तारे प्रत्यहीं आकाशांत उगवतात; पण त्यांत सूर्यचंद्रलाच आपण अधिक महत्व कां देतों ? इतरांहून त्यांचा आकार मोठा दिसतो ह्मणून नव्हे; तर त्यापासून आपणाला प्रकाश मिळतो, अखिल प्राण्यांच्या जीवनार्थ अवश्य असणाऱ्या ज्या नानाविध वनस्पती उगवतात, जीं नानाविध फळें, फुलें उत्पन्न होतात, त्या सर्वांस मुख्यतः तेच कारणीभूत होत असतात; त्याचप्रमाणें उष्ण व शीत यांचाही प्रादुर्भाव त्यांच्याच प्रभावानें होतें, वगैरे अनेक करणांनीं ते आपल्या सुखास कारणीभूत होत असतात, ह्मणून होय. ह्या गोष्टीवरून काय बरें निष्पन्न होतें ? अर्थात् हेंच कीं, ज्याच्या अंगीं जसे जसे विशेष गुण असतील, तशी तशी त्याची चहा ही ह्या जगांत विशेष होत असते. त्याचप्रमाणें ह्या अखिल जगांत गुणानें, ज्ञानानें, सामर्थ्यानें आणि योग्यतेनें सर्वप्रकारें श्रेष्ठ

असणारी जी मानवकोटी तींत परोपकार, भूतदया इत्यादि उच्चतम गुणांनीं मंडित असणाऱ्या पुरुषांचीं योग्यता केवढी मोठी असेल, हें निराळें सांगितलें पाहिजे असें नाहीं.

नानांच्या मनांत देशहिताची कळकळ फार होती, हें त्याच्या कृतीवरून सहज दिसून येतें. त्यांची बुद्धि सर्वव्यापी असल्यामुळें सर्व बाजूंनीं आपल्या देशबांधवाची स्थिति सुधारण्यासाठीं त्यांनीं अव्याहत परिश्रम केले. त्यांनीं आपणाकडे आलेली लोकनायकाची भूमिका किती उत्कृष्ट रीतीनें बजाविली, हें येथें निराळे सांगावयास नको. आणि ही लोकनायकाची भूमिका आमच्या चरित्रनायकाला कशी मिळाली, या विषयीं खुद्द **एलिससाहेब** ह्मणतात—How was it that this eminent position among his countrymen had been attained? He certainly did not attain this position by virtue of rank, for his social status was not higher than that of many others, nor did he attain it by means of wealth, for there were very many in Bombay wealther than he. No, it was by strict rectitude of purpose and sheer force of character that he raised himself to be the representative of all classes, and won the entire confidence and respect of all his countrymen. This position gave him such influence and such vast local knowledge, that his views in regard to any public measures affecting the Native ommunity were always held by Government as of the highest value. In regard to such measures the Government constantly consulted him. He was, in effect, a Counsellor of the Government ontside the Council, and in his word and advice successive administrations in Western India had for many years placed the most implicit confidence. इतक्या प्रांजलपणें खुद्द **गव्हर्नर साहेबांनीं** आमच्या चरित्रनायकाची थोरवी वर्णन केली आहे.

(१) ग्रांड ज्यूरी.

चांगल्या मनुष्याच्या आयुष्यांतील उत्तम भाग कोणता तर त्यानें कीर्तीच्या अपेक्षेनें न केलेलीं आणि त्याला ज्यांचें स्मरण नाहीं अशीं परोपकाराचीं खरीं कृत्यें हीं होत.

वर्डस्वर्थ.

त्या वेळीं नुकतीच राज्याची घडामोड झाल्यामुळें इंग्रज सरकाराचा हिंदुस्थानवासी जनांवर फारसा विश्वास नव्हता. त्यामुळें राजकीय व्यवहारांत एतद्देशियांचा किंचितही शिरकाव नव्हता. आपल्या-लोकांना सरकारांत बिलकूल मान नाहीं, हा विचार बरेच दिवस **नानांच्या** मनांत घोळत होता. आपल्या लोकांवर सरकाराचा विश्वास बसण्यास आणि ते सरकाराची जबाबदारीचीं कामें करण्यास पात्र आहेत किंवा नाहींत, हें सरकाराच्या दृष्टोपत्तीस आणण्याविषयीं आमच्या चरित्रनायकानें जे दिर्घोद्योग केले, ते त्याच्या शिलाला योग्यच होते. सरकारापासून आपणास कोठले अधिकार मिळतील आणि आपले लोक कोठल्या अधिकाराला पात्र आहेत, ह्या गोष्टी स्वतःशीं ठरवून **नानांनीं** प्रथम '**ग्रांड ज्यूरींत**' बसण्याचा एतद्देशीय लोकांना अधिकार मिळावा ह्मणून खटपट चालविली. पूर्वीं खुनासारखे मोठे खटले असल्यास त्याचा कच्चा मजकूर समजून घेऊन त्याच्या जबान्या लिहून घेऊन त्याच्या निकालाकरितां तो खटला सुप्रिम कोर्टांत पाठवून देण्यांत येई. तेथें जें सेशन भरत असे, त्यांत १४ सन्माननीय युरोपियन पंच नेमलेले असत. त्यांना त्या जबान्या तपासण्याकरितां देऊन त्या खटल्याचा निवाडा करणें त्यांच्या मतावर अवलंबून असे. हा पंचांचा मान सन्माननीय असून त्याला '**ग्रांड ज्यूरी**' असें ह्मणत. हा मान आपल्या लोकांना मिळावा

ह्मणून **नानांनीं** सतत तीन वर्षें खटपट चालविली. शेटीं त्यांच्या प्रयत्नाला यश येऊन सन १८३६त **ग्रांड ज्यूरींत** बसण्याचा सन्माननीय हक्क एतद्देशीय लोकांना **नानांच्या** दीर्घोद्योगानें मिळाला. त्या वेळीं गव्हर्नर **सर जॉन माल्कम्** ह्यांची कारकीर्द होती.



सर जॉन मालकम.

आपल्या लोकांना हा अधिकार दिल्यावर एके प्रसंगीं भाषण करतांना **गव्हर्नरसाहेबांनीं** असे उद्गार काढले कीं, ' एतद्देशीय लोकांशीं कोठल्याही प्रकारें द्वैतभाव ठेवणें, हें इंग्रज लोकांस मोठें हानिकारक आहे. कोणी इंग्रज कामगारानें असें समजूं नये कीं, आपण ह्मणजे इंग्रज सरकारी अधिकारी; आपणापाशीं राज्यसत्ता आहे, तर एतद्देशीय लोकांत व आपणांत मोठें अंतर आहे म्हणून त्यांच्याशीं सलोख्यानें वागूं नये. असा अभिमान कोणी मनांत वागवूं नये. परस्परांनीं शुद्ध अंतःकरणानें वर्तण्यांत मोठें सुख आहे.

1. His first effort was, to abtain for the Native Gentlemen in Bombay, admission to the Grand Jury. His labours to accompish this object were long continued and strenuous and in 1826. they were crowned with success. In seeking this reform for the Native Gentry of Bombay, he asked not for more personal advantage, but he sought to prove that they were fit to do the work of Grand Jurors.

A. R. Seoble.

प्रथम आपणास स्वजातीय अभिमान इतका असे कीं, एखाद्या एतद्देशीय श्रीमान् गृहस्थाबरोबर संघटण ठेवणें ह्मणजे कमीपणा वाटे; परंतु अनुभवांतीं माझी खात्री झाली कीं, एतद्देशीय लोकांपाशीं बरोबरीच्या नात्यानें वागल्यानें पुष्कळ लाभदायक गोष्टी आहेत.राजा आणि प्रजा यांमध्यें प्रामाणिकपणा आणि प्रीति उत्पन्न करण्याचीं लक्षणें हींच आहेत कीं; एकमेकाशीं मोकळे मनानें वागणें. '

गव्हर्नरसाहेबांच्या तोंडून असे उद्गार निघण्याला कारण त्यांचें आणि **नानां**चें चांगलें सख्य होतें. **एलिफन्स्टन** साहेबांचा जसा **नानां**वर लोभ होता तसा **माल्कम्** साहेबांचाही होता.

असो. **नानांनीं** आपल्या आयुष्यक्रमांत जीं जीं निरनिराळीं महत्वाचीं कामें केलीं,त्यांत हें एक अति महत्वाचें काम होय. त्यांनीं देशहिताकरितां अंगीकृत केलेलीं जीं जीं ह्मणून कार्यें होतीं, तीं तीं आपापल्या स्वरूपांत उच्च स्थान पावलीं आहेत, असें आतां आपण पहात आहोंत. याचें कारण त्या कार्यांच्या उत्पादकाची ह्मणजे आमच्या चरित्रनायकाची, प्रथम तीं कार्यें योजण्यांत दिसून आलेली अप्रतिम बुद्धिमत्ता, अविश्रांत उद्योग आणि विशेषेंकरून त्यांची हृदयपूर्वक आस्था व आश्चर्यजनक स्वार्थत्याग, हीं होत. दासबोधांत एके ठिकाणीं ह्मटलें आहे—

नाना उत्तम गुणसत्पात्र । तोचि मनुष्य जगन्मित्र !

' मनुष्य आपल्या आंगच्या उत्तम गुणांनीं सहज सर्व जगाचा मित्र होतो.

(२) सती जाण्याचा प्रतिकार.

स्वे स्वेऽधिकारे या निष्ठा सगुणः परिकीर्तितः ।

भागवत.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल **लॉर्ड उइलियम बेंटिक**-साहेबांनीं लोकहिताचीं जीं अनेक कामें केलीं, त्यांपैकीं एक इ. स. १८३० त **हिंदुस्थानांत** फार प्राचीन काळापासून चालत आलेली सती जाण्याची चाल एकदम बंद केली, हें एक होय. त्यावेळीं सर्वत्र एकच गडबड उडून गेली होती. सती जाणें हें कृत्य अत्यंत घोर आहे, हें जरी प्रत्येकजण जाणत



लॉर्ड उइलियम बेंटिक.

होता आणि सरकारानें जनाच्या कल्याणासाठीं ती घातुक चाल बंद केली, तरी ही सरकारची कृती हिंदुस्थानवासी जनांना प्रिय झाली नाहीं; इतकेंच नव्हे तर बंगाल्यांतून मोठमोठ्या लोकांनीं हा हुकूम रद्द व्हावा ह्मणून जारीनें खटपट चालविली होती. शेवटीं येथें दाद लागत नाहीं, असें पाहून त्यांनीं **ब्यॉथो** नांवाचा एक हुशार वकील **विलायतेंत** खुद्द **बादशहा**कडे अर्ज घेऊन पाठविला

१. ह्या प्रसंगाविषयीं सविस्तर रीतीनें डॉ० उइल्सन् साहेब ह्मणतातः—

In regard to philanthropy again, it was worthy of remem, brance, that Mr. Sankarsett and those like-minded with himself had been of signal service to the Government and Native commu-

तें पाहून लार्डसाहेबास विचार पडला. आपल्या कृतीमुळें बंगाल्यांत असंतोष उत्पन्न झाला, तसा सर्व हिंदुस्थानात होईल कीं काय, अशी त्यांस भीति पडली. कदाचित् महाराष्ट्रांतही कांहीं गडबड होईल, ती होऊं नये ह्मणून लॉर्डसाहेब मुंबईत आले, व त्यांनीं मुंबईचे गव्हर्नर सर जॉन् माल्कम् साहेब यांच्या सहाय्यानें सर्वत्र शांतता राखण्याचा प्रयत्न केला. त्या वेळीं नानानीं लोकमत वळविण्यांत सरकारला फार मदत केली· सती जाण्याची चाल किती अघोर आहे, हें लोकांच्या मनावर बिंबविण्याचा त्यांनीं दीर्घ प्रयत्न केला आणि त्याच प्रमाणें सती जाण्याची चाल सरकारानें बंद केली.

---

nity at the end of 1829 and commencement of 1830 when Lord William Bentinck in Bengal and Sir John Malcolm in Bombay, resolved to put an end to the ancient but horrid rite of Sattee, with all its awful atrocities. so that occasion, on memorable in the History of India, even Calcutta, the foremost city in India in education and enlightenment, was moved to the folly of sending a lawyer (a Mr. Batho) to England, to protest in its name against the measure, and to move the King in Council to rescind the benevolent ordinance, so as to allow the youth bereft of his father to burn to death his surviving mother with the body of the departed, that is to make himself an orphan in a double sense, and murderer in the highest ! Such was the influence the philanthropic influence of Mr. Jagannath and the other parties associated with him, that no such folly was perpetrated in Bombay, though so near to Konkan religiously governed by Brahmans of great power, and a province in which from forty to sixty Sattee are supposed annually to have occurred and that no popular disaffection with the benevolent measure of the British administration was here permitted to appear. Since that time Mr. Jagannath had often been a wise and kind interpreter to the natives, of measures which, however excellent in themselves, have been distasteful to fastidious prejudice and olden customs.

त्या विरूद्ध सर्व महाराष्ट्रांत आपल्या मित्रमंडळीच्या साह्यानें एक ही सभा भरूं दिली नाहीं. इतकें त्यांचें सर्वत्र वजन होतें. ह्या कामाप्रीत्यर्थ खुद्द **गव्हर्नर जनरल लार्ड उइलियम बेंटिक** आमच्या लोकनायकच्या तीन वेळां भेटी घेतल्या. या वरून **नानांचें** किती दांडगें वजन होतें, याची सहज कल्पना होते.

---

(३) जस्टिस ऑफ धि पीस.

Mr. Jagannath Sankersett also sought admission for natives as Justices of the Peace. In 1835 he was sucessful, and he was one of the first twelve Native Gentlemen appointed to sit in this body.

A. R. Scoble.

मोठमोठ्या सरकारी अमलदारांकडे जरी त्यांचें मोठें वजन होतें, तरी त्यांचा अयोग्य रीतीनें **नानांनीं** कधींही फायदा घेतला नाहीं. आपणांस ज्या गोष्टींची आवश्यकता आहे, त्या साध्य होण्यास ते योग्य दिशेनें आणि योग्य वेळींच खटपट करीत. आपल्या शहरच्या व्यवस्थेसाठीं रयतेकडून जें द्रव्य सरकारांत जातें, त्याचा नीट व्यय होतो कीं नाहीं, रयतला यथायोग्य न्याय मिळतो कीं नाहीं, हें पाहणारे व शहरांत स्वच्छता आणि शांतता ठेवणारे, आपल्या राजाच्या तर्फेनें नेमलेले प्रतिनिधि त्यांना '**जस्टिस ऑफ धि पीस**' असें ह्मणतात. हा अत्यंत सन्माननीय हुद्दा जे द्रव्यवान् आणि अब्रुवान् असतील, त्यांनाच इंग्लडसरकारांतून मिळतो. पूर्वी हे सर्व प्रतिनिधि

युरोपियन असत. प्रथम सन १७०४ सालीं **सर निकोलस वेट,** त्यावेळचे गव्हर्नर यांनीं मि. **एलाबी** यांस जस्टिस ऑफ धि पीस नेमिलें होतें, व हेच गृहस्थ पहिले युरोपियन जे. पी. होत. पुढें **ग्रांट ज्यूरीचें** काम आपल्या लोकांकडून उत्तम रीतीनें होत आहे, असें पाहून एतद्देशीय लोकांकरितां '**जास्टिस ऑफ धि पीस**' चा अधिकार मिळविण्याच्या खटपटीला **नाना** लागले. **ग्रांड ज्यूरीनंतर** आपल्या लोकांच्या अंगीं '**पेटी सेशन**' मध्यें बसण्याइतकी पात्रता आलेली आहे, हें **नानांनीं** कैकवेळां सरकारच्या निदर्शनास आणिलें. परंतु ह्या लोककार्यांत **अर्ल ऑफ क्लेअर** आणि **जॉन रोमन्** ह्या गव्हर्नरांच्या कारकीर्दींत त्यांना यश आलें नाहीं. तरी,

नात्मानमवमन्येत पूर्वाभिरसमृद्धिभिः
आमृत्योः श्रियमन्विच्छेन्नैनांमन्येत दुर्लभां ।

असें **मनूनें** सांगितल्याप्रमाणें इष्ट कार्याविषयीं प्रयत्न केले असतां त्यांत प्रथम यश आलें नाहीं, त्यामुळें निराश होऊन कार्य होणार नाहीं, असें मानून स्वस्थ न बसतां **नानांनीं** नेटानें उद्योग चालविला, त्यांनीं आपले प्रयत्न किंचित्‌ही शिथील पडूं दिले नाहींत. हातीं घेतलेलें कार्य शेवटपर्यंत पहिल्या प्रतीचें झालें पाहिजे, अशी त्यांची स्वभावतःच महत्वाकांक्षा असल्यामुळें तितकी सिद्धि येईपर्यंत ते अव्याहत प्रयत्न चालू ठेवीत. पुढें सन १८३९ त **सर रॉबर्ट ग्रांट** हे प्रजाहितैकतत्पर गव्हर्नर येतांच **नानांचे** प्रयत्न फलद्रूप झाले.

---

१ पहिले नेटिव्ह बारा जस्टिस ऑफ धि पीसः—**सर जमशेटजी जिजीभाई ब्यॉरोनेट, जगन्नाथ शंकरशेट, फ्रामजी नसरवानजी पटेल, वरजीवनदास माधवदास, खरशेटजी नसरवानजी कामा, खरशेटजी रुस्तमजी कामा, नौरोजी फर्डुनजी, डोसाभाई फ्रामजी, आर्देसर फ्रामजी मूस, भास्कर सुंदरजी, रामचंद्र लक्ष्मणजी,** आणि **माधोबा हरिश्चंद्रजी.**

यावरून एका गोष्टीचा बोध होतो. तो हा कीं, कोठल्याही कार्याच्या यथायोग्य परिपोषास तिच्या चालकाची किंवा उत्पादकाची एकनिष्ठा लागते. दोन, चार निरनिराळ्या कार्यांत एकदम एकाच वेळीं संबंध ठेवल्यानें त्या चालकाचें मन अनेकविधा होऊन सर्व कार्यांत एकच गुंतागुंत होते, आणि अखेरीस एकही कार्य नीट रीतीनें तडीस जात नाहीं, असा सर्व साधारण नियम आहे. परंतु आमच्या चरित्रनायकास निसर्गतःच अनेक विषयांचें आकलन करण्याची शक्ति लाभली असल्यामुळें त्यांच्या सामान्यतः दिसून येणाऱ्या या नियमाचा परिणाम झाला नाहीं.

---

(४) पेटी सेशन.

आपल्या लोकांना '**जस्टिस ऑफ धि पीस**' हा अत्यंत सन्माननीय हुद्दा मिळविण्याला **नाना** सर्वस्वी कारण होत. त्या वेळीं प्रथम जे बारा एतद्देशीय **जे. पी.** केले, त्यांत **नानाही** एक होते. हा हुद्दा मिळतांच एतद्देशियांस '**पेटी सेशन**' मध्यें बसण्याचा अधिकार सहज लाभला. त्या वेळीं प्रत्येक गुरुवारीं सिनिअर म्याजिस्ट्रेटच्या कचेरींत '**पेटी सेशन**' भरत असे. त्यांत सिनिअर

---

१ **रॉबर्ट ब्रूस** ह्यांची देखील अशीच गोष्ट आहे. ह्यानें एका कोळ्याला आपलें घर बांधण्याची खटपट सहा वेळ पुनः पुनः करतांना पाहिलें; आणि सातव्यानें, त्याला यश आल्याचें त्यांच्या दृष्टीस पडलें. तेवढ्यावरून त्याला बोध मिळून देशहिताच्या कामीं उद्योग करण्याची मोठी उमेद आली आणि तिच्या योगानें त्या महत्कार्यांत त्यांचे मनोरथ सिद्धिस गेले.

म्याजिस्ट्रेट, एक युरोपियन जे. पी. आणि एक एतद्देशीय जे. पी. असे तिघेजण बसून गुंतागुंतीचे फौजदारी खटले पहात असत. या सेशन मध्यें नानानीं आपली लौकर छाप बसविली. आणि—

'हेम्नः संलक्षते ह्यग्नौ विशुद्धिः शामिकापिवा'

ह्या न्यायानें त्यांच्या गुणांचें शुद्ध तेज प्रकाशीत झालें. खटल्याचा निकाल सांगतांना त्यांचें चातुर्य आणि मुत्सद्देगिरी पाहून मोठमोठे सरकारी अमलदार त्यांची वाहवा करीत; पुढें पाळीप्रमाणें सेशन मध्यें बसण्याचा अधिकार दुसऱ्या जे. पी. कडे जावयाचा, परंतु त्यांचें न्यायचातुर्य पाहून सरकारानें त्यांना कैक वेळां त्याच जागेवर पुनःपुनः नेमिले.

1. He (Mr. Jagannath Sankarsett) was one of the first native Justices of the Peace, and in that capacity, when first appointed to take his turn at presiding at the Petty Sessions, he discharged the duties of his office in a highly satisfactory manner. When the term of office expired, he was again nominated.

A. R. Scoble


(५) मुंबई म्युनिसिपॅलिटी.

जिहीं आपुल्या सर्व प्रयत्नें ।
पराचे क्लेष परिहरणें ॥
श्रमोनी पुढल्या सुख दावणें ।
तो एक धन्य संसारीं ॥

मुक्तेश्वर.

नाना जे. पी. झाले त्याचवेळीं **शहरसुधारणेची** पूर्ण वहिवाट बदलून **'म्युनिसिपल कमिशन'** नेमण्यांत आलें. त्यांत **नानां**ची योजना होती.

मुंबई म्युनिसिपॅलिटी बद्दलचा कारभार केव्हा व कसा अस्तित्वांत आला, ह्या संबंधानें आपण येथें थोडा विचार करूं. ह्या करितां आपणांस थोड्या मागच्या काळाकडे वळलें पाहिजे. फार प्राचीनकाळीं **मुंबईबेटाची** रचना व हल्लींची **मुंबई** ह्या संबंधानें विचार करूं लागलों तर आपलें मन आश्चर्यानें अगदीं थक्क होऊन जाईल, यांत किमपीही संशय नाहीं. कुलाब्याच्या टोंकापासून तों थेट माहिमच्या उत्तर सीमेपर्यंत दक्षिणोत्तर जमिनीचा जो भाग आपण पाहतों, तसा कांहीं पूर्वींच्या काळीं नव्हता. त्या वेळीं **मुंबईबेट** हें अनेक लहान लहान बेटें मिळून बनलें होतें. मध्यें मध्यें समुद्राच्या पाण्याच्या खाड्या होत्या. ह्मणजे एका बेटांतून दुसऱ्या बेटांत होडीच्या साह्यावांचून कांहीं जातां येत नव्हतें. ह्या खेरीज सदरहू बेटांच्या भोंवतालीं दलदलीची जागा असे. आसपास खाजणें असल्यामुळें हवा सर्द व रोगी होती, आणि येथें वस्ती करणाऱ्या लोकांत अनेक तऱ्हेच्या रोगांचा प्रादुर्भाव होत असे ! आणि जमीन



सन १६७२ मधील जुन्या मुंबईबेटाचा नकाशा.

चित्रकारः–
रा. वि. मा. पितळे.

पान ११२

बाँबे आर्ट प्रिंटिंग वर्क्स.

चांगली नसल्यामुळें धान्य वगैरे फार पिकत नसे. हवाही कांहीं आरोग्यकारक नव्हती. वरील बेटावर कोळी, किंवा मच्छिमार लोक, पांचकळशे, सुतार अशाच लोकांची विशेष वस्ती असे.

सन १६६१त **पोर्तुगाल** आणि **इंग्लड** ह्या दोन देशांच्या राज्यघराण्यांचा जेव्हां शरीरसंबंध घडून आला, त्या वेळीं **मुंबईबेट** हें पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांत होतें. पोर्तुगालच्या राजानें मुंबईबेट हें **इंग्लंडच्या दुसऱ्या च्यार्लस** राजास लग्नांत आंदण ह्मणून दिलें. तेव्हां पासून ह्या बेटाची पुढें पुढें नवली पालटत चालली. आणि त्याच्या उदयकाळास प्रारंभ झाला. ह्या संबंधाचा पूर्वीचा इतिहास कै० **रा. गोविंद नारायण माडगांवकर** ह्या विद्वान् गृहस्थानें १८६३ सालीं प्रसिद्ध केलेल्या '**मुंबईचें वर्णन**' नामक पुस्तकांत साद्यंत वर्णन केलेला आहे, तो जिज्ञासूंनीं अवश्य अवलोकन करावा.



रा. गोविंद नारायण माडगांवकर.

तात्पर्य पूर्वींच्या काळांत व हल्लींच्या मुंबईच्या परिस्थितींत कालमाहात्म्यानें बरेंच अंतर पडून गेलेलें आहे. वरील हकीकत लिहिण्याचें कारण पूर्वींच्या **मुंबईबेटाची** आरोग्याच्या बाबतींत स्थिति कशी होती, हें आमच्या वाचकांच्या निदर्शनास आणण्याचा आमचा प्रयत्न होता.

व्यापारवृद्धीमुळें या शहराची जसजशी भरभराट होत गेली, तसतसे अनेक देशांतून व **हिंदुस्थानां**तील इतर शहरांतून लोक इकडे येऊन स्थायिक राहूं लागले. त्या कारणामुळें इकडे लोकवस्ती भराभर वाढत चालली. आणि ह्या करितांच शहराच्या आरोग्यरक्षणाचें काम सरकारास हातीं घेणें भाग पडलें.

सन १७९२ त इंग्लंडांतील **तिसऱ्या जॉर्ज** राजाच्या कारकीर्दींत ह्या गोष्टींस कांहींसें स्वरूप येऊं लागलें. त्या सुमारास **बंगाल्यां**तील **गव्हर्नरजनरल** यांस जे. पी. नेमण्याचा अधिकार प्राप्त झाला. आणि त्यांजकडे शहराच्या आरोग्यरक्षणाची व्यवस्था करण्या करितां त्यांना अधिकार मिळाला. त्या नंतर मध्यंतरीं कांही काळ लोटला. अखेरीस १८४५ त म्युनिसिपलच्या कारभारास अधिक चांगलें स्वरूप येऊं लागलें आणि '**कोर्ट ऑफ पेटिसेशन**' ही संस्था सरकारच्या आश्रयाखालीं स्थापन झाली. तींत दोन जस्टिसिस ऑफ धि पीस त्यांस पोलिस म्याजिस्ट्रेटचा अधिकार देऊन म्युनिसिपॅलिटीचा कारभार चालविण्याचा अधिकार दिला. आणि त्यांस म्युनिसिपॅलिटीच्या पैशाचा व्यवहार करण्याची पूर्ण मुखत्यारी मिळाली. पुढें '**बोर्ड ऑफ कांझर्व्हन्सी**' ही संस्था अस्थित्वांत आली. ह्या संस्थेनें १८५० त घरपट्टी वगैरे बसविण्याची व्यवस्था करून शहरसुधराईची बरीच खटपट केली. कालांतरानें शहरची जसजसी वस्ती वाढत गेली, तसतशी शहरसुधराईची अधिक चांगल्या तत्वावर व्यवस्था झाली. मि. **कॉनिबियर** ह्या हुषार इंजिनिअरच्या व्यवस्थेखालीं **विहाड**च्या तलावाची सर्वे करवून पाण्याचे लोखंडी नळ घालून शहरांत १८६९ सालीं पाणी आणलें. याच सुमारास प्रसिद्ध म्युनिसिपल कमिशनर मि. **आर्थर क्रॉफर्ड** हे उदयास आले. आणखी तेव्हांपासून म्युनिसिपल कारभाराची अनेक

बाबतींत दिवसेंदिवस भरभराट होत गेली. त्याबद्दलची साद्यंत हकीकत येथें देतां येत नाहीं, तरी त्यावेळीं म्युनिसिपल कमिशनमध्यें नानांनीं केलेल्या कामगिरीबद्दल मि. **दिनशा एदलजी वाच्छा** यांनीं नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या **'राइस ॲन्ड ग्रोथ ऑफ बाँबे म्युनिसिपल गव्हर्नमेंट'** या ग्रंथांत ते खालीं लिहिल्याप्रमाणें ह्मणतात—

'× × × Looking calmly across the interval of 48 years, it is indeed a matter of the greatest satisfaction to know that in 1864–65, there were in the Council of the Bombay Government; men in power and responsibility far sighted and braod minded enongh to forecast the future expansion and growth of the City, even then fast rising to commercial eminence, and provide for it accordingly. Statesmen like Sir Bartle Frere as Governor, and Sir William Mansfield as Commander-in-chief (afterwards Lord Sandhurst) a soldier statesman of exceptional ability and strength of character, supported by an equally able and sagacious non-official personality as Mr. Walter Cassels and other non-official members of the Local Legislative Council, of whom the most prominent and progressive was the Honorable Mr. Jagannath Sankarsett, whose majestic and dignified Maratha figure in marble adorns the vestibule of the north-eastern wing of the Town hall. It was owing to such official and non-official statesmen, in the Council, that the Act so far reaching in its effect on the future well-being city, was passed, an Act, we repeat, which even after well nigh the lapes of a half a century still substantially forms the general ground work on which the Muuicipal Government is at present carried on.'

'गेल्या जवळ जवळ अर्ध शतकापूर्वीं ह्मणजे १८६४–६५ सालांत सरकारच्या कौन्सिलांत मुंबई शहराची वाढ होण्याच्या बाबतींत फार दूरदृष्टि, दिलदार, वजनदार आणि जबाबदार अशा दर्जाचीं माणसें निर्माण होऊन गेलीं, ह्या गोष्टीकडे सूक्ष्मावलोकन केलें ह्मणजे मोठें कौतुक वाटतें. याखेरीज त्यावेळीं वृद्धि पावणारें व्यापाराचें महत्त्व वाढविणारांपैकीं मुत्सद्दी असे **मुंबईचे** गव्हर्नर **सर बॉर्टल फ्रिअर** आणि सर **उइलिअम म्यान्सफील्डसारखे** सेनानायक (जे पुढें **लॉर्ड स्यांढर्स्ट** ह्या नांवानें प्रसिद्धीस आले) आणि, तितक्याच योग्यतेचे असलेले मि. **वाल्टर क्यासलूस** आणि इतर सभासद यांच्यांतील अत्यंत प्रमुख आणि प्रगमनहितैषी **नामदार जगन्नाथ शंकरशेट,** ज्यांचा संगमरवरी दगडाचा भव्य व विशाळ पुतळा **टाऊन हॉल**च्या पश्चिम भागांत विराजित झाला आहे, असे सरकारास सहाय्य करणारे बिनसरकारी सभासद कौन्सिलांत होते. सांप्रत आपण **मुंबई म्युनिसिपॉलिटी**चा जो भव्य पसारा आणि प्रगति पाहतों त्याची मांडणी करण्याचें सर्व श्रेय त्यावेळीं कौन्सिलांत असलेले, वर उल्लेख केलेले सरकारी आणि बिनसरकारी सभासद यांसच आहे. त्यांनीं ज्या तत्वावर म्युनिसिपॅलिटीच्या कामाची मांडणी केली, त्याच तत्वांचें आज पन्नास वर्षें अनुकरण करण्यांत येतें, व त्यामुळेंच हा म्युनिसिपल कारभार इतका संतोषकारक चालला आहे.'

असो, म्युनिसिपल कमिशन नेमून त्यांत **नानां**ची योजना झाली. हें वर सांगितलेंच आहे. त्यावेळीं **नानांनीं मुंबईच्या** शहरवासी जनाच्या आरोग्यार्थ आणि सुखवृद्ध्यर्थ किती प्रशंसनीय प्रयत्न केले होते याची वाचकांस सहज कल्पना होईल.

तात्पर्य, आमच्या चरित्रनायकानें ह्या बाबतींत लोककल्याणाचें जेवढे जेवढे विषय पुढें आले, त्या सर्वांत अगदीं मनःपूर्वक झटून लोकसेवा बजाविली[1], आणि लोकांकडून धन्य ह्मणवून घेतलें.

---

1. In all matters pertaining to courtesy, to the commemoration of public worth, philanthropy, to patriotism, to the relief of distress near and afar off, and to the advancement of the general improvement of this locality and its neighbourhood, he was ever ready to give most efficient aid, both by the personal advocacy and liberal contributions. He was constantly called upon to take a prominent part in all public meetings held in the Town Hall; and though not in any sense a man of obtrusiveness, he did not fail to give a generous response to the numerous calls which were addressed to him.

Rev Dr. Wilson.

(६) धि बॉम्बे ॲसोसिएशन.

पूर्वी राजकारणांत लक्ष देण्यास आपणास कारण नाहीं, असें सगळ्या लोकांस वाटत असे; आतां असें वाटूं लागलें आहे कीं, साधारण लोकस्थितीविषयीं सरकारास योग्य सूचना करणें हें लोकांचें कर्तव्य आहे. सार्वजनिक हिताहिताचे प्रश्न कौन्सिलांत विचारतात. त्यांचीं उत्तरें मिळतात. आणि त्यांचा उपयोग होतो.

वि. को. ओक.

इ. स. १८९२च्या जुलै महिन्याच्या पांचव्या तारखेस मुंबई शहरांत '**धि बॉम्बे असोशिएशन**' या नांवाची एक संस्था स्थापन झाली[१]. आणि ही संस्था स्थापन करण्याची चळवळ करणारांत **सर जमशेटजी जिजीभाई, श्रीमंत जगन्नाथ शंकरशेट, नौरोजी फर्दुनजी,** आणि **दादाभाई नौरोजी** ही मंडळी प्रमुख होती. तिचा

---

१ सनदशीर पद्धतीनें लोकहिताची बाजू उचलून तिचा उत्कर्ष करण्याचे प्रयत्न करणें, हा ह्या संस्थेचा उदात्त हेतु संस्थेच्या चालकांनीं आज तागायत चालविला आहे. जरूर वाटेल तेव्हां जाहीरसभा भरवून सार्वजनिक कामाची चर्चा करणें, **प्रांतिक** व **हिंदुस्थान सरकार**ला व **ब्रिटिश पार्लमेंट**ला वेळोवेळीं लोकपक्षाच्या वतीनें निरनिराळ्या महत्वाच्या प्रश्नासंबंधी अर्ज करणें, वगैरे अनेक साधनांनीं ही संस्था आपल्या हेतूंच्या सिद्धयर्थ झटत आहे. १८८५ सालीं **इंग्लडांत पार्लमेंट**ची जी निवडणूक झाली, त्याप्रसंगीं मि. (आतां सर) **नारायण गणेश चंदावरकर** यांस हिंदी लोकांची स्थिति ब्रिटिश जनतेपुढें निवेदन करण्यासाठीं आपल्या तर्फे मुद्दाम पाठविलें. **मुंबईस पहिली राष्ट्रीय सभेची** बैठक बसविण्याचें काम याच संस्थेनें

उद्देश असा होता कीं, इलाख्यांतील रयतेचीं दुःखें निवारण करणें, किंवा प्रजेस कोणत्याही तऱ्हेचा उपद्रव होत असला, तर त्याची पूर्ण रीतीनें चौकशी करून ती सरकारच्या कानावर घालणें आणि ज्या योगानें लोकांचें कल्याण होईल, त्या बद्दल विचार करून जरूर पडल्यास सरकाराच्या अनुमतानें **वरिष्ट** किंवा **विलायत** सरकारा-पर्यंत जाणें इत्यादि सरकार आणि प्रजा या दोघांमधील मध्यस्थी करणें हा ह्या संस्थेचा मुख्य उद्देश होय.

आपल्या शिरावर घेतलें. १८८८ सालच्या म्युनिसिपल बिलांत लोकांच्या खऱ्या गरजांचा समावेश होण्याकरितां या संस्थेनें केलेली चळवळ चांगलीच फलद्रूप झाली. त्यासालीं पास झालेला हल्लींचा **म्युनिसिपलअॅक्ट** या संस्थेच्या धोरणी चळवळीचेंच फळ होय. १८८९ सालीं ना. **न्यायमूर्त्ति तेलंग** यांच्या जागीं श्रीयुत **चंदावरकर** हे संस्थेचे सेक्रेटरी झाले. याच सालीं **राष्ट्रीयसभे**च्या प्रसंगीं असोसिएशननें प. वा. **ब्रॅडलॉ** यांस मानपत्र दिलें. १८९२ सालीं **लॉर्ड लॅन्सडौन** यांच्या कारकीर्दींत पास झालेल्या **लेजिस्लेटिव्ह कौन्सिल अॅक्ट**ला मूर्त्तस्वरूप येण्यास याच संस्थेचे श्रम विशेषतः कारणीभूत झाले, असें म्हटलें पाहिजे. १८९५ सालीं पुण्यास झालेल्या जंगीं काहुरांतून **राष्ट्रीयसभा** पार पडण्यास पुण्याच्या कमेटीला या संस्थेचें चांगलेंच सहाय्य झालें. १९०२–३ सालीं **बॉम्बे लँड रेव्हिन्यू कोड अमेंडमेंट**चें पिछेहाटीच्या धोरणाचें बिल **लेजिस्लेटिव्ह कौन्सिल**मध्यें आलें, त्यावेळीं सरकाराला अर्ज करून व ना. **सर फेरोजशहा मेथा** यांच्या अध्यक्षतेखालीं जंगी जाहीरसभा भरवून या संस्थेनें चांगलीच चळवळ केली. १९०४ सालीं **सर हेनरी कॉटन** यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईस भरलेल्या **राष्ट्रीयसभे**ची बैठक व सरकारा-कडूनही पाठबळ मिळालेलें औद्योगिक प्रदर्शन अत्यंत यशस्वी होण्याला याच संस्थेचे परिश्रम कारण झाले. याच सालीं **लार्ड कर्झन** साहेबांचें **युनिव्हर्सिटी अॅक्ट अमेंडमेंट बिल** व **ऑफिशियल सीक्रेट बिल**

वरील संस्था स्थापन झाली, त्या दिवशीं एक मोठी जाहीर सभा **एल्फिन्स्टन विद्यालया**मध्यें भरली होती. त्या प्रसंगीं आमच्या चरित्रनायकानें सभेचें अध्यक्षस्थान सुशोभित केलें होतें. त्यावेळीं त्यांनीं केलेलें प्रास्ताविक भाषण फारच मुद्देसूद होतें. त्यांनीं आपल्या भाषणांत संस्थेच्या ध्येयाचा चातुर्यानें जो उल्लेख केला, त्यावरून त्यांची लोकहितैकदृष्टि आणि सरकाराविषयीं प्रेम स्पष्ट व्यक्त होत आहेत. ते ह्मणाले, ' या देशांतील रयतेचें कल्याण करावें अशी दयाळू **इंग्रज**सरकाराची फार इच्छा आहे. आणि त्याप्रमाणें सरकाराचा प्रयत्नही चालू आहे. परंतु आमचीं अशीं कांहीं दुःखें आहेत कीं, तीं सरकारच्या नजरेस येत नाहींत. करितां अशीं दुःखें सरकारच्या दृष्टोत्पत्तीस आणून द्यावीं आणि रयतेच्या सुखाकरितां सरकारास हरएक गोष्टींत सहाय्य करावें, ह्याच उद्देशानें ही संस्था स्थापन केली आहे. '

यांविरुद्ध या संस्थेनें अर्जद्वारां सरकाराला लोकमत निदर्शित केलें. १९०५ सालीं **ब्रिटिशजनते**समोर **हिंदुस्थान**ची खरी स्थिति निवेदन करण्यासाठीं या संस्थेनें **नामदार गोखले** यांस आपल्या तर्फे **इंग्लंडांत** पाठविलें. १९०९ सालीं **मोर्ले**साहेबांनीं **हिंदीकौन्सिला**विषयीं सुचविलेल्या सुधारणांबद्दल त्यांचें ह्या संस्थेनें जाहीर अभिनंदन केलें. अशा रीतीनें ही अत्यंत उपयुक्त संस्था आपलें कर्तव्य निःस्वार्थतेनें व लोकहितैकदृष्टीनें चोख बजावीत आली आहे. ही **अपोलो बंदरावर रेडिमनीबिल्डिंग**मध्यें असून तिचें आजपर्यंतचे महत्वाचे व राजकीय विषयांवर बहुत ग्रंथ असलेलें एक मोठें पुस्तकालय आहे.

ह्या संस्थेचे **नाना** हे अध्यक्ष * असून डॉ. **भाऊ दाजी** व श्री. **विनायकराव जगन्नाथ शंकरशेट** हे चिटणीस होते. ह्या संस्थेला **सर जमशेटजी जिजिभाई, श्री. जगन्नाथ शंकरशेट, सखाराम लक्ष्मणजी, धनजीभाई नसरवानजी कामा** वगैरे श्रीमंत लोकांनीं द्रव्यद्वारां बरीच मदत केली; व कांहीं इतर मंडळीनींदेखील यथाशक्ति द्रव्यसहाय्य केलें.

---

(७) धि बाँबे ब्रँच आफ् धि रॉयल एशियाटिक सोसाइटी.

वरील संस्थेची स्थापना सन १८०४ मध्यें झाली. हिचे संस्थापक सुप्रिम कोर्टामध्यें **सर जेम्स मॉकिन्टाश्** या नांवाचे मोठे न्यायी सहनशील व चतुर असे न्यायाधीश होते. त्यांनीं एतद्देशीय लोकांच्या कल्याणाकरितां व ज्ञानवृद्धीकरिता एक मोठें पुस्तकालय स्थापन केलें. मूळ इंग्लंडमध्यें वरील नांवाची संस्था प्रथम स्थापन झालेली होती, तिचीच वरील संस्था ही एक शाखा होय. ह्या पुस्तकालयांत इंग्रजींत अनेक विषयांवर विद्वान् लोकांनीं लिहिलेले बहुत ग्रंथ आहेतच.

---

* He was the head of the Bombay Association,—a body, which, although it did not possess much influence now, as the natives were better able to express their feelings through the medium of the Press, yet possessed great influence, and it redounded to the credit of Mr. Jagannath Shankarsett, that he was thus able to guide the fiery spirits of Young Bombay and to conduct the Association without its incurring ridicule.

A. R. Scoble.

परंतु प्राच्य भाषांतील संस्कृत, मराठी, गुजराथी, आरबी, हिंदुस्थानी, कानडी वगैरे ग्रंथ हजारों आहेत. ह्या पुस्तकालयाचे अनेक विद्वान् व श्रीमंत गृहस्थ सभासद आहेत. प्रसिद्ध विद्वद्वर्य **बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर** हेही एक सभासद होते. आणखी हिच्या सुरवातीस हिचेच वर म्हटलेले संस्थापक **सर जेम्स मॉकिनटाश्** हे बरींच वर्षें अध्यक्ष होते. त्यांच्या पाठीमागून प्रसिद्ध **डॉक्टर उईल्सन** हे बरींच वर्षें अध्यक्ष होते. व प्रसिद्ध भिषग्वर्य **डॉ० भाऊ दाजी** हे उपाध्यक्ष असून **डॉ० बर्डवुड** हे सेक्रेटरी होते.

आमच्या चरित्रनायकाचा वरील संस्थेशीं वीस वर्षांपेक्षां अधिक संबंध होता. त्यांनीं आपल्या नेहमींच्या इतर सांप्रदायाप्रमाणें ह्याही संस्थेस पूर्ण रीतीनें मदत केली. ते संस्थेचे सभासद झाल्यापासून त्यांनीं आमरणांत तिची सेवा बजाविली. इतकेंच केवळ नव्हे, तर त्यांनीं सदरहू संस्थेला १८६९ सालांत ५००० रुपयांची मोठी देणगी दिली. त्यांनीं दिलेल्या देणगीचा विनियोग वरील संस्थेच्या पुस्तकालयास '**न्याच्यरल हिस्टरी**'चे अति महत्वाचे व मौल्यवान् ग्रंथ घेण्याकडे करून **जगन्नाथ शंकरशेट लायब्ररी** या नांवाची एक स्वतंत्रच लायब्ररी वरील पुस्तकालयास जोडलेली आहे.

वरील **एशिॲटिक सोसायटीचें** सदर पुस्तकालय मुंबईंतील टाऊन हॉलच्या इमारतीच्या उत्तरेकडच्या भागांत आहे. तें फार प्रेक्षणीय असून तें जिज्ञासूंनीं अवश्य जाऊन पहावें.

---

(८) ऑग्रिहॉर्टिकल्चरल् सोसाइटी ऑफ वेस्टर्न इंडिया, आणि जिऑग्रफिकल् सोसाइटी.

वरील दोन्ही संस्थांचा उद्देश अनुक्रमें (१) एतद्देशीय माळ्यांस बागबागाइतीचें काम चांगल्या प्रतीचें शास्त्रीय पद्धतीनुरूप शिकवून त्यांत त्यांस तरबेज करणें आणि (२) आपल्या भरत खंडांत ठिकठिकाणीं जमिनीसंबंधानें कांहीं फेरबदल झाले असल्यास त्याचें वर्णन करणें आणि अनेक प्रकारच्या नवीन धातूंच्या खाणी वनस्पति, जनावरें वगैरेंचा पूर्ण शोध करून त्यांचा वृत्तांत लिहून तो सभेपुढें वाचणें, हा होता. पहिल्या संस्थेच्या स्थापनेमुळें आपल्या देशांत युरोपखंडांतल्या अनेकविध वनस्पति, व फळ-फळावळ होऊं लागली. कोबी, अलकोल, सलगम, सालिड, फ्रेंचबीन्स, पारस्निप, लूसर्न इत्यादि फळकंदाचें बीज इकडे उत्पन्न होऊं लागलें. त्याचप्रमाणें कृषिकर्मास लागणारीं हरएक प्रकारचीं आयुधें यूरोपच्या धर्तीवर प्रचारांत आणून त्यांचा इकडे उपयोग करूं लागल्यामुळें जमिनीच्या मशागतींत अनेक प्रकारच्या सुधारणा होऊन त्यापासून आपल्या लोकांस पुष्कळ फायदा होऊं लागला. एतावता कृषिकर्मांत व शिल्पशास्त्रांत बरीच क्रांती घडून आली.

वरील दोन्ही संस्थांचे **नाना** हे मूळ उत्पादकांपैकीं एक असून ते आमरण त्यांचे अध्यक्ष होते. त्या दोन्ही संस्थांच्या भरभराटीस त्यांनीं बरेच परिश्रम करून त्यांस वेळोवेळीं उदारबुद्धीनें द्रव्यसाह्य केलें.

(१) व्हिक्टोरिया अँड आल्बर्ट म्युझिअम् अथवा सर्वपदार्थसंग्रहालय.

वरील संस्थेचा उद्देश असा होता कीं, १८५७ सालच्या शिपायांच्या बंडाची भयंकर लाट ओझरल्यानंतर **कंपनीसरकार**च्या हातांतून आपल्या परमपूज्य कै० **महाराणीसाहेब व्हिक्टोरिया** यांनीं हिंदुस्थानची राज्यव्यवस्था आपल्या हातीं घेतली. ह्या गोष्टीचें आपणास चिरकाल स्मरण रहावें ह्मणून आणि आपल्या लोकांची राजनिष्ठा प्रदर्शित व्हावी ह्मणून या शहरांत एक **सर्वपदार्थसंग्रहालया**ची स्थापना करावी व त्याच्या आसपास एक विस्तीर्ण बगीचा करावा असें ठरून मोठमोठे लोकांची एक मंडळी स्थापन झाली. तिचे श्री. ना. **जगन्नाथ शंकरशेट** यांस अध्यक्ष नेमलें. वरील मंडळीची सभा टौनहॉलांत सन १८५८ च्या डिसेंबरच्या १९ तारखेस भरली होती. आणि डॉ. **बर्डवुड** आणि डॉ. **भाऊ दाजी** यांस तिचे चिटणीस नेमले. वरील संस्थेस खुद्द **नानांनीं** पांच हजार रुपये बहाल केले व इतर पारशी, वाणी, वगैरे धनिक गृहस्थांनीं आपल्या शक्त्यनुसार तीस द्रव्यद्वारां मदत केली, पुरेशी वर्गणी जमल्यानंतर वरील विशाळ इमारतीचा कोणशिळा बसविण्याचा समारंभ मुंबई इलाख्याचे त्या वेळचे लोकप्रिय गव्हर्नर **सर बार्टल फ्रिअर** यांनीं ता. १९ नव्हेंबर १८६२ या दिवशीं साजरा केला. त्या प्रसंगीं सभेचे अध्यक्ष **ना. जगन्नाथ शंकरशेट** यांनीं एक उत्कृष्ट भाषण केलें. त्यावर गव्हर्नरसाहेबांनीं त्यांच्या राजनिष्ठेबद्दल मोठी स्तुति केली. मग कोणशिळा बसवि-

ण्याचा विधि साजरा केला. त्या प्रसंगीं लोकसमुदाय व प्रेक्षक वर्ग बराच जमला होता. त्या दिवशीं लोकांची बरीच गर्दी जमली होती. कोणशिळा बसवितेवेळीं आधीं तिच्या खालीं एक तांब्याची मजबूत पेटी घालून तींत त्या दिवसाच्या प्रत्येक वर्तमानपत्राची एक एक प्रत घातली होती. आणि मुंबईतील सरकारी चालू नाणें व समारंभासंबंधाचे कागदपत्र घातले होते. त्या पेटीवर एक लेख कोरलेला आहे, तो येणेप्रमाणें:—

सन १८६२ नव्हेंबर १९ बुधवार.

महाप्रतापी **राणी व्हिक्टोरिया** हिच्या राज्याच्या पंचविसाव्या वर्षीं **हिज् एक्सेलन्सी धि रैट आनरेबल् धि अर्ल आव्ह एल्जिन्** आणि **किंकरडैन** कै. टी. जी. जी. सी. बी., के. एस्. ऐ. हे भरतखंडाचे **व्हैसराय** आणि **गव्हर्नर जनरल** असून **हिज एक्सेलन्सी सर हेनरी बार्टल एडवर्ड फ्रिअर**, के. सी. बी., मुंबईचे **गव्हर्नर** यांनीं **व्हिक्टोरिया** आणि **आलबर्ट पदार्थसंग्रहालया**च्या पायाचा दगड बसविला, सन १८५८ नवेंबर, या दिवशीं **महाराणीनें** भरतखंडाचें राज्य आपल्या स्वाधीन करून घेतलें, असा जाहीरनामा लावला होता. त्या दिवसाच्या स्मरणार्थ आणि आपल्या राजनिष्ठाप्रदर्शनार्थ मुंबापुरस्थ लोक हे बांधीत आहेत.

धि आनरेबल जगन्नाथ शंकरशेट सर्व पदार्थसंग्रहालय व उपवनालय यांच्या व्यवस्थापक मंडळीचे अध्यक्ष, **भाऊ दाजी** इस्कायर, जी. जी. एम्. सी. आणि जी. सी. एम्. **बर्डवुड्** इस्कायर, एम्. डी. हे आनररी जाइंट सेक्रेटरी होते.

विलियम लौडन इस्कायर, मुंबईचे शेरिफ **विलियम ट्रेसी.**

शिल्प शास्त्री,

ह्या दगडावर लेख पुढील लिहिला आहे.

हा

व्हिटोरिया आलबर्ट संग्रहालयाचा पायाचा

मुख्य दगड

तारिख १० नवेंबर १८६२ रोजीं

मेहरबान सर **एच्. बी. ई. फ्रिअर** के. सी. बी.

मुंबईचे गव्हर्नर यांनीं घातला आहे.

वरील समारंभाच्या प्रसंगाचा घेतलेला फोटो (चित्र) हा पुढील पानावर दिलेला आहे. सदरहू प्रसंगीं **नानांनीं** दाखविलेल्या चातुर्याची 'आख्यायिका' प्रकरणांत 'मान घ्यावा तो असा घ्यावा.' या सदराखालीं एक गोष्ट लिहिलेली आहे, ती जिज्ञासूंनीं अवश्य पहावी.



व्हिक्टोरिया आणि आलबर्ट म्युझिअम या इमारतीची कोणशिळा बसविण्याच्या समारंभाचें चित्र. कोणशिळेच्या डाव्या अंगास **नाना** अंगांत पायघोळ अंगरखा घालून उभे आहेत आणि डावे अंगास **सर बॉर्टल् फ्रिअर**, मुंबई इलाख्याचे गव्हर्नर उभे आहेत. एका जुन्या चित्रावरून.

पान १२६

बॉबे आर्ट प्रिंटिंग वर्क्स.

(१०) फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूट.

मुंबई प्रांतांत साधारणतः दहा वर्षांनीं अवर्षण पडतें, असा अदमास आहे. अशा प्रकारचें अवर्षण सन १८२२ त पडलें होतें. शहरांतल्या विहिरींत भर श्रावण महिन्यांत पाणी सुमारें हात दोन हात होतें. **धोबीतळ्याचें** पाणी सारें आटून जाऊन तें तळें अगदीं कोरडें ठणठणीत पडलें होतें; ह्या कारणास्तव त्यांत दोन मोठ्या विहिरी खणाव्या लागल्या. त्यांत दैवयोगानें उत्तम गोडें पाणी लागलें. ह्यावरून त्यास **साखरतळें** असें नांव पडून गेलें. पुढें **शेट फ्रामजी कावसजी** ह्या नांवाच्या एका धनाढ्य पारशी गृहस्थानें पांच पंचवीस हजार रुपये खर्च करून चांगल्या रीतीनें तें बांधून काढलें; म्हणून सरकारनें ह्या तळ्यास '**फ्रामजी कावसजीचें तळें**' असें नांव ठेवलें. परंतु '**धोबी तळें**' हें नांव पूर्वीपासूनच प्रचारांत असल्यामुळें तेंच नांव आजदीनपावेतों वहिवाटींत होतें. होतें म्हणण्याचें कारण हें तळें मुंबई म्युनिसिपालिटीनें सन १९१३ सालांत त्यांत भरणी टाकून तें साफ बुझवून टाकलें.

वरील परोपकारी पारशी गृहस्थ हे जेव्हां इहलोक सोडून गेले, तेव्हां ह्यांचें चिरकाल स्मरण रहावें म्हणून कांहीं गृहस्थांनीं वर्गणी जमवून तीस चाळीस हजार रुपयांची रकम केली. आणि ह्या तळ्यालगतच एक सार्वजनिक वाडा बांधिला. ह्या वाड्यास '**फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूड**' असें नांव दिलें.

वरील प्रस्थावना करण्याचें कारण सदरहू वाड्याची कोणशिळा

आमचे चरित्रनायक **श्रीमंत जगन्नाथ शंकरशेट** यांनीं सन १८६२ च्या जानेवारी महिन्यांत बसविली. सदरहू प्रसंगीं मोठमोठे इंग्रज व एतद्देशीय लोक आले होते. व त्यांनीं वरील समारंभ मोठ्या थाटानें साजरा केला.

'**फ्रामजी कावसजी इन्‌स्टिटयूड**' हें मुंबई शहरांत एक नामांकित व उपयुक्त स्थळ आहे. ह्यांत मोठमोठ्या राजकीय, व सार्वजनिक, व इतर महत्त्वाच्या सभा, मिजलसी, गायनांचे जलसे, अनेक संस्थांचे बक्षीस समारंभ वगैरे होत असतात. ह्या इन्‌स्टिटयूच्या भव्य व शृंगारलेल्या दिवाणखान्यांत मध्यभागीं मरहूम शेट **फ्रामजी कावसजी** यांची ऑइलपेंटिंगची सुंदर तसबीर टांगलेली आहे. आणखी तिच्या दोहों बाजूस अनुक्रमें **सर जमसेटजी जिजीभाई बाटलीवाले,** ब्यारोनेट आणि **नामदार श्रीमंत जगन्नाथ शंकरशेट** यांच्या ऑइलपेंटिंगच्या सुंदर तसबिरी टांगलेल्या आहेत. त्यामुळें वरील दिवाणखान्यास एक अवर्णनीय शोभा आलेली आहे. आणि वर म्हटलेल्या कोणत्याही समारंभाच्या प्रसंगीं आपण हजर राहिलों, तर वरील सुंदर तसबिरी पाहून आपणास सदरहू परोपकारी व लौकिकवान् पुरुषांची स्मृति झाल्याशिवाय रहात नाहीं, आणि त्यांच्या परोपकारिक व धार्मिक कृत्यांचे आपणांस कौतुक वाटल्याशिवाय रहात नाहीं. इतकेंच केवळ नव्हे, तर आपल्यांत कांहीं काळामागें अशा प्रकारचीं नररत्नें होऊन गेलीं, हें पाहून आपणांस त्यांच्याबद्दल पूज्यबुद्धि उत्पन्न होऊन एक प्रकारचा अभिमान वाटतो.

---

(११) धि ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेल्वे.

आपल्या प्रजेचा जीव व मालमत्ता यांचें संरक्षण करण्याची आणि रयतेच्या सुखाची वृद्धि करण्याची जबाबदारी सरकारावर आहे. हें कर्तव्य सरकारास नानाविध प्रकारांनीं बजवावें लागतें. त्याचप्रमाणें लोकांच्या उपयोगार्थ सरकारानें अंगिकारलेल्या कामांचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. पोष्ट खातें, तार खातें, सेविंग ब्यांक, इत्यादि कृत्यें लोकहितार्थ होत. वाफेचीं यंत्रें हा देखील त्यापैकींच एक प्रकार आहे. आपल्या देशांत रेल्वे गाडी झाल्यास त्यापासून भारतवासी जनास सुख आणि लाभ यांची प्राप्ति होईल, असें वाटून आमचे चरित्रनायक **नाना, सर जमशेटजी जीजीभाई** आदि करून मुंबईंतील सुप्रसिद्ध नागरिक आणि कांहीं सरकारी अमलदार यांनीं सन १८४३ मध्यें एक दोन सभा भरवून आपला मनोदय जाहीररीतीनें लोकांस कळविला. आणि ह्या कामीं जनतेनें द्रव्यद्वारां मदत करून आपलें हित करून घ्यावें, असें दर्शविलें. ह्या कामीं जनतेचें मन तयार करण्यास पुढारी मंडळीस बराच त्रास पडला. शेवटीं ह्या गोष्टीचा बराच खल होऊन मुंबईंतील प्रसिद्ध नागरिकांनीं सरकारास अर्ज केला. तेव्हां सरकारानें द्रव्यसहाय्य करून एकंदर एक कोट पन्नास लक्ष रुपयांचें भांडवल उभें केलें. आणि रस्ता आखून कामाला सुरवात केली. हें काम नऊ वर्षेपर्यंत चाललें होतें. ह्या सडका कल्याणपर्यंत तयार झाल्यावर ह्या लोखंडी सडकेला ‘ **बॉंबे ग्रेट इस्टर्न रेल्वे** ’ असें नांव देण्यांत आलें. पुढें ता.

१६ एप्रिल १८५३ या दिवशीं सायंकाळीं पांच वाजतां **बोरीबंदर** स्टेशनवरून प्रथम गाडी चालू झाली. त्यादिवशीं सर्व सरकारी व सावकारी कचेऱ्या बंद ठेवल्या आणि हा समारंभ पाहण्यास गांवोगांवचे हजारों लोक मुंबईस जमले होते. गाडी चालू होण्यापूर्वीं दोन तीन तास **बोरीबंदर** पासून परळपर्यंत लोकांच्या झुंडीच्या झुंडी मौज पाहण्यास जमल्या होत्या. पांच वाजतां जेव्हां गाडी चालतांना लोकांच्या दृष्टीस पडली, तेव्हां तिचा वेग पाहून ते मोठे आश्चर्यचकित झाले आणि त्यांनीं वेळोवेळीं टाळ्या पिटून आपला हर्ष व्यक्त केला.

ह्या गाडीमध्यें मुंबईचे गव्हर्नर **लॉर्ड एलिफन्स्टन, नाना,** रेल्वेचे डायरेक्टर्स, मोठमोठे हुद्देदार, सरकारी कामदार व दुसरे शेटसावकार मिळून चारशें गृहस्थ बसले होते. ह्या गाडीला वाफेचीं तीन एन्‌जिन्स् लाविलीं असून श्रृंगारलेले वीस डबे लावले होते. ही गाडी सहा वाजण्याचे सुमारास ठाण्यास जाऊन पोंचली. त्या ठिकाणीं रेल्वे कंपनीच्या व्यवस्थापकांनीं आमंत्रित गृहस्थांचें योग्य आदरातिथ्य केलें. ही गाडी रात्रीं आठ वाजतां परत मुंबईस आली.

पुढें ह्या रेल्वेचा विस्तार वाढत गेल्यावर पहिलें नांव बदलून '**धि ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेल्वे**' असें नांव देण्यात आलें.*

* ह्या रेल्वेचा ता. २१ एप्रिल १८६३ त खंडाळ्यास 'बोरघांट' रेल्वेच्या रहदारीला सुरू झाला, असें जाहीर करण्याचा समारंभ झाला. त्या वेळचे मुंबईचे गव्हर्नर **सर हेन्री बार्टल एडवर्ड फ्रिअर,** के. सी. बी. यांच्या हस्तें झाला; त्या वेळीं भाषण करतांना गव्हर्नर साहेब म्हणाले, '× × × After some months of private discussion, the undertaking was formally brought before Government in a letter dated 13th July 1844, and signed by *Sir Erskine Persy* and seven other

वर नमूद केलेलीं अनेक सार्वजनिक कृत्यें किती महत्त्वाचीं आहेत आणि त्या सर्वांत आमच्या चरित्रनायकानें आपलें कर्तव्य किती उत्तम प्रकारें बजावलें याचा विचार, वाचक हो, तुम्हीच करा !

gentlemen, among whom you will find the name of our respected friend the Hon'ble *Jagannath Sankarsett*, then, as now, foremost in anything connected with the improvement of Bombay; and another of your present Directors, *Sir Jamshetjee Jejeebhoy* who has been connected with the undertaking from the beginning. I sincerely congratulate them on the completion of a work in which they took so early an intelligence, an interest, and I congratulate the Board on having among their number native gentlemen of so much wealth and consideration, whose presence at the Board during so many years forms some counterpoise to the ever-changing character of our community in general.'

भाग अकरावा.

परोपकाराचीं आणि धार्मिक कामें.

परोपकाराय सतां विभूतयः

सुभाषित.

शरीर परोपकारीं लावावें ॥ बहुतांच्या कार्यास यावें ॥
उणें पडों नेदावें ॥ कोणा एकाचें ॥ १ ॥
दुसऱ्याच्या दुःखें दुःखी व्हावें । परसंतोषें सुखी व्हावें ॥
प्राणीमात्रास मेळवून घ्यावें ॥ बऱ्या शब्दें ॥ २ ॥
नर देह हा स्वाधीन । सहसा नव्हे पराधीन ।
परंतु हा परोपकारीं झिजवून । कीर्तिरूपें उरवावा ॥ ३ ॥

रामदास.

थक होण्यासारखीं कोणी कार्यें केलीं, तर त्याबद्दल आपणास सौतुक वाटणें स्वाभाविकच आहे. त्यांतल्या त्यांत **नानांच्या** परिस्थितींतल्या माणसानें परोपकारार्थ शरीर झिजवावें व अनेकांडून धन्यवाद घ्यावेत, हें समाधानकारक होय. आपणांस हरघडीस असें दिसून येतें कीं, जो गर्भश्रीमंतींत वाढला, त्यास परदुःख केवळ सीतळ वाटतें, असा एक साधारण नियम आहे. दुसऱ्यास होणाऱ्या दुःखाची किंवा

संकटावस्थेची कल्पना अशा माणसांस क्वचित् होते. मग अशा दुःखितांस किंवा संकटग्रस्तांस मदत करणें लांबची गोष्ट होय! आणि स्वताची गांठ झिजवून लोकांच्या कार्यास येणें तर दुरापास्तच! कारण सारा जन्म श्रीमंतींत गेलेला, मग त्यास दुसऱ्याच्या दुःखाची कल्पना कशी व्हावी!! तथापि **नानांनीं** मात्र तसें कांहीं केलें नाहीं. त्यांना समजूं लागल्यापासून तों अखेरपर्यंत त्यांनीं तन मन धनें करून लोकांच्या उपयोगीं पडून **“ शरीर परोपकारीं लावावें। बहुतांच्या कार्यास यावें ॥ ”** ह्या **श्री समर्थांच्या** वचनाची सार्थकता केली, हें पुढें दिलेल्या अनेकविध गोष्टींवरून वाचकांस कळून येईल, तें अवलोकन करावें.

---

(१) भिवंडी येथें निघालेली श्रीविठ्ठलाची पालखी आणि हिंदु मुसलमानांची मारामारी.

अनाथाचा नाथ पतित पावन ॥
दीनाचें रक्षण करीतसे ॥

तुकाराम.

नानासारखा चतुर, शहाणा, परोपकारपरायण व दृढनिश्चयी पुरुष आढळणें विरळा! परदुःख विमोचन करण्याचा जणूं त्यांनीं विडाच उचलला होता, असें दिसतें. हस्तें परहस्तें आपल्या देशबांधवांची सुखसमृद्धि कशी होईल, या गोष्टीकडे त्यांचें सदा लक्ष असे. परहित करण्यासाठीं त्यांनीं आपलें तन मन धन सदा तत्पर ठेविलें

होतें. परंतु सर्वत्र गोष्टी केवळ द्रव्यबळावर अवलंबून असतात, असें नाहीं; तर कांहीं प्रसंगीं अक्कलहुषारी लढवून आणि स्वतांचें वजन खर्च करून एखादी गोष्ट साध्य करून द्यावी लागते. अशाच पैकीं पुढील गोष्ट असून त्याचा निकाल त्यांच्या हातून कसा गोड झाला, याविषयीं आतां आपण पाहूं.

ठाणें जिल्ह्यांत **भिवंडी** ह्मणून एक तालुक्याचा गांव आहे. या ठिकाणीं **मुसलमान** व **हिंदु** यांची मोठी वस्ती असून तेथें भाताचा व्यापार ही बराच चालतो. सुमारें ७९–८० वर्षांपूर्वीं ह्मणजे सन् १८३७ चे सुमारास चैत्र शुद्ध ११ स **श्रीविठ्ठलाच्या** पालखीचा छबीना वार्षिक वहिवाटीप्रमाणें गावांत फिरावयास निघाला. त्या वर्षीं मुसलमान लोकांची **इमामजयंती** ही त्याच वेळेस आली होती. गावांत **हिंदु** लोकांची पालखी मिरवत जात असतां व **मुसलमान** लोकांची ही एक फळी गांवांत फिरावयास निघाली होती. **हिंदूंच्या** पालखीची व **मुसलमान** लोकांच्या फळीची रस्त्यांत जेव्हां गांठ पडली, त्या वेळीं असें सांगतात कीं, **हिंदूंनीं मुसलमान** लोकांस जावयास वाट दिली असतां ते लोक एकदम **हिंदूंवर** घसरले. **मुसलमान** बंडखोरांत **आब्या तेली, मदन पिल्या, मोहिद्दीन हंडी, काजी पिल्या, दीन महमद लोखंडकुट्या**–लोहार–ही मंडळी प्रमुख होती. **हिंदू** लोक आधींच गरीब; त्यांत **श्रीविठ्ठलाच्या** पालखीसमवेत ब्रह्मस्वरूपाचें भजन करीत चालले असतां एकाएकीं आपणांवर हल्ला केल्यामुळें अगदीं गर्भगळित होऊन ते वाट मिळेल तिकडे पळूं लागले. पालखीवरही हल्ल्याचे प्रहार होतील म्हणून तीही त्यांनीं लांबविली. त्या गर्दींत मार म्हणून जो काय मिळाला तो हिंदूंस. ते आधींच भेकड, त्यांत त्यांजवर एकाएकीं हल्ला

झाल्यामुळें अगदीं गांगरून जाऊन आपणास मारहाण करणारांचा प्रतिकार करण्याचें त्या बिचाऱ्यांस कोठून सुचणार ? त्यांना पलायन करावें, हेंच काय तें विहित वाटून ज्यास जिकडे वाट मिळाली, तिकडे त्यानें पलायन केलें. **मुसलमान** लोकांनीं त्या गरीब **हिंदूंची** कणीक चांगली मऊ केली. पुढें बंडखोरांपैकीं **आब्या तेली** या नांवाचा मुसलमान होता. त्यानें प्रथम देवळाच्या दारावर लाथ मारून तें फोडून टाकिलें. मग **मुसलमानांनीं** देवालयांत प्रवेश केला. तेथें जाऊन मूर्त्ति वगैरे फोडूं लागले. वाटेंत गांठ पडली त्यावेळीं तंटा न व्हावा एतदर्थ **हिंदूंनीं** पोबारा केला. परंतु जेव्हां देवालयांत ते अविंध अघटित कर्में करूं लागले, त्यावेळीं जे थोडेसे हिंदु लोक देवालयांत होते, त्यांनीं जीवावर उदार होऊन **मुसलमानांस** देवळांतून घालविण्यास अथवा आपल्या मूर्त्ति फोडूं न देण्यास करवेल तितकी पराकाष्ठा केली. परंतु ती सर्व निष्फळ झाली. **मुसलमानांनीं हिंदूंचें** कांहीं एक चालूं न देतां देवालयांत सर्व मूर्त्ति फोडून त्या छिन्नविच्छिन्न करून ते चालते झाले.

ज्यांचा केवळ स्पर्श झाला असतां सचैल स्नानच केलें पाहिजे, त्यांच्या हातून यथेच्छ मार मिळून जें आपलें मुख्य दैवत त्या मूर्त्तींस केवळ अविंधांचा स्पर्शच झाला इतकेंच नव्हे, तर त्यांनीं त्या फोडून तोडूनही टाकिल्या, यामुळें सर्व **भिवंडीमध्यें** हिंदू लोकांस जें मरणप्राय दुःख झालें, त्याची कल्पना आमच्या वाचकांनींच करावी ! !

असो, पुढें रीतीप्रमाणें आपल्यास **मारल्याबद्दल** व आपलीं देवालयें भ्रष्ट करून त्यांतील मूर्त्ति फोडल्याबद्दल **मुसलमान** लोकांवर फिर्यादी झाल्या. त्याची चौकशी ठाणें कोर्टांत होऊन

अखेर निकाल दुर्दैवानें **हिंदूविरुद्धच** झाला. तेव्हां **मुसलमान** लोकांच्या विजयानंदास पारावारच नाहींसा झाला. त्यांनीं **ठाणें** मुक्कामीं व **भिंवडी** येथें पेढे बर्फी वाटून महोत्सव केला. त्या गांवीं **नाना विठ्ठलशेट वाणी** म्हणून एक मोठे निस्सीम भक्त व चतुर गृहस्थ रहात असत. त्यांस **श्री. नाना शंकरशेट** यांच्या अद्वितीय कीर्त्तीचें स्मरण झालें. हा पुरुष मोठा कार्यकर्ता आणि परोपकारी असून खरा हिंदुधर्मसंरक्षक आहे. शिवाय यांचें सरकारदरबारांत मोठें वजनही आहे, हें सर्व त्यास विश्रूत होतें. यास्तव येथें घडलेलें वर्तमान त्यांच्या कानावर घालावें, असा विचार करून तो व दुसरे बहुत लोक मुंबईस **श्रीमंतांच्या** भेटीस आले.

ही मंडळी आली त्यावेळीं **नाना** देवपुजेंत निमग्न होते. बहु मोठा समाज बाहेरगांवाहून आपल्या भेटीस आल्याचें समजतांच पूजास्थानीं त्यांस बोलावून येण्याचें कारण विचारिलें. त्यावेळीं **नाना विठ्ठल भिंवडीकर** यांनीं आपल्याबरोबर आणिलेले छिन्न भिन्न झालेले मूर्त्तीचे तुकडे पुढें ठेऊन ते बोलले कीं—"आतां आम्हीं याचीच का पूजा करावी !! **मुसलमान** लोकांनीं आमच्या मूर्त्तीची अशी दशा करावी व आम्हांस यथेच्छ मारावें—व हें सर्व आमचा तिळप्राय अन्याय नसतां—व अखेरीस आम्हीं सरकारांत दाद मागावयास गेलों असतां तेथें आमच्या तर्फे निकाल न झाल्यामुळें आम्हीं सदोदीत भीतींत असावें, हें आपणासारख्यांस आवडावें काय ? आम्हांस आतां आमचे प्राण व वित्त हीं आमच्या गांवीं सुरक्षित राहतील, याविषयीं खात्री देववत नाहीं. यासाठीं आतां आम्हांस या संकटावस्थेंतून मुक्त करणार आपल्यावांचून अन्य

कोणी नाहीं. भिंवडीच्या मंडळीस **नानांनीं** आपल्या येथेंच राहवून घेतलें व आश्वासन देऊन त्यांचा जेवणाखाण्याचा बंदोबस्त करविला.

भोजनोत्तर मारामारीसंबंधें सर्व वर्तमान समजून घेऊन व **विठ्ठलशेठ** वगैरे असामींनीं केलेली फिर्याद व तिच्या झालेल्या निकालाचे सर्व कागदपत्र पाहून **नानांची** खात्री झाली कीं, या प्रकरणांत **मुसलमान** लोक मूळ आगळीक करणारे असून हिंदूंनीं जरी अपराध केला असेल, तरी तो स्वतःचा बचाव करण्यासाठीं केला असेल. यासाठीं या मारामारीची पुन्हा चांगली चौकशी व्हावी; असें त्यांस वाटलें. नंतर **भिंवडीकर** मंडळींचें समाधान करून त्यांस धीर देऊन आपण **गव्हर्नर साहेबांच्या** बंगल्यावर गेले. त्यावेळीं **गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रँट** हे अधिकारापन्न होते. **गव्हर्नर साहेबांनीं** कुशल प्रश्नोत्तरानंतर एवढ्या ऐन दोन प्रहरीं येण्याची तसदी घेण्याचें कारण विचारिलें. **नानांनीं** येण्याचें कारण इत्थंभूत सर्व सांगितलें. व आपल्या बराबर फिर्याद व तिचा झालेला निकाल, यांच्या आणलेल्या नकलांचें भाषांतर करून सांगितलें आणखी असेंही पण सुचविलें कीं, या प्रकरणांत योग्य पुरावा पुढें न आल्यामुळें म्हणा किंवा कोणत्याही कारणानें म्हणा, योग्य न्याय झाला नसावा, असें वाटतें, तर तो व्हावा.

इंग्रज सरकारचें राज्य आम्हां प्रजेस जे मोठें प्रिय झालें आहे, त्याच्या अनेक कारणांपैकींच हें एक आहे कीं, या राज्यांत अति श्रीमानापासून तों तहत अति गरिबापर्यंत सर्वांस योग्य न्याय मिळतो. यासाठीं त्या अनाथ **भिंवडीकर हिंदु**लोकांविषयीं माझी अशी विनंती आहे कीं, या प्रकरणाची दुसऱ्या एखाद्या हुशार व न्यायी अमलदारापुढें पुनरपि चौकशी व्हावी. **नाना** हे सरकारचे मोठे

हितकर्ते आहेत, अशी **गव्हर्नर साहेबांची** खातरी असल्यामुळें बहुतेक सर्व गोष्टी नवीन प्रचारांत आणण्याच्या कामांत ते त्यांची सल्लामसलत अगोदर घेत असत. शिवाय **नानांविषयीं** सरकारचा असा समज होता कीं, ते भलत्याच कामांत उगाच भीड घालावयाचे नाहींत.

वर **नानांनीं** सांगितलेलें वर्तमान ऐकून घेऊन **गव्हर्नरसाहेबांनीं** '**भिवंडी**' प्रकरणाची पुन्हा तपासणी ठाणें येथें अमुक दिवशीं व्हावयाची आहे, तर पूर्वींचे त्या प्रकरणांतील वादी प्रतिवादी व उभय पक्षाकडील साक्षीदार यांनीं अमुक दिवशीं **ठाणें** म्याजिस्त्रेट कोर्टांत हजर असावें अशी तजवीज ठेवण्याविषयीं ठाणें माजिस्त्रेट यांस हुकूम पाठविला. आणि ठाण्याहून मि० **कोल** व मि० **पेन** या दोघां पोलिस अमलदारांस भिंवडीस पाठविलें. त्यांनीं येऊन प्रथम मुसलमान बंडखोरांस. कैद केलें. आणि आम्हांस चांगल्या आधारावरून असें कळतें कीं, दुसऱ्या खेपेच्या फिर्यादीच्या दिवशीं ठाणें कोर्टांत हजर राहण्याकरितां सदरहू मुसलमान बंडखोर भिंवडीहून ठाण्यास होड्यांतून जलमार्गानें नेत असतांना भिंवडींतील एक सावकार **रघुनाथशेट वाणी** यांनीं पोलिसांस सांगितलें कीं, हे बदमाष लोक होड्याही बुडविण्यास कमी करणार नाहींत. ह्मणून त्यांस मचव्यांतून न्यावें. तेव्हां पोलिसांनीं त्या प्रत्येक बंडखोरास त्याच्याच धोतरानें त्याचे हात पाठीमागें बांधून त्यांस चतुर्भुज करून **ठाण्यास** आणलें व कडक बंदोबस्तांत ठेविलें.

या प्रकरणाच्या संबंधें त्या वेळचे पाहिलेले लोक असें सांगतात कीं, सरकारच्या हुकुमान्वयें या कज्जाची तपासणी करण्यासाठीं **ठाणें** तुरंगांतच मॅजिस्त्रेट यांनीं आपली कचेरी केली होती. कोणी

असेंही सांगतात कीं, ह्या प्रकरणाची चौकशी करावयासाठीं मुंबईहून कोणी बडा कामगार नेमिला होता. नेमिलेल्या दिवशीं वादी प्रतिवादी व साक्षीदार तर हजर होतेच. परंतु विजयानंदी झालेले तमाम **भिवंडी** येथील **मुसलमान** लोकही, ही मजा पहावयास त्या समयास आलेले होते.

पुढें चौकशी सुरू होऊन जेव्हां वादीतर्फे पुरावा घेण्यांत आला, त्या वेळीं तो खोटा ठरवावा या उद्देशानें उलट पक्षकारानें आपली शिकस्त केली; परंतु त्यांचा कोटीक्रम कांहींएक उपयोगी पडला नाहीं. आरोपींनीं गुन्हा नाकबूल करून त्याच्या पुष्टीकरणार्थ बहुत खोटे साक्षीदार हजर केले. परंतु उलट तपासणीच्या वेळीं ते अगदीं लटपटून गेले. हें पाहून प्रतिवादीपक्षाचा व्यूह अगदींच ढासळून गेला. आपण आतां खास हरतों, असें त्यांस वाटूं लागलें. आपले साक्षीदार सर्व बनावट आहेत व त्यांची साक्ष अगदींच असंबद्ध झाली, असें त्यांस वाटूं लागलें. चौकशी पुरी झाल्यावर आतां म्याजिस्त्रेट साहेब काय निकाल सांगतात, इकडे पक्षकार व प्रेक्षक यांचें लक्ष लागून गेलें.

इतक्यांत न्यायाधीश निकाल सांगूं लागले. त्यांनीं सर्व प्रतिवादींस पूर्ण अपराधी ठरवून त्यांस त्यांच्या अपराधाच्या मानाप्रमाणें शिक्षा सांगितल्या. नंतर खरोखर अपराधी असून ज्यांस न्यायासना पुढें आणिलें नव्हतें, अशा तेथें हजर असलेल्या इतर अपराध्यांवरही तेथच्या तेथेंच खटले करून त्यांसही योग्य शिक्षा ठोठावल्या. या प्रकरणाची चौकशीच ठाणें तुरूंगांत झाली होती. यामुळें अपराध्यांस त्याच वेळीं तुरुंगाधिपतीच्या स्वाधीन करून न्यायाधिशांनीं आपली कचेरी बरखास्त केली.

विठ्ठलशेट आदीकरून मंडळी **भिवंडीस** परत गेल्यावर त्यांनीं व इतर हिंदुगृहस्थांनीं आपल्यास झालेला आनंद प्रदर्शित करण्याचें तूर्त तहकूब करून देवार्चना करण्याकडे सर्व गुंतून गेले. पुढें सुमुहूर्तावर **श्रीविठ्ठलाची** पुन्हा प्राणप्रतिष्ठा करून **भिवंडींत** मोठा उत्सव केला. त्याप्रसंगीं आमच्या चरित्रनायकासही **भिवंडीच्या** रहिवाशांनीं आमंत्रण करून तो प्रसंग साजरा केला.

भिवंडीच्या मारामारीसंबंधानें नानांनीं आपलें वजन खर्चून फिर्यादीचा एकंदर शेवट गोड केला, हें पाहून कल्याणमुकामीं त्याकाळीं राहणाऱ्या कोणी एका कासारानें **नानांवर** एक पोवाडा रचला आहे. तो फार गोड आहे. तो पोवाडा आह्मी शेवटीं परिशिष्टांत दिला आहे, तो अवश्य पहावा.

---

(२) पंढरपुरांत श्रीविठ्ठलमंदिरांत द्वारप्रवेशाची परवानगी.

नाम हे नगरी वैकुंठ पंढरी ।
नांदतो श्रीहरी पांडुरंग ॥

नरहरि सोनार.

पंढरपूर हें क्षेत्र सोलापूर जिल्ह्यांत **भीमातटाकीं** आहे. या ठिकाणीं **भीमा** नदीचा चंद्रकोरीप्रमाणें आकार झाला असल्यामुळें तिला **चंद्रभागा** असें म्हणतात. या ठिकाणीं प्रसिद्ध भगवद्भक्त **नरहरि सोनार** यांनीं म्हटल्याप्रमाणें '**भींवरेचें स्नान देवाचें दर्शन, पाप हें जळोन जाय तेथें** ॥' अशी स्थिति होते.

तेथें **श्रीपांडुरंगाच्या** दर्शनासाठीं दर **आषाढी कार्तिकी** एकादशीस **नागपूर, वऱ्हाड, कोल्हापूर, कोंकण, गुजराथ, काठेवाड** इत्यादि दूरदूरच्या ठिकाणांहून लोकांचे थवेच्या थवे प्रतिवर्षी जात असतात. या शिवाय प्रतिमहिन्यास पहिल्या एकादशीस दर्शनास येणारेही बहुत वारकरी असतात. या **पांडुरंग**भक्तांमध्यें बहुतेक असे निस्सीम भक्त आहेत कीं, ते आपल्या नियमित वेळीं सर्व कामें एकीकडे ठेवून **पंढरीस** अवश्य वारीला जावयाचेच. कांहीं असे विलक्षण असतात कीं, नियमित वेळीं कांहीं विशेष कारणानें **विठ्ठल**-दर्शन न झालें, तर तें होईपावेतों उपोषित राहतील. **पंढरीस आषाढी** एकादशीच्या वेळीं कधीं कधीं दोन दोन लक्ष यात्रा जमत असते. **कार्तिकीच्या** वेळीं सुमारें एक लक्ष तरी यात्रा आपली जमावयाचीच. **पंढरपूर** येथें म्युनिसिपल कमेटीचें उत्पन्न दर साल पन्नास हजार रुपये आहे. यात्रेकरी लोकांवर दर माणशीं एक-वार चार आणे कर घेतला जातो. यामुळें तेथें सांप्रत झालेली सुधारणा दृष्टीस पडते. ती पन्नास साठ वर्षांपूर्वी अगदीं नव्हती. यात्रेच्या वेळीं गांवांत महामारीचें आगमन नाहीं, असें विरळाच. सरकार अशा प्रसंगीं जिकडे तिकडे “पंढरपूर येथें वाऱ्याचा उपद्रव सुरू झाला आहे, यासाठीं तेथें कोणी जाऊं नये” अशा अर्थाच्या जाहिराती लावतें. परंतु खरे **पांडुरंग**भक्त तिकडे लक्ष न देतां यात्रेस गेल्याशिवाय रहात नाहींत. असा मोठा समाज जमल्यामुळें नदीचें पाणी अत्यंत दूषित होऊन रोग दूणावतो व हजारों लोक यमपुरीची वाट धरतात. **श्रीविठ्ठल** मंदि-रांत दर्शनाची सांप्रत जशी तजवीज आहे तशी पूर्वीं नव्हती. यामुळें गरीब गुरिबांस दोनदोन दिवस देवालयांत राहूनही दर्शन होत नसे. या देवालयास चार गाभारे आहेत. ते यात्रेकरूंनीं

सर्व भरून जातात. ज्यांत **श्रीविठ्ठलमूर्त्ति** आहे, तो सर्वांत लहान असून त्यास एकच दरवाजा आहे. आंत चार मनुष्यें एकदम जाऊं शकत नाहींत; आंत गेलेलीं माणसें बाहेर पडतपर्यंत दुसऱ्यांस आंत जातां येत नाहीं. दर्शनासाठीं अगदीं आतुर झालेले लोक देव आहे त्या अथवा इतर गाभाऱ्यांत जाण्यासाठीं भगीरथ प्रयत्न करतात. स्त्रीपुरुष सर्व एकत्र असून आंत प्रवेश करतांना अथवा बाहेर येतांना सर्वांसच फार त्रास होतो. त्या गर्दींत पांच चार प्राणनाश झाले नाहींत, असें कधीं होत नसे. तरी लोक जावयाचे थांबले नाहींत.

एका वर्षीं तेथें यात्रा येण्याच्या पूर्वींच महामारीचा प्रादुर्भाव झाला होता. पुढें यात्रा जमल्यावर तेथें मोठा आकांत होईल व परत जाणाऱ्या यात्रेकरूं बरोबर ती जिकडे तिकडे अनेक प्रांतांत प्रवेश करील, एतदर्थ त्या वर्षीं सरकारानें खडा पहारा ठेवून देवदर्शनच बंद केलें. यामुळें तर मोठाच हाहाःकार उडाला. देवदर्शनासाठीं आलेले लोक तेथेंच बसून राहिले. देवाच्या सात सेवाधाऱ्यांचें उत्पन्न कायतें या यात्रेवर. तें बंद झालें. लोक फार दुःखी झाले व ज्यास जो बरा उपाय वाटला, तो तो करूं लागला. परंतु सर्व निर्फळ. त्यावेळीं आपल्या **नानां**ची परोपकार करण्याविषयींची कीर्ति **पंढरपूर** येथील कांहीं सेवाधाऱ्यांनीं ऐकली होती, म्हणून त्यांपैकीं कांहीं मुंबईस त्यांजकडे आले व झालेला सर्व प्रकार त्यांस निवेदन केला.

त्यावेळीं **पंढरपूर** हें **सातारा** जिल्ह्यांत मोडत असे व साताऱ्यास कमिशनरी अमल होता. **नानांनीं गव्हरनर साहेबांची** भेट घेऊन सर्व प्रकार त्यांस कळवून दर्शनाची मनाई केल्यामुळें मोठा आकांत उडाला आहे. व ती दूर न झाली तर धर्मसंबंधानें बखेडा जर उत्पन्न

झाला, तर सर्व लोकांस अत्यंत दुःख होईल. यासाठीं दर्शनाची मोकळीक देऊन रोगाचा प्रादुर्भाव न होण्यासाठीं योग्य वाटेल ती तजवीज ठेवावी, अशी शिफारस केली. त्याचा विचार होऊन 'दर्शनास मनाई करूं नये, परंतु बाकी बंदोबस्त ठेवावा' असा हुकुम ताबडतोब मिळविला.

यात्रा उतरण्यासाठीं स्वच्छ हवेवर **गोपाळपूर** येथें धर्मशाळा बांधिल्या आहेत. **चंद्रभागे**चें पाणी आधीं जड, त्यांत यात्रेच्या वेळीं तें फार गढूळ होतें, व तेणेंकरून तें रोगोद्भवास एक प्रबल कारण होतें. या साठीं थोडे वर्षांवर एक मोठा तलाव बांधून गांवांत नळाचें स्वच्छ पाणी सदोदीत मिळण्याची सोय झाली आहे. दवाखान्याची तर स्थापना झालीच आहे. असो; या परोपकाराच्या कृत्यामुळें यात्रेकरूंच्या द्वारें **नानां**ची कीर्ति सर्व देशभर पसरली; आणि म्हणून देवदर्शनाच्या बाबतींत सर्वांस सारखें मुक्तद्वार मिळाल्यामुळें स्वातंत्र्यसुखाचा लाभ हजारों यात्रेकरू आज जो अनुभवीत आहेत, तें सारें **नानां**च्या परिश्रमांचें फल होय.

आतां इकडे आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणें अप्रासंगिक होणार नाहीं; इतकेंच नव्हे, तर सदरहू गोष्ट नमूद करणें हें अत्यावश्यक होय. ती गोष्ट ही कीं, वर लिहिलेल्या प्रसंगापर्यंत **श्रीविठ्ठल**-मंदिरांतील सेवाधारी अथवा बडवे हे फार उन्मत्त असत. ते करतील ती पूर्वदिशा ! ते आपल्या अधिकाराच्या जोरावर ब्राह्मणेतरांस देवाच्या दर्शनास आंत जाऊं देत नसत. त्यांस प्रतिबंध करीत. त्यामुळें नाइलाजास्तव आंतील गाभाऱ्याच्या दरवाजाबाहेरूनच देवदर्शन घेणें भाग पडे. येणेंकरून अशा भक्तांचा मोठा विरस होत असे. मोठा विरस म्हणण्याचें कारण असें कीं, भाविक व प्रेमळ लोक **श्रीविठ्ठलमूर्तीस**

दर्शनप्रसंगीं प्रेमभावानें कडकडून आलिंगन देत; म्हणजे त्यांचें पूर्ण समाधान होत असे. आणि आपण आज कृतकृत्य झालों, असें त्यांस वाटे. **मग तया सुखा अंत नाहीं पार । आनंदें सागर हेलावती ॥** अशी त्यांची स्थिति होत असे. या वेळचा आनंद आणि देखावा अगदीं अपूर्व दिसे; त्यांचें वर्णन कोठवर करावें ! हीही गोष्ट आमच्या **नानांच्या** स्मरणांतून गेली नाहीं. तरी ह्याही गोष्टीचा प्रतिकार करावा आणि भक्तमंडळीस मनसोक्त दर्शन घेऊं द्यावें, हा हेतु मनांत धरून **नानांनीं** सरकारांत आपलें वजन खर्च करून त्याहीबद्दल परवानगी मिळविली आणि लोकांस देवदर्शनाचें मुक्तद्वार करून दिलें. त्यामुळें **नानांनीं** अखिल महाराष्ट्रास किंबहुना अवघ्या हिंदुवर्गास अत्यंत ऋणी करून ठेविलें; म्हणून ते लोक **नानांचे** अद्याप पोवाडे गातात.

---

(३) द्वारकाक्षेत्रांत श्रीद्वारकानाथजीच्या देवालयांत वाघरी लोकांनीं केलेला भ्रष्टाकार व तन्निवारणार्थ केलेले महत् प्रयत्न.

नानानीं आणखी एक अशाच प्रकारचें कृत्य करून आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. **काठेवाडांत** गुर्जर लोकांचें **श्रीद्वारका** म्हणून एक प्रसिद्ध देवस्थान आहे. हें **श्रीमंत गायकवाड** सरकाराचे ताब्यांत आहे. **वाघरी** म्हणून या सरकाराची एक निव्वळ रानटी व लुटारू प्रजा होती. बहुतकालपर्यंत ते **गायकवाड सरकाराच्या** हुकुमांत वागत नसत. यामुळें त्यांचा

बंदोबस्त विशेष प्रकारानें करावा लागत असे. असें सांगतात कीं, एकदां या वाघरी लोकांनीं मोठा भ्रष्टाकार करून जिकडे तिकडे लुटालूट चालविली. त्या वेळीं त्यांनीं द्वारका लुटून तेथील सर्व द्रव्य पळविलें. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं इंग्रज सरकारानें आपल्या सैन्यांतील एक गोऱ्या पळटणीची तुकडी तिकडे पाठविली. तिनें त्या वाघरी लोकांस अगदीं जेरीस आणिलें. परंतु ते द्वारकेंत शिरले. आपल्या पाठीस गोरे लोक एथपर्यंत लागत आले, तेव्हां ते आतां आपला पुरा समाचार घेतल्याशिवाय जावयाचे नाहींत, असें पाहून केवळ प्राणरक्षणार्थ ते सर्व लोक श्रीद्वारकानाथजीच्या मंदिरांत शिरले. त्यावेळीं त्यांस वाटलें कीं, आपण आतां बचावलों. कारण म्लेंच्छ कांहीं देवाळयांत प्रवेश करूं शकणार नाहींत. परंतु ही त्यांची अटकळ चुकली. वाघरी देवालयांत छपून बसले आहेत, असें समजल्यावर त्यांच्या बंदोबस्तार्थ त्यांनींही देवालयांत प्रवेश केला. मग काय विचारावें ? एकच गर्दी उडाली. धर्मभक्त गुर्जरांचें तें महापवित्र स्थान असल्यामुळें देवालय व त्यांतील मूर्त्ति भ्रष्ट न व्हावी म्हणून त्यांनीं भगीरथ प्रयत्न केले. परंतु त्यांच्या विनंतीकडे कोणीच लक्ष दिलें नाहीं. आंत गेल्यावर वाघरी लोकांचें यथेच्छ पारिपत्य केल्यावर त्यांस चतुर्भुज केलें. नंतर तें देवालय व त्यांतील मूर्त्ति त्यांच्याच आहेत, असें समजून त्या सर्व भष्ट केल्या.

हा झालेला भ्रष्टाकार पाहून व ऐकून सर्व ठिकाणच्या गुजराथी लोकांत मोठा हाहाःकार उडाला. राजसैन्याकडून हा प्रकार घडलेला पाहून "राजानें मारलें व पावसानें भिजविलें" तर दाद कोणाकडे मागावी ! ! या न्यायानें ते स्वस्थ बसून राहिले. इतक्यांत दिपवाळीचा सण आला. हा सण या मुंबईशहरांत असा उत्कृष्ट

रीतीनें होतो कीं, त्या वेळचा दीपोत्सव पहावयास फार दूरदूरचे सहस्त्रावधि लोक प्रतिवर्षीं येथें येतात. अत्युत्तम दीपोत्सव करणारे मुख्यत्वेंकरून मुंबईतील गुजराथी लोक होत.

गुर्जर लोकांच्या महास्थानाची वरीलप्रमाणें स्थिति झाल्यामुळें दिपवाळीचा सण नेहमींप्रमाणें करण्यास त्यांस अगदीं उत्साह राहिला नव्हता. ह्मणून दुःख प्रदर्शनार्थ या वर्षीं धनत्रयोदशीच्या दिवशीं सालाबादप्रमाणें दीपोत्सव करावयाचा नाहीं, असा त्यांनीं संकल्प केला. फार काय, दुसऱ्या दिवशीं या विषयीं जिकडे तिकडे पुकारा होऊन त्याच्या कारणाचा शोध मोठमोठाले सरकारी युरोपियन अमलदार करूं लागले. **गव्हर्नर साहेबांनीं** तर आपल्या लोकप्रिय **नानांस** निमंत्रण पाठवून असें होण्याचें कारण काय ह्मणून विचारिलें. भेटीअंतीं **नाना** ह्मणाले कीं, “ आह्मा हिंदूमध्यें दिपवाळी सारखा मोठा दुसरा सण नाहीं व तो यथाशक्ति आह्मी सर्व साजरा करतों, हें खरें परंतु अत्यंत दुःखांत बुडालेल्या कुटुंबांत मात्र त्या वर्षीं हा सण साजरा केला जात नाहीं. हल्लीं आह्मां सर्व **हिंदूंस** अशौच यावें व त्यामुळें दीपोत्सवासारखीं सर्व आनंदाचीं कामें बंद ठेवणें आह्मांस भाग पडावें, अशा दुःखांत आह्मीं असल्यामुळें हा आमच्यानें साजरा करवत नाहीं. ” नंतर **गव्हर्नर साहेबांनीं** विचारिल्यावरून आमच्या नामदार साहेबांनीं **द्वारकेंत** झालेला प्रकार त्यांस निवेदन केला. **द्वारका** या महास्थानाचें हिंदुलोकांत व त्यांत विशेषेंकरून गुजराथीलोकांत केवढें माहात्म्य आहे, याचेंही दिग्दर्शन **नानांनीं** केलें. **गव्हर्नर साहेब** परम दयाळु व न्यायी होते. यामुळें त्यांनीं **नानांस** एकदम खात्रीनें सांगितलें कीं, झालेल्या प्रकरणाची योग्य चवकशी होऊन देवालयांतील मूर्त्ति शुद्ध

करण्यासाठीं योग्य रकम ही **गायकवाड** सरकाराकडून देव-विण्याची तजवीज अल्पकाळांत आह्मीं खास करवितों. आपण मात्र याप्रमाणें सर्व लोकांची खात्री करून सालाबादप्रमाणें दीपोत्सव साजरा करावा. साहेबांच्या बोलण्यास रूकार देऊन **नाना** गावांतील मोठमोठ्या चार गुजराथी शेठ सावकारांकडे गेले. व नव्हर्नर साहेबांनीं दिलेलें अभिवचन त्यांस कळविलें. नंतर सर्व यथान्याय खास होईल, तुम्ही दीपोत्सव खुशाल करावा व तसें न झाल्यास त्याबद्दलची जबाबदारी आमच्याकडे आहे, अशी त्यांची खात्री केली. **नानांनीं** खात्री केल्यावर सर्वांनीं **नानांच्या** सांगण्याप्रमाणें त्याच दिवशीं सायंकाळीं दीपोत्सवाची तजवीज केली. नंतर सायं-काळीं **नामदार गव्हर्नर साहेब** व आमचे **नामदार नानासाहेब** व इतर मोठमोठाले लोक तो दीपोत्सव व त्या दिवसाची रोषनाई पहावयास निघाले. व जिकडे तिकडे सालाबादप्रमाणें लखलखाट पाहून त्या सर्वांस परमानंद झाला. व असें सांगितात कीं, या प्रकरणीं **साहेब बहादुरांनीं** सर्वांदेखत आपल्या चरित्रनायकांची फार प्रशंसा केली.

पुढें कालांतरानें सदरहू प्रकरणाची पूर्ण चवकशी होऊन देवाल-यांतील मूर्तीची शुद्धता करवून तिची यथासांग प्राणप्रतिष्ठा करविली व त्यामुळें रयत संतुष्ट झाली, ही उपकाराची गोष्ट तिकडील लोक अद्याप आठवतात व **नानांचे** पोवाडे गातात.

---

(४) दवाखाना.



आजारी आणि रोगग्रस्त लोकांकरितां **नानांनीं** ताडदेवावरील **श्रीभवानीशंकरच्या** धर्मशाळेच्या एका कोपऱ्यावर स्वखर्चानें एक धर्मार्थ दवाखाना चालू केला. ह्याच्यापूर्वी मरहूम शेट **सर जमशेटजी जिजीभाई,** पहिले ब्यारोनेट यांनीं भायखळ्यावर मोठ्या प्रमाणावर एक हास्पिटल बांधलें. पण **वाळकेश्वर, महालक्ष्मी, गिरगांव** वगैरे शहरच्या दक्षिण भागांतील गरीब लोकांस भायखळ्यासारख्या लांबच्या ठिकाणीं जाण्यास फार अवघड जातें व वेळेवर त्यांस औषधोपचार घडत नाहीं, जाणून **नानांनीं** वरील दवाखाना स्वखर्चानें चालविला आणि **नानांचे** वंशज तो अद्यापपर्यंत चालवितात.

---

(५) श्रीभवानीशंकर–ताडदेव.



नानांचे तीर्थरूप **शंकरशेट** यांनीं ताडदेवावर आपल्या बंगल्याच्या विस्तृत आवारांत **श्रीत्र्यंबकेश्वराच्या** देवळाचे धर्तीवर एक **श्रीभवानीशंकराचें** उत्तम देवालय बांधलें. हें देवालय **शंकरशेट** यांनीं आपली मृतपत्नि **सौ० भवानीबाई** यांच्या स्मरणार्थ, पुष्कळ द्रव्य खर्च करून बांधलें आहे. देवळाच्या आवारांत उत्तम फरसबंदी केलेली आहे व त्याच्या सभोंवती बगीच्याची शोभा अप्रतिम



श्री भवानीशंकरचें देऊळ ताडदेव.

चित्रकारः–
रा. मो. ना. कीर्तीकर.

पान १४८

बॉंबे आर्ट प्रिंटिंग वर्क्स.

आहे. जिकडे तिकडे नानातऱ्हेचीं व सुवासिक फुलझाडें लाविलेलीं आहेत. देवळासमोर दोन दीपमाला उभारलेल्या आहेत. बाजूस एक काळ्या फरसबंदीची पुष्करणी किंवा हौद* बांधला आहे. ह्या सर्व गोष्टीमुळें सदरहू देवालयास अप्रतिम शोभा आलेली आहे, ह्या देवालयाचा वार्षिकोत्सव व जत्रा हीं दरवर्षीं मार्गशीर्षमासीं पौर्णिमेस होत असतात. ह्या वार्षिकोत्सवाबद्दलचें साद्यंत वर्णन ह्याच पुस्तकांत एकोणिसाव्या भागांत " **श्रीभवानीशंकरची वार्षिक जत्रा** " या मथाळ्याखालीं दिलें आहे.

---

(६) श्री रामचंद्रजी–भुलेश्वर.



श्री **भुलेश्वरच्या** देवळाच्या आवारांत **नानांनीं** एक **श्रीरामचंद्रजीचें** देवालय बांधलें आहे. या ठिकाणीं दुसऱ्या अनेक देवाळांचा समूह आहे. **श्रीरामचंद्रजीच्या** देवळांत नेहमीं कथापुराणें क्रमाक्रमानें चाललेलींच असतात आणि चैत्रांत रामनवमीचा उत्सव नऊ दिवसपर्यंत चालतो.

---

* हा हौद दोन वर्षांपूर्वी मुंबई म्युनिसिपालिटीनें, आसपास मलेरिया ह्या दूषित तापाचा फैलाव होतो, ह्या सबबीवर, शहरांतील इतर मोठमोठे तलाव, विहिरीं, दगड, माती, केरकचरा घालून बुजविले आहेत, त्याप्रमाणें ही पुष्करणी भरणी घालून बुजवून टाकिली आहे.


(७) श्री अमृतेश्वर–घोडबंदर.



नांनांचें मूळ गांव, ह्मणजे त्यांचे आजे **बाबुलशेट मुरबाड** सोडून **घोडबंदरास** आले, त्या ठिकाणीं त्यांनीं आपल्या राहत्या बंगल्याचे पिच्छाडीस एक **श्रीअमृतेश्वराचें** देवालय बांधलें आहे. हें उत्तराधिमुख असून त्यास एक प्रशस्त सभामंडप जोडलेला आहे.

---

(८) श्रीशंकर--माथेरान.



उष्णकाळांत **नाना** हे **मुंबईतून पुणें** मुक्कामीं किंवा **माथेरान** अथवा **महाबळेश्वर** सारख्या उंच गिरिशिखरावर हवापालट करण्याकरितां प्रतिवर्षीं अवश्य जात असत. वरील सर्व ठिकाणीं त्यांचे स्वताचे बंगले असत. प्रतिदिवशीं देवदर्शन घेतल्या शिवाय रहावयाचें नाहीं, असा त्यांचा संकल्प असल्यामुळें त्यांनीं **माथेरान** मुकामीं एक **श्रीशंकराचें** देवालय स्वखर्चानें बांधलें आहे. **माथेरानास** जाणाऱ्या इतर श्रीमंत व गरीब लोकांस हें देऊळ फार सोइवार पडतें.

---

(९) श्रीशंकर—शहापूर.



नानाशंकर शेटच्या पूर्वजांचें मूळ गांव घोडबंदर हें होय. तें **शहापूर** तालुक्यांत आहे; ह्याच्या बद्दलचें वर्णन दुसऱ्या भागांत येऊन गेलेलेंच आहे. खुद्द **शहापूर** गावांत **नानांनीं** एक **श्रीशंकराचें** देऊळ बांधलें आहे. हें गंगेच्या काठीं असून त्याच्या आसपास वनश्रीची नैसर्गिक शोभा अप्रतिम आहे.

---

(१०) धर्मशाळा.



प्रवासी, पांथस्थ, यात्रेकरू, बैरागी वगैरे लोकांच्या सोईकरितां त्यांस विश्रांतीस्थल किंवा आश्रयाकरितां **नानांनीं** ठिकठिकाणीं धर्मशाळा पुष्कळ द्रव्य खर्च करून बांधल्या आहेत. त्या येणें प्रमाणें:— **श्रीभवानीशंकर,** ताडदेव येथें; **श्री भुलेश्वर** येथें; **मुंबईतील** * स्मशानभूमीलगत; **श्री वालुकेश्वर** येथें; **घोडबंदर** येथें; **श्री वज्रेश्वरी** येथें; **शहापूर** येथें. वगैरे लहान मोठ्या धर्मशाळा बांधलेल्या आहेत. त्यांचा आज कैक काळ पर्यंत हजारों लोकांस सारखा उपयोग होत आहे. पैकीं **श्रीवालुकेश्वर** येथील धर्मशाळा हल्लीं जमीनदोस्त झालेली आहे.

---

* सोनापुरांतील धर्मशाळेंत वरिक पांढरपेशांतील कांही ज्ञातींत मृत्यु झाला, तर पहिल्या दिवसापासून अगर नववे दिवसापासून तों बारावे दिवसापर्यंत और्ध्वदेहिक विधि, श्राद्ध, तर्पण इत्यादि विधि करण्याकरितां ही धर्मशाळा **नानांनीं** बांधली असून फार उपयोगी व सोईची आहे.

(११) सार्वजनिक रस्ते



ज्या प्रमाणें नानांनीं लोकोपयोगाकरितां दवाखाने देवालयें, धर्मशाळा बांधल्या, त्याचप्रमाणें त्यांनीं कांहीं कांहीं ठिकाणीं सार्वजनिक रस्तेही बांधले आहेत. ते येणें प्रमाणें:—

पुणें—वेताळ पेठेच्या पिच्छाडीस **नानांनीं** आपल्या राहत्या बंगल्यानजिक पंधरा हजार रुपये खर्च करून एक सार्वजनिक रस्ता सन १८६४ त बांधला. तो **पर्वतीच्या** पायथ्याशीं जातो. त्यास ' **नाना शंकरशेट रस्ता** ' असें ह्मणतात.

त्याच प्रमाणें **श्रीवज्रेश्वरी, नाशिक, त्र्यंबकेश्वर** मुकामीं त्यांनीं लोकांची अडचण जाणून त्यांच्या उपयोगाकरितां रस्ते बांधून आपल्या कीर्तींत भर घातली आहे

(१२) सार्वजनिक घड्याळ.

पुणें मुकामीं स्टेशनानजिक असलेल्या धर्मशाळेवर लोकांच्या सोईकरितां तीन हजार रुपये खर्च करून सन १८६४ त एक सार्वजनीक मोठें घड्याळ बसविलें आहे. तें जाणारा येणारास वेळ पहाण्यास फार सोईचें झालें आहे.

(१३) पुष्करणी, हौद-इत्यादि.



जसें क्षुधितांस अन्नदान त्याचप्रमाणें तृषेनें प्राण व्याकुळ झाल्यास त्यांची तृषाशांति करण्याच्या धार्मिक बुद्धीनें **नानांनीं** ठिकठिकाणीं पुष्करणी वगैरे बांधल्या आहेत. त्यामुळें हजारों माणसांची तहान भागून ते **नानांस** दुवा देत आहेत. त्याचप्रमाणें मुक्या जनावरांची देखील मोठी सोय झालेली आहे.

नानांनीं पालवावरील आपल्या राहत्या वाड्याच्या पिच्छाडीस एक मोठी पुष्करणी अथवा हौद बांधला होता, त्याचप्रमाणें ताडदेवावर **श्रीभवानीशंकरा**च्या देवालयानजिक एक विस्तृत चिरेबंदी हौद बांधला होता. पण वरील दोनही हौद मुंबई म्युनिसिपालिटीच्या **मलेरिया डिपार्टमेंटनें** स्वखर्चानें जलसंचयपूरिकरणसत्रांत भरणी घालून बुजवून टाकिले.

त्याचप्रमाणें **घोडबंदर** मुकामीं **श्रीअमृतेश्वराच्या** देवळाचे पिच्छाडीस एक मोठा हौद बांधला आहे. त्याचें पाणी बाजूच्या डोंगरावरील कांतळांतून पन्हळ बांधून त्याच्या खालीं आणून तें वर म्हटलेल्या हौदांत सोडिलें आहे. ह्या हौदाचें पाणी इतकें मधुर व पाचक आहे कीं, मनुष्यानं कितीही जडान्न सेवन केलें तरी त्यानें वरील हौदाचें पाणी एकदां प्राशन केलें, तर कांहीं वेळानें त्यास सणसणीत भूक लागते. मग अजीर्णाचें तर नांव नको.

ह्या हौदासंबंधानें आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्या सारखी आहे कीं, तो समुद्राच्या पाण्याच्या इतका लगत आहे कीं, त्यांत

खारें पाणी पाझरून हौदांत खात्रीनें मिसळत असेल, असें वाटल्या वांचून रहात नाहीं. पण त्याच्या अगदीं उलट प्रकार आहे, तो असा कीं, त्याचें पाणी वर म्हटल्याप्रमाणें मधुर व पाचक असून त्याच्या पाण्यांत नुसतें जरी स्नान केलें, तरी त्याची क्षुधा अगदीं प्रदीप्त होऊन एकदां पोटांत अन्नाचा गोळा कधीं पडतो, असें होऊन जातें.

हा हौद **घोडबंदरा**पासून पुढें **वसई** वगैरे ठिकाणीं जाण्याचा जो पायमार्ग आहे, त्या मार्गावर असल्यामुळें तो प्रवासी पांथस्थांच्या फार उपयोगी पडतो आणि **घोडबंदर** गावांतील रहिवाशी ह्याच हौदाचें बहुधा पाणी पिण्याकरितां नेतात.

(१४) हॅरिसन् स्प्रिंग–माथेरान.



श्रीमंत लोक उष्णकाळांत **माथेरान**सारख्या गिरिशिखरावर थंड हवेकरितां जात असतात. आधीं हें स्थान फार उंच आहे. त्यांत चैत्रवैशाखांत तर तिकडे पाण्याचें फार दुर्भिक्ष असतें. पाण्याकरितां जीव लाही लाही होऊन जातो. हें पाहून **नानां**नीं तिकडे आपल्या राहत्या बंगल्याच्या नजीक एका वाहत्या झऱ्याचें पाणी अडवून त्या ठिकाणीं एक टांकें बांधिलें आहे; त्यास **हॅरिसन् स्प्रिंग** असें म्हणतात. ह्याचें पाणी मधुर व पाचक असून तें वस्तीपासून इतर स्प्रिंग्स्पेक्षां नजिक असल्यामुळें गांवांतील रहिवाशांस आणि आजूबाजूच्या बंगल्यांतील माणसांस त्याचा मोठा पुरवठा होतो; आणि त्यामुळें लोकांची मोठी सोय झालेली आहे.

(१५) पुणें येथें श्रीशंकराचें देऊळ.

वर एके प्रसंगीं म्हटल्याप्रमाणें **नाना** हे निस्सीम शंकरभक्त असल्यामुळें दररोज शिवदर्शन झाल्याखेरीज अन्नग्रहण करावयाचें नाहीं, असा त्यांचा कृतसंकल्प असे. त्याअन्वयें त्यांचा जेव्हां जेव्हां पुणें येथें मुक्काम होत असे, त्यावेळीं शिवदर्शनाच्या उद्देशानें त्यांनीं आपल्या बंगल्याच्या विस्तृत आवारांत एक शंकराचें लहानसें देऊळ बांधलें आहे. दररोज शंकरदर्शनोत्तर त्यांचा भोजनविधि व्हावयाचा, असा त्यांचा नित्याचा परिपाठ असे.

याप्रमाणें **नानांनीं** आपल्या ऐपतीप्रमाणें आपल्या द्रव्याचा, बुद्धीचा, वजनाचा वगैरे सदुपयोग करून लोकांवर अगणित उपकार करून ठेवले आहेत, ह्मणून ते अद्याप **नानांचे** पोवाडे गातात. जिकडे पैसा विपुल आहे, तिकडे इच्छा नाहीं व जिकडे इच्छा आहे तिकडे लक्ष्मीची अवकृपा ! ! तेव्हां **नानांनीं** जी लोक सेवा बजाविली, ती फार अमोल आहे. परोपकारी कामाप्रमाणें इतर बाबतींत **नानांनीं** जीं अनेकविध लोकोपयोगी कामें केलीं, तीं फार प्रशंसनीय तर आहेतच पण त्याचा सत्परिणाम आह्मास अद्याप पावेतों उपभोगण्यास सांपडतो. ह्मणून कोणत्याना कोणत्या तरी बाबतींत त्याच्या सुपरिणामाचीं फळें आह्मास चाखण्यास मिळतात. **नानांचें** नांव जें अजरामर झालें आहे, त्यांचीं तरी कारणें हींच आहेत कीं, त्यांनीं जीं जीं कामें करून ठेविलीं आहेत, त्यांची आह्मास निरंतर स्मृति राहील, अशींच तीं चिरकाळिक आहेत. ह्मणून आह्मी ह्मणतों कीं, अशाप्रकारचीं माणसें आह्मास दैवयोगानें लाभलीं, हें आमचें मोठें सुदैव ! !

भाग बारावा.

नानांचें जिवंत स्मारक.

मानो हि महतां धनम् ।

एक संस्कृत कवि.

उत्तम गुणें शृंगारला । तो बहुतांमध्यें शोभला ।
प्रगट प्रतापें उगवला । मार्तंड जैसा ।

रामदास.

शंकराचार्यांनीं प्राचीनकाळीं प्रचलित असलेल्या बौद्धधर्मासंबंधानें आपल्या प्रतिस्पर्ध्यांबरोबर वाद करून आणि त्यांस वादांत जिंकून पाखंडमताचा विध्वंस केला आणि वेदप्रणित सनातन धर्म प्रस्थापित करून स्वमताचा चोहोंकडे प्रसार केला. भूतलावर जेव्हां पापवृत्तीचा प्रादुर्भाव होतो, तेव्हां त्यांचें निवारण करून धर्मसंरक्षण करण्याकरितां भगवंतास अवतार धारण करावा लागतो. श्रीमद्भगवद्गीतेंत ह्मटलेंच आहे कीं, ' **धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे,** ' त्या अन्वयें कोणतीही गोष्ट धर्मबाह्य अथवा शिष्टसांप्रदाय सोडून असली तर तिचें निवारण कोणत्याना कोणत्यातरी रूपानें होतेंच. तद्वत्च हल्लींच्या काळींही ह्या जगतीतलावर अनेक प्रसंगीं अनेक विभूति

वारंवार अवतीर्ण होऊन त्या अखिल जनवृंदाच्या उपयोगीं पडल्या, असें आपणास मागील इतिहासावरून कळून येतेंच.

त्याचप्रमाणें इकडे सन १८१८ त इंग्रज बहाद्दरांच्या राज्य-कारभाराला नवीन वळण मिळाल्याकारणानें पूर्वींची वहिवाट अगदीं बदलून जाऊन परिस्थितीही बदलली. नवीन नवीन व चांगल्या गोष्टी प्रचारांत येऊं लागल्या. आणि अशा वेळीं सरकारास चांगल्या चांगल्या व योग्य माणसांची वाण भासूं लागली. ह्याच सुमारास **नाना**नीं सार्वजनिक कामांत पडून जसे ते लोकांच्या उपयोगीं पडले, त्याचप्रमाणें त्यांनीं सरकारासही अनेक प्रकारें साह्य केलें. ही काम-गिरी मनांत वागवून लोकांनीं **नानां**चा सार्वजनिकरीत्या, ते हयात असतानांच मोठा बहुमान केला, त्याबद्दलची कौतुकप्रचुर व साद्यंत हकिकत पुढें दिलेली आहे.

तात्विक दृष्टया पाहूं गेलें असतां सृष्टिनियम असा दृष्टोत्पत्तीस येतो कीं, मनुष्यानें कोणतेंही भलें वा बुरें कृत्य केलें तर त्याची फल-श्रुति त्याला इहलोकींच प्राप्त होते, किंवा त्याचा बरावाईट परिणाम त्याला इकडेच भोगावा लागतो; एखाद्यानें जर कांहीं वाईट काम केलें, तर कालांतरानें त्यास त्याचें प्रायश्चित् भोगावें लागतें. अथवा त्याचें अन्यरूपानें नुकसान होतें, हें आपण नेहमीं पहातच आहोंत. त्याचप्रमाणें जर एखाद्यानें निरपेक्षबुद्धीनें चांगलें कृत्य केलें, धार्मिक, परोपकारी, किंवा सार्वजनिक हिताचें असें कोणतेंही काम केलें, तर त्याच्या सुकृताचीं फळें त्याला इहलोकींच अन्यत-ऱ्हेनें मिळतात, असेंही आपल्या अनुभवास येतें. आणि हीच गोष्ट आमच्या चरित्रनायकास पूर्णपणें लागू पडते. अर्थात् **नानांच्या** अवघ्या राजवटींतील त्यांच्या अनेक सत्कृत्यांचीं फळें त्यांच्या हया-

तींतच त्यांस पहावयास सांपडलीं. असा सुयोग फारच थोड्यांच्या वाट्यांस येतो. किंबहुना नाहीं ह्मटल्यास अतिशयोक्ति होईल, असें आह्मांस वाटत नाहीं. हा केवळ कपिलाषष्ठीचाच योग ! ! त्याबद्दलचा सुरस व कौतुकप्रचुर कथाभाग आमच्या वाचकांस पुढें सादर करतों तो असाः—

बुधवार, ता. ९ मार्च १८६४ हा दिवस मुंबईकरांच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं नमूद करण्यासारखा मंगलप्रद झाला. कारण ह्या दिवशीं, **नानानीं** जवळ जवळ ४४ वर्षें निरलस व निरपेक्षबुद्धीनें तनमनधनेंकरून जी अव्याहत लोकसेवा बजाविली, ती मनांत वागवून त्याबद्दल त्यांचे केवळ अंशतः तरी उतराई व्हावें, ह्या उद्देशानें व **नानांबद्दल** जाहीररीत्या आदर प्रगट करण्याबद्दल टौनहॉलांत मुंबईच्या रहिवाशांनीं एक प्रचंड सभा भरविली. तिचा साद्यंत पण संक्षिप्त वृत्तांत असा आहेः—सदरहू दिवशीं मुंबईशहराचे त्या वेळचे शेरिफ **डाक्टर बर्डवुड** (हल्लीं सर जॉर्ज बर्डवुड) यांनीं मुंबईच्या रहिवाशांची एक सभा भरविली. त्या सभेंत सर्व जातीचे व धर्माचे लोक आले होते.

मुंबईंतले मोठमोठे धनाढ्य शेट सावकार, श्रीमंत व्यापारी, लहान थोर विद्वान् व इतर रहिवाशी हजर होते. त्यांपैकीं प्रमुख मंडळीचीं नांवें येणेंप्रमाणें. **सर जमशेटजी जिजिभाई बाटलीवाले ब्यारोनेट, काव्हसजी जहांगिरजी रेडीमनी, खरसेटजी नसरवानजी कामा, फ्रामजी नसरवानजी पटेल, लिमजी माणिकजी बनाजी, भगवानदास पुरुषोत्तमदास, प्रेमचंद रायचंद, करसनदास माधवदास, गोकुळदास तेजपाळ, वरजिवनदास माधवदास, धरमसी पुंजाभाई, हार्मसजी बमनजी वाडिया,**

प्रोफेसर दादाभाई नौरोजी, दिनशा माणिकजी पेटिट, नसरवानजी माणिकजी पेटिट, हार्मसजी दादाभाई, माणिकजी खरशेटजी, खरशेटजी रुस्तमजी कामा, डोसाभाई फ्रामजी कडाका, बहिरामजी जिजीभाई, दादोबा पांडुरंग, डॉ. भाऊ दाजी, डॉ. नारायण दाजी, हरिश्चंद्र सदाशिवजी हाटे, चोबे कमळाकरपंत गोपाळ, विनायकराव वासुदेवजी, कमरुद्दीन तय्यबजी, वगैरे. त्याचप्रमाणें युरोपियन मंडळीही आली होती. त्यांपैकीं प्रमुख मंडळी डा. उइलसन, ई. आय्. हावर्ड, टी. सी. ॲनस्टी, ड्यूपोर्ट, म्याकलीन्, नाईट, सिंक्लेअर, गॉर्डन, हँकॉक, हचिन्सन, केनेडी, जेकब ही होती.

मंडळी जमल्यावर डॉ. बर्डवुड हे सभेच्या कामाला सुरवात करतांना ह्मणाले कीं, " सद्गृहस्थहो ! आजच्या सभेकरितां अध्यक्षांची निवड करण्यास विनंति करण्यापूर्वीं आणि आजच्या सभेच्या कामांतून मी आपला हात बाहेर काढून घेण्यापूर्वीं आजच्या प्रसंगीं माझें ह्रद्गत जाहीररीत्या आपणापुढें मांडतों, तें हें कीं, आजची सभा भरविण्याचें सुदैवानें माझ्या वाट्यांस आलें आहे, हें मी माझें महत् भाग्य समजतों, कारण कीं, ऑनरेबल जगन्नाथ शंकरशेट यांच्या सार्वजनिक कामासंबंधानें माझा स्वतःचा ज्या ज्या बाबतींत संबंध आला, त्या त्या विषयीं मला त्यांच्याबद्दल अकृत्रिम स्नेह, कृतज्ञता आणि आदर यांचीच जोड मिळाली, हें नमूद करण्यास मला अत्यंत संतोष होतो. माझ्या कांहीं एतद्देशीय मित्रांच्या साह्यानें व्हिक्टोरिया आणि आल्बर्ट म्युझिअम आणि व्हिक्टोरिया गार्डन्स या संस्थांच्या प्रस्थापनेचा जो प्रयत्न झाला आणि ह्या कर्तृत्वामुळें मला प्रस्तुतचे मुंबईच्या शेरिफचें बहुमानजनक

पद प्राप्त झालें, याच अवधींत **नामदार जगन्नाथ शंकरशेट** सारख्या सन्मान्याचा मान करण्याचें सुदैवानें माझ्या वाट्यास आलें, ह्याबद्दल मी आपण स्वतःस धन्य मानून घेतों. (टाळ्या) सन १८५७–५९ या सालीं ज्या वेळेस शिपायांच्या बंडाचा अवघ्या हिंदुस्थानभर भयंकर वणवा पसरला होता, त्याच संधीस इकडे **व्हिक्टोरिया** आणि **आल्बर्ट म्युझिअमची** आणि विद्याभिवृद्धि व सार्वजनिक हिताची चळवळ चालू होती. (टाळ्यांचा गजर) आणि अशा आणीबाणीच्या प्रसंगीं **नामदार जगन्नाथ शंकरशेट** यांची आह्मांस पूर्ण मदत मिळाली ह्मणून अशा महाभागाची प्राणप्रतिष्ठा करण्याचें तुह्मी सर्वांनीं योजिलें आहे. तरी तुमच्या प्रयत्नास पूर्णपणें यशप्राप्ति होवो ! !

डॉक्टर बर्डवूड यांनीं अशाप्रकारचें भाषण करून ते स्थानापन्न झाले.

नंतर **शेट फ्रामजी नसरवानजी** यांनीं सूचना केल्यावरून आणि त्यास **शेट दिनशा माणकजी पेटिट** यांनीं अनुमोदन दिल्यावरून **सर जमशेटजी जिजीभाई ब्यारोनेट** हे अध्यक्षस्थानीं विराजमान झाले. अध्यक्षानीं आपल्या आरंभींच्या भाषणांत मुंबईचे त्यावेळचे लोकप्रिय **गव्हर्नर सर बार्टल फ्रिअर** यांजकडून आलेलें पत्र सभेपुढें वाचलें, त्याचा सारांश येणेंप्रमाणें:—

“ मान्यवर **सर जमशेटजी जिजीभाई** यांस, सरकारी हुद्देदार या नात्यानें कोणत्याही सार्वजनिक चळवळीमध्यें मला कोणत्याही तऱ्हेचा भाग निरुपायानें घेतां येत नाहीं. ह्याबद्दल मी आपणास पूर्वींच कळविलें आहे. तथापि **लेजिसलेटिव्ह कौन्सिल** मधील आह्मांपैकीं एका योग्य पुरुषाचा यथायोग्य सन्मान होत आहे, हें



सर बॉर्टल् फ्रिअर–मुंबई इलाख्याचे गव्हर्नर.
(हे नानांचे परम सन्माननीय स्नेही होते.)

पान १६१



सर जमशेटजी जिजिभाई बाटलीवाले, ब्यारोनेट–दुसरे–
(हे नानांचे परम स्नेही होते, **त्यांचें नांव खरशेटजी.**)

पान १६०

जुन्या चित्रांवरून.

बॉबे आर्ट प्रिंटिंग **वर्क्स.**

ऐकून मला परमावधीचें समाधान वाटतें. आणखी **शंकरशेट**मारख्या नरवरानें आपल्या अवघ्या हयातींत केलेले सार्वजनिक हितप्रयत्न आणि मुख्यत्वेंकरून विद्याभिवृद्धीसंबंधानें व त्यांत स्त्रीशिक्षणासंबंधानें त्यांनीं केलेले अविश्रांत परिश्रम ह्या गोष्टी स्मरून आपण त्यांचे अंशतः तरी उतराई होण्याकरितां आणि त्यांच्याबद्दल पूर्ण आदर व्यक्त करण्याकरितां त्यांच्या जिवंतपणींच त्यांचा यथायोग्य सन्मान व त्यांचें स्मारक करण्याचा तुह्मी चालविलेला प्रयत्न फारच प्रशंसनीय आहे. परंतु प्रस्तुतचा प्रसंग सार्वजनिक स्वरूपाचा असल्यामुळें मला त्यांत जाहिररीत्या सामील होतां येत नाहीं. ह्याबद्दल परमावधीची दिलगिरी वाटते. तथापि आपल्या अंगीकारलेल्या महत् कार्याबद्दल माझी पूर्ण सहानुभूति आहे."

शंकरशेटच्या टेस्टिमोनिअल–स्मारक–फंडाच्या वर्गणीदारांच्या पटांत माझें नांव कृपा करून दाखल करावें, अशी माझी आपणास विनंती आहे.

आपला परम,

एच्य्. बी. ई. फ्रिअर.

गव्हर्नरसाहेबाचें पत्र वाचून झाल्यावर अध्यक्षांचें प्रस्ताविक भाषण झालें. ते ह्मणाले "ज्या गोष्टी आपण श्रेष्ठतम मानतों व ज्यांच्यामुळें त्या आपल्या स्वदेश बांधवांस चिरकालिक सुखदायक, उपयुक्त व आनंदमय झालेल्या आहेत, त्या वंदनपात्र महाभाग नामदार **जगन्नाथ शंकरशेट** यांचें आजच्या प्रसंगीं जाहीररीत्या अभिनंदन करण्याकरितां भरलेल्या सभेचें अध्यक्षस्थान पत्करण्यास केलेल्या आमंत्रणाचा मी मोठ्या संतोषानें स्वीकार करतों.

ज्यांच्या अंगीं केवळ सार्वजनिक हिताचें तत्व अगदीं मुरलेलें असून त्यांच्या कर्तृत्वाबद्दल आजच्या प्रसंगीं ज्यांचा जाहीररीत्या सन्मान करण्याचा प्रयत्न चालविलेला आहे, ते महाशय नामदार **जगन्नाथ शंकरशेट** हे आमच्या घराण्याचे फार जुने स्नेही आहेत. माझा स्वतःचा त्यांच्याशीं आज पस्तीस वर्षांपेक्षां अधिक असा अकृत्रिम स्नेह आहे. आणि एवढ्याच करितां आजच्या प्रसंगीं त्यांचा सन्मान करण्याच्या बाबतींत भरविलेल्या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्यास मला अत्यंत संतोष होतो. नामदार **जगन्नाथ शंकरशेट** हे सार्वजनिक बाबतींत वयोवृद्ध झालेले आहेत ह्मणून त्यांची खरी योग्यता जाणून त्यांच्या आपण करीत असलेल्या संभावनेस माझी पूर्ण सहानुभूति आहे.

याकरितां ते मानपात्र असल्यामुळें त्यांचा एक पुतळा उभारून एक स्मारक करण्याचा जो विचार कायम झाला आहे, तो फार स्तुत्य होय.

अध्यक्षांचे भाषणानंतर प्रोफेसर **दादाभाई नौरोजी** (हल्लीं वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध, व तपोवृद्ध) हे भाषण करण्यास उठले. ते ह्मणाले, "सद्‌गृहस्थ हो! **नामदार जगन्नाथ शंकरशेट** यांनीं आजपर्यंत बजावलेल्या कामगिरीबद्दल त्यांचा यथायोग्य सन्मान करण्याकरितां आपल्या आटोक्यांत जेवढी ह्मणून उच्चतम शक्ति असेल, तितकी खर्च करून तो साजरा केला पाहिजे. **नामदार जगन्नाथ शंकरशेट** यांचे जे मज स्वतःवर अगणित उपकार झालेले आहेत, त्यामुळेंच आजच्या प्रसंगीं त्यांच्या स्मारकाची सूचना सभेपुढें मांडण्यास मला अत्यंत संतोष वाटतो. आणि त्याच उपकृतीमुळें माझे विचार कृतज्ञतापूर्वक शब्दांनीं आपणांपुढें भाषणरूपानें मांडण्याची

सांप्रत मला संधी मिळाली, ह्याबद्दल मी आपणा स्वतास धन्य मानून घेतों. ज्या वेळेस हल्लीं विद्यमान असलेल्या अनेक विद्वान् लोकांचा जन्म सुद्धां झालेला नव्हता, कित्येक तर पाळण्यांतच रांगत होते व कांहीं कांहीं बाळगोपाळ रस्त्यांत स्वेच्छाचारी इतस्ततः खेळण्यांत रममाण झालेले होते, अशाच वेळीं **नामदार जगन्नाथ शंकरशेट** यांनीं सार्वजनिक कार्याचा उपक्रम केला होता. आपल्या लोकांत विद्यादानाचें बीज जिच्यामुळें प्रथम पेरण्यांत आलें, त्या '**बाँबे नेटिव्ह स्कूल बुक अँड स्कूल सोसायटी**' नामक संस्थेची या शहरांत सन १८२२सालांत संस्थापना झाली. तिच्या उत्पादकांत **नामदार जगन्नाथ शंकरशेट हे अग्रणी** होते. सदरहू संस्थेच्या १८२४ च्या पहिल्याच अहवालांत **नामदार जगन्नाथ शंकरशेट** याचें नांव व्यवस्थापक मंडळींत दाखल झालें होतें. त्याच मंडळीचें पुढें सन १८२४ त **बाँबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी** या संस्थेंत रूपांतर झालें; तथापि ह्याही संस्थेंत **नामदार जगन्नाथ शंकरशेट** हे होतेच. नंतर सन १८४० त जेव्हां **बाँबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीनें** '**बोर्ड ऑफ एज्युकेशन**' या संस्थेकडे आपला कारभार सोंपविला, तेव्हां देखील **नामदार जगन्नाथ शंकरशेट** यांनीं उपरी निर्दिष्ट संस्थेची अव्याहत सेवा बजाविली आणि लोकांस विद्यामृत पाजण्याच्या उद्देशानें शाळा बांधण्याकरिता किंवा '**एलफिन्स्टन् प्रोफेसरशिप**' स्थापन करण्याकरितां जेव्हां वर्गणी गोळा करण्याचे प्रयत्न झाले, त्या वेळीं देखील **नामदार जगन्नाथ शंकरशेट** यांनीं द्रव्यद्वारां बरीच मदत केली. सन १८४० त **नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीनें** आपल्यावतीनें जे तिघे एतद्देशीय गृहस्थ व्यवस्थापक निवडले, त्यांत **ना. जगन्नाथ शंकरशेट** होते; आणि ते सन १८५६ पर्यंत प्रतिवार्षिक निवडणुकींत त्याच व्यवस्थापक

मंडळींत निवडून येत असत. आणखी पुढें विद्यावृद्धि करण्याचे जे जे प्रयत्न झाले, त्या सर्वांत **ना. शंकरशेट** यांचें पाऊल सदोदीत पुढें असे. ते **एल्फिन्स्टनफंडाच्या** ट्रस्टीपैकीं एक होते. याप्रमाणें जवळ जवळ सतत चाळीस वर्षें यांनीं लोकसेवा करून प्रत्येक बाबतींत द्रव्यद्वारां हरघडीस मदत केली. इतकेंच केवळ नव्हे, तर **स्टूडन्स लिटररी अँड साएन्टिफिक सोसायटी**' नामक संस्थेनें ज्या वेळेस प्रथम मुलींच्या शाळा घातल्या व ज्या शाळांस पुष्कळ लोकांकडून पहिल्या पहिल्यानें मोठा प्रतिकार करण्यांत आला, अशा संस्थेस **ना. शंकरशेट** यांनीं आपला उदार आश्रय दिला, आणि त्यांपैकीं एक मुलींची शाळा स्वखर्चानें चालविली. आणि गिरगावांतही एक *मुलांची शाळा स्वखर्चानें चालविली, याच ठिकाणीं एक संस्कृत पुस्तकालय स्थापन केलें. याप्रमाणें **नाना शंकरशेट** यांनीं विद्यावृद्धीचें बीज प्रथमताच पेरिलें आणि त्याचे उत्तम रीतीनें परिपोषण करून त्याचा पर्यायेंकरून मोठा विस्तार झालेला आज आपण पहातच आहोंत. या प्रमाणें **नानांनीं** आपणा सर्वांस अगदीं ऋणी करून ठेविले आहे.

वरील विद्यावृद्धीच्या प्रयत्नाखेरीज तितक्याच महत्वाच्या बाबतींत त्यांनीं जे उद्योग केले, त्यांच्याबद्दल आपण विचार करूं. सन १८२९ त **ना. जगन्नाथ शंकरशेट** यांनीं आह्मां एतद्देशियांस '**ग्रांडज्युरी**' मध्यें बसण्याचा अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळें म्युनिसिपालटीसंबंधानें नेटिव्हांस पूर्ण अधिकार मिळाला. पुढें १८३७ त '**जस्टिस ऑफ धि पीस**' या संबंधानें

*हें **धि जगन्नाथ शंकरशेट फर्स्ट ग्रेड अँग्लो व्हर्न्याक्युलर स्कूल** होय व हीच '**नानांची शाळा**' या नांवानें प्रसिद्ध होती.

एतद्देशियांस पूर्ण आखत्यार मिळवून देण्याचे परिश्रम केले. त्या अन्वयें प्रथमतःच जे १२ 'जस्टिसिस् ऑफ धि पीस' निवडून आले, त्यांत नानांचाही समावेश झाला. त्या १२ जे. पी. नीं '**बेंच ऑफ् पेटिसेशन**' यांत **नानांस** पहिले म्याजिस्ट्रेट ठरविलें. याच-वेळच्या सुमारास युरोपियन आणि नेटिव्ह यांस पोलिसानीं निराळ्या तऱ्हेनें वागविल्याबद्दल सरकारची बरीच कानउघडणीं केली. पुढें शहरसुधराईची कमिटी स्थापन झाली, त्यांतही **नाना** होतेच आणि **बोर्ड ऑफ कॉंझर्व्हन्सी**, ह्या संस्थेंत **नानांची** नेमणूक झाली. त्यांतही **नानांनीं** सात वर्षांपेक्षां अधिक मोठ्या चतुराईनें उत्तम रीतीनें कामगिरी बजाविली; आणि अद्यापपर्यंतही ते परिश्रम करीत आहेतच. सदरहूप्रमाणें या इलाख्यांत ज्या वेळेस **रेल्वे** सुरू झाली, तिला **नानांचें** बरेंच पाठबळ होतें.

आतां आपण 'पोलिटिकल'—राजकीय-बाबतीविषयीं विचार करूं. मुंबई शहरांत '**बॉंबे असोसिएशन**' नामक जी राजकीय संस्था उपस्थित झाली, त्यांत **नाना** हे अग्रगण्य होते. आणि ह्या संस्थेच्या विद्यमानें, एतद्देशियांस मुंबई इलाख्याच्या **कायदेकौन्सिलमध्यें** समावेश होण्याचा जो अधिकार प्राप्त झाला, त्या अन्वयें **नाना** हे सदरहू कौन्सिलमध्यें पहिले एतद्देशीय गृहस्थ निवडून आले; त्यांनीं **कायदे कौन्सिलांतही** अप्रतिम कामगिरी बजाविली.

धार्मिक बाबतींतही पैशाचा व्यय करण्यासंबंधानें **नानांचें** पाऊल सदा पुढें असे. त्यांनीं कैक धर्मशाळा बांधल्या, दवाखाने घातले, रस्ते बांधले, अशीं परोपकारिक कामें पुष्कळ केलीं आहेत.

याप्रमाणें कोणत्याही बाबतीसंबंधानें पाहूं गेलें असतां **नानांनीं** द्रव्यसाह्य केलें. कोणतीही सार्वजनिक गोष्ट करणें झाली तर मदती

करितां **नानां**कडे धांव घेतली, आणि ती विफळ झाली, असें कधींही घडलें नाहीं.

यावरून आपणा सर्वांच्या ध्यानांत आलेंच असेल कीं, एखाद्या एतद्देशियाच्या हातून सार्वजनिक कामगिरी बजावण्याचें जितकें शक्य आहे, तितकी **जगन्नाथ शंकरशेट** यांनीं खास बजाविली आहे. या प्रमाणें **ना. जगन्नाथ शंकरशेटनीं** देशसेवा उत्तम तऱ्हेनें बजावलेली आहे, यांत तिळप्राय शंका नाहीं. **सर जमशेटजी जिजीभाई, ना. जगन्नाथ शंकरशेट, मि. फ्रामजी कावसजी** आणि **बमनजी होरमसजी** ह्या चौघां असामींनीं जी निरपेक्ष लोकसेवा बजाविली, याकरितां या चौघांचें आपणांस कधींच विस्मरण पडणार नाहीं. ह्मणून अशा माणसांचा सन्मान लोकांनीं करणें ह्मटलें ह्मणजे त्यांनीं आपला स्वतःचाच सन्मान करून घेण्यासारखें होय.

अशा आशयाचें **प्रो. दादाभाई नौरोजी** यांनीं भाषण केल्यानंतर खालील सूचना सभेपुढें मांडली, कीं ' **ना. जगन्नाथ शंकरशेट** यांनीं जी जवळ जवळ चाळीस वर्षें लोकसेवा बजावली, त्याबद्दल त्यांचे उतराई होण्याकरितां व त्यांचा यथायोग्य सन्मान करण्याकरितां **व्हिक्टोरिया** आणि **ऑलबर्ट म्युझिअममध्यें** त्यांचा एक संगमरवरी दगडाचा पुतळा उभारण्यांत यावा. "

वरील सूचनेवर सभेचे अध्यक्ष हे आतां लोकमत घेणार, इतक्यांत त्यावेळचे सुप्रसिद्ध ब्यारिस्टर मि. टि. सी. **ॲन्स्टी** यांनीं सभेपुढें दरखास्त मांडली कीं, " आजच्या प्रसंगीं **ना. जगन्नाथ शंकरशेट** यांच्या स्मारकासंबंधानें विचार करण्याची मुंबईचे शेरीफ यांनीं मुंबईच्या रहिवाशांवर जी कामगिरी लादलेली आहे, ती त्यांस करण्यास भाग न पाडतां ती रिकिझिशनिस्ट लोकांनींच करावी "

अशा आशयाचें भाषण करून **ना. जगन्नाथ शंकरशेट** हे इतक्या मानपानास पात्र नाहींत, असें ह्मणून खुद्द त्यांच्या विरुद्ध भाषण करण्यास सुरवात केली.

आतां आपण **ॲनस्टी** ब्यारिस्टर साहेबांबद्दल दोन शब्द लिहूं. हे मोठे कायदेपंडित असून त्यावेळीं मुंबई शहरांत त्यांच्या तोलाचा एकही ब्यारिस्टर नव्हता. हायकोर्टांत ते आपल्या अशिलाच्या वतीनें एकदां कां बोलावयास उभे राहिले, तर त्यांच्यापुढें विरुद्ध पक्षाचा कोणताही ब्यारिस्टर सहसा टिकत नसे, अशी त्यांची मोठी ख्याती होती.

मग रीतीप्रमाणें अध्यक्षांनीं **प्रो. दादाभाई नौरोजी** यांची मूळ सूचना आणि त्यावर मि. **ॲनस्टी ब्यारिस्टर** यांची दरखास्त सभेपुढें मांडली. मग सदरहू दरखास्त अगदीं पालथी पडून स्मारक करण्याची मूळ सूचना टाळ्यांच्या प्रचंड गजरांत मंजूर झाली.

सदरहू सूचना पास झाल्यानंतर शेट **होरमसजी दादाभाई** नांवाचे प्रसिद्ध विद्वान् गृहस्थ, ज्यांनीं इंग्लंडांत कैक वर्षें आपल्या आयुष्याचे दिवस घालवून तद्देशीय लोकांच्या चालीरीतींचें सूक्ष्म रीतीनें निरीक्षण केलें होतें, व पुष्कळ ज्ञान संपादन केलें होतें, त्यांनीं सभेंत उठून **आनस्टी** साहेबांविरुद्ध मोठें खरमरीत व जोरदार भाषण केलें. ते ह्मणाले कीं, **ना. जगन्नाथ शंकरशेट** यांच्या लौकिकास बाध येईल, अशा तऱ्हेचे यांनीं जे उद्गार काढले, ते ऐकून तर माझ्या अंगावर शहारेच आले. **ना. जगन्नाथ शंकरशेट** ह्या महाभागाची इतर सामान्य मनुष्याबरोबर तुलना करून त्यांची नालस्ती करणें, हा निवळ मूर्खपणा होय. **ना. जगन्नाथ शंकरशेट** यांच्या अवघ्या व्यवहारक्रमाचें गेलीं तीस वर्षें मी सूक्ष्म

रीतीनें निरीक्षण करीत आलों आहें. त्यांनीं जीं आजपर्यंत मोठमोठीं आश्चर्योत्पादक कामें केलीं व लोकसेवा बजावली, ती फार अप्रतिम होय. एखाद्याचा सूड उगविण्याच्या उद्देशानें त्याच्यावर तुटून पडणें, हें मोठें अनुदारपणाचें व तिरस्करणीय कृत्य होय. कारण **ना. जगन्नाथ शंकरशेट** यांचें जनहितपदाचीं कृत्यें करणें हें अत्युच्च वैभवशिखर होय, आणि तेंच त्यांच्या वैऱ्यांस निंदास्पद होय. **ना. जगन्नाथ शंकरशेट** हे कांहीं साधारण कोटींतले नव्हत, हें **मि. ॲनस्टी** ह्यांस माहीत असेलच, कारण त्यांनीं एकाच विवक्षित जातीच्या कल्याणाकरितां आपलें आयुष्य कांहीं वेंचलें नाहीं, तर सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांचें कल्याण करण्याकडे त्यांनीं आपल्या आयुष्याचा बराच भाग खर्च केला !! इत्यादि इत्यादि.

अशा आशयाचें भाषण करून **मि. होर्मसजी दादाभाई** हे स्थानापन्न झाले, आणि नंतर रीतीप्रमाणें मोठमोठ्या नामांकित गृहस्थांची एक कमिटी नेमून वरील स्मारकाकरितां वर्गणी गोळा करण्याचा ठराव झाला. नंतर प्रसिद्ध **डॉ. वुलसन्** हे बोलण्यास उभे राहिले, त्यांनीं त्या सभेत एक उत्कृष्ट भाषण करून **ना. जगन्नाथ शंकरशेट** यांचा व त्यांच्या आयुष्यक्रमांतील अतिमहत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख केला. ते ह्मणाले कीं, **नामदार जगन्नाथ शंकरशेट** ह्यांचा सन्मान करण्याकरितां जी सभा भरविलेली आहे, तींत आपलें ह्मणत मांडण्यास मला परमावधीचा संतोष होतो. **मि. ॲनस्टी** व **मि. मॅक्लिन** यांनीं सभेतील ऐक्याचा कांहींसा भंग केला, हें सर्वथैव अनुचित होय. सभेचा ओघ प्रथमपासून कोणत्या दिशेकडे आहे, हें त्यांनीं सावधान व विचारपूर्वक दृष्टीनें पाहिलें असतें, तर त्यांच्या

कडून अशाप्रकारचें वर्तन आज खचित झालें नसतें. स्मारक कोणत्या रूपांत करावें, ह्याबद्दल मतभेद होणें गैर नाहीं; तथापि आजच्या प्रसंगासंबंधानें पूर्वसभेंत जो विचार कायम झाला होता, त्याकडे लक्ष देऊन आजच्या सभेंत निरर्थक प्रलाप करण्याचें कांहींएक प्रयोजन नव्हतें. **ना. शंकरशेट** यांच्या एतद्देशीय चाहत्यांचें जर त्यांचें स्मारक, पुतळा उभारण्याचें मानस असेल, तर त्यांस तो खुशाल करूं द्या. ह्या कार्यास हाताबोटांवर मोजण्या इतक्या माणसांनीं प्रतिकार करणें, सर्वथैव हास्यास्पद आहे. आणि **शंकरशेट** यांचीं खरी योग्यता ज्यांस माहीत आहे, ते खरोखर असें अश्लाघ्य वर्तन कधींहीं करणार नाहींत.

मी जेव्हां **प्रथम** १८२९ त हिंदुस्थानांत आलों, तेव्हांपासून आज जवळ जवळ ३९ वर्षें **ना० जगन्नाथ शंकरशेट** यांचा चरित्रक्रम फार बारकाईनें पहात आलों आहें. जरी ते त्यावेळीं वयानें लहान होते, तथापि ह्या ठिकाणीं ते एतद्देशियांचे केवळ पुढारी होते. जरी ते अमर्याद संपत्तीचे जगत्शेट नव्हते, किंवा विद्वान् पंडित नव्हते, किंबहुना योद्धे, क्षत्रिय अथवा सरदार नव्हते, तथापि हिंदुबहुजनसमूहाचे एक स्वयंसिद्ध वजनदार अध्वर्यु होते. आणखी विद्यावृद्धीविषयक, परोपकारिक आणि औदार्यपूरित ,अशा कृत्यांनीं आणखी एतद्देशीय व युरोपियन या उभतांमधील प्रेमभाव व जनपदशिष्टाचार राखण्याचें त्यांचें धोरण यामुळें त्यास वरील उच्चतम पद आपोआपच प्राप्त झालें आहे. **प्रो० दादाभाई नौरोजी** यांनीं मघां ह्मटल्याप्रमाणें एतद्देशियांत विद्याभिवृद्धीचें बीजारोपण करण्याचा प्रयत्न प्रथम त्यांनीं केला.

माऊंटस्टचुअर्ट एल्फिन्स्टन् साहेबांच्या कारकीर्दीपासून नानाविध विषयांवर ग्रंथ प्रसिद्ध करण्याकरितां ह्यांनीं पुष्कळ साहाय्य केलें; आणि अगदीं अलीकडे विद्याविषयक बाबतींत ते सरकारचे मसलतगार आहेत. आणि ह्याच संबंधानें एकेवेळीं लोकमत अगदीं प्रक्षुब्ध झालें होतें. त्यावेळीं त्यांनीं काढलेले उद्गार फार विचार करण्यासारखे आहेत. ते म्हणाले ' विद्येच्या बाबतींत होणारे स्वाभाविक व योग्य परिणाम ग्रहण करण्यास आपण तयार असलें पाहिजे.'

कलकत्याचे **लाट साहेब लॉर्ड उइलियम बेंटिक** यांनीं सन १८२९ त जेव्हां '**सतीजाणें**' बंद केलें, त्या संबंधांत इकडे **मुंबईचे गव्हर्नर सर जॉन मालकम** यांस या बाबतींत रयतेची सम त पाडण्यांत **ना० जगन्नाथ शंकरशेट** यांनीं चांगलें साह्य केलें.

याप्रमाणें **ना. जगन्नाथ शंकरशेट** यांनीं स्वदेशाभिमान, दातृत्व, स्वराजनिष्ठा, सामाजिक, म्युनिसिपल प्रगती वगैरे गोष्टींसंबंधानें उत्तमोत्तम कामगिरी बजाविली, ती फार अमोल आहे."

पुढें वर्गणी गोळा करून पहातां ती पंचवीस हजार रुपये जागच्या जागीं गोळा झाली. मग रीतीप्रमाणें अध्यक्षांचे आणि मुंबईचे शेरिफ **डॉ० बर्डवुड** यांनीं ती सभा बोलविल्याबद्दल त्यांचे आभार मानण्याच्या सूचना सभेपुढें मांडून त्याही मंजूर झाल्या.

सभा विसर्जनापूर्वीं अध्यक्षांच्या नांवाचा आणि **ना. जगन्नाथ शंकरशेट** यांच्या नांवाचा त्या प्रत्येकीं तीन तीन वेळां टाळ्यांच्या प्रचंड गजरांत जयघोष झाला, तो इतका कीं, एवढें मोठें टाऊनहॉल, पण तें वरील गजरानें बराच वेळपर्यंत दुमदुमत राहिलें.

याप्रमाणें लोकांचें बरें केल्यानें किंवा त्यांच्यावर उपकार केल्यानें याबद्दलचा मोबदला आपणास अनपेक्षित मिळतोच. आणि त्यांत आश्चर्य असें कांहीं नाहीं. तेव्हां लोकांनीं कृतज्ञता बुद्धीनें **नानां**चा जो कांहीं गौरव केला, तो तर यथार्थच होय. परंतु खुद्द **नानांनीं** जी निरपेक्षबुद्धीनें लोकसेवा बजाविली, त्या संबंधानें असें ह्मणावें लागतें कीं, परोपकार केल्यानें जें पुण्य गाठीं पडतें, तसें शंभर यज्ञ केल्यानें प्राप्त होत नाहीं. कारण ह्मटलेंच आहे कीं,

परोपकारजं पुण्यं न स्यात्क्रतुशतैरपि

भाग तेरावा.

वैभवोन्नति.

सत्कीर्ती नौबदिचा डंका गाजे मग शंकाच नको ।

अनंतफंदी.

सुरमंडळीं सहस्रनयन । ग्रहमंडळीं सहस्रकिरण ॥
पाताळभुवनीं सहस्रवदन । तेवीं तो मान्य भूतळीं ॥

मुक्तेश्वर.

कर्तृत्ववान् व तेजस्वी पुरुष कोणत्याही परिस्थितींत जरी असला, तरी तो कांहीं लोपून जात नाहीं. तो प्रकाशमान व्हावयाचाच. **कोहिनूर, कुलिनन**सारखीं तेजःपुंज रत्नें मृत्तिकाभिसरण जरीं झालीं, तरी चमकणारच. कारण कविचूडामणी मोरोपंतांनीं ह्मटल्याप्रमाणें '**जरि उकिरड्यांत पडला, मळला न हिरा तथापि सामान्य**' या न्यायानें स्वयंप्रकाशित रत्नें आपोआपच झळकतात. आमच्या चरित्रनायकानें आपल्या ऐन उमेदींत सार्वजनिक व लोकोपयोगी कामें करण्याची हौस बाळगून जी लोकसेवा बजाविली, व ज्यामुळें ती लोकांस मान्य होऊन **नाना** हयात असतांच त्यांचें चिरस्मरणीय स्मारक करून त्यांनीं आपली कृतज्ञता प्रगट केली, त्या आमच्या चरित्रनायकांचें वैभवशिखर केवळ आस्मा-

नास जाऊन पोहोंचलें, हें आह्मी ह्या पुस्तकांत वेळोवेळीं वर्णन केलेल्या गोष्टींमुळें वाचकांस सहज कळून येईल. **नाना** आधीं गर्भश्रीमंत. त्यांत त्यांस घरची उत्तम शिस्त लागलेली, विद्वान् गुरुवर्यांच्या हाताखालीं उत्तमप्रतीचें शिक्षण मिळालेलें, इतक्या गोष्टींची जिकडे जोड मिळालेली, तिकडे गुणातिशयास काय उणीव ! ! **नानांनीं** जेव्हां अगदीं पूर्ववयापासून लोकसेवेस कंबर बांधली, तेव्हांपासूनच त्यांची उत्तरोत्तर वाहवाच होत गेली, लोकांत व सरकारांत यथास्थित मानपान मिळत गेला. इतकेंच केवळ नव्हे, तर मोठमोठे राजेरजवाडे ह्मणजे कोल्हापुरचे **श्रीमंत छत्रपती**, बडोद्याचे **गायकवाड**, इंदूरचे **होळकर** तों तहत **सांगली**, **मिरजकरांसारखे** संस्थानिक यांजकडून **नानांचा** योग्य सन्मानच होत गेला. **नाना** हे कायदेकौन्सिलचे एक एतद्देशीय वजनदार सभासद व सरकार दरबारांत त्यांचा चांगला मानमरातब असल्यामुळें राजेरजवाडे व इतर संस्थानिक त्यांची सल्लामसलत घेण्याकरितां हरहमेश त्यांजकडे येत जात असत; असो.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वरंगांत तिकडे उत्तर हिंदुस्थानांत प्रसिद्ध राजकार्यधुरंधर **रावराजे सर दिनकरराव राजवाडे** यांनीं ज्या प्रमाणें अनेक प्रभूंची सेवा बजाविली आणि मुख्यत्वेंकरून सन १८५७।५८ सालांतील प्रसिद्ध शिपायांच्या बंडाच्या राष्ट्रीय महत्संकटकाळीं आपले धनी ग्वालेरचे **श्री० जयाजीराव शिंदे** यांची बाजू उत्तम राखून इंग्रजसरकारच्याही विश्वासास पात्र झाले, त्याचप्रमाणें इकडे दक्षिणभागांतही **नानांनीं** अनेक बाबतींत निरपेक्ष लोकसेवा बजावून सरकारासही राजी ठेवलें; तर वरील उभयतां नररत्नें सरकारच्या कृपेस पात्र कां नाहीं होणार ? ज्याप्रमाणें

तिकडे **सर रावराजे दिनकरराव** यांनीं राजसेवा बजावून त्यांजकडून धन्यवाद घेऊन आपलें नांव इतिहासांत प्रमुखस्थानीं करून ठेवलें आहे, त्याचप्रमाणें इकडे **नांना**नींही लोकसेवा बजावून आपलें नांव मुंबईइलाख्याच्या इतिहासांत चिरकालीक व संस्मरणीय करून ठेवलें आहे.

नानांच्या वेळेस मुंबईत ज्या ज्या ह्मणून लोकोपयोगी अनेक संस्था अस्तित्वांत आल्या, त्या प्रत्येकींत **नानां**चें प्रमुखपणें अंग असे. इतकेंच केवळ नव्हे, तर त्या प्रत्येकींत **नानां**नीं तनमनधनेंकरून मदत करून त्या बहुतेक बाबतींत त्यांनीं अध्यक्ष, ट्रस्टी, डायरेक्टर इत्यादि बहुमानदर्शकपदांनीं कामगिरी बजाविली.

नाना हे खानदानींतले व गर्भश्रीमंत असल्यामुळें त्यांचा मुंबई शहरांतल्या इतर चांगल्या घराण्यांशीं अकृत्रिम स्नेहसंबंध असे. प्रख्यात कुबेरतुल्य **बाटलीवाल्यां**चे घराण्यांतील दुसरे **ब्यारोनेट सर खरशेदजी जमशेटजी जिजीभाई बाटलीवाले, ब्यारोनेट** ह्यांशीं **नानां**चें फार सख्यत्व होतें. तें इतकें कीं, हरएक सार्वजनिक काय, राजकीय काय किंवा सामाजिक बाबतींत ही परस्परांच्या विचाराशिवाय काडीही हालत नसे. खुद्द **बाटलीवाले**च **नानां**ची सल्लामसलत घेत असत. मुंबई शहरांतील इतर प्रसिद्ध घराण्यांपैकीं नामदार **सर आगाखान, सर डेव्हिड सासून, सर थारया टोपन, महमद अल्ली रोगे, माणकजी पेटिट, वाडिया, वार्जिवनदास माधवदास, रामलाल, भाऊ रसूल, आत्माराम माधवजी, आत्माराम केशव भांडारे** वगैरे त्या वेळच्या प्रसिद्ध घराण्यांशीं **नानां**चा चांगला स्नेह असे. वरील पैकीं कांहीं घरण्यांना **नानां**नीं ऐन आणिबाणीच्या प्रसंगीं साह्य केल्याचे दाखले मिळतात.

ही फक्त मुंबईतील धनिकांविषयीं गोष्ट झाली. परंतु **कोल्हापूरचे श्रीमंत** छत्रपतीसारखे राजेरजवाडे, **थोरले श्रीमंत सयाजीराव** व **गणपतराव गायकवाड, तुकोजीराव होळकर** वगैरे मोठमोठीं माणसें **सांगलीकर, मिरजकर, इचलकरंजीकर, कुरुंदवाडकर, रास्ते, ढमढेरे, मिरजकर, पानसे** वगैरे बडी बडी मंडळी **नानांच्या** अतिपरिचयाची होती. ह्मणजे हीं माणसें **नानांशीं** मित्रत्वाच्या नात्यानें संबंध ठेवीत असत. **अलीबागचे बाबासाहेब आंग्रे-बिवलकर**-हे तर **नानांच्या** सल्ल्याबाहेर कधींही जात नसत. त्यांशीं त्यांचा मोठा स्नेह असे. तो इतका कीं, एके प्रसंगीं **आलीबागेस** आंग्र्याच्या येथें लग्नसमारंभ असल्यामुळें **नानांस** लग्नाचें आमंत्रण तर रीतीप्रमाणें पाठविलेंच होतें, पण **आंग्र्यांनीं नानांस** आणण्यास आपली स्वतःची बोटही पाठविली होती. त्याप्रमाणें **नानांनीं** आपल्या इतमामाप्रमाणें बरोबर मंडळी व सेवकपरिवार घेऊन त्यांची स्वारी **आलीबागेस** येऊन दाखल झाली. लग्नकार्यप्रसंगीं परस्परांचे आहेरपाहेर प्रत्येकाच्या इभ्रतीप्रमाणें झाले, व मानपान यथायोग्य झाला. त्यांत सांगावयाची गोष्ट ही कीं, **श्री० अंग्र्यांनीं** अवघा लग्नसमारंभ **नानांच्या** अनुमतानें व त्यांच्या खुद्द देखरेखीखालीं उरकून घेतला. याचें तात्पर्य हेंच कीं, **आंग्रेसरकार** व **नाना** या उभयतांमध्यें पूर्ण स्नेहभाव असल्याखेरीज इतक्या अगत्यपूर्वक गोष्टी घडून आल्या नसत्या, हें उघड आहे.

नानांचा पिंड अगदीं बालपणापासून सुखसंपन्नतेंत वाढला असून गृहशिक्षा चांगली असल्यामुळें त्यांच्या तारुण्यांत व उत्तर वयांत त्यांचे विचार उदात्त व प्रगल्भ झालेले होते; आणि हें स्वाभाविक आहे. कारण कोंवळेपणांत मुलांस जी शिक्षा लावावी, तिचाच बरा

वाईट परिणाम त्यांच्या हृत्पटलावर ठाम होतो, असें हरघडीस आपल्या प्रत्ययास येतें. **नानांस**ही त्यांच्या पूर्ववयांत सुशिक्षणाचें बाळकडू पाजलें असल्यामुळें त्याचा परिणाम त्यांजवर चांगलाच व हितकर झाला, ह्यांत नवल तें कोणतें !! आणि म्हणून त्यांचे आचार-विचार तद्रूप होऊन त्याचा अपूर्व लाभ जनतेस मिळाला, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी होय !!! आणि त्यामुळेंच त्यांचा अवघा आयुष्यक्रम श्रेयस्कर झाला, हें इकडे नमूद करण्यास आम्हांस फार संतोष होतो.

आमच्या चरित्रनायकाची एकंदर रहाणी एखाद्या उमरावाप्रमाणें असे. त्या मानानें त्यांचा इतमामही मोठा होता. पदरीं वडिलोपार्जित व स्वकष्टार्जित गजांतलक्ष्मी असल्यामुळें त्यांस कोणतेही बाबतींत कम-तरता नव्हती, कशाचीही ददात नव्हती. तैनातीस सेवकजनाचा परिवार मोठा होताच; त्यामुळें पुष्कळ कुटुंबाचा योगक्षेम चांगल्या रीतीनें चाले. आणि पुष्कळ निराश्रित कुटुंबें त्यांच्यावर अवलंबून असत. त्यांच्या पागेंत एकंदर एकापेक्षां एक व तेजदार असे तीस घोडे होते. जोडीच्या अशा आठ दहा गाड्या होत्या, आणि त्याच मानानें एका घोड्याच्या गाड्यांची संख्या मोठी होती. ही पागेची मोजदाद खुद्द **मुंबईं**तील झाली. याखेरीज **पुणें** मुकामीं चार गाड्या आणि सहा घोडे ठेविलेले असत. शिवाय लग्नकार्यप्रसंगीं, दरबारोत्स-वाच्या वेळीं, दिपवाळीच्या दिवसांत पेढ्या किंवा लाईट पाहण्यास जाते-समयीं वगैरे उपयोगाकरितां एक चार घोड्यांचा नकशीदार व उत्तम शृंगारेलला मोठा * रथ असे. त्याच्या सहाही खिडक्यांस रेशमी पडदे

* हा चार घोड्यांचा रथ त्या वेळचे मुंबईचें गव्हर्नर **सर रिव्हिट कार-न्याक** यांजपासून **नानांनीं** दहा हजार रुपयांस विकत घेतला होता, असें आम्हांस चांगल्या आधारावरून कळतें.


सोडून वरल्या अंगाला साटणीच्या झालरी लावलेल्या होत्या व त्यांमधून जरतारी गोंडे सोडलेले होते. आंतील बैठकही परांच्या गादीनें मढविलेली मृदु असून वर उंची मखमालीचें आच्छादन घातलें होतें. तो रथ उंच कमानीवर बसविलेला असून झुलता होता. म्हणजे त्यांत बसतांना केवळ पालखींत बसण्याचा भास होत असे. सारथीपीठ अथवा मोतद्दारास बसण्याची जागा उंच असून त्यावर मखमाली जरीबुटीच्या झुली ठेवलेल्या असत. सारथीपीठाच्या दोहों बाजूंस रुप्याचे दोन नकशीदार उंची कंदील जोडलेले असत, त्यामुळें सदरहू रथास अप्रतिम शोभा आलेली होती.

याप्रसंगीं प्रसिद्ध **रघुनाथपंडित** कवीच्या एका श्लोकाची आठवण होते. तो हा कीं, पंडितांनीं नलोपाख्यानांत पुण्यश्लोक नळराजाच्या वैभवाचें वर्णन केलें आहे कीं, ‘ द्वारीं झुलोत गज सिंह हिंसोत तेजी ! ’ गाजी तुला सकल लोक असोत राजी ॥ वगैरे. तरी वरील वर्णनाशीं **नानां**चें वैभववर्णन किती यथार्थरीतीनें साम्य पावतें, हें **नानां**ची अवघी अमदानी ज्यांनीं ज्यांनीं म्हणून प्रत्यक्ष नजरेनें पाहिली असेल, त्यांसच त्याची चांगली साक्ष पटेल, असो.

नानांचे तीर्थरूप **शंकरशेट** हे पहिल्या पहिल्यानें व्यापारोद्देशानें **घोडबंदराहून मुंबईस** जात येत असत, हें मागील एका भागांत निवेदन केलें आहे. पुढें कांहीं दिवसांनीं **मुंबई** मुकामीं जुन्या मार्केट नजिक जागा खरेदी करून तिकडे स्वतःकरितां एक रहातें घर बांधलें. तेव्हांपासूनच त्यांच्या व्यापारास दिवसेंदिवस चढती कळा लागत गेली. त्या मानानें त्यांनीं **मुंबईंत** अधिक जमीनजुमला खरेदी करून स्थावर मिळकत पुष्कळ वाढविली. कालांतरानें पालव किंवा गिरगांवच्या मोठ्या रस्स्यावर आपल्या लौकिकास साजे असा एक मोठा

टोलेजंग वाडा बांधला. त्याच्या आजुबाजूला बगीचा करण्याकरितां मोठी जागा राखून एक मोठा टोलेजंग वाडा पूर्वाभिमूख उभारला आहे. हा वाडा म्हणजे त्या वेळीं मुंबईचें एक मोठें भूषणच होऊन राहिलें होतें. वाडा दुमजली असून अगदीं पेशवाईथाटाचा बांधलेला आहे. एका माणसाच्या उभारीपर्यंत उंच जोतें धरून त्यावर इमारतीची उभारणी केलेली आहे. ओटी विस्तृत लांब रुंद आहे. पेढीचें दालन, त्याच्या पिछाडीस मोठें माजघर, आंत दोहों बाजूस दोन दोन अशा मोठ्या चार खोल्या, त्याच्या पाठिमागें आंतील मोठें दालन. पुढें मोठा चौक. त्याच्या दोहों बाजूंस दोन मोठ्या खोल्या. त्यांपैकीं एका खोलींत मूदपाकखाना व दुसरींत कारण-परत्वें उपयोगांत येण्याकरितां स्वयंपाकासाठीं राखून ठेवलेली जागा आहे. चौकामध्यें उत्तम फरशीदार असा चौकोनी चवथरा करून त्यावर उत्तम तुळशीवृंदावन बांधलें आहे. त्यामुळें चौकाला अप्रतिम शोभा आलेली आहे. चौकाच्या पिछाडीस एक मोठें स्नानगृह आहे.

पहिल्या मजल्यावर जाण्याकरितां ओटीला लागून असलेल्या दालनांतून उजव्या हाताकडून एक काळ्या फरसबंदीचा नागमोडी जिना आहे. हा जिना पाहतांक्षणींच वाड्याच्या वैभवाचें चित्र दृग्गोचर होतें. ह्या जिन्यानें वर चढून गेल्यावर जें पहिलें दालन लागतें, त्यांत ज्या अनेक तसबिरा टांगलेल्या आहेत, त्यांतच जिना संपतांच आपल्या समोर ह्या वैभवशाली पुरुषाची त्याच्या पूर्ववयांतली तेलाच्या रंगांत रंगविलेली एक मोठी सुंदर तसबीर दृष्टीस पडते, नानांनीं आपल्या अठरावे वर्षीं जनसेवा व सार्वजनिक कृत्यांच्या अफाट मैदानावर जेव्हां पाऊल ठेवलें, त्यावेळची ही तसबीर होय. ही इतकी सुंदर व हुबेहुब आहे कीं, ती पहातांक्षणींच आपल्या मनांत एका प्रकारचा पूज्यभाव उत्पन्न होतो. ह्या तसबिरीची आणखी ध्यानांत



नानांचा पालवावरील भव्य वाडा.

पान १७८

चित्रकार:—

रा. मो. ना. कीर्तीकर.

बॉंबे आर्ट प्रिंटिंग वर्क्स




नानांच्या पालवावरील वाड्याचा फरसबंदीचा नागमोडी जिना.

चित्रकारः—

रा. मो. ना. कीर्तीकर.

पान १७

बॉंबे आर्ट प्रिंटिंग व



नानांच्या वाड्याचा भव्य दिवाणखाना.

पान १७९

चित्रकारः-
रा. मो. ना. कीर्तीकर.

बाँबे आर्ट प्रिंटिंग वर्क्स.

ठेवण्यासारखी अशी एक गोष्ट आहे कीं, ही तसबीर **नानांच्या** अठरावे वर्षीं रंगविली, तथापि त्या चेहऱ्यावरून ते राजबिंडे पंचवीस वर्षांचे तरणेबांड व तेजस्वी पुरुष दिसतात. इतकी त्यांची शरीरयष्टी सतेज व सपिंड होती.

वरील दालनांतूनच दिवाणखान्यांत जाण्याचा मार्ग आहे. दिवाणखान्यांत पाऊल टाकतांच तो तिकडील वैभवप्रचुर चिन्हांनीं सजविलेला पाहून आपलें मन प्रथमदर्शनींच प्रसन्न होतें. दिवाणखान्यांचा एकंदर थाट कांहीं अपूर्व आहे. श्रीमंतीथाटाप्रमाणें त्यांत सर्व गोष्टींची व इतर उपकरणांची अगदीं रेलचेल आहे. उंची बिलोरी सामानानें तो सुशोभित केलेला आहे. हा जोडदिवाणखाना आहे. त्यापैकीं मुख्य मोठ्या दिवाणखान्यांत मध्यंतरी एक मोठा झुंबर साखळदंडानें टांगलेला आहे. ह्या झुंबरास खालीं बारा वालशेडस व वर आठ शेडस बसविलेलीं आहेत. व त्याच्या सर्व अंगास उंची लोलक लटकाविलेले आहेत. त्यामुळें त्यास अप्रतिम शोभा आलेली आहे. त्या झुंबराच्या दोहोंबाजूंस दोन पण जरा लहान झुंबर टांगलेले आहेत. चारही बाजूंच्या कोपऱ्यांत चार लोलकयुक्त मून आहेत. मधून मधून हंड्या व बिलोरी कांचेचे रंगीबेरंगी गोल लटकाविलेले आहेत. अलीकडे छताला व भिंतींस इन्क्यांडिसन्ट ग्यासलाईटची योजना: केलेली आहे. कारणप्रयोजनप्रसंगीं सदरेमध्यें दिव्यांची रोषनाई केलेली पाहून पाहणारांचे डोळे दिपून जातात. दिवाणखान्याच्या भिंतीस मोठमोठाले आयने लाविलेले आहेत. मुख्य बैठकीच्या मागच्या बाजूच्या भिंतीस वरल्या छताला पोहोंचेसा एक मोठा आयना टांगलेला आहे. व त्याच्या दोहोंबाजूंस मोठाल्या तेल्यारंगांत कुशल कारागिराकरवीं रंगविलेल्या दोन तसबिरा—लाईफ

साईझ—आहेत. त्यांपैकीं एक आमचे चरित्रनायक **श्रीमंत जगन्नाथ** ऊर्फ **नाना शंकरशेट** ह्यांची आहे व दुसरी त्यांचे एकुलते एक चिरंजीव **श्रीमंत विनायकराव** ऊर्फ **बाबासाहेब** ह्यांची आहे. **नानांच्या** तसबिरीच्या समोरच्या बाजूस **शंकरशेट** यांची तसबीर आहे. आणखी बाबासाहेबांच्या समोर त्यांचे चिरंजीव **भवानीशंकर** ऊर्फ **बाळासाहेब** यांची तसबीर आहे. त्या प्रत्येकाच्या चेहेरेपट्टीवरून चार तऱ्हांच्या चार वृत्ति पहाणारास स्पष्ट दिसून येतात. **शंकरशेटच्या** प्रतिमेवर लक्ष्मीची छाया दृग्गोचर होते. **नानांकडे** पाहिलें तर वैभवसंपन्नतेची साक्ष पटते; **बाबासाहेबांच्या** चेहऱ्याकडे अवलोकन केलें असतां गंभीरपणाचा आविर्भाव दिसतो, आणि **बाळासाहेबांच्या** चेहऱ्याकडे दृष्टी फेंकली असतां वरील तीन्हीं प्रतिमांत दृश्यमान होणाऱ्या निरनिराळ्या वृत्तींचें जणूं एकीकरण झालेलें आहे, असें पहावयास मिळतें. सात वर्षांची ती चिमुकली श्याममूर्ति, परंतु चेहरा पाणीदार, तोंडवळा गोंडस, डोळ्यांत विलक्षण प्रकारची चमक, सारी अंगलट सपिंड व वळणदार आणि कांती श्यामवर्ण असून एकंदर चेहरा राजबिंडा व फार मोहक दिसतो. दुसरी गोष्ट अशी कीं, खुद्द ही तसबीर काढणाराची कुशलता इतकी दिसून येते कीं, तसबिरीसमोर उभें राहिलें असतां आपणास असा भास होतो कीं, **बाळासाहेब** आतां आपणाबरोबर जणूं बोलतीलच. एकंदर तें राजबिंडें तेज पाहून पाहणारास सानंदाश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं.

वरील मुख्य दिवाणखान्याखेरीज त्यालाच लागून दुसरा पण जरा लहान चुतुष्कोनी दिवाणखाना आहे. तोही अशाच प्रकारच्या जिनसांनीं सजविलेला आहे. आणखी त्यामुळें एक विशेष प्रकारची शोभा आली आहे. ह्या दिवाणखान्यांत **सर जमशेटजी जिजिभाई**




श्री. रा. रा. विनायकराव जगन्नाथ शंकरशेट, जे. पी.
ऊर्फ बाबासाहेब–नानांचे एकुलते एक चिरंजीव– पान १८०.

जुन्या चित्रांवरून.



श्रीमंत चि० भवानीशंकर विनायकराव ज० शंकरशेट
ऊर्फ बाळासाहेब–नानांचे नातू.—पान १८०

बॉंबे आर्ट प्रिंटिंग वर्क्स.



नानांचा भवानीशंकरचा जुना व भव्य बंगला.

पान १८१

का जुन्या चित्रावरून.

बॉंबे आर्ट प्रिंटिंग वर्क्स.

बाटलीवाले व त्यांच्या कुटुंबांतील इतर पुरुष यांच्या तसबिरा लट-काविलेल्या आहेत. सोनेरी वर्खाच्या उत्तम नकशीदार कोचा व खुर्च्या ठेविलेल्या असून व श्रीमंताच्या दिवाणखान्यांत शोभतील अशीं अनेक तऱ्हेचीं उपकरणीं योग्यस्थानीं ठेवल्यामुळें व इतर नकशीदार आयने, सुंदर सुंदर तसबिरा लावल्या असल्यामुळें एकंदर दिवाणखान्यांस अप्रतिम शोभा आलेली आहे. दिवाणखान्यांच्या पिछाडीस एक थोरलें दालन आहे. त्या दालनाचा उपयोग कार्यप्रयोजनाच्या वेळेस दुग्धपान वगैरे करण्याकडे करतात. दिवाणखान्याच्या वरच्या मजल्यावर **नानांचें** शयनमंदिर असून त्याच्या शेजारीं ऑफीस रूम-खासगी कचेरीची जागा—असे व दुसऱ्या बाजूस एक मोठें पुस्तकालय असे. **नानांचा** वाडा बाहेरून दिसण्यांत जरी साधा दिसतो तरी आंतून फार प्रेक्षणीय आहे. हें आम्ही वर केलेल्या वर्णनावरून दिसून येईलच. तथापि ज्यांनीं तो अद्याप पाहिला नसेल, त्यांनीं एकवार संधी मिळाल्यास तो अवश्य जाऊन पहावा, अशी आमची त्यांस मोठी शिफारस आहे.

सदरहूप्रमाणें **नानांचा** ताडदेववरील बंगला इतका उत्कृष्ट होता कीं, त्याचें सविस्तर वर्णन करूं गेल्यास एक स्वतंत्र भागच होईल. तथापि त्याच्या सोईस्करतेची साक्ष पटण्याकरितां इतकें सांगितलेलें पुरे कीं, सदरहू बंगल्यांत **कोल्हापुरचे श्रीमंत छत्रपती, इंदुरचे श्रीमंत होळकर**, यांच्यासारखे राजेरजवाडे व थोर थोर माणसें येऊन उतरत असत.

वरील स्थावर मिळकतीखेरीज मुंबईशहरांत इतर स्थावर मिळकत बरीच होती. त्यापैकीं ग्रॉंटरोडवरील नाटकगृह हें होय ह्या नाटकगृहासंबंधाचे सविस्तर वर्णन एकोणीसाव्या भागांत दिलेलें आहे, तें अवलोकन करावें.

पुणेंमुकामीं **पर्वती**च्या पायथ्याशीं बेताळपेठेच्या सीमेवर **नानां**चा एक मोठा बंगला होता. भंवतालीं अवाढव्य बाग होती. तींत नानातऱ्हेचीं फळ व फुलझाडें असून बागेची रचना अशा तऱ्हेची केली होती कीं, तीस अप्रतिम शोभा आली होती. वरील बंगल्यांत मोठमोठे दरबार, धुळभेटीचे समारंभ, बड्या बड्या मंडळीच्या मुलाखती आणि अशाच प्रकारच्या सार्वजनिक मिजलसी हर हमेश होत.

त्या त्या ऋतूंमध्यें थारेपालट करण्याकरितां **महाबळेश्वर, माथेरान**सारख्या उत्कृष्ट ठिकाणीं उंच गिरीशिखरावर **नानां**चे दोन दोन बंगले असत. ह्या सर्व गोष्टी **नानां**च्या वैभवसंपन्नतेच्या दर्शकच होत.

अशाप्रकारें **नानां**चें वैभव अगदीं शिखरास पोंहचलें व त्यांची मानमान्यता मोठी वाढली आणि ती त्यांनीं शेवटपर्यंत भोगली, त्यांचा इतमामही एखाद्या राजवाड्याप्रमाणें किंवा एखाद्या संस्थानिकाप्रमाणें मोठा होता. आह्मी ह्मणतों ह्याची सत्यता ज्यांनीं ज्यांनीं ह्मणून **नानां**ची अमदानी खुद्द डोळ्यांनीं पाहिली असेल, त्यांसच पटण्यासारखी आहे. इतरांस किंवा हल्लींच्या पिढीस त्याची कल्पना सुद्धां होणें शक्य नाहीं. तात्पर्य काय कीं, वर लिहिलेल्या वर्णनावरून असेंच ह्मणावें लागतें कीं, **नानां**नीं जो जन्म घेतला, तो केवळ मोठें वैभव भोगण्यासच घेतला होता, हें ह्मणणें अतिशयोक्तीचें किंवा साहासाचें होणार नाहीं ! ! कारण जें सुख एकाद्या राजासही दुर्लभ, तें **नानां**स सहज प्राप्त झालें होतें. आणि त्यांनीं त्याचा आपल्या हयातींत पूर्णरीतीनें उपभोग घेतला. आणि अशा रीतीनें त्यांच्या वैभवाचा अगदीं कळस झाला. ह्यासंबंधाचीं प्रसंगचित्रें आह्मी ह्याच ग्रंथांत यथाप्रसंगीं दिलेलींच आहेत.

भाग चौदावा

मुंबईंतील स्मशानभूमि राखण्याविषयीं नानांनीं केलेले प्रयत्न.

जगाच्या कल्याणा । संताच्या विभूति ॥
देह कष्टवीती । उपकारें

तुकाराम.

पशूकी होत पन्हया नरका कछु नहिं होय ॥
नर करनी करे तो नरका नरायन होय ॥

कबिर.

रत्नाकराच्या विशाळ उदरांत बहुमोल रत्नें पैदा होतात, नभोमंडळांत अनेक तेजःपुंज तारे चमकतात, त्याचप्रमाणें ह्या वसुंधरेच्या पृष्ठभागावरही अनेक नररत्नें उत्पन्न होऊन तीं मानवसृष्टीच्या उपयोगी पडून तिच्या सुखास कारणीभूत होतात. ह्या भूतलावर संकटपरंपरा ही नेहमीं असावयाचीच. पण तिचें निवारण करण्यास तो परममंगल व सुख-निधान असा परमेश्वर मानवसृष्टीच्या सुखवृद्ध्यर्थ अशाच विभूति निरंतर निर्माण करतो, त्यांपैकींच आमचे चरित्रनायक **नाना** हे एक होत. आह्मीं हें जें विधान केलेलें आहे, त्याचें प्रत्यक्ष प्रमाण

नानांनीं एके प्रसंगीं मुंबईच्या रहिवाशांवर एक संकट गुदरलें होतें, त्याचें त्यांनीं आपल्या वजनानें व चातुर्यानें कसें निवारण केलें, त्यावरून सहज दिसून येईल. तो वृत्तांत असा:

मनुष्यमात्रानें आपली इहलोकींची यात्रा संपविली कीं, सृष्टिक्रमानुसार त्यास परलोकमार्गाचें अवलंबन करावें लागतें. अर्थात् मनुष्याचा प्राण-वायु पंचमहाभूतांत जाऊन मिळतांच रीतीप्रमाणें त्याच्या जडदेहाची अंत्यव्यवस्था लावणें त्याच्या आप्तवर्गास व इष्टमित्रांस भाग पडतें. मनुष्यप्राणी जिवंत असतां त्याच्या शरीराची केवढी प्राण-प्रतिष्ठा होत असते, व किती सातसायास होत असतात, हें सर्वांस माहीत आहेच. नटणें, मुरडणें तर निरंतर चालू असतेंच, पण शरीरयष्टि सालंकृत करण्यांत त्याचा कसा खटाटोप चाललेला असतो, हें आपण पाहतोंच ! त्यांतल्या त्यांत सत्कार्यांत कालक्षेप केल्यास त्या कृ-तीची सार्थकता होते, नाहीं तर त्याचें जनांत उलट हांसें मात्र होतें. कारण म्लेंच्छ साधुवर्य कबीर यांनीं वर्णन केल्या प्रमाणें--

इसतनधनकी कोन बढ़ाई । देखत नयनोंसें मट्टी मिलाई ॥ धृ० ॥
हाड जले जैसी लकडीकी मोळी । बाल जले जैसी घांसकी पोली ॥१॥
अपने खातर मेहेल बनाया । आपन जाकर जंगल सोया ॥ २ ॥
कहत कबीरा सुनो मेरेभया । आप मुवे पिछे डुबगई दुनिया ॥ ३ ॥

अशाप्रकारें सालंकृत केलेल्या शरीरयष्टीला ' जंगल ' हेंच विश्रांतिस्थान अखेर लाभतें.

आपले पूर्वज केवढे स्वधर्मपरायण व भाविक होते, हें सर्व वि-श्रुत होय. धनधान्य, मालमत्ता पुत्रपौत्रादि सांसर्गिक बाबतीसंबंधानें आपली इच्छा परिपूर्ण झाल्यावर त्यांचा पारमार्थिक विषयाकडे कल होणें स्वाभाविक आहे. त्या अन्वयें आपली संसारयात्रा पूर्ण करून

आपला देह एखाद्या क्षेत्राच्या ठिकाणीं ठेवावा,अशी त्यांची प्रवृत्ति होत असे. आणि तदनुरूप संसाराचा सारा भार आपल्या मुलांमाणसांवर टाकून त्याची निरवानिरव करीत आणि घरच्या मंडळीचा अखेरचा निरोप घेऊन ते यात्रोद्देशानें बाहेर पडत. अर्थात् क्षेत्राचे ठिकाणीं मृत्यु आल्यास आपल्या देहाचें सार्थक झालें, असें त्यांस वाटत असे. कारण देहाचें दहन करण्यास उत्तम ठिकाण ह्मटलें ह्मणजे एखादें क्षेत्र, समुद्रकिनारा, नदीतीर, किंवा नाला, ओढा; आणि त्यांच्याही अभावीं अखेर म्लेंच्छ कवीनें ह्मटल्याप्रमाणें ‘ जंगल ’ हें होय.

समुद्रकिनारा किंवा नदीतीर अशा ठिकाणीं प्रेत दहन करावें, अशी शास्त्राची अनुज्ञा आहे. कारण मृताचे शवाची दहनक्रिया उरकल्यानंतर त्याच्या अस्थींचें समुद्रांत किंवा गंगेंत (नदींत) विसर्जन करावयाचें, असा परिपाठ आहे. आम्हां मुंबईकरांस सुदैवानें महासागराचें सान्निध्य लाभल्यामुळें मृतांच्या अस्थींची त्यांत व्यवस्था लावण्याचें उत्तम साधन अनायासें प्राप्त झालेलें आहे. असो.

आपल्या सुहृदांच्या मरणोत्तर त्यांच्या शवांची अंत्यव्यवस्था मुंबई शहराच्या पश्चिम किनाऱ्यावर म्हणजे ज्याला आपण हल्लीं ‘ **ब्याक बे** ’ म्हणतों त्या ठिकाणीं असलेल्या स्मशानभूमींत लावीत असतों. हेंच ठिकाण ‘ **सोनापूर** ’ या नांवानें आज प्रसिद्ध आहे. हें स्थान कधींपासून उपयोगांत येऊं लागलें, ह्याबद्दलचा पुरावा आज आम्हांपाशीं नाहीं. तरी पण तें पुष्कळ दिवसांपासून प्रचारांत असलें पाहिजे, असें आम्हांस वाटतें. ह्याच **स्मशानभूमी**वरून दक्षिणोत्तर व रेल्वेच्या सडकेलगत एक रस्ता थेट वर **चौपाटी**-पर्यंत जातो, त्यास ‘ **क्विन्स रोड** ’ असें म्हणतात. ह्या रस्त्यावरून कोटांतून **मलबार हिल**—**वाळकेश्वर**—किंवा **महालक्ष्मी**

अथवा सदरहू ठिकाणांपासून **कोटापर्यंत** जाणाऱ्या मोठमोठ्या साहेबलोकांच्या व अम्मलदारांच्या गाड्या जात येत असतात. शहरांतील रस्त्यावरून आपल्या गाड्या नेण्याऐवजीं, ह्या ठिकाणीं समुद्रकिनारा जवळ असल्यामुळें **क्विन्सरोडवरूनच** त्याने आण करतात. तेव्हां ह्याच रस्त्यावर सदरहू **स्मशानभूमि** असल्यामुळें तींत दहन होत असलेल्या प्रेतांची फार दुर्गंधी सुटत असते, आणखी हिंदुलोकांच्या **स्मशानभूमी**लगतच असलेल्या मुसलमानांचीं प्रेतें गाडण्याची जागा आहे, त्यांत मुंबईसारख्या भरवस्तीच्या ठिकाणीं प्रेतें गाडल्यापासून शहरांत अनेक रोगांचा उद्भव होऊन शहरच्या आरोग्यास धोका येईल, अशी त्यावेळीं कित्येक साहेबलोकांनीं तक्रार केली. हें पाहून ह्या गोष्टीची पूर्ण चवकशी करून **कायदेकौन्सिलच्या** बैठकीमध्यें तिचा पूर्णरीतीनें खल करावयाचा, असा ठराव झाला. त्याबरहुकूम सदरहू बैठकीमध्यें हें प्रकरण विचारास पुढें आलें.

ह्यासंबंधाची चळवळ सन १८६३ सालाच्या सुमारास झाली. त्यावेळचे मुंबईइलाख्याचे लोकप्रिय गव्हर्नर **सर बार्टल फ्रिअर** हे अधिकारारूढ होते. **कौन्सिलच्या** नियमाप्रमाणें गव्हर्नरसाहेबांनीं अध्यक्षस्थान विराजमान केलें होतें. सरकारच्या **एग्झिक्युटिव्ह कौन्सिलचे** व सरकारी सभासद ऑनरेबल **मि० ट्रिस्ट्रम**, ऑ. मि० **ॲण्डरसन**, ऑ. मि० **रॉबर्टसन**, ऑ. मि० **स्कॉट** वगैरे मंडळी होती व बिनसरकारी सभासदांपैकीं ऑ० **सर जमशेटजी जिजिभाई ब्यारोनेट**, ऑ० श्री० **माधवराव विठ्ठल विंचुरकर**, ऑ० मि० **जगन्नाथ शंकरशेट**, ऑ० मि० **प्रेमाभाई हेमाभाई** वगैरे मंडळी होती.

वर सांगितलेल्या आशयाचें बिल, **कौन्सिलचे** वरीष्ठ सभासद ऑ० मि० **ट्रिस्ट्रम** यांनीं **कौन्सिलपुढें** प्रथम सादर केलें. त्यावर बरीच भवति न भवति होऊन शहरवासियांच्या आरोग्यरक्षणाकरितां हल्लींच्या ठिकाणीं असलेली **स्मशानभूमि** तिकडून काढून शहराच्या बाहेर उत्तरसीमेवर म्हणजे **शिवडीसारख्या** अती दूरच्या ठिकाणीं न्यावी व मृतांच्या आप्तेष्टांस आपल्या खांद्यावरून प्रेतें इतक्या दूरच्या पल्ल्यावर वाहून नेण्यास अडचण पडेल म्हणून आगगाडींतून त्या ठिकाणीं नेऊन तिकडे त्यांचें यथाविधि दहन करावें, अशा प्रकारच्या सूचना सभेपुढें मांडून त्यास वरील सरकारी सभासदांनीं पुष्टी देऊन सदरहू बिल मंजूर करण्याचा दीर्घ प्रयत्न केला. व तें बिल पास होण्याचीं पूर्वचिन्हेंही दिसूं लागलीं. तथापि बिन सरकारी सभासदांपैकीं ना० **जगन्नाथ शंकरशेट** यांनीं सभेपुढें दरखास्त मांडून हें बिल इतक्या घाईनें मंजूर न करितां त्याबद्दलच्या साधक बाधक कारणांचा पूर्ण विचार व्हावा व ह्या संबंधानें इतर सभासदांस विचार करण्यास पूर्ण अवधि मिळावी, म्हणून हें बिल **कौन्सिलच्या** पुढील बैठकीपर्यंत तहकूब ठेवावें, अशी सूचना केली. त्या अन्वयें **कौन्सिलची** बैठक पुढील विचाराकरितां तहकूब ठेविली.

ही **कौन्सिलमध्यें** घडलेल्या गोष्टीची पूर्व हकिकत हां हां म्हणतां विद्युत्वेगानें साऱ्या मुंबईशहरभर पसरली. त्या वरून मुंबईंतल्या रहिवाशांचें धाबें अगदीं दणाणून गेलें. आणखी त्यांस मोठा विचार पडला. आतां या गोष्टीची व्यवस्था कशी काय करावी, याची विवंचना दत्त म्हणून त्यांच्यापुढें उभी राहिली. एक तर गांवांतल्या गावांत **स्मशानभूमि** असतांनाही प्रेतयात्रेबरोबर जाण्यास

लोक कांकूं करतात. कोणी म्हणतो ' माझा पाय दुखतो, ' कोणी म्हणतो ' आपल्याच्यानें शेवटपर्यंत पल्ला झेंपावयाचा नाहीं. ' कोणी म्हणतो ' आपणांस असा प्रसंग माहीत नाहीं,' कोणी म्हणतो ' माझी बायको गरोदर आहे, मला खांद घालण्यास अधिकार नाहीं, ' असें कोणी कांहीं कोणीं कांहीं निमित्त काढून आपला पाय मागें घेतो. एकंदर अशा वेळेस अनेक अडचणी उद्भवतात, मग लांबच्या ठिकाणीं जर **स्मशानभूमि** नेली तर कांहीं पुसावयासच नको. म्हणून अशा प्रसंगीं संकटाचें निवारण करण्यास समर्थ असे काय ते एक **नानाशंकरशेट**च आहेत, तर त्यांजपाशीं जाऊन आपलें गाऱ्हाणें त्यांच्या पुढें मांडावें, असें लोकांस वाटलें. कारण सर्व लोकांचा पूर्ण भरंवसा होता कीं, **नानाशंकरशेट** यांनीं कोणतीही लोकोपयोगी गोष्ट मनावर घेतली, तर ती खात्रीपूर्वक सिद्धीस नेल्याशिवाय ते कधींही स्वस्थ बसावयाचे नाहींत. दुसरें असें कीं, मुंबईचे गव्हर्नरसाहेब बहादूर हे कोणतीही लोकोपयोगी अथवा सार्वजनिक गोष्ट करणें झाल्यास ते **नानां**ची हरएक बाबतींत अवश्य सल्ला घेत असत. व **नाना**ही अगदीं मान्य लोकनायक असल्यामुळें त्यांची सल्ला सहसा वांया जात नसे. हा हेतु मनांत धरून कांहीं पुढारी मंडळी **नानां**कडे जाऊन त्यांस आपलें गाऱ्हाणें त्यांनीं सांगितलें. ते म्हणाले ' तुमच्या खेरीज आज या अवघ्या मुंबई शहरांत आमचा वाली कोणी नाहीं. आपण मनावर घेतल्यास काय होणार नाहीं !! आज आपण कराल ती पूर्वदिशा !!! तरी पुढें येणाऱ्या संकटाचें निवारण करून आम्हांस संकटमुक्त करावें.' **नानां**नीं वरील मंडळीस आश्वासन देऊन त्यांची बोळवण केली.

ह्याच सुमारास एक ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट स्वाभाविक घडून आली. ती ही कीं, **कौन्सिल**च्या पहिल्या बैठकीनंतर सरकारनें सोनापूरांत प्रेतें दहन करण्याची मनाई केली. अशी मनाई केल्यामुळें **स्मशानभूमि** कायती एकच दिवस बंद होती, आणि त्याच दिवशीं मांडवीमध्यें एका सधन वाणीगृहस्थाचा मृत्यु झाला. त्यामुळें सदरहू वाणीगृहस्थाच्या आप्तेष्टांस मोठा विचार पडला, व पुढें काय करावें, हें कोणासही सुचेना. तेव्हां बरीच भवति न भवति झाल्यावर अखेरीस त्यांनीं असा विचार केला कीं, हें प्रेत **नानां**च्या घरांत नेऊन ठेवावें, ह्मणजे अशा प्रकारची अडचण आपोआप निवारण होईल. मग तिकडे कसचा उशीर ! मंडळींनीं प्रेत उचललें, तें थेट **नानां**च्या वाड्याच्या आवाराबाहेर आणून ठेविलें ! आणि दाद मागण्याकरितां कांहीं मंडळी उघडीबोडकी दारांत उभी राहिली. त्यावेळेस **नाना** हे देवपूजेंत निमग्न होते, पूजासमाप्तीनंतर ते बाहेर येऊन जों पहातात, तों हा प्रकार त्यांच्या दृष्टीस पडला. मंडळीनें त्यांस विनंति केली कीं, सरकारानें सोनापुरांत प्रेतें जाळण्याची पूर्ण मनाई केली आहे, तेव्हां आतां आह्मी ह्या प्रेताची व्यवस्था कशी काय लावावी? प्रथम **नानां**स थोडा विचार पडला. परंतु आणीबाणीच्या प्रसंगीं ते कधींच डगमगणारे नव्हते. युक्तीप्रयुक्तीनें अशा प्रकारच्या अडचणींतून ते पार पडत असत. तात्काळ कपडे चढवून खुद्द **गव्हर्नरसाहेबां**च्या बंगल्यावर त्यांची स्वारी येऊन दाखल झाली. आणि झालेली इत्थंभूत हकिगत **गव्हर्नरसाहेबां**च्या कानावर घातली. आणि त्यांस सांगितलें कीं, "अशा धर्मसंबंधी बाबतींत सरकारानें रयतेची पायमल्ली केली तर लोकांचीं मनें निष्कारण बिघडतील. आणि त्याचा परिणाम कदाचित् विपरीत होईल. शिवाय आह्मांस लोक पुढारी समजतात आणि अशा वेळींच कांहीं प्रसंग आला तर

सरकारानें आह्मांस जबाबदार धरूं नये" तेव्हां **गव्हर्नरसाहेबांनीं** पूर्ण विचाराअंतीं **कौन्सिलपुढें** आलेल्या बिलाचा अखेरचा निकाल लागेपर्यंत सोनापुरांत प्रेतें दहन करण्याची परवानगी दिली. असो.

सदरहू बिल ज्या वेळेस कौन्सिलमध्यें दुसऱ्यानदां वाचनास आलें, त्यावेळीं आमच्या लोकनायकानें जें चातुर्य प्रगट केलें व आपल्या वजनानें एतद्देशियांची बाजू राखिली, त्याबद्दल **कायदे-कौन्सिलमध्यें** इतर कौन्सिलदारांचीं झालेलीं भाषणें देण्यास आह्मांस आज स्थलावकाश नाहीं, ही निरुपायाची गोष्ट होय. तथापि आमच्या चरित्रनायकाच्या भाषणांतील मुख्य भाग भाषांतरासहित पुढें दिला आहे. **नाना** ह्मणाले:—

'× × Under Act XIV of 1856 the Municipal Commissioners are invested with ample powers. If there is any danger to health to be apprehended from the present Burial grounds, they are competent to cause them to be cleansed and eventually to be closed.

They are authorized to make Bye-law for the inspection and regulation of Burial and Burning grounds, to prescribe rules as to the depth of grave and of interment and generally as to all matters connected with the good order of Burial and Burning grounds. If therefore for the sake of public decency or for purpose of cleanliness any alteration in the present mode of making graves is required, the Commissioners have the powers of seeing that it is done. To me it appears that if the Bill be made Law, it is tantamount to passing a vote of censure on the Municipal Commissioners. No such Act, as that proposed, is needed. The more appropriate designation of the Bill would be "an Act to take away

from the Parsees their Towers of Silence" and from the other sections of the community their present place for disposal of their deads; for, this appears to me to be the real object of the Act.

"There is no ground whatever for saying that the practice of Hindus burning their dead by the sea-side, in Back-Bay is injurious to health. This has been admitted by the Medical Board; in fact it is universally admitted; my Honorable colleague has himself done so. Let any one go and stand near the place when the bodies are being bnrnt, and venture to say he will detect no offensive smell beyond that of burning wood. When the burning is not going on there is far more disagreeable smell from the imperfect drainage of the land in the neighbourhood, and this fact has been confirmed by Dr. Broughton in his conversation with me.

It is hardly necessary for me to point out that if the present Hindu burning grounds were ordered to be removed, great dis-satisfaction would prevail among the Hindus, and greatest inconvinience would be felt by that sect. As I have on another occasion remarked, the Hindus would not adopt any plan of removing their deads where the Railway would have to be used. It is a part of our religion not to allow any but those of the caste to which the deceased belonged, to touch the body. The relatives of the deceased must carry the body on their own shoulders until it is placed on the pile and in the case of the poorer classes, great difficulty is sometimes experienced in procuring a sufficient number of persons to perform this part of ceremony. It is also a religious custom with us that those who attend the funeral cannot

take food until the body has been burnt or buried, not until they have returned home and washed themselves. The same rule also is observed by the other members of the family, who must fast until the return of the funeral party; a similar custom likewise prevails among the Parsee community.

Our present highly respected Governor is so well acquainted with the peculiar notions and the religion of the Hindus, Mahomedens and Parsees that he would not, except it were absolutely necessary, disturb the present burial and burning grounds, but who knows what any future Governor might do. We might have one sent out here who was, comparatively speaking, unacquainted with our manners, customs and religion, and who might adopt as his motto: " Let the dead make room for the living " and at once order that no more bodies should be burned, buried or exposed within a certain distance of the Town. On looking over this Bill, I observe that it does not repeal Sections 106 to 110 of Act XIV of 1856, which are quite inconsistent with the provisions of this Bill.

" I would here remark, too that if the Governor make the order contemplated by Section III., every time a family voult is required to be opened, for instance, in the Cathedral or other place, the consent of the Governor, &c., must be previously obtained. "

" As to Section III., how is this approval to be obtained ? Is it to be in writing ?

" But the main objection that I have to this Bill is that it is in no way required. I do not understand what was meant by the Hon'ble Mr. Tristram when he

stated on moving for leave to bring in this Bill, that the powers of the Municipal Commissioners as relating to burial and burning grounds were confined to their operations to the Town of Bombay, and give them no jurisdiction beyond its prescribed limits.

" The word Town as used in that Act has a wider meaning than the Hon'ble Gentleman is perhaps aware of; it is defined by the interpritation Clause (Section II) to iclude all places within the local limits of the jurisdiction of Her Majesty's Supreme Court of Judication. I am told that the jurisdiction thus given is as wide (if not wider than) that intended to be given by this Act, and that it extends over the Town and suberbs of Bombay, as defined by the 5th Section of this Bill. If this is so, then I concieve the whole argument of the Hon'ble Gentleman for the necessity of this Bill falls to the ground. "

सदरहू इंग्रजी भाषणाचा मराठींत सारांशः--

' × × सन १८९६ च्या १४ व्या आक्टाखालीं म्युनीसिपल कमिशनर यांस मुबलक अधिकार मिळाला आहे. जर हलींच्या स्मशानभूमीपासून लोकांच्या आरोग्यास धक्का पोंचत असेल, तर त्याबद्दल व्यवस्था लावण्यास म्युनिसिपल कमिशनर मुखत्यार आहेत.

' या खेरीज स्मशानभूमीची पाहणी करण्यास आणि तींतील खड्यांची खोली ठरविण्यास म्युनिसिपल कमिशनरास एखादा पोटकायदा करण्याची पूर्ण मुभा असून गर्तेची जागा व दहन करण्याची जागा यांत स्वच्छता आणि निटनिटकेपणा ठेवणें, ही देखील त्यांच्या अधिकारांतील गोष्ट आहे. ह्या बिलास जर कायद्याचें स्वरूप दिलें, तर

अप्रत्यक्ष रीतीनें म्युनिसिपल कमिशनराच्या अधिकाराची पायमल्ली करण्यासारखें आहे. ह्मणून अशाप्रकारचा कायदा करण्याची सांप्रत अवश्यकता नाहीं. मला असें वाटतें कीं, पारशी लोकांचे दोखमे-प्रेतें ठेवण्याच्या विहिरी—आणि हिंदु लोकांच्या स्मशानभूमि आहेत तेथून काढून टाकण्याचा ह्या बिलाचा मुख्य उद्देश दिसतो.

समुद्रकिनाऱ्यावर—ब्याकबेवर हिंदुलोकांनीं प्रेतांचें दहन करणें हें आरोग्यास अपायकारक आहे, असें ह्मणणें केवळ निराधार होय. आणि मेडिकल बोर्डानें ह्याच मताचा अनुवाद केला आहे, इतकेंच नव्हे, तर माझे कौंन्सिलचे मित्र हे देखील ह्याच मताचे आहेत. ज्या ठिकाणीं प्रेतांचें दहन होत असतें, त्या ठिकाणीं कोणीही जाऊन उभें राहिलें, तर त्यांस जळत्या लाकडांच्या गंधाशिवाय दुसऱ्या कोणत्या ही प्रकारची दुर्गंधी सुटत नांहीं, असें त्याच्या प्रत्ययास येईल. जेव्हां दहनक्रिया चाललेली नसते, अशावेळीं तिकडे एक वाईट प्रकारची घाण येत असते. परंतु ती घाण जवळपासच्या दोषी गटारा-पासून येत असते, आणि माझ्या बरोबर झालेल्या संभाषणांत डॉ० **ब्राउटन** यांनींदेखील ही गोष्ट पूर्णपणें मान्य केली आहे.

जर हल्लींची स्मशानभूमि आहे तेथून काढून नेण्याचा संकल्प केला तर हिंदुलोकांत फार असंतोष उत्पन्न होईल आणि त्यामुळें त्यांची अत्यंत गैरसोय होईल, हें कांहीं दाखविण्याची अवश्यकता आहे, असें मला वाटत नाहीं. ज्या ज्या वेळीं प्रेतें नेण्याकरितां आगगाडीचा उपयोग करण्याचा प्रसंग येईल, त्या वेळीं ही गोष्ट हिंदुलोकांस कधींही मान्य होणार नाहीं. असें मृतांच्या ज्ञातीबांधवांखेरीज इतरांस शवाला स्पर्श करणें, हें हिंदूंना शास्त्रसंमत नाहीं. मृतांचे आप्तविषयक ह्यांखेरीज प्रेतें वाहून नेऊन त्यांचा अंत्यविधि आटोपप-

येत दुसऱ्या कोणासही त्यांस स्पर्श करण्याचा अधिकार नाहीं, अशी वस्तुस्थिति असल्यामुळें कधीं कधीं गरीब गुरीबांना मयताची अंत्य-व्यवस्था लावण्याकरितां पुरेपूर जातभाई मिळविण्यास फार त्रास पडतो, असें अनुभवास आलें आहे. आणि स्मशानयात्रा आटोपून मंडळी घरीं येऊन स्नान करीपर्यंत अन्नग्रहण करण्याची शास्त्रीय-पद्धतीनुरूप मनाई आहे. आणि स्मशानयात्रेस गेलेली मंडळी परत येईपर्यंत कुटुंबांतील माणसांस अन्नग्रहण करतां येत नाहीं. पारशी ज्ञातीमध्यें देखील अशाच प्रकारची वहिवाट आहे.

हिंदु, मुसलमान आणि पारशी यांच्या धर्मसंबंधी असलेल्या चमत्कारिक कल्पना ज्यांस पूर्णपणें अवगत आहेत, ते आमचे प्रस्तुतचे लोकप्रिय व सन्माननीय **गव्हर्नर—सर बॉर्टल फ्रिअर** हे अत्यंत जरूरी असल्याशिवाय हल्लींच्या स्मशानभूमीच्या बाबतींत चालू असलेली वहिवाट कधींही बदलणार नाहींत. परंतु कोण जाणे, त्यांच्या पश्चात् येणारे गव्हर्नर वरील व्यवस्थेंत काय फेरबद्दल करतील, हें सांगतां येत नाहीं. कारण ते आमच्या चालीरीति आणि धर्म यासंबंधानें अजाण असल्याकारणानें शहराच्या विवक्षित भागांत ह्या पुढें प्रेतें जाळूं किंवा पुरूं नयेत, अगर उघडीं टाकूं नयेत, असाही हुकूम सोडतील. ह्या बिलासंबंधीं विचार करतां मला असें वाटतें कीं याचा आणि सन १८९६ च्या १४ व्या आक्टांतील १०६ पासून ११० पर्यंत कलमांचा आशय परस्पर विरोधी आहे.

मला असें वाटतें कीं, ३ ऱ्या सेक्शनच्या अन्वयें **गव्हर्नर साहेबांनीं** हुकूम फर्माविले तर प्रेताचें दहन करण्यास व थडग्याचा खाडा खणण्यापूर्वीं त्या कुटुंबांतील माणसांस गव्हर्नर साहेबांचा अगाऊ हुकूम घ्यावा लागेल. आणि अशा रीतीनें हुकूम आमलांत

आणणें झाल्यास तो कोणत्या तऱ्हेनें मिळावावा ? लेखी मिळवावा, कीं कसें ?

ह्या बिलासंबंधीं माझा मुख्य कटाक्ष हा आहे कीं, मला त्याची मुळींच अवश्यकता दिसत नाहीं. **नामदार ट्रिस्ट्रमसाहेबांनीं** हें बिल अस्तित्वांत आणण्याची परवानगी मागितली, तेव्हां त्यांनीं मुंबई-शहराच्या हद्दींत असणाऱ्या सर्व स्मशानभूमींवर म्युनिसिपल कमीशनरसाहेबांस अम्मल बजविण्याची मुखत्यारी आहे, असें जें ह्मटलें, त्याचाच अर्थ मला कळत नाहीं. कारण ' शहर ' ह्या शब्दाची व्याख्या नामदारमजकुरांनीं जी केली आहे, तीपेक्षां ती फारच व्यापक आहे. कारण त्या सेक्शनच्या कायद्यांत याची अशी स्पष्ट व्याख्या केली आहे कीं, **नामदार राणीसरकारच्या** वरीष्ठ कोर्टाची ज्या भागावर अम्मलहुकमत चालते, त्या सर्व स्थानांचा यांत समावेश होतो, ह्मणून ह्या आक्टांत जी स्थलमर्यादा नमूद केली आहे, तीपेक्षां ती मोठी व व्यापक आहे. आणि खरी वस्तुस्थिति जर अशी असेल, तर मी असें समजतों कीं, नामदार मजकुरांनीं ह्या बिलाच्या समर्थनार्थ जो कोटीक्रम केला, तो सपसेल चुकीचा ठरतो,

वरील भाषणावरून आमच्या वाचकांची पूर्ण खात्री झालीच असेल कीं, तें किती झोंकदार, मुद्देसूद, विचारपरिप्लुत, गंभीर व कळकळीचें होतें. वरील भाषणांत **नानांचें** इंग्रजीभाषाभिज्ञान, कायद्याचें पूर्ण परिज्ञान, साधकबाधक प्रमाणें दाखविण्याची अप्रतिम हातोटी आणि दुसऱ्यांचीं मनें आपणाकडे आकर्षण करून घेण्याची अजब कला, ह्या गोष्टी **नानांस** किती उत्कृष्ट रीतीनें साधल्या होत्या, हें त्यांच्या सदरहू भाषणावरून दिसून येतें. ह्मणजे पंतांनीं ह्मटल्याप्रमाणें " बह्वर्थ जनमनोहर स्वल्पाक्षर मधुर सत्य बोलावें ॥ ज्या सद्वाक्यश्रवणें

श्रोत्यांचें चित्त शिराहि डोलावें ॥ " ह्या उक्तीची सत्यता **नानांच्या** ठायीं दिसून येते. **नाना** जात्या धूर्त, हुषार व स्वकर्तव्यदक्ष असून त्यांस त्यांच्या पूर्ववयांत उत्तम विद्यासंस्काराची जोड मिळून त्यांचें अंतःकरण सुसंस्कृत झालें होतें, ह्मणजे '**आधीं सोनियाचें । त्या वरी जडावाचें**' असा योग आला होता. त्यामुळें त्यांची सर्वदा वाहवाच होत गेली.

वरील भाषणानंतर रीतीप्रमाणें इतर **कौन्सिलदारांचीं** साधक बाधक अशीं भाषणें झालीं. तीं सर्व **नानांच्या** वरील भाषणापुढें फिकीं पडलीं. तदनंतर ना. गव्हर्नर साहेबांचें अध्यक्ष या नात्यानें समारोपादाखल भाषण झालें, आणखी आश्चर्याची गोष्ट ही कीं, मूळ सदरहू बिल **कौन्सिल**पुढें आणणारे ना. **ट्रिस्ट्रम**साहेब यांनी तें परत घेतलें. अर्थात् सदरहू बिल पालथें पडलें. याप्रमाणें **नानांची** सरशी होऊन त्यांनीं आपलें अंगीकृत कार्य अखेर शेवटास नेलें. त्यामुळें आह्मां अखिल मुंबईकरांस त्यांनीं आपले अत्यंत ऋणी करून ठेवलें आहे. ह्या एका गोष्टीवरून **नानांनीं** आपली कीर्ति अजरामर करून ठेविली आहे व तेणेंकरून ती मुंबईच्या इतिहासांत चिरकालिक राहील, हें म्हणणें धाडसाचें होणार नाहीं, असा आह्मांस पूर्ण भरंवसा आहे. **नानांनीं** सदरहू **सोनापूर** आहे त्याच ठिकाणीं राखण्याचा जो प्रयत्न केला, त्यावरून मुंबईच्या रहिवाशांस अत्यंत आनंद तर झालाच, परंतु त्यामुळें मुंबईकरांची जी मोठी गैरसोय व अडचण होणार होती, ती टळली आणि प्रेतें खांद्यावरून वाहून नेण्याऐवजीं तीं आगगाडींतून नेल्यापासून धर्मसंबंधी बाबतींत त्यांचीं मनें प्रक्षुब्ध होण्याचा असलेला संभव टळला ह्मणून ते अद्यापपर्यंत **नानांचे** पोवाडे गातात. यावरून भर्तृहरीच्या एका श्लोकाची आठवण पडते कीं,

' आरभ्यते न खलु विघ्न भयेन नीचैः ।
प्रारभ्य विघ्नविहता विरमन्ति मध्याः ॥
विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमानाः ।
प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ' ॥

या संबंधानें **नानांनीं** जे अकटोविकट परिश्रम केले व यशसिद्धि मिळविली, त्या संबंधानें आम्हास या ठिकाणीं एक कौतुकप्रचुर गोष्ट नमूद केल्यानें अप्रासंगिक होणार नाहीं. ती गोष्ट ही कीं, **सोनापुराची** जी इकडून उचलबांगडी होणार होती, ती टळली; त्यामुळें हें **नानांचें** केवळ स्मारकच होय, असें आम्हांस वाटतें. आणि त्याच्या केवळ अभिनंदनार्थच त्या **सोनापुरास** ' **नानांचें सोनापूर** ' असें लोक अद्याप संबोधून म्हणतात. कित्येक लोक त्यास विनोदानें ' **नानाचा धक्का** ' किंवा ' **नानाची वाडी** ' असेंही ह्मणतांना ऐकण्यांत येतें. त्याचें कारण **नानांनीं** मुंबईकरांवर जे अगणित उपकार करून ठेवले आहेत, ते अद्याप लोक विसरले नाहींत, आणि या पुढेंही विसरणार नाहींत, अशी पूर्ण खात्री आहे.

वरील गोष्टीवरून आमच्या वाचकवर्गास पूर्णरीतीनें कळून चुललेंच असेल कीं, मुंबईकरांवर केवढें मोठें संकट आलें होतें व त्याचें निवारण **नानांनीं** मोठ्या शिताफीनें व शहाणपणानें केलें. त्यांनीं जर ह्या गोष्टींत मन घालून खटपट केली नसती आणि आपल्या वजनाचा यथाकाळीं योग्य उपयोग केला नसता, तर आह्मां मुंबईकरांची आजमितीला काय स्थिति झाली असती आणि आमचे किती हाल झाले असते नकळे ! !

भाग पंधरावा.

कायदेकौन्सिलांत नानांनीं बजाविलेली कामगिरी.

परोपकारा शरिर झिजावें जैसा मैलागिरि चंदन

अनंतफंदी.

शेवट गोड झाला म्हणजे मोठा आनंद वाटतो. पण तेंच साधावयाचें फार कठीण असतें. नाहीं तर मनुष्यप्राणी आला तसा गेला, ह्यांत मोठेंसें कांहीं नाहीं. पण तीच त्यानें आठवण रहाण्यासारखी कांहीं कृती केली, तरच त्याच्या जीविताचें साफल्य होतें; कारण जी गोष्ट आपल्या अधिकारांतली किंवा आटोक्यांतली असते, त्याकडे जर दुर्लक्ष केलें, तर आपण आपल्या कर्तव्यास जागत नाहीं, असें होतें. आणखी जर अनेकांचें बरें करणें आपल्या हातांत आहे, तें न करणें म्हणजे आपण आपल्या कर्तव्यास विसरणें होय. टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवकळा प्राप्त होत नाहीं. मोठेपणा मिळवावयाचा आहे, तर लोकांच्या उपयोगी पडून त्यांचें कल्याण केलें पाहिजे, फुकाचा मोठेपणा मिळत नसतो.

मुंबईचे माजी गव्हर्नर **सर जॉर्ज क्लार्क** यांनीं १८६१ त जेव्हां **नानांस** आपल्या कायदेकौन्सिलचे प्रथम सभासद नेमलें, तेव्हांपासून तों शेवटपर्यंत त्यांनीं आपल्या हुशारीनें व कळकळीनें लोककल्याणाकरितां जी कामगिरी बजाविली, ती फार विचार करण्यासारखी आहे, तिची अंशतः कल्पना होण्याकरितां आम्हीं ती खालीं संक्षेपांत सादर करीत आहों. **नानांची** हयात आणखी कांहीं वर्षे असती, तर त्यांनीं ह्याहीपेक्षां पुष्कळ अधिक चांगलें काम निःसंशय केलें असतें.

नाना हे मान्य लोकधूरिण असल्यामुळें व त्यांनीं ऐन उमेदींत म्हणजे आपल्या वयाच्या अवघ्या अठराव्या वर्षींच लोकसेवाव्रताचें कंकण हातीं बांधून आमरण जी अव्याहत लोकसेवा बजाविली, त्यापैकींच त्यांनीं मुंबईचे **लेजिस्लेटिव्ह** किंवा **कायदे कौन्सिलांत** बजविलेली कामगिरी ही अप्रतिम होय. मुंबई इलाख्याचे लोकप्रिय गव्हर्नर **ऑ० मौंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन** साहेबांच्या कारकीर्दीपासून म्हणजे सन १८१९ पासून तों तहत **सर बार्टल् फ्रिअर** ह्यांच्या कारकीर्दीपर्यंत—१८६९—मध्यंतरींचे जे जे गव्हर्नर्स होऊन गेले, त्या सर्वांनीं दरएक बाबतींत **नानांची** सल्लामसलत घेत जावी. इलाख्यांत कोणतीही नवीन गोष्ट प्रचारांत आणणें झाल्यास त्यांनीं **नानांची** अवश्य सल्ला घ्यावी. कारण **नाना** हे मुंबईसरकार व इलाख्यांतील रयत ह्यांचे जणू मध्यस्थ होते. म्हणजे सरकार व रयत या उभयतांचाही **नानांवर** पूर्ण भरंवसा होता. आमच्या म्हणण्याची सत्यता खालीं दिलेल्या दोन तीन अवतरणांवरून वाचकांच्या प्रत्ययास येईल. ती गोष्ट ही कीं, **नानांच्या** मृत्यूनंतर लगेच कायदेकौन्सिलची जी प्रथम बैठक झाली, तींत खुद्द गव्हर्नरसाहेब **ना० सर बार्टल् फ्रिअर**

यांनीं कौन्सिलमध्यें **नानांच्या** मृत्यूसंबंधानें बोलतांना खालील उद्गार काढले आहेत, ते मुळांतच देतों, ते असेः—

" By the successive Governors of Bombay, since the time of Mr. Mount Stuart Elphinstone their late colleague had been held in the highest esteem. From his very early youth he had been invariably consulted by the Government whenever it was proposed to introduce any measure which affected the welfare of the Native Community. Mr. Mount Stuart Elphinstone had the advantage of his advice in framing his Educational Scheme and not one of his (the President's) predecessors had failed to consult Mr. Jagannath Sankersett whenever it became desirable to ascertain the feelings of the people in regard to any important measures. It was seldom that it fell to the lot of a private person to be so consulted. "

" मि० **मौंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन्** ह्यांच्या वेळेपासून लागापाठ अधिकारारूढ झालेल्या अगदीं आतांपर्यंतच्या गव्हर्नरांपर्यंत प्रत्येक-जण **नानांस** अत्यंत सन्मानपूर्वक चहात असत. एतद्देशियांच्या सुखाच्या आड एखादी गोष्ट येत असली, तर तिचें निवारण कर-ण्याकरितां जर एखादी नवीन गोष्ट प्रचारांत आणणें झाली, तर त्या संबंधानें **नानांची** सल्लामसलत सरकार त्यांच्या अगदीं पूर्ववयापा-सून घेत आलें. **मौंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन**साहेबांनीं ज्या वेळेस प्रथम विद्यावृद्धीविषयक प्रयत्न सुरू केले, त्यावेळीं **नानांच्या** योग्य सल्लामसलतीचा ह्यांस फारच उपयोग झाला. आणि एखाद्या मह-त्वाच्या बाबतींत रयतेचें हृद्गत समजून घेण्याची सरकारास अवश्य-कता वाटली, त्या त्या वेळीं माझ्या पूर्वींच्या प्रत्येक गव्हर्नरानें

नानाचें अवश्य अनुमत घ्यावें. अशा रीतीनें खुद्द सरकारानें लोकमत काय आहे, हें समजून पाहण्याकरितां एखाद्या खासगी मनुष्याची सल्ला घेणें, अशीं उदाहरणें फार क्वचित् आढळतात. ”

गव्हर्नरसाहेब पुढें म्हणतात:—

“ But though it was always felt that Mr. Jagannath Sankarsett would truly represent the wishes of the people, with all whose wants and desires he heartly sympathised, that he was always trusted as a true and valued friend of the Government, for he thoroughly understood and sympathised with the policy of the British Government of India. Sir George Clerk recognized his worth when he appointed him one of the first members of the Council. His services in the Council were well known to them all, and were very highly appreciated by the present Government.”

“ना. **जगन्नाथ शंकरशेट** यांना रयतेच्या गरजा काय आहेत, हें उत्तम प्रकारें अवगत असून तिच्याविषयीं **नानांची** जरी पूर्ण सहानुभूति होती, तथापि ते ब्रिटिशसरकारचे अत्यंत महत्त्वाचे सल्लागार होते. कारण त्यांस सरकारची राजनीति अवगत असून ती मान्य होती. **सर जॉर्ज** क्लार्कसाहेबानीं त्यांची खरी योग्यता जाणून त्यांस आपल्या कायदेकौन्सिलचे पहिले सभासद नेमले. त्यांनीं कायदेकौन्सिलांत बजावलेली कामगिरी सर्वांस महशूर आहेच आणि सदरहू कामगिरी हल्लींच्या सरकारास ही पूर्णपणें मान्य झाली आहे.”

याशिवाय आणखी ‘ जुगाराचें ’ बिल कौन्सिलपुढें वादविवादास आलें, त्यावेळीं **नानांनीं** भाषणप्रसंगीं केलेला कोटिक्रम व दाखविलेलें कल्पनाचातुर्य ह्याविषयीं खुद्द ना. गव्हर्नर साहेब म्हणतात:—

"× × × × × × and such discriminating criticism as was contained in the remarks of the Honorable Jagannath Sankarsett would be considered most useful by the Council of the Governor General, and on such a question, would be received with attention and respect, as expressing the views of those who practically knew the wants of the commercial metropolis of Western India."

"सदरहू बिलावर अनुकूल आणि प्रतीकूल वाद जो आतां आपण ऐकला, त्यावर **नामदार जगन्नाथ शंकरशेट** यांनीं केलेला महत्त्वाचा कोटिक्रम खुद्द **गव्हर्नर जनरलां**च्या कायदेकौन्सिलांत देखील फार महत्त्वाचा गणला जाईल. कारण व्यापारांत अग्रेसर असलेली पश्चिम हिंदुस्थानची राजधानी जें मुंबईशहर, त्यांतील रयतेचें हृद्गत त्यांस पूर्णपणें कळून चुकलें होतें."

ह्या वरील अवतरणांवरून **गव्हर्नर जनरलच्या सुप्रिम** अथवा **वरिष्ठ कायदेकौन्सिलमध्यें** देखील **नानां**च्या मतांचा व विचारांचा केवढा बोज होता, हें सहज दिसून येतें. याप्रमाणें वरील उताऱ्यांवरून **नानां**विषयीं मुंबईसरकारचें काय मत होतें, व **नानां**चा सरकारदरबारांत किती बोज होता, हें स्पष्ट दिसून येईल.

नानांचा लोकमान्य पुढारीपणा जाणून व त्यांची लोकहिताची कळकळ, त्यांनीं आजपर्यंत बजाविलेलीं सार्वजनिक कामें व लोककल्याणाविषयींची त्यांची लालसा असून सरकारकार्याविषयांची आस्था व सरकारचें हित इत्याद्यनेक गोष्टी मनांत आणून मुंबई इलाख्याचे त्यावेळचे गव्हर्नर **सर जॉर्ज रसेल क्लार्क** यांनीं ता. २२ जानेवारी १८६१ रोजीं **नानांस कायदेकौन्सिल**चे सभासद निवडले, असें वर ह्मटलेलेंच आहे. नेटिव्हांपैकीं हा मोठा मान प्रथम ज्यांस मिळाला,

त्यांत **नाना** प्रमुख होते. प्रथम जे चौघे नेटिव्ह गृहस्थ कौन्सिलांत निवडले गेले, ते **सर रुस्तमजी जमशेटजी जिजीभाई ब्यारोनेट, श्रीमंत माधवराव विठ्ठल विंचूरकर, श्रीमंत जगन्नाथ शंकरशेट** व **मि. प्रेमाभाई हेमाभाई.**

नानांच्या कायदेकौन्सिलच्या अवघ्या अमदानींत कौन्सिलपुढें जे जे महत्त्वाचे विषय वारंवार आले, त्या सर्वांत **नानांनीं** हरएक वेळीं फार चातुर्य, अक्कलहुशारी व तत्परता दाखविली. ती फार प्रशंसनीय होय. **कौन्सिलच्या** कामांत गव्हर्नरसाहेबांची किंवा कोणत्याही सरकारी अधिकाऱ्यांची भीडभाड न धरितां किंवा विकारवश न होतां अगदीं निर्भीडपणें कामगिरी बजाविली; त्यांत लोककल्याणाचे जे जे विषय सभेपुढें आले, त्या सर्वांत **नानांचा** नेहमी तिसरा पाय असे. इतकेंच नव्हे तर असे विषय खुद्द **नानांनींच** सभेपुढें आणून त्यांचा खल केला. आपल्या लोकांस त्या वेळच्या देशाच्या परिस्थितीस कोणत्या गोष्टी फायदेशीर होतील, ह्यांकडे त्यांचें विशेष लक्ष असे आणि कौन्सिलांत त्यांच्या निर्भीडपणामुळें त्यांचें विशेष तेज पडत असल्यामुळें त्यांच्या सूचना बहुतकरून अमान्य होत नसत. मुंबईची **स्मशानभूमि** आहे त्याच ठिकाणीं राखण्याकरितां कौन्सिलांत त्यांनीं केलेली खटपट व त्यांचें अश्रुतपूर्व झालेलें भाषण हीं याच पुस्तकांत अन्यत्र सारांशरूपानें दिलीं आहेत. त्या गोष्टीवरून ‘ शितावरून भाताची परीक्षा ’ होईलच ! म्हणून आम्हीं कांहीं अधिकउणें न लिहितां व आमचें शिफारसपत्र **नानांस** न देतां त्यांनीं कायदेकौन्सिलांत काय काय व कशा तऱ्हेनें कामगिरी बजाविली, हें थोडक्यांत पाहूं.

इत्थंभूत हक्किकत देण्यास स्थलावधि नाहीं, ह्याबद्दल फार वाईट

वाटतें. तथापि ज्या ज्या मुख्य मुख्य गोष्टींचा त्यांनीं खल केला, तेवढ्यांचाच फक्त संक्षिप्त गोषवारा देऊं, म्हणजे तेवढ्यानेंच **नानांनीं** बजावलेल्या कामगिरीची कल्पना वाचकांस सहज करतां येईल.

ते महत्वाचे विषय येणेंप्रमाणें:—

रेफर्मेटरीच्या कायद्यांत सुधारणा.

(१) 'अप्रबुद्ध व कोंवळ्या मुलांच्या हातून कायद्याविरूद्ध एखादा अपराध घडला असला आणि जर त्यांस त्याबद्दल **उद्योग-शाळेंत**-रेफर्मेटरींत-घातलें व जर तिकडून त्यांनीं 'यःपलायसजीवति' केली, अर्थात् ते पळून गेले, तर त्या अपराधाबद्दल त्यांस तुरंगांत घालून सक्तमजुरीची शिक्षा भोगण्यास लावणें इष्ट होणार नाहीं. कारण तसें केल्यानें अशा मुलांची नीतिमत्ता बिघडून तीं कोडगीं बनण्याचा अधिक संभव आहे. त्यांस उद्योगशाळेंत रेफर्मेटरीमध्येंच कडक शासन केल्यानें वाईट कामापासून परावृत्त होण्यास संधी मिळेल. तरी ह्या संबंधानें पळून जाणाऱ्या मुलांस शासन करण्याचा म्याजिस्ट्रेट ह्यांस ऐच्छिक अधिकार असावा' ह्याबद्दल **नानांनीं** कायदेकौन्सिलांत खटपट केली.

म्युनिसिपल कमिशनरांची अधिकारमर्यादा वाढविण्याची सूचना.

(२) सन १८५० च्या सव्विसाव्या आकटान्वयें नेमलेल्या **म्युनिसिपल कमिशनर**ची अधिकारमर्यादा वाढविण्यासंबंधानें कौंसि-लपुढें आलेल्या बिलाच्या वादविवादांत **ना. जगन्नाथ शंकरशेट** यांनीं. दवाखाने, हॉस्पिटल्स आणि शाळा यांना द्रव्यसाह्य मिळविण्याकरितां ॲक्टामध्यें **मु० कमिशनरांस** अधिकार असण्याबद्दलची सूचना केली.

रस्त्यावरील धुळीचा प्रतिबंध.

(३) म्युनिसिपल कराच्या उत्पन्नांतून शहराच्या सार्वजनिक रस्त्यांवर पाणी शिंपडण्यांकडे **म्युनिसिपल कमिशनरांनीं** कांहीं वाजवी रक्कम लावण्याबद्दलची सूचना केली. त्यामुळें रस्त्यांतून गाड्याघोड्यांच्या रहदारीमुळें व वाऱ्यामुळें उडणाऱ्या धुळीचा प्रतिबंध होऊन शहरांतील रस्ते चांगल्या स्थितींत राहतील व त्यामुळें जाणारा येणारांस सुखावह होईल, अशी **नानांनीं** सूचना केली.

अज्ञान मुलांच्या मालमत्तेचें संरक्षण.

(४) मुंबई इलाख्यांतील आपल्या आईबापांच्या पश्चात् अज्ञान मुलांच्या जीवितांचें, द्रव्याचें आणि मालमत्तेचें चांगल्या रीतीनें संरक्षण व्हावें म्हणून कायद्यामध्यें योग्य ती सुधारणा करण्याबद्दल **नानांनीं** खटपट केली. अर्थात् आईबापांच्या पश्चात् अज्ञान मुलांचे जे पालक असतील, त्यांना त्यांच्या वित्ताची व मालमत्तेची अफरातफर करतां येऊं नये, त्याचप्रमाणें त्यांची मालमत्ता कोणासही देणगी ह्मणून देतां येऊं नये, किंवा ती त्यांस गहाण वगैरे ठेवतां येऊं नये. असा मतलब होय. सरकारच्या सूचनेवरून सदररूपानें देतां येऊं नये, ह्मणून अदालतींतील जज्जांनीं सुचविल्यावरून कायद्यांत आज जो दोष आहे तो काढून टाकणें. कारण त्यामुळें अज्ञानांच्या मालमत्तेची त्यांच्या पालकांस लागेल तशी विल्हेवाट लावतां येऊं नये, ह्याबद्दल हल्लींच्या कायद्यांत कांहीं तरतूद नाहीं. तर यासाठीं त्यांत अवश्य फेरफार केला पाहिजे, ह्मणून **नानांनीं** सूचना केली.

मुलांमुलींच्या लग्नाच्या बाबतींत कायद्यांत सुधारणा.

(९) हिंदुस्थानांतील अज्ञान मुलांमुलींचीं लग्नें करण्यासंबंधानें कायद्यांत योग्य तो फेरबदल करण्याची **नानानीं** खटपट केली. ती अशी कीं, हिंदुस्थान हा देश उष्ण कटिबंधांत असल्यामुळें आमच्या मुली थंड देशांतील मुलींपेक्षां लौकर वयांत येतात. त्यांस त्यांच्या अठराव्या वर्षापूर्वींच मातृपद प्राप्त होतें, ह्मणजे त्यांस मुलें होतात. तेव्हां त्या वयांत येण्यापूर्वीं त्यांचे विवाह व्हावेत, अशाबद्दल कायद्यांत फेरबदल करण्याची **नानांनीं** खटपट केली. कारण आमच्या पौर्वात्य शास्त्राप्रमाणें व रूढीप्रमाणें कोणत्याही मुलीस ती अठरा वर्षांची होईपर्यंत अविवाहित ठेवतां येत नाहीं. **नाना** कौंसिलांतील वादविवादप्रसंगीं ह्मणाले कीं, ‘ मला स्वताला मुलींचीं लहानपणांत लग्नें करण्याचा मोठा तिटकारा आहे, कारण मी आपल्या स्वतः-च्या कुटुंबांतील मुलींचीं लहानपणीं लग्नें न करण्याचा कृतनिश्चय केलेला आहे. आणि लहानपणीं लग्नें केल्यापासून पुढें दुर्दैवानें कसकसे अनर्थ ओढवतात, ह्या गोष्टीचा विचार करून माझे देशबांधवही आपल्या मुलांमुलींचीं लग्नें त्यांच्या अल्पवयांत करणार नाहींत, असा मला पूर्ण भरंवसा आहे. ’

वरील गोष्टीवरून **नाना** जरी सुधारणाप्रिय होते तथापि लोकांच्या गरजा काय आहेत, शास्त्राची आज्ञा काय आहे, आपणांत कोणती रूढी प्रचारांत आहे व कोणत्या गोष्टी केल्यानें लोक संतुष्ट होतील व सरकारही खुष राहील, ह्याबद्दलचें त्यांस पूर्ण ज्ञान होतें, तदनुरूप त्यांचें नेहमीं धोरण असे.


स्मॉलकॉजकोर्टांत वकिलांस काम चालविण्याची परवानगी.

(६) स्मॉलकॉज कोर्टाच्या मुकद्दम्यांत ब्यारिस्टर लोकांचें साह्य न घेतां वकिलांच्या हातून ते चालवितां यावे, ह्याबद्दल **नानांनीं** खटपट केली. कारण ब्यारिस्टर लोकांस खटले चालविण्याकरितां पैसे फार द्यावे लागतात, तेच वकिलास चालविण्याचा अधिकार मिळावा व त्याकरितां त्यांस फी ही कमी देतां येईल. आणि त्यामुळें गरीब लोकांस मुकद्दमे चालविण्यास वकिलांची मदत घेतां येईल. त्यामुळें गरिबांचा फार फायदा होईल, ह्याबद्दल **नानांनीं** प्रयत्न केले.

दत्तक मुलाच्या मालमत्तेचें संरक्षण.

(७) एखाद्या बाईनें आपल्या पतीच्या निधनानंतर जर एखादा मुलगा दत्तक घेतला, तर त्या उभयतांमध्यें अनेक वेळां बेबनाव घडून आल्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. यास्तव सदरहू दत्तक घेतलेल्या मुलाच्या जीविताचें व त्यांच्या मालमत्तेचें उत्तम रीतीनें संरक्षण व्हावें ह्मणून अशा प्रकारच्या आयांचे हांत पक्के बांधून द्यावे ह्मणजे त्यांस अन्यायानें सदरहू मालमत्तेची अफरातफर करतां येऊं नये ह्मणून याबद्दल कायद्यांत अवश्य तरतूद करण्याची **नानांनीं** खटपट केली.

ह्या गोष्टीवरून आह्मांस या ठिकाणीं एका गोष्टीचा उल्लेख केल्याशिवाय रहावतच नाहीं. ती ही कीं, ज्या गोष्टींबद्दल ह्या दत्तकप्रकरणांत कायद्यांत अवश्य तरतूद करण्याची **नानांनीं** जी खटपट केली, ज्या गोष्टीच्या परिणामाबद्दल **नानांस** आज पन्नास वर्षांपूर्वी त्याची आवश्यकता वाटली, तीच गोष्ट खुद्द त्यांच्या वंशजांसंबंधानें घडली. ह्मणजे **शंकरशेटच्या** गादीवर आज विद्यमान असलेले



श्रीमंत रा. रा. रावजी विनायकराव जगन्नाथ शंकरशेट.

हे नानांचे नातू हल्लीं त्यांचे गादीवर विराजमान आहेत. पान २०९

चित्रकारः—

रा. मो. ना. कीर्तीकर.

बॉंबे आर्ट प्रिंटिंग वर्क्स.

त्यांचे नातू **श्रीमंत रावजी विनायकराव जगन्नाथ शंकरशेट** ह्यांच्यांत व त्यांच्या कै. मातुश्री **लक्ष्मीबाई** ह्यांच्यांत दुर्दैवानें वितुष्ट येऊन त्यामुळें पुढें त्यांच्या घराण्याचा 'न भूतो न भविष्यति' याप्रमाणें नाश झाला, व कोर्टाच्यापायीं द्रव्याचा पुष्कळ चुराडा उडाला. ती हकिकत फार मोठी आहे, ती लिहूं ह्मटल्यास तिचा एक स्वतंत्र ग्रंथच होईल ह्मणून ती आह्मांस येथें देतां येणें शक्य नाहीं. आणि देण्याचें प्रयोजनही नाहीं. ती गोष्ट **नानां**स पन्नास वर्षांपूर्वी कळून चुकली होती आणि त्यांनीं पुढच्या धोरणावर दृष्टि ठेवून कायद्यांत ह्याबद्दल तरतूद करण्याची खटपट केली. परंतु भवितव्यापुढें कोणाचा इलाज नाहीं!

इतर प्रान्तांना सरकारी कायद्याचा फायदा.

(८) सातारा आणि त्याच्या जवळपासच्या प्रांतांतील रयतेनें सरकारास अर्ज केल्यावरून सदरहू प्रांताला मुंबई इलाख्याचे सरकारी कायदे लागू करावेत, ह्मणजे त्यांस कोर्टाच्या मुकद्दम्यांत सर्वत्र फायदा घेण्याची मोकळीक मिळावी व त्यांस सरसकट सारखा न्याय मिळावा ह्मणून **नानां**नीं खटपट केली.

सरकारधाऱ्याच्या ठरावांत सुधारणा.

(९) सरकारधारा देण्याबद्दल जमीनदारानें जरी त्या संबंधानें झालेला सरकारी ठराव मान्य केल्यासारखा आहे, तथापि आपणास बाहेरून कळल्यावरून असें समजतें कीं, सरकारधारा जमीनदारांनीं स्वखुषीनें देण्याऐवजीं त्यांस जबरदस्तीनेंच देणें भाग पडतें, ह्याबद्दल सदरहू सरकारदेण्याबद्दल अधिक चांगल्या रीतीनें व्यवस्था करावी, ह्मणजे रयतेस कोणत्याही रीतीनें आपल्या माथ्या-

वर बोजा आहे असें वाटूं नये, ह्याबद्दलचें बिल **नानांनीं** कौन्सिलपुढें आणलें.

शहरपोलिस आणि गांवपोलिस.

(१०) पोलिसच्या एकंदर व्यवस्थेंत सुधारणा करणें ती फक्त मुंबईसारख्या दाट वस्तीच्या शहरांतील पोलिसखात्यांत अवश्य करावी, परंतु खेडेगांवांतील पोलिसव्यवस्थेंत फेरफार करण्याची कांहीं अवश्यकता नाहीं, ह्याबद्दल **नानांनीं** कौन्सिलांत ऊहापोह केला.

मुंबईचें स्मशानभूमीप्रकरण.

(११) 'मुंबईचें स्मशानभूमीप्रकरण' हें स्वतंत्र भागांत दिलेंच आहे, तें वाचकांनीं अवलोकन करावें.

कापसाच्या व्यापाराचे परवाने.

(१२) कापसाच्या व्यापारांत कांहीं अफरातफर झाली, तर त्यासंबंधानें लोकांस परवाने देण्याचें नाकारण्याचा अधिकार जिल्ह्यांतील कलेक्टरांस नसावा, ह्याबद्दल **नानांनीं** कौन्सिलांत खटपट केली.

व्याहाड पाणीखात्याची व्यवस्था.

(१३) व्याहाड पाणीखात्याची व्यवस्था करण्यासंबंधानें एक बिल **नानांनीं** कौन्सिल पुढें आणिलें.

नाना ह्मणाले कीं, ' सरकारांत योग्य वेळीं पैसे भरणें म्युनिसिपल कमिशनरांस वारंवार शक्य होणार नाहीं ' ह्मणून ह्या संबंधानें **बेंच ऑफ जस्टिसिस**चा अभिप्राय घेणें रास्त होईल, कारण सदरहू संस्थेच्या शिरावरच ह्याबद्दलची सर्व जोखीमदारी आहे. या

करितां **बेंच ऑफ जस्टिसिसलाच** ह्याबद्दलची आपल्या मर्जीनुरूप व्यवस्था करण्याकरितां अधिकार असावा.'

सदरहू संस्थेनें वरील व्यवस्था आपल्याच आटोक्यांत ठेवण्याबद्दल सरकारांत पुष्कळ वेळां लिहिलें होतें, त्यामुळें ह्यासंबंधानें फाजील होत असलेला खर्च पुष्कळ अंशांनीं कमी होईल. परंतु दुर्दैवेंकरून सरकारानें वरील विनंति मान्य केली नाहीं. पुढें **बेंच ऑफ जस्टिसिसनें** ह्याबद्दलच्या खर्चाची निमेनीम वांटणी करण्याचा ठराव केला. ह्मणून सरकारी इमारतींवर पाणपट्टी कां वगळावी, याचा उलगडा होत नाहीं. इतर कर भरणाऱ्यांप्रमाणेंच सरकारही सदरहू कर भरील असें वाटतें. ह्या संबंधाची वाटाघाट **नानांनीं** कौन्सिलमध्यें केली.

जुगाराचा प्रतिकार.

(१४) मुंबई इलाख्यांत चोहोंकडे जुगार, मुदतीचे सट्टे व पैजा मारण्याचा व्यवहार हे प्रकार फार वाढत चालले, आणखी रयतेस फार उपद्रव होऊं लागला व कित्येकांची नीतिमत्ता बिघडूं लागली. ह्मणून त्याचा प्रतिकार करण्याच्या उद्देशानें **नानांनीं** लोकांच्या सुखवृद्ध्यर्थ प्रयत्न करण्याच्या उद्देशानें जुवेबाजीच्या प्रतिकाराचें बिल कौन्सिलपुढें सादर केलें. त्या वेळेस त्यासंबंधानें बरींच साधक बाधक कारणें दाखविण्यांत व कायद्यांतील कांहीं कलमांच्या अयथार्थतेबद्दल जो ऊहापोह केला, त्यांत त्यांचें व्यवहारचातुर्य, दूरदृष्टी, कायद्याविषयींचें पूर्ण ज्ञान व भाषणप्रसंगीं इंग्रजी भाषेवरील त्यांचें पूर्ण प्रभुत्व हीं उत्कृष्ट रीतीनें दिसून आलीं.

वरील विषयांवर झालेलें भाषण फार महत्त्वाचें होतें, परंतु तें या प्रसंगीं जागेच्या अभावामुळें देतां येत नाहीं, ह्याबद्दल आह्मांस फार दिलगिरी वाटते.

सबूकलेक्टरचा पोलिसखात्यावरील अधिकार.

(१५) जिल्हानिहाय असलेले सबूकलेक्टर्स यांनां ॲसिस्टंट टू म्याजिस्ट्रेटचे अधिकार देण्याबद्दलचें बिल सादर केलें; तेणेंकरून त्यांस त्यांच्या हाताखालीं असलेल्या पोलिसखात्यावर पूर्ण रीतीनें ताबा बसवितां यावा व तें खातें त्यांच्या पूर्ण कह्यांत जावें, असा मतलब होता. कारण सबकलेक्टरच्या अधिकारांतील पोलिसखात्यावर त्यांना अधिकार चालवितां येत नसे.

प्रांतमामलतदारांचा अधिकार.

(१६) मुंबई इलाख्यांतील प्रांत मामलतदारांस जिल्ह्यांतील कलेक्टरांच्या विचाराशिवाय कोणत्याही स्थावर विळकतीचा ताबा लोकांपासून अन्यायानें नाहींसा झाल्यास त्यासंबंधानें अमलबजावणी करण्याचा त्यांस अधिकार पोंचत नसे, त्याबद्दल **नानांनीं** खटपट केलेली.

जमीनदारांचे हक्क.

(१७) मुंबई इलाख्यांतील जमिनीची मोजदाद करून त्यांच्या हद्दी ठरविणें आणि त्यांवरील जमाबंदी कायम करून जमिनींच्या मालकांचे हक्क राखणें ह्याबद्दलचा विचार केला आणि कौंसिलांत **नानांनीं** त्याबद्दल खटपट केली.

म्युनिसिपल कमिशनर आणि एन्जिनिअर यांचें वेतन.

(१८) गांव म्युनिसिपालिट्यांचा कारभार सुयंत्र चालवितां यावा म्हणून सदरहू म्युनिसिपालिट्यांस कांहीं जास्त अधिकार देण्याबद्दलचें बिल कौन्सिलपुढें विचारास आणलें. मुंबई शहरांतील म्युनिसिपालिटीच्या द्वारें अवश्य शहरसुधराई करितां यावी म्हणून म्युनिसिपल कमिशनरांस कांहीं जास्त अधिकार द्यावे व त्यांस आपलें काम अधिक नेटानें व संतोषकारक रीतीनें करितां यावें म्हणून त्यांस

दरमहा रु० ३००० वेतन मिळावें आणि सदरहू प्रमाणें म्युनिसिपल एन्‌जीनिअर यांसही दरमहा रु० २००० वेतन मिळावें, ह्याबद्दल **नानांनीं** कौन्सिलांत खटपट केली. वगैरे, वगैरे.

तात्पर्य थोडक्या काळाच्या अवधींत ह्मणजे अवघ्या चार साडे-चार वर्षांत कायदेकौन्सिलांत **नानांनीं** जें काम केलें, त्यांतील मुख्य मुख्य गोष्टींचा गोषवारा वर दिलेला आहे, त्यावरून आमच्या वाचकवर्गाची खात्री झालीच असेल. इच्छा आणि तयारी असेल तर मनुष्यप्राणी काय करणार नाहीं ? सर्व कांहीं करूं शकेल ! वर लिहिलेल्या गोष्टीखेरीज **नानांनीं** कौन्सिलांत बारीक सारीक कामें पुष्कळच केलीं तीं सविस्तर येथें देतां येत नाहींत. तथापि शेलकीं तेवढीं म्हणजे ज्यामुळें **नानांच्या** सत्कीर्तीचा अधिक प्रकार होईल, अशांचाच सारांश दिलेला आहे. यावरून असेंच ह्मणणें भाग पडतें कीं, **नाना** आपल्या कर्तव्यास पूर्णरीतीनें जागले, त्यांस पाठमोरे झाले नाहींत. आपला देह त्यांनीं सत्कार्यीं लावला. ह्मणून आह्मी असेंच ह्मणतों कीं, इच्छा असली तर मनुष्यप्राणी आटोक्या-च्याही पलीकडे चांगलीं कामें करूं शकतो. मध्यंतरी कितीही अड-थळे आले, तरी तो त्यास जुमानीत नाहीं. आपला क्रम तो अबाधीत चालवितो. ही गोष्ट आपल्या हल्लींच्या तरुण पिढीनें केवळ कित्ता घेण्यासारखी आहे. परिणामावर दृष्टी ठेवून अंगीकृत कार्य तडीस नेण्यास झटावें आणि परमेश्वरावर भरंवसा ठेवून आपला क्रम चालू ठेविल्यास खात्रीनें यशस्सिद्धि होईल. कारण भगवद्भक्त **तुकोबारा-**यांनीं म्हटलें आहे कीं,

जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती । चालविशी हातीं धरूनियां ॥

भाग सोळावा.

निधन.

मरावें परी कीर्तिरूपें उरावें

रामदास.

उपजणें मरणें न चुके नरा ॥
फिरत नित्य असे भवभोंवरा ॥

वामन.

जब तुम पैदा भये जग हांसे तुम रोय
अब तोमी ऐसा करो के पीछे हांसे ना कोय.

तुळसीदास.

टवटवीत पुष्पांचा बहार वसंतऋतूचें अस्तित्व आहे तोंपर्यंत दृग्गोचर होतो. अखिल वनराजीचा प्रफुल्लितपणाही त्याच समयास नयनमनोहर दिसतो. जोंपर्यंत शरीरांत प्राणवायु आहे, तोंपर्यंत त्या शरीराची शोभा. ज्या ज्या गोष्टीच्या परिपोषास अवश्य लागणारें तत्व अस्तित्वांत आहे, तोंपर्यंत त्या त्या गोष्टींचें महत्त्व. परंतु जसा का एकदां वसंतऋतूचा बहार निघून गेला म्हणजे तींच पुष्पें केवळ निर्माल्यवत् होतात, अखिल वनराजी निस्तेज होऊन जाते किंवा शरीरांतील प्राणवायु निघून गेल्यावर नुसतें भेसूर शव राहतें, अथवा एखादी सुशील गृहिणी पतिनिधनानंतर नष्टप्रभ होऊन जाते, तद्वत्च जर एखादा लोकमान्य

लोकधुरीण अस्तंगत झाला, तर अखिल जनतेवर जणूं निस्तेजकळा आल्यासारखी भासते, असो.

कोणत्याही गोष्टीची अखेर साधावयाची म्हणजे फार बिकट काम असतें. ह्याची कल्पना बुद्धिबळाच्या डावांत अखेर साधणारांसच होणारी आहे. अशा कांहीं गोष्टी असतात कीं, त्या अगदीं जवळ जवळ शेवटपर्यंत चांगल्या सुरळीत चालतात. परंतु अखेरीस अगदीं क्षुल्लक कारणामुळें बिनसतात. तात्पर्य, अखेर साधणें फार दुर्घट होय. त्याचप्रमाणें एखाद्या विभूतीचा अवघा जीवनवृत्तांत निवेदन करून त्याची अखेर कथन करणें हें ग्रंथकारांस फार जड जातें व त्यांस एका प्रकारें संकटप्रद होतें. आह्मीही **नानां**चा आतांपर्यंत अवघा चरित्रक्रम वाचकांस सादर केला आहे; परंतु त्यांचें निधनवृत्त कथन करणें आम्हांस फार जड जातें. परंतु ही निरुपायाची गोष्ट होय. कोणत्याही कामास प्रारंभ केला कीं, त्याचा शेवट करणें हें अत्यावश्यक होय. ह्याबद्दल भिन्नमत व्हावयाचें नाहीं.

सन १८६५ च्या वर्षाऋतूस आषाढ महिन्यांत प्रारंभ झाला. वसंतऋतूच्या उष्ण वातावरणामुळें संतप्त झालेल्या शरीरावर वर्षाऋतूचे प्रथम चार थेंब पडले ह्मणजे एकाप्रकारची हुषारी वाटून मन प्रफुल्लित होतें. अनेक परिस्थितींतले लोक ह्या वर्षाकालाची केवळ मार्गप्रतीक्षा करीत असतात. अर्थात लोकांचीं मनें एकाप्रकारानें उल्लसित झालेलीं असतात. पुढें श्रावणमास. ह्या वेळेस वर्षावाची गर्दीच गर्दी. त्यामुळें परिस्थिति बरीच संतोषकारक बदललेली असते. अशा वेळीं मुंबईकरांस किंबहुना साऱ्या महाराष्ट्रास एक अत्यंत दुःखकारक प्रसंग अनुभवण्याची वेळ आली आणि तो प्रसंग प्रस्तुतस्थलीं निवेदन करण्याचें आमच्या वांट्यास आलें, ही निरु-

पायाची गोष्ट होय. जी कामगिरी तूर्त आह्मावर येऊन पडलेली आहे, ती यथाशक्ति पार पाडण्यास आह्मांस तयार असलें पाहिजे; ती कांहीं टाळतां येत नाहीं. श्री समर्थांनीं ह्मटल्याप्रमाणें "**अंतकाळ येतो येतां । तेथें नये चुकवीतां**" तसें मरण हें कोणास चुकत नाहीं किंवा चुकवितांही येत नाहीं. पण त्यांतल्यात्यांत ज्यानें अखेर साधली, तो जिंकला. आमच्या चरित्रनायकासंबंधानें ही गोष्ट अशीच आहे. त्यानें आपल्या अवघ्या हयातींत जीं जीं लोकोपयोगी व परोपकारी कामें केलीं व जो नांवलौकिक मिळविला, ह्या संबंधानें आह्मी आतांपर्यंत ह्या चरित्रवृत्तांत जें वर्णन केलें आहे, त्यावरून आमच्या वाचकवर्गास त्याबद्दलची चांगली अटकळ झाली असेल, असा आह्मांस पूर्ण भरंवसा आहे. ह्मणून आतां आपण मूळ विषयाकडे वळूं.

नानांची शरीरप्रकृति सदा निकोप असे. त्यांस दुखणेंबाणें सहसा येत नसे. याचें कारण त्यांनीं "**पुरुषार्थाचें साधन बा! धनसें हें शरीर रक्षावें**" या कविवर्य **मोरोपंता**च्या उक्तीप्रमाणें आपली शरीरसंपदा उत्तम तऱ्हेनें राखिली होती. **नाना** आधीं गर्भश्रीमंत त्यांत त्यांनीं सुखांत दिवस काढलेले; त्यांत सर्व गोष्टींची अनुकूलता होती आणि मन विवंचनारहित होतें. तेव्हां इतक्या गोष्टींचा जेथें एकत्र योग झाला, अर्थात शरीरस्वास्थ्य आणि मनःस्वास्थ्य यांचा संगम झाला ह्मणजे शरीरप्रकृति निकोप राहणें अगदीं स्वाभाविक आहे. ही झाली सुखसंपन्नतेची गोष्ट! परंतु इतर कोणत्याही परिस्थितींतल्या माणसानें पूर्ववयांत अवश्य तेवढे नियम पाळल्यानें व विकारव्यसनरहित कालक्रमणा केल्यानें अगदीं खात्रीपूर्वक त्यांची शरीरसंपत्ति सदृढ राहील व त्यास सहसा दुखणेंबाणें येणार नाहीं.

मग **नानां**च्या परिस्थितींतला मनुष्य सदृढ राहील, यांत नवल तें कोणतें ! ! असो.

आम्हीं हल्लीं ज्या गोष्टीविषयीं लिहीत आहों, त्या सुमारास **नानांस** बासष्टावें सरून त्रेसष्टावें वर्ष लागलें होतें. त्यांचा नित्याचा व्यवहारक्रम सुरळीत चालला होता. प्रकृति अगदीं चांगली होती. आणि त्यांच्या नेहमींच्या पद्धतीनुरूप ज्या ज्या वेळीं जीं जीं कामें करावयाचीं, त्या त्या वेळीं तीं नियमित करण्याचा त्यांचा क्रम अबाधित चालला होता. अशा वेळीं सन १८६५ च्या जुलई महिन्याची १७ वी तारीख उगवली. ह्या दिवशीं **नानांची** प्रकृती नित्याप्रमाणें अगदीं निकोप व स्वस्थ होती. ह्मणजे शरीरस्वास्थ्य व मनःस्वास्थ्य या दोहोंचाही योग होता. सायंकाळीं चार वाजतां टाउनहालांत '**ॲग्रि हॉर्टिकल्चरल् सोसायटी**' ची सभा होती, त्यासभेस हजर रहाण्यास **नाना** वेळेवर गेले. वरील संस्थेचे **नाना** हे अध्यक्ष होते. सभेची वेळ होतांच **नाना** हे अध्यक्षाचे जागेवर विराजमान झाले. त्या दिवसाचें सभेचें काम म्हटलें म्हणजे वरील सोसायटीच्या विद्यमानें चालत असलेला व जो पुढें '**राणीचा बाग**' या नांवानें प्रसिद्धीस आला, त्या बगिच्याची स्थिति लोकाश्रयाच्या अभावीं आणि जनतेकडून येणाऱ्या वर्गणीची बरीचशी बाकी थकल्यामुळें अगदीं डबघाईस आली होती, म्हणून त्यासंबंधानें विचार करणें, हें होतें. त्यांत मुख्यत्वेंकरून **मुंबईतील** शेटसावकारांस द्रव्याच्या बाबतींत खालावत जाण्याचें कारण '**बॅकबे रेक्लमेशन स्कीम**' मुळें अस्तित्वांत आलेला '**शेअर म्यानिया**' हें होय. ह्यांत सामील झालेल्या मुंबईतील कितीएक धनिकांची जी दुर्दशा झाली, तिचें कोठवर वर्णन करावें ! ! ह्या संबंधाची सविस्तर हकिकत ह्याच ग्रंथांत अन्यत्र दिलेली आहे, ती जिज्ञासूंनीं पहावी. असो.

तात्पर्य, वर म्हटलेल्या कारणामुळेंच द्रव्याच्या बाबतींत शैथिल्य आल्यामुळें वरील लोकोपयोगी व सार्वजानिक संस्थेस लोकांकडून मदत मिळेनाशी झाली म्हणून तिची स्थिति खालावत चालली होती. तरी तिला हातभार लावून ती सांवरून धरण्यास काय उपाय योजावे, ह्या संबंधाचा विचार करण्याकरितां वरील सभा भरविली होती. म्हणून अध्यक्ष या नात्यानें **नानानीं** जें प्रास्ताविक भाषण केलें, तें मुळांतच इंग्रजींत खालीं देतों. त्या वरून **नानांस** सार्वजनिक कामाची किती हौस होती व लोककल्याणाविषयीं त्यांस किती कळकळ होती, हें स्पष्ट दिसून येतें. तें भाषण येणेंप्रमाणें:—

नाना म्हणाले:—

"Gentlemen,—Your Committee have asked you to meet them today, as they are in need of your help to get the Society out of a pressing difficulty. The want of a Garden nearer the centre of the Town than our late Garden at Sewree, induced the Government in 1862, to give us thirty-three acres of the Mount Estate in trust for the purpose. This we have partially laid out as a botanical and pleasure garden; and we obtained the necessary funds by appealing to the public from time to time for subscription. In this way upwards of Rs 22,000 were collected. But during the past twelve months there has been a falling off in public support from well understood cause, and at last our debt amounts to Rs 16,000, with a prospective monthly deficit of Rs 400. Now in ordinary times this would have been a matter of little concern, but in these days the gravity of our position must not be under-estimated. Your Committee have felt that they could not order any

reduction of expenditure injurious to the garden and yet they could not be responsible for the Society going on getting into debt month by month. They have therefore asked you to come together and consult what we should do to get rid of the debt, and to meet the estimated prospective deficit. × × × × × We wish to arouse a more general interest in the gardens. It is now practically supported by a few members. This is not just, nor is it expedient; for the future of the gardens can not be assured until they receive the general support of the public. Short of appealing to the Society generally, the Committee have done all they can to prevent the estimated deficit. First, on the ground of having faithfully discharged the duties of trust imposed upon the Society by Government, they appealed for further aid from them. Government while admitting the claim, stated that we had a better claim upon the Municipality. We then, on the ground that we had laid out and drained 33 acres of unsightly and unhealthy land, applied to Mr. Crawford for assistance, who while admitting our claim, is however unable in the present state of the Municipal fund to help us, but he promises to make provision for a grant in the October Budget. This correspondence the Secretary will read to you presently. We may, I think, safely calculate upon the Bench of Justices voting us Rs 250 a month. We have laid out 33 acres without assistance, and the Bench cannot object to paying Rs 250 a month towards as it were the police and health of so large an area in the very centre of the Island. The pleasure and recreation which the Gardens afford to the inhabitants of Bombay and instruction to the students of the Grant

Medical College in Botany, and to strangers visiting the Presidency, are also claims to Municipal support. But for the present we must help ourselves and I earnestly trust that we shall do so at our own cost and not on the cost of the Gardens. × × × × × This debt of Rs 16,000 is after all, money invested in reproductive work, for one-half the Garden has been laid out in Mango and Pamals trees which will yield Rs 2,000 to 3,000 yearly, in a year or two. In fact we cannot turn back now; we must go on, we have no choice. The reputation of Bombay constrains us. As the Bombay Saturday Review said,—so far back as November 22nd 1862, observe, before the year of speculation,—" The Victoria Museum and Gardens is emphatically the greatest public work hitherto undertaken in this City;" and we must not in 1865 stop short in it, because of the unfortunate crisis which has overtaken Bombay. I have always supported this Society and I shall, of course, subscribe today for its relief; but what I whish is that we all jointly come to the rescue, and not have the burden to be borne by half a dozen men; in other words that we consider the difficulty as if there had been no crisis, of which in truth and fact, the history of the gardens is completely independent."

× × × × × × × × × × × ×

येणेंप्रमाणें **नानांचें** भाषण झाल्यावर सभेचा पुढील औपचारिक विधि उरकून सभा विसर्जन झाली.

नाना घरीं आल्यावर त्या रात्रीं त्यांस थोडासा ज्वर आला. ताबडतोब त्यांस औषधोपचार सुरू झाला. त्यांच्या घराण्याचे—फ्यामिली—डॉ० **चार्लस मोरहेड** आणि डॉ० **ब्यारिंगॉल** हे होते.

ह्या उभयतांस **नानांनीं** मोठमोठीं वर्षासनें देऊन आपले पदरीं ठेविलें होतें. त्याचप्रमाणें भिषग्वर्य **डॉ० भाऊ दाजी** हे, **कृष्ण जोशी**,[1] **अनंता बाळाचार्य वैद्य**[2] हेही प्रसंगविशेषीं **नानां**कडे औषधोपचार करण्यास जात असत.

नानांस ज्वर येऊं लागल्यापासून दोन तीन दिवसांनीं त्यांचें सारें अंग पिवळें दिसूं लागलें. डोळे पिवळेधमक झाले. तेव्हां वैद्यांनीं ही कामीण किंवा कावीळ आहे, असें निदान ठरविलें व त्याप्रमाणें औषधाची योजना झाली आणि कारणपरत्वें अनुपान बदलूं लागले. **नानां**चा ज्वर कांहीं हटेना. वैद्यांनीं औषधोपचाराची पराकाष्ठा केली, तरी गुण ह्मणून येईना. वरील उपचार चालू असतां रोगांस कांहीं उतार पडेना तेव्हां वैद्यांनीं **नानां**ची प्रकृति पुन्हा तपासली त्यांत **नानां**स नवज्वराची भावना झाली आहे, असें स्पष्ट दिसून आलें. मग औषधाची योजना बदलली. तरी ज्वराचें पाऊल दिवसेंदिवस

---

१ **डॉ० भाऊ दाजी** यांची वाचकांस ओळख करून देण्याचें कांहींच प्रयोजन नाहीं.परंतु **कृष्ण जोशी** यांजविषयीं दोन शब्द लिहिणें अगत्याचें आहे. हे जातीनें पळशे ब्राह्मण असून ह्यांचा वडिलोपार्जित धंदा वैद्यकीचा असून त्या काळीं ते एक नामांकित वैद्यांत गणले जात असत. मुंबई शहरांतले मोठमोठे व श्रीमंत लोक त्यांजजवळून औषधपाणी घेत असत. प्रसिद्ध **हरिश्चंद्रबाबा जोशी** यांचे ते तीर्थरूप होते. असें सांगतात कीं, **हरिश्चंद्रबाबा जोशी** लहान असतां एकदां त्यांच्याविषयीं **नानांनीं** खुद्द असे उद्गार काढले कीं, " हा मुलगा खरोखर **कृष्ण जोशांचा** लौकिक संभाळील आणि आपल्या ज्ञातींत मोठा पुढारी होईल. " **हरिश्चंद्रबाबांस नाना** हे वारंवार चांगली सल्लामसलत देत असत. त्यावरून **हरिश्चंद्रबाबा** अगदीं शेवटपर्यंत ह्यांचे उपकार आठवीत असत.

२ **अनंत बाळाचार्य वैद्य** हेही एक प्रख्यात वैद्य मुंबईत गायवाडींत रहात असत. हे देखील वैद्यकशास्त्रांत निष्णात असून मुंबई शहरांतील गरीबापासून तों श्रीमंतापर्यंत ह्यांच्याकडून औषधोपचार करवून घेत असत. ह्यांचे वंशज गायवाडींत रहात असून आपला वडिलोपार्जित धंदा अद्यापपर्यंत चालवीत आहेत.

पुढें पुढें पडत चाललें. आणि घरांतील माणसांचीं मनें चिंताग्रस्त झालीं आणि त्यांच्या **आप्तेष्टास** व असंख्य परिचितांस त्यांच्या दुखण्याविषयीं फार भीति उत्पन्न झाली. जातीचे परजातींचे लोक समाचारास येऊं लागले. याप्रमाणें एकच गोंधळ उडाला. यूरोपियानांपैकीं डॉ० (हल्लीं सर) **जॉर्ज बर्डउड** ह्यांच्याशीं **नानांचा** अत्यंत स्नेह होता. ते तर ह्या वेळीं **नानांच्या** बिछान्याजवळ निरंतर बसलेलेच असत. त्याचप्रमाणें **डॉ. भाऊ दाजी** हे ही ह्या आणीबाणीच्या प्रसंगीं **नानांच्या** सान्निध्यास असत व औषधोपचाराची प्रकृतीचें मान पाहून कमिअधिक योजना करीत. **बाटलीवाले, वर्जिवनदास माधवदास** यांच्या सारखीं थोर थोर माणसें समाचारास येऊं लागलीं.

नानांचा आपल्या कुटुंबांतील परिवार मोठा असल्यामुळें त्यांच्या हल्लींच्या दुखण्याबद्दल त्यांस काळजी वाटावी, हें स्वाभाविक आहे. त्याअन्वयें घरांतील मंडळीनें **नानांच्या** दुखण्यास उतार पडावा आणि त्यांतून ते उठून उभे रहावेत म्हणून अनेक नवस सायास केले. **भवानीशंकराच्या** देवळांत शंकराच्या माथ्यावर रुद्राभिषेक चालविला. याप्रमाणें कोणी कांहीं कोणी कांहीं असे बाह्योपचार चालविले. असे अनेकांनीं अनेक प्रकार केले. त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. तेव्हां **नानांच्या** ह्या दुखण्याबद्दल सर्वांस अतिशय वाईट वाटलें.

दिवसेंदिवस रोगाचें पाऊल पुढें पुढें पडत चाललें. डाक्टरांचे व वैद्यांचे सर्व उपाय निष्फळ होऊं लागले. तेव्हां त्यांनीं रोगाचें लक्षण असाध्य ठरविलें. योग्य वेळीं अनुपान बदलून ओषधें देऊन रोगास कांहीं उतार पडावा ह्मणून त्यांनीं आपली पराकाष्ठा

केली, परंतु सारें व्यर्थ ! ! कांहीं देखील इलाज चालेना ! ! ! शेवटीं वैद्यराजांस **नानांच्या** दुखण्याचा अखेरचा परिणाम कळून चुकला. **नाना** हे आतां एक दोन दिवसांचे सोबती आहेत, असें समजून त्यांनीं घरांतील माणसांस व मुख्यत्वेंकरून **नानांचे** एकुलते एक चिरंजीव **बाबासाहेब** यांस त्याप्रमाणें सुचविलेंही. तें एकून त्या प्रेमळ सत्पुत्रास किती परमावधीचें दुखः झालें असेल, याची कल्पना वाचकांनींच करावी ! ! घरांतील मंडळीचीं व आप्तेष्टांची तोंडें निस्तेज दिसूं लागलीं. परंतु पुढील अनिष्ट परिणामाची वाच्यता **नानांच्या** कानावर न जाऊं देण्याची त्यांनीं आपल्यापरी बरीच मोठी खबरदारी घेतली. परंतु ज्यानें आपला अवघा आयुष्यक्रम मोठ्या शहाणपणानें व मोठ्या धूर्तपणानें कंठिला, त्याला आपला अंतकाळ समीप आला, हें कळणार नाहीं काय ! ! **नानांस** तें तर कळून चुकलेंच. पण त्यांनीं आपल्या माणसांच्या समजुतीकरितां बाहेर दर्शविलें नाहीं. अखेरीस ज्यास आह्मी भीत होतों, तो दिवस उगवला.

नाना स्वकर्तव्यदक्ष असल्यामुळें त्यांनीं सर्व गोष्टींची पूर्वींच मोठ्या शहाणपणानें व दूरदृष्टीनें पूर्ण निरवानिरव करून ठेविली होती. पाठीमागें कांहींच भानगड ठेविली नव्हती. जसजसी वेळ समीप येऊन ठेपली, तसतसा वैद्यांचा धीर सुटत चालला व घरांतील मंडळीस मरणप्राय दुःख झालें. **नाना** अगदीं अखेरपर्यंत अंतर्यामीं सावध होते. अखेरीस ती शेवटची काळघटका अवघ्या तास दीड तासावर येऊन ठेपली. **नानांस** कळून चुकलें कीं, आपण आतां अगदीं थोड्या वेळेचे सोबती. असें जाणून त्यांनीं आपले माणसांस आपणास तिसऱ्या मजल्यावरील आपल्या शयनमंदिरांतून खालीं तळ-मजल्यावर **देवघरासमीप** आणून निजविण्यास सांगितलें. आणि

पुरोहितास '**गजेंद्रमोक्षा**'ची पोथी काढून ती वाचण्यास सांगितलें व आपण स्वतः ती ऐकत राहिले. त्या वेळीं त्यांच्या चेहेऱ्यावर एका प्रकारचें तेज चमकूं लागलें व तो प्रफुल्लित आणि गंभीर असा दिसूं लागला. गजेंद्रमोक्षाचें पारायण संपण्यापूर्वीं प्रसिद्ध वरदी कवि व साधुपुरुष **विठोबाअण्णा दफ्तरदार** यांनीं '**अंतसमय परमघोर । दोषत्रय करिति जोर । घुरु घुरु घुरु कंठ होय । भरिल भ्रम हरिल स्मृति । करिल घाबरा ॥ करिं अतित्वरा ॥** ह्मटल्याप्रमाणें त्रिदोषाची भावना झाली, कंठास घरघर लागली, जीव घाबरा झाला, आणि **श्री समर्थ रामदासांनीं "अंतकाळ येतो येतां ॥ तेथें नये चुकवितां ॥"** असें ह्मटल्याप्रमाणें **ता० ३१ जुलई १८६५–श्रावणी सोमवार–या** दिवशीं माध्यान्ह उलटून गेल्यावर ह्मणजे बारा वाजल्याउपरांत **नानांचें** प्राणोत्क्रमण झालें. त्यांच्या शरीरांतील प्राणवायु निघून जाऊन तो पंचतत्वांत मिसळून त्यांचा जडदेह मात्र धरणीवर राहिला, आणि त्यांच्या वैभवमाध्यान्हीसच त्यांचें देहावसान झालें, आणखी मुंबईइलाख्यांतील एक अति तेजःपुंज तारा अखेरचा मावळला.

आपल्या कर्तबगारीनें आपली कीर्ति अजरामर ठेवून व आपले पश्चात् लोकांस आपले पोवाडे गाण्यास लावून **नानांनीं** आपली इहलोकींची यात्रा संपविली, हें योग्यच झालें. पण आह्मास मात्र दुःखसागरांत लोटून **नानांनीं** कैलासास प्रयाण केलें, ह्याबद्दल फार वाईट वाटतें. **नाना** आणखी कांहीं वर्षें जगते, तर त्यांनीं जी कामगिरी आपल्या हयातींत बजाविली, तिच्यापेक्षां कितीतरी पटीनें अधिक त्यांनीं लोकसेवा बजाविली असती, यांत तिलप्राय शंका नाहीं. मरणें हें सर्वांसच आहे, कोणीही मृत्यूच्या दाढेंतून सुटला आहे,

असें नाहीं. पण त्यांतल्या त्यांत **नानां**सारखा सार्वजनिक पुरुष अवेळीं नाहींसा झाला, हें पाहून फार वाईट वाटतें. बाकी काळाची झपड केव्हां कोणावर येईल, याचा भरंवसा नाहीं. साधुवर्य **तुकाराम** यांनीं ह्मटलेंच आहे कीं,

मृत्यु न ह्मणे हा बलाढ्य ॥ मृत्यु न ह्मणे हा धनाढ्य ॥
मृत्यु न ह्मणे हा आढ्यं ॥ सर्व गुणें ॥
मृत्यु न ह्मणे हा विख्यात ॥ मृत्यु न ह्मणे हा श्रीमंत ॥
मृत्यु न ह्मणे हा अद्भुत ॥ पराक्रमी ॥
मृत्यु न म्हणे हा भूपति ॥ मृत्यु न म्हणे हा चक्रवर्ती ॥
मृत्यु न म्हणे हा करामती ॥ कैवाड जाणे ॥
चारी खाणी चारी वाणी ॥ चौऱ्यांशी लक्ष जीवयोनी ॥
जन्मा आले तितुके प्राणी ॥ मृत्यू पावती ॥

किंवा म्लेंच्छ कवि व साधुवर्य **कबीर** यांनीं ह्मटल्याप्रमाणें

" जब आवे कालकी फेरी ॥ पलकी नहीं सबोरी "

या न्यायानें त्या निर्घृण काळानें **नानां**वर पाश घालून आमच्यांतून त्यांस अकाळीं ओढून नेलें, त्यास इलाज नाहीं; असो.

नानांची मृत्युवार्ता हां हां ह्मणतां शहरांत पसरली. तेव्हां जो तो **नानां**च्या वाड्याकडे त्यांचें शेवटचें दर्शन घेण्याकरितां व त्यांच्या प्रेतयात्रेबरोबर जाण्याकरितां धांव घेऊं लागला. शाळा, कॉलेजें, मार्किटें, मोठमोठीं ऑफिसिस ताबडतोब बंद झालीं. जातीचे, परजातीचे, हिंदु मुसलमान, पारशी, ख्रिश्चियन, साहेब, यहुदी, तसेच मोठमोठे सरकारी अधिकारी, श्रीमंत व गरीब स्मशानयात्रेबरोबर जाण्यास सिद्ध झाले. सायंकाळचे ४—४॥ वाजतां स्मशानयात्रा

१ श्रीमंत, मोठा. २ कारस्थान, कौशल्य.

निघाली. तिजबरोबर जातीची व परजातीची मिळून जवळ जवळ दीड हजार मंडळी होती. नानांच्या वाड्यापासून ते स्मशानभूमीपर्यंत सारा रस्ता माणसांनीं जणूं फुलून गेला होता. स्मशानयात्रेचा अवघा देखावा मोठा गंभीर होता. रस्त्यांतून वावरण्याऱ्या गाड्या माणसाच्या गर्दीमुळें जिकडेतिकडे घटकाभर खोळंबून राहिल्या होत्या. स्मशानभूमींत पोहोंचल्यानंतर प्रथम दहनाची जागा दुधानें धुवून शुद्ध केली. आणि नंतर त्याच्यावर चंदनाची चिता रचिली. पुढें तीवर नानांचें शव ठेवून आणि सर्वांनीं त्याचें अखेरचें दर्शन घेतलें व शेवटीं त्याचें यथाविधि दहन केलें. झालें, इकडे सारा ग्रंथ आटोपला. तात्पर्य, एकदां काळ विपरीत आला म्हणजे कांहींच लटपट चालत नाहीं किंवा कोणीही कामास येत नाहीं. काळचरित्रच असें आहे. ह्मटलेंच आहे कीं, " मातुलो यस्य गोविंदःपिता यस्य धनंजयः । सोऽपि कालवशं प्राप्तः कालो हि दुरितक्रमः ॥ "

नाना आमच्यांतून जडदेहानें नाहींसे झाले खरे, पण कीर्तिरूपानें ते आमच्यांत राहिलेच आहेत. शिरोलेखांत वर्णन केल्याप्रमाणें **श्री समर्थांनीं** ह्मटलेंच आहे कीं, ' **मरावें परी कीर्तिरूपें उरावें** ' ह्या उक्तीची सत्यता **नानांच्या** ठायीं किती यथार्थपणें दिसून येते, याचा आमच्या वाचकवर्गानेंच विचार करावा. नाहीं तर प्राणी आला तसा गेला. व्यर्थ जन्मास येऊन मातेस मात्र शिणविली. प्रसिद्ध भगवद्भक्त **नरहरि सोनार** हे म्हणतात " **देह जन्मला व्यर्थ । झाले पापाचे पर्वत ॥ दानधर्म नाहीं केला । शेवटीं जन्म व्यर्थ गेला ॥ देह अवघा क्षणभंगूर । दिसे स्वप्नवत सार ॥ नरहरि ह्मणे शेवटीं । संगें न येई लंगोटी ॥ १ ॥** " पण लोककार्याकडे दृष्टी ठेवून **नानांनीं** आपलें तन मन धन त्यास सर्वस्वीं वाहिलें व

आपला देह शिणविला आणि ह्मणूनच लोक त्यांचे अद्यापि पोंवाडे गातात. तेव्हां अशा प्रकारें आपली कीर्ति पाठीमागें ठेवून ज्यांनीं अवघ्या जनाचे धन्यवाद घेतले, ते पुरुष श्रेष्ठ होत. म्हणून श्री समर्थांच्याच वाणीनें ह्या कष्टमय भागाचा आपण उपसंहार करूं:-

काया बहुत कष्टावावी ॥ उत्कट कीर्ति उरवावी ॥
चटक लावून सोडावी ॥ कांहीं एक ॥
तनें मनें झिजावें ॥ तेणें भलें ह्मणोनि घ्यावें ॥
उगेंच कल्पिती शिणावें ॥ वाउगें जनीं ॥

भाग सतरावा.

दिनचर्या

* मौने मौनी गुणिनि गुणवान् पंडिते पंडितोऽसौ
दीने दीनः सुखिनि सुखवान् भोगिनि प्राप्तभोगः ।
मूर्खे मूर्खो युवतिषु युवा वाग्मिषु प्रौढवाग्मी
धन्यः कोऽपि त्रिभुवनजयी योऽवधूतेऽ वधूतः ॥

सुभाषित

यांत्रिककलेची अभिवृद्धि झाल्यापासून मनुष्यमात्राचे श्रम कितीतरी पटींनें वाचले आहेत, ह्याकडे दृष्टि फेंकली तर मन आश्चर्यानें थक्क होऊन जातें. यंत्रसाह्य नसतें तर मनुष्यमात्रास उदरनिर्वाहार्थ व इतर कृत्यांस किती त्रास सोसावा लागता व तीं तीं कामें पुरीं करण्यास किती कालावधि लागला असता, याचा विचार मनांत आला ह्मणजे चालू परिस्थितीच्या अनुकूलपणाबद्दल त्या कृपानिधीचे शतशः आभार मानल्याखेरीज राहवत नाहीं. थोर आणि योग्य पुरुषांच्या आयुष्य-

* मुनिसमुदायांत मौन धारण करणारा, गुणिजनांसी समागम झाला असतां गुण प्रगट करणारा, पंडित मंडळींत पंडित, दीनाचे ठायीं दीन, सुखी असल्यांशीं सुखी, विलासीजनाशीं विलासी, मूर्खांसी मूर्ख, तरुण स्त्रियांसी तरुण, वावदुकाशीं वक्ता व वैराग्याशीं वैरागी, याप्रमाणें जो सर्वांशीं रंग पाहून वर्तणारा तो त्रिभुवन-जयी चतुर पुरुष धन्य होय.

क्रमांतील घडामोडीची साधनसामुग्री उपलब्ध असली तर अनभ्यस्त माणसांच्या अंतःकरणांत किती प्रकाश पडेल, याबद्दल शंकाच नाहीं. म्हणून यांत्रिककलेपासून जशी मनुष्यमात्राच्या सुखांत आपोआपच भर पडली आहे, त्याचप्रमाणें महाभागांच्या आयुष्यक्रमांतील व मुख्यत्वेंकरून त्यांच्या दिनक्रमांतील गोष्टी अनायासें समजल्यानें त्या आपल्यापुढें ठेवून तदनुसार वर्तनक्रम ठेवण्यास एकाप्रकारचें उत्कृष्ट साधन होईल, असा आह्मास पूर्ण भरंवसा आहे.

कोणत्याही कर्तृत्ववान् पुरुषाचा अवघ्या दिवसाचा व्यवहारक्रम जाणल्यानें जो कांहीं आनंद होतो, किंवा जो कांहीं ज्ञानलाभ होतो, तो केवळ अपरमित होय. थोर पुरुषांच्या चरित्रावलोकनापासून जो संतोष होतो, तितकाच त्यांचा दिनक्रम समजल्यानें आपणास अनेक गोष्टी कळून त्यापासून नवीन ज्ञान करून घेण्याचा मोठा फायदा होतो. आपल्या महाराष्ट्रांत **श्री शिवाजी** महाराजापासून तों थेंट पेशवाईअखेरपर्यंतच्या काळांत जे थोर राजपुरुष उदयास आले, त्यांचा आख्या दिवसांतील व्यवहारक्रम अथवा दिनचर्या हल्लीं बऱ्याच उपलब्ध झाल्या आहेत. अशा माणसांच्या स्मरणवह्या **इतिहाससंशोधक मंडळीच्या** विद्यमानें अगदीं अलीकडे प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यांचें परिशीलन केल्यानें अंतःकरणांत एका प्रकारचा संतोष होतो. आणि त्यामुळें आपल्या ज्ञानभांडारांत एका प्रकारची भर पडते. ह्मणून आह्मी आमच्या चरित्रनायकाची दिनचर्या लिहिण्याचा इकडे उपक्रम करतों. त्यामुळें आमच्या अनेकविध वाचकवर्गांची बरीच करमणूक होऊन त्यांस आपला स्वतःचा वर्तनक्रम कसा ठेवतां येईल, याची अटकल बांधतां येईल, असा आह्मास भरंवसा आहे.

नाना आपल्या पूर्ववयांत मोठ्या पहांटेस उठत असत. ऐहिक व पारमार्थिक गोष्टींचा अवलंब करण्याची जी आवश्यकता आहे, त्याबर्हुकूम वर्तनक्रम ठेवण्याची त्यांची नेहमी प्रवृत्ति असे.

प्रातःकाळीं उठावें । कांहीं पाठांतर करावें ।
यथानुशक्ति आठवावें । सर्वोत्तमासी ।
प्रातःकाळीं उठत जावें । 'प्रातःस्मरामि' करावें ।
नित्यनेमें स्मरावें । पाठान्तर ।

या श्रीसमर्थांच्या वचनाप्रमाणें **नाना** पहांटेस उठल्याबरोबर प्रथम प्रातःस्मरण करीत असत. ईश्वरचिंतन त्याचप्रमाणें आपल्या कुलस्वामीचें आणि **पंतांनीं** ह्मटल्याप्रमाणें " **गति उत्तम होय असें वर्तावें, धर्मनीति रक्षावी । चित्तांत पूर्वजांची नित्य स्थिति रीति शांति लक्षावी ।** " याप्रमाणें आपल्या पूज्य पूर्वजांचे निष्ठापूर्वक स्मरण करून श्लोक, भुपाळ्या वगैरेचा त्यांनीं पाठ म्हणत जावा, नंतर ते प्रातर्विधि उरकल्यावर मुखमार्जनादि नित्यनैमित्तिक कामें करीत. तदनंतर त्यांचें स्नान होत असे. तें उरकल्यानंतर सूर्यास दोनतीनशें पर्यंत त्यांनीं नमस्कार घालावे. यांमुळें ऐहिक आणि पारमार्थिक अशा दोन्ही गोष्टी साधत. नमस्कार घातल्यानें आपली शरीरसंपदा सदृढ होते, हा एक मोठा लाभ. कारण कविचूडामणी **मोरोपंतांनीं** ह्मटलेंच आहे कीं, " **पुरुषार्थाचें साधन बा ! धनसें हें शरीर रक्षावें.** " ! या न्यायानें अगम्य लाभ होतोच; आणखी वरील नमस्कारांची कृति ईश्वराठिकाणीं रूजूं होते, हा एक पारमार्थिक अलभ्य लाभ होय.

नानांचा पुढें पुढें ह्मणजे बहुतेक आपल्या उत्तरवयांत हा स्नानविधिक्रम पर्यायेंकरून बदलत गेला, तो असा–त्यांचें स्नान

श्रीमंती थाटाप्रमाणें व कामकाजाच्या लकड्यामुळें सकाळीं फार करून उशिरां होत असे. हा स्नानविधि मोठ्या थाटाचा पण तथाकर्म व्हावयाचा ! तो असा--चौरंगासारखी काळ्याभोर दगडाची एक तुळतुळीत शिळा, ही त्यांच्या स्नानास बसण्याची बैठक. तीवर **नाना** एकदां जाऊन बसले, ह्मणजे शागीर्दानें त्यांच्या करितां अगोदरच गंघाळांत सारून ठेवलेल्या उष्णोदकानें प्रथम चांगलें अंगमर्दन करून स्नान करावयाचें. पाणी घालणारा शागीर्द नानांस सोंवळ्यानें पाणी सारण्याकरितां त्यांच्या अगोदरच स्नान करी. व त्या पाण्यास कोणीही पोराशानें शिवतां कामा नये, अशी **नानां**ची सक्त ताकीद असे. पहिलें गंघाळ संपलें ह्मणजे शागीर्दानें तें पुनः भरावें. इतक्यांत हातांत सुवर्णचंबू घेतलेला एक पुरोहित जवळ उभाच असे. त्यानें त्यांतलें थोडेसें गंगोदक त्या गंघाळांत टाकावें. मग **नानां**नीं अंजुळींत उदक घेऊन त्या पुरोहितानें संकल्प सांगावा. तो पुरा झाल्यावर त्यांनीं पुनः स्नान करावें. ह्मणजे तीर्थाठिकाणीं ज्याप्रमाणें गंगेवर स्नानविधि होतो, त्याप्रमाणें **नानां**चा रोजचा स्नानाचा क्रम असे. स्नान आटोपल्यावर ओलें वस्त्र पिळावें व जमिनीवर पाय न ठेवतां तिकडे जवळच ठेवलेल्या शिसवी खडावा पायांत घालून शागिर्दानें खुंटीवर ठेवलेलें धौतवस्त्र घेऊन तें परिधान करावें. त्याचप्रमाणें आणखी एक धुतलेलें उपवस्त्र अंगावर घेऊन स्वारीनें देवघरांत प्रवेश करावा. हा सकाळचा स्नानविधि झाला. त्याच प्रमाणें सायंकाळींही सदरहू प्रमाणें स्नानविधि व्हावयाचा ! ह्मणजे दिवसांतून दोनवेळां त्यांचें स्नान होत असे.

इकडे आणखी एका गोष्टीचा उल्लेख केल्यास कांहीं अप्रासंगिक होणार नाहीं, असें आह्मास वाटतें. ती गोष्ट ही कीं, सोमवती, ग्रहण

वगैरे कांहीं पर्वणी आली तर त्या दिवशीं नानांनीं मोठ्या पहांटेस उठून प्रथमतः घरीं नित्यनियमाप्रमाणें स्नान करावें, आणि नंतर शागीर्द, पुरोहित व आपल्या इतर परिवारानिशीं आपण स्वतः पालखींत बसून चौपाटीवर–ब्याकबेवर समुद्रस्नानास जावें. घरीं स्नान करून जाण्याचें कारण त्या पवित्र रत्नाकरास पारोशानें शिवतां कामा नये, अशी त्यांचीं वहिवाट असे.

देवघरांतील थाट मोठा अवर्णनीय होता. देवघरांतील जमीन तांबड्या संगमरवरी दगडांची बनविलेली आहे. तिकडल्या भिंती चांगल्या रंगवून त्यांजवर दशावतारांतलीं सर्व चित्रें नानारंगांनीं कुशल कारागिराकडून काढविलेलीं होतीं. वर छताला हंड्या, झुंबरें टांगलेलीं असून दोन बाजूंस भिंतीस सुवर्णांकित चौकटीचे दोन मोठाले आयने लाविले आहेत. व इतर बाजूंस देवादिकांच्या सुरेख तसबिरा टांगलेल्या आहेत. देवघराच्या मध्यभागीं एक लांब रुंद असा चौकोनीं शिसवी लांकडांचा नकशीदार काळाभोर चौरंग ठेविलेला आहे. त्यावर तसाच शिसवी लाकडाचा, खालच्या बैठकीस साजेसा एक देव्हारा ठेवलेला आहे त्याचें काम मोठें नामीं कोरलेलें आहे. चोहों बाजूंचे खांब मोठे नकशीदार असून त्यावर गोलाकार कळस आहे. देव्हाऱ्याच्या शेजारीं दोहों बाजूस दोन धाकट्या चौरंगावर दोन ताटें ठेवून त्यांत दोन मोठ्या समया तेवीत ठेवीत. चौरंगापुढें पूर्वाभिमूख व्यासपिठासारखा काळ्याभोर शिशवी लाकडांचा पाट मांडलेला असून त्यावर शोभेकरितां रुप्याच्या फुल्या बसविलेल्या आहेत. त्याचप्रमाणें पाठीमागें टेकण्याकरितां प्रभावळीच्या आकारासारखा शिशवी पाट जोडलेला आहे. पाटासमोर एक मोठें रुप्याचें ताह्मण ठेवलेलें असून त्यांत रुप्याचीच पंचपात्री असे. जवळ निर्मळ पाण्याचें भरून ठेव-



नानांच्या वाड्यांतील प्रसिद्ध देवघर.

चित्रकार:–
रा. मो. ना. कीर्तीकर.

पान २३२

बॉंबे आर्ट प्रिंटिंग वर्क्स.

लेलें उदकपात्र व पूजेस लागणाऱ्या अवश्य द्रव्यांचें पंचपाळें आणि दुसरे बाजूस उत्तम मलबारी चंदनाच्या खोडाचें गंध घेतलेलें रुप्याचें लंचोळें असे. परडीमध्यें दुरवा, फुलें, तुळशी, समिधा, बिल्वपत्रें व **नाना** हे श्रीशंकराचे निस्सीम भक्त असल्याकारणानें श्रीशंकरास प्रिय असलेलीं त्या त्या ऋतूंत उत्पन्न होणारीं अगस्त, पारिजातक, धोत्रा, तगर, कण्हेर इत्यादि पांढरीं फुलें असून पुरोहितानें अगोदरच पूजेचें उत्तमप्रकारें साहित्य करून ठेविलेलें असे. मग अंगावर उपवस्त्र घेऊन सोंवळ्यानें **नानां**ची स्वारी आसनापन्न व्हावी. **नानां**चा चेहरा मुळचा सतेज व सुंदर, व त्यांत स्नान करून शुचिर्भूत होऊन आसनावर बसल्यानंतर त्यांची अंगकांती मोठी तेजःपुंज दिसे. संध्या झाल्यावर अति प्रेमभावानें "**स्नान संध्या टिळे माळा । पोटीं क्रोधाचा उमाळा**" असें न करतां शांतवृत्तीनें **नाना** शोडषोपचारें यथासांग पूजा करीत.

पूजाप्रसंगीं त्यांच्या संन्निध शास्त्रीपंडितांचा परिवार असे. त्यावेळीं धर्मसंबंधीं अनेक गोष्टींवर चर्चा चाले. कोणत्याही धार्मिक बाबतींत एखाद्या गोष्टीस आधार पाहिजे असल्यास हरहमेशा उलगडा होत असे. एकापेक्षां एक अधिक असे व्युत्पन्न शास्त्री तैनातींत असल्यामुळें ह्यासंबंधानें कोणत्याही गोष्टीची वाण पडत नसे. कधीं कधीं त्यांच्यातच पूर्वपक्ष उत्तरपक्ष होऊन एखाद्या शास्त्रीय विषयाचा मथितार्थ काढीत. शास्त्रीमंडळाखेरीज त्यावेळचे नामांकित गवई व बजवय्ये हजर असून त्यांचें अनेक रागांत सुस्वर गायन होत असे. ती सकळाचीच वेळ असल्यामुळें त्याप्रसंगीं म्हणण्यास योग्य अशा भैरवी, तोडी, जीवनपूरी, असावरी, बिलावल, सारंग, बिंद्रावनी वगैरे अनेक रागांत सुस्वर गायन होत असे. पूजासमाप्तीनंतर

शास्त्री व भिक्षुक मंडळीबरोबर ते घटका दोन घटका संभाषण करीत व त्यांस त्यांच्या योग्यतेनुरूप बिदागी देऊन त्यांची बोळवण करीत. पाटावरून उठण्याची वेळ झाली म्हणजे शागीर्दानें पाटाच्या पाठीमागें एक सोंवळ्याचें वस्त्र अंथरून ठेवावें. **नाना** पाटावरून उठले म्हणजे त्या वस्त्रावर देवास बारा साष्टांग दंडवत घालीत व प्रदक्षणा घालून ते बाहेर येत. याप्रमाणें पूजेचा रंग रोजचा असाच असे. देवघरांत कोणीही जावों, त्यांचें मन सुप्रसन्न व्हावयाचेंच ! तिकडला सर्व आरास पाहून व धूपदीप, नानातऱ्हेचीं पुष्पें इत्यादिकांच्या परिमळानें ती जागा दरवळून गेल्यामुळें त्याच्या पोटांत आनंदाचे कल्लोळ उठत व प्रस्तुत आपण एखाद्या क्षेत्रांतील देवालयांत आहोंत कीं काय, असा क्षणभर भास होई. अशी या देवपूजेची सर्वत्र ख्याती होती. त्यावेळचे संस्थानीक, सरदार, मानकरी देखील तन्निद्दल आश्चर्य करीत. या आमच्या म्हणण्यास एक विशेष गोष्ट चांगली प्रमाणभूत आहे. ती ही कीं, एकदां इंदूरचे कै० **श्रीमंत तुकोजीराव होळकर** हे मुंबईत असतां वरील देवपूजा पहाण्यास मुद्दाम आले होते, त्याबद्दलचा सविस्तर वृत्तांत आख्यायिका या सदराखालीं लिहिलेला आहे, तो पहावा.

ह्याठिकाणीं एक गोष्ट लिहिली असतां अप्रासंगिक होणार नाहीं. ती ही कीं, **नानांची** पूजा चालली असतां त्यावेळेस जर कोणी हिंदूखेरीज एखादा परजातीय ह्मणजे पारशी, साहेब यांपैकीं अगत्याचे कामास त्यांच्या भेटीला आला व निकडीनें त्यांची भेट घेतलीच पाहिजे, अशा प्रसंगीं त्यांच्याशीं बोलण्याकरिता देवखोलीच्या डाव्या अंगास एक मोठी बारी ठेवलेली आहे. तींतून पलीकडल्या दालनांत असलेल्या माणसाबरोबर **नाना** कारणपरत्वें बोलत.

देवपूजा आटोपल्यावर भोजनविधि व्हावयाचा. त्यापूर्वीं हातांत पळीपंचपात्री घेऊन, पायांत खडावा घालून बाहेर येत व सूर्यास अर्घ्यप्रदान करून नमस्कार करीत व कोणी अतीत अभ्यागत आला असल्यास त्याची प्रथम अन्नशान्ति करून मग आपण अन्नग्रहण करीत. भोजनप्रसंगीं **नाना** एका रुप्याच्या फुल्या बसविलेल्या शिशवी पाटावर बसून एक पाट पाठीमागें टेंकावयास घेत. त्याचप्रमाणें पुढें एक पाट मांडून त्यावर रुप्याचें ताट ठेवून मग त्यांतून सुग्रास अन्नाचें भोजन करीत. दररोज बाहेरचें कोणी ना कोणीतरी पंक्तीला असे.

भोजनोत्तर तांबूलग्रहण करून बाहेर पेढीवर येत. व कांहीं कामासंबंधानें जरूरीचीं कागदपत्रें पहाणें असल्यास ते पहात आणि कारकून मंडळीस त्यांच्या त्यांच्या कामाप्रमाणें वर्दी देऊन माडीवर जाऊन वामकुक्षी करीत. वामकुक्षी आटोपल्यानंतर कांहीं थोडासा उपहार किंवा त्या त्या ऋतूंत पैदा होणारीं नानाजातींचीं फळें खात. सायंकाळच्या सुमारास कोणी मंडळी भेटीस किंवा कांहीं कामाकाजानिमित्य आली असल्यास त्यांच्याशीं थोडा वेळ संभाषण करीत. नंतर बाहेर जोडीच्या गाडींतून फिरावयास जात. बरोबर कोणीतरी मोठी व शिष्ट मंडळी असे. फिरावयास जातेसमयीं आधीं ताडदेवावरील आपल्या **श्री भवानीशंकराच्या** देवालयांत जाऊन देवदर्शन करीत व तेथून हवा खावयास जात असत. अशा वेळीं त्यांच्याविषयीं ध्यानांत ठेवण्यासरखी एक गोष्ट आहे कीं, गाडी चालली असतां कोणी आपल्या परिचयाचा गृहस्थ वाटेंत भेटला, किंवा एखादा मोठा गृहस्थ वाटेंत भेटला, तर **नाना** हे प्रथम आपण होऊन त्यास नमस्कार करीत; ह्मणजे त्या गृहस्थास ह्यांना उलट

नमस्कार करावा लागे, अशी त्यांची पद्धत असे. **नाना** हे शहरांतील अनेक मोठमोठ्या संस्थांचे अध्यक्ष किंवा डायरेक्टर असल्यामुळें त्या त्या संस्थांच्या नियमित भरणाऱ्या सभांस हजर राहण्याकरितां जात असत.

बाहेरून फेरफटका करून आल्यावर त्यांचें सायंस्नान होत असे. नंतर सोंवळ्याचें वस्त्र नेसून स्वारी देवघरांत प्रवेश करी. त्यांची यथासांग पूजा अर्चा झाल्यावर भोजनविधि व्हावयाचा. भोजनोत्तर परिचित मंडळी बरोबर शिळोप्याच्या गप्पागोष्टी होत. **नानांस** बुद्धिबळांचा नाद असल्यामुळें कधीं कधीं प्रहर रात्रीपर्यंत खेळत असत. किंवा झोंपण्यास जाण्यापूर्वीं एक उत्तम गोष्टी सांगणारा मनुष्य त्यांनीं आपल्या तैनातींत ठेवलेला होता. त्याच्याकडून नानातऱ्हेच्या गोष्टी ऐकत आणि मग निद्रासुखानुभव घेण्याकरितां शयनमंदिराकडे त्यांची स्वारी जावयाची.

वरील वर्णनावरून **नानांचा** नित्यक्रम कसा होता, हें आमच्या वाचकांच्या ध्यानांत येऊन चुकलेंच असेल. त्यांनीं आपला काळक्षेप कोणत्या तऱ्हेनें केला आणि तो विहित अगर वावगा होता, याचें आपणांस अनुमान करतां येईल. लोकधूरिणत्वाचीं सूत्रें ज्यांच्या हातीं आहेत, अशा व्यक्तींच्या वर्तनक्रमावर लोकांची तीक्ष्ण दृष्टी असते आणि तें एकाप्रकारें योग्यच होय. कारण लोकमान्यांचा वर्तनक्रम हा पुढील पिढीस उदाहरणादाखल उपयोगी पडतो. तेव्हां **नानांसारख्यांनीं** इतरांस कित्ता घेण्यासारखें वर्तन ठेविलें होतें, यांत नवल तें कोणतें!! ह्मणून आह्मी ह्मणतों कीं, **नानांच्या** दर्जाचीं माणसें फारच थोडीं पैदा होतात, खंडीमध्यें पाव रती; बाकी अर्धवटांचाच सुळसुळाट फार!!!

भाग अठरावा.

आख्यायिका.

सूरतसे कीरत बडी । बिन पंख उडजाय ॥
सूरत बिचारी जाती रही । कीरत कभी न जाय ॥

कबीर

चेंडूफळी, हुतूतू, हमामा, लगोऱ्या वगैरे उघड्या हवेंतील खेळ मुलांस जसे प्रिय असतात आणि तीं त्यांत एकदां रंगून गेलीं ह्मणजे त्यांस तहानभुकेचें ही विस्मरण पडतें, त्याचप्रमाणें ललितवाङ्मयाचा व्यासंग करणारांस श्रमपरिहाराच्या भावनेनें ह्मणा अगर चित्तरंजनास ह्मणा, ऐतिहासिक गोष्टी, थोर पुरुषांच्या चरित्रांतील भाग, चुटके, आख्यायिका वगैरे वाचून त्यांची चित्तवृत्ति तल्लीन होऊन जाते. एवढेंच नव्हे, तर नामांकित होऊन गेलेल्या माणसांच्या आयुष्यक्रमांतील मनोरंजक व उपयुक्त भाग वाचल्यानें तो एकाप्रकारें बोधप्रद होतो, हें सांगणे नलगे ! या दृष्टीनें **नानां**बद्दल ही त्यांच्या चातुर्याच्या, अक्कलहुशारीच्या, शहाणपणाच्या, प्रसंगावधानाच्या इत्याद्यनेक विश्वसनीय गोष्टी ज्या आमच्या ऐकिवांत आल्या, त्या आम्ही संगतवार आमच्या अनेकविध वाचकवर्गाच्या चित्तरंजनास खालीं

देत आहोंत. त्यामुळें त्यांची करमणूक होऊन त्या बोधप्रद व ज्ञानदायक होतील, अशी आमची पूर्ण खात्री आहे. त्या गोष्टी येणेंप्रमाणें:—

(१) पुण्यांत केलेला धूळभेटीचा समारंभ.



एके प्रसंगीं **नानांचें** वास्तव्य **पुणें** मुकामीं असतां आपल्या बंगल्यांत गव्हर्नरसाहेबांस धूळभेटीस बोलवावें, असा उद्देश मनांत धरून एक दरबार भरवावा व त्याची पुढील व्यवस्था कशीकाय करावयाची याचा बेत मनांत योजून ते त्याच्या उद्योगास लागले. ही बातमी हां हां म्हणतां अवघ्या पुणें शहरांत पसरली. ह्या वेळेच्या सुमारास थोड्याच वर्षांपूर्वीं जरी ब्रह्मबादशाहीची-पेशवाईची-इतिश्री झाली होती, तथापि पेशवाईंतील कांहीं बऱ्यावाईट गोष्टींचा पूर्णपणें लोप झाला नव्हता. सद्गुणापेक्षां दुर्गुणाचेंच अधिक प्राबल्य असतें, असें आपल्या हरघडीस दृष्टोत्पत्तीस येतें. गांव आहे तिकडे महारवाडा आहेच. आणखी स्वराज्याच्यावेळीं रिकामटवळ्या लोकांचा सुळसुळाट असे. त्यांत पुणें शहर ही पेशवाईची राजधानी असल्यामुळें तेथें तर तशा प्रकारच्या लोकांचें प्राबल्य विशेष असे. अशा मंडळीला ‘ उठल्या गांवची पाटिलकी ’ करण्याची फार खोड असे. कोणाची निंदा कर, कोणाची खोडी काढ, कोणाला शिव्या दे, हा त्यांचा एक प्रकारचा धंदाच बनून गेला होता. पुण्यांतील पेशवाईपासून प्रसिद्धीस आलेलें ‘ गटारयंत्र ’ हें सर्वविश्रुत आहेच. बुधवारच्या चौकांत ह्या मंडळीचा नेहमीं अड्डा असावयाचा. ह्यांत मुख्यत्वेंकरून भटभिक्षुकांचा, उपद्व्यापी व रिकामटवळ्या लोकांचा

जमाव फार असे. शहरांत त्यावेळेस बरेच श्रीमान्, सरदार, मानकरी, घरंदाज वगैरे लोक फार असत. त्यांच्या येथें होणाऱ्या जाणाऱ्या गोष्टींचा भेद काढण्यांत पूर्वोक्त ' गटार यंत्राचा ' अगदीं हातखंडा असे. कोणाच्या घरीं कांहींही होवो, ' गटारयंत्राला ' आधीं बातमी लागावयाचीच. **नानांनीं** आपल्या येथें दरबार भरविण्याचा जो संकल्प केला होता, त्याची बातमी प्रथम अशावेळीं नामशेष होऊन राहिलेल्या ' गटारयंत्रा ' स लागली आणि त्यासंबंधानें त्यांच्यांत **नानांची** टवाळकी करण्याची सुरवात झाली. यथापि त्या प्रसंगीं **नाना शंकरशेटकडे गव्हर्नरसाहेबांची** स्वारी धूळभेटीस यावयाची असून सदरहू वेळीं **रास्ते, ढमढेरे, सांगलीकर, इचलकरंजीकर,** वगैरे बड्या बड्या मंडळीस पाचारण केलें होतें.

बाळाजी बाजीराव पेशव्याच्या अमदानींत **पेशवाईच्या** वैभवाचा पूर्ण कळस झाला होता. पुढें वातावरणांत दैवदुर्विपाकाचीं कृष्णवर्ण अभ्रपटलें येऊन काळ प्रतिकूळ झाल्यामुळें **मराठे** आणि **गिलचे, दुराणी** आदिकरून लोकांत **पानिपत** मुकामीं जें भयंकर रणकंदन माजलें व ज्यामुळें पुढें मराठ्यांचें अगदीं **पानिपत** होऊन पेशवाईच्या व मोठमोठ्या नामांकित सरदार घराण्यांच्या केवळ अस्तित्वावर येऊन बेतली, त्याप्रसंगीं मराठ्यांचें नष्टवैभव मिळवून पुढें कांहीं काळपर्यंत तें सांवरून धरण्यांत ज्यांनीं ह्मणून आपल्या अक्कलहुशारीनें, दूरदृष्टीनें, धूर्ततेनें लुप्तप्राय होणारी पेशवाई ही सांवरून धरली, ते राज्यकलाकुशल प्रख्यात मुत्सद्दी **नानाफडणवीस** यांची आम्हास याप्रसंगीं आठवण होते.

नानाफडणविसांच्या अंगीं जे अनेक प्रशंसनीय गुण वसत होते, त्यांपैकींच 'बातमी काढणें' ही एक अजबकला त्यांस

उत्तम तऱ्हेनें साधली होती. स्वराज्यांत कोठें काय काय चाललें आहे, हें तर **नानाफडणविसांस** बिनचुक कळेच; परंतु आपल्या राज्यापासून फार दूर अशा **निजाम**च्या राज्यांत व म्हैसूरवाले **टिपूसुलतान** यांच्या दरबारांतील इत्थंभूत बातमी काढण्यांत त्यांचा अगदीं हातखंडा असे.

हे विचार सुचण्याचें कारण आमच्या चरित्रनायकाचाही बातमी काढण्यांत अगदीं हातखंडा असे, हें होय. वर म्हटलेल्या गटारयंत्रांत **नानां**कडे भरविणाऱ्या दरबारासंबंधानें ज्या ज्या गोष्टी झाल्या, त्या सर्व **नानां**च्या कानावर लगेच गेल्या. कारण आमच्या **नानां**जवळही एक अशाप्रकारचें मोठें गटारयंत्र होतें, त्यामुळें त्यांस गावांत झालें गेलें वर्तमान सहज कळत असे. दरबारासंबंधानें गटारयंत्रांतील झालेली वाटाघाट **नानां**स कळल्याबरोबर दरबारसमारंभ कांहीं अडथळा न येतां उत्कृष्ट तऱ्हेनें व वैभवसंपन्न सामुग्रीनें सिद्धीस नेण्याचा त्यांनीं संकल्प केला, आणि त्याप्रमाणें त्याच्या उद्योगास ते लागले. आधीं प्रथम **गव्हर्नरसाहेबांस** समारंभास निमंत्रण करण्याच्या वेळींच **नानां**नीं विनंती केली कीं, समारंभास आपण येतेवेळीं आपल्या पूर्ण इतमामासह स्वारशिबंदी वगैरे लवाजम्यानिशीं येण्याची कृपा करावी. त्यामुळें सरकारासही मोठेपणा मिळून सदरहू समारंभ आम्हांसही मोठा भूषणभूत होईल आणि त्यामुळें उभयतांचेंही वैभव वाढेल. **गव्हर्नरसाहेबांनीं नानांच्या** म्हणण्यास मोठ्या संतोषानें रूकार दिला. पुढें **नानां**नीं वरील समारंभास त्यावेळीं पुण्यांत रहात असलेल्या अनेक संस्थानिकांस, त्याचप्रमाणें मोठमोठे युरोपियन मिलिटरी व सिव्हिल ऑफिसर्स, सेक्रेटरीज, बाटलीवाले वगैरे बड्या बड्या शेटसावकारांस रीतीप्र-

माणें आमंत्रण केलें. समारंभाच्या दिवशीं गांवांत जिकडे तिकडे धामधूम उडून राहिली होती.

इकडे **नानां**च्या बंगल्यांत अगदीं कडेकोट तयारी झाली होती. त्यांत कोणत्याही तऱ्हेचें न्यून पडूं न देतां समारंभ उत्तम तऱ्हेनें पार पाडण्याबद्दल **नानां**नीं मोठी दक्षता ठेविली होती.

ह्या प्रसंगीं एक गोष्ट नमुद करणें हें अप्रासंगिक होणार नाहीं. ती ही कीं, त्यावेळीं पुण्यांत बडोद्याचे **श्रीमंत महाराज गणपतराव गायकवाड** व **कोल्हापूरचे छत्रपती** या उभय भूपतींचें वास्तव्य होतें. व ते वरील समारंभाप्रसंगीं आपल्या स्वारीच्या पूर्ण थाटानें आगमन करणार होते. नेमलेल्या वेळीं निमंत्रित मोठमोठी मंडळी येऊं लागली. त्याप्रमाणें ज्यांच्या त्यांच्या ऐपतीप्रमाणें **नानां**नीं त्यांस उत्थापन देऊन त्यांस आपापल्या जागेवर बसवूं लागले. तितक्यांत जवळच्या मंडळीस **नाना** ह्मणतात, 'आतां **रास्ते** येत आहेत' कांहीं वेळानें पहावें तों खरोखरच **रास्ते** आले. पुढें 'आतां **ढमढेरे** येत आहेत.' तों खरोखरच ढमढेरे आले, 'हे **विंचुरकर** येत आहेत.' कांहीं वेळानें पहावें तों तेच, याप्रमाणें जवळपासच्या मंडळीस **नानां**नीं अगदीं आश्चर्यभरीत करून सोडलें. ते मनांत ह्मणूं लागले कीं, **नाना** तर इकडे दरबारहॉलांत बसलेले असून त्यांस प्रत्येक वेळेस **रास्ते, विंचुरकर,** वगैरे आल्याचें बिनचूक कसें कळतें, ह्याचें त्यांस गूढ पडलें व ते **नानां**बद्दल मोठें कौतुक करूं लागले. इतक्यांत **श्रीमंत गायकवाड सरकारची** स्वारी येत असतांना **नाना** ह्मणाले 'आतां **गायकवाड** येत आहेत' कांहीं वेळानें खरोखर गायकवाड आले. आणखी मग **नाना** त्यांस सामोरे जाऊन त्यांस नेमलेल्या जागेवर आणून बसविलें. इतकें जों होत आहे तों दूर अंतरावरून

इंग्रजी मिलिटरी ब्यांडाचा आवाज ऐकूं येऊं लागला. त्यावरून **गव्हर्नरसाहेबांच्या** आगमनाची सूचना होऊन जे ते आपापल्यापरी तयारींत राहिले. तदनंतर **नाना, सर जेमशेटजी जिजीभाई बाटलीवाले** व कांहीं संस्थानीक व मानकरी वगैरे बरोबर घेऊन खालवर दरवाज्यापर्यंत **गव्हर्नरसाहेबांस** सामोरे गेले व त्यांस घेऊन सर्व मंडळी दरबार हॉलपर्यंत येऊन पोंचली. **गव्हर्नरसाहेबांचें** आगमन होतांच सर्व मंडळीनें त्यांस आदरपूर्वक उत्थापन दिलें व **गव्हर्नरसाहेबांस** त्यांच्या जागेवर नेऊन बसविलें. तिकडे **नानांनीं** जमलेल्या मंडळींपैकीं सर्वांच्या ना० **गव्हर्नरसाहेबांबरोबर** क्रमाक्रमानें मुलाखती करविल्या. कांहीं वेळानें पुष्पहार, अत्तरगुलाब, पानसुपारी वगैरे होऊन समारंभविधि आटोपला.

तथापि या संबंधानें लोक ह्मणूं लागले कीं, असा समारंभ आणि स्वारीचा थाट पेशवाईनंतर कधींच झाला नाहीं.

नानांची देवपूजा आणि श्रीमंत तुकोजीराव होळकर.

एकदां इंदूरचे कैलासवासी **श्री० तुकोजीराव होळकर** यांची स्वारी मुंबईस आली होती. महाराज त्यावेळेस ताडदेवावरील **नानांच्या श्री भवानीशंकरच्या** बंगल्यांत उतरले होते. त्यांच्या मनांत सदरहू देवपूजेबद्दल कर्णोपकर्णीं ऐकलेली गोष्ट स्वतः नजरेनें पहावी, अशी उत्कट इच्छा झाली. पण ती बाहेर न दाखवितां एके दिवशीं महाराज **नानांस** त्यांच्या देवपूजेच्या वेळेची संधी साधून आपल्या आगमनाची पूर्वसूचना न देतां त्यांच्या पालवावरच्या वाड्यांत भेट-

ण्यास म्हणून आले. त्यांचें रीतीप्रमाणें आगतस्वागत होऊन परस्परांच्या इकडल्या तिकडल्या गोष्टी झाल्यानंतर महाराजांनीं देवखोलींत देवदर्शन घ्यावें अशी आपली मनीषा प्रदर्शित केली. मग सर्व मंडळी देवघरांत आली. महाराजांनीं तिकडली आरास, पदार्थांची ठेवरेव इतर गोष्टींची टापटीप वगैरे पाहून मनांत आश्चर्य मानून आपल्याशींच ह्मणाले, "वाहवारे वा, धन्य **नाना**. एकूण ईश्वराचा खरा लाल आहे यांत संशय नाहीं, " नंतर त्या संबंधाचीं परस्पर प्रश्नोत्तरें होऊन विन्मुख जाऊं नये ह्मणून महाराजांनीं देवापुढें दोन मोहरा ठेऊन व देवास नमस्कार करून **नानां**चा निरोप घेतला.

सदरहू दोन मोहोरा देवाच्या देव्हाऱ्यांत अगदीं अलीकडेपर्यंत दररोज पुजत असत, असें आह्मास खातरीपूर्वक आधारावरून कळतें.

कर्मठपणाचा आविर्भाव आणि गर्वनिरसन



पुण्यांत कोणीएक वे० **कृष्णशास्त्री** या नांवाचे स्नानसंध्येबद्दल प्रसिद्ध असे कर्मठ व सत्वशील ब्राह्मण रहात असत. त्यांचा व **नानां**चा थोडाबहूत परिचय होता. **नाना** हे ब्राह्मणेतर जाणून त्यांस नमस्कार करावयाचा नाहीं, इतकेंच नाहीं तर इतरांजवळ भाषणप्रसंगीं त्यांस " **नानासाहेब** " अशा बहुमानवाचक शब्दानें संबोधून कधींही बोलावयाचें नाहीं, असा त्यांचा मोठा दुराग्रह असे. एके दिवशीं सहजगत्या शास्त्रीबुवा **नानांच्या** पुण्याच्या बंगल्यात त्यांस भेटण्यास मुद्दाम गेले. त्यावेळेस **नाना** पूजेमध्यें निमग्न झाले होते.

इतक्यांत शास्त्रीबुवा आल्याची सेवकानें **नानांस** वर्दी दिली. **नानांनीं** त्यांस आंत घेऊन येण्यास सेवकास आज्ञा केली. त्याप्रमाणें शास्त्री-बुवा आंत आल्यावर पाहतात तों **नाना** अगदीं पूजेंत तन्मय होऊन गेलेले आहेत. **नानांनीं** त्यांस जवळच्या पाटावर बसण्यास हातानें खूण करून आपली पूजा तशीच चालविली. शास्त्रीबुवांनीं तो सर्व पूजेचा रंग पाहून मनांत दंग झाले. त्यांची वृत्ति पालटली; आणि इतके दिवस **नानां**विषयीं मनांत बाळगलेला वृथाभिमान काढून टाकून **नानांस** नमस्कार केला व त्या वेळेपासून त्यांस चारचौघांत **"नाना साहेब"** असें ह्मणूं लागले.

माथ्यावर छत्राचा योग



कुलाबा जिल्हयांतील **आलीबागचे आंग्रे** यांजकडे एकदां व्रतबंध समारंभ होता. त्यांनीं **नानांस** अत्याग्रहपूर्वक आमंत्रण केलें होतें. **नाना** आपल्या बरोबर आपल्या इतमामाप्रमाणें मंडळी घेऊन **आलीबागेस** गेले. तिकडे कांहीं जात्याभिमानी ब्राह्मणांनीं **नाना** दैवज्ञ (सोनार) समजून त्यांच्या पूजेअर्चेसंबंधी उपहास मांडला व त्यांस कोणी नमस्कार करूं नये, असा आपसांत बेत केला. पुढें असा योग घडून आला कीं, त्याच ब्राह्मणांस **आंग्रेसर-कारा**कडून समारंभाप्रीत्यर्थ **नानांस** व त्यांच्या बरोबरच्या मंड-ळीस अहेर घेऊन **नाना** उतरले होते त्या ठिकाणीं घेऊन जाणें अनपेक्षित भाग पडलें. तेव्हां **नानांस** कसोटीस लावण्याची आयतीच संधी आलेली पाहून अहेर घेऊन पांच पंचवीस ब्राह्मण **नानाकडे**

गेले. त्या वेळेस **नाना** पूजासनावर ध्यानस्थ बसले होते. त्या वेळची त्यांची **तद्रुप** झालेली वृत्ति, पूजेचा एकंदर ठाव, त्यांची ती तेजःपुंज अंगकांती व अद्वितीय तेज पाहून त्या ब्राह्मणांच्या मनांतील सर्व अहंता तेव्हांच गळून गेली व ते आपापसांत कुजबुज करूं लागून ह्मणाले, "**वा ! केवळ अवतारी पुरुष; पूर्वजन्मीं तपश्चर्या थोडी चुकली, नाहीं पेक्षां माथ्यावर छत्राचाच योग होता ! !**" ध्यानविसर्जनानंतर **नानांस** आलेल्या ब्राह्मणांनीं आदरपूर्वक नमस्कार करून बरोबर आणलेला अहेर पुढें ठेविला. **नानांनीं** त्या मंडळीचा सत्कार करून त्यांस पानसुपारी वगैरे देऊन त्यांची बोळवण केली.

भोजनप्रसंगीं परभाषिक शब्द न उच्चारण्याचा बाणा.

नानांस आपल्या धर्माचा केवढा मोठा अभिमान होता व केवढें बळकट प्रेम होतें, ह्या विषयीं ज्या अनेक गोष्टी आहेत त्यांपैकीं भोजनप्रसंगाची एक ध्यानांत ठेवण्यासारखी व वृथाभिमनाचा टेंभा मिरवून मी मी म्हणविणारांस खालीं पाहण्यास लावावयासारखी चमत्कारिक गोष्ट सांगूं.

कोणत्याही शुभकार्यांत अमंगळपणा किंवा अशुभपणा नसावा किंवा अशा समयीं जेणेंकरून मनाची अप्रसन्नता होईल, अशा गोष्टी न करण्याविषयीं मनुष्यमात्राची साहजिक प्रवृत्ति असते. आणि शिष्टाचार ही असाच आहे. हीच गोष्ट आमच्या चरित्रनायकाशीं पूर्णपणें लागू होती, असें म्हणणें धाडसाचें होईल, असें आम्हांस वाटत नाहीं. हा अलौकिक पुरुष

आपल्या धर्माचा इतका कट्टा अभिमानी होता कीं, जेवीत असतांना परभाषेंतील-**इंग्रजी**-शब्द कधींही उच्चारीत नसे. कारण **'न वदेत् यावनी भाषां प्राणैर्कण्ठगतैरपि'** या न्यायानें बोलण्याचा ओघच आला किंवा आतां बोलल्याशिवाय गत्यंतरच नाहीं असें त्यांस वाटलें, तर किती मार्मिकतेनें म्हणावें, तें खालीं लिहिलेल्या उदाहरणावरून सहज कळून येईल. समजा, जर जेवतांना न्यायाबद्दल गोष्टी निघाल्या, व मुंबईचे **चीफ जस्टिस सार्जंट साहेब** यांजबद्दल बोलावयाचें असल्यास " आपले मुंबईचे वरिष्ठ न्यायाधीश ते, त्यांचें नांव 'सा' आहे ते, " किंवा मुंबईच्या गव्हरनराबद्दल बोलावयाचे असल्यास, " आपले मुंबईचे सुभेदार, ते, " वगैरे सांकेतिक बोलून किंवा त्या इंग्रजी शब्दाचें आद्याक्षर किंबहुना त्या शब्दाचें होत असल्यास भाषांतर मराठींत बोलावें व तत्प्रसंगीं अंगीं अस्पर्शतेचा दोष न लावून घेतां तो प्रसंग खुबीनें मारून न्यावा. कदाचित् चुकून वाकून एखादा इंग्रजी शब्द मुखावाटे आलाच, तर त्या अशौचक्षालनार्थ " **विष्णवेनमः, विष्णवेनमः,** " असे शब्द उच्चारून नेत्रांस उदकाचा हस्तस्पर्श करावा. यावरून त्यावेळच्या लोकांची आपल्या धर्मावर केवढी श्रद्धा होती व त्यांच्या अंतःकरणांत त्याविषयीं निरंतर किती बळकट प्रेम जागृत होतें, हें या गोष्टीचें उन्मत्त द्योतक होय.

मरहूम **रावराजे सर दिनकरराव राजवाडे** या प्रसिद्ध पुरुषाबद्दलही अशीच एक चमत्कारिक आख्यायिका आहे. असें सांगतात कीं, **रावराजे** जेव्हां **गव्हर्नर जनरलां**च्या भेटीस कलकत्त्यास जात व भेटीप्रसंगीं इंग्रजी चालीप्रमाणें एकमेकांबरोबर हस्तांदोलन-शेकह्यांड--करीत, त्याप्रसंगीं पूर्वींच व्यवस्था करून ठेवल्या-

प्रमाणें उदकानें **हस्तप्रक्षालन** करीत--हात धुवीत असत. कारण साहेबलोकांचा हस्तस्पर्श झाला ह्मणजे अमंगळ व धर्मबाह्य मानीत असत. केवढा हा स्वधर्माचा तीव्र अभिमान ! !

मान घ्यावा तो असा घ्यावा ! !

मुंबईत **व्हिक्टोरिया अँड आलबर्ट म्युझिअम्** या नांवाच्या इमारतीची कोणशीला बसविण्याचा समारंभ सन १८६२ च्या नव्हेंबर महिन्याच्या १९ ला झाला. त्या प्रसंगीं आमंत्रित मंडळींत कौतुक करण्यासारखी एक गोष्ट घडून आली. ती अशी कीं, त्या वेळीं समारंभसुरवातीच्या जरा आधीं मुंबई शहरांतील मोठमोठे धनाढ्य शेट सावकार जमले असून ते आपआपल्या स्थानापन्न झाले होते. इतक्यांत **नामदार गव्हर्नरसाहेबां**ची स्वारी लवाजम्यानिशीं येऊन दाखल झाली. हें पहातांच जमलेल्या मंडळींतून कांहीं प्रतिष्ठित गृहस्थ त्यांस सामोरे गेले. त्या मंडळींत आमचे चरित्रनायक अग्रेसर होते. **गव्हर्नरसाहेब** गाडींतून उतरत असतांना **नानांनीं** त्यांस हात देऊन ते साहेबांस सभास्थानीं घेऊन आले. रीतीप्रमाणें परस्परांचे कुशलादि औपचारिक प्रश्न होऊन मंडळी परस्परांबरोबर इकडल्या तिकडल्या गोष्टी करीत असतांना आमच्या चरित्रनायकानें सर्वांस कौतूक वाटल्यासारखी एक गोष्ट घडवून आणिली. परंतु वरील गोष्ट करण्यापूर्वीं त्यांनीं आपल्या नजिकच्या सुहृदांस सहज थट्टेनें म्हटले कीं "आतां बघाहो मी कशीं मजा करतों ती ! " असें म्हणून त्यांनीं जमलेल्या मंडळींतील आपल्या परिचितां-

पैकीं दोघी युरोपियन मडमांबरोबर इकडल्या तिकडल्या गोष्टी बोलण्याचा आव घातला. सदरहू दोघी मडमा आपल्या दोहों बाजूंस दोन्ही हातांनीं धरून त्या भव्य व विस्तृत समारंभमंडपांत ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत गोष्टी करण्याच्या मिषानें इतस्ततः हिंडत राहिले. **नानांनीं** ज्यांस ' कांहीं गमत करतों तें पहा, ' वगैरे सांगितलें होतें, ते लोक कौतुकपूर्ण नजरेनें **नाना** काय करतात तें पहात राहिले. इतक्यांत समारंभ सुरवातीची वेळा झाल्यामुळें सहाजिक-रीत्या **ना० गव्हर्नरसाहेबांनीं** ' **शंकरशेट** कोठें आहेत ' म्हणून चौकशी केली. अशा:बड्या माणसाच्या तोंडांतून शब्द बाहेर पडल्या बरोबर ते झेलण्यास कांहीं मंडळी तयार असतेच. या न्यायानें नामदारसाहेबांच्या तोंडांतून शब्द निघतांक्षणींच जो तो **शंकरशेट** कोठें आहेत म्हणून चौकशी करूं लागला. व कांहीं मंडळी ' **शंकरशेट** यांस लगबगीनें बोलावून आणण्यास धांवले. अशा संधींत ' **शंकरशेट, शंकरशेट,** ' या नांवाचा सभा-मंडपांत जिकडे तिकडे प्रतिध्वनि सुरू झाला. **नानांनीं** आपल्या बरोबरच्या मडमांबरोबर बोलण्याच्या नादांत अगदीं गर्क आहोंत, असें आसपासच्या मंडळींत बळेंच भासविलें. आपणास मंडळी बोल-विण्यास येत आहे हें पाहून ते मुद्दाम त्यांस चुकवून दुसऱ्याच दिशेनें फिरत राहिले. तों इतक्यांत सदरहू मंडळी **नानां**जवळ आली.**शंकरशेट,** आपणास **गव्हर्नरसाहेब** बोलवीत आहेत, आपण तिकडे चलावें. असें सांगून **नानां**च्या उत्तराची वाट पाहूं लागली. **नानांस** आपण मनांत धरलेल्या सोंगाची पूर्णपणें बतावणी करावयाची असल्यामुळें वरील मंडळीस ' आपण चलावें, मी हा आलोंच,' असें म्हणून ते परत इकडे आपल्या स्त्रीमित्रांबरोबर गोष्टी करीत हिंडूं लागले. तों

इतक्यांत ' **शंकरशेट, शंकरशेट** ' या नावांचा पुन्हा एकदां प्रतिध्वनि दुमदुमूं लागला. आतां फार अडवून धरूं नये म्हणून **नानांची** स्वारी आपल्या बरोबरीच्या मंडळासह सभास्थानाकडे यावयास निघाली. येतां येतां जमलेल्या मंडळींतील आपल्या कांहीं सुहृदांस ते जातां जातां म्हणाले कीं "मान घ्यावा तो असा घ्यावा." हें पाहून आसपासची मंडळी **नानांच्या** चातुर्याची व अक्कलहुशारीची तारीफ करून कौतुक करूं लागली. मग पुढें रीतीप्रमाणें समारंभास सुरवात होऊन सर्व विधि यथासांग उरकल्यानंतर त्याची परिसमाप्ति झाली. वरील समारंभासंबंधाचा पूर्ण वृत्तांत ह्याच पुस्तकांत अन्यत्र लिहिलेला आहे. तो जिज्ञासूंनीं अवश्य अवलोकन करावा.

परकीयांचा नानांबद्दल आदर किंवा ' शंकरशेट ' या नांवांचें महत्व.

आही वेळोवेळीं **नानांच्या** गुणांचें वर्णन केलेलें आहे, आणि त्यांचे नानाविध गुण गाण्याविषयीं ज्या अनेक गोष्टी कारणीभूत झाल्या आहेत, त्यांची सत्यता खालीं लिहिलेल्या एका गोष्टीवरून दिसून येईल. **नाना** एतद्देशीयांस प्रिय व पूज्य होते, ही गोष्ट तर सर्वप्रसिद्ध आहेच; पण विलायतसारख्या दूरदूरच्या परद्वीपांहून आलेल्या लोकांच्याही प्रीतीस व आदरास ते पात्र झाले होते, हें पुढील गोष्टीवरून कळून येईल. मुंबईइलाख्याचे गव्हर्नर **सर जार्ज ऑर्थर ब्यारोनेट** (सन १८४२–४६) ह्यांचें

नानांवर येवढें प्रेम असून ते त्यांच्या गुणावर इतके लुब्ध असत कीं, नानांचें नांव त्यांनीं आपल्या हृत्पटलावर जणूं कोरून ठेवण्याचा निश्चयच केला होता, असें वाटतें; ह्मणजे त्यांनीं विलायतेस सन १८६४ त आपल्या नवीन जन्मलेल्या मुलाचें नांव **लिओनार्ड रॉबर्ट शंकरशेट** असें बहुमानानें ठेविलें. मशारनिल्हे गव्हर्नरसाहेब हे * **ब्यारोनेट** होते. वंशपरंपरेप्रमाणें **ब्यारोनेट** ही पदवी पहिल्या मुलाला मिळावयाची; आणखी गव्हर्नरमजकुरांनीं आपल्या पहिल्या मुलाचें नांव **शंकरशेट** असें ठेविलें असतें तर त्यांस " **शंकरशेट ब्यारोनेट**" असें ह्मटलें असतें व हा एक चमत्कारिक योग आयताच जुळून आला असता. हा मान कांहीं लहानसान नव्हे. आणि दुसरी गोष्ट ही कीं, त्यावेळेचे साहेबलोक आपले लोकांविषयीं कृतज्ञतापूर्वक अगत्य ठेवीत असत.

---

* **नानां**स कांहीं साहेबलोक जरी यांचें जाहीर नांव " **नाना** " असें होतें, तरी " **शंकरशेट** " ह्या टोपण नांवानें त्यांस आदरानें संबोधून ह्मणत असत. आणखी कांहीं लोक त्यांच्या वंशजांस अद्यापपर्यंत " **शंकरशेट** " ह्याच नांवानें मोठ्या आदरानें संबोधून म्हणतात.

एका बाईस चुडेदान.



कांहीं गोष्टीमध्यें व ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं नानांनीं आपल्या मनाचा मोठेपणा कसा राखला व एकाद्याचें काम करून देण्याबद्दल त्यांस दिलेली प्रतिज्ञा खरी करण्यांत किंवा ती पाळण्यांत **नाना** किती भगीरथ प्रयत्न करीत, किंवा किती मनापासून झटत, हें पुढील एका उदाहरणावरून कळून येईल.

आमच्या ऐकिवांत असें आहे कीं, एके दिवशीं संध्याकाळची वेळ टळून गेल्यावर ऐन दिवे लावण्याच्या सुमारास एक बाई[1] **नानांचे** घरीं येऊन तिनें **नानांचे** पाय घट्ट धरिले व मोठ्या दीनवाणीनें करुणा भाकून स्फुंदत स्फुंदत ती **नानांस** म्हणूं लागली कीं, '**नाना**, आज माझा गरिबाचा संसार बुडाला, माझें सौभाग्य गेलें, मला चुडेदान द्या. तुम्ही माझे मायबाप आहांत, तुमचे शिवाय आज मुंबई शहरांत कोणीही संकटनिवारण करण्यास समर्थ नाहीं.' **नानांस** बाई फार घाबरून गेली आहे, तिचा चेहेरा अगदीं निस्तेज होऊन त्याच्यावर केवळ प्रेतकळा आलेली आहे, असें दिसलें. तीस पाहिल्या बरोबरच असें वाटलें कीं, ती कोणत्यातरी एखाद्या महत् संकटांत सांपडलेली आहे. **नाना** जात्याच फार दयाळू अंतःकरणाचे असल्यामुळें त्यांस त्या बाईची फार कींव आली व पुढचा मागचा विचार न करितां त्या बाईस त्यांनीं एकदम अभय देऊन वर उठण्यास सांगितलें. बाई वर उठल्यावर **नानांनीं** तिला तिची सर्व हकिकत विचारली. बाईनें आपली सर्व इत्थंभूत हकिकत सांगितली कीं,

१ ही बाई क्षत्रीय (खतरीण) जातीची होती, असें सांगतात.

माझ्या घरधन्यास खुनाच्या आरोपाबद्दल फांशीची सजा होऊन त्यांस उद्यां फांशी देणार आहेत. आतां ज्यास खुद्द हायकोर्टांतून खुनाच्या अपराधास्तव फांशीची सजा झाली, त्यास जिवानिशीं सोडविणें ह्मणजे कांहीं लहानसान गोष्ट नव्हे. परंतु बाईस तर **नानांनीं** आश्वासन दिलें होतें. आपण दिलेल्या वचनाचें स्वरूप पाहून **नाना** तर प्रथम मनांत दचकले. परंतु आपण वचनांत गुंतून गेल्यामुळें त्यांस एकाप्रकारचें संकट पडलें. थोडासा विचार करून तुझ्या धन्याच्या मुक्ततेबद्दल मी कांहीं प्रयत्न होईल तर करून पाहातों, असें सांगून बाईस घरीं जाण्यास सांगितलें. त्या रात्रीं **नानांस** झोंप बिलकूल आली नाहीं व ह्या संकटांतून देव कसा पार पाडील तो पाडो, अशा विवंचनेंत त्यांनीं सारी रात्र काढली. परंतु एकाएकीं आठवण होऊन उद्यां काय काय करावयाचें, याचा बेत मनांत योजून ठेविला. दुसरे दिवशीं पहांटेस मुखमार्जनादि प्रातर्विधि आटोपून आपल्या दोन घोड्यांच्या गाडींत बसून गव्हर्नरसाहेबांचे बंगल्यावर गेले. साहेब मजकुरची भेट झाल्यावर प्रथम इकडे तिकडे कुशलप्रश्न झाल्यावर **नानांनीं** पूर्वरात्रीं ठरविलेल्या संकेतानुरूप गव्हर्नरसाहेबांसह थोडीशी रपेट करण्याच्या निमित्तानें स्वारी शहरांत येण्यास निघाली. येतां येतां गाडीवानास अगाऊ सूचना दिल्याप्रमाणें **नानांची** गाडी फांशीं देण्याच्या ठिकाणावरून चालविली. ती वेळ म्हणजे त्या बाईच्या नवऱ्यास फांसावर चढविलेला आहे, तेथील सर्व संस्कार चाललेले आहेत व आतां थोडक्याच मिनीटांनीं फांशीं देणार, अशी होती. इतक्यांत **नानासाहेबांची** गाडी तेथें येऊन ठेपली. सदरहू गृहस्थास फांशीं देणार म्हणून प्रेक्षकसमुदायाच्या गर्दीनें आसपासचे रस्ते

अगदीं बंद झाले होते. त्यामुळें **नानांची** गाडी जाण्यास बराच अडथळा झाला. बरीच गर्दी पाहातां गव्हर्नरसाहेबांनीं स्वाभाविकरीत्या चौकशी केली. **नानास** ही गोष्ट पूर्वी माहीत होतीच. त्यांनीं गव्हर्नर साहेबांस सर्व हकिकत सांगितली.

पूर्वीं अशी चाल असे कीं, खुद्द गव्हर्नर साहेब किंवा गांवांतील एखादा श्रीमंत गृहस्थ जर एखाद्यास फांशी देत असतांना त्या रस्त्यावरून गेला, तर त्या फांशी जाणाऱ्या गृहस्थास माफी करून अजीबात सोडून देत, हें सर्वविश्रुत होय. त्याअन्वयें ह्या ही गृहस्थास माफी मिळून त्यास सोडून दिलें. केवढा हा मनाचा मोठेपणा, केवढें औदार्य ! ! व केवढा अधिकार ! ! ! जवळ संपत्ति असून व हातांत अधिकार असून ज्यांनीं ज्यांनीं ह्मणून विपत्तींत पडलेल्याचें संकट निवारण केलें, त्यासच मोठेपणा मिळून त्यांचें नांव अजरामर झालें आणि अशाच सत्कृत्यांनीं आमच्या **नानांनीं** आपलें नांव चिरस्मरणीय करून ठेवलें आहे, याची आह्मांस मोठी धन्यता वाटते.*

---

* **टीप**—वरील आख्यायिकेच्या सत्यासत्यतेविषयीं आह्मी जबाबदार नाहीं. कारण ती जशी आमच्या ऐकिवांत आली, तशीच दिली आहे. पूर्वींच्या काळीं फांशी देण्याच्या जागेवरून जर एखादा श्रीमंत गृहस्थ किंवा एखादा मोठा अधिकारी जात असला, तर फांशी जाणाऱ्या इसमास माफी मिळत असे, असा लोकपवाद असे. त्या अनुरोधानें वरील आख्यायिका आह्मी ऐकिली तशीच दिली आहे. खरेखोटेपणा निवडणें आह्मीं आमच्या वाचकांवर सोंपवितों.

समयसूचकता

अथवा

दरबारांत चातुर्यानें मिळविलेली जागा.

उदिते तु सहस्रांशौ न खद्योतो न चंद्रमाः ।

सुभाषित.

नानांची नजर अति तीव्र असे. कोणत्याही गोष्टीवर त्यांनीं एकदां दृष्टी फेंकिली कीं, ती अगदीं कायम! म्हणजे त्या दृष्टीमुळें तिकडील परिस्थिति त्यांच्या चटदिशीं लक्षांत येत असे; कितीही अडचणीचा प्रसंग आला, किंवा असा प्रसंग एखाद्यानें मुद्दाम घडवून आणिला, तरी त्यांतून कसें पार पडावें, किंवा वेळ कशी मारून न्यावी, हें त्यांसच ठाऊक! एकदां कांहीं उपद्व्यापी मंडळीनें अशा प्रकारची वेळ आणून **नानांस** भरसभेंत खालीं पाहण्यास लावण्याचा कसा प्रयत्न केला आणि त्यांतून **नाना** चातुर्यानें कसे पार पडले, हें खालीं दिलेल्या गोष्टीवरून सहज कळून येईल.

एखाद्या चांगल्या मनुष्याचें कित्येकांस बरें पाहवत नाहीं. **नानां**च्या वेळेस त्यांचें कौतुक करणारीं जशीं माणसें होतीं, त्याचप्रमाणें त्यांचें न्यून पाहणारेही कांहीं लोक होते. अशा परोत्कर्षासहिष्णु मंडळीपैकीं कांहीं असामींनीं **नानां**ची ऐन वेळेवर फजिती करून त्यांस खालीं पाहण्यास लावण्याचा पूर्वसंकेत केला; तो वृत्तांत असा—

कोणेएकेवेळीं मुंबईतल्या कौन्सिलहॉलमध्यें एक मोठा दरबार भरला होता. मोठमोठी व नामांकित मंडळी येऊन स्थानापन्न झाली होती. अशा प्रसंगीं **नानां**चीही जागा त्यांच्या इभ्रतीप्रमाणें बरीच उच्च ठिकाणीं ह्मणजे जवळ जवळ गव्हर्नरसाहेबांच्या आसनाजवळ असावयाची. इतक्यांत योग्य वेळेवर **गव्हर्नर**साहेबांची स्वारी दरबारस्थानीं आली. साहेबमजकूर येतांच त्यांस सर्वांनीं रीतीप्रमाणें उत्थापन दिलें. **नाना** तोंपर्यंत कांहीं आले नव्हते. दरबारच्या कामास आतां इतक्यांतच सुरवात होणार अशा ऐन वेळेला **नानां**ची स्वारी आली. दरबारहॉलच्या प्रवेशद्वारापर्यंत **नाना** जेव्हां येऊन पोंहोंचले व त्यांनीं आपली नजर चोहोंकडे फेंकली तेव्हां त्यांच्या नजरेस असें आलें कीं, सर्व प्रमुख जागा यच्चयावत् आधींच भरून गेलेल्या आहेत. आपणास बसावयास आपल्या योग्यतेनुरूप स्थान नाहीं, व आतां खालीं पहावयाची वेळ आली आहे, असें त्याच्या चट्दिशीं लक्षांत आलें. तथापि आपल्या बुद्धिसामर्थ्यानें अशा खटपटीस त्यांनीं कधींच कोणास भीक घातली नव्हती, ते काय अशा वेळेस थोडेच फसतात ! वर निर्दिष्ट केलेल्या 'अव्यापारेषु व्यापारः' या कोटींतल्या माणसांनीं बनवून आणलेला घाट चटदिशीं त्यांच्या लक्षांत येऊन चुकला. आणि त्यांतून ते मोठ्या चातुर्यानें पार पडले, ते असें.

आलेली वेळ कशी तरी निभावून नेली पाहिजे ह्मणून अगदीं न डगमगतां त्यांनीं दरबारांत प्रवेश करून आपल्या वृत्तींत कोणत्याहीं रीतीचा विकार किंवा फरक न दाखवितां मोठ्या धिम्मेपणानें ते **गव्हर्नर**साहेबांच्या आसनापर्यंत गेले. इतक्या वेळांत सर्व मंडळीचें व त्यांत मुख्यत्वेंकरून वरील दीर्घोद्योगी मंडळीचें

लक्ष **नाना**कडे लागून राहिलें होतें. **गव्हर्नर**साहेबांच्या आसनापासून तों लगतच्या सर्व खुर्च्या आधींच भरून गेलेल्या होत्या. तेव्हां आतां **नाना** कोठें बसतात, याकडे त्यांचें लक्ष वेधून राहिलें. **नानांनीं गव्हर्नर** साहेबांच्या कानाशीं लागून आपणापाशीं कांहीं बोलावयाचें आहे, असा बहाणा केला. इतक्यांत **गव्हर्नर**साहेब आपल्या जागेवरून उठले, तेव्हां अर्थात् सर्व मंडळीस उठणें भाग पडलें. त्याअन्वयें **गव्हर्नर**साहेब आपल्या जागेवर जाऊन बसत तोंपर्यंत सर्वांस उभें राहावें लागलें. **गव्हर्नर** साहेब व **नाना** यांची दुकल जी दरवाज्यापर्यंत बोलत गेली, ती तशीच मंद पाउलीं मागें परतली व **गव्हर्नर**साहेब पुन्हा स्थानापन्न झाले. ते बसतांच त्यांच्या लगतच्याच खुर्चीवर **नाना** बसले. तेव्हां अर्थात् प्रत्येकास स्वाभाविकपणें एकेक खुर्ची मागें सरकणें निरुपायानें भाग पडलें. याप्रमाणें आलेली वेळ मोठ्या चातुर्यानें निभावून **नाना** त्यांतून पार पडले. शाहणे व समजुतदार जे लोक होते, त्यांनीं **नानां**च्या समयसूचकतेची तारीफ केली, व इतर मंडळीचीं तोंडें हिरमुसून गेलीं.

दुग्धपादप्रक्षालन अथवा **समयसूचकता.**

एके प्रसंगीं **नाना** आपल्या व्याह्याच्या घरीं भोजनास गेले होते. पात्रावर बसावयाच्या पूर्वीं एकदां पंगतींतून फिरण्याचा त्यांचा संप्रदाय असे. ह्मणजे मंडळी कोण कोण आलेली आहे, पात्रावर सर्व पदार्थ वाढलेले आहेत किंवा नाहीं, वगैरे पाहून एखादा पदार्थ चुकून वाढावयाचा राहिला असला तर त्याकडे त्यांची अचूक

नजर जात असे. व तो आणवून वाढावयास सांगत. येणेंप्रमाणें **नाना**, व्याही व इतर कांहीं परिवारासह पंगतींतून फिरत असतां **नानां**चा पाय एका दुधाच्या द्रोणास लागून तो लवंडला आणि त्यामुळें थोडेसें दूध **नानां**च्या पायावर सांडलें. तेव्हां आलेली वेळ मारून नेण्याच्या उद्देशानें त्या चतुर पुरुषानें जवळपासच्या मंडळीस संबोखून म्हटलें कीं, " कायहो; व्याह्यांच्या घरीं आलें म्हणजे दुधानें पाय धुतात नाहीं का !! " त्या बरोबर जमलेल्या मंडळींत हशा पिकून जो तो **नानां**च्या चातुर्याचें व समयसूचकतेचें कौतुक करूं लागला.

कोजागरी पौर्णिमा अथवा कोजागरः !



वरील शुभमंगल दिवशीं **नानां**च्या ताडदेवावरील **श्रीभवानीशंकरा**च्या बागेंत एक अवर्णनीय समारंभ प्रतिवर्षीं होत असे. ताडदेवावर **नानाशंकरशेट**चा भव्य व नयनमनोहर असा एक बंगला होता. आजुबाजूला विस्तृत जागा असून एक रमणीय बाग असे. बंगल्यापासून तों थेट **श्रीभवानीशंकर**च्या देवालयापर्यंत म्हणजे सुमारें दोन तीनशें कदम विस्तृत बगीचा असे. त्यांत नानातऱ्हेचीं फुलझाडें असत. ह्याच उद्यानांत एक मोठी पुष्करणी असे. त्या पुष्करणीपासून कांहीं अंतरावर एक चुनेगच्ची लतामंडप बांधलेला होता. त्यावर उत्तम तऱ्हेचें छत असून त्यावर नानातऱ्हेच्या रंगी बेरंगी व सुगंधित पुष्पवेली सोडल्या होत्या. बागेंत अंमळ फेरफटका केला तर किंवा लतामंडपांत अंमळ बसलें

तर मन रममाण होऊन सर्व श्रमाचा परिहार होत असे. पुष्पांचा परिमळ सर्व बागेभर दरवळून जाऊन त्यांत संचार करणाऱ्या माणसांचें घटकाभर चित्त आनंदी होत असे. बंगल्याविषयीं अधिक वर्णन करण्याची अवशकता नाहीं. इतकें सांगणें बस आहे कीं, त्यांत अनेक प्रसंगीं मोठमोठे **राजेरजवाडे** येऊन वास्तव्य करीत असत. **कोल्हापुरचे छत्रपती, बडोद्याचे खंडेरावमहाराज गायकवाड, इंदूरचे तुकोजीराव होळकर** अशासारखी मोठमोठी मंडळी येऊन उतरत असे. कारण **नानांच्या** इभ्रतीप्रमाणें व नांवलौकिकानुरूप तो उत्तम तऱ्हेच्या सामानानें शृंगारलेला असे. इतकें सांगितलें म्हणजे त्याच्या वैभवाची कल्पना वाचकांस सहज करतां येईल. असो. कोजागरी पौर्णिमेच्या दिवशीं सदरहू बागेंतील लतामंडप उत्तम तऱ्हेचा शृंगारून हंड्या, झुंबरें वगैरेची अप्रतिम रोषनाई करीत असत. मोठमोठ्या नामांकित शास्त्र्यांस व **नानांच्या** आप्त व इष्ट मंडळीस पाचारण केलेलें असे. रीतीप्रमाणें देवपूजा आटोपून चंद्रास नैवेद्य दाखवून झाल्यावर मंडळी उपहारास बसे. उपहारसमाप्तीनंतर तांबुलादि औपचारिक प्रकार झाल्यावर जो तो आपआपल्या इच्छेप्रमाणें करमणूक करून घेत असे. उदाहरणार्थ विद्वान् शास्त्री मंडळ नानातऱ्हेच्या विषयांवर वादविवाद करीत असे, कोणी बुद्धिबळें किंवा सोंगट्यांचा किंवा दशावतारी गंजीफांचा डाव मांडून त्यांत रममाण होत असे. येणेंप्रमाणें अनेक तऱ्हेचे व्यवसाय चालू असत. **नानांचे** स्वतः बुद्धिबळें खेळणारे असे नामांकित स्नेही असत, त्यांजबरोबर ते बुद्धिबळांचा डाव मांडीत असत. उत्तररात्रींपर्यंत तो डाव चाले. तेव्हां कांहीं असामी अपरात्र झाल्यामुळें स्वाभाविकरीत्या कंटाळून जात असत ह्मणून ते आपण होऊन

बळेंच डावांत हार खात असत आणि **नानांस** डावाची मात करण्याची संधी देत असत. याप्रमाणें वरील करमणूक प्रहररात्रीपर्यंत चाले. पौर्णिमेच्या दिवशीं व अशा शुभमंगलप्रसंगीं मुद्दाम जागरण करून वेळ आनंदांत घालवीत असत आणि " कोजागरः " ह्या शब्दाची इतिसार्थकथा करीत.

नाशिक मुकामीं नानांनीं केलेला श्राद्धविधि आणि गंगापुत्रांनीं—बडव्यांनीं—केलेला बखेडा.

एके प्रसंगीं **नाना** आपल्या लवाजम्यानिशीं **नाशिक** मुकामीं यात्रेच्या उद्देशानें गेले होते. यात्रेस किंवा कोणत्याही मुशाफरीस निघणें झाल्यास आपल्या बरोबरीच्या इष्टमित्रांस, आश्रितवर्गास व कुटुंबांतील माणसांस बरोबर घेऊन निघत असत. त्यांच्या इभ्रतीप्रमाणें त्यांच्या बरोबर मोठा परिवार असावयाचा. अशा वेळीं स्वारीचा थाट एखाद्या मोठ्या उमरावाप्रमाणें असून बरोबर मोठा सरंजाम असे. शिपाई प्यादे, नोकर चाकर, पालखी, पालखीचे भोई, अशा प्रकारचा थाट असे. नाशिकक्षेत्रीं जाऊन श्राद्धविधि करावयाचा व आपल्या वडिलांच्या नांवाचें तर्पण करावयाचें, हा हेतु मनांत धरून त्यांची स्वारी **नाशिक** मुकामीं येऊन दाखल झाली. आपल्या कुळाच्या उपाध्यांस आपल्या आगमनाची पूर्वसूचना दिली होती. तिकडे गेल्यावर श्राद्धविधि करण्यास आतां सुरवात करणार इतक्यांत क्षेत्रांतील कांहीं " अव्यापारेषु व्यापारः " अशा कोटींतील गंगापुत्रांनीं आपलें पूर्ण स्वरूप प्रगट करून

नानांच्या श्राद्धविधीस अडथळा आणण्याचा बराच घाट घातला. त्यांच्या मनांतील हेतु हा कीं, ह्यांस आतां अडविलें ह्मणजे त्याच्या निवारणार्थ आपली चांगली संभावना करतील व त्यामुळें आपणास मोठी द्रव्यप्राप्ति होईल, असा त्यांचा उद्देश होता. तेव्हां **नाना** हे ब्राह्मणेतर असल्यामुळें त्यांस श्राद्धविधि शास्त्रोक्त व यथासांग करण्याचा अधिकार नाहीं, असें त्यांनीं खूळ काढलें. श्राद्धविधि उपरांत भाताचे पिंड गंगेंत विसर्जन करावयाचे नाहींत, अशी त्यांनीं सबब पुढें आणून बरीच गडबड मांडली. **नाना** हे मनाचे खंबीर, दूरदृष्टी, व चाणक्ष असल्यामुळें त्यांनीं वरील गडबडीस मुळींच भीक घातली नाहीं आणि ते आपल्या कार्यास लागले. त्यामुळें अवघे गंगापुत्र फार खवळून गेले आणि तें प्रकरण अखेर विकोपास जाऊन बरेंच हातघाईवर आलें. तें इतकें कीं, त्यांनीं **नानांची** पक्की खोड मोडण्याचा संकल्प करून बंडावा करण्यास ते उद्युक्त झाले. **नानांच्या** खास पालखीवर धोंडमार करून त्यांची खोड मोडण्याच्या तयारीस लागले. याप्रमाणें त्यांनीं धुमाकुळ मांडली. एखादा लेंचापेंचा व भित्रा मनुष्य **नानांच्या** ठिकाणीं असता, तर तो तेव्हांच गडबडून गेला असता. परंतु **नाना** कांहीं अशा कोटींतले नव्हते, म्हणून ते यत्किंचित्हीं न डगमगतां आलेलें संकट निवारण्याच्या उद्योगास लागले. त्यांनीं ताबडतोब जिल्ह्याचे कलेकटर बहादूर **नाशिक** गांवच्या बाहेरच रहात होते. त्यांस आपल्या एका खासगी मनुष्याबरोबर दोन अक्षरें लिहून एक चिठी पाठविली. त्यांत त्यांनीं झालेला सर्व वृत्तांत निवेदन करून असें ही सांगितले कीं, गंगापुत्रांनीं आमच्यावर मोठा गहजब केला आहे व तूर्त आमच्या जिवासही धोका पोंहोंचण्याचा फार संभव आहे. तरी

आपण बंदोबस्त करावा. **नानां**चा सरकार दरबारांत मोठा मानमरातब असून ते कायदेकौन्सिलचे मेंबर असल्यामुळें त्यांचें मोठें वजन होतें. व खुद्द मुंबई इलाख्याचे गव्हर्नरसाहेबांबरोबर देखील त्याचें चांगलें सख्यत्व असून ते लोकांचे पुढारी आहेत हें सर्वश्रुत होतेंच. यावरून कलेक्टरानें **नानां**चा निरोप पोंचतांच अगदीं विलंब न लावितां पोलिसपार्टी व कांहीं घोडेस्वार सदरहू दंग्याच्या ठिकाणीं ताबडतोब रवाना केले.

ही मंडळी सदरहू ठिकाणीं आलेली पहातांच गंगापुत्रांची अगदीं त्रेधा उडून गेली व ते पार खजील झाले. आतां आपला या पुढें कांहीं निभाव लागणार नाहीं, असें समजून त्यांनीं शहाणपणानें आपला पाय हळु हळूं मागें घेतला. व यच्चयावत् सर्व मंडळी तेथून चालती झाली.

पुढें **नानां**नीं आपल्या कुटुंबाच्या पूर्वोक्त उपाध्याकरवीं श्राद्धविधि शास्त्रोक्त व यथासांग करून पिंडाचें गंगेंत विसर्जन केलें आणि तत्प्रीत्यर्थ आपल्या स्वतःच्या उपाध्यांची चांगली संभावना करून व जवळ असलेल्या इतर गंगापुत्रांस आपल्या नांवालौकिकाप्रमाणें दक्षणा देऊन त्यांची बोळवण केली. व कलेक्टरानें मदतीस पाठविलेल्या पोलिसपार्टींची व स्वारांची आभारपूर्वक रवानगी केली. उपरीनिर्दिष्ट गंगापुत्रांनीं जेव्हां हा प्रकार पाहिला, तेव्हां त्यांची बालंबाल खात्री झाली कीं, **नाना** हे केवळ सामान्य पुरुष नसून एक असाधारण व्यक्ति आहे, असें त्यांस पूर्णपणें कळून चुकलें आणि आपण त्यांच्या निरर्थक वाटेस जाऊन आपलें स्वतःचें दक्षणेच्या रूपानें नुकसान करून घेतलें, अशी त्यांची पूर्ण खातरी झाली.

श्रीशंकरप्रतिमासंभव



नाना आपल्या अल्पवयांत एकदां आपले तीर्थरूप **शंकरशेट** ह्यांजबरोबर **नाशिकच्या** यात्रेस गेले होते. त्यावेळीं **नाशिक** क्षेत्रांत एक अतिविख्यात ज्योतिषी रहात असत. ते हात पाहून ग्रह अगदीं बिनचूक वर्तवीत आणि हाताच्या रेषांवरून त्याच्या शरीरावरील चिन्हें अगदीं बिनचूक सांगतात, अशी त्यांची ख्याति होती. **शंकरशेट** हे आपल्या चिरंजिवास बरोबर घेऊन सदरहू ज्योतिर्विदांच्या बिऱ्हाडीं गेले व त्यांस **नानांच्या** हातावरून त्यांचे ग्रह कसे काय आहेत, ते पाहून सांगण्याची विनंती केली. त्या अन्वयें जोतिषीबुवांनीं **नानांच्या** हातावरील रेषा पाहून **शंकरशेटजींस** सांगितलें कीं, ' ह्या मुलाचे ग्रह फार उच्चीचे असून हा पुढें भाग्यशाली पुरुष होईल. एवढेंच केवळ नव्हे, तर ह्याची तपश्चर्या थोडीशी चुकली. नाहीं तर ह्याच्या माथ्यावर छत्राचा योग होता. जोतिषीबुवा एवढ्यानेंच तृप्त न होतां त्यांनीं थोडेंसें मेण आणवून तें **नानांच्या** टाळ्यास चिकटवून काढलें व पहातात तों त्या मेणावर **श्रीशंकराची** प्रतिमा उमटलेली आहे. ती त्यांनीं **शंकरशेटजींस** कौतुकानें दाखविली. तेव्हां त्या वत्सल पित्यास किती आनंद झाला असेल व त्यास किती धन्यता वाटली असेल, ह्याची कल्पना वाचकांनींच करावी. पुढें रीतीप्रमाणें जोशीबुवांची उत्तम संभावना करून **शंकरशेटजींनीं** त्यांची रजा घेतली.

लांबटांग्या मशालजी अथवा एक विक्षिप्त व्यक्ति.

एके वेळीं एक अती उंच व धिप्पाड मनुष्य **नानां**कडे येऊन बोलूं लागला कीं, 'मी मुंबई शहरांत पुष्कळ चांगल्या लोकांकडे रोजगार मागण्याकरितां हिंडलों, परंतु मला कोणीही आश्रय दिला नाहीं. ह्मणून मी आपलेपाशीं नोकरी मागण्याकरितां आलों आहें, मला आपल्या पायांजवळ आसरा मिळावा. मला आपल्या खेरीज आतां कोणी नाहीं.' हा मनुष्य इतर उंच माणसां-पेक्षां पुष्कळ उंच होता. ह्मणजे स्वतः **नाना** इतर माणसांपेक्षां वीत दीडवीत उंचच होते. त्यांची उंची सहा फूट होती. परंतु हा मनुष्य **नाना**पेक्षांही मूठभर उंचच होता आणि त्याचा आहारही मोठा दांडगा होता. **नानांनीं** त्यास विचारलें कीं, 'तूं कोणतें काम करशील व तुझा काय उपयोग आहे;' त्यानें उत्तर दिलें कीं, 'माझा काय उपयोग आहे, हें मी आपणांस एखादेवेळीं दाखवीन'!! **नानांनीं** ही एक विक्षिप्त व्यक्ति आहे, एवढ्याचकरितां त्याला आपल्या आश्रयास ठेविलें. तो प्रत्येक वेळीं **अडीच अडीच तीन तीन** शेरांचा भात उठवीत असे, इतका त्याचा आहार मोठा होता. **नानांनीं** सदरहू माणसास आपल्या पदरीं ठेवून त्यास मशालजीची ह्मणजे दिवाबत्ती करण्याची कामगिरी सांगितली. असें ह्मणतात कीं, 'तो **नांना**च्या दिवाणखान्यांतील हंड्या, झुंबरें हातानेंच लावीत असे. आधीं **नानांच्या** वाड्याचा दिवाणखाना भव्य व उंच असून त्या बेतानें हंड्या झुंबरें उंच टांगलेलीं असत. तेव्हां आपल्या

पायाखालीं कांहीं एक आधार न घेतां व श्रीमंतलोकांकडे असे उंचीवर टांगलेले दिवे लावण्याकरितां लांकडी घोडे असतात, अशा घोड्यांचें साह्य न घेतां तो मनुष्य आपल्या हातानेंच दिवे लावीत असे. केवळ राक्षसच ! !

पुढें ह्या विक्षिप्त स्वारीनें एके दिवशीं एक उचापत केली आणि भररस्त्यावर आपल्या अंगबळाचें मोठें प्रदर्शन करून सर्व मंडळीस पोट धरधरून हासविलें. ती गोष्ट अशी कीं, एकदां **नाना** आपल्या वाड्याच्या ओटीवर बसले आहेत, अशी संधी साधून ह्यानें रस्त्यावर येऊन एका साहेबाची दोन घोड्यांची गाडी भरवेगानें कोटाकडे चालली होती, ती पाठीमागून जाऊन धरली. अर्थात् गाडी चालण्याची बंद पडली. तिला पुढें चालतांच येईना. आपली गाडी कां थांबली ह्मणून साहेब बहादूर जों मागें वळून पहातात तों-हे **बळभीम** उभे असलेले त्यांच्या दृष्टीस पडले. अर्थात् साहेब-मजकुरांची तब्बेत गरम झाली. तेव्हां ह्या स्वारीनें मागच्या पायीं पोबारा केला. त्यावेळीं रस्त्यावरील मंडळींत एकच हश्शा पिकला, आणि नंतर साहेबांची गाडी पुढें चालती झाली.

पिंपळाचा वृक्ष आणि नानांची धूर्तता.



कांहीं वर्षांमागें या शहरांत **मुंबादेवी**नजिक एका जागेंत एक पिंपळाचा मोठा वृक्ष होता, तो रहदारीच्या मार्गांत असल्यामुळें येणाऱ्या जाणाऱ्यांस कांहींसा अडथळा होत असे. हें पाहून मुनिसिपल अधिकाऱ्यांनीं तो अजिबात काढून टाकण्याचा संकल्प करून ते त्या उद्योगास लागले. तिकडे कांहीं धर्मभोळे लोक होते, त्यांस हें खपलें नाहीं. कारण पिंपळाचा वृक्ष हा आपण पवित्र मानतों, म्हणून त्याचें छेदन करावयाचें नाहीं—तोडावयाचा नाहीं, अशी आपली पूर्वापार समजूत आहे. शिवाय पिंपळवृक्षाचा उपनयन संस्कार होत असतो, म्हणजे त्यास **ब्रह्मत्व** प्राप्त होतें; म्हणून तो तोडून टाकणें, हें मोठें पाप आहे, असें समजतात.

याखेरीज पिंपळवृक्ष तोडून टाकण्यासंबंधानें आपल्या लोकांची निराळीच समजूत आहे. ती अशीं कीं, सदरहू वृक्षावर मुंजाची फेरी असते किंवा त्याचें त्यावर वास्तव्य असतें. याकरितां तो वृक्ष जो कोणी तोडील, त्यास पिडा होते व तो मृत्युमुखीं पडतो, अशी समजूत होती. म्हणून अशा तऱ्हेचा वृक्ष तोडण्याचे भरीस फारसें कोणी पडत नसे.

सदरहू वृक्ष मुनिसिपालिटीचीं माणसें तोडीत आहेत,हें पाहून अशाच प्रकारच्या धर्मभोळ्या माणसांना तें खपलें नाहीं. म्हणून तो त्यांनीं न तोडण्याविषयीं पुष्कळ खटपट केली, परंतु ती निर्फळ होण्याचा रंग दिसला. इतक्यांत त्यांपैकीं कित्येक आमचे लोकनायक **नाना** यांकडे गाऱ्हाणें घेऊन आले, व झालेली सर्व हकिकत त्यांस निवेदन केली. ती ऐकून घेऊन **नाना** आलेल्या मंडळीबरोबरच मुंबादेवीस

तो वृक्ष असलेल्या ठिकाणीं येऊन दाखल झाले. तिकडे मुनिसिपालिटीचे आधिकारी व इतर प्रेक्षकलोक बरेच जमा झाले होते. **नाना** आल्याबरोबर दुसरें तिसरें कांहींएक न करतां प्रथम त्या पिंपळवृक्षास त्यांनीं साष्टांग दंडवत घातला. याप्रमाणें विधि उरकल्यावर चवकशी करण्याच्या मिषानें त्यांनीं जवळपासच्या लोकांशीं बोलण्याचा आव घातला.हें पाहून सरकारचीं माणसें चपापलीं. ते म्हणाले कीं, **नानां**सारखे संभावित व थोर पुरुष जर ह्या वृक्षाच्या पायां पडतात, तर ह्यांत कांहीं तरी पवित्रपणा व गूढ असलें पाहिजे. तेव्हां असा वृक्ष आपण तोडूं नये हें बरें, असें समजून त्यांनीं तो वृक्ष न तोडतां ते तिकडून निघून गेले, व वृक्ष आपोआप बचला. याप्रमाणें जमलेल्या मंडळीनें **नानां**च्या धूर्तपणाचें मोठें कौतुक करीत ते तिकडून सानंदाश्चर्यानें निघून स्वस्थानीं गेले.

पिंपळवृक्षाप्रमाणें आपल्यामध्यें वटवृक्ष, औदुंबर, तुळस हेही वृक्ष किंवा झाडें पवित्र मानून आपण त्यांची पूजा करितों, हें सर्वविश्रुत होय. त्या अन्वयें पिंपळवृक्षास **नानां**नीं दंडवत घातला, यांत कांहीं अस्वाभाविक नाहीं. आणखी **नाना** स्वतः धर्मनिष्ट असून त्यांच्या वेळेला लोकांत हल्लींपेक्षां धार्मिक प्रवृत्ति अधिक असे व त्याकाळचे लोक धर्मभीरु असत, हें निर्विवाद होय. तेव्हां लोकहित साधण्याच्या सबबीवर कां होईना ! **नानां**नीं पिंपळवृक्षास दंडवत घातला ही गोष्ट कांहीं अस्थानीं झाली नाहीं, असें आम्हांस वाटतें ! ! शिवाय त्यांनीं **एक पंथ और दो काज** हें साधलें, असें आमच्या चतुर वाचकांच्या लक्षांत येऊन चुकलेंच असेल ! ! !

माथेरानच्या गिरिशिखरावरील सूर्यास्त आणि डा० बर्डउड.

एके प्रसंगीं आमच्या चरित्रनायकांचें **माथेरान** ह्या गिरिशिखरावरील आपल्या बंगल्यांत वास्तव्य असतांना एक मोठी ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट घडून आली. ती ही कीं, त्याच सुमारास



डा० बर्डउड

प्रसिद्ध **डॉ. बर्डउड** यांचाही मुक्काम **माथेरानास** होता. **डॉ. बर्डउड** यांचा **नानांशीं** चांगलाच स्नेहसंबंध होता व ते **नानांस** फार मान देत असत. त्यावेळेस एकेदिवशीं त्याठिकाणीं एक चमत्कारिक योग घडून आला. **डॉ. बर्डउड** यांनीं आमचे चरित्रनायक हे किती

स्वधर्मपरायण होते, हें दाखविलें आहे. **नानां**स फार दिवसांत पौत्रमुख पहाण्याचा सुयोग आला नाहीं, ह्मणून ' देवानें आपले डोळे झांकण्यापूर्वीं एकदां पौत्रमुख दाखवावें, ' अशा प्रकारचे हरहम्मेश ते उद्गार काढीत असत. आणखी एवढ्याकरितां त्यांनीं अनेक तीर्थाटनें केलीं. **काशीविश्वेश्वर, मथुरावृंदावन** ते थेट **हरिद्वार** येथील प्रसिद्ध देवस्थानास जाऊन त्यांनीं तीर्थयात्रा केल्या

वरील प्रसंगीं **नानां**चा मुक्काम **माथेराना**स असतां डॉ० **बर्डउड** यांचीं व **नानां**ची एका ठिकाणीं अवचित गांठ पडून त्या उभयतांचें जें संभाषण झालें, त्यासंबंधानें मशारनिल्हे **बर्डउडसाहेब** यांनीं पुढें **नानां**च्या निधनानंतर जी एक चमत्कारिक गोष्ट निवेदन केली, तिचा सारांश येणेंप्रमाणें:—

डॉ० **बर्डउडसाहेब** म्हणतात कीं, ' मी एकदां सायंकाळीं व्यायाम करण्याच्या उद्देशानें फिरत फिरत **डेंजर** पॉईंट नामक शिखरावर दाट जंगलांतून जात असतां माझ्या पाठीमागून घोड्यांच्या टापांचा आवाज कांनीं पडला. पुढच्या बाजूला कांहीं अंतरावर कांहीं ठाकूरलोक जमा होऊन कांहीं शांती करण्याच्या उद्देशानें एक कोंबडा बळी देण्याच्या ते तयारींत आहेत, असें माझ्या दृष्टीस पडलें. तो इतक्यांत घोड्यांच्या टापांचा आवाज अगदीं जवळ जवळ ऐकूं येऊं लागला; तसा मी एका दाट वाढलेल्या झुडूपाच्या आड अम्मळ बाजूस छपून राहिलों. तों माझ्या दृष्टीस काय पडलें कीं, **ना० जगन्नाथ शंकरशेट** हे पाठिमागें एका घोडेस्वारासहित (कारण ते **कायदे कौन्सिलचे** सभासद होते, ह्मणून) एका मोठ्या खंद्या घोड्यावर आरूढ होऊन येत आहेत. त्यांच्या पुढून दोन सेवक ललकारत चालले आहेत, अशा थाटानें त्यांची स्वारी मी छपून

उभा राहिलेल्या जागेवरूनच चालली होती. हें पाहून मी त्यांस सामोरा जाऊन **हस्तांदोलन** करण्याच्या उद्देशानें पुढें जों जाणार तों इतक्यांत दोघां मोतद्दारांनीं **नानां**च्या घोड्याचा लगाम हातीं धरून तो उभा केला, व **नाना** खालीं उतरले आणि पुढें चालूं लागले. ते थेट सदरहू गिरिशिखराच्या कडेवर जाऊन हस्तांजली करून पश्चिमाभिमुख उभे राहिले. ती वेळ संध्यासमयाची असून भगवान् सहस्त्ररश्मी सूर्यनारायण अस्ताचलास जाण्याची होती. **नाना** एकाग्रचित्तानें ध्यानस्थ असून मुखानें कांहीं हळुहळू म्हणत आहेत, असें दिसलें. त्यावेळचा त्यांचा भव्य, गंभीर व तेजपुंज चेहरा पाहून मला फार धन्यता वाटली. अशा अवस्थेंत त्यांच्या नेत्रांतून अश्रुबिंदु गालावरून खालीं पडत आहेत, व अंजलीयुक्त हस्त पसरून ते देवापाशीं कांहीं तरी मागत आहेत, असें मला दिसलें. तेव्हां अशावेळीं आपण इकडे उभे न रहतां आपला मार्ग सुधरावा, असें मनांत येऊन मी हळुहळू मागच्या पायीं निघालों. इतक्यांत कांहीं वेळानें **जगन्नाथ शंकरशेट** यांची स्वारी घोड्यावरून आपल्या परिवारासह माझ्यापाठीशीं येऊन थडकली. त्या वेळचा त्यांचा चेहरा मला प्रफुल्लित व हास्यमुख दिसला. डोळ्यांत एका प्रकारचें तेज चमकत होतें. जवळ येतांच त्यांचें प्रसन्नमुख पाहून मी त्यांस ह्मणालों 'कसें काय शेटजी, आपली पौत्रप्राप्तीची इच्छा फलद्रूप होणार, असें वाटतें.' **नाना** ह्मणाले ' अगदीं खास होणार **बर्डउड,** हें मला तुम्हांला सांगावयाचेंच होतें.' पुढें मी त्यांना प्रश्न केला कीं, ' आपला हेतु सिद्धीस जाणार, ह्याबद्दल आपणांस काय खात्री आहे? पुढें **नाना** ह्मणतात 'कां नाहीं!! माझी इच्छा फलद्रूप होणार खास, असें मला

देवाजीनें माझ्या कर्णरंध्रांत आतांच येऊन सांगितलें.' हें ऐकून मला सानंदाश्चर्य वाटलें.'

'पुढें आमचें वरील संभाषण झाल्यापासून सुमारें नऊ महिन्यांनीं **नानां**स पौत्रमुख पहाण्याचा सुयोग खरोखरच प्राप्त झाला. नऊ महिन्यांपूर्वीं **माथेरान**च्या गिरिशिखरावर पौत्रप्राप्तीकरितां भाकलेली करुणा देवानें ऐकली व त्यांचे अखिल जन्माचें पांग फिटलें, हें पाहून कोणासही सानंदाश्चर्य वाटण्यासारखें आहे.' तात्पर्य **नानां**स त्यांच्या हयातींतच त्यांच्या इच्छेप्रमाणें नातू झाला.

१८५७ च्या प्रसिद्ध बंडांत नाना सामील असल्याबद्दल सरकारास आलेला संशय.

१८५७ सालांत शिपायांच्या बंडाची साऱ्या हिंदुस्थानभर जी धुमश्चक्री चालली होती व ज्यामुळें आमचे दयाळु सरकार कांहीं वेळपर्यंत संकटग्रस्त होतें, अशावेळीं **नानां**विषयीं बंडाच्या बाबतींत एक चमत्कारिक गोष्ट घडून आली, व ज्यामुळें **नाना** हे स्वतः ह्या भयंकर संकटांत सांपडण्याचा पुष्कळ संभव असतांही त्यांतून ते केवळ मुक्त झाले, इतकेंच नाहीं, तर उलट त्यांचा सरकारांतून मोठा गौरव झाला व त्यांची कीर्ति अधिक फैलावली. त्याबद्दलची हकिकत आह्मीं खालीं देतों, ती अशी:—

१८५७ सालच्या बंडाच्या वेळेस मुंबईइलाख्याचे गव्हर्नर **लॉर्ड एल्फिन्स्टन** ह्यांची कारकीर्द होती. बंडाच्या धामधुमींत इतर ठिकाणांप्रमाणें साऱ्या मुंबईशहरांचे रहिवाशी फार चिंताग्रस्त व हवालदील होते. त्यावेळीं प्रसिद्ध मि. **चार्लस फार्जेट** हे पोलिस

कमिशनर होते. हे फार हुशार व कर्तव्यदक्ष असत. मुंबईतील बदमाष लोकांस यांनींच मोठ्या चातुर्यानें वठणीस आणिलें. प्रत्येक आणीबाणीच्या वेळीं प्रसंगानुरूप वेषांतर करून त्यांनीं अनेक चोऱ्या पकडल्या, जुगाराचे अड्डे मोठ्या युक्तीनें शोधून काढून जुगाऱ्यांस व बदमाषांस शासनें करवून त्यांचा पुरा नायनाट केला, अशी त्यांची मोठी ख्याती होती. व त्यांचा लोकांस मोठा दराराही होता.

मुंबई शहरांतील कांहीं साहेबलोकांनीं गव्हर्नर साहेब **लॉर्ड एल्फिन्स्टन** यांजपाशीं अशी बातमी आणली कीं, **जगन्नाथ शंकरशेट** आणखी मुंबईंतले कांहीं चांगले चांगले लोकांपैकीं दोघे तिघे गृहस्थ हे बंडास आंतून सामील आहेत. तेव्हां अर्थात् हें प्रकरण काय आहे, याची बारीक रीतीनें चौकशी करण्याकरितां **लॉर्ड एल्फिन्स्टन** साहेबांनीं पोलिस कमिशनर **फारजेट** साहेब यांस फर्माविलें.

वरील युरोपीयन गृहस्थांनीं गव्हर्नर साहेबांस असेंही सांगिलें कीं **जगन्नाथ शंकरशेट**,सुरतेचे नामधारी नबाब **मिरजाफर अली** आणखी दुसरे तिघे एतद्देशीय गृहस्थ हे प्रख्यात बंडवाले यांस आंतून बंडास सामील झाले आहेत. **फॉरजेट** साहेबांनीं गव्हर्नर साहेबांची खातरी करून दिली कीं **जगन्नाथ शंकरशेट** यांच्या हांतून अशी गोष्ट कालत्रयींही घडणार नाहीं. तथापि ह्या गोष्टीचा पूर्णपणें छडा लावण्याकरितां **फॉर-जेट**साहेबांनीं एक चमत्कारिक युक्ति योजिली. ती अशी कीं,ह्या बंडाच्या धामधुमीच्या वेळीं **नानांनीं** आपल्या ताडदेवावरील श्रीभवानीशंकराच्या देवालयानजिक असलेल्या धर्मशाळेंत बंडाच्या ठिकाणांहून आलेल्या पुष्कळ गरीब ब्राह्मणभिक्षुकांस रहावयास जागा देऊन त्यांस अन्न-दान देण्याची व्यवस्था केली होती व त्यांस तिकडे थारा दिला होता.

फॉर्जेटसाहेबांनीं एका बाहेरगांवच्या ब्राह्मणास भिक्षुकाचा वेष देऊन त्यास चांगलें पढवून वरील भिक्षुक मंडळींत आश्रय मिळ-ण्याच्या मिषानें पाठवून दिलें. मतलब असा कीं, त्या नामधारी भिक्षुकानें मिळून मिसळून **नानां**विषयीं कांहीं बातमी मिळते किंवा काय, ती काढण्याविषयीं बरीच खटपट केली. परंतु वरील प्रयत्ना-पासून कांहींएक निष्पन्न झालें नाहीं. तेव्हां अर्थात् **फॉरजेट**साहेबांस आपला प्रयत्न सोडून देणें भाग पडलें. तथापि असें ह्मणतात कीं, **फॉरजेट**साहेबांनीं स्वतः ब्राह्मणाचा वेष घेऊन ते एकदां **नानां**च्या पालवावरील वाड्यांत येऊन दाखल झाले. हे मराठी भाषा उत्तम बोलत. देवडीवरील रखवालदारास 'बाहेर पुण्याहून एक शास्त्रीबुवा आले आहेत, व आपणांस भेटूं इच्छितात,' असा निरोप आंत **नानां**स कळविण्यास सांगितलें. त्याप्रमाणें **नानां**स आंत वर्दी पोंचतां-क्षणींच कांहीं वेळानें **नाना** घरांतून बाहेर पेढीच्या दारापर्यंत येऊन पोहोंचले. त्यांची नजर येवढी कांहीं तीव्र असे कीं, एखादा मनुष्य बारान बारा चोवीस वर्षांपूर्वीं जर पाहिलेला असला, तर तो त्यांच्या स्मरणांतून कधींही जावयाचा नाहीं. त्याच्या नांवनिशीसहित त्यास हाक मारून ओळख देत. **नाना** बाहेरच्या दरवाज्यापर्यंत येऊन हे नवीन शास्त्री कोण आले आहेत, हें पहाण्याकरितां त्यांनीं आपली नजर फेंकली. नामधारी शास्त्रीबुवांची व **नानां**ची नजरानजर होतांच **नानां**नीं त्यांस चटदिशीं ओळखलें व येऊन आपला हात पुढें करून 'ओहो, **मि. फॉरजेट शास्त्रीबोवा,** आपण आलांत काय,' असें ह्मणून त्यांस शेकहॅण्ड केली. आपणांस **नानां**नीं पूर्णपणें ओळखलें, हें पाहून **फॉरजेट**साहेब मनांतलेमनांत फार खजील झाले. तें बाहेर न दाखवितां त्यांनीं तो प्रसंग हंशावारी

नेऊन व कांहीं इकडल्या तिकडल्या गोष्टी करून **नानां**ची रजा घेतली.

आह्मांला खात्रीपूर्वक आधारावरून असें कळतें कीं, **नाना** हे बंडास सामील आहेत ह्या संशयावरून त्यांस पकडून अटकेंत ठेवावें, या उद्देशानें सरकारानें त्यांजवर वारंट देखील काढलें व तें आतां बजावणार अशा संधीला मुंबईतील प्रख्यात सधन व वजनदार नागरिकांपैकीं एक गृहस्थ कांहीं कामानिमित्त **गव्हर्नर** साहेबांच्या बंगल्यावर त्यांस भेटावयास ह्मणून गेले होते. त्या प्रसंगीं बंडाच्या धामधुमीविषयीं त्यांच्या गोष्टी सुरू झाल्या. **गव्हर्नर**साहेब ह्मणाले कीं, ' **जगन्नाथ शंकरशेट** यांचें चालू बंडांत अंग आहे, असें आह्मी ऐकतों, तर ही गोष्ट खरी आहे किंवा काय,' तेव्हां भेटीस आलेल्या गृहस्थानें गव्हर्नर साहेबांची खात्री करून सांगितलें कीं, ' **जगन्नाथ शंकरशेट** यांच्या हातून अशी गोष्ट कालत्रयींही घडणार नाहीं. याबद्दल आह्मीच तर काय, परंतु मुंबईशहरांतील हवा तो गृहस्थ खात्री करून देईल. तेव्हां मात्र **गव्हर्नर**साहेबांची खात्री होऊन त्यांनीं **नानां**बद्दल काढलेलें वारंट त्यांजवर बजावण्याचें रहित केलें, असें ऐकतों.

ह्या कचाटींतून **नाना** पार तर पडलेच, पण त्याच्या ऐवजीं अशा महत्संकटकाळीं **नानां**नीं सरकारची बाजू राखून त्यांस उलट मदतच केली, असा खात्रीपूर्वक आधार मिळतो. तो असा कीं, जेव्हां मुंबईतील हिंदु रहिवाशांनीं मुंबईसरकारचे मुख्य सेक्रेटरी **धि आनरेबल मि. सी. एल. अँडरसन** यांस त्यांच्या प्रयाण समयीं जें मानपत्र दिलें, तेव्हां मध्यंतरीं बंडाच्या वावटळींत **नानां**-विषयीं ज्या कंड्या पिकल्या होत्या, त्यांस आळा घालण्याच्या उद्दे-

शानें सभेंत भाषण करतांना ते **नानां**कडे मुद्दाम वळून ह्मणाले* कीं, ' बंडाच्या वेळीं वेळोंवेळीं मला सहाय्य करून निरपेक्ष बुद्धीनें तुह्मी मला जी सल्लामसलत दिली, त्याबद्दल मी आपला अंतः-करणपूर्वक आभारी आहें. '

अजागळ नापितराज अथवा मखलाशी हजामत.

कधीं कधीं **नाना** पुणेंमुक्कामीं असतां मोठमोठे सरदार, संस्थानिक, वगैरे हरहमेश त्यांच्या भेटीस येत असत. **नाना** हे सरकारच्या कृपाछत्राखालीं असल्यामुळें व सरकारचा त्यांच्यावर पूर्ण भरंवसा असल्यामुळें आपल्या कामकाजाकरितां व **नानां**ची हरएक बाबतींत सल्लामसलत घेण्याकरितां सरदार लोक व संस्थानिक त्यांचेकडे येत असत. अशाच एके प्रसंगीं सकाळच्या वेळीं कांहीं मानकरी जमले होते. शास्त्रीपंडित तर हरहमेश असतच. ती वेळ त्यांची स्मश्रू करविण्याची होती. त्या दिवशीं **श्रीमंत आपासाहेब नातु** यांजकडून एक न्हावी आला होता. तो **कारागिरींत** फार कुशल आहे, अशी त्यावेळीं त्याची मोठी ख्याती होती. तेव्हां आपल्या तैनातींतील अशा कुशल कारागिरास **श्रीमंत आपासाहेबांनीं** आज्ञा केली कीं, ' तूं आज **नानां**ची श्मश्रू करून ये.'

---

* The Hon: Mr. Anderson's words were:—

" And to you Mr. Jagannath Sankarsett, I may be allowed to say that at a peculiar juncture in this country I owed the best of counsel to whom I constantly referred for advice as to native feeling and what would be pleasing to Natives. "

नाना आपल्या नेहमींच्या थाटाप्रमाणें अंगात झगा घालून श्मश्रूस बसत असत. **श्रीमंत आपासाहेबां**कडून आलेल्या न्हाव्यानें **नानां**स त्यापूर्वीं पाहिलें नव्हतें. हजामतीची वेळ होतांच आपला नेहमींचा न्हावी **गणू** नांवाचा होता, त्यास हजामतीस बोलाविलें. इतक्यांत **श्रीमंत आपासाहेबां**कडून एक कुशल न्हावी हजामतीस पाठविला आहे, अशी वर्दी **नानां**स दिली. तेव्हां **नानां**नीं त्यासच बोलाविलें. त्यांचा नेहमीचा न्हावी **गणू** तेथें जवळच उभा होता. त्या आलेल्या न्हाव्यास **नानां**नीं पुढें बोलावून ह्मटलें कीं, ' हं, चालूं दे. ' त्या न्हाव्यानें पाणी लावण्यास जेमतेम घेतलें. त्यानें **नानां**चें ऐश्वर्य व तेजस्विता पाहून तो अगदीं विरमून गेला. त्याच्यानें **नानां**ची हजामत करवेना. त्याचे हात थरथर कांपूं लागले. तेव्हां **नानां**स वाटलें कीं, हा चांगल्या तऱ्हेनें पाणी लावीत असेल. त्यानें जेमतेम पाणी तर लावलें आणि हातांत वस्तरा घेतांच त्याचा हात अधिक कांपूं लागला. तेव्हां निरुपाय होऊन त्यानें वस्तरा खालीं ठेवला आणि आपले दोन्ही हात जोडून विनयपूर्वक म्हटलें कीं, ' महाराज, आपली शेंडी माझ्यानें धरवत नाहीं आणि माझ्या हातून आपली हजामत करवत नाहीं, मला क्षमा असावी.' हें ऐकून जमलेल्या मंडळींत एकच हंशा पिकला आणि नापितराजास **नानां**नीं जाण्याची परवानगी दिली. हा त्यांच्या केवळ तेजस्वितेचा प्रभाव होय. **प्रतिभासंपन्न** पुरुषाची गोष्टच कांहीं वेगळी असते.

तपकिरीची डबी किंवा मोठमोठ्यांचा आदरसत्कार.



कारण प्रसंगीं चारचौघांत जे शिष्टाचाराचे प्रकार असतात, उदाहरणार्थ—पानसुपारी इत्यादि त्याचप्रमाणें तपकीर देणें हाही एक त्यांतीलच प्रकार होय. चाळीस पन्नास वर्षांपूर्वीं तपकीर ओढण्याचा प्रकार विशेषेंकरून मुंबईतील पारशी ज्ञातींत फार प्रचारांत होता. तेव्हां त्याचेंच अनुकरण आमच्या लोकांत जास्त होत गेलें, असें वाटतें. सार्वजनिक प्रसंगीं असो, किंवा परिचित मंडळींत असो, तात्पुरता शिष्टाचार करण्याकरितां तपकिरीची डबी पुढें करावयाची. दुसऱ्यानें तींतून चिमूटी घेऊन देणारास आभारपूर्वक अर्थानें मान वांकवून किंवा राम राम करून त्याच्याबद्दल आपला आदर व्यक्त करावयाचा. याप्रमाणें ही पद्धत अद्यापीही चालूच आहे. त्यांत विशेषेंकरून आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं, तपकीर देणारा व घेणारा या उभयतांसही आपला मोठा आदर झाला, अशा प्रकारची समजूत आहे. हल्लीं अशा प्रकारच्या शिष्टाचाराचे प्रकार अनेक झालेले आहेत. तात्पर्य, हल्लींच्या चालू इतर शिष्टाचारांपेक्षां तपकीर देण्याचा शिष्टाचार अधिक संभावितपणाचा मानतात.

नाना जरी स्वतः तपकीर ओढीत नसत, तरी त्यांच्या वेळेस मुंबई शहरांत पारशी लोकांत अनेक श्रीमंत व संभावित घराणीं होतीं व त्यांच्याशीं **नानां**चा कमीअधिक प्रमाणानें स्नेहसंबंध होता. तेव्हां हरएकप्रसंगीं उभयतांचें सम्मेलन झालें ह्मणजे आदरातिथ्या-

करितां तपकिरीची डबी पुढें करावयाची. वर ह्मटलेंच आहे कीं, **नाना** जरी स्वतः तपकीर ओढीत नसत, तरी इतरांच्या आदरातिथ्याकरितां तपकिरीची डबी जवळ बाळगीत. वास्तविक पाहतां तपकिरीच्या डबीचा उल्लेख करणें फारसें महत्त्वाचें नाहीं. तथापि आमच्या आख्यायिकेस एका प्रकारचें महत्त्व आलेलें आहे. तें असें कीं, **नानां**च्या जवळ जी तपकिरीची डबी होती, ती कांहीं इतर लोकांच्या डबीसारखी नव्हती. तर त्यांच्या लौकिकास साजेल अशा प्रकारची बहुमोल किंमतीची असून ती नकशीदार सुवर्णाची होती. इतकेंच केवळ नव्हे, तर जसें एखाद्या बहुमोल आंगठीवर हिरे, माणकें यांचें कोंदण करतात, त्याचप्रमाणें **नानां**च्याही डबीवर उत्कृष्ट जडावाचें कोंदण केलेलें होतें. त्यामुळें सदरहू डबी एक प्रेक्षणीय वस्तु बनून गेली होती. **सर बाटलीवाले, माणकजी लिमजी बनाजी** यांच्या सारखी बडी बडी मंडळी एकत्र जमली म्हणजे आदरातिथ्याकरितां **नानांनीं** सदरहू डबी त्यांजपुढें करावी. वास्तविक पाहतां तपकिरीच्या चिमटीमध्यें विशेष महत्त्व आहे असें नाहीं, तथापि हा आदरसत्कार करण्याचा एक शिष्टाचारच बनून राहिला आहे आणि त्यामुळें परस्परांस मोठी धन्यता वाटे.

माहुली येथील तीर्थयात्रा व स्वतःचें मुंडावण.

तीर्थांचें जें मूळ व्रतांचें जें फळ । ब्रह्म तें केवळ पंढरिये ॥
तें आह्मी देखिलें आपुल्या नयनीं । फिटलीं पारणीं डोळियांची ॥

तुकाराम.

पुणें जिल्ह्यांत साताऱ्या नजिक **माहुली** नांवाचें एक प्रसिद्ध क्षेत्र आहे. त्याठिकाणीं एकदां आमचे चरित्रनायक तीर्थयात्रेच्या उद्देशानें गेले होते. त्याप्रसंगीं आपल्या कैलासवासी तीर्थरूपांच्या श्राद्धानिमित्त क्षौर करून तर्पण करावें, असा त्यांचा उद्देश होता. त्यांनीं आपल्या नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें व आपल्या इतमामास साजेल असा आपला परिवार व इतर आप्तेष्ट मंडळी व आपले उपाध्ये वगैरे बरोबर घेतले होते. अशा थाटानें त्यांची स्वारी **माहुली** येथें येऊन दाखल झाली.

नाना हे फार कर्मनिष्ठ असल्यामुळें त्यांचीं सर्व धार्मिक कृत्यें यथासांग व्हावयास पाहिजे होतीं. त्यांत अणुरेणू कमतरता त्यांस खपत नसे. आणि ह्याबद्दल त्यांची आपल्या आश्रितवर्गावर मोठी करडी नजर असल्यामुळें त्यांच्या कार्यांत कधीं न्यून पडत नसे. **माहुली** मुकामीं आल्यावर **नानां**नीं श्राद्ध व क्षौरकर्म करण्याचा आपला मानस तिकडील उपाध्यांस कळविला. परंतु इतर बडव्यांनीं कांहींतरी निमित्त काढून **नानां**च्या कृत्यास खो घालण्याचा घाट घातला. 'तुम्ही सोनार आहांत, तुम्हास यथासांग विधि करण्यास अधिकार नाहीं,' अशा कांहीं


पोकळ सबबी पुढें आणून **नानांच्या** कृत्यांत अडथळा आणला. वास्तविक पाहतां हिंदुविरहित इतरांस क्षेत्राठिकाणीं कांहीं **हव्यकव्य** करण्यास मनाई करणें वास्तविक होईल. परंतु जो हिंदु म्हणवितो, त्यास अधिकार नाहीं ह्मणणें म्हणजे निव्वळ सत्तेचा जोर किंवा दुराग्रह; कारण क्षेत्राच्या ठिकाणीं ह्या बडव्यांचें प्राबल्य फार असतें व ते लोक आपल्या संघाच्या जोरावर यजमानाजवळून द्रव्य काढून घेण्याकरितां ते त्यांस फार अडवितात. इतकेंच केवळ नव्हे; तर कधीं कधीं ते यात्रेकऱ्यांचा 'न भूतो न भविष्यति' असा छलही करतात.

परंतु **नाना** हे अलोट धैर्याचे व प्रसंगावधानी असून आणीबाणीच्या प्रसंगीं वेळ कशी मारून न्यावी, इत्यादि गुण त्यांचे अंगीं पूर्णपणें बाणले असल्यामुळें ते अशा तऱ्हेच्या बिकट प्रसंगीं कधींही डगमगत नसत किंवा अशा प्रकारच्या हुलकावणीस त्यांनीं कधीं कोणास भीक घातली नाहीं; तर ते काय याप्रसंगीं डगमगतात! त्यांनीं आपले बरोबर आणिलेल्या उपाध्यास श्राद्धविधि चालविण्यास सांगितलें. हें पाहून बडव्यांनीं **नानांची** पक्की खोड मोडण्याचा संकल्प केला. तो असा कीं, गांवांतील सर्व न्हाव्यांस **नानांचें** क्षौर करावयास जाऊं नये अशी त्यांनीं तंबी दिली. कारण क्षौरकर्म आटोपल्याशिवाय श्राद्धविधि होणें नाहीं. तेव्हां बडव्यांचे चिथावणीवरून न्हाव्यांनीं आपापसांत संप करून **नानांचें** क्षौर करण्यास जावयाचें नाहीं, असा निश्चय केला. परंतु **नाना** हे फार पोंचेल व धोरणी असल्यामुळें त्यांनीं मुंबईहून निघतांनाच आपले बरोबर इतर आश्रितांप्रमाणें आपला स्वताचा **गणू न्हावी** आणला होता. त्यास आपलें क्षौर करण्याची आज्ञा केली. मग तिकडे कसचा उशीर! **गणू न्हाव्याचे** हातून **नानांच्या**

उपाध्यांनीं यथाविधि क्षौर करवून श्राद्धविधि यथासांग उरकून घेतला व नानांनीं आपली मनीषा तृप्त करून घेतली. अर्थात् कट करणारे बडवे व अखिल न्हावीदादा लटपटले व मनांतळे मनांत अत्यंत खजील झाले. परंतु गोष्ट होऊन चुकली, त्यास इलाज नाहीं.

तथापि **नानांस** आपले नांवाची व इभ्रतीची मोठी चाड असल्यामुळें त्यांनीं रीतीप्रमाणें तिकडे यथायोग्य दानधर्म केला व बडव्यांस त्यांच्या ऐपतीप्रमाणें दक्षणा वाटली. ' भिक्षुकाचा हात पुढें ' या न्यायानें यच्चयावत् बडव्यांनीं **नानांकडून** दक्षणा ग्रहण केली. परंतु बिचारे **न्हावीदादा** मधेंच लटपटले.

मुंबईचे दोस्त सर रॉबर्ट ग्रँट आणि नाना.



मुंबई इलाख्याचे माजी **गव्हर्नर लॉर्ड क्रेअर** यांच्या पाठीमागून **सर रॉबर्ट ग्रँट** यांची **गव्हर्नर**च्या जागेवर सन १८३५ त नेमणूक झाली. त्यांनीं आपल्या आमदानींत रयतेचें कल्याण करण्याचा बराच प्रयत्न केला, त्यामुळें त्यांस ' **फ्रेंड ऑफ बांबे** '—' मुंबईचे दोस्त ' असेंच टोपण नांव पडलें. त्यांच्या अवघ्या चरित्रक्रमाशीं आपणांस कांहीं एक कर्तव्य नाहीं. फक्त त्यांनीं अधिकारापन्न झाल्यापासून तीनच वर्षें काय तीं गव्हर्नरीच्या जागेचा उपभोग घेतला, व चौथे वर्षीं त्यांस पुणें मुक्कामीं शैत्यविकार होऊन सन १८३८ त अपमृत्यु आला. त्यांचे मृत्यूनंतर मुंबईत टाऊन हालांत रहिवाशांची एक दुःखप्रदर्शनार्थ सभा भरविली. त्या सभेंत

रीतीप्रमाणें औपचारिक भाषणें झालीं. आणि त्यांचे स्मारकाचा विचार ठरला. त्यावेळीं **नानांनीं** 'मरहूम गव्हर्नराचें जर कांहीं स्मारक करणें असेल, तर तें '**मेडिकल कॉलेज**' रूपानें करावें,' अशी सूचना केली. त्यावेळचें **नानांचें** *भाषण जोरदार आणि सर्वांच्या मनावर ठसा उमटविणारें झालें. **नानांची** सूचना सभेस मान्य झाली व त्या अन्वयें एक **मेडिकल कॉलेज** स्थापन करून त्यास **सर रॉबर्ट ग्रँट** यांचें नांव द्यावें, असें ठरलें. याप्रमाणें पुढें एक मेडिकल कॉलेज स्थापलें. तें आज **ग्रँट मेडिकल कॉलेज** या नांवानें सुप्रसिद्ध आहे.

बडोद्याच्या दरबारांतील मानपान.



कोणे एके प्रसंगीं बडोद्याचे श्रीमंत **खंडेराव** महाराज **गायकवाड** यांनीं एकदां बडोद्यांत दरबार भरविला होता. त्यावेळीं इतर आमंत्रित मंडळीबरोबर मुंबईतील प्रख्यात **सर जमशेटजी जिजीभाई ब्यारोनेट** व श्रीमंत **जगन्नाथ शंकरशेट** या उभयतांसही पाचारिलें होतें. राजधानींतील दरबारचा थाट त्यांच्या इभ्रतीप्रमाणें तर अपूर्व झालाच. तथापि आमच्या मुंबईतील पाहुणे मंडळीच्या मानपानांत तेथील कांहीं व्यवस्थापक मंडळींच्या केवळ हलगर्जीपणामुळें थोडसें न्यून पडलें. त्यामुळें असें झालें कीं, वरील उभयतां पाहुण्यांचा हिरमोड होऊन गोष्ट थोडीशी रुसव्यावर गेली.

---

* हें भाषण परिशिष्टामध्यें दिलें आहे, तें पहावें.

त्यामुळें ही पाहुणेमंडळी इतर गोष्टींची पर्वा न करतां परत मुंबईस जाण्यास सिद्ध झाली. ही गोष्ट तिकडील रेसिडेन्ट साहेबाच्या सहज कानावर गेली. तेव्हां त्यास फार वाईट वाटलें व घसरलेली गोष्ट सांवरण्याकरितां त्यांनीं आपल्या स्वारांपमधून एक स्वार **श्रीमंत खंडेराव गायकवाडाकडे** तांतडीनें रवाना केला व झालेली हकिकत श्रीमंत सरकारच्या कानावर घातली. तेव्हां ही गोष्ट निष्कारण बनून आली ह्याबद्दल **गायकवाडांस**ही मनापासून वाईट वाटलें व अशा तऱ्हेनें घडून आलेली गोष्ट सांवरण्याकरितां त्यांनीं खटपट केली. ती अशी कीं, ह्या पाहुणेमंडळीचा योग्य आदर करण्याकरितां त्यांनीं एक स्वतंत्र दरबार भरविला व त्यांत त्या उभयतांचा त्यांच्या इभ्रतीस साजेल असा योग्य मानपान केला.

लग्नमंडप आणि डॉ० भाऊ रसूल व आत्माराम केशवजी भांडारे.

नानांचे चिरंजीव **विनायकराव** ऊर्फ **बाबासाहेब** यांचें जेव्हां पहिलें लग्न झालें, तेव्हां ते एकुलते एक चिरंजीव असल्यामुळें त्यांचें लग्न **नानांनीं** आपल्या नांवालौकिकास साजेल अशाच तऱ्हेचें मोठ्या थाटाचें केलें, हें सांगणें नको. आवारांत नुसता लग्नमंडप हजारों रुपये खर्च करून उभारला होता. तो उत्तमप्रकारें शृंगारून त्यांत अप्रतिम रोषनाई केली होती. अशा प्रकारचा मुंबई शहरांत प्रथम झालेला मंडप हाच होता. त्यामुळें तो पाहण्यास लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटत असत. ह्या लग्नमंडपांतील सर्व प्रकारची देखरेख व शि-

ष्टाचार आणि आमंत्रित पाहुण्यांचा परामर्ष घेणें वगैरे व्यवस्था प्रसिद्ध **भाऊ रसूल** आणि **नानां**चे स्नेहांकित **आत्माराम केशवजी भांडारे** हे खुद्द जातीनें पहात होते. त्यांच्या परिश्रमानें समारंभास अप्रतिम शोभा आली होती.

सातारच्या छत्रपतीनें नानांस दिलेलीं वस्त्रें.

एके प्रसंगीं **नानां**ची स्वारी **माहुली** मुक्कामीं गेली होती. त्यावेळीं **सातारचे** शेवटचे **छत्रपति** गादीवर होते. **नाना** हे मुंबईसरकारच्या मर्जींतले एक वजनदार व नामांकित गृहस्थ आहेत, असें जाणून **छत्रपतीनें** त्यांस **सातार्‍यास** येण्याविषयीं आग्रहपूर्वक निमंत्रण दिलें. तेव्हां त्यांच्या खास आमंत्रणावरून **नानां**ची स्वारी तिकडे वळली. त्या प्रसंगीं **नानां**चा दरबारांत यथायोग्य मानपान होऊन **छत्रपतीनें** त्यांस बहुमोल वस्त्रें वगैरे अर्पण करून त्यांचा बहुमान केला, असें आह्मांस कळतें.

'राणीचा बाग मी आज खुला करितों.'

राणीच्या बागेंतील **'व्हिक्टोरिया अँड आल्बर्ट म्युझिअम'** नांवाची पदार्थसंग्रहालयाच्या भव्य इमारतीची कोणशिळा खुद्द मुंबईचे गव्हर्नर **सर बार्टल फ्रिअर** यांनीं स्वतः घातली. पण पुढें राणीचा बाग तयार झाल्यावर तो खुला करण्याचा समारंभ झाला, त्या वेळीं

खुद्द गव्हर्नर साहेब सदरहू समारंभास हजर होते. औपचारिक विधि उरकल्यानंतर गव्हर्नर साहेबांनीं नानांकडे वळून ह्मटलें कीं, "I now call upon my friend Mr. Jagannath Sankersett to declare the garden open."

" माझे मित्र मि० **जगन्नाथ शंकरशेट** यांस आतां मी हा बाग खुला केल्याचें जाहीर करण्याबद्दल विनंति करतों. " गव्हर्नर साहेबांच्या मुखावाटे वरील शब्द पडतांच **नानां**नीं उठून थोडें औपचारिक भाषण केलें आणि शेवटीं ह्मटलें कीं, " I now declare the garden open " मी आज हा बाग खुला केल्याचें जाहीर करतों. " असें ह्मटल्याबरोबर **नाना** हे टाळ्यांच्या गजरांत स्थानापन्न झाले.

पुढें हारतुरे होऊन समारंभाची परिसमाप्ति झाली. गव्हर्नर साहेबांचा **नानां**शीं किती सलोखा होता व त्यांच्या विषयीं किती आदर होता, हें ह्या गोष्टीवरून स्पष्ट दिसून येतें. अशा प्रकारचा मान मिळणें फार विरळा !!

नायकिणींची वरात आणि नाना.

नानांनीं जेव्हां आपले एकुलते एक चिरंजीव **श्री० विनायकराव उर्फ बाबासाहेब** ह्यांचा प्रथम विवाह केला, त्या वेळीं अवघा लग्नसमारंभ **नानां**च्या नांवाप्रमाणें व इभ्रातीप्रमाणें मोठ्या थाटाचा झाला असेल, हें सांगणें नकोच. आठ दहा दिवस पाहुण्यांचा पाहुणचार, मेजवान्या, नायकिणींचे नाच वगैरे सारखें चाललें होतें. प्रतिदिवशीं निरनिराळ्या नामांकित नायकिणींचे ताफे गाण्यास येत.

समारंभसमाप्तीच्या दिवशीं, ज्या ज्या नायकिणींस लग्नसुरवातीपासून गाण्यास बोलविलें होतें, त्या सर्वांना शेवटचें दिवशीं आमंत्रण करून त्यांचा जलसा भरविला. पाळीपाळीनें प्रत्येक नायकिणीनें त्या दिवसाचे मिजलसीमध्यें आपापल्या ऐपतीप्रमाणें गाण्याची हजिरी दिली. हें इतकें होईतों पहाटचे ३—३॥ वाजले. समारंभ बरखास्त होऊन आमंत्रित मंडळी आपापले घरीं निघून गेली. पण नायकिणी मागेंच राहिल्या.

नायकीणी घरीं जाण्यास तयार झाल्या. अपरात्र होऊन गेलेली. श्रीमंतांकडे गाण्यास जावयाचें म्हणून त्यांनीं अंगावर नखशिखांत हिऱ्यामोत्यांचे अलंकार घातले होते. शालू, साड्या वगैरे उंची उंची वस्त्रें परिधान केलेलीं होतीं. अशा प्रसंगीं गाड्यांच्या साह्यावांचून अशा अवशीस घरीं जाणें, हें त्यांस मोठें संकटप्रद वाटलें. कारण त्यावेळीं हल्लींच्या प्रमाणें भाड्याच्या गाड्या अपरात्रीं रस्त्यांतून वावरत नसत. चोरवटाही मनस्वी असे. भर दिवसा ढवळ्या एखादा गृहस्थ **शंकेला रस्त्यांत अगर एखादे गल्लींत बसला, तर त्याचें पागोटें वरच्या वर नाहींसें होत असे. मग रात्रीच्या प्रहरची गोष्टच बोलावयास नको. ह्या वेळीं शहरांतील कांहीं भागांतून फिरण्यास लोक सहसा धजत नसत. अशी त्यावेळीं स्थिति होती. मग नायकिणी तर बोलून चालून अबला, त्यांस अशा अपरात्रीं गाड्यांच्या साह्यावांचून पायींच घरीं जाणें अवघड वाटलें, यांत नवल नाहीं.

नायकिणींत अर्थात् कुजबूज सुरू झाली. त्यांच्यापैकीं एकादोघींनीं असें सुचविलें कीं, खुद्द **नानांच्याच** गाड्या मागाव्या म्हणजे झालें. मग तेथें कसचा उशीर ! ही सूचना सर्वांस पसंत पडून त्याप्रमाणें ती त्यांनीं अमलांतही आणिली. ही बातमी **नानांच्या** का-

नावर जेव्हां गेली, तेव्हां ते असें ह्मणाले कीं "काय नायकिणी माझ्या गाड्या बसावयास मागतात काय ! ! " याप्रमाणें आपल्या गाड्या नायकिणीस बसावयास दिल्यामुळें लोकांत होणारी चर्चा तर टळावी, परंतु नायकिणींचीं मनें न दुखवितां तीं युक्तीनें संभाळावीं, ह्याबद्दल **नानांनीं** एक खाशी तोड काढिली व ती सतरा आणे फलद्रूप झाली, ती अशीः—

नानांनीं लग्नसमारंभाकरितां आणलेले नळे, चंद्रजोती वगैरे दारूसामान घरांत बरेंच शिल्लक होतें. मशालजीस हिलाल पेटविण्यास सांगितलें आणि घरांत तासे मर्फे वगैरे तयार होतेच. ताशांचा प्रचंड गजर, हिलालांचा मोठा लखलखाट आणि नळे, चंद्रज्योती यांची गर्दी. मग वरातीस काय उणें ! ! सर्व नायकिणींस आपली आयती वरात निघणार ह्मणून त्या फार आनंदीत झाल्या. शेटजींचा निरोप घेऊन त्या रस्त्यानें निघाल्या. दिव्यांच्या उजेडांत आणि दारूसामानाच्या रोषनाईत वाजत गाजत त्या आपापल्या घरीं सुखरूप पोहोंचल्या आणि '**नानांनीं** आज आपला फार बहुमान केला' असें पाहून त्यांस मोठी धन्यता वाटली. पण ' अंतरकी खून राम जाने ' याप्रमाणें आलेली बिकट वेळ निभावून **नाना** तींतून अजीबात मोकळे झाले. आणि अवघ्या नायकीणी संतोषित झाल्या.

गोव्यास पालखी मिरवणुकीचा प्रतिबंध व नाना.

गोवें प्रांतीं दैवज्ञब्राह्मण मंडळीचा भरणा फार आहे. त्यांच्या कुलधर्माप्रमाणें व पूर्ववहिवाटीप्रमाणें पूर्वीं वार्षिकोत्सवानिमित्त व लग्नकार्यप्रयोजनप्रसंगीं अनुक्रमें देवाच्या पालखीचा छबीना व पालखीमिरवणूक हिलालसहित सार्वजनिक रस्त्यांतून काढीत असत. पुढें कालांतरानें अधिकारीवर्गानें अशा मिरवणुकीस प्रतिबंध केला. सत्तेपुढें शहाणपण नाहीं! गरीब बिचारी प्रजा, निमूटपणें स्वस्थ बसली!! परंतु तिच्यांतही कांहीं धीराची मंडळी होती. **नानांची** कीर्ति तिच्या कानावर गेलीच होती. सदरहू मंडळी मुंबईस येऊन तिनें **नानांची** भेट घेतली व सर्व वृत्तांत त्यांस निवेदन केला. तेव्हां **नानांनीं** खुद्द गोवेंसरकाराबरोबर पत्रव्यवहार करून दैवज्ञांस मिरवणुकीचा ब्राह्मणत्वामुळें पूर्वापार प्राप्त झालेला हक्क व जुनी वहिवाट ह्या संबंधी त्या सरकारची पूर्ण खातरी करून दिली. तेव्हां गोवेंसरकारनें सदरहू समारंभाप्रसंगीं आणि इतर कार्यप्रयोजनप्रसंगीं दैवज्ञब्राह्मण मंडळीस हिलालसहित व छत्रीसहित पालखी सार्वजनिक रस्त्यांतून मिरविण्यास मोठ्या संतोषानें परवानगी दिली. तेव्हा दैवज्ञब्राह्मण मंडळी **नानांची** अत्यंत आभारी झाली आहे.

ह्या गोष्टीच्या नंतर अल्पकाळानें **नाना** निवर्तले. त्यामुळें वरील परवानगीची अधिकारी वर्गानें अम्मलबजावणी केली नाहीं. ह्या कामांत मन घालून खटपट करणारा कोणी वजनशीर पुरुष राहिला नव्हता. ह्मणून हें प्रकरण पुढें कांहीं कालपर्यंत तसेंच भिजत राहिलें होतें. पण असें ऐकितों कीं, अलीकडे पालखीचा छबीना गावांत मिरविण्याची दैवज्ञब्राह्मण मंडळीस पूर्ण मोकळीक आहे.

सर जॉन पीटर ग्र्यांट—चीफ् जस्टिस आणि नाना.



सन १८३० च्या सुमारास **सर जॉन माल्कम** हे गव्हर्नरीच्या पदावर आरूढ असतांना "**हेबिअस कॉर्पस ॲक्ट**" ह्यासंबंधानें त्यावेळचे हायकोर्टचे वरीष्ठ न्यायाधिकारी चीफ् जस्टिस **सर जॉन पीटर ग्र्यांट** यांनीं रयतेच्या वतीनें चळवळ करून आपली पूर्ण सहानुभूति व्यक्त केली. पण त्यामुळें मुंबई सरकारची साहेबमजकुरावर इतराजी होऊन त्यांस अखेरीस "चीफ् जस्टिस्" पदास मुकावें लागलें. हें पाहून मुंबईच्या रहिवाशांस अतीशय वाईट वाटलें. आणि तसें वाटणें तें अगदीं स्वाभाविक आहे. कारण **सर जॉन पीटर ग्र्यांट** हे फार न्यायी असून एतद्देशियांबद्दल त्यांस मोठी सहानुभूति होती. अर्थात सरकारच्या ह्या कृतीबद्दल पूर्ण निषेध करण्याकरितां सन १८३० त रहिवाशांनीं एक मोठी सभा भरविली. **नानांनीं** तींत पुढाकार घेतला होता. इतर वक्त्यांच्या भाषणांत सरकारच्या ह्या वर्तनाबद्दल पूर्ण निषेध व्यक्त करून त्याजवर सणसणीत टीकारूपि अस्त्रांचा केवळ वर्षाव झाला. हें पाहून **नाना** सभेंत बोलण्यास उठले. काळवेळ पाहून वर्तन करावयाचें, हा त्यांचा बाणा असे. त्यास अनुसरून **नानांनीं** भाषण केलें. त्यांत पूर्वीच्या वक्त्यांनीं केलेल्या भाषणाचा मार्मिक तऱ्हेनें अनुवाद करून विकारवश न होतां मुंबई सरकारच्या हातून घडलेल्या ह्या चुकीचें माप त्याच्या पदरांत इतक्या बेमालूम रीतीनें घातलें कीं, **नानांच्या** ह्या भाषणापासून मुंबई सरकारास तसेंच प्रजेसही विषाद न वाटतां उलटें कौतुकच वाटलें. अर्थात् **नानांनीं** उभतांसही मोठ्या चातुर्यानें संतुष्ट ठेविलें.

लोकांनीं आपणास मान कसा द्यावा !

लोकांनीं आपणास मोठें ह्मणावें, चार चौघांत मान मिळावा, असें **नानांस** सदोदीत वाटत असे. नव्हे ! ही केवळ त्यांस महत्त्वाकांक्षाच होती !! परंतु ती कांहीं अस्थानीं नव्हती. **नानांसारख्या** प्रतिभावान् पुरुषास ती शोभत असे. एकाद्या साधारण माणसानें अशा प्रकारची हांव धरणें उलट हास्यास्पद होईल. ह्या संबंधाची कौतुकप्रद हकिकत खालीं दिली आहे, ती वाचकांनीं अवलोकन करावी.

एके प्रसंगीं **नानांनीं** आपल्या पालवावरील वाड्यांत एका संस्थानिकास पानसुपारीस पाचारण केलें आणि त्याप्रीत्यर्थ आपल्या येथें मोठा समारंभ केला. शहरांतील मोठमोठे श्रीमंत, सावकार वगैरे थोर थोर मंडळीस पाचारण केलें होतें. समारंभाची वेळ झाल्याबरोबर आमंत्रितमंडळी येऊं लागली. त्यांत **बाटलीवाले, वर्जिवनदास माधवदास, माणकजी पेटिट, कामा, मंगळदास नथूभाई, विश्वनाथ नारायण मंडलिक,** वगैरे मंडळी जमली. ज्यांच्याकरितां मुद्दाम सदरहू समारंभ भरविला होता, त्यांची यावयाची वेळ झाली होती. इतक्यांत नामदार **गव्हर्नरसाहेबांकडून** लखोटा घेऊन एक स्वार **नानांच्या** दारांत येऊन उभा राहिला. त्यांत नामदार **गव्हर्नरसाहेबांनीं नानांस** अत्यंत जरूरीच्या कामाकरितां त्वरित येऊन आपणास भेटून जाण्याविषयींचा मजकूर होता. तो पाहून जवळ बसलेले **सर बाटलीवाले** यास लखोट्यांतील मजकूर दाखवून त्यांस सांगितलें

कीं, ' मी **गव्हर्नरसाहेबांच्या** बंगल्यावर **उभ्या उभ्या** जाऊन येतों, आपण **श्रीमंत** ××× कर आले कीं, त्यांस मिजलसीमध्यें सन्मानपूर्वक बसवावें ! इतकें म्हणून **नानांची** स्वारी **गव्हर्नरसाहेबांच्या** बंगल्याकडे रवाना झाली.

नाना निघून गेल्यावर थोडक्याच वेळानें आमंत्रित पाहुणे **श्रीमंत** ××× कर समारंभस्थानीं येऊन पोहोंचले. रीतीप्रमाणें आणि पूर्वीं ठरल्याप्रमाणें मानकरी मंडळीनें **श्रीमंतांस** उत्थापन देऊन त्यांस त्यांच्या नियोजित जागीं आदरानें नेऊन बसविलें. कुशल प्रश्नोत्तरें झाल्यावर **श्रीमंतांनीं नाना** कोठें आहेत, वगैरे स्वाभाविक चवकशी केली. तों **बाटलीवाल्यांनीं** सांगितलें कीं, '**नानांस गव्हर्नरसाहेबांनीं** कांहीं जरूरीच्या कामांत त्यांची सल्लामसलत घेण्याकरितां आपल्या बंगल्यावर बोलाविलें आहे, ते इतक्यांत येतील.' हें इतकें होत आहे तों **नानांची** स्वारी खरोखरच येऊन समारंभस्थानीं दाखल झाली. **नानांनीं** दिवाणखान्यांत पाऊल टाकिल्याबरोबर **श्रीमंत ××× कर** यांनीं स्वतः **नानांस** उत्थापन देऊन त्यांचें स्वागत केलें व त्यांस आपले शेजारीं आदरानें बसविलें.

झालें ! **नानास** पाहिजे होतें तें हेंच कीं, आपण स्वतः आपल्या दिवाणखान्यांत निमंत्रित पाहुण्यास उठून त्यांचें स्वागत करण्याऐवजीं आपण त्यांजकडून मानपान करून घेतला ! ! जणूं **नानांनीं** ह्याबद्दल पूर्वसंकेतच करून ठेविला होता, असें सकृद्दर्शनीं आपणास वाटतें ! ! !

अलीबागचे आंग्रे सरकार आणि नाना

अलीबागचे आंग्रेघराण्यांतील पहिला **राघोजीराव आंग्रे** हा मोठा कर्तबगारी पुरुष होता. हा गादीवर बसल्यापासून त्यानें प्रजेच्या सुखवृद्ध्यर्थ झटून राज्यांत सर्वत्र आबादीआबाद करून सोडली. पेशवे सरकारचा ह्याच्यावर पूर्ण भरवंसा होता. **सवाईमाधवराव पेशवे** यांच्या लग्नप्रसंगीं प्रसिद्ध **नानाफडणविसांनीं राघोजीराव आंग्रे** ह्यांजवर सर्व व्यवस्था सोंपविली होती. हा पुरुष सन १७९३ त मरण पावला. ह्यास औरसपुत्र दोघे, **मानाजीराव** व **कान्होजीराव** आणखी एक दासीपुत्र **जयसिंगराव**. हा वयातीत होता. **मानाजीरावास पेशवे** सरकारांकडून गादीचीं वस्त्रें, शिक्कामोर्तब हीं जरी प्राप्त झालीं होतीं तथापि जयसिंगरावानेंच मुख्त्यारीनें गादीचा कारभार चालविला. पुढें राज्यप्रकरण होऊन **मानाजीराव** व त्याचा कनिष्ठ बंधु या उभयतांस कारागृहवास भोगावा लागून जयसिंगरावानेंच आंग्र्यांची गादी बळकाविली. आणि त्या उभयतां अल्पवयी बंधूंस जिवें मारण्याचा प्रयत्नही झाला होता. ही राज्यतृष्णा ! !

पुढें पुन्हा राज्यकारण उपस्थित होऊन **आंग्रे**घराण्यांतील एक दूरचा पुरुष कोणी **बाबूराव** आंग्रे हा होता. ह्यानें **जयसिंगरावास** पदच्युत करून आपणच गादी बळकाविली व राज्यकारभार पाहूं लागला. त्यास **बाबूराव श्रीधर बिवलकर** या धूर्त व हुषार माणसाचें राज्यकारभारांत चांगलें साह्य असे.

'ह्या बिवलकराचा मुलगा **विनायक पर्शराम** ऊर्फ **बाबासाहेब बिवलकर,** जो पुढें " **बाबाजी दिवाणजी** " या नांवानें प्रसिद्धीस आला, त्यानें राज्यांत बंडावा उत्पन्न केला. हा पुरुष मोठा कर्तबगारी, धूर्त, महत्वाकांक्षी व राजकारणपटु असा होता. बंड केल्याच्या आरोपावरून त्यास **बाबूराव आंग्र्यांनीं** धरून खांदेरीच्या किल्ल्यांत नेऊन जिवें मारावें, असा हुकूम फर्माविला. नंतर पुष्कळ वजनशीर माणसांच्या मध्यस्थीनें त्यास न मारतां फक्त अटकेंत ठेवावें,' असें ठरविलें. पुढें **बिवलकरानें** आपली मोठ्या चातुर्यानें सुटका करून घेतली. पुढें कांहीं काळानें **बाबुराव आंग्रे** मरण पावला.

वरील उलाढाल संपल्यावर मूळपुरुष व राजकैदी मानाजीराव व कान्होजी हे बंदिवासांतून मोकळे होऊन कुलाब्यास येऊन राज्यकारभार पाहूं लागले; व कांहीं काळानें गादीचीं वस्त्रें मिळविण्याकरितां पुण्यास निघून गेले. त्यावेळीं पुण्यास शेवटचे **बाजीराव** हे पेशवेपदारूढ होते. त्यांच्या अमदानींत नजराण्याचें माहात्म्य फार वाढलें होतें. **बाजीरावानें** वस्त्रें देण्याकरितां चार लक्ष रुपये नजराणा ह्मणून **मानजीरावा**कडे मागितले. ते देण्यास **मानजीराव** असमर्थ असल्यामुळें ते मोठ्या विवंचनेंत पडले होते. ही संधी **बिवलकरांनीं** साधून त्यांनीं **मानाजीरावास** सांगितलें कीं, तुह्मीं उभयतां बंधू असें लिहून द्या कीं, **विनायक पर्शराम** यास मुखत्यारदिवाणगिरी द्यावी. व सर्व राज्यकारभार त्यांनींच पाहून खजिन्यांत शिल्लक पडेल, तेव्हां आपला ऐवज पुरा करून घ्यावा आणि तोंपर्यंत रकमेस व्याज चालू असावें. याप्रमाणें **मानाजीरावास** असा जुलमी लेख लिहून देणें भाग पडलें.'

'वर ह्मटलेला लेख लिहून दिल्यावर दिवाणजी हे मुखत्यारीनें राज्यकारभार पाहूं लागले. हें **मानाजीरावास** न साहून ते दिवाण-

जीबरोबर धुसफुस करूं लागले. उभयतांमध्यें याप्रमाणें वैमनस्य येऊन **मानाजीरावां**चा शेवटपर्यंत काळ अगदीं संकटांत जाऊन अखेर सन १८१७ मध्यें ते स्वर्गवासी झाले. त्यानंतर लगेच **मानाजीरावां**चे चिरंजीव दुसरे **राघोजी आंग्रे** हे राज्यपदारूढ झाले.ते अल्पवयी असल्यामुळें **बाबाजी दिवाणजी** हेच कारभार पहात होते.'

' **राघोजी** वयांत आल्यावर राज्यकारभार दिवाणजी हे मुखत्यारीनें पहात, हें त्यांस खपेना. ह्मणून उभयतांमध्यें स्वाभाविकरीत्या वैतुष्ट आलें. तंट्याचें मूळ कारण दिवाणजींचें संस्थानावर असलेलें चार लक्ष रुपयांचें कर्ज, हें होय. तें एकदां देऊन टाकिलें, ह्मणजे आपणास मूखत्यारीनें राज्यकारभार चालवितां येईल. असें वाटून त्यांनीं आपला हुजऱ्या कोणी **महादु मराठा** या नांवाचा एक हुशार व खटपटी होता. त्यास मुंबईंत **नानाशंकरशेट** यांजपाशीं चारलक्ष रुपये कर्जाऊ मागण्याकरितां पाठविलें. **नानां**नीं ते कबूल करून सरकारच्या हातची चिट्टी शिक्कामोर्तबसह घेऊन येण्यास **महादूस** सांगितलें. त्याप्रमाणें **महादू** परत अलीबागेस जाऊन राघोजीरावांची एक चिट्ठी सहीशिक्का करून मुंबईंत आला. **नानाशंकरशेट** यांनीं आंग्रे यांची चिट्ठी पाहून त्यांस मोठा चमत्कार वाटला. हा व्यवहार ह्मटला ह्मणजे **बावासाहेब दिवाणजी** यांचे मार्फत व्हावयाचा. त्यांतून दिवाणजींचें आणि **नानां**चें सख्य असून त्यांची देवघेवही चालू असे. असें असून जेव्हां परभारें ही चिट्ठी आली, तेव्हां यांत कांहीं तरी खटपट असावी, असें **नानां**स वाटून त्यांनीं दिवाणजीस निरोप पाठवून बोलावून आणिलें आणि त्यांस ही हकिकत सांगितली. दिवाणजीनें तो प्रकार जाणला व चिठ्ठी परत घेऊन स्वारी कुलाब्यास येऊन दाखल झाली. पुढें **राघोजी**ची आई **गजराबाई** हिच्या समक्ष **राघोजी आंग्रे** यांनीं

केलेली ही सर्व खटपट मुद्देसूद दाखविली. तेव्हां **आंग्रे** यांस ही गोष्ट कबूल करणें भाग पडलें. या वेळीं **बाबासाहेबांस** अतीशय राग आला होता परंतु त्यांनीं तो न दाखवितां **आंग्रे** यांस समजावून चार गोष्टी सांगितल्या आणि **महादू**सारख्या हलकट मनुष्याचे नादीं लागून असले ढंग करूं नये ह्मणून निक्षून सांगितलें. तथापि **आंग्रे** यांचे मनांत आपल्याविषयीं द्वेषभाव उत्पन्न झाला असून तो वृद्धिंगत होत आहे. अशी दिवाणजींनीं आपले मनांत पक्की गांठ मारली आणि त्या दिवसापासून ते फार सावधगिरीनें वागूं लागले.

तात्पर्य, जर त्यावेळीं **नानांनीं** कबूल केल्याप्रमाणें **आंग्रे**सरकारास चार लक्ष रुपये कर्जाऊ दिले असते, तर निःसंशय त्यांचें कोटकल्याण झालें असतें. कारण खुद्द राजाची एकदां एखाद्यावर कृपा झाली तर तिकडे मग बघावयासच नको ! पण अशाप्रकारें अडचणींत सांपडलेल्या माणसाकडून द्रव्यलोभास गुंतून व त्याच्या संकटावस्थेचा गैरफायदा घेऊन त्याच्या द्रव्याचा अपहार करण्याचें **नानांनीं** कधींच मनांत आणलें नाहीं. या खेरीज अशा देवघेवीच्या नाजूक बाबतींत दिवाणजीसारख्या योग्य अधिकाऱ्याच्या पूर्ण सल्ल्याशिवाय कोणतीही गोष्ट करणें **नानांस** विहीत वाटलें नाहीं. ह्मणून चार लक्ष रुपये **आंग्रे**सरकारास कर्जाऊ देण्याचें तसेंच तहकूब राहिलें.

यावरून दोन गोष्टींचा उलगडा होतो. एक तर कोणाकडून ही अन्यायानें द्रव्याचा अपहार करण्याचा **नानांस** मनापासून तिटकारा. यावरून त्यांची निर्लोभता दिसून येते आणि दुसरें असें कीं, कोणतीही गोष्ट, मग ती राज्यप्रकरणी असो अगर खासगी असो, पूर्ण विचाराशिवाय कधींहीं करण्यास त्यांचें पाऊल पुढें पडत नसे. यावरून **नानांची** दूरदृष्टी दिसून येते. अशा प्रकारचीं माणसें दुनि-

येंत फार क्वचित् पैदा होतात. ह्मणून **नानां**च्या वरील गुणांवरून त्यांचें जेवढें कौतुक करावें, तेवढें थोडेंच ! !

वर लिहिलेल्या अनेकविध मनोरंजक, बोधपर व अनुकरणीय गोष्टी दिलेल्या आहेत, त्यांवरून आमच्या वाचकांची खात्री झालीच असेल कीं, **नाना** हे कांहीं साधारण कोटींतले पुरुष नव्हते. त्यांची अलौकिक बुद्धिमत्ता, त्यांचें कल्पनाचातुर्य, त्यांचें प्रसंगावधान, त्यांची भूतदया, त्यांची समयसूचकता आणि त्यांच्यावर एखादा अकल्पित बिकट प्रसंग येऊन गुजरला, तर त्यांतून अजिबात अचुक निसटून जाण्याची अजब कला इत्याद्यनेक गुण त्यांस कसे साध्य झाले होते आणि त्यामुळें त्यांची इभ्रत उत्तरोत्तर कशी वाढत गेली, हें पाहून आपणांस मोठें कौतुक वाटून त्यांच्या विषयीं आदर उत्पन्न होतो व त्यांच्या ठायीं मोठा पूज्यभाव उत्पन्न होतो. अशाप्रकारचा गुणनिधि पुरुष आमच्यांत होऊन गेला, याचा आम्हांस मोठा अभिमान वाटतो. म्हणून त्यांचें गुणवर्णन करणें आमचें आद्यकर्तव्य होय. कारण कविवर्य मोरोपंतांनीं ह्मटलेंच आहे कीं,

अरिच्याहि सद्गुणातें, प्रेमें वाखाणितात सुज्ञानी ॥

अर्थात् जे ज्ञानवान् आहेत, ते शत्रूचेही गुण प्रेमानें वाखाणतात, मग ज्यांच्यामध्यें वर म्हटलेले अनेकविध गुण एकवटलेले आहेत, ते आमचे चरित्रनायक **श्रीमंत जगन्नाथ शंकरशेट** ऊर्फ **नाना शंकरशेट** यांचा लोकांनीं त्यांच्या हयातींत काय किंवा त्यांच्या पश्चात् काय, मोठा बोलबाला केला, यांत नवल तें कोणतें, ! ! अशा बहुगुणी पुरुषाबद्दल एका संस्कृत कवीनें वर्णन केलें आहे, तें असें:—

अष्टौ गुणाः पुरुषं दीपयन्ति, प्रज्ञा च कौल्यं च दमः श्रुतंच ।
पराक्रमश्चाबहुभाषिता च, दानं यथाशक्ति, कृतज्ञता च ।

भाग एकोणिसावा

नानाविषयीं ध्यानांत ठेवण्यासारख्या कांहीं विशेष गोष्टी.

चक्रवर्ती भूपति असो अगर खेडेगांवांतील पर्णकुटींत राहणारा एखादा क्षुद्र असो, श्रम परिहारार्थ त्यास विश्रांति ही अत्यावश्यक आहे. साधारण मनुष्य असेल तर त्याची विश्रांती ह्मटली ह्मणजे स्वस्थ बसून किंवा पडून राहणें किंवा झोंप घेणें, ही होय. परंतु ज्याला ह्मणून कांहीं ज्ञान आहे, किंवा ज्याला चार अक्षरें समजतात, तो विश्रांतीच्या सबबीवर कधीं ही स्वस्थ बसून राहणार नाहीं. त्यांची विश्रांती ह्मटली ह्मणजे, ग्रंथावलोकन ! त्यांतलेत्यांत जेणेंकरून त्यांच्या मनाची प्रसन्नता वाढेल, अशाप्रकारच्या मनोरंजक, चटकदार व बोधपर ग्रंथाचें वाचन अधिक श्रेयस्कर होय. नानाविषयीं ज्या अनेक चमत्कारिक व ध्यानांत ठेवण्यासारख्या गोष्टी आहेत, त्यांच्या अवलोकनानें विश्रांतीच्या वेळीं बोध व करमणूक होऊन श्रमपरिहार होतील, अशी आमची खातरी आहे. त्या संगतवार पुढें दिल्या आहेत.

(१) नानांची शरीरयष्टि.

नानां उत्तम कुळांत जन्मले. ह्या ग्रंथांत दिलेल्या **शंकरशेट**जींच्या चेहऱ्यावरून ते भव्य व तेजदार पुरुष दिसतात. त्याचप्रमाणें **नानां**चाही चेहरा सतेज व सुंदर होता. ऐन तारुण्याच्या भरांत तो सुंदर दिसेलच, यांत नवल नाहीं. पण तोच भर ओसरल्यावर उत्तरवयांत देखील तो तेजदार व भव्य दिसत होता. **नानां**ची एकंदर शरीरयष्टि भव्य होती. उंची सहा फूट असे. ह्मणजे चांगल्या सशक्त माणसाच्या नेहमीच्या उंचीपेक्षां नाना वीत दीडवीत उंच होते. ते असें कीं, लग्नसमारंभप्रसंगीं कधीं जर वरातीबरोबर इतर मंडळीसमवेत त्यांस पायीं जाण्याचा प्रसंग आला, तर त्यांचें डोकें इतर माणसांपेक्षां वीत दीडवीत उंच दिसे. एवढे ते उंच असत. त्यांचा भालप्रदेश रुंद असून त्यावर वैभवसंपन्नतेची छाया स्पष्ट दिसे. डोळे विशाल व मोठे पाणीदार होते. आणि त्यांत एकाप्रकारची विलक्षण चमक दिसून येत असे. त्या मानानें त्यांची दृष्टि फार तीव्र आहे, असें दिसे. आणि तींत दूरदर्शीपणाचें छायाचित्र स्पष्ट दिसून येई. डोळ्यांत इतकें विलक्षण प्रकारचें तेज चमकत असे कीं, साधारण माणसाला आपली नजर त्यांच्या नजरेसमोर लावून कधींच त्यांच्याकडे बघवत नसे. शिवाय एकाद्या मनुष्यानें क्षुल्लक असा अपराध केला असल्यास **नानां**नीं एकदां कां त्याच्याकडे नुसतें पाहिलें कीं, त्या बापड्याची अगदीं गाळण झालीच ह्मणून समजावी. भुंवया कमानदार असून मोठ्या होत्या. त्यामुळें त्यांच्या चेहऱ्यास विशेष शोभा आली होती. आणखी त्यावरून त्यांच्या मुखश्रीवर धूर्ततेचें चिन्ह स्पष्ट दृग्गोचर होत असे. त्यांचें नाक सरळ व भरदार दिसे. त्याचप्रमाणें त्यांचे

कानही त्यांच्या चेहेऱ्यास शोभतील असेच होते. एकंदर चेहरा सुबक व पाणीदार होता. छाती रुंद व भरदार होती. त्यावरून त्यांच्या ठायीं अलोट धैर्य असावें असें दिसून येत होतें. हात लांब व गोंडस होते. ते इतके कीं, ते त्यांच्या जानूपर्यंत किंवा गुढघ्यां-पर्यंत पोंचत. ह्मणजे **नाना** अजानुबाहु होते. हें भाग्यवंताचें लक्षण होय. अशा प्रकारचीं अजानुबाहु माणसें पृथ्वीवर क्वचित् पैदा होतात. दहा लाखांत एखादा ! ! पाय भरदार व त्यांच्या अवघ्या शरिरास साजतील असेच होते. एकंदर शरिराचा बांधा प्रमाणशुद्ध होता. वर्ण निमगोरा असून अंगकांती पिंवळ्यानिंबासारखी तेजःपुंज होती. एकंदर मोहरा फार देखणा होता. त्यांच्या चेहरपट्टीचें वर्णन कोणीसें पोवाड्यांत फार मार्मिकरीतीनें केलें आहे, त्याचा थोडासा मासला पुढें देतों, तो हाः—"खुपसुरतपाक मोहरा ॥ स्वच्छ चेहरा जन भपकुन पाहतात ॥" हें वर्णन **नानां**च्या आठरावे वर्षांचा चेहरा ह्याच ग्रंथांत आलेला आहे, त्याकडे पाहिलें असतां वाचकांची बालंबाल खातरी होईल, असा आह्मांस पूर्ण भरंवसा आहे.

नानांच्या अवघ्या शरीरयष्टीचें वर्णन करण्याचा मुख्यमुद्दा असा आहे कीं, ते बांधेसूद व सुस्वरूप होते, हें दाखविणें तर खरेंच पण मिजलसींत, समारंभ प्रसंगीं, मोठमोठ्या सभांतून किंवा सरकारवा-ड्यांत धूळभेटीचे प्रसंगीं अगर इतर प्रयोजनाच्या वेळीं **नाना** जर हजर असले, तर लोक त्यांचे तोंडाकडे सकौतुक टकमकां बघीत असत, हें वाचकांच्या निदर्शनास आणण्याचा आमचा प्रयत्न होय. त्यांच्यावरून निंबलोण काढण्याचाच केवळ प्रसंग ! ! तात्पर्य, ज्या सभेंत **नाना** हजर नाहींत, ती सभाच नव्हे किंवा ज्या कारणप्रयो-जनीं **नानां**चें आगमन झालें नाहीं, त्यास शोभाच येऊं नये, असें त्यांच्या वेळचे लोक म्हणत असत ! ! !

(२) कोट ऑफ् आर्म अथवा सरकारी शिक्कामोर्तब.



कोट ऑफ् आर्म–शिक्कामोर्तब.

नानांचा मोठेंपणा व इभ्रत जाणून आणि सरकारी व सार्वजनिक कामें पाहून राणीसरकारनें त्यांस सन १८६१ त 'कोट ऑफ् आर्म' अथवा त्यांच्या घराण्यास वंशपरंपरेचा **शिक्कामोर्तब** बहाल केला. त्यांत **नानांस** शहरच्या नागरिकाचे पूर्ण हक्क व जादा अधिकार दिलेला आहे. ह्या **कोट ऑफ आर्म**बरोबर सुवर्णाचे दोन शिक्के अर्पण केलेले आहेत. त्या दिवसापासून **नाना** व त्यांचे पश्चात् त्यांचे वंशज हे वरील शिक्का किंवा मोनोग्राम कागदोपत्रीं अद्याप वापरतात.

---

(३) महाजन.

नाना हे **श्रीवालुकेश्वराचें** देऊळ व त्या संबंधाची स्थावर मिळकत, धर्मशाळा वगैरे आणि त्या लगतीचीं इतर देवस्थानें ह्यांचे इतर कांहीं थोर, अब्रुदार व धनाढ्य लोकांप्रमाणें पूर्ण वहिवाटदार आणि **महाजन** होते. **श्रीवालुकेश्वराच्या** देवस्थानाची व्यवस्था **नानांच्या** खुद्द देखरेखीखालीं आणि त्यांच्या सल्लचानें चाले.

(४) नानांस घोडेस्वाराची मनसब.

मुंबईंत कायदेकौन्सिलची स्थापना होऊन त्यांत एतद्देशियांची निवडणूक झाली, तेव्हांपासून प्रत्येक सभासदास सरकारी घोडेस्वाराची मनसब (आर्डर्ली) मिळाली. **नाना** हे बाहेर फिरावयास किंवा सरकारी कामकाजास किंवा कायदेकौन्सिलच्या बैठकीस जावयास निघाले कीं, हा स्वार त्यांचे गाडीपुढें चाले, असें आम्हास चांगल्या आधारावरून कळतें. हा मान एतद्देशियांपैकीं फार थोड्यांच्याच वांट्यास आला. हा प्रघात सरकारानें पुढें बंद केला.

(५) नाना रेल्वेचे एक डायरेक्टर होते.

सन १८५३ त जी. आय्. पी. रेल्वे कंपनी सुरू झाल्यापासून एतद्देशियांपैकीं **नाना** हे एक **डायरेक्टर** होते. त्यामुळें रेल्वेच्या बाबतींत त्यांचें वजन व मानपान बराच मोठा असे.

(६) सोन्याची पास.

नाना रेल्वेचे **डायरेक्टर** झाल्यापासून त्यांस कंपनीकडून एक सुवर्णाची पास बहाल करण्यांत आली. कंपनीची लाईन जेथपर्यंत आहे, तेथपर्यंत पहिल्या वर्गांतून जाण्यायेण्याची त्यांस पूर्ण मुभा असे.

(७) रेल्वे स्टेशनावर पांच मिनिटें उशिरां जाणें.

नाना जी. आय. पी. रेल्वेचे **डायरेक्टर** झाल्यानंतर त्यांस जर कधीं पुणेंमुकामीं अगर इतर ठिकाणीं जाणें झालें, तर त्याप्रमाणें ते रेल्वेच्या एजंटच्या ऑफिसांत पूर्वसूचना देत कीं, ' मला आज अमुक गाडीनें अमुक एक ठिकाणीं जावयाचें आहे ' इतकी सूचना मिळाल्याबरोबर अधिकारीवर्गांत बरीच धांदल उडे. **नानां**करितां पहिल्या वर्गाचा डबा राखून ठेवलेला असे. गाडी सुटण्याची वेळा जर दुपारची दोहोंची असली, तर कायद्याप्रमाणें त्याच्या कांहींवेळापूर्वीं रेल्वेस्टेशनावर हजर असलें पाहिजे. पण **नाना** हे पांच मिनिटें मुद्दाम उशीर करून जात. मग तर ड्रायव्हराची व गार्डाची अगदीं तारांबळ उडे. **नानां**ची स्वारी एकदां कां स्टेशनाच्या आवारांत दाखल झाली कीं, स्टेशनमास्तर व त्यांचे हाताखालची मंडळी **नानांस** त्यांच्या इष्टठिकाणीं नेऊन बसवीत व त्यांच्या सामानासुमानाची योग्य व्यवस्था मोठ्या दक्षतेनें व काळजीपूर्वक लावीत. मग गाडी चालू व्हावयाची.

पांच मिनिटें उशिरां जाऊन मान घ्यावयाचा, असा त्यांचा बाणा असे. स्टेशनावर जातांच **"शंकरशेट आले, शंकरशेट आले, "** असा स्टेशनभर प्रतिध्वनि व्हावयाचा आणि अधिकारीवर्गांत एकच गर्दी उडून जात असे.

(८) रेल्वे ऑफिसवर प्रमुख ठिकाणीं नानांचा संगमरवरी दगडाचा बस्ट.

नाना रेल्वेचे **डायरेक्टर** असल्यामुळें बोरीबंदरच्या रेल्वे ऑफिसावर प्रमुखठिकाणीं दर्शनीच इतर डायरेक्टर्सच्या समवेत

त्यांचा ही एक संगमरवरी दगडाचा भव्य बस्ट (डोकीपासून छातीपर्यंतच्या भागाचा चेहरा) बसविलेला आहे. तो सार्वजनिक रस्त्याच्या त्या भागावरून जाणाऱ्यायेणाऱ्यांच्या सहज दृष्टीस पडतो.

(९) रेल्वेंतून पितापुत्रानीं एकत्र प्रवास कधींही न करणें.

नानांस रल्वेंतून पुण्यास अगर इतर ठिकाणीं आपल्या कुटुंबांतील माणसांसमवेत अथवा त्यांचे एकुलते एक चिरंजीव **विनायकराव** ऊर्फ **बाबासाहेब** यांसह प्रवास करण्याचा जर प्रसंग आला, तर ते प्रथम आपण जात आणि मागाहून म्हणजे मागचे गाडींतून अगर दुसरे दिवशीं **बाबासाहेब** जावयाचे, अशी त्यांची वहिवाट असे. कारण बोरघाटांतील बोगदे व मोठमोठे लांकडी आणि लोखंडी पूल नुकतेच वहिवाटींत आले होते, व अवघ्या घाटाची योजना नवीनच आस्तित्वांत आली होती. त्यामुळें इकडच्या लोकांस त्या बद्दलची फारशी शाश्वती वाटत नव्हती. घाटांत अपघात होऊन जिवास कधीं धोका येईल याचा भरंवसा नव्हता, अशी आमच्या लोकांची समजूत झाली होती. आणि तसाच कांहीं दुर्दैवानें प्रसंग आला तर एकाच वेळीं पितापुत्रास धोक्यांत येणें रास्त व शहाणपणाचें काम नाहीं, असें कोणीही म्हणूं शकेल. म्हणून पितापुत्र एकाच वेळीं एकाच गाडींतून प्रवास न करण्याचा **नानां**चा संकल्प किती दूरदृष्टीचा व शहाणपणाचा होता, हें कोणीही कबूल करील. म्हणून **नानां**च्या ह्या बुद्धिवैभवाबद्दल आम्हास आनंदाश्चर्य वाटतें.

(१०) नाना उत्तम पोहणारे होते.

नानांनीं आपल्या पूर्ववयापासून आपली शरीरसंपदा उत्कृष्ट तऱ्हेनें राखिली होती. तिची निष्काळजीपणानें अगर व्यसनाधीन

होऊन कधींच हेळसांड केलेली नव्हती. म्हणून अखेरपर्यंत ती चांगली राहिली होती. अवघें अंग भरदार असून वळणदार होतें आणि त्यांच्या स्नायूंची शक्ति बळकट व वाखाणण्यासारखी होती. ते तलावांत अ-गर नदींत पोहण्यास निघाले कीं त्यांच्याबरोबर पोहण्यांत कोणीही टिकत नसे. प्रहर प्रहर दोन दोन प्रहर ते पाण्यांत सारखे डुंबत रहात असत. आणि नदींतून पोहतांना कोस कोस पाऊण पा-ऊण कोसाची मजल एका दमांत मारीत, इतकी त्यांच्या स्नायूंची शक्ति बळकट व वाखाणण्यासारखी असे.

(११) सार्वजनिक ठिकाणीं ठेवलेले नानांचे पुतळे व चेहरे

मुंबई, पुणें, सातारा वगैरे नामांकित शहरांत **नानां**चे पुतळे किंवा तेल्यारंगाचे चेहरे ठेविलेले आहेत. हें त्यांच्या वैभवसंपन्नतेचें पूर्ण द्योतक होय. मुंबईतील टाऊनहालांत उत्तरेकडच्या दालनांत **नानां**चा संगमरवरी दगडाचा एक भव्य पुतळा ठेवलेला आहे. हा पुतळा **नानां**च्या अवघ्या श्रेष्ठतम अमदानीचें स्मारक म्हणून मुंबई-तील लोकांनीं स्वखर्चानें मुद्दाम विलायतेहून उत्कृष्ट कारागिराच्या हातून घडवून आणला आहे. ह्याकरितां सन १८६४ म्हणजे **नानां**च्या हयातींतच लोकांनीं मुंबईच्या टौउनहालांत प्रचंड जाहीर-सभा भरवून व आपापसांत वर्गणी गोळा करून **नानां**बद्दल आपला आदर व गुणग्राहकता व्यक्त केली.

ह्या बद्दल साद्यंत इतिहास ह्याच पुस्तकांत बाराव्या भागांत वर्णन केलेला आहे. तो जिज्ञासूंनीं अवश्य पाहण्याची आम्ही वाचकांस शिफारस करितों. मात्र इकडे एका गोष्टीचा उल्लेख केल्यास

अप्रासंगिक होणार नाहीं. ती गोष्ट ही कीं, एखाद्या सर्वमान्य पुरुषाचा सार्वजनिक पुतळा लोकांनीं स्वखर्चानें त्याच्याच हयातींत उभा करण्याचा प्रयत्न करणें, हें **नानां**च्या आधीं ज्या मान्यवर पुरुषाच्या वांट्यास आलें, ते थोर पुरुष **सर जमशेटजी जिजीभाई बाटलीवाले, पहिले ब्यारोनेट** हे होत. **नानां**च्या पाठीमागून आणखी एका महाभागाचा पुतळा, पुढें पुष्कळ वर्षांनीं कां होईना, त्याच्याच हयातींत उभारण्यांत आला, ते प्रसिद्ध **डा. ब्लेनी** होत. वरील तिघांपैकीं पहिले दोघे म्हणजे मरहूम **बाटली-वाले** व मरहूम **नानाशंकरशेट** ह्यांच्या हयातींतच त्यांचे पुतळे उभे करण्याचा लोकांनीं संकल्प केला. पण सदरहू दोघेही असामी आपले स्वताहाचे पुतळे उभे राहिलेले पाहण्यास जगले नाहींत, ही निरूपायाची गोष्ट होय! परंतु तिसरे **डा. ब्लेनी** ह्यांनीं मात्र आपला पुतळा बोरीबंदरासमोर भाटियाबागेच्या उत्तर सीमेवर उभा केलेला आपल्या डोळ्यांनीं पाहिला. तेव्हां त्या पुरुषास किती धन्यता वाटली असेल, ह्याची कल्पना आमच्या वाचकांनींच करावी.

टाऊनहालखेरीज जी. आय. पी. रेल्वेच्या ऑफिसावर दर्शनींच **नानां**चा एक बस्ट ठेविला आहे, त्याबद्दलचें वर्णन स्वतंत्र वर येऊन गेलेलेंच आहे.

मुंबईंतील सोनापुरच्या स्मशानभूमीच्या आवारांत शिरतांच दर्श-नीच **नानां**चा एका संगमरवरी खांबावर त्याच जातीच्या शुभ्र दग-डाचा एक बस्ट बसविलेला आहे. स्मशानयात्रेबरोबर जाणाऱ्या प्रत्येक इसमास, **नानां**नीं तीच स्मशानभूमि आहे त्याच ठिकाणीं राखून आह्मां मुंबईकरांवर जे चिरस्मरणीय उपकार करून ठेवलेले आहेत, त्याची पूर्ण साक्ष पटते व त्यांचें हरघडीस स्मरण होतें.

वर लिहिलेल्या संगमरवरी बस्टाच्या जोडीचा एक बस्ट **नानांच्या** पालवावरील वाड्याच्या दिवाणखान्यांत शिरतांच तो प्रथम दृष्टीस पडतो आणि ह्या वैभवशाली पुरुषाचें स्मरण होतें.

ह्याखेरीज तेल्यारंगाच्या रंगविलेल्या तसबिरा मुंबईशहरांत अगणित आहेत. **नानांच्या** योग्यतेचे जे पुरुष त्यांच्याकाळीं होऊन गेले, त्यांनीं कौतुकानें आपल्या भव्य दिवाणखान्यांत ठेविले आहेत.

फ्रामजी काव्हसजी इन्स्टिटयूटच्या सार्वजनिक इमारतीची कोणशीळा **नानानींच** बसविली. तेव्हां अशा प्रसिद्ध ठिकाणीं **नानांची** तेल्या रंगाची तसबीर ठेवणें, हें अगदीं स्वाभाविक आणि योग्य आहे.

ह्याशिवाय आरशांत बसविण्यासारखे **नानांचे** असंख्य फोटो मुंबई शहरांत काय किंवा गांवोगांवीं काय, घरंदाज मंडळीनें आपापल्या दिवाणखान्यांत आदरपूर्वक ठेविलेले आपल्या अद्याप दृष्टीस पडतात.

पुणें व सातारा या प्रसिद्ध शहरांत **नानांच्या** तेल्या रंगाच्या उत्कृष्ट तसबिरा प्रसिद्ध ठिकाणीं ठेविलेल्या आहेत. सातारापुकामीं **नानाशंकरशेट** क्लबच्या दिवाणखान्यांत ठेविलेली तेल्या रंगाची भव्य तसबीर हल्लीं **नानांचे** गादीवर विद्यमान असलेले त्यांचे नातू **श्रीमंत रा. रा. रावजी विनायकराव जगन्नाथ शंकरशेठ** यांनीं नवथर सदरहू क्लबला बहाल केलेली आहे, असें ऐकतों.

(१२) स्नेही आणि परिचित मंडळी.

नानांसारख्या सार्वजनिक किंवा परोपकारी कामास वाहिलेल्या अथवा ज्यांचा रयतेंतच केवळ नव्हे, तर सरकार-दरबारांत मोठा मानपान व दांडगें वजन आहे, अशा पुरुषाचा

स्नेह संपादन करण्याची कोणास बरें दृढतर इच्छा होणार नाहीं ! ! **नाना** हे **कायदेकौन्सिलचे** एक वजनदार सभासद असल्यामुळें आणि मुख्यत्वेंकरून मुंबईच्या त्या त्या वेळच्या खुद्द **गव्हर्नराप**र्यंत त्यांचें दांडगें वजन होतें, म्हणून इलाख्यांतील **होळकर, गायकवाडासारखे** मोठमोठे राजेरजवाडे त्याचप्रमाणें **सांगली, मिरज, कुरुंदवाडकरांसारखे** संस्थानिक आणि इतर लहान थोर सरदारमंडळी **नानांची** राजकीय काय किंवा सामाजिक काय, अशा बाबतींत सल्लामसलत घेण्यास त्यांचेकडे हरहमेश येत जात होती.

मुंबई शहरांतील मोठमोठ्या नामांकित आणि घरंदाज मंडळीपैकीं पहिले व दुसरे **ब्यारोनेट सर जमशेटजी जिजीभाई बाटलीवाले, माणकजी पेटिट, वाडिया, वर्जिवनदास माधवदास रामलाल, प्रेमचंद रायचंद, सर थारया टोपन, महमदअल्ली रोगे, सर डेव्हिड ससून, आगाखान, भाऊ रसूल, आत्माराम माधवजी, आत्माराम केशवजी भांडारे, डा. भाऊ दाजी,** रावसाहेब **विश्वनाथ नारायण मंडलिक, बाबाजी दिवाणजी आंग्रे डा० बर्डउड, डा० उइलसन्** अशासारख्या थोर थोर मंडळीचा **नानांशीं** अत्यंत स्नेहसंबंध होता.

(१३) डाक्टर बर्डवुड आणि नानांचा अंतकाळ.

मागील प्रकरणांत लिहिल्याप्रमाणें **नानांच्या** विशेष परिचयाची जी मंडळी होती, अगर **नानांवर** ज्यांनीं जीव कीं प्राण केला, अशांपैकींच एक **डाक्टर** (हल्लीं **सर**) **बर्डवुड** हे एक होत. **नाना** आजारी पडून त्यांचें दुखणें जेव्हां फार विकोपास गेलें, तेव्हां डा. **बर्डवुड** हे त्यांच्या नेहमीं सान्निध्यांत असत, असें मागें एका प्रसगीं ह्मटलेलेंच आहे. पण त्यांचें दुखणें

जेव्हां विकोपास गेलें व वैद्यमंडळानें त्यांची स्थिति निराशाजनक ठरवून जेव्हां त्यांस मृत्युशय्येवर टाकिलें, व आतां ते अवध्या घटका दोन घटकेचेच सोबती आहेत, असें जेव्हां आढळून आलें, तेव्हां **डाक्टर** मजकुरांनीं आपल्या राहत्या बंगल्यापासून **नानां**च्या पालवावरील वाड्यापर्यंत त्यांची प्रकृती कशीकाय आहे, हें समजण्याकरितां टप्याटप्यावर मुद्दाम माणसें ठेविलीं होतीं. त्यांच्याकरवीं **नानां**ची अखेरची स्थिति **डाक्टर** मजकुरांस घडीघडी कळत असे. नेटिव्हलोकांनीं **नानां**वर लोभ तर ठेवलेलाच होता, पण परकियांचा देखील **नानां**वर किती लोभ असे व त्यांचेविषयीं किती आदर व पूज्यभाव असे, हें वरील गोष्टीवरून स्पष्ट दिसून येतें.

(१४) "सर" ही पदवी पण नानांचा अकल्पित मृत्यु.

नानांनीं जवळ जवळ ४९ वर्षें जी लोकसेवा बजाविली आणि मुख्यत्वेंकरून इंग्रजसरकारास हरएक बाबतींत हरघडीस जी अमोलिक मदत केली आणि अनेक वेळां सरकारची बाजू राखून त्यास योग्य सल्लामसलत दिली, त्याचा मोबदला म्हणून मुंबईसरकारच्या शिफारशीवरून विलायतसरकारनें **नानां**स " **सर** " ही बहुमानाची पदवी समर्पण केली होती, असें आमच्या ऐकिवांत आहे. पण सदरहू पदवी मुंबईत येऊन पोहोंचण्यापूर्वींच **नानां**चा काळ झाला, ही निरूपायाची गोष्ट होय.

(१५) नानाचा धक्का अथवा नानाची वाडी.

मुंबईतील सोनापूरची स्मशानभूमि **नानां**नीं आपल्या वजनानें, परिश्रमानें व चातुर्यानें राखिली, त्यामुळें आह्मां मुंबईकरांवर तर अगणित उपकार करून ठेविलेले आहेतच, पण ह्या एका गोष्टी-वरून त्यांनीं आपलें स्वतःचें नांव चिरस्मरणीय करून ठेविलेलें

आहे. तें इतकें कीं, पांढरपेशेखेरीज करून इतर हिंदुलोकांत मृत्यु झाला तर आपापसापैकीं एखाद्याजवळ दुसऱ्यानें चवकशी करून ह्मटलें कीं, "कायरे तुझा अमुक अमुक कोठें गेला" तर "तो **नानाच्या धक्क्यावर गेला**" किंवा "**नानाच्या वाडींत गेला**" असा त्यास जबाब मिळतो. यावरून कांहीं कृतज्ञता, कांहीं आदर, कांहीं स्मरण, कांहीं विनोद या पैकीं कोणत्याही का रूपानें होईना, **नानां**ची आठवण होते, आणि ती अशीच चिरकालिक राहील, असा आह्मास पूर्ण भरंवसा आहे.

(१६) श्रीभवानीशंकरची वार्षिक जत्रा.

सदरहू जत्रा प्रत्येक वर्षीं मार्गशीर्षमासीं ताडदेवावरील **श्रीभवानीशंकर**च्या देवळाप्रीत्यर्थ भरत असते. खुद्द **नानां**च्या वेळेस ह्या जत्रेचें महत्व फार मोठें होतें. सर्व देवळाभर, त्याच्या आवारांत, देवळालगतच्या धर्मशाळेच्या भव्य इमारतीभर आणि खुद्द **नानां**च्या राजविलासी बंगल्यावर लाईटची उत्कट रोषनाई केलेली असे. जिकडे तिकडे ध्वजा, पताका लटकविलेल्या असत आणि इतर गोष्टींनीं सदरहू जागा उत्तम तऱ्हेची शृंगारलेली असे. ती इतकी कीं, पहाणाराचे डोळे दिपून जात.

वरील जत्रेच्या प्रसंगीं आमंत्रित मंडळापैकीं नामदार **गव्हर्नर साहेब,** कौंसीलचे मेंबर्स, हायकोर्टचे जजीस, **बाटलीवाले** व शहरांतील इतर संभावित लोकांस आमंत्रण असे. आमंत्रित मंडळी मिजलसीच्या ठिकाणीं जमा झाल्यावर त्यांच्या करमणुकीकरितां, वारांगनांचा उत्कृष्ट नाच व्हावयाचा. त्याच प्रमाणें अत्तर गुलाब हार तुरे, वगैरे देऊन झाल्यावर पाहुणे मंडळी त्याच बंगल्याच्या वरील विस्तृत व शृंगारलेल्यां गच्चीवर जावयाची. तिकडला आरासही अप्र-

तिम असावयाचा. मंडळीस बसण्यास मखमालीनें व उंची साटणीनें मढविलेल्या कोचा व खुरच्या असत, मंडळी स्थानापन्न झाल्यावर बंगल्याच्या समोर **नानां**चीच एक मोठी विस्तृत बाग असे, तीस '**अंजीरबाग**' म्हणत. त्या बागेंत नानातऱ्हेचें दारूकाम सुरू व्हावयाचें. तें अप्रतिम होत असे. असें म्हणतात कीं, सदरहू दारूकामाची मोठी ख्याती होती. नंतर समारंभ बरखास्त होत असे.

(१७) सुधारक आणि नाना

नाना जसे निस्सीम स्वधर्मनिष्ठ होते, त्याचप्रमाणें ते मोठे सुधारकही होते. हें वाचून आमच्या वाचकांस अगदीं चमत्कारिकसें वाटेल. परंतु त्यांत मोठेंसें आश्चर्य मानण्यासारखें असें कांहीं नाहीं. कारण ते धर्मशील होते. परंतु धर्मभोळेपणानें जी अंधपरंपरा कांहीं कांहीं ठिकाणी दृष्टीस पडते, ती मात्र **नानां**च्या ठायीं अगदीं नव्हती. स्वधर्माप्रमाणें आचरण ठेवून सत्कालक्षेप करणें हें त्यांस फार प्रिय असे, असें त्यांच्या एकंदर राहणीबद्दल ह्या पुस्तकांत ठिकठिकाणीं आलेल्या वर्णनावरून कळून येईल. त्याचप्रमाणें **नाना** हे खरे सुधारक होते. मुलींस शिक्षण देणें, त्यांचीं अल्पवयांत लग्नें न करणें, इत्यादि ज्या ज्या गोष्टींशीं धर्माचा कांहीं एक संबंध पोहोंचत नाहीं, किंवा अशा गोष्टींस धर्म कधींही आड येत नाहीं, अशाबद्दल **नाना** फार दक्ष असत. उदाहरणार्थ '**स्टूडण्टस लिटररि अँड साएंटिफिक् सोसायटी**' च्या स्त्रीशाखेस **नानांनीं** तनमनधनेंकरून मदत केली आणि स्वताहाच्या वाड्याच्या आवारांत 'मुलींची शाळा' स्वखर्चानें चालविली. त्याचप्रमाणें मुलींचीं लग्नें अल्पवयांत करूं नयेत, ह्याबद्दल तर त्यांनीं कायदेकौन्सिलच्या एका बैठकींत पुढाकार घेऊन त्या संबंधाचा कायद्यांत योग्य फेरफार करविला. त्या संबं-

धाचें त्यांचे कौन्सिलमध्यें झालेलें भाषण उत्तम प्रकारचें व मननीय आहे.

त्याचप्रमाणें कोणी एखाद्यानें **परद्वीपगमन** केल्याबद्दल त्यास वाळींत टाकून त्याच्याशीं अगदीं संबंध सोडून देणें, हें रानटी व क्रूरपणाचें कृत्य आहे, असें **नानां**चें मत असे, ह्याचें पुढें दिलेल्या एका गोष्टीवरून सहज अनुमान करतां येईल व त्यांची मतें किती सुधारलेलीं होतीं, हें कळून येईल.

एकेप्रसंगीं शेट **माणिकजी खरशेटजी** हे पारशी गृहस्थ विलायतेस जाऊन आल्यानंतर त्यांच्यावर पारशी लोकाकडून ज्ञाती-बहिष्कार घालण्यांत आला. **शेट माणिकजी खरशेटजी** हे जड्ज्य असून **नानां**च्या अत्यंत स्नेहांपैकीं एक होते. त्याच संधीस दुसऱ्या एका सधन व **नानां**च्या अत्यंत परिचयांतल्या पारशी गृहस्थास **नानां**नीं आपल्या बंगल्यांत (पार्टी) मेजवानी देण्याचा विचार करून त्याप्रमाणें गांवांत मोठमोठ्या लोकांत आमंत्रणचिठ्ठ्या वाटण्यांत आल्या. त्याप्रमाणें **शेट माणिकजी खरशेटजी** जड्ज्य ह्यांस ही आमंत्रण चिट्ठी पाठविली. त्यामुळें पारशी लोकांत बराच गवगवा झाला. त्यांपैकीं कांहींजण ह्मणावयास लागले कीं, सदरहू **शेट माणिकजी** हे विलायतेस जाऊन आल्याबद्दल त्यांस ज्ञातीबहिष्कार आहे. तर ते जर **नानाशंकरशेट**कडे पार्टीस जाणार असले तर आह्मी तिकडे खास जाणार नाहीं. ही गोष्ट **नानां**च्या कानावर गेली, तेव्हां त्यांनीं मोठ्या धैर्यानें खालील उद्गार काढले:—

*" माझे मित्र **शेट माणिकजी खरशेटजी** ह्यांस मेजवानींतून अजीबात वगळण्यापेक्षां मी मेजवानीच मुळीं देणार नाहीं."

* I would rather give no party than exclude my friend Manckji from the circle of invitation.

(१८) लक्ष्मणशास्त्री थत्ते आणि नाना.

नानांचे सहवासास शास्त्रीपंडितांचा भरणा असे. त्यांच्या बरोबर ते कधीं कधीं अनेक शास्त्रीय विषयांवर संभाषणें करीत आणि त्या संबंधानें त्यांस कांहीं शंका आल्या, तर त्यांचें समाधान शास्त्र्यांकरवीं करून घेत. वरील शास्त्रीमंडळांत वे. शा० सं० **लक्ष्मणशास्त्री थत्ते** या नांवाचे एक फार व्युत्पन्न शास्त्री होते. त्यांच्यावर **नानां**चा फार लोभ असे.

एके प्रसंगीं भर दोनप्रहरीं शास्त्रीबुवा धांपा टाकीत आणि घामाघूम झालेले असे **नानां**च्या वाड्यांत येऊन दाखल झाले. शास्त्रीबुवांची अशी अवस्था झालेली पहातांच **नानां**नीं अर्थात त्यांचेपाशीं चवकशी केली. " काय **लखोबा** ! आज तुमची अशी अवस्था होण्याचें काय कारण ? " तेव्हां शास्त्रीबुवा ह्मणाले कीं, **नानासाहेब**, आज माझें घर बुडालें आणि माझा सर्वस्वी नाश झाला; आपणावांचून मला आतां त्राता कोणी नाहीं. शें दीडशें रुपयांकरितां वाण्यानें माझे घरावर टांच आणिली आहे. आणि माझें सर्व सामानसुमान काढून नेत आहे. तरी या संकटांतून मला आतां वांचवा. मी आपले उपकार कधींही विसरणार नाहीं. "

नाना हे दयाभूत होते ! त्यांनीं पाहिलें कीं, थोड्याशा रकमेकरितां ह्या गरिबाचा संसार बुडतो. हें मनांत आणून त्यांनीं शास्त्रीबुवांस धीर दिला. आणि वाणी व बेलिफ् यास आपले घरीं आणवून त्यांनीं शास्त्रीबुवांचे वतीनें कर्जाची रकम आपण स्वतः भरून त्यांस मोकळें केलें. त्यामुळें शास्त्रीबुवा **नानां**चे फार ऋणी * झाले.

---

*ही गोष्ट खुद्द लक्ष्मणशास्त्री थत्ते यांनीं आम्हास सांगितली. ती तशीच आख्यायिकेच्या रूपानें इकडे दाखल केली आहे.

(१९) दांडगी स्मरणशक्ति

नानांची स्मरणशक्ति इतकी कांहीं दांडगी होती कीं, त्यांस पुष्कळ वर्षांपूर्वीं एखादा मनुष्य पाहिलेला असला किंवा एखादी गोष्ट, मग ती क्षुल्लक का असेना, पुष्कळ काळापूर्वीं घडलेली असली तरी ती **नानांस** बिनचुक सांगतां येत असे. एखादा मनुष्य फार वर्षांनीं जर **नानांस** भेटला तर त्यास नांवानें हांक मारीत. त्याचप्रमाणें एखादी गोष्ट फार काळापूर्वीं घडली असली तरी ती त्यांस बिनचुक सांगतां येत असे. एखाद्या मनुष्यानें जर एखादें बरें-वाईट कृत्य केलें असलें तर त्याची आठवण **नाना** त्यास बिनचुक देत. त्यामुळें लोकांस त्यांचें फार आश्चर्य वाटे. स्वतःच्या वाड्यांत जर कांहीं कारणप्रयोजन असलें तर रीतीप्रमाणें त्या प्रीत्यर्थ सर्वांस आमंत्रणें जावयाचीं. मग वेळेवर आमंत्रित मंडळी येऊं लागली म्हणजे अमक्या घराण्यांतला अमुक एक मनुष्य आला नाहीं तर **नाना** त्यास मुद्दाम विचारीत कीं, ' काय हो, आज तुमचा + + कां आला नाही ? वगैरे. म्हणजे त्या बापड्यास एखादें वेळेस खजील व्हावें लागे किंवा पाण्यांत ढेकूळ टाकल्याप्रमाणें त्याची स्थिति होई. या अशा प्रकारची त्यांची स्मरणशक्ति मोठी दांडगी होती. ह्या स्मरणशक्तींबद्दल लोकांस मोठें कौतुक वाटे.

(२०) नानाशंकरशेट या नांवाची म्हण.

एखाद्या माणसानें कोणतीही गोष्ट जर दिमाखानें केली किंवा एखादी क्षुल्लक गोष्ट करण्यास मोठेपणाचा आव घातल्यास त्याच्याविषयीं तिरस्कार व्यक्त करावयाचा असला तर 'तूं मोठा बाजीराव आहेस !' किंवा ' तो काय बाजीराव आहे, ' अशा रीतीनें त्यास संबोधून म्हणण्याची वहिवाट पडली आहे. त्याचप्रमाणें दैवज्ञज्ञातींत **नानांच्या**

नांवावरून एक ह्मण पडली. ती अशी कीं, कोणी एकाद्यानें जर एखादी गोष्ट प्रौढीनें किंवा दिमाखानें केली, तर त्यास **तो काय मोठा नानाशंकरशेट** आहे!' असें विनोदपूर्ण वाणीनें ह्मणण्याचा परिपाठ पडून गेला आहे.

(२१) परान्न-सेवन-त्याग.

कोणी माणसें काशीयात्रेस जाऊन आलीं तर तन्निमित्य आपला एखादा आवडीचा पदार्थ सेवन करण्याचा त्याग करतात. किंवा एखादी गोष्ट करणें वर्ज करतात. तसेंच आपल्या एखाद्या सुहृदाच्या मृत्यूनंतर त्याच्याविषयीं आपणांस असलेला आदर किंवा त्याची निरंतर स्मृति रहावी म्हणून कांहीं कांहीं पदार्थ सेवन कारण्याचें वर्ज करतात; त्याचप्रमाणें **नानांनीं** आपल्या प्रिय पत्नीच्या मृत्यूनंतर परान्नसेवन करण्याचें वर्ज केलें.

(२२) नाना मुंबई युनिव्हर्सिटीचे फेलो झाले.

कलकत्त्याच्या सुप्रिम लेजिस्लेटिव्ह कौन्सिलनें १८ जुलई १८५७ रोजीं पास केलेल्या आक्टान्वयें मुंबई इलाख्यांत वगैरे विद्यावृद्धीविषयक बाबतींत एतद्देशियांची प्रगती व्हावी म्हणून मुंबई शहरांत एक विद्यापीठ—**युनिव्हर्सिटी**—सन १८५९ त स्थापिलें. त्यांत नेक **नामदार लॉर्ड एल्फिन्स्टन साहेब गव्हर्नर बहादूरांपासून** तों ईंग्रजी बडे बडे अमलदार आणखी नेटिव्हांपैकीं सन्मान्य व सधन गृहस्थांची मंडळी स्थापन केली आणि त्यांस **फेलो** नेमलें. त्यांत नेटिव्हांपैकीं प्रथम पांच असामी होते. ते येणेंप्रमाणें:- **सर जमशेठजी जिजीभाई बॅरोनेट, श्रीमंत जगन्नाथ शंकरशेट, डॉ० भाऊ दाजी, मी० बमनजी हार्मसजी** आणि **मी० महमद युसफ मुर्गे**, मुंबईचे काजी.

नवव्या भागांत वर्णन केल्याप्रमाणें लोकांत विद्यावृद्धीचा प्रसार करण्याकरितां **नानां**नीं जे परिश्रम केले, ते मनांत आणून मुंबई सरकारानें त्यांस युनिव्हर्सिटीचे **फेलो** नेमून त्यांचा मोठा गौरव केला, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्या सारखी आहे.

(२३) धि जगन्नाथ शंकरशेट संस्कृत स्कॉलरशिप.

श्रीमंत विनायकराव जगन्नाथजी शंकरशेट यांनीं आपल्या परमपूज्य पित्याचा मृत्यु झाल्यानंतर, **नानांनीं** विद्याभिवृद्धीच्या बाबतींत गेलीं ४२ वर्षे जे परिश्रम केले, त्याच्या स्मरणार्थ आणि मुख्यत्वेंकरून **नानांस** आपल्या संस्कृतभाषेचा पूर्ण अभिमान होता त्याच्या गौरवार्थ त्यांच्या नांवानें स्कॉलर्शिप स्थापन करण्याचा आपला मनोदय युनिव्हर्सिटीस कळवून त्या प्रीत्यर्थ कांहीं रकम युनिव्हर्सिटीच्या स्वाधीन केली. तिच्या दरमहाच्या व्याजांतून २५–२५–रूपयांच्या तीन व २०–२० रुपयांच्या तीन स्कालर्शिपा, म्याट्रिक्युलेशन परीक्षेंत पास होऊन जे उमेदवार संस्कृतभाषेंत उत्तीर्ण होतील, त्यांपैकीं ज्यांचा नंबर पहिला व दुसरा येईल, त्या विद्यार्थ्यांस आपला अभ्यासक्रम कालेजांत पुढें चालविण्याकरितां तीन वर्षेंपर्यंत शिष्यवृत्या स्थापन केल्या. पण पुढें कांहीं काळानें व्याजाचा दर कमी झाल्यामुळें वर म्हटलेल्या तीन स्कॉलरशिप्सच्या दोन करून अनुक्रमें पंचवीस पंचवीस रुपयांच्या अठरा अठरा रुपये आणि वीस वीस रुपयांच्या बारा बारा रुपये करून त्या तीन वर्षांच्या ऐवजीं दोन दोन वर्षेंपर्यंत चालतील अशा केल्या.

युनिव्हर्सिटीच्या द्वारें म्याट्रिक्युलेशन परिक्षेंत दरवर्षीं संस्कृतभाषेंत उमेदवार पास होऊन ज्यांचे नंबर पहिले व दुसरे आले, त्यांस **जगन्नाथ शंकरशेट स्कॉलर्शिप** मिळत गेली, आणि ती अद्याप-

पर्यंत तशीच चालत आहे. सदरहू स्कॉलर्शिप ज्यांस मिळाली व जे पुढें नांवालौकिकास आले, त्यांपैकीं कांहीं प्रमुख मंडळीचीं नांवें येणें प्रमाणें:— रा० **यशवंत वासुदेव आठले**, रा० **काशीनाथ बळवंत पेणसे**, रा० **नारायण बाळकृष्ण गोडबोले**, रा० **गणेश जनार्दन आगशे**, रा० **वामन दाजी ओक**, रा० **वामन शिवराम आपटे**, रा० **श्रीधर रामकृष्ण भाण्डारकर**, रा० **बाबाजी आबाजी भागवत**, रा० **लक्ष्मण रामचंद्र वैद्य**, रा० **भास्कर रामचंद्र आर्ते**. रा० **भास्कर विष्णु जोशी**, रा० **शिवराम महादेव परांजपे**, रा० **नरहर कृष्ण केळकर**, रा० **जनार्दन विनायक ओक**, वगैरे.

नानांच्या नांवाची स्कॉलर्शिप मिळवून त्यांच्या नांवाचें स्मरण हरघडीस होतें, हें तरी एक स्मारकच होय, यांत संशय नाहीं.

(२४) ग्रांटरोड बादशाही थिएटर.

मुंबई शहरांत पूर्वी स्वतंत्र नाटकगृहें नव्हतीं. याचें कारण हल्लीं-प्रमाणें पूर्वीच्या काळीं नाटकें पाहाण्याची लोकांस इच्छा कमी असावी अथवा नाटकगृहाच्या अभावीं नाटककंपन्याच स्थापन होत नसाव्या असें दिसतें. ही झाली ७९।८० वर्षांची गोष्ट. पुढें सन १८४२ त कोणी क्यापटन **क्रुकशांक** नांवाच्या विलायतेंतील एका नाटककंपनीच्या मालकानें ग्रॉंटरोडवर एक नाटकगृह बांधलें. सदरहू नाटकगृहाची जागा **नानां**ची होती. हें नाटकगृह '**ग्रांटरोड बादशाही थिएटर** ह्या नांवानें प्रसिद्ध होतें. तें बांधतांना जमिनीच्या मालकाबरोबर—**नानां**बरोबर—सदरहू साहेबानें अशी अट ठरविली होती कीं ' कांहीं विवक्षित काळपर्यंत त्यानें त्यांत नाटकें करावीं व शेवटीं ठराविक काळ संपतांच तें नाटकगृह **नानां**-

च्या स्वाधीन करावें. मग तें पर्यायानें **नानां**च्या ताब्यांत आलें. हें नाटकगृह इतक्या उत्कृष्ट रीतीनें बांधलें होतें कीं, त्यांत कोणत्याही जागेंत बसलें असतां स्टेजवरील–रंगभूमीवरील–पात्रें सारखीं दिसत आणि सदरहू पात्रांचीं भाषणें चांगल्या रीतीनें सारखीं ऐकूं येत. त्यानंतर ह्या नाटकगृहांत प्रथम प्रथम **इचलकरंजीकर, चित्तचक्षुकोल्हापुरकर हिंदु स्त्री नाटक मंडळी** अशां सारख्या नामांकित नाटकमंडळ्या नाटकें करीत असत. संगीत नाटकाचार्य **डोंगरे** यांचीं **संगीत रत्नावली** वगैरे नाटकें होत. पुढें प्रसिद्ध संगीत नाटकाचार्य **कै० अण्णा किर्लोसकर** यांचीं संगीत **शाकुंतल** आणि **संगीत सौभद्र, अण्णा मार्तंड जोशी** हे **आर्य संगितोत्तेजक मंडळीच्या** विद्यमानें **संगीत मृच्छकटिक** इत्यादि नाटकें करीत असत. **एल्फिन्स्टन कॉलेज** मधील विद्यार्थ्यांनीं कधीं कधीं संस्कृत नाटकें करावींत. त्यानंतर मुंबई शहरांत पुष्कळ नाटकगृहें बांधिली गेलीं, तथापि बादशाही थिएटरासारखें नाटकगृह अद्यापि एकही झालें नाहीं.

(२५) ब्याकबे रेक्लमेशन कंपनी अथवा साउथसीबबल् किंवा मुंबईतल्या धनिकांची दुर्दशा.

मुंबईशहराच्या पश्चिम किनाऱ्यावर समुद्राचा कांहीं भाग भरणी टाकून भरून काढण्याचा जो प्रयत्न झाला व ज्यामुळें पुढें मुंबईशहरांतील कित्येक धनिकांची अगदीं दुर्दशा उडाली आणि जो पुढें **ब्याकबेचा खाडा** या नांवानें प्रसिद्धीस आला, त्याची हकिकत आजच्या पिढीस मुळींच नाहीं. एवढेंच नव्हे तर कित्येक त्या वेळचे जे वृद्ध गृहस्थ आज मितीस हयात आहेत, त्यांस देखील हें प्रकरण काय आहे, हें समाधानकारकरीतीनें सांगतां येणें कठीण. ह्या-

बद्दलचा इतिहास जसा मनोरंजक आहे, तसा तो मनन करण्यासारखाही आहे. ह्मणून त्याची अंशतः तरी कल्पना हल्लींच्या माणसांस व्हावी ह्मणून आह्मी पुढें ती देत आहोंत. साद्यंत इतिहासाशीं आपणास कांहीं कर्तव्य नाहीं. तो साराच मनोरंजक आहे, तो सर्वांस समजणें इष्ट आहे. तथापि ग्रंथविस्तारभयास्तव इकडे देतां येणें शक्य नाहीं. परंतु ज्यामुळें आमच्या चरित्रनायकास तो फार भोंवला व ज्यामुळें त्यांस जवळजवळ बत्तीसलाखांचा चट्टा बसला, तेवढ्यापुरत्या भागाचा आपण विचार करूं. तो वृत्तांत असाः—

ईस्ट इंडिया रेल्वे आणि **जी. आय. पी.** रेल्वे कंपनी ह्या (१८४८) त दोन कंपन्यांना रेल्वे लाईनीं घालण्यास हिंदुस्थान सरकारनें परवानगी दिली. त्यावेळी **लॉर्ड डलहौसी** याची कारकीर्द चालू होती.

पुढें कालांतरानें **बी. बी. सी. आय. रेल्वे** अस्तित्वांत आली. १८६३ त **पब्लिकवर्क्स** डिपार्टमेंट स्थापन झालें.

प्रॉव्हिन्शिअल् गव्हर्नमेंट्सना—स्थानिक सरकाराना—हिंदुस्थान सरकाराकडून पब्लिकवर्क्स खात्यांची अभिवृद्धि करण्यास फर्माविलें. कारण त्यापासून रयतेचें कल्याण होऊन सरकारचें ही उत्पन्न वाढावें असें होतें: कसें तें पाहूं.

वरील हुकुमान्वयें मुंबईसरकारचें लक्ष आख्या मुंबईबेटाचा पश्चिम किनारा भरून काढून दुरुस्त करण्याकडे वेधलें. कारण दहाव्या भागांत ११२ व्या पृष्ठावर लिहिल्याप्रमाणें मुंबईबेट हल्लींप्रमाणें सबंध एक नव्हतें; पण लहान लहान सात बेटांचा एक समुह होता, असें म्हटलें आहे. कैक काळापूर्वी-१६७२ त त्यांतील खाड्या भरून टाकल्यावरही मुख्यत्वेंकरून किनाऱ्या किनाऱ्यानजिकची जमीन स्वाभा-

विक उंचसखल होती. वर म्हटलेल्या सात बेटांच्या मधील खाडया मातीनें भरून काढल्यावरही सबंध बेटाच्या पश्चिम किनाऱ्यालगतची सर्व जमीन उंचसखल होती. आणि अशा प्रकारची खड्याखोऱ्याची जमीन मुख्यत्वेंकरून व्यापारी रहदारीला अगदीं अयोग्य होती. म्हणून ती भरणी वगैरे घालून सारखी करण्याकरितां हिंदुस्थान सरकारच्या हुकुमान्वयें मुंबई सरकारानें ह्या गोष्टीकडे लक्ष पुरविलें.

ह्या सुमारास कोणतेंही मोठें काम सहकारित्वाच्या तत्वावर खासगी रीतीनें आपापसांत वर्गणी गोळा करून सिद्धीस नेणें इकडच्या माणसांस फारसें माहीत नव्हतें. मुंबईंत व्यापाराची भरभराट चालू होती. ह्याचें मुख्य कारण **अमेरिकन सिव्हिल वॉर**—अमेरिकेशीं युद्ध—त्यामुळें इंग्लंडांत हिंदुस्थानांतून कापसाची निर्गत फार झाल्यामुळें व्यापारास तेजी आली होती. ह्याबद्दलचा इतिहास मनोरंजक असल्यामुळें त्यासंबंधानें आमच्या लोकांस व मुख्यत्वेंकरून हल्लींच्या पिढीस थोडीशी कल्पना व्हावी ह्मणून आम्ही तो खालीं देत आहोंत.

पहिल्यानें अमेरिकेंतील कापूस विलायतेंत जात असे. पण पुढें स्वतंत्र होण्याच्या भरीस पडून अमेरिकेनें विलायत सरकाराबरोबर युद्ध आरंभिलें, त्यामुळें अमेरिकेचा कापूस विलायतेंत जाण्याचा बंद झाला. ह्मणून तिकडच्या लोकांनीं मोठी हाकाटी केली. आणि कापसाच्या पुरवठ्याकरितां त्यांनीं हिंदुस्थानाकडे दृष्टी वळविली. हिंदुस्थानचा कापूस विलायतेंत जाऊं लागला. तरी तुटवडा कांहीं चांगल्या रीतीनें भरून निघेना. हिंदुस्थानच्या ज्या ज्या भागांत कापसाची पैदास्त होत असे, तिकडून कापूस मुंबईस येऊन पडे. व मुंबईहून

तो विलायतेंत रवाना होई. कापसाच्या व्यापाराला तेजी एवढी आली कीं, ह्या सत्रांत इकडील लोकांनीं आपले बिछानें, गिरद्या वगैरे विकून पैसा केला. दोन प्रहरीं यजमान कामावर गेले ह्मणजे बायकांनीं घरांतल्या गिरद्या वगैरे विकून पैसा करून त्याचे आपल्या अंगावर चार दागिने केले. याप्रमाणें कापसाला फार किंमत येऊं लागली.

आतां, सदरहू भरणीचें मोठ्या खर्चाचें काम करण्यास खुद्द सरकारापाशीं पुरेसा पैसा नव्हता. म्हणून शेअर्स काढले जाऊन खाजगीरीतीनें सदरहू काम पुरें करणें हाच मार्ग खुला राहिला. पुढें १८५९ **एल्फिन्स्टन लँड प्रेस** कंपनी अस्तित्वांत येऊन तिला शहराच्या उत्तरेकडील भाग भरणी टाकून भरून काढण्याची परवानगी दिली. सदरहू कंपनीनें वरील काम उत्तम रीतीनें तडीस नेलें. त्यावरून सरकारानें ब्याकबे कंपनीला सदरहू कंपनीपेक्षां कांहीं अधिक सवलती देऊन ब्याकबे म्हणजे शहराचा पश्चिम किनारा भरून काढण्याची परवानगी दिली. तिची हकिकत अशीः—

बी. बी. सी. आय. रेल्वे कंपनीचें टर्मिनस स्टेशन प्रथम ग्रांटरोड येथेंच होतें. तें सरकारी ठरावान्वयें कुलाब्यास आणावयाचें होतें. सरकारानें कंपनीस जागा देण्याची हमी घेतली होती. टर्मिनस स्टेशन कुलाब्यास आणण्याचें भारी काम एकट्या रेल्वे कंपनीच्या आवांक्याबाहेरचें होतें. ह्मणजे झेंपण्यासारखें नव्हतें. कारण भरणी घालण्यास आतोनात द्रव्यसहाय हवें होतें. परंतु व्यापाराच्या सोईकरितां जेणेंकरून रेल्वेचा फांटा कुलाब्यापर्यंत जितकी त्वरा करून आणतां येईल, तितका पाहिजेच होता. कारण वर ह्मटलेल्या अमेरिकन सिव्हिल वॉरमुळें अमेरिकेंतून इंग्लंडला—लँक्साशायर—जाणारा

कापूस बंद झाल्यामुळें विलायतेंत ह्या संबंधानें मोठी चळवळ उडाली. तेव्हां विलायतेच्या व्यापाऱ्यांची गरज भागविण्यास हिंदुस्थानांतील कापूस विलायतेस पाठविण्याची तजवीज व्हावी, असें हिंदुस्थान-सरकारनें ठरविलें आणि त्याप्रमाणें तिकडे हिंदुस्थानचा कापूस जाऊं लागला. त्यामुळें इकडल्या कापसास फारच तेजी आली, असें वर ह्मटलेंच आहे. मुंबईचे व्यापारी म्यान्चेस्टरचे व्यापाऱ्यांस हिंदुस्थानांतील कापसाचा पुरवठा करण्याच्या उद्देशानें चोहोंकडचा कापूस जमा करून तिकडे पाठविण्याकरितां आपापसांत वर्गणी गोळा करूं लागले. ह्यांत मि. **रुस्तमजी जमशेटजी जिजीभाई** हे अग्रगण्य होते.

सन १८६३ सालापर्यंत **अमेरिकन सिव्हिल वॉर** बराच वेळ चालेल, असें सर्वसाधारण धोरण होतें. आणि ह्मणून अमेरिकेचा कापूस इंग्लंडास पाठविणें अगदीं अशक्य होतें. त्यामुळें कापसाच्या अभावीं लँक्याशायरवाल्यांचेंही धाबें अगदीं दणाणून गेलें. या बनावावरून कापसाच्या पुरवठ्याकरितां विलायतेंतील लोकांचें सारें लक्ष हिंदुस्थानाकडे लागलें. असो.

याप्रमाणें हिंदुस्थानांतील अनेक प्रांतांतून येणारा सारा कापूस गँटरोड स्टेशनाच्या आवारांत येऊन पडे. आणि तिकडून बैलगाड्यांतून लांबच्या मार्गानें कुलाब्यास न्यावा लागे. त्यामुळें मुंबईच्या व्यापाऱ्यांस हें काम फार श्रमाचें, वेळेचें, जबाबदारीचें आणि मुख्यत्वेंकरून मोठ्या खर्चाचें वाटूं लागलें. याकरितां ग्रांट-रोडपासून कुलाब्यापर्यंत रेल्वेचा फांटा नेण्याविषयींची खटपट जारीनें सुरू झाली. सरकारनें **बी. बी. सी. आय. रेल्वे कंपनीनें** हें काम त्वरित सिद्धीस नेण्याबद्दल तिचा अगदीं पाठपुरावा घेतला. परंतु हें काम अति-शय खर्चाचें असल्यामुळें रेल्वेकंपनीखेरीज इतर खासगी कंपनीकडून

मदत मिळाल्याशिवाय तडीस जाणें जवळ जवळ अशक्यच होतें. या खेरीज करारपत्रान्वयें सरकारानें रेल्वे कंपनीस देऊं केलेली जागा तरी कोठें होती ! कारण ह्याच सुमारास जमिनीची किंमत अतिशय वाढली होती. त्याचप्रमाणें प्रत्येक जिनसेवर, मग ती रोजच्या उपयोगाची असो, अगर सुखाची अगर ऐषआरामाची असो, जबरदस्त महागाई बसली.

पुढें पुढें तर परिस्थिति पर्यायानें अधिकच बिकट होत गेली. १८५७ चे सालानें हिंदुस्थानची कशीकाय दुर्दशा उडविली, हें सर्वांस महशूर आहेच. त्यामुळें दयाळू इंग्रजसरकाराला द्रव्याच्या बाबतींत न भूतो न भविष्यति झीज सोसावी लागली. म्हणून द्रव्याच्या अभावीं रयतेच्या हिताचीं बहुतेक कामें कांहीं काळपयर्त तहकूब ठेवणें सरकारास निरूपायानें भाग पडलें. इतक्यानेंच सर्व संकटपरंपरेची पूर्तता झाली नाहीं.

बंडाची वावटळ निघून गेल्यावर पुढें ३-४ वर्षांच्या अवधींत सरकारास ह्या बाबतींत जवळ जवळ २८ कोटींचा चट्टा बसला तो भरून काढण्यास इन्कमट्याक्स (प्राप्तीवरील कर) हा रयतेची तीव्र नाखुषी असतांही हिंदुस्थानांत प्रथमच अस्तित्वांत आला. सदरहू कर १८५८ चे धामधुमीचें साल संपल्यावर लगेच दुसरे वर्षीं म्हणजे १८५९ त सरकारानें बसविला. त्यामुळें जवळ जवळ सव्वासहा कोटींचें निव्वळ उत्पन्न सरकाराच्या पदरांत पडलें. तें वाढतां वाढतां १८६३ त साडे तेरा कोटीपर्यंत वाढलें.

यावरून पाहतां वाचकांस असें आढळून येईल कीं, जमिनीची अकटोविकट वाढलेली किंमत देऊन ती **बी. बी. सी. आय.** रेल्वे करितां खरेदी करण्याचें हिंदुस्थान सरकारास पसंत नव्हतें. तथापि

मुंबई सरकारचे (सर बॉर्टल् फ्रिअर) असें मत होतें कीं, ग्यारंटीड रेल्वेकंपनीच्या तत्वावर एखाद्या खासगी कंपनीचे खुद्द सरकारानें पातीदार होऊन हें भरणीचें बिकट काम तडीस न्यावें आणि याप्रमाणें जर सारी व्यवस्था झाली असती तर खात्रीनें ह्या कामांत खोट न बसतां उलट तें फार संतोषकारकरीतीनें तडीस गेलें असतें. आणि त्यामुळें सरकार व रयत या उभयतांचा ही निःसंशय मोठा फायदा झाला असता.

असो, पुढें **बी. बी. सी. आय. रेल्वेचे** इन्जिनीअर व म्यानेजिंग एजंट यांनीं प्रसिद्ध **रिची स्टुअर्ट कंपनीचे** वरिष्ठ पातीदार मि० **मायकेल स्कॉट** यांजबरोबर दळणवळण सुरू करून एक कंपनी काढण्याविषयीं त्यांचे करारमदार झाले. आणि अखेरीस १८६३ च्या सप्तेंबर महिन्यांत **बॉंबे रेक्लमेशन कंपनी लिमिटेड** या नांवाची एक कंपनी स्थापन होऊन ती रजिस्टर झाली. मि० **कावसजी जहांगीर, प्रेमचंद रायचंद, वॉल्टर क्यासल्स** आणि मि० **गाल्व्हिन स्टील** हे तिचे मुख्य पातीदार असून तिच्या पुरस्कर्त्यांपैकीं होते. याप्रमाणें पूर्वीच्या ठरावानुरूप सदरहू भरणी घातल्या जाणाऱ्या जमिनींपैकीं, एक पंचमांश जमिनीचे सरकार पातीदार होणार होतें. त्या अन्वयें **बॉंबे रेक्लमेशन स्कीम** कंपनीच्या पुरस्कर्त्यांनीं सरकारास प्रत्येकीं १०,००० रुपयांचा एक एक शेअर, असे दोनशें शेअर्स घेण्याची विनंति केली. पण वर लिहिल्याप्रमाणें स्टेट सेक्रेटरीनें व हिंदुस्थान सरकारानें प्रथमच नको म्हटल्यामुळें सदरहू शेअर्स न विकतां तसेच राहिले. पुढें ते शेअर्स अखेरीस जाहीर लिलावानें एक कोटी पंचवीस लक्ष रुपयांस विकले गेले.

याप्रमाणें शेअर्स विकण्याची सट्टेबाजी सुरू झाली. तिच्या

विक्रीपासून वसूल झालेल्या पैशांपैकीं ह्मणजे जवळ जवळ ९१ लक्ष रुपये **बॉंबे रेक्लमेशन कंपनीनें एशियाटिक ब्यांकेंत** अनामत ठेविले. याप्रमाणें सर्व व्यवस्था झाली पण पुढें काल प्रतिकूळ आल्यामुळें **बॉंबे रेक्लमेशन कंपनीचे** दिवस फिरले आणि उभारलेली इमारत एकाएकी ढांसळून जमीनदोस्त झाली. त्यामुळें ज्यांनीं ज्यांनीं ह्मणून तिचे शेअर्स सट्यानें विकत घेतले होते, ते सर्वजण एका क्षणांत लाख्याचे भिके झाले. त्याबद्दलचीं कारणें व तिच्यासंबंधाची थोडीशी हकिकत लिहून हा भाग संपवूं.

आधीं प्रथम हिंदुस्थानसरकारनें स्टेट सेक्रेटरीच्या सांगण्यावरून कंपनीच्या अंगिकारलेल्या कृत्यास आपला हातभार लावण्याचें नाकारिलें. हा कंपनीस ' प्रथमग्रासे माक्षिकापात ' झाला. **अमेरिकन सिव्हिल वॉर**—युद्ध—जी फार दिवस चालेल असें वाटलें होतें, ती उभयराष्ट्रांत समजी झाल्यामुळें एकदम थांबली. त्यामुळें काय झालें कीं, लढाईमुळें अमेरिकेचा कापूस विलायतेस जाण्याचा जो बंद झाला होता, त्याची लढाई थांबल्यामुळें निर्गत विलायतेस पुन्हा सुरू झाली. त्यामुळें हिंदुस्थानच्या कापसाला विलायतेचे व्यापारी विचारीनातसे झाले. म्हणून इकडल्या कापसाच्या व्यापाराला अजिबात खो बसला आणि पुष्कळ कापसाचे व्यापारी निर्धन झाले. ह्मणून मुख्यत्वेंकरून ज्यांच्या सोईकरितां ब्याकबेच्या खाड्यांत भरणी टाकून त्यावरून रेल्वेलाईन कुलाब्यापर्यंत आणावयाचा जो मुख्य मतलब होता, तो बऱ्याच अंशीं ढांसळला.

ह्या एवढ्याच गोष्टीवरून कंपनीच्या दुर्दैवाची पूर्णता झाली नाहीं. त्यांत आणखी एका गोष्टीची भर पडावयाची होती. ती ही कीं, ज्या **एशियाटिक ब्यांकेंत** कंपनीनें आपली ९१ लक्षाची ठेव अनामत

ह्मणून ठेवली होती, त्या बाईनें आपलें दिवाळें काढून आपल्या काखा वर केल्या. त्यामुळें तें अगदीं कंपनीच्या जिव्हाग्रीं बसलें व आजपर्यंत कंपनीनें एवढे परिश्रम करून जी गोष्ट इतक्या स्वरूपाला आणली होती, तिचा व्यूह एकदम ढांसळला. ह्मणून कंपनीच्या नाड्या बंद पडल्या.

झालें ! इतक्या जेव्हां गोष्टी **बॉंबे रेक्लमेशन कंपनीस** प्रतिकूळ झाल्या, तेव्हां तिची इतकी वाताहात झाली, त्यांत नवल तें कोणतें ! ! दैवदुर्विपाकानें कंपनीवर आपला पूर्ण पगडा बसविला ! नव्हे ! ! मुंबईतल्या धनिकांवर पूर्ण साडेसाती बसली आणि ता० १८ नोव्हेंबर १८६६ सालीं कंपनीनें अखेरचा राम म्हटला ! !

ह्या वरील सट्टेसत्रांत मुंबईच्या इतर धनिकांप्रमाणें खुद्द **नानांचें** बरेंच मोठें भांडवल गुंतून राहिलें होतें, त्यास **ब्याकबेच्या खाड्यांत** पूर्णाहुति मिळाली. त्याची कल्पना वाचकांस अंशतः होण्यास इतकें सांगितलें म्हणजे पुरे कीं, **नानांस** वरील सत्रांत एकंदर ३२ लक्षांचा खो बसला. त्यांपैकीं **नाना** हयात असेतोंपर्यंत त्यांनीं कंपनीचे जसजसे कॉल—मागणी—आले, तसतसे एकंदर २२ लक्ष रुपये भरले आणि ता० ३१ जुलई सन १८६९ रोजीं **नानांचा** काळ झाल्यावर त्यांचे चिरंजीव **श्रीमंत विनायकराव** यांनीं पुढें १० लक्षांची फेड केली, असा लोकप्रवाद आहे. इतकी संपत्ती घरांत राहती, तर किती चांगलें झालें असतें ! ! पण भवितव्यापुढें इलाज नाहीं, आणि होणार गोष्टी कांहीं चुकत नाहींत ! ! !

हें **ब्याकबे रेक्लमेशन** प्रकरण संपविण्यापूर्वीं एका गोष्टीचा या ठिकाणीं उल्लेख केल्याशिवाय आमच्यानें रहावतच नाहीं. ती गोष्ट

ही कीं, ब्याकबे रेक्लमेशन कंपनीच्या रंगभूमविर मुख्य पात्राची भूमिका ज्यानें आणली, ते प्रसिद्ध **शेट प्रेमचंद रायचंद** हे होत. ह्यांचा व्यापारीपेशा असे. पण पुढें दलाली करूं लागले. त्यांत त्यांचा उत्तम जम जमला. तो इतका कीं, ते केवळ दलालांचे व शेरबाजाराचे राजे बनले. ह्याची कल्पना बरोबर व्हावयास इतकें ह्मटलें ह्मणजे पुरे कीं, **राजा बोले आणि दळ हाले** अथवा **प्रेमचंद बोले आणि व्यापार चाले.** त्यांचें धैर्य, त्यांचें धोरण, त्यांची महत्वाकांक्षा आणि त्यांचा खटाटोप अती लोकविलक्षण होता. बाजारांत त्यांच्याशिवाय पान हालूं नये. नुसत्या त्यांच्या शब्दांवर मुंबई ब्यांकेत दररोजची लाखो रुपयांची घडामोड चाले. पुढें त्यांनीं व्यापारवर्धनाच्या सबबीवर सट्टेबाजी सुरू केली. पण पुढें त्यांना काळ प्रतिकूळ झाल्याबरोबर त्यांच्या मनोराज्याचा डोल्हारा एकदम खालीं आला. आणखी त्यामुळें ते आपण स्वतः दैवदुर्विपाककूपांत पडून आपणाबरोबर इतर असंख्य निरपराधी प्राण्यांस ओढून घेतलें. आणि त्यामुळें त्यांस हाय हाय करावयास लाविलें ! !

वरील गोष्टींवरून **नानां**च्या ठिकाणीं किती अमोल गूण एकत्र वसत होते, हें समजून येईल. ज्याच्यामुळें **नानां**विषयीं पुढें मोठा बोलबाला झाला, त्या कौतुकप्रचुर गोष्टींच्या अवलोकनानें आमच्या प्रिय वाचकांचें आत्मरंजन तर होईलच, परंतु एकाप्रकारें सदरहू गोष्टी बोधपर व ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत, अशी त्यांची खातरी होईल. म्हणून आम्हीं म्हणतों कीं, **नाना** हे केवळ साधारण माणूस नसून कोणी तरी ईश्वरीप्रसादांतले एक अद्वितीय पुरुष होते, असें आमच्याचसें काय, पण साऱ्या जगाच्या निदर्शनास त्यांनीं आणून दिलें.

भाग विसावा

समारोप

प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ ज्यानें केला ।
तो नर भला भलारे ! भला भला !

शिवदिनकेसरी.

रिद्धिसिद्धि ह्या ज्यांनीं आपल्या दासी करून ठेविल्या आहेत, ते पुरुष भाग्यवान् व धन्य होत. पण अशा प्रकारचीं माणसें फार क्वचित निर्माण होतात. खंडीमध्यें पावरती ! गरीब कुळांत जन्म घेऊन पुढें जे आपल्या पराक्रमानें उदयास येतात, ते वंदनपात्र होतात, परंतु ह्यांत फारसें आश्चर्य नाहीं. कारण जे गरिबाचे श्रीमंत होतात, त्यांस आपली मागची स्थिति आठवून पुढील क्रम सुधारण्यास चांगली सवड सांपडते. आपली दिशा कोठें चुकत आहे, हें त्यांस चटकन् समजतें. पण जो मुळचाच गर्भश्रीमंतींत वाढला, त्यास वरील स्थितीची कल्पना न होतां तो बहुतेक आळशी, अक्कलशून्य, स्वच्छंदी आणि मूर्ख असा बनतो, असें आपल्या हरघडीस प्रत्ययास येतें. पण अशा तऱ्हेचीं माणसें बहुधा घरच्या मंडळीच्या फाजील लाडानें व निष्काळजीपणानें बेमुरवत बनतात. त्यांस कोणत्याही प्रकारचा

आळा रहात नाहीं. मग जेव्हां तीं मोठीं वाढतात, तेव्हां वर ह्मट-ल्याप्रमाणें स्वेच्छाचारी व दुर्गुणी बनून आपल्या पूर्वज्यांच्या नांवा-लौकिकास काळिमा आणण्यास कारणीभूत होतात. तात्पर्य काय कीं, गर्भश्रीमंतींतलीं मुलें बहुतकरून पुढें वाईट निपजतात, असें दाखविण्याचाच आमचा प्रयत्न आहे.

परंतु आमच्या चरित्रनायकाविषयीं अगदीं उलट स्थिति होती. **नाना** हे सातानवसांनीं जन्मले असल्याकारणामुळें ते स्वाभाविक आपल्या वडील माणसांचे अगदीं लाडके होते, हें निर्विवाद होय. तेव्हां त्यांस आपल्या ऐन तारुण्यांत बहकून जाण्याचा पुष्कळ अव-सर होता. परंतु ते कोणत्या तऱ्हेचे पुरुष होते आणि त्यांनीं नांव-लौकिक मिळवून ते कसे उदयास आले. आणि त्यांनीं आपली कीर्ति कशी अजरामर करून ठेविली आहे, हें सारें जगापुढें आहेच. तेव्हां त्यांच्या साऱ्या चरित्राचा आढावा काढून त्याचें काय तात्पर्य निघतें तें आपण पाहूं.

दुसऱ्या भागांत वर्णन केल्याप्रमाणें **नानां**चे पूर्वज ठाणें जिल्हांत शहापूराजवळ कसबें **मुरबाड** नांवाचा तालुक्याचा एक गांव आहे, तिकडचे मुळचे राहाणारे होते. त्या वेळेच्या सुमारास महाराष्ट्रांत श्रीमंत पेशव्यांची सत्ता प्रचलित असून **मुरबाड** हा गांव त्यांच्याच अमदानीपासून भरभराटीस आलेला होता. त्यावेळीं तिकडे व्यापाराची मोठी घडामोड होत होती. लोकही चांगले सुखसंपन्न होते. ह्याचीं अनेक कारणें आहेत. वरील प्रांत मोठा सुपीक असून गांवाच्या आसपास शेत व माळजमीन अफाट आहे. परसांत अनंत आकाश व तिनही बाजूला प्रसिद्ध सह्याद्रीपर्वताची रांग असून त्याच्या पाय थ्याशीं **मुरबाड** हा गांव वसलेला आहे. आजूबाजूच्या प्रदेशांत व

वनश्रीची नैसर्गिक व नयनमनोहर शोभा अगदीं अप्रतिम आहे. सह्याद्रीवर दिव्यवनस्पतींची पूर्ण संपन्नता असून त्याचा परिणाम तिकडच्या रहिवाशांवर झालेला आहे. हवा निरोगी व उत्कृष्ट असून पाणी मधुर व पाचक आहे. एवढ्या परिस्थितीस लोकांची शरीरसंपदा सदृढ व निरोगी असे. लोक बहुधा व्यापारीपेशांतील असून खाऊन पिऊन सुखी असत.

हवा, पाणी, व्यापारवृद्धि आदिकरून अनुकूल परिस्थितींत लोक सुखासमाधानाचा आणि शरीरसंपदेचा सुखानुभव घेत असतील, यांत नवल तें कोणतें. **नानां**च्या पूर्वज्यांवर लक्ष्मीची पूर्ण कृपा होती. व ती पुढें पुष्कळ काळपर्यंत तशीच कायम राहिली, ही गोष्ट सर्वांस महशूर आहेच. अर्थात त्यांच्या घराण्यांतील प्रत्येक पुरुष सतेज, सुंदर, कर्तबगारी, कुटुंबाभिमानी व ईश्वरभक्तिपरायण निपजला. **बाबुलशेट**च्या आधींच्या पुरुषांबद्दल आम्हांस या प्रसंगीं अधिकउणें कांहीं एक लिहितां येत नाहीं. परंतु खुद्द **बाबुलशेट**पासून पुढें चारही पिढ्यांतील पुरुष शरीरसंपदेंत, लौकिकांत, व कर्तबगारींत सरसच निपजले. कारण त्यांच्या घराण्याची मूळची राहणीच उत्कृष्टतऱ्हेची होती. ह्याच कुटुंबांत **नानां**सारखा कुलदीपक पुरुष जन्म पावून त्यांनी तें धन्य केलें. आणि इतरांनीं त्यांचें-चरित्र लिहिण्यासारखी कृती करून ठेविली, हा त्यांच्या कुटुंबावर ईश्वरीप्रसादच होय, यांत तिलप्राय शंका नाहीं. कारण, तसें नसतें तर तिसऱ्या भागांत वर्णन केल्याप्रमाणें **नानांचे** आजे **बाबुलशेट** यांस, त्यांच्या कुटुंबांत एक कुलदीपक पुरुष निर्माण होण्याबद्दल आशीर्वाद देण्याची एका महंतास स्फूर्तीच झाली नसती. **नानांचा** जन्म होण्यापूर्वीं ते मातेच्या उदरांत बारा वर्षेंपर्यंत गर्भवास उपभो-

गीत होते आणि जन्मास आल्यावर त्याचें उटें, त्यांनीं पुढें मोठमोठीं लौकिकाचीं कामें करून भरून काढलें आणि आपल्या मातेची कूस धन्य करून ते कुलावतंस झाले.

नानांचे तीर्थरूप **शंकरशेट** हे जेव्हां आसन्नमरण झाले व आतां आपल्या जीविताची आशा राहिली नाहीं, असें त्यांस वाटलें, तेव्हां वडिलांच्या नात्यानें त्यांनीं आपलें कर्तव्य, वडिलांस उचित, असेंच पूर्णरीतीनें बजाविलें. त्यांनीं **नानांस** जवळ बोलावून त्यांस प्रेमळ उपदेश केला. आणि **नानांनीं** तो लक्ष्यांत वागवून आपलें वर्तन त्याप्रमाणें ठेविलें, आणि "सुपुत्र" या शब्दाची इतिसार्थकता केली. वडिलांनीं जें त्यांस बाळकडू पाजलें होतें, त्याचा इष्ट परिणाम पुढें झालाच. कारण **नानांनीं** सार्वजनिक कामांत पडून जी कामगिरी बजाविली, त्यामुळें स्वाभाविक ते प्रतिभासंपन्न झाले, असें त्यांच्या चरित्रावरून सहज दिसून येतें.

सन १८१८ चें धामधुमीचें साल संपल्यावर सर्वत्र शांतता नांदूं लागली आणि इंग्रज सरकारानें लेकहिताच्या कामाकडे आपली दृष्टी वळविली. त्या सुमारास मुंबईइलाख्याचे लोकप्रिय गव्हर्नर **माउन्ट-स्टुअर्ट एलफिन्स्टन** हे अधिकारापन्न होते, हें इतिहासज्ञांस अवगत आहेच. त्यांनीं रयतेच्या सुधारणेस ज्या गोष्टी प्रथम हातीं घेतल्या, त्यांपैकीं विद्याभिवृद्धीची बाब हिला अग्रस्थान दिलें पाहिजे. शहरांतील प्रमुख व कर्त्या मंडळीस हाताशीं धरून नागरिकांस विद्यामृत पाजण्याचें पवित्र काम सरकारानें हातांत घेतलें. त्यांत **नाना** हे प्रमुख होते. त्या वेळेस **नानांचें** वय अवघें अठरा वर्षांचें होतें. ही गोष्ट फार लक्षांत ठेवण्यासारखी आहे. अर्थात मुंबई शहरांत विद्यादेवीच्या मंदिराची मुहूर्तमेढ प्रथम **नानांनीं** बसविली, हें कोणासही नाकबूल

करतां यावयाचें नाहीं, कारण ७७ पानावर बॉंबे नेटिव्ह स्कूलबुक अँड **स्कूलसोसायटी**च्या संस्थापनेसंबंधानें एके प्रसंगीं प्रसिद्ध आर्य-पुत्र **दादाभाई नौरोजी** यांनीं जे उद्गार काढले आहेत, त्यावरून वाचकांची खात्री होईल. आणि ह्याच वेळेपासून **नानांनीं** आपलें पाऊल जनहितपदाच्या मैदानावर टाकून त्यांनीं सार्वजनिक कामास आपणांस अखंड वाहून घेतलें, आणि तें व्रत त्यांनीं आमरणांत चालविलें.

वरील वर्णनावरून आमच्या वाचकांची खात्री झालीच असेल कीं, मुंबई शहरांत प्रथम विद्याभिवृद्धीचा उगम केव्हां व कसा झाला आणि त्यांत **नानांनीं** पुढाकार घेऊन त्यांस कसें नांवारुपास आणिलें. हा पूर्वीचा खरा इतिहास अलीकडच्या पिढीस माहीत असणें शक्य नाहीं. पण त्यामुळें खऱ्या वस्तुस्थितीचा लोप झाला असून कांहीं कांहीं मंडळीचा त्या संबंधानें निरर्थक गैरसमज झालेला दिसत आहे. असो.

पुढें दोन वर्षांनीं ह्मणजे सन १८२४ त **बॉंबे नेटिव्ह स्कूल बुक अँड स्कूल सोसायटी** या संस्थेचें **बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी** यांत रूपांतर झालें. ही ही विद्याविषयक संस्था असल्या-कारणामुळें प्रमुखपणा पत्करून तनमनधनें करून हिचें **नानांनीं** चांगलें संपोषण केलें. त्यानंतर अनुक्रमें सन १८२७ त **एल्फि-न्स्टन फंड**; सन १८३७ त **बोर्ड ऑफ एज्युकेशन**, सन १८४९ त **स्टूडण्टस् लिटररी अँड साएन्टिफिक सोसायटी**, सन १८५६ त **डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रकशन** वगैरे सारख्या विद्यावृद्धीविषयक व लोकोपयोगी संस्था अस्तित्वांत आल्या. त्या सर्वांत **नानांनीं** पुढाकार घेऊन त्यांस बरेंच द्रव्यसाह्य

केलें. याखेरीज **जगन्नाथ शंकरशेट मुलींची शाळा** आणि **धि जगन्नाथ शंकरशेट फर्स्टग्रेड अँग्लो व्हर्न्याक्युलर स्कूल** ह्या मुलांमुलींच्या दोन स्वतंत्र शाळा स्वखर्चानें मोठ्या हौसेनें चालविल्या. त्यांपैकीं मुलींची शाळा **नानांच्या** वाड्याच्या आवारांत त्यांच्या गादीवर हल्लीं विराजमान असलेले **श्रीमंत रावजी विनायकराव जगन्नाथ शंकरशेट** यांनीं स्वखर्चानें अद्यापपर्यंत चालविली आहे व दुसरी ह्मणजे मुलांची शाळा **श्रीमंत रावजीशेट** यांच्या कैलासवासी मातुश्री गं. भा. **लक्ष्मीबाई** ह्यांनीं मातापुत्राच्या भांडणांत असंख्य द्रव्याचा अपव्यय केला, त्याच्यापायीं खालावल्यामुळें निरुपायानें बंद करावी लागली. भवितव्यता !!

वरील विद्यावृद्धीचें प्रकरण संपविण्यापूर्वीं ज्या ज्या विद्वान् पुरुषांनीं **नानांस** उणीअधिक मदत केली, त्यांचा या प्रसंगीं नामनिर्देश केला नाहीं, तर आमचे पदरीं अनुदारपणाचा दोष येईल. वर ह्मटलेल्या गृहस्थांत **सदाशिव काशीनाथ छत्रे, बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर, हरि केशवजी, दादाभाई नौरोजी, नारायण दिनानाथजी,** डा० **भाऊ दाजी, दादोबा पांडुरंग, विश्वनाथ नारायण मंडलीक,** डॉ० **उइल्सन** ही मंडळी प्रमुख होती.

विद्यावृद्धीच्या कामगिरीखेरीज तिच्याच बरोबरीनें राजकीय व सार्वजनिक कामांत—पुढाकार घेऊन **नानांनीं** जी लोकसेवा बजाविली, ती फार अमोल आहे. सरकारास काय किंवा **लोकांस** काय, उभयपक्षासही राजी ठेवून उभतांकडून धन्यवाद घेतले, हें सर्वविश्रुत आहेच. '**ग्रांट ज्यूरी, सती प्रकरण, जस्टिस आफ् धि पीस, पेटी सेशन, म्युनिसिपालिटी, बॉंबे असोसिएशन, रॉयल एशियाटिक सोसायटी, जिऑग्रफिकल सोसा-**

यटी, व्हिक्टोरिया आलबर्ट म्युझियम, फ्रामजी कावसजी इन्स्टिटयुट, जी. आय. पि. रेल्वे, वगैरे अनेक संस्थांत **नानांनीं** ह्मटून काय काय कामें केलीं, याबद्दलचें साद्यंत वर्णन दहाव्या भागांत येऊन गेलेंच आहे. तेव्हां त्या संबधानें या ठिकाणीं पाल्हाळ करण्याचें प्रयोजन नाहीं. कारण त्या साऱ्या गोष्टी वाचकांच्या दृष्टीसमोर आहेतच.

विद्यावृद्धि आणि राजकीय व सार्वजनिक या कामांखेरीज तितक्याच योग्यतेचीं परोपकाराचीं व धार्मिक कामें तितक्याच आस्थेनें व कळकळीनें केलीं. त्याबद्दलची सविस्तर हकिकत अकराव्या भागांत येऊन गेलीच आहे. म्हणून त्यासंबंधानें इकडे पुनरावृत्ति करण्याची आम्हास आवश्यकता वाटत नाहीं. तात्पर्य **नानांच्या** अवघ्या ६३ वर्षांच्या हयातींतील पहिलीं ह्मणजे बाळपण व मध्यम स्थिति या अवस्थांचीं अठरा वर्षें वजा जातां बाकी राहिलेलीं ४५ वर्षें पर्यंत **नानांनीं** बजावलेली कामगिरी लक्षांत आणतां एका व्यक्तीच्या हातून एवढ्या अवधींत इतके दीर्घ परिश्रम झाले, आणि त्यामुळें महत् लोककल्याण झालें, हें पाहून मन आश्चर्यानें थक्क होऊन जातें आणि असें ह्मणणें भाग पडते कीं, **नानांवर** केवळ ईश्वरीकृपाच होती. इतकेंही ह्मणून आमच्या मनाची तृप्तता होत नाहीं. तर **नाना** हे केवळ ईश्वरांश होते, असें ह्मणणें वावगें व धाडसाचें होणार नाहीं, असें आह्मास वाटतें.

नानांचा लोकमान्य पुढारीपणा, त्यांची लोककल्याणलालसा, त्यांची इभ्रत, त्यांनीं उत्तम बजाविलेली कामगिरी इत्यादि गोष्टी ध्यानांत आणून सन १८६१ त त्या वेळचे गव्हर्नर **सर जार्ज क्लार्क** यांनीं **नानांस** आपल्या **लेजिसलेटिव्ह कौन्सिलचे** ह्मणजे कायदेकानू करणाऱ्या मंडळीचे सभासद नेमून त्यांचा

मोठा गौरव केला. एतद्देशीय लोकांपैकीं जे प्रथम कौन्सिलांत चौघे गृहस्थ निवडून आले, त्यांत **नाना** प्रमुख होते. त्यांनीं कौन्सिलांत बजाविलेल्या कामगिरीचा साद्यंत इतिहास वाचकांपुढेंच आहेच. तेव्हां त्यासंबंधानें याप्रसंगीं अधिक उल्लेख करणें इष्ट नाहीं. तथापि, **नाना** कांहीं वर्षें आणखी जगते, तर त्यांनीं याहीपेक्षां लोकहिताचीं पुष्कळच कामें निःसंशय केलीं असतीं, हें कोणासही नाकबूल करतां यावयाचें नाहीं. कौन्सिलांत कामकरीत असतां त्यांची धूर्तता, त्यांचें वजन, त्यांचा निभिडपणा, त्यांची दूरदृष्टि, लोकहिताची बाजू राखण्याची त्यांची सदिच्छा, वादविवादप्रसंगीं प्रतिपक्षाबरोबर भाषण करतांना त्यांचा कोटिक्रम, त्यांचें कायद्याचें परिज्ञान, इंग्रजी भाषेवरील त्यांचें प्रभुत्व इत्याद्यनेक गोष्टी मनांत आणल्या म्हणजे असेंच म्हणावें लागतें कीं:—**नाना** हे कांहीं साधारण कोटींतले माणूस नसून इतर माणसांपेक्षां त्यांच्यात कांहीं विशेष गुण होते. म्हणजे वर म्हटल्याप्रमाणें त्यांच्यावर पूर्ण ईश्वरीप्रसाद होता, यांत संशय नाहीं, कौन्सिलच्या सभांत त्यांनीं आपणावर कोणाचेंही तेज पडून दिलें नाहीं. पण उलट त्यांनीं इतर सभासदांवर आपली छाप बसविली. स्वतंत्रेचा महिमा असाच आहे ! ।

कायदेकौन्सिलांत नानांनीं लोकहिताचीं पुष्कळच कामें केलीं, पण ज्यामुळें त्यांचें नांव आज त्रिखंड गाजत आहे, तें **स्मशानभूमीप्रकरण** होय. त्याबद्दलचें सविस्तर वर्णन चवदाव्या भागांत येऊन गेलेंच आहे. त्या एकाच प्रकरणावरून **नानांचीं** कीर्ति अजरामर होऊन राहिलेली आहे. गरीबगुरीब लोकांस हल्लींच्या काळीं, **नानाशंकरशेट** हे कोण होते, याविषयीं फारसी माहिती नसेल. परंतु **नानांनीं** आपल्या कर्तबगारीनें राखलेल्या **स्मशानभूमी**बद्दल बोलतांना

नानाचें सोनापूर किंवा **नानाची वाडी** असेंच बोलतात. आणि आम्ही म्हणतो कीं, **नानां**च्या अवघ्या कर्तबगारीबद्दल जर त्याचें कांहीं स्मारक असेल, तर मुंबईची **स्मशानभूमि** हेंच त्याचें स्वयंसिद्ध स्मारक होय.

आपल्या अमदानींत म्हणजे ४९ वर्षांच्या अवधींत लोकहितोपयोगी जीं कामें **नानां**नीं केलीं, आणि सरकारास अनेक बाबतींत योग्य सल्ला मसलत देऊन मदत केली, त्यामुळें त्यांनीं लोकांकडून धन्यवाद घेतलेच आणि दयाळू सरकारची पूर्ण कृपा संपादन केली. हें तर झालेंच. पण ह्या साऱ्या गोष्टींबद्दल त्यांचें अंशतः उतराई होण्याच्या उद्देशानें बुधवार ता. ९ मार्च १८६४ रोजीं मुंबईच्या टौनहॉलांत नागरिकांनीं मोठी प्रचंड सभा भरवून **नानां**चा एक संगमरवरी दगडाचा पुतळा उभा करण्याचें ठरविलें आणि त्याबरहुकूम विलायतेहून एक पुतळा घडवून आणून तो टौनहॉलांत ठेविला आहे. याप्रमाणें लोकांनीं आपली कृतज्ञता प्रदर्शित केली आहे. मरहूम **सर जमशेटजी जिजीभाई बाटलीवाले**, पहिले ब्यारोनेट यांच्या पाठीमागून त्या त्या व्यक्तीच्या जिवंतपणीं अशाप्रकारचा पुतळा उभा करण्याचा मान **नानां**स मिळाला, ही गोष्ट कौतुकप्रद व ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

सार्वजनिक कामांत पडल्यापासून उत्तरोत्तर **नानां**ची भरभराटच होत गेली. आणि त्यामुळें त्यांचें वैभव वाढत गेलें. तें इतकें कीं, शेवटीं त्यांच्या वैभवाचा अगदीं कळस झाला. त्यांस योग्य मानपान मिळत गेला. मोठमोठे सरकारी अमलदार, नामदार गव्हर्नर साहेब वगैरे सरकारी अधिकारीमंडळ यांपासून तों मोठमोठे राजेरजवाडे संस्थानिक, सरदारलोक ह्यांपर्यंत **नानां**चा वेळोवेळीं सन्मान होत

गेला. त्या वेळचे मुंबईइलाख्याचे गव्हर्नर नेकनामदार **सर बॉर्टल फ्रिअर** यांच्याशीं तर **नानां**चा अत्यंत स्नेह होता. ना. गव्हर्नर-साहेब **नानां**ची हरएकबाबतींत सल्लामसलत घेत होते. आणखी इतर बाबतींतही **नानां**चा शब्द वांया जात नसे. इतकें गव्हर्नरसाहेबांजवळ **नानां**चें वजन असे. खुद्द विलायतेच्या आपल्या परमपूज्य कैलास-वासी **व्हिक्टोरिया महाराणीसरकारा**पर्यंत त्यांच्या नावाचा डंका पोंहोचला. आह्मांस खात्रीलायक माहितीवरून असें कळतें व लोक-प्रवादही असाच आहे कीं, **नानां**ची कीर्ति खुद्द **महाराणीसरकारा**-पर्यंत जाऊन **नानां**च्या अवघ्या कामगिरीबद्दलचा ह्मणून मोबदला त्यांस अत्युच्च मानाची व वैभवाची अशी "**सर**" ही पदवी बहाल करण्याच्या उद्देशानें इकडे पाठविली होती. पण ईश्वरीयोजना कांहीं निराळीच होती. ती ही कीं, सदरहू पदवी इकडे **नानां**स समर्पण करण्यापूर्वींच दुर्दैवानें **नानां**चा अंत झाला, व पदवी जागचेजागींच राहिली. ही निरुपयाची गोष्ट होय !!

अठराव्या भागांत आख्यायिका या सदराखालीं दिलेल्या अनेक चमत्कारिक व बोधपर गोष्टींवरून **नानां**च्या ठायीं समयसूचकता, धूर्तता, प्रसंगावधान, धारिष्ट्य, शहाणपण, प्रसंगी वेळ मारून नेण्याची अजब कला इत्याद्यनेक बहुमोल गुण वसत होते. नव्हे ! वरील गुणांबद्दल जणू त्यांस बाळकडूच पाजलें होतें. ! ! एरव्हीचा प्रसंग असो, पण ऐन आणिबाणीचा प्रसंग **नानां**वर कदाचित् येऊन गुदरला, किंवा एखादें महत् संकट ठेपलें, तर अशा बिकटप्रसंगांतून अजीबात कसें बिनचूक निसटून जावें, ह्याचा धडा **नानां**कडूनच शिकावा. अशा संकटसमयीं **नानां**च्या अंतःकरणांत भीतीनें ठाव घेतला आहे, असें कधींच झालें नाहीं ! ! उलट पक्षीं अशा बिकट

प्रसंगांतून मोकळे होऊन इतर लोकांस त्यांनीं कैकवेळां आश्चर्य व कौतुक करण्यास लाविलें आहे. तात्पर्य **नानांची** बुद्धिमत्ता किती विशाळ होती हें सहज दिसून येईल.

हें झालें आख्यायिका किंवा ऐकीव गोष्टी अथवा दंतकथा यासंबंधाचें वर्णन! परंतु एकोणिसाव्या भागांत **नानांविषयीं ध्यानांत ठेवण्यासारख्या कांहीं गोष्टी** या सदराखालीं आलेल्या **नानांविषयीं** अनेकविध गोष्टींकडे अवलोकन केलें म्हणजे आपणांस सानंदाश्चर्य वाटून **नानांविषयीं** अत्यंत आदर व पूज्यभाव उत्पन्न होतो आणि ते एक आद्वितय पुरुष होऊन गेले, या गोष्टीची आपणास साक्ष पटते. वरील भागांत वर्णन केलेल्या इतिहासाकडे पाहतां **नानांमध्यें** विशाळ बुद्धिमत्ता, अलौकिक भूतदया, उदात्त विचार, परोपकारिक बुद्धि, अचल धैर्य, दूरदृष्टी आणि दुसऱ्यांचीं मनें लोहचुंबकासारखीं आपणाकडे ओढून घेण्याची अजब कला, इत्याद्यनेक बहुमोल गुणांचें **नानांच्या** ठिकाणीं जणूं एकीकरण झालें होतें, यांत तिळप्राय शंका नाहीं. इतके असंख्य गुण एका व्यक्तीच्या ठिकाणीं वसत असणें ही गोष्ट ईश्वरीकृपेशिवाय होणें नाहीं, असें आम्हास वाटतें.

उत्कृष्ट मानमरातब, लोकांकडून मोठा धन्यवाद आणि संपूर्ण वैभव उपभोगून **नानांनीं** आपला जीवनक्रम संपविला. आपल्या आयुष्यातील ६२ वर्षां इतका अवधि सत्कालपेक्षांत घालून लोक कल्याणाकडे प्रवृत्ति ठेऊन सार्वजनिक कामांत मग्न असतांना ऐन-रंगांत, जसा एखादा पक्षी पिंजऱ्यांतून भर्रदिशीं उडून जाऊन माल-कास चटका लावतो, तद्वत्‌च **नाना** आमच्यांतून एकाएकीं निघून गेले. आपलें आयुष्य कसेंतरी घालवून म्हातारपणीं काळमुखीं पडणें, ह्यांत कांहीं पुरुषार्थ नाहीं, हें कोणीही कबूल करील. पण ऐन उमेदींत

किंवा आयुष्याच्या भरभराटींत कां होइना ? देह सोडून लोकांस चटका लावणें हें पुष्कळ श्रेयस्कर होय ! ! **नर करनी करे तो नरका नारायन होय** या साधुवर्याच्या उक्तीप्रमाणें **नानांनीं** करून ते अखेरीस नारायणस्वरूपी झाले, आणि आयुष्यरूपी रंगभूमीवरील आपली भूमिका उत्कृष्ट तऱ्हेनें पार पाडली ! !

कोणत्याही माणसाची खरी योग्यता त्याच्या पश्चात् कळून येते आणि असें वाटतें कीं, हा प्राणी आणखी कांहीं वर्षें जगता तर बरें होतें ! आणि असें वाटणें अगदीं स्वाभाविक होय ! ! आमच्या म्हणण्याचें प्रत्यंतर पुढील उदरहणावरून कळून येईल. ता. ३१ जुलई १८६९ रोजीं **नानां**चा काळ झाल्यानंतर पुढें लगेच **नानां**चा ज्या ज्या संस्थाशीं कमीअधिक संबंध होता. त्यांनीं आपापल्या संस्थांतून **नानां**च्या मृत्यूबद्दल दुःखप्रदर्शनप्रसंगीं त्यांचे गुणानुवाद गाइले आहेत त्यावरून, कायदे कौन्सिलच्या पहिल्या बैठकींत, त्याचप्रमाणें इंग्रजी, मराठी, गुजराथी वगैरे वृत्तपत्रकारांनीं सानुकूल अभिप्राय दिले आहेत, त्यावरून वाचकांस **नानां**च्या अवघ्या आयुष्यक्रमाची खरी अटकळ करतां येईल. ह्या बद्दलचा उल्लेख पुढील ह्मणजे शेवटच्या भागांत अनुक्रमावर केलेला आहेच. त्यावरून **नाना** हे साधारण कोटींतले पुरुष नसून आमच्यांत एक अद्वितीय महाभाग होऊन गेले, असें सहज दिसून येईल. याचें कारण **नानां**च्या अवघ्या कुटुंबावर परमेश्वराची पूर्ण कृपा होती, असें वाटतें ! तात्पर्य ईश्वरीप्रसादावांचून पिढ्यानपिढ्या सारखी भरभराट चालणें केवळ अशक्य ! ! आणखी खुद्द **नानां**स वैभवाच्या अत्युच्च शिखरावर चढविण्यास आणि त्यांस सदैव आपल्या कृपाछत्राखालीं ठेवण्यास कारणीभूत काय तें त्यांचें आधिदैवत ओं[१] ! ! !

१ शंकर.

भाग एकविसावा.

नानाविषयीं लोक काय बोलतात.

सत्कर्मयोगें वय घालवावें ॥
सर्वांमुखीं मंगल बोलवावें ॥

रामदास

त्रस्त झालेल्या मनास विश्रांती ही अवश्य होय आणि ह्या भागाबरोबर आमच्या ग्रंथाचीही परिसमाप्ति झाली. आमच्या प्रिय वाचकवर्गास येथपर्यंत वाचनाचे श्रम दिले आणि बऱ्यावाईट गोष्टी त्यांजपुढें सादर केल्या, त्या त्यांनीं गोड करून घ्यावा आणि ते घेतीलच, अशी आह्मांस बळकट आशा आहे. हें सारें ठीकच झालें; पण **नानां**सारख्या पुण्यवान् पुरुषाचा जीवनक्रम लिहिण्यांत जो आमचा काळ गेला, तो फार सुखावह व आनंदमय गेला, आणखी ह्याच्यापेक्षां आह्मापाशीं अधिक साधन-सामुग्री असती व त्यामुळें **नानां**च्या चरित्राचा कांहीं अधिक भाग लिहिण्यास सांपडता, तर **नानां**च्या स्मृतिसमागमाचा अलभ्य लाभ आह्मांस घडता; पण त्यासंबंधानें आज आम्हां-पाशीं अधिक लिहिण्यास कांहीं नाहीं ह्मणून या ठिकाणीं आमच्या ग्रंथासंबंधानें लेखनव्यवसाय निरुपायानें पुरा करावा लागतो, ह्या-

बद्दल आह्मास परमावधीचें वाईट वाटतें. कारण साधुवर्य तुकारामबावाच्या वाणीनेंकां होईना, " पवित्र होईन चरित्र उच्चारें " ही हांव धरिली. कारण त्या पुराणपुरुषाच्या चरित्रकथनानें तरी आम्हास कांहींसा पुण्यांश प्राप्त होईल, अशा आशेंत आम्हीं होतों, पण आमची स्थिति " अपुरती बुद्धि पुण्य नाहीं गाठीं " याप्रमाणें झाली त्याला इलाज नाहीं. तथापि चार शिष्ट लोकांच्या सहवासानें " गाईन ओवीया शिष्टांच्या आधारें ॥ सारीन विचारें आयुष्या या " हें आपलें कतव्यकर्म जाणून **नानां**चें चरित्र गाइलें. ह्मणून त्या पुण्यपुरुषाच्या सहवासाचा जरी आह्मास प्रत्यक्ष लाभ घडला नाहीं, तरी त्याच्या अवघ्या जीवनक्रमाचा साद्यंत्य वृत्तांत लिहून तो जनसमूहापुढें सादर करण्याचें आह्मांस जें सामर्थ्य आलें, तीं सारी **नानां**च्या पुण्याईचींच फळें होत.

नानांच्या मृत्यूनंतर लगेच **कायदे कौन्सिलच्या** बैठकींत किंवा ज्या ज्या संस्थाशीं त्यांचा उणाअधिक संबंध होता, त्या त्या संस्थांच्या सभांतून **नानां**चे गुणानुवाद गाइले गेले, आणखी त्याचप्रमाणें त्या वेळच्या वृत्तपत्रांत **नानां**च्या अवघ्या अमदानीचे स्वल्पांत चरित्ररेखाटन केलें, त्यांतील भाषणांचें आणि लेखांचें अगदीं सारांशरूपानें सार देतों. त्यांवरून **नानां**विषयीं सरकारचा आणि लोकांचा अभिप्राय कसा काय होता आणि सरकार दरबारांत त्यांचा मानमरातब कसाकाय राखला जात होता, हें कळून येईल.

वास्तविक पहातां कोणत्याही मनुष्याची किंमत त्याच्या मृत्यूनंतरच वास्तविक पाहतां कळून येते, असा प्रकार नेहमीं दृष्टीस पडतो. त्याअन्वयें **नानां**चे पोवाडे लोकांनीं त्यांच्या निधनानंतर गाईलेच परंतु **नाना** हयात असतांनाच त्यांच्या चांगूलपणाबद्दल

आणि त्यांच्या अवघ्या चरित्रक्रमाबद्दल पुष्कळ बोलबाला झाला होता, हें सर्वविश्रुत आहेच; असो.

प्रथम मोठमोठ्या लोकांचे अभिप्राय देऊन नंतर वृत्तपत्रकारांचे विचार सादर करूं

कायदेकौन्सिलमध्यें झालेलीं भाषणें.

पुणें, ता० २ आगष्ट १८६५

नेकनामदार सर बार्टल् फ्रिअर,

जी. सी, एस्. आय; के. सी. बी; डी. सी. एल्. मुंबई इलाख्याचे गव्हर्नरसाहेब बहादुर यांचे भाषणाचा सारांश.

"**धि आनरेबल् मौउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन** गव्हर्नर साहेब बहादूरांपासून तो तहत हल्लींच्या सरकारापर्यंत मुंबई इलाख्याचे जे जे गव्हर्नर होऊन गेले, त्या सर्वांनीं **नामदार जगन्नाथ शंकरशेट**-बद्दल स्पृहणीय आदर ठेवला होता. जेव्हां एखादी नवीन गोष्ट प्रचारांत आणण्याचा सरकारचा विचार होई आणि त्यापासून जर रयतेचें अनहित होत असलें तर सरकारनें तन्निवारणार्थ काय उपाय योजावे, ह्याबद्दल **ना० जगन्नाथ शंकरशेट**ची सल्लामसलत, ते वयानें जरी अल्प होते तरी, अवश्य घेत जावी."

" **मि. मौउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन्** साहेबांनीं एतद्देशियांत विद्यावृद्धीचा प्रसार करण्यास केलेल्या प्रयत्नास **ना० जगन्नाथ शंकरशेट** यांची सल्लामसलत अत्यंत उपयोगी पडली आणि त्यांच्याशिवाय इतर गव्हर्नरांनीं एखाद्या महत्त्वाच्या बाबतींत लोकमत, किंवा लोकांचें हृद्गत काय आहे हें जाणण्याच्या उद्देशानें **ना० जगन्नाथ शंकर**-

शेट यांची अवश्य सल्लामसलत घेत जावी. याप्रमाणें गव्हर्नरांनीं एखाद्या खासगी गृहस्थाची सल्लामसलत घेणें, हे फार थोड्यांच्याच वांट्यास येतें. "

" रयतेच्या गरजा काय आहेत आणि ज्या गरजांबद्दल **ना० जगन्नाथ शंकरशेट** यांचीं पूर्ण सहानुभूति होती, ह्याची जरी सरकारास जाणीव होती तथापि **ना० जगन्नाथ शंकरशेट** हे सरकारचे विश्वासपात्र आणि वंदनपात्र असे मोठे दोस्त होते; कारण त्यांस हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या राज्यव्यवस्थेबद्दल पूर्ण आदर व सहानुभूति होती. "

" **सर जॉर्ज क्लार्क** यांनीं **ना० जगन्नाथ शंकरशेट** यांची खरी योग्यता जाणून त्यांनीं त्यांस आपल्या कायदेकौन्सिलचे पहिले नेटिव्ह सभासद नेमलें. त्यासंबंधानें त्यांनीं जी अमोल कामगिरी बजाविली, ती सर्वश्रुत आहेच आणि हल्लींच्या सरकारानेंही ती पूर्णपणें मान्य केली आहे. "

नामदार मि. एलीस्, कायदेकौन्सिलचे वरिष्ट सभासद यांचे भाषणाचा सारांश.

" **नामदार जगन्नाथ शंकरशेट** हे स्वजातियांचेच केवळ पुढारी नव्हते, तर अवघ्या हिंदुसमाजाचे मान्य पुढारी होते, आणि ह्या मानाचा त्यांनीं पुष्कळ वर्षेपर्यंत उपभोग घेतला. "

"मुंबई शहरांत **ना. जगन्नाथ शंकरशेट** पेक्षां कितीतरी पटीनें अधिक असे धनाढ्य लोक होते, तथापि **ना. जगन्नाथ शंकरशेट** यांसच हा बहुमान मिळण्याचें खरें कारण ज्या कामांत त्यांनीं मन घातलें, तें काम अगदीं अंतःकरणपूर्वक झटून आणि निश्चयानें करावयाचें आणि ह्यामुळेंच त्यांस अती उच्च पद प्राप्त झालें होतें."

"जेव्हां जेव्हां सरकारानें एखादी सार्वजनिक गोष्ट करण्याचें मनांत आणलें आणि जीमुळें रयतेच्या हक्काची पायमल्ली होत असली, तर त्या संबंधानें सरकार **ना. ज. शं.** यांचा अभिप्राय वारंवार विचारीत असे आणि तदनुसार आपली वृत्ति ठेवीत असे."

"कौन्सिलच्या बाहेर मुंबई सरकारचे **ना० ज० शं०** हे सल्ला-मसलतगार होते आणि निरंतर त्यांच्या सल्लामसलतीवर सरकारचा पूर्ण विश्वास होता."

"लोकांची हरएक बाबतींत उन्नति करण्यासंबंधानें ज्यांनीं वाचाळता केली, त्यांच्या पेक्षां किती तरी पटीनें अधिक अशी **ना० ज० शं०** यांनीं विद्याविषयक, सामाजिक प्रगतीच्या बाबतींत आणि एतद्देशियांच्या उन्नत्यर्थ मोठी कामगिरी बजाविली."

नामदार लेफ्टनन्ट कर्नल मॅरिअट यांचे भाषणाचा सारांश

"सार्वजनिक कामांत **ना० जगन्नाथ शंकरशेट** यांनीं जी आस्था आणि बालबोधपणा दाखविला व जी कर्तबगारी वेळोवेळीं प्रगट केली, त्याबद्दल मला सानंदाश्चर्य वाटतें. त्याचप्रमाणें एखाद्या क्षुल्लक बाबतींतही अगदीं उत्तम रीतीनें अंगीकृतकार्य पार पाडण्याची लालसा त्यांनीं प्रगट केली, ही गोष्ट मोठी विचार करण्यासारखी होय."

हर म्याजिस्टीज बेंच्य आफ् जस्टिसिसची सभा.

मुंबई टाऊनहाल, ता. १८ आगष्ट १८६५

ए. आर. स्कोबल एस्क्वायर–अध्यक्ष यांचे भाषणाचा सारांश.

"**ना. जगन्नाथ शंकरशेट** हे मुंबईच्या रहिवाशांस दीर्घकाल-पर्यंत पूर्णपणें माहीत होते आणि ते रहिवाशी हल्लीं ज्या अनेक

हक्कांचा उपयोग घेत आहेत, ह्याबद्दल ते नामदार मजकुराचे अत्यंत ऋणी आहेत."

"**ना० जगन्नाथ शंकरशेट** यांचा जीवनक्रम हा एतद्देशियांच्या प्रगमनकालाची केवळ मुहूर्तमेढच होय, असें ह्मटल्याशिवाय माझ्यानें राहवतच नाहीं."

"दुसऱ्या एका बाबतींत मुंबईच्या रहिवाशांनीं **नामदार जगन्नाथ शंकरशेट** यांजविषयीं आदरपूर्वक अभिमान बाळगला पाहिजे. ती गोष्ट ही कीं, जर एखादेप्रसंगीं एतद्देशीय राजेरजवाड्यांपैकीं किंवा संस्थानिकांपैकीं कोणाएकाचे मुंबईशहरांत कारणपरत्वें आगमन झालें, तर अशांचें योग्य आदरातिथ्य करण्याचा मान नेहमीं **ना० जगन्नाथ शंकरशेट** यांजकडेसच असे, आणि ती कामगिरी ते उत्तम रीतीनें बजावीत."

शेट मंगळदास नथूभाई यांचे भाषणाचा सारांश.

"**ना. जगन्नाथ शंकरशेट** हे सार्वजनिक कामास निरंतर वाहिलेले होते आणि जणूं हेंच त्यांचे ब्रीद होतें. मरहूम **सर जमशेटजी जिजीभाई** यांच्या पाठीमागून **ना. जगन्नाथ शंकरशेट** यांनीं आपलें वजन, शक्ति, आपलें व्रत आणखी आपली संपत्ति पूर्णरीतीनें लोकोपयोगी कारणांकडे लाविल्यामुळें ते मोठ्या उच्च पदवीस चढले होते."

बॉंबे ब्रँच ऑफ धि रॉयल एशिॲटिक सोसायटीची सभा

मुंबई, ता० १० आगष्ट १८६५

डॉ० उइलसन् यांचे भाषणाचा सारांश

"**ना० जगन्नाथ शंकरशेट** यांची मृत्युवार्ता ऐकून ही सोसायटी अत्यंत दिलगीरी प्रदर्शित करते. गेलीं वीस वर्षेपर्यंत ते या

सोसायटीचे एक सन्माननीय सभासद असून तिच्या आश्रयाखालीं चालत असलेल्या पुस्तकालयास ते सढळ हातानें मदत करीत असत. आपल्या अविश्रांत परिश्रमांनीं व असाधारण लोकहितैकदृष्टीमुळें ते पश्चिम हिंदुस्थानास एक भूषण होऊन राहिले होते.

डॉ० स्टोव्हेल, एम. डी. यांचे भाषणाचा सारांश

" **ना० जगन्नाथ शंकरशेट** हे या शहरांत विद्यावृद्धीकरणारांत आग्रेसर होते आणि ह्या इलाख्यांत जी विद्यारूपी अत्युच सरकारी इमारत आज आपण पहात आहोंत, ती उभारण्यांत मरहूम **सर जमशेटजी जिजीभाई**, मरहूम **बमनजी हॉर्मसजी**, मरहूम **फ्रामजी कासजी** आणि मरहूम **ना० जगन्नाथ शंकरशेट** यांचेच मुख्यतः परिश्रम कारणीभूत झालेले आहेत."

व्हिक्टोरिया म्युझिअम आणि गार्डनची सभा

टाऊनहॉल, ता० ७ सप्टेंबर १८६६

मि० मंगळदास नथूभाई यांनीं सूचना केल्यावरून आणि त्यास मि० **डोसाभाई फ्रामजी कडाका** यांनीं पुष्टीकरण देऊन सभेंत ठराव पास झाला, तो येणेंप्रमाणें:—

ही सभा आपले माजी अध्यक्ष ना० **जगन्नाथ शंकरशेट** यांच्या निधानाबद्दल अत्यंत दिलगिरी प्रदर्शित करते आणखी त्यांच्या स्मरणार्थ त्यांचा मोठा सन्मान करण्याच्या उद्देशानें त्यांची रिकामी पडलेली जागा भरून काढण्याकरितां त्यांचे चिरंजीव मि० **विनायकराव जगन्नाथजी शंकरशेट** यांनीं स्वीकारावी ह्मणून त्यांस विनंती करावी आणि त्याच्या कैलासवासी तीर्थरूपांनीं ह्या संस्थेसंबंधानें जी उत्तम कामगिरी पतकारली होती, ती तडीस नेण्याकरितां त्यांनीं आह्मांस मदत करण्याबद्दल त्यांस विनंती करावी."

ॲग्रिहॉर्टिकल्चरल् सो. ऑफ् वेस्टर्न इंडियाची सभा.

टाऊनहॉल, ता. ७ सप्तेंबर १८६५

मि. मंगळदास नथूभाई यांचे भाषणाचा सारांश.

" मुंबईंतील सर्व जातीवर्गांनीं **ना. जगन्नाथ शंकरशेट,** या संस्थेचे माजी अध्यक्ष यांच्या निधनाबद्दल जें दुःख प्रदर्शित केलें आहे, त्यांचें आपण अनुसरण करून **ना. जगन्नाथ शंकरशेट,** जे ह्या सोसायटीचे आद्यप्रवर्तक होते आणि ज्यांनीं गेलीं चार वर्षे या संस्थेची अलौकिक सेवा बजाविली आणि ज्यांनीं तीस आपल्या उदार हस्तानें मदत केली, त्यांच्या मृत्यूची नोंद ही संस्था मोठ्या कृतज्ञतेनें करिते. "

युनिव्हर्सिटी ऑफ बॉंबेची सभा.

टाऊनहॉल, ता० ६ एप्रिल १८६६

" गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं **ना. जगन्नाथ शंकर-**
शेट यांस मुं० युनिव्हर्सिटीचे फेलो नेमिलें, यांच्या सार्वजनिक उप-
युक्ततेबद्दल उल्लेख करण्याचे मला आजवर पुष्कळ प्रसंग आले
परंतु आजच्या प्रसंगीं त्यांच्या निधनामुळें एक अगदीं पुराण, कार्य-
क्षम आणि या इलाख्यांत एतद्देशियांच्या विद्याभिवृद्धीकरितां अवि-
श्रांत झटणारा पुरुष नाहींसा झाला, त्यामुळें अशा विभूतीची आप-
णांस सहसा विस्मृति पडणार नाहीं, याबद्दल माझी पूर्ण खातरी आहे."

ग्रँट मेडिकल् कॉलेजचा वार्षिक बक्षीस समारंभ.

ग्रँट मेडिकल कॉलेज

ता. ३ जानेवारी १८६६

" **ना० जगन्नाथ शंकरशेट** यांच्या वेळेपासून ज्या ज्या उप-
युक्त संस्था अस्तित्वांत आल्या आहेत, त्या प्रत्येकीस मनापासून

हातभार लावण्याचा केवळ त्यांनीं संकल्पच केला होता आणि एतद्देशियांची सुखवृद्धि करण्याकडे त्यांची नेहमीं प्रवृत्ति असे. "

वृत्तपत्रकारांचे अभिप्राय.

टाईम्स् ऑफ इंडियाचे उद्गार.

ता. आगष्ट १८६९

" **ना० जगन्नाथ शंकरशेट** यांच्या मृत्यूमुळें मुंबईच्या रहिवाशातील एक जुना, सन्माननीय आणि उपयोगी शहरनिवासी नाहींसा झाला. तो गेलीं चाळीस वर्षेंपर्यंत शहरवासियांचा खास अग्रणी होता. त्याच्या मृत्यूमुळें होणारी हानी ही लोकांस फार जाणवेल "

" मुंबई शहरांतील हिंदु रहिवाशांस त्याच्या तोलाचा, त्याची जागा चालविण्यास लायक असा पुरुष आतां मिळणें विरळा. "

" बुद्धिवैभवांत तो **नानाफडणवीस** आणि **बाबाजी दिवाणजी** यांच्या तोडीचा होता आणि तो जर सरकारच्या तैनातींत असता तर त्यास अत्युच्च अशी जागा खास प्राप्त झाली असती. याशिवाय त्याच्याविषयीं ब्रिटिशसरकारच्या संबंधानें राज्यनिष्ठपरायणतेबद्दल किमपीही शंका नव्हती "

बॉंबे गॅझेटचे उद्गार.

ता. १ आगष्ट १८६९

" **ना० जगन्नाथ शंकरशेट** हे जसे मोठे स्वधर्मपरायण होते तसेच ते कट्टे सुधारकही होते आणि त्यांस हें जें उच्चपद प्राप्त झालें, त्याचें इंगित असें आहे कीं, त्यांनीं आपलें 'स्व' सोडिलें नव्हतें. "

" लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे कायदे करणाऱ्यांपैकीं नेटिव्ह कौन्सिलरांवर त्यांनीं खात्रीनें वर्चस्व मिळविलें "

बॉंबे सॅटर्डे रिव्ह्यूचे उद्गार.

ता. ९ आगष्ट १८६६

" बुद्धिवैभवांत **नानाफडणवीस** आणि **रावराजे सर दिनकरराव** यांच्या तोडीचे **नाना** होते. "

" शिपायांच्या बंडाच्यावेळीं सरकारची बजावलेली कामगिरी आणि त्याचप्रमाणें कायदेकौन्सिलांत केलेलीं कामें हीं केवळ अमोलिक होत आणि त्यामुळें त्यांचें नांव चिरकाल राहील. "

" **नानां**सारख्या स्वतंत्र दर्ज्याच्या आणि इभ्रतीच्या माणसावर बंडाबद्दल आळ यावा हें चमत्कारिक दिसतें, परंतु त्या वावटळींतून ते मुक्त झाले आणि अराजनिष्ठतेचा लागलेला कलंक धुवून निघाला आणि त्याच्या उलट त्यांनीं ह्या बिकट प्रसंगीं सरकारास उत्तम प्रकारची मदत आणि योग्य सल्ला दिली. "

नेटिव्ह ओपिनियनचे उद्गार

ता. ६ आगष्ट १८६९.

" सन १८२२ त म्हणजे **नाना** वयांत आल्या दिवसापासून लोकसेवेकरितां जी त्यांनीं कंबर बांधिली आणि आपल्या संपत्तीचा जो योग्य विनियोग केला, तें पाहून आम्हास मोठें कौतुक वाटतें "

" **नानां**च्या पश्चात् त्यांची जागा भरून काढणें, हें जवळ जवळ अशक्यच. "

रास्त गोफ्तारचे उद्गार.

ता. ६ आगष्ट १८६५

" लोकांवर आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेनें वर्च्यस्व मिळवून ज्यांनीं आपली कीर्ति दिगंत केली, त्यांचा मृत्यु ही राष्ट्रीय-हानी होय. "

इंदुप्रकाशचे उद्गार.

ता. ७ आगष्ट १८६५

" **नानांची** राहणी एखाद्या मोठ्या उमरावाप्रमाणें आणि एखाद्या मुत्सद्याप्रमाणें नेहमीं असे. "

बॉंबे एज्युकेशनल् रेकार्डचे उद्गार.

आगस्ट १८६५.

" **ना० जगन्नाथ शंकरशेट** यांचे मृत्यूमुळें एतद्देशियांच्या विद्यावृद्धीचा एक आद्यप्रवर्तक आणि मोठा कर्तबगार पाठीराखा नाहींसा झाला. "

सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडियाचे उद्गार.

लंडन, ता० १९ सप्टेंबर १८६५

" **महाराणी सरकारचे** सेक्रेटरी ऑफ् स्टेट फॉर इंडिया, धि राईट ऑनरेबल **सर चार्लस** वुड, बॉरोनेट जी० सी० बी० (नंतर व्हायकाउंट हॅलिफ्याक्स) यांजकडून मुंबईचे ना० **गव्हर्नर साहेब** बहादूर यांस आलेली थैली येणें प्रमाणें:—

लेजिसलेटिव्ह, नं० १२

" तुमच्या कायदेकानू करणाऱ्या कौन्सिलचे एक सभासद **ना० जगन्नाथ शंकरशेट** यांच्या मृत्यूबद्दल आपल्याकडून ता० ८ आ-

गष्ट १८६९ ची नं०९ थैली पावली. त्याबद्दल आम्हांस अत्यंत वाईट वाटतें."

याप्रमाणें **नाना**नीं आपल्या वयाच्या अठरावे वर्षांपासून सार्वजनिक कामांत पडून—अखेरपर्यंत ह्मणजे जवळजवळ चार तपें लोकसेवाव्रताचें कंकण हातीं बांधून जी अमोल कामगिरी बजाविली आणि त्यांजकडून आपणास धन्य ह्मणवून घेतलें, त्यामुळें जनतेवरच केवळ उपकार केले नसून त्यांनीं आपलें सारें आयुष्य सत्कार्यीं वेंचलें आणि ह्मणून ते अवघ्या लोकांस वंदनपात्र झाले. **नानां**च्या वेळेस मुंबईशहरांत त्यांच्यापेक्षां किती तरी पटीनें अधिक असे धनाढ्य लोक पुष्कळ होते, परंतु त्यां सर्वांपेक्षां **नानां**च्या अवघ्या चरित्रक्रमाकडे सूक्ष्मरीतीनें अवलोकन केलें, तर असेंच आढळून येईल कीं, **नानां**नीं जी लोकसेवा बजाविली, ती केवळ अमोल होय. त्यांनीं आपलें सारें तन, मन, धन लोककार्यांकडे लाविलें, त्यामुळें त्यांच्या सत्कीर्तिरूपी नौबदीचा चोहोंकडे डंका वाजला यांत शंका कसली !! आणि हें स्वाभाविकच आहे कीं, ज्यानें आपलें वय सत्कर्मांत घालविलें, त्यानें सर्वांमुखीं मंगल बोलविलें. म्हणून आम्ही श्रीसमर्थांच्या शब्दांनींच ह्या ग्रंथाची परिसमाप्ति करतों, ती अशी कीं,

सत्कर्मयोगें वय घालवावें ॥
सर्वांमुखीं मंगल बोलवावें ॥

याप्रमाणें **नानां**नीं आपलें आयुष्य मंगलमय केलें आहे.

परिशिष्ट १.

ता. ३१ जुलई १८६५ रोजीं नानांचा काळ झाल्यावर लगेच थोडे दिवसांनीं मुंबई इलाख्याचे त्या वेळचे गव्हर्नर सर बॉर्टल् फ्रिअर यांनीं नानांचे चिरंजीव श्रीमंत विनायकराव ऊर्फ बाबासाहेब यांस एक दुःखवट्याचें पत्र पाठविलें. तें फार मोठें असल्यामुळें त्यांतील अवश्य तेवढा सारांश खालीं देतों:—

GOVT. HOUSE, POONA.
August 21st, 1865.

Dear Mr. Vinayak,

I have put off from day to day writing to you, knowing how unwelcome such intrusions on sorrow like yours must often be, when the family are more fully occupied with their own grief and with observances which cannot be delayed, so that they are hardly able to realize what has happened. I sent through several friends a brief expression of my sincere sympathy with you and your family and we recorded, in the public acts of the Government of Bombay, our sense of the great public loss we have sustained.

But all this very inadequately expresses what I feel both personally and in my official capacity, for I believe very few out of his own family and very intimate friends, had such a sincere regard and respect for your father as I have felt for many years past and no one had better grounds for appreciating his great value as a public man, and the immense loss–for the time quite irreparable–which his removal will be, to the whole community, as well as to Govt.

I can very warmly sympthise with you in the feeling you describe at being called on to fill his place.

* * * * * * * * * *

I need hardly tell you how willingly I will do whatever is in my power to promote the great public objects he had in view.

Kindly express to all members of your family the sincere sympathy which I and my family feel for them, and believe me

Dear Mr. Vinayak,
Very truly yours
(*Sd.*) *H. B. E. Frere.*

परिशिष्ट २.

कै० बाळकृष्ण निळाजी पितळे (पुढें डॉ० पितळे) आणि कै० विनायकराव गोपाळराव घोसाळकर–वेदपाठक—या उभयतांनीं दैवज्ञज्ञातीय क्यालेंडर व डायरेक्टरी सन १८६८ त प्रसिद्ध केली. तिच्या दोन प्रती, सर बॉर्टल् फ्रिअर, मुंबईचे माजी गव्हर्नर स्वदेशीं गेल्यावर त्यांस पाठविल्या. त्यांचा आभारपूर्वक स्वीकार करतांना एका पत्रांत गव्हर्नर साहेबांनीं नानांविषयीं उद्गार काढलेले आहेत. तें पत्र मुळांतच खालीं देतों:—

22, Princes Gardens,
February 1st 1868.

Gentlemen,

Accept my best thanks for the 2 copies of the Daivadnya Dnatiya Calendar and Directory for 1867/68 which reached me quite safely.

It seems full of accurate information very conveniently arranged and I felt especially glad to see how much space was devoted to the memory of *my respected colleague and much valued friend Mr. Jagannath Sankarsett*, who in so many ways afforded such an excellent example not only to the members of his own community but to all his fellow countrymen.

I remain,
Gentlemen,
Very faithfully yours,
Sd. H. B. E. FRERE.

Messrs Vinayakrao Gopalrao
& Balkrishna Nilaji,
5 Girgaum Back Road,
Bombay.

परिशिष्ट ३.

कै० विनायकराव गोपाळराव घोसाळकर– यांनीं वऱ्हाड प्रांताचे डायरेकटर ऑफ् पब्लिक इन्स्ट्रकशन् डा० आर. एस्. सिंक्लेअर एल्. एल्. डी. यांस सन १८६९ त, ज्याच्यामध्यें कै० ना. जगन्नाथ शंकरशेट यांच्या चरित्र विषयक बऱ्याच गोष्टींचा समावेश केलेला आहे, अशा पुस्तकाच्या तीनशें प्रती पाठविल्या. त्यांचा आभारपूर्वक स्वीकार करतांना उत्तरादाखल पाठविलेल्या पत्रांत डाक्टर साहेबांनीं नानांविषयीं उद्गार काढलेले आहेत, ते येणें प्रमाणें:—

No. 1187 of 1169-70.

To,

Mr. VINAYAKRAO GOPALRAO,

Bombay.

Dated Akola, 16th October 1869.

Sir,

I have the honour to acknowledge the receipt of your letter dated the 12th Instant and to return you, on behalf of the Educational Department here, my best thanks for the 300 copies of the Notices illustrative of the life of the late *Hon'ble Jagannathji Sankarsett–a man to whom the Bombuy Presidency owes much for his earnest labour in the cause of education,* and who showed myself many personal attentions from the time I entered the Bombay Educational Department up to his departure from amongst us. With your permisson I will make such distribution of these works as may render the Memoir of the *Hon'ble Jagannathjee Sankersett* as widely and permanently known as possible in Berar.

I have the honour &c.,
Sd. R. S. Sinclair, LL. D.
Director of Public Instruction
BERAR.

परिशिष्ट ४.

नानांचे परम स्नेही **डॉ० बर्डउड** (हल्लीं **सर जॉर्ज बर्डउड**) हे विलायतेंत अद्याप हयात आहेत. हे फारच वयोवृद्ध आहेत. बहुतेक वय जवळ जवळ ९९ वर्षांचे असावें, असा अजमास आहे. पण त्यांची तरतरी अद्याप कायम आहे. **नानांच्या** चरित्रासंबंधानें कांहीं अधिक माहिती मिळावी ह्मणून आम्ही त्यांस दोन पत्रें लिहिलीं. त्यांचीं उत्तरें त्यांनीं विलंब न लावतां आह्मांस पाठविलीं. त्या पत्रांसोबत **डॉ० साहेबांनीं** आम्हांस **नानांविषयीं** कांहीं उपयुक्त माहिती अगत्यपूर्वक पाठविली. ती सारीच फार मनोवेधक आहे, पण स्थलसंकोचास्तव आम्हास इकडे तीं पत्रें सबंध छापतां येत नाहींत, सदरहू पत्रांत आम्ही **नानांचें** चरित्र प्रसिद्ध करीत आहोंत हें पाहून त्यांस फार संतोष झाला आणि त्यांतील आमच्या केलेल्या प्रशंसेचा भाग वजा जातां बाकीचा मजकूर विचार करण्यासारखा आहे. ह्मणून आम्ही वाचकांच्या माहितीकरितां त्यांतील अवश्य तेवढा भाग खालीं देतों, तो येणें प्रमाणें:—

5, Windsor Road,
Ealing near London W.
Friday, 29th May 1914.

My dear Mr. Pitale,

In acknowledgment of yours of May 9 last, received last Saturday I write to say that I am truly delighted to hear that yon are writing a life of the late *Honourable Jagannathjee Sankarsett*; for there was no one in the notable period during which he lived with honour to Bombay and to himself more worthly of such a record of his private and public life than he. He was one of a notable group of men, Hindus and Parsis and Jews of which *Sir Jamsetjee Jijibhoy*, the first *Baronet* and *Sir*

Cowasjee Jehangir, David Sassoon, Sir Mangaldas Nathubhoy and *Setjee Jagannathjee Sankarsett* among the dead and the venerable and Honourable *Dadabhai Naorojee* among the still living stand out as the most notable—as he *Mr. Dadabhai Naorojee,* who was comparatively young as he then was, was in simple fact & truth the inspirer & leader of them all.

× × × × × × × × ×
× × × × × × × × ×

I remember your father (it should be Uncle-late Rao Saheb Ganpatrav Moroba Pitale, J. P.)-and I am glad to conclude from your being engaged so earnestly in responsible & beneficient literary work-May God help you in your good work.

Ever Sincerely Yours,
Sd. GEORGE BIRDWOOD,
(Some time Registrar of the
University of Bombay.)

To,

VINAYAKRAO MADHAVRAO PITALE, Esqr.

परिशिष्ट ५.

ह्या ग्रंथांत २८० व्या पानावर **'मुंबईचे दोस्त सर रॉबर्ट ग्रँट आणि नाना'** या सदरांत दिलेल्या मजकुरांत **सर रॉबर्ट ग्रँट** साहेबांच्या मृत्यूनंतर त्यांचें कांहीं स्मारक करण्याकरितां भरलेल्या सभेंत नानांचें जें भाषण झालें, तें येणेंप्रमाणें:—नाना म्हणाले:—

"I cannot conceive any act we could possibly perform in commemoration of the amiable deceased which would be so gratifying to his name and so likely to perpetuate his renown for philanthropy and kind heartedness to our children's children, as the foundation of a Medical College, to be designated after him, whom we so deeply and with so much justice deplore."

परिशिष्ट ६.

पोवाडा नानाशंकरशेटजींचा

दैववान **नाना शंकरशेट** विज्याती ॥ केली केवढी उभय वंशांत उभयतां ख्याती ॥ ध्रु० ॥ नाकळे कुणाला विचित्र हरिची माया ॥ क्षणमात्रें दिनावर लाविल छत्र धराया ॥ **बाबुलशेटीवर** पडली कृपेची छाया ॥ ते पुण्यवान ती धन्य पवित्र जाया ॥ **शंकरशेट** आला पोटीं कीर्त कराया ॥ जाली प्राप्त लक्ष्मी आणि आरोग्य काया ॥ चा० ॥ वाढली मानमान्यता जगामध्यें मोठी ॥ पाहिल्या पडे भ्रम केवळ धनाची पेटी ॥ नावडे गोष्ट कल्पांतीं कोणाची खोटी ॥ चा० ॥ कडकडीत कठीण मर्जी ॥ जैसा फर्जी निर्भय गर्जुन बोले ॥ संतत संपत अनकुल ॥ नाहीं प्रतिकूळ ॥ या भरपणांत डोले ॥ बाछाय आपले घरचे ॥ लाल हरींचे !! त्या योग्य तैसे तोले ॥ चा० ॥ बहुत बळें संपदा मिळविली ॥ मुळापासुन औदसा पळविली ॥ विष्णुसहित लक्ष्मी वळविली ॥ चा० ॥ आहारे **शंकरशेट** धनाढ्य ॥ भाग्यवान भोळे महाराज ॥ कुटुंब संरक्षणाचें जहाज ॥ डामडौल नाहीं मीजाज ॥ दीन दुबळ्यांचे गरीब नवाज ॥

× × × × × × × × × × ×
× × × × × × × × × × ×

॥ चाल ॥ सात्विक सगुण जाहले ॥ सुशिल पाहिले मणी स्वजात गोतांत ॥ कडी तोडे कंठ्या मुद्या पेट्या चकचकीत हातांत॥ खुपसुरतपाक मोहरा ॥ स्वच्छ चेहरा जन भपकुन पाहतात ॥ चाल ॥ दयावंत वचनाचे भक्तिवान गंभीर मनाचे ॥ एक एक झाले पुरुष धिराचे ॥ प्रपंचिक आणि परोप——

परिशिष्ट ७.

पोवाडा भिवंडीचा.

मुसलमान×××××इमान सत्याचा थारा ॥ बिकटराज्य इंग्रेज शेवटीं उर्फाटा मारिल मारा ॥ उलटकलीचा वारा तेरावे सद्दीचा काय जोरा ॥ अविंध मनिं इच्छिती मराठी धर्म आपण बुडवूं सारा ॥ मालमस्त कुणि हालमस्त म्हणती हा निश्चय निर्धारा ॥ पाहूं एखादी संधी करून कटीबंध आपण घालूं मारा ॥ देशोदेशीं करून ठेविला बेत परि न चाले जोरा ॥ भिवंडीमध्यें समामुजावर परि बारा घरचे बारा ॥ हे शके १७६९ उगवतां हेमलंबी सवंत रामजन्म तत्वतां ॥ नऊदिवस आनंदाचे करिती भावें कीर्तन कथा ॥ रामजन्म होतांच झुल्यावर मूर्त्ति झुलविती डोल्लारा ॥ एकादशिचा छबिना शहरामध्यें भिरवितो परभारां ॥ मुसलमान० ॥ १ ॥ चैत्रशुद्ध द्वितीयेचे दिवशीं मुसलमान मोहरम आला ॥ डोल्लाऱ्याचा दिवस घरोघर करूं लागले रणदुल्ला ॥ घेऊन फेकिरी बांध गळ्यामध्यें घालुन नाड्याच्या माळा॥ घरघर मागून खिचडा बनाऊन खाती करिती बिसमिल्ला ॥ करून भंग पंचरंग घुटुनिया घेती सबजेचा प्याला ॥ सदा धुंद कैफांत मस्तबेमस्त तार आली डोळां॥ एकसजामुजावर **अहमद** खाटी मिठी ॥ तो **मदनपिल्या** आणि **काजी पिल्या** खटखटी ॥ **कबरू बुराण** तोही पडला हटी ॥ **अंबीरपाटील, मोहिदिन** **इंडी** सदोदीत पोकळ तोरा ॥ **बंधुभोजा भिक्या पाउल्या** याचाही ऐसा धारा ॥ मुसलमान० ॥ २ ॥ **अंबिरपाटिल, फकऱ्या, पिल्या, रहिमान्या** तो तांबोळी॥ पानसुपारी विकतां विकतां अवबुद्धि कोठुन आली॥ तीळ खुरासण्या मोठ्या करंज्या आणुनियां घाणा घाली ॥ आली अवदसा

पुरती सपाट्यामध्यें आला **आव्या** तेली ॥ **दिन महंमद** लोखंड कुटणारा उगाच झाला बेताली ॥ पुढें येईल कामास मगरुमी कोण होईल तुमाचा वाली ॥ मिळुनियां हजारों केला त्याहीं कटाव॥ येत्या बाजारीं करूं लागले घटाव॥ त्यामध्यें निघालें दहा दिवस ठेले छिटाव ॥ गलेकुची रस्त्यानें धांवतां एकच केला दणकारा ॥ कांहिंकांच्या हातीं सोटे काठ्या कांहिंकांच्या हातीं तल-वारा ॥ मुसलमान० ॥ ३ ॥ भिवंडी कसबेंमध्यें छबिना निघतो सारे शहरांत ॥ एकदशीच्या दिवशीं साल दरसाल मिरवितो बहरांत ॥ दशमिस जरी काढावा तरी त्या दिवशीं कत्तलकी रात ॥ दुसऱ्या दिवशीं अबिंध ताबूद घेऊन आले बाजारांत। शिवपूजेचा नगारा वाजतां आले धांवुन देवळांत ॥ श्रीविठ्ठलाचीं मूर्त्त फोडली पहा केवढा केला घात ॥ गणपती शांबाच्या केल्या ऐशापरी ॥ घण उचलोनी घातला नंदीच्या वरी ॥ पहा केवढी केली जबरदस्ती ॥ कांहीं धाक नाहीं अंतरी ॥ **नाना विठ्ठलशेठ** पुढें होऊन सर्वांचा अधिकारा। म्हणे मी लाविन शिक्षा भिवंडीमध्यें नाहीं अविंद यांसी थारा ॥ मुसल-मान० ॥ ४ ॥ **नाना विठ्ठलशेट** जाऊन मुंबईस केली चतुराई ॥ **नानाशंकरशेठ** तयांची भेट घेतली लवलाहीं ॥ मूर्ती पुढें ठेविल्या कशा भंगल्या विठ्ठल रखुमाई ॥ धनी तुहीं समर्थ मराठीधर्म आपण राखा कांहीं ॥ पूर्वीं दैत्य माजले गांजिल्या द्वापारीं ब्राह्मण गाई ॥ पृथ्वी येतां शरण कसें निर्दाळण केलें भगवंताहीं ॥ यासमयीं करा उपकार आम्हांवर आतां ॥ जें झाले तें हो बरें नये सांगतां ॥ **नाना** ही बंदोबस्त केला स्वतः **निर्वेल** साहेबासी लिहिलें चारी तत्वता ॥५॥ मुसलमान० ॥ ५ ॥ महालकरी कमाविसदार मनसुभे कारितात ते मानत नाहीं ॥ **कऊल साहेब पेन साहेब** कैद केले मग त्याहीं ॥

कैद करून ठाण्यास रवाना बेत ठरविला सर्वांहीं ॥ द्रव्य खर्चें लागेल तो करूं वकील दाखऊं हरिपाही ॥ वळख आपुली दरबारीं काय करणार मराठे गरिबांहीं ॥ सदर आदालत करूं भिऊं नका होईल आपुली फत्ताई ॥ ठेविले जज्जसाहेबांनें शेशनावरी ॥ मग पडलें विचारी गोष्ट दिसत नाहीं बरी ॥ येईल कीं कांहीं बाजू आपल्यावरी ॥ मोठेमोठे अब्रुदार तेव्हां ते होते सदरेच्या दरबारा ॥ त्यांस लिहून धाडिलें सोडवा आह्मी नाहीं विसरूं उपकारा ॥ मुसलमान० ॥ ६ ॥ जुस्तीच्या वेळेस दिले संटेन्स अखेरचा झाला शेरा ॥ पाईं बेड्या ठोकून घातल्या आला चौऱ्यांशीचा फेरा ॥ पायशृंखळा घालुन अटक केली बिकट फार बंदोबस्ती ॥ सक्तमजूरी करा भात ध्या आठशेरी पोटापुरती ॥ नित्य उठून दररोज भिंवडीकर कैदी खपा सडके वरती ॥ बरी करा गवताची खुरपणीं पाणी शिपा बंगल्या भवतीं ॥ घेऊन डोईवर धोंडे चला निट मांडवीच्या रस्त्यावरती ॥ गेले वडील **नानाशंकरजी**ला शरण ॥ आम्हीं गरीब झालों गाय नका देऊं मरण ॥ आली चिठी लिहून दरबारी तेव्हां झालें तरण ॥ दिले फैल जामीन नविन झाला जन्म नूतन आले संसारा ॥ **सदन सखाराम** ह्मणे सुटून गेले कहींक दिवसां माघारा ॥ मुसलमान × × × × × इमान सत्याचा थारा ॥ बिकट राज्य इंग्रेज शेवटीं उफोटा मारिल मारा ॥ ७ ॥

परिशिष्ट ८.

आमचे मित्र रा. रा. **रामकृष्ण माधवराव चोणकर** यांनीं कांहीं वर्षांपूर्वीं प्रसिद्ध केलेल्या **दैवज्ञ डायरेक्टरी** नांवाच्या पुस्तकाच्या मळपृष्ठावर खालीं लिहिलेली कविता आहे, तींत **नानांचें** नांव चमत्कारिक रीतीनें गोंवलेलें आहे. याखेरीज कविता रचणारानें

आपलेंही नांव गोवलें आहे. तीं नांवें आह्मी जाड्या टाइपांत दाखविलेलीं आहेत. ह्या कवितेवरून आम्हास कविचूडामणि **मोरोपंत** यांनीं रचलेल्या **दामरामायणा**ची आठवण होते. ती कविता खालीं लिहिल्याप्रमाणें आहेः—

आर्या.

ज		न्मुनियां नरदेहीं	**कै** क सदाही करीं बरें का	ज
	ज	गपालक हरि त्याचें	**ना** म जगीं राखि सर्वदा ला	ज
गं		गा नीर स्थिरता	**रा** हे त्याचें धरोनि मति अं	ग
	गं	गाधरीं मन धरी	**य** मक जसें कवनिं या करी सं	ग
न्ना		णी मनीं कवण तो	**ण** पण अहों तें नचें प्रसंप	न्ना
	न्ना	नास विश्व माने	**ल** क्ष्मी गुण शास्त्र विभव संप	न्ना
थ		कली नमुनी परिते	**क्षु** द्र मति स्वीकरी न जनना	थ
	थ	रथरती रिपु सारे	**म** लिन करूं ये कुणा न तत्पं	थ
जी		जी ह्मणे जन परी	**ण** न भावा ओळखे असे रा	जी
	जी	वास तोष देते	**जी** वन शास्त्र स्वयें जना पा	जी
शं		काच मनीं न धरी	**व** त्तें साधावयास पुण्यां	श
	शं	भु प्रिय तो प्राणी	**ग** र्वे न देतां जनास द्रव्यां	श
क		पट जया पुढतीं हो	**ळ** ळळ करी नित्य फार निश	ङ्क
	क	रि त्या जनीं बहु दया	**दै** वें जो होय पीडिला र	ङ्क
र		मणीय मुख तयाचें	**व** चन तसें नित्य शुद्ध आचा	र
	र	मती कवी असो तेंऽ	**ज्ञ** वदनिं हि गाजतो यशोभा	र
से		वीन दुष्कृतीनें	**धु** ळ कां कोणी धरील हो पा	से
	से	वक तैसा जन लो	**ळे** पदिं तो राजया परी दी	से
ट		वटवित तो कळांनीं	**क** रि जन थक्क स्वयें सदा धी	ट
	ट	ळतीं विघ्नें यशातें	**र** मवी मन्मन कदा नये वी	ट

शुद्धीपत्र.

पान.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
१४	१८	१६३७	१७३७
२३	१९	खळलेल्या	खवळलेल्या.
२९	२४	प्रासाद चिन्हानि	प्रसाद चिन्हानि
४०	२४	घोडबंदर	घोडबंदर.
४५	४	दुग्धलता अमृतधनें.	दग्धलता अमृतघनें.
६३	१	लहानपणासुन	लहानपणापासून.
७०	७	सत्य असें तरि विद्या दानाशीं तुल्य आणि पुण्य आणिक न ॥	सत्य असें तरि विद्या दान तुल्य पुण्य आणिक न ॥
९९	३–४	लोकरच	लौकरच
१०२	१६	ther	their.
१०४	३	हक	हक्क
१०९	४	ग्रॉट	ग्रँड
११२	८	पूर्ण	पूर्व
१२८	५	इन्स्टिट्यूड	इन्स्टिट्यूट
१३२	१३	सौतुक	कौतुक
१५१	२–१	घोडबंदर	मुरबाड
१४९	१०	श्रीरामचंद्रजी–भुलेश्वर.	हें देवालय नानांचें नव्हे त्यांचे हल्लींचे वंशज सांगत
१७०	११	समत	समजूत
२३१	६–७	मुलींची शाळा श्रीमंत रावजी विनायकराव जगन्नाथ शंकरशेटं यांनीं स्वखर्चानें अद्यापपर्यंत चालविली आहे.	ही शाळा कमिटीनें चविली आहे, असें मागा समजलें.



श्री. रा. रा. मधुसूदन रावजी वि. ज. शंकरशेट, बी. ए., एल्‌एल्. बी.
हे नानांचे पणतू हल्लीं सॉलिसिटरचा अभ्यास करीत आहेत.

चित्रकारः–

रा. मो. ना. कीर्तीकर.

बॉंबे आर्ट प्रिंटिंग वर्क्स.



श्रीमंत रावजीशेटच्या बाकीच्या मुलांचा संघ-भूप.

चित्रकारः-
रा. मो. ना. कीर्तीकर.

बॉंबे आर्ट प्रिंटिंग वर्क्स



Cover Pages Printed at
The Bombay Art Printing Works,
20-24, Custom House Road, Fort, Bombay.